# संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांची भूमिका

# १९२० ते १९६०

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्या शाखांअंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध

संशोधकाचे नाव

प्रा. बिरूदेव महादेव कोकरे

मार्गदर्शकाचे नाव

डॉ. अमोल शंकरराव विद्यासागर

मे २०१५

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

## Tilak Maharashtra University

## Vidyapeeth Bhavan, Gultekdi, Pune - 37.

# CERTIFICATE

This is to certify that the dissertation entitled ***"Samyukta Maharashtra Chalwal Va Vrutapathrchi Bhumika 1920 to 1960"*** which is being submitted herewith for the award of the Degree of (Doctor of Philosophy) Vidyawachaspati (Ph.D.) in History under the faculty of Moral and Social Sciences of Tilak Maharashtra University, Pune is the result of original Research work completed by **Mr. Kokare Birudeo Mahadeo** under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this dissertation has not formed the basis for the award of any Degree or similar title in this or any other university of examining body.

**Research Guide**

**(Dr. Amol Shankarrao Vidyasagar)**

**Asst. Prof. Department of History,**

**Aabasaheb Garware College, Karve Road,**

**Pune - 411004**

**Date :**

**Place : Pune**

# प्रतिज्ञापत्र

मी, श्री बिरूदेव महादेव कोकरे ( PRN No. 02109011653 ) लिहून देतो की, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांची भूमिका (१९२०-१९६०) ह्या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलीत केली असून त्याचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. आणि सदर माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र उपयोग केलेला नाही.

बिरूदेव महादेव कोकरे

संशोधक विद्यार्थी

# ऋणनिर्देश

आज हा शोधनिबंध सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे. २००० साली गणपती पाहण्याच्या निमित्ताने पुण्याला आलो आणि काय माहीत या शहराच्या मी इतका प्रेमात पडलो की, येथेच राहण्याचे ठरविले. मुळातच लहानपणापासून शिक्षणाची आवड त्यामुळे एकीकडे उदरनिर्वाहासाठी मिळेल ते काम करणे आणि दुसरीकडे शिक्षण अशा संघर्षातून शिकत असताना मला प्रत्येक टप्प्याला पुण्यातील खूप चांगली माणसे भेटली. त्यांच्या कृपेमुळेच मी शिकू शकलो. त्या सर्वांच्या बद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

इतिहास व पत्रकारिता हे माझ्या आवडीचे विषय. इतिहास हा विषय अभ्यासाला अगोदर आला. इतिहास आणि पत्रकारिता यांचा संबंध काय? अशी शंका येऊ शकते. पण इतिहासाचे सर्व व्यापिकत्व आणि पत्रकारितेच व्यापिकत्व लक्षात घेता हे समजणे फार अवघड नाही. हे संशोधनपर लेखन साकार होत असताना अनेकांचे सहकार्य लाभले. प्रथम माझे मार्गदर्शक डॉ. अमोल विद्यासागर यांनी वेळात वेळ काढून बहुमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच ज्येष्ठ समाजवादी विचारवंत भाई वैद्य, अर्थपूर्ण मासिकाचे संपादक श्री. यमाजी मालकर, सकाळ वृत्तपत्राचे संपादक मल्हार अरणकल्ले, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. श्रद्धा कुंभोजकर, बाबासाहेब चितळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील इतिहास विभागाचे डॉ. नलिनी वाघमारे, डॉ. प्रवीण जाधव, डॉ. माणिक सोनवणे, एच. व्ही. देसाई कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. गणेश राऊत हे स्वत: अनेक कामात व्यस्त असतानाही माझ्या उपलब्ध वेळेला महत्त्व दिले. माझ्या छोट्या मोठ्या शंकेचे निरसन केले. वेळोवेळी मला सहकार्य करून प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

ज्यांनी मला नेहमीच मदत करून प्रोत्साहन दिले असे माझे हितचिंतक श्री. अरविंद साखळकर, सौ. स्वाती साखळकर, सारस्वत बँकेचे श्री. चंद्रशेखर वागळे, महाव्यवस्थापक दिलीप तावडे, मधुसत्वचे संपादक सुनील मांजरेकर, श्री. एन. आर. कुलकर्णी, राष्ट्र सेवा दलाचे विमलताई गरुड, सिंधूताई काटे, भरत लाटकर यांनी वेळप्रसंगी मार्गदर्शन करून माझ्या मनात नवीन प्रेरणाही निर्माण केली. त्याबद्दल त्यांचे शब्दांत आभार मानणे औपचारिकपणाचे वाटत असले, तरी अत्यंत आवश्यक आहे. मी त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

या संशोधनासाठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सकाळ ग्रंथालयातील श्री अविनाश गाडेकर, चंद्रकांत कुलकर्णी, मनोज धनलोभे, एस. एम. जोशी फाउंडेशन, मधू दंडवते ग्रंथालय, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालयातील, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मुंबई विद्यापीठातील ग्रंथपाल कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या सहकार्यामुळे मला ग्रंथालयातील सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच संदर्भसाहित्य मिळवून देण्यात मदत केली. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

ज्यांच्या आठवणीशिवाय हे प्रबंध पुरे होऊ शकत नाही असे सारस्वत बँकेचे अध्यक्ष आदरणीय कै.एकनाथ ठाकूर साहेब, ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. ग. प्र. प्रधान, मृणालताई गोरे, दत्ता ताम्हाणे, डॉ.शांती पटेल, कॉ. गोविंद पानसरे यांच्या आठवणीने नेहमीच डोळ्यांत अश्रू येतील ते आज हयात नाहीत. त्यांची उणीव नेहमीच भासणार आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या कामी अनेक मित्रांनी सारस्वत बँकेतील सहकाऱ्यांनी व हितचिंतकांनी मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या प्रोत्साहन दिले. त्या सर्वांचा उल्लेख इथे करणे शक्य नसले, तरी त्या सर्व ज्ञात अज्ञात मित्रांचा हितचिंतकाचा सदैव मी ऋणी आहे.

# विशेष आदरणीय आभार

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक, कुलसचिव डॉ. उमेश केसकर, सहाय्यक कुलसचिव श्री. जगदीश साळवे यांनी विद्यापीठात पीएच.डी. पदवीसाठी प्रबंध लिहिण्याकरिता बहुमोल संधी उपलब्ध करून दिली. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

तसेच सकाळ, इंडिया फाउंडेशनने फेलोशिप देऊन आर्थिक मदत केली. म्हणून हे प्रबंध पूर्ण होऊ शकले. त्यांचाही मी अत्यंत मन:पूर्वक आभारी आहे. तसेच माझी पत्नीने अभ्यासामुळे घराकडे दुर्लक्ष झाले तरी मला समजून घेतले. यामुळे माझी पत्नी सौ. वैभवी, भाऊ महाळाप्पा, तसेच आई-वडील श्री. महादेव व सौ. कांताबाई यांचाही मी आभारी आहे.

माझ्या प्राणाहुतीनेही तिच्या श्रमयज्ञाची सांगता होणार नाही अशा माझ्या परमप्रिय आदर्श, त्यागशील, अनुकरणीय, मातापित्यास कृतज्ञपूर्वक अर्पण.

बिरूदेव कोकरे

## अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | |
| | मार्गदर्शकांचे पत्र | |
| | ऋणनिर्देश | |
| पहिले | | १-५४ |
| | संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांचा उदय विकास | |
| दुसरे | | ५५-११० |
| | प्रस्तावना व संशोधन आराखडा | |
| तिसरे | | १११-२६० |
| | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका | |
| चौथे | | २६१-३०७ |
| | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांनी हाताळलेली विविध आंदोलने | |
| पाचवे | | ३०८-३२६ |
| | निष्कर्ष | |
| | परिशिष्ट क्र.१ | ३२७-३२८ |
| | प्रश्नावली | |
| | परिशिष्ट क्र.२ | ३२९-३७१ |
| | मुलाखती | |
| | परिशिष्ट क्र.३ | ३७२-३८६ |
| | संदर्भसूची | |
| | परिशिष्टे क्र. ४ | |
| | अ. अग्रलेख सूची | ३८७-३९० |
| | ब. बातमी लेख सूची | ३९१-३९३ |
| | क. नकाशा सूची | ३९४ |
| | ड. छायाचित्र व व्यंगचित्रे सूची | ३९५-४११ |
| | इ. संयुक्त महाराष्ट्रासाठी हुतात्मा झालेल्याची नावे | ४१२-४१४ |

# प्रकरण पहिले

## संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांचा उदय विकास

१.१ प्रस्तावना

१.२ महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.३ दार कमिशनची नियुक्ती

१.४ जेव्हीपी समिती

१.५ आंध्र राज्याची निर्मिती

१.६ नागपूर करार

१.७ राज्य पुनर्रचना समिती

१.८ शंकरराव देव यांचा द्वि भाषिकांचा पर्याय

१.९ त्रिराज्याय योजनेविरुद्ध विरोधकांचे आंदोलन

१.१० संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीकडे वाटचाल

१.११ संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती

१.१२ वृत्तपत्रांचा उदय

१.१३ वृत्तपत्रांच्या निर्मितीपूर्वी भारतातील स्थिती

१.१४ भारतातील वृत्तपत्रांचा उदय

१.१५ भारतीय भाषिक वृत्तपत्रांची सुरुवात

१.१६ मराठी वृत्तपत्रांची निर्मिती

१.१७ समारोप

# प्रकरण पहिले

# संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांचा उदय विकास

## १.१ प्रस्तावना

महारड्ढ, राष्ट्रिक अशा अनेक शब्दांनी युक्त आहे. या प्रदेशातील जनताही प्राचीन क उत्तर आणि दक्षिण भारताच्या मध्यावर असलेल्या महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. या प्रदेशाला प्राचीन काळात दण्डकारण्य म्हटले जात असे. तसेच हा प्रदेश दक्षिणपथ म्हणून ही ओळखला जातो. अगस्ती ऋषींनी दक्षिण भारतात पहिल्यांदा प्रवेश केला आणि त्यांनी तीन समुद्रांतील जलाचे प्राशन केले, अशी आख्यायिका आहे. महाराष्ट्र हा शब्द प्राचीन काळापासून प्राकृत भाषेचा स्वीकार व वापर करत आहे. महाराष्ट्राच्या प्राचीन कालखंडात सातवाहन, चालुक्य, वाकाटक, राष्ट्रकूट, यादव या राजघराण्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. सह्याद्रीच्या पर्वत शिखरांमध्ये पसरलेला महाराष्ट्र हा इतिहासातील अनेक घटनाक्रमांमुळे विखुरला गेला. त्यातील मराठवाड्याचा प्रदेश हा मुघल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर निजामाच्या हैद्राबाद राज्यात राहिला, तर विदर्भ हा प्रदेश केंद्रीय मध्य प्रांताचा भाग बनला. अशा वेळी या महाराष्ट्राला एकत्र आणण्यासाठी भाषावार प्रांतरचनेनंतर मोठी चळवळ उभी राहिली. या चळवळीला संघटित करण्याचे काम या प्रदेशातील वृत्तपत्रांनी केले. तथापि या प्रदेशाची खरी ओळख प्राचीन आणि मध्ययुगीन काळात विविध ऐतिहासिक घराण्यांनी केलेल्या कामगिरीतून अधिक प्रकट होते. सातवाहन, चालुक्य, वाकाटक, राष्ट्रकूट आणि यादव यांच्या काळात महाराष्ट्राच्या संस्कृतीची खरी जडणघडण झाली. तथापि महाराष्ट्राला राष्ट्रीय जीवनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. इ.स. सन ६ जून

१६७४ साली शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि दक्षिणपथावर हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. अशा प्रकारे 'महाराष्ट्राची अस्मिता' छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडापासून अस्तित्वात आली. स्वामी रामदासांनी 'महाराष्ट्र धर्माचे' आचरण करण्याचा सल्ला मराठीभाषकांना दिला होता. पेशव्यांच्या राजवटीत बहुसंख्य मराठीभाषक प्रदेश अनेक प्रांतात व देशी संस्थानात विभागले गेले.[१]

पुणे येथील केसरी वृत्तपत्राच्या अग्रलेखातून मराठी भाषकांसाठी राज्याच्या विभाजनावर नापसंती व्यक्त करण्यात आलेली होती. १८९१ मध्ये आणि त्यापुढील कालखंडात विशेषतः लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना १९०८ ते १९१४ या काळात 'केसरी' चे संपादक न. चिं. केळकर यांनी मराठीभाषकांच्या एकीकरणाचा एक मजबूत घाट घातला होता. त्यांनी मुंबईचे मराठीभाषक भाग आणि बेरारसारखे प्रांत यांचे एकत्रीकरण करावे अशी सातत्याने मागणी केल्याचे दिसते. त्यातच श्रीधर व्यंकटेश केतकर हे स्वतंत्र भाषिक राज्याचे पुरस्कर्ते होते. मराठी ही महाराष्ट्राची अधिकृत भाषा व्हावी, ही त्यांची इच्छा होती. तरीही स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची कल्पना ग. वि. केतकर व न. चिं. केळकर या दोघांनीही उघडपणे मांडलेली नव्हती. मात्र न. चिं. केळकर केसरीचे संपादक असताना 'केसरी' वृत्तपत्राने मराठीभाषकांच्या राज्याची कल्पना मांडलेली होती. यावरूनच ''१८९१ मध्ये पुण्याच्या 'केसरी'ने मराठी प्रजेची वेगवेगळ्या प्रांतात आणि संस्थानात विभागणी करणे चुकीचे आहे.''[२] असे परखड मत मांडले. यावरून केसरी वृत्तपत्राची ही टीका मराठी राज्याच्या स्थापनेच्या मागणीचा प्रारंभ होता, असे म्हणता येईल. व लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना केसरी वृत्तपत्र संपादकांची जबाबदारी न. चिं. केळकर यांनी स्वीकारली. १९०८ ते १९१७ या

कालावधीत त्यांनी मुंबईचे मराठी भाषिक भाग आणि विदर्भ बेरार यांसारख्या प्रांताचे एकत्रीकरण करण्यात यावे. अशी परखड भूमिका मांडून त्याचा सातत्याने पाठपुरावा केला.

याचा केसरी वृत्तपत्राने मराठीभाषक एकत्रीकरणावर भर दिला होता. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या काळापासूनच सबंध मराठी भाषिकांचे राज्य असावे, अशी भावना जनतेमध्ये निर्माण होत गेली. लोकमान्य टिळक यांच्या केसरी व मराठा या दोन वृत्तपत्रांनी आधुनिक महाराष्ट्राच्या विचारांचा पाया घातला. महाराष्ट्रातील कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा अशा सर्व क्षेत्रांत लोकमान्य टिळकांनी जी दूरदृष्टी दाखवलेली होती, तीच दूरदृष्टी त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीतही दाखविली. केसरी या साप्ताहिकाचे दैनिकात रूपांतर झाल्यानंतर लोकमान्यांचे नातू जयंत श्रीधर टिळक याची संयुक्त महाराष्ट्र समितीचे सचिव म्हणून निवड झाली. त्यांनी आपल्या आजोबाच्या विचारांची धुरा समर्थपणे पुढे चालवून लोकमान्यांचे संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले. त्या काळी प्रकाशित होणाऱ्या मराठी वृत्तपत्रांवर लोकमान्य टिळकांची विलक्षण छाप दिसून येते. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील लोकमान्य टिळकांची चतुःसूत्री स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही त्यांच्या कार्यकाळात मराठी वृत्तपत्रांनी नेटाने उचलून धरली. त्यामुळेच लोकमान्यांच्या विचारांचा प्रभाव ब्रिटिश राजवटीच्या आमदानीतील महाराष्ट्राप्रमाणेच तत्कालीन विदर्भाचा जो भाग संयुक्त प्रांतात होता त्यावरही पडला होता. एवढेच नाही तर निजामाच्या राजवटीखाली असलेल्या मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लोकमान्य टिळकांनी राजकीय जागृती घडवून आणली होती. लोकमान्यांच्या विचाराने खानदेश व कोकण हा महाराष्ट्राचा

उर्वरित भागही प्रभावित झालेला होता. याचाच अर्थ असा की, महाराष्ट्राच्या सर्व भागात टिळकांनी भाषिक एकतेची राजकीय जागृती घडवून आणली आणि पर्यायाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे महाराष्ट्राच्या एकीकरणास हातभार लावला. म्हणूनच त्यांच्या या बीजसूत्राचे प्रतिबिंब संयुक्त महाराष्ट्रात सुरू असलेल्या व्यापक चळवळीमध्ये पडल्याचे दिसून येते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास अभ्यासण्यापूर्वी महाराष्ट्र प्रांताची जडणघडण कशी झाली, या बाबतच्या ऐतिहासिक संदर्भाची पार्श्वभूमी जाणून घेणे आवश्यक आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, वाकाटक आणि यादव या ऐतिहासिक वैभवशाली राजघराण्यांनी महाराष्ट्राची जडणघडण केली. महाराष्ट्राच्या भूमीवरच छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्र धर्माचे रक्षण करण्यासाठी 'हिंदवी स्वराज्य' स्थापन केले. संयुक्त महाराष्ट्राची व्यापक अशी बैठक खऱ्या अर्थाने प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात भक्कमपणे कशी उभी राहिली, त्याचा थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

## १.२ महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्र हा शब्द महारठ्ठ, राष्ट्रिक या शब्दापासून बनला आहे. ''ह्युएनत्संगाने त्यांच्या प्रवास वर्णनात दक्षिणेत मोहलिसे म्हणजे तीन महाराष्ट्र असल्याचे नमूद केले आहे आणि मराठी माणूस हा काटक, शूर, पराक्रमी आणि तेवढाच स्वाभिमानी आहे. तो दिलेला शब्द पाळतो आणि त्याचा कोणी अपमान केल्यास त्याचा बदला घेतल्याशिवाय राहत नाही''[३] असे मराठी माणसाचे वर्णन केले आहे. ह्युएनत्संगाच्या तत्कालीन प्रवासवर्णनातील मराठी माणसाचे वर्णन विचारात घेतल्यास या भूमीत वास्तव्यास

असलेला मराठी माणूस स्वत्वासाठी भाषिक एसकतेसाठी प्रादेशिक एकतेसाठी जागा होणार नाही, हे विरळच. स्वाभिमानी मराठी माणसांनी आपली स्वतंत्र अस्मिता जपून भविष्याकडे वाटचाल केली.

दक्षिणपथी वैभवशाली महाराष्ट्राची ओळख अतिप्राचीन काळापासून उपलब्ध आहे. अशा महाराष्ट्राच्या भूमीवर राष्ट्रकूट, वाकाटक, सातवाहन, चालुक्य, यादव अशा वैभवशाली राजवटींनी अनेक वर्षे राज्य केले. सातवाहन सम्राटाने दक्षिणपथावर सुमारे साडेतीनशे वर्षे राज्य केले. त्यांच्याच राजवटीत प्राकृत भाषेचा विकास झाला. हे मराठी भाषेचे आद्य रूप होय. गोदावरी नदीच्या उगमापासून हा प्रदेश अश्मक म्हणून ओळखला जातो. पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे दक्षिणपथी महाराष्ट्राच्या पाऊलखुणा सापडलेल्या आहेत. ''नाणेघाटामधील शिलालेखात गौतमीपुत्र सातकरणी याचा उल्लेख दक्षिणपथपती असा आहे.''[४] यावरून त्या काळातील महाराष्ट्राला दक्षिणपथ ही संज्ञा दिली जात होती. हे स्पष्ट होते असे मत ल.रा.पांगारकर यांनी मांडले आहे. दक्षिणेतील अति प्राचीन मानवी संस्कृतीच्या पाऊलखुणा औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रात आढळतात. अश्मयुगीन संस्कृतीबरोबरच नंतरच्या काळात स्थानापन्न झालेली ताम्रपाषाण संस्कृतीही याच दक्षिणपथात नावारूपाला आली. प्रारंभी भारतात जी सोळा महाजनपदे होती, त्यापैकी अश्मक आणि मूलक ही दोन राज्य भूमीत होती. ''बौद्ध वाङ्मयात राष्ट्रिक आणि महारठ्ठ हे महाराष्ट्राशी संबंधित शब्द पहिल्यांदा आले आहेत. सम्राट अशोकाने आणि त्यानंतर मोगलीउत्ताने दक्षिणेकडे बौद्ध धर्मप्रचारक पाठवले होते. हे प्रचारक जिथे गेले, त्यामध्ये राष्ट्रिक किंवा महारठ्ठ असे प्रदेशनाम आले आहे.''[५]

औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणमधील एक वैदिक धर्माभिमानी बाबरी यांनी गौतम बुद्धांची परीक्षा घेण्यासाठी आपल्या सोळा शिष्यांना उत्तरेमध्ये श्रावस्ती येथे पाठवले होते. हे प्रचारक जिथे गेले त्यामध्ये राष्ट्रिक व महारट्ठ असे प्रदेशनाम आलेले आहे.

महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा उदय नेमका कधी झाला याबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. देश आणि राष्ट्र या संज्ञा आजकाल राजकीय व सामाजिक दृष्टिकोनातून वापरल्या जातात. 'रट्ठ' शब्दांचेच संस्कृत रूप राष्ट्रिक असून भोज स्वतःला महाभोज म्हणत असत. असे मत डॉ. भांडारकर यांनी मांडले. त्याचप्रमाणे राष्ट्रिक आपणास महाराष्ट्रीक म्हणत असत, महाराष्ट्र हे नाव कोणत्याही जाती किंवा वंशावरून पडले नसून ते प्रदेशाच्या विस्तारावरून पडले. असे मत पा. वा. काणे यांनी मांडले आहे. सातवाहन काळात महाराष्ट्राच्या जीवनाची सांस्कृतिक जडणघडण झाली. पुढे चालुक्य व राष्ट्रकूट काळात महाराष्ट्राचा विस्तार झाला. ''पुराणामध्ये शूर्पारक (सोपारे), अश्मक (गोदा खोरे दक्षिण भाग), कुंतल (कृष्णा खोरे), अभिर (नाशिक, खानदेश), दण्डक (डांग), विदर्भ (वऱ्हाड), इ. प्रदेशांबरोबर महाराष्ट्र अशी संज्ञा येते.''[६]

व्ही. डी. महाजन यांच्या मते, ''सातवाहनाच्या मूल स्थानाबद्दल इतिहासकारांत मतभेद असले, तरी प्रतिष्ठान ऊर्फ पैठण ही त्यांची राजधानी आहे, याबाबत आता एकमत झाले आहे.''[७] सातवाहनांच्या काळात कला, स्थापत्य व भाषेचा विकास झाला. महाराष्ट्रातील पैठण, जुन्नर, कराड, कोल्हापूर, तेर, भोकरदन, इत्यादी शहरे व्यापाराची केंद्रस्थाने बनली. पुढे चालुक्य काळात वेरूळ, घारापुरी इत्यादी ठिकाणी कला व

स्थापत्याची प्रगती झाली. या काळात महाराष्ट्राची आर्थिक भरभराट होऊन प्रगतीच्या अनेक दिशा खुल्या झाल्या. पुढे वेरूळच्या राष्ट्रकुटांनी महाराष्ट्र व कर्नाटकावर अधिराज्य स्थापन केले. या घराण्याचा संस्थापक दंतीदुर्ग हा लक्तलूर किंवा लातूरचा राहणारा होता. वेरूळचे कैलाश लेणी ज्याच्या कारकीर्दीत कोरली गेली तो राजा कृष्ण पहिला स्वतःला कंधारपूरवराधीश्वर असे म्हणवतो. राष्ट्रकुटांनी महाराष्ट्राप्रमाणेच उत्तर भारतामध्ये राजस्थानातील प्रतिहार आणि बंगालमधील पाघराण्यावर आपले वर्चस्व स्थापन केले होते. राष्ट्रकुटांच्या अस्तानंतर कल्याणी चालुक्याने काही काळ राज्य केले. त्यानंतर आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण देवगिरीच्या यादवांनी घातली. आरंभी नाशिक, चांदवड येथे राज्य करणाऱ्या यादवांनी पुढे सेऊनदेश म्हणजे खानदेश आणि औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी येथे आपले सत्ताकेंद्र स्थापन केले. सिंघनदेव व आमनदेव यानंतर रामचंद्रदेव यादवाने देवगिरीच्या सत्तेचा उत्कर्ष केला. यादव सम्राट हे मराठी भाषेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या काळात चक्रधरांनी महानुभाव पंथ स्थापन केला आणि मराठी भाषेचा प्रसार केला. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेत रचला. पु. ग. सहस्त्रबुद्धे म्हणतात, ''कृष्णदेव यादवाने क्षीण झालेल्या धर्माला त्यांनी तरुणता प्राप्त करून दिली.''[८] अशा प्रकारे यादवांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा पाया घातला. चक्रधराच्या लीळाचरित्रात महाराष्ट्राचा सांस्कृतिक भूगोल प्रकट झाला आहे. पुढे या महाराष्ट्राला बळकट करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केले. रयतेमध्ये स्वराज्य स्वधर्म स्वभाषा व स्वसंस्कृती विषयी जागृती घडून आणली. त्याच्यामुळेच मराठी मानसात अस्मिता निर्माण झाली. १८१८ साली ब्रिटिशांनी पेशव्यांचा पराभव करून महाराष्ट्रावर ताबा मिळविला. त्यानंतर मुंबई प्रांतावर

इंग्रजांचे वर्चस्व राहिले. त्यात महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही प्रांतांचा समावेश होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुंबई राज्य उदयास आले. या परिस्थितीमध्ये कर्नाटक, मध्य प्रदेशात विखुरलेल्या महाराष्ट्राला एकत्र आणणे ही काळाची गरज होती आणि ते कार्य संयुक्त महाराष्ट्र चळवळीने केले.

मराठी भाषिक लोकांनी महाराष्ट्राच्या एकीकरणाचा विचार २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून सुरू केला. त्यामध्ये साहित्य संमेलनाचा महत्त्वाचा वाटा आहे. म्हणूनच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या ऋणानुबंधामध्ये, मराठी भाषिकांमध्ये एकी करण्याची ओढ साहित्य संमेलनातून झाली असे मत मांडलेले आहे. देशाच्या विविध भागांत विखुरलेल्या मराठीभाषकांना एकत्र करणे, त्यांचे संघटन करणे व त्यांना नेतृत्व देणे या तीनही बाबी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी अपरिहार्य होत्या. या तीनही बाबींचा विचार करता असे दिसते की, देशाच्या विविध भागात पसरलेल्या मराठीभाषकांमध्ये आपण एकत्र यावे, ही भावना होती. त्याचबरोबर विविध भाषक प्रदेशांना एका ध्वजाखाली एकत्र आणण्यासाठी प्रभावी संघटन कार्याची जरुरी होती. त्याप्रमाणे समाजाच्या सर्व स्तरांतून प्रभावी नेतृत्व लाभून या प्रदेशांना एका समान सांस्कृतिक धाग्याने बांधून ठेवणे आवश्यक होते. या तीनही सूत्रांचा एकत्र विचार केला असता असे दिसून येते की, संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश कोणी आणला, या प्रश्नाचे उत्तर शोधताना या तीनही घटकांचा विचार करावा लागतो. समर्थ सामुदायिक नेतृत्वाप्रमाणेच लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक होते आणि अशी जनजागृती करण्यासाठी वृत्तपत्रांनीच पुढाकार घेतला. त्यामुळे प्रस्तुत संशोधनामधील ‘संयुक्त

महाराष्ट्र चळवळीत वृत्तपत्रांची भूमिका' हा या संशोधनाचा मुख्य गाभा होय. जर तत्कालीन वृत्तपत्रांनी यथायोग्य जनजागृती केली नसती तर संयुक्त महाराष्टाचा मंगल कलश १९६०पर्यंत मराठी जनतेच्या हाती लागला नसता. याबाबतचे हे सूत्र सिद्ध करण्यासाठी क्रमाक्रमाने शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून प्रस्तुत प्रबंधात नवी मांडणी करण्यात आली आहे.

ब्रिटिशांनी १९११ नंतर भारताची भाषेच्या आधारावर पुनर्रचना करावयास सुरुवात केली. त्यामुळेच बंगालची फाळणी व बिहार या दोन प्रांतात विभागणी झाली. ''१९३६ साली बंगाल, पंजाब व संयुक्त प्रांत या प्रांताबरोबर सिंध, ओरिसा, आसाम व सरहद्द प्रांत या नव्या भाषक राज्याची स्थापना करण्यात आली.''[९] प्रांतिक भाषिक राज्याची बाब विचारात घेऊनच १९१५ साली लोकमान्य टिळकांनी सर्व मराठी भाषिकांना एकत्र आणण्याची आणि त्याची प्रांताच्या भाषावार पुनर्रचना करण्याची मागणी केलेली होती. ''लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाने तयार झालेल्या १९१९ च्या काँग्रेस डेमॉक्रॅटिक पक्षाच्या जाहीरनाम्यातील कलम १० मध्ये भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती.''[१०] भारतात भाषावार प्रांतरचना हा विचार १९१७ मध्ये पट्टभी सीतारामच्या यांनी मांडला होता. पण त्यांची मागणी हवेतच विरली. त्याकडे इंग्रजी सत्ता व स्वदेशी यांनी लक्षच दिले नव्हते. मराठी भाषकांचे विभाग एकत्र करण्याची कल्पना उघड करण्याचे श्रेय जयपूरच्या विठ्ठल वामन ताम्हणकरांना द्यावे लागते. ''१९१७ मध्ये लोकशिक्षण मासिकातील 'त्रिभंगलेला महाराष्ट्र' या लेखात त्यांनी मुंबई, सी.पी.बरोबर येथील मराठी भाषकांचाच उल्लेख केला असे नसून हैद्राबादमधील तसेच गोव्यातील

पोर्तुगीज कॉलनीत राहणाऱ्या मराठी भाषकांचाही त्यात उल्लेख केला.''[११] विनोबा भावे, धनंजयराव गाडगीळ यांचा महाराष्ट्र एकीकरणाचा पाठीराख्यांना पाठिंबा होता. श्री.भावे यांनी महाराष्ट्र धर्म या जर्नल मध्ये महाराष्ट्र हा २५ जिल्ह्यात समाविष्ट व्हावा, अशी मागणी केली. त्यांनी मुंबई सी.पी.बरोबरचे १८ जिल्हे हैद्राबादचे ५ मराठवाड्यातील जिल्हे इतर दोन जिल्ह्यातील मराठी राजघराण्यांचा समावेश होता. ''हैदराबाद संस्थान आणि वऱ्हाड मध्यप्रांत येथील मराठी भाषकांचा मुलूख मुंबई राज्यातील मराठी भाषक जिल्ह्यांना जोडावा आणि अशा तऱ्हेने विभागलेला महाराष्ट्र एकसंध करावा ही कल्पना स्पष्टपणे १९१७ साली जयपूरच्या प्रा. विठ्ठल वामन ताम्हणकर यांनी 'लोकशिक्षण' मासिकात प्रथम मांडली.''[१२]

विठ्ठल वामन ताम्हणकर यांनी ग. ग. जांभेकर यांच्या लोकशिक्षण मासिकात मांडलेली ही कल्पना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे उगमस्थान म्हटली जाते. तत्कालीन महाराष्ट्रावर लोकशिक्षण या मासिकाचा विलक्षण प्रभाव होता. सुशिक्षित व साक्षर वाचकांची एक पिढीच या मासिकाने घडविली. खासकरून मध्यमवर्गीय, विचारशील असा मिळालेला वाचकवर्ग हे या मासिकाचे वैशिष्ट्य होते या मासिकाने वेगवेगळ्या कल्पना मांडल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह अन्यत्र पसरलेल्या मराठी वाचकांमध्ये या कल्पनेबद्दल कुतूहल आणि जिज्ञासा निर्माण झाली. लोकशिक्षण मासिकाच्या वैचारिक प्रभावाबरोबर संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचा गतीने प्रसार झाला आणि विचारशील मराठी तरुण या दिशेने वाटचाल करू लागला. पुढील २० वर्षांच्या काळात वर्तमानपत्रातील लेखन, सभा, संमेलने यातून होणारे जागरण आणि पोषक

विचारमंथन याद्वारे संयुक्त महाराष्ट्राची कल्पना सुशिक्षित मध्यमवर्गीय विचारवंतांनी मांडण्यास सुरुवात केली. तेच या कल्पनेचे मूळ बीजांकुर होते. पुढे वृत्तपत्रांनी त्यास खतपाणी घातल्यामुळे थोड्याच काळात या बीजांकुरांचा वटवृक्ष झाला. ही प्रक्रिया कशी वेगाने घडून आली ते या संशोधनातून तपासले आहे.

भारतात प्रांताची फेररचना भाषेच्या आधारावर करावी अशी काँग्रेस पक्षाची १९२० पासून मागणी होती. १९२० च्या नागपूर काँग्रेस नंतर मराठी भाषिक प्रदेशात मुंबई महाराष्ट्र वऱ्हाळ आणि नागपूर प्रदेश काँग्रेस समित्यांची स्थापना झाली होती. आचार्य विनोबा भावे यांनी त्यांच्या महाराष्ट्र धर्म या लेखात संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचा पुरस्कार केलेला होता. त्यामुळे सर्व महाराष्ट्रभर त्या दृष्टीने विचार मंथनाला सुरुवात झाली. गांधी युगात भारतीय राष्ट्रीय चळवळीचा चौफेर विकास झाला. पण महाराष्ट्रात अगदी टिळक युगापासून एकविचार पक्का होता की, भारत हा राष्ट्रांचा समूह आहे आणि भारताचा खऱ्या अर्थाने राष्ट्र म्हणून विकास करावयाचा असेल तर भारताची फेररचना भाषेच्या आधारावर केली पाहिजे. ''भाषावार राज्य बनविणे ही एक देश बांधण्याची कामगिरी आहे. या दृष्टीने विचार करूनच १९२० सालापासून दरवेळी या संकल्पनेचा उच्चार झाला.''[१३] १९२० साली काँग्रेसची जी घटना तयार करण्यात आली, त्यामध्ये भाषावार प्रांतरचनेला मान्यता देण्यात आली होती. मोतीलाल नेहरू व सप्रू यांच्या समितीने भारतीचे घटनेचे जे चित्र कल्पिले त्यामध्ये ही भाषिक राज्यनिर्मितीचे तत्त्व गृहीत धरले होते. जोपर्यंत स्वराज्य मिळाले नव्हते तोपर्यंत या प्रश्नावर काँग्रेसमध्ये काही वाद नव्हताच. ''स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी गांधीजींनी

वेळोवेळी भाषावार प्रांतरचनेचे समर्थन केले होते. ब्रिटिशांशी लढताना काँग्रेस कमिट्यांची उभारणी भाषिक तत्त्व स्वीकारूनच झाली होती.''[१४] भारताला स्वतंत्र व लोकशाही घटना देण्याचे जे जे प्रयत्न झाले. त्या प्रत्येक प्रयत्नामधून भाषावार प्रांतरचनेचे नाव मान्य केले गेले होते.

प्रशासकीय सुलभता तसेच शिक्षण व संस्कारासाठी समान भाषा, इतिहास व संस्कृती जपण्यासाठी पूरक विचारमंथन घडविण्यासाठी सुद्धा भाषावार प्रांतरचना ही वरदान ठरणारी होती. दक्षिण भारतामध्ये मराठी, कानडी, तेलुगू हे भाषिक समूह इंग्रजांनी विविध प्रदेशांत वेगवेगळ्या पद्धतीने टाकले होते. मराठवाडा हा प्रदेश जसा हैद्राबाद राज्यात होता त्याचप्रमाणे कर्नाटकातील बिदर, गुलबर्गा, रायचूर हा प्रदेश हैद्राबाद राज्याचा भाग होता. अशा वेळी भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार ते भाषिक प्रदेश त्या त्या भाषिक टप्प्यात समाविष्ट करणे ही एक अपरिहार्य बाब होती. तत्त्वतः मान्य करण्यात आलेले भाषावार प्रांतरचनेचे सूत्र गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांच्या निर्मितीसाठी पोषक ठरले. त्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीस अधिक जोर चढला.

पहिल्या महायुद्धानंतर भारताला घटनात्मक सुधारणा देण्यासाठी नेमलेल्या मॉटेग्यू चेम्सफर्ड कमिशनने या प्रश्नांची चर्चा केली होती. महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व हाती घेतल्यानंतर १९२१ साली राष्ट्रीय काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा पुरस्कार केला. १९२४ साली महात्मा गांधीजींनी भाषिक

प्रांतरचनेला मान्यता दिली होती व काँग्रेसची पुनर्घटना त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला. १९२५ मध्ये मोतीलाल नेहरू कमिटीपुढे बोलताना दोन कम्युनिस्ट युवकांनी महाराष्ट्र हा सार्वभौम भारताचा समाजवादी भाग असावा अशी मागणी केली होती. प्रबोधनकार ठाकरे यांनी ही महाराष्ट्रासहित सर्व भाषिक राज्याच्या निर्मितीचा आवश्यकता प्रतिपादन केली होती. १९२८ साली भारतामध्ये आलेल्या सायमन कमिशनने आपल्या अहवालात म्हटले होते की, ''जेथे एक भाषा बोलणाऱ्या प्रदेश एक घटकराज्य होण्यासारखी परिस्थिती असेल तेथे त्या प्रदेशातील लोकांच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास करण्याच्या दृष्टीने समान भाषा हे एक सामर्थ्यवान व स्वाभाविक असे साधन ठरेल.''[१५] भारतात आलेल्या सायमन कमिशनने काही अंशी नेहरू कमिशनमधील शिफारशी मान्य केल्या. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली १९३७ साली भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा ठराव एकमताने संमत करण्यात आला होता.''[१६] १२ मे १९४६ मधील बेळगाव साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग.त्र्य.माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा ठराव मांडून नियोजित मराठीभाषक राज्याचा भूप्रदेश व सीमारेषा याचा स्पष्ट उल्लेख केलेला होता.

समर्थ रामदासांनी मांडलेली महाराष्ट्र धर्माची कल्पना संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पूरक ठरली. आचार्य विनोबा भावे यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्र धर्म' या लेखात ही बाब ती उचलून धरली या कल्पनेचा पुनरुच्चार केला. पोतदार यांनी केलेली मीमांसा अर्थपूर्ण होती. त्यांनी गतकालीन इतिहास व संस्कृतीचे धागेदोरे लखात घेऊन

महाराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सर्व मराठीभाषक समूहांना एका छताखाली आणण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली होती. असा संयुक्त महाराष्ट्र निर्माण केल्यामुळे मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या विकासाला नव्याने चालना मिळू शकेल, असा आशावाद त्यांनी प्रकट केला होता. त्यांच्या प्रदीर्घ भाषणातील समारोपाचा हा मुद्दा सुशिक्षित मराठी तरुणांच्या मनाला अंतर्मुख करणारा ठरला. त्यांच्या विचारांचे प्रामुख्याने दोन फायदे झाले. एक म्हणजे संयुक्त महाराष्ट्र हा महाराष्ट्र धर्म या कल्पनेच्या रक्षणासाठी आवश्यक आहे, ही बाब सर्वांच्या लक्षात आली आणि दुसरे म्हणजे असा महाराष्ट्र धर्म कृतीमध्ये आणण्यासाठी सर्व मराठीभाषकांनी संकल्पसिद्ध व्हावे त्यासाठी जाणीवपूर्वक पावले टाकावीत, असा एक विचार समोर आला. त्या दृष्टीने विविध पक्षोपपक्षांमध्ये विखुरलेली नेतेमंडळी याबाबत विचार करू लागली आणि त्यांची पावले संयुक्त महाराष्ट्राच्या दिशेने पडू लागली. तरीही कृतीसाठी सामान्य जनतेचा दबाव. असा रेटा आवश्यक होता आणि तो निर्माण करण्यासाठी तत्कालीन मराठी भाषिक वृत्तपत्रांनी आपले लेख, अग्रलेख आणि बातम्या याद्वारे यामधून चळवळीची पार्श्वभूमी तयार करण्यास प्रारंभ केला. या संमेलनानंतर पुढील दोन दशकानंतर म्हणजे १९४० ते १९५० आणि १९५० ते १९६० या दोन दशकाचा काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळ गतिमान होऊ लागली व या चळवळीने अल्पावधीत आपली वाटचाल यशाच्या दिशेने सुरू केली. म्हणून यामधील दोन दशके अत्यंत महत्त्वाची ठरली. यापैकी पहिले दशक हे पूर्वतयारीसाठीचे होते तर दुसरे दशक हे निर्णायक यशाचे होते. या सर्व वाटचालीमध्ये आपले संपूर्ण योगदान देऊन त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे यशस्वी हा टप्पा कसा गाठला गेला व त्यामध्ये मराठी भाषिक वृत्तपत्रांनी कसा पुढाकार घेतला ते या प्रबंधात

अभ्यासावयाचे आहे. कोणतीही चळवळ निर्णायक दिशेने सफल होण्यासाठी तेथील विचारशील वर्गात प्रथम जागृती होणे आवश्यक असते, अशी जागृती तत्कालीन वृत्तपत्रांनी घडवून आणली. त्यामुळे वृत्तपत्रांचे या संबंधातील कार्य अभ्यासताना त्यांच्या क्षमतांचा, मर्यादांचा विचार करून समतोल विश्लेषण करणे हा या प्रबंधाचा गाभा होय. त्या दृष्टीने मूळ वृत्तपत्रे व त्यातील पुरावे शोधण्यावर प्रबंधामधून भर दिला आहे.

१९३८ मध्ये बॅ. रामराव देशमुखांनी मराठी भाषिक वऱ्हाड प्रांत मध्य प्रदेशातून वेगळा काढावा, असा ठराव मांडला होता. तशा आशयाचा ठराव १९३८ च्या काँग्रेस अधिवेशनात मंजूर होऊन ब्रिटिश सरकारला पाठविण्यात आला. वि. दा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑक्टोबर १९३८ साली मुंबई मराठी साहित्य संमेलन भरले होते. त्या संमेलनातून मराठीभाषक प्रदेशांचा प्रांत निर्माण व्हावा, असा ठराव मंजूर झाला होता. १९३९ मध्ये अहमदनगर १९४० मध्ये रत्नागिरी आणि १९४१ मध्ये सोलापूर येथे भरलेल्या साहित्य संमेलनामधून एकभाषी मराठी राज्याच्या मागणीचा पाठपुरावा करण्यात आला नोव्हेंबर १९३९ मध्ये काही पत्रकार व लेखकांनी लोकांना संयुक्त महाराष्ट्र संघटनेत सामील होण्याचे आवाहन केले. ग.त्र्य.माडखोलकर, दामोदर विश्वनाथ गोखले, श्रीपाद शंकर नवरे, त्र्य. व्यं. पर्वते पटवर्धन आणि इतरांनी यावर सह्या केल्या. त्या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी २८ जानेवारी १९४० रोजी 'महाराष्ट्र सभेची' स्थापना झाली होती. बॅ. देशमुख हे त्या सभेचे अध्यक्ष होते. तेव्हापासून संयुक्त महाराष्ट्र हे नाव पुढे आले. काँग्रेस समाजवादी पक्षाने नाशिक अधिवेशनातील कामकाजात भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नावर एक ठराव मंजूर केला होता. त्या

ठरावामध्ये घटना समितीने भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्वीकारावे आणि राज्याची पुनर्रचना घडवून आणावी असे स्पष्ट करण्यात आले. ''संयुक्त महाराष्ट्र सभेने २४ मे १९४० रोजी महाराष्ट्र एकीकरण परिषद भरविली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे परिषदेचे स्वागताध्यक्ष होते.''[१७]

डॉ. तु. ज. केदार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद भरविण्यात आली. त्यात एकीकरणाच्या संदर्भात विचारविनिमय करण्यात आला. १८ ऑगस्ट १९४० रोजी लोकनायक अणे यांच्या पुढाकाराने वर्धा येथे रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाडी कार्यकर्त्यांची बैठक झाली. तीत महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या चळवळीस साहाय्य करणे, हे आपले कर्तव्य त्यांनी मानले ज.स.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० व ३१ मे १९४३ रोजी मुंबई येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेत संपूर्ण महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव मांडण्यात आला. ३ ऑक्टोबर १९४३ रोजी महाविदर्भ परिषदेचे दुसरे अधिवेशन डॉ. मुकुंदराव जयकर यांच्या आधिपत्याखाली अमरावती येथे भरले त्यात महाराष्ट्र एकीकरणास साहाय्य करण्याचा संकल्प करण्यात आला.

वेगवेगळ्या भागात भरलेल्या साहित्य संमेलने ही चळवळीच्या पहिल्या टप्प्याचा प्रारंभ बिंदू मानली जातात. कारण स्वतः दत्तो वामन पोतदार यांनी साहित्य संमेलनात जी कल्पना मांडली होती तिचे पर्यवसान या चळवळीत झाल्याचे दिसून येते. कोणताही विचार हा प्रथम बीजरूपात मांडला जातो, नंतर त्याचे पर्यवसान एखाद्या

आंदोलनात किंवा चळवळीत कसे होते याचा विचार करताना वातावरणनिर्मिती हा घटक महत्त्वाचा ठरतो. जोपर्यंत प्रभावी वातावरणनिर्मिती होत नाही तोपर्यंत कोणत्याही चळवळीला जोर चढत नाही. जनमत घडविण्यासाठी वृत्तपत्रासारख्या जबाबदार प्रभावी माध्यमातून जे चिंतन घडते ते निश्चितच समाजजीवनाला नवी दिशा देण्यासाठी पोषक ठरू शकते.

१९४० ते १९५० या कालखंडातील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमधील पहिल्या टप्प्यात मराठी भाषिक वृत्तपत्रांनी प्रामुख्याने तीन प्रकारे योगदान दिलेले आहे. पहिले म्हणजे या वृत्तपत्रांनी प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी लोक आणि नेते यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. दुसरे म्हणजे स्वातंत्र्याचा लढा दृष्टिपथात येत असताना त्याबरोबरच महाराष्ट्र राज्य स्थापनेसाठी प्रयत्न करणे कसे आवश्यक आहे, हे मांडण्यास सुरुवात केली आणि वृत्तपत्रांनी शासन, समाज व संस्कृती या तीनही घटकांवर प्रभाव टाकून संयुक्त महाराष्ट्राच्या दिशेने जनमानसाची जडणघडण करण्यास सुरुवात केली. ही प्रक्रिया अवघड होत्या, परंतु काळाच्या प्रवाहाबरोबर भाषिक मराठी वृत्तपत्रांनी हे शिवधनुष्य समर्थपणे उचलले आणि ते पेलविण्यास जनमताची मशागत केली. जनमताची प्रक्रिया दोन दशकात कशी गतिमान झाली आणि त्यातून संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश वृत्तपत्रांनी कसा आणला याबाबतचे निदान या प्रबंधात करावयाचे आहे. त्यासाठी वर्तमानपत्रातील विविध आशय व तत्कालीन सामग्रीचा भाष्य करण्याचा प्रयत्न यामधून केलेला आहे. त्यासाठी संशोधनातील अभ्यासामध्ये ऐतिहासिक समाजशास्त्रीय पद्धतीचा वापर करून शोधसमस्येची नव्याने मांडणी केलेली आहे. अशी मांडणी करताना

सूत्ररूपृष्ठे काही तथ्ये येथे मांडलेली आहेत आणि अशी तथ्ये एकत्र करून त्यातून एक नवा ऐतिहासिक सिद्धांत पुढे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अखिल भारतातील सर्व प्रदेशाच्या तुलनेत जागरूक मराठी वृत्तपत्रांनी बजावलेले कार्य इतिहासाला निश्चितच कलाटणी देण्यासाठी याचा मागोवा घेऊन त्या अनुषंगाने कसे पोषक, त्याबाबत येथे तत्त्व आणि व्यवहार या दोनही दृष्टीने सूत्ररूप विवेचन करण्यावर प्रबंधामध्ये भर दिलेला आहे.

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीने १९४६ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे आहे. १२ मे १९४६ रोजी बेळगावात पत्रकार, कादंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली ३०वे मराठी साहित्य संमेलन भरले होते. त्या वेळी वऱ्हाड, मराठवाडा आणि गोमांतक हे तीन भाग अनुक्रमे ब्रिटिश, निजाम, पोर्तुगीज या तीन भिन्न राज्यसत्तेच्या आधिपत्याखाली नांदत होते. तीन कोटी मराठी भाषकांपैकी सुमारे ९० लाख लोक या तीन भागांमध्ये राहत होते. या वस्तुस्थितीकडे श्रोत्यांचे लक्ष वेधून माडखोलकरांनी महाराष्ट्रातील सर्व पक्षांच्या, जातीच्या आणि धर्माच्या कार्यकर्त्यांना महाराष्ट्राच्या एकीकरणाची हाक दिली. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात यावा, अशी तजवीज करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात यावी, असा ठराव आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी मांडला. ते म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्र समितीचा हा प्रश्न सर्व मराठीभाषकांच्या जीवन–मरणाचा प्रश्न आहे. केवळ ह्या एकासाठी हे साहित्य संमेलन भरले आहे, हे जरी नमूद झाले तरी महाराष्ट्राच्या इतिहासात हे संमेलन अमर होईल यात मुळीच शंका नाही.''[१८]

तिसाव्या मराठी साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे रणशिंग फुंकण्यात आले. त्यातील अध्यक्षीय भाषणात करण्यात आलेले सुतोवाच हे या लढ्याची नांदी ठरले. मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण मराठी वृत्तपत्रांनी उचलून धरले. त्यातील विचारांचा गाभा संघर्षाची मांडणी करणारा होता. मराठी भाषकांचे एकत्रीकरण हा म्हणावा तेवढा सोपा मार्ग नाही. तो काट्यांनी भरलेला आहे. मराठी भाषकांची एकत्र येण्यासाठी सामुदायिक संघर्ष केला तरच त्यातून काही नवे मतांतर घडू शकेल, असा आशावाद या भाषणांनी निर्माण केला. हे भाषण या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एक महत्त्वाचा दस्तावेज म्हटले पाहिजे. कारण महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी ब्रिटिश सरकारचे लांगूलचालन करणाऱ्या महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांशी लढा द्यावा लागणार होता. तसेच स्वातंत्र्यानंतर मुंबई द्विभाषिक राज्य नष्ट करून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मोरारजी देसाई यांच्यासारख्या प्रबळ नेत्याशी सुद्धा झुंज द्यावी लागणार होती. ही बाब त्याच्या भाषणानंतर सर्वांच्याच नजरेच आली. त्यासाठी अनुकूल विचारमंथन आणि राजकीय फेरजुळवणीस पोषक अशा मांडणीस प्रारंभ झाला. ही मांडणी कशी करण्यात आली हे पुढील भागात अधिक प्रभावीपणे स्पष्टपणे होईल.

१२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे आयोजित केलेल्या साहित्य संमेलनामध्ये ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसंदर्भात अत्यंत महत्त्वाची भूमिका मांडली. प्रादेशिक स्वायत्त आणि चतुःसीमेवरील जनतेच्या मताबाबत सदर संमेलनात दोन महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. शिवाय याच संमेलनात संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली. यातूनच संयुक्त महाराष्ट्राला सुरुवात झाली. ''पण

साहित्य संमेलन किंवा मराठी साहित्य परिषद हे काही राजकीय समस्या सोडविण्याचे व्यासपीठ नव्हे. म्हणून २८ जुलै १९४६ रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' ही सर्वपक्षीय आणि अपक्षीय संघटना जन्माला आली.''[१९] शंकर देव, केशव जेधे, भाऊसाहेब हिरे, देवकीनंदन नारायण, डॉ. धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी आदी नेते या परिषदेत होते. ही परिषद सर्व पक्षीय संघटना होती. परंतु काँग्रेस नेत्यांचे तिच्यावर वर्चस्व होते. अखिल महाराष्ट्राची प्रतिनिधी या रूपृष्ठे १९५५ पर्यंत तिने संयुक्त महाराष्ट्रासाठी कार्य केले. या परिषदेने आपल्या ठरावात असे स्पष्ट केले की, हिंदुस्थानातील लोकशाही राज्यघटना यशस्वी करण्यासाठी भाषावार प्रांतरचना करणे हे स्पष्ट आवश्यक असून सर्व सलग मराठी भाषा प्रदेशाचा एक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करण्यात यावा. या ठरावामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात साहित्यिक विचारवंत आणि राजकारणी यांनी एकत्र आले व त्यांनी देशातील इतर भागाप्रमाणे आपली मराठी अस्मिता साकार करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. महाराष्ट्र वऱ्हाड आणि नागपूर भागातील मराठी भाषक नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा पाठपुरावा करण्याच्या उद्देशाने परस्परांशी विचारविनिमय करून ८ ऑगस्ट १९४७ रोजी 'अकोला करार' केला. या करारानुसार संयुक्त महाराष्ट्र हा वेगळा प्रांत निर्माण करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. त्या प्रांताअंतर्गत पश्चिम महाराष्ट्र आणि महाविदर्भ असे उपप्रांत असावेत, असे सुचविण्यात आले. दोन प्रांताची कार्यक्षेत्रे निर्धारित करून त्यासाठी स्वतंत्र विधिमंडळ व मंत्री मंडळ असावीत. मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या मागण्या अमान्य झाल्यास सर्व मराठीभाषक नेत्यांनी महाविदर्भाच्या मागणीला पाठिंबा द्यावा, असे ठरविण्यात आले. घटना परिषदेने

उपप्रांताच्या कल्पना फेटाळून लावली. तसेच ''दार आयोग, जेव्हीपी (जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, पट्टभी सीमारामय्या) समितीच्या अहवालात प्रांताच्या भाषावार पुनर्रचनेबाबत प्रतिकूलता व्यक्त करण्यात आल्याने घटना परिषदेत हा प्रश्न तात्पुरता मागे पडला.''[२०]

अशा प्रकारे भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न हा अनेक चढउतारांनी भरलेला असून त्यात कधी अनुकूलता तर कधी प्रतिकूलता असा ऊन–सावल्यांचा खेळ चालू होता. त्यामुळे आशा व निराशा अशा अनेक चढ–उतारांतून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला मार्गक्रमण करावे लागले. परंतु अनुकूलतेची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ ठेवणे आणि आपल्या ध्येयावर अविचल श्रद्धा ठेवून वाटचाल करणे ही मराठी माणसांची संस्कृती असल्यामुळेच हा लोकलढा यशस्वी होऊ शकला आणि त्यातून एक नवे विचारपर्व उदयास आले.

भाषावार प्रांतरचनेस काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते प्रतिकूल होते. अशा वेळी महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांना त्यांच्या विरोधात उघड भूमिका घेणे अशक्य होते. त्याचा फायदा घेऊन महाराष्ट्रातील समाजवादी, कम्युनिष्ट, शेतकरी कामगार पक्ष इत्यादी डाव्या पक्षांनी काँग्रेसविरोधी जनमत संघटित करण्यासाठी प्रथम संयुक्त महाराष्ट्र समिती आणि नंतर संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून भाषावार प्रांतरचनेचा व महाराष्ट्राच्या एकीकरणाचा लढा संघटित केला आणि तो तेवढाच जोमाने पुढे चालविला.

''मुंबईसह महाराष्ट्राच्या मागणीचा महात्मा गांधी, सरदार पटेल, पंडित नेहरू

वगैरे काँग्रेस श्रेष्ठींचा विरोध होता. आझाद, राजाजी, आचार्य कृपलानी हे नेते भाषावार प्रांतरचना करण्यास फारसे उत्सुक नव्हते. भारताच्या फाळणीस मान्यता द्यावी लागल्याने भाषावार प्रांतरचना केल्यास देशात फुटिर प्रवृत्ती वाढीला लागून देशाचे आणखी तुकडे पडतील असे भय वाटत होते. याउलट पट्टभी सीतारामय्या, एन. जी. रंगा, रंगाराव दिवाकर, निजलिंगाप्पा, शंकरराव देव, केशवराव जेधे हे काँग्रेसच्या दुसऱ्या फळीतील नेते भाषावार प्रांतरचनेचे स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने दिलेले वचन पाळावे, असा आग्रह धरीत होते. काँग्रेसच्या नेत्यांपैकी फक्त राजेंद्रप्रसाद यांचा पाठिंबा होता.''[२१] राजेंद्र बाबूच्या या हालचालींमुळे अखेर एस.के.दार यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारला आयोग नेमणे भाग पडले असे असले तरी प्रांतातील सभेने काँग्रेस मंत्रिमंडळांनी मात्र या प्रश्नाबाबत तटस्थतेचेच धोरण स्वीकारले. वास्तविक काँग्रेस मंत्रिमंडळांनी तटस्थतेची भूमिक द्यावयास नको होते.

काँग्रेस मंत्रिमंडळांनी घेतलेल्या तटस्थ भूमिकेचा फायदा विरोधी पक्षांना म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र समितीला झाला. संयुक्त महाराष्ट्र समितीने केंद्र सरकारच्या विरोधात म्हणून त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करून काँग्रेस विरोधात वातावरण तापविण्यास सुरू केले. अशा ताणतणावाच्या वातावरणातील पार्श्वभूमीवर महाराष्ट्राध्ये वृत्तपत्रांचा उदय कसा व केव्हा झाला, हे संशोधनाच्या दृष्टीने समजावून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

## १.३ दार कमिशनची नियुक्ती—

भारताच्या घटना समितीपुढे भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न आणावा असा आग्रह मुंबईमध्ये झालेल्या परिषदेने धरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अशीच मागणी परिषदेकडे केली. त्यामुळे या मागणीला समूळ जोर आला.

घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनाही भाषावार प्रांतरचनेचे महत्त्व समजले होते म्हणूनच त्यांनी १७ जून १९४७ मध्ये न्यायाधीश एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली दार कमिशनची स्थापना केली. कमिशनने आपली अधिकार कक्षा ठरवून घेऊन भाषावार प्रांत करावेत किंवा नाही? भाषावार प्रांत रचना करताना कोणते प्रांत कसे बनवावे? आंध्र, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती करणे सोयीचे आहे किंवा कसे? अशा प्रश्नांवर दार कमिशनने चौकशी करून आपला अहवाल सादर करावा असे ठरविण्यात आले.

दार कमिशन समोर मराठी भाषिक प्रांत रचनेची मागणी एकमुखाने करण्यासाठी निवडक कार्यकर्त्यांची ८ ऑगस्ट १९४७ रोजी अकोला येथे बैठक झाली. या बैठकीमध्ये शंकरराव देव, मा. सां. कन्नमवार, रामराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ, पूनमचंद्र रांका, द. वा. पोतदार, ग. त्र्यं. मोडखोलकर, प्रमिला ओक, दा. वि. गोखले, पंढरीनाथ पाटील आणि प. शां. देशमुख अशा मान्यवरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि महाराष्ट्र एकीकरणाबाबत विदर्भ नेत्याच्या मनात विश्वास निर्माण करून अकोला करार संमत झाला. ''अकोला करारामध्ये जर संयुक्त महाराष्ट्र निर्मिती करणे अशक्य

झाले तर आमच्याकडून महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत करण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील.''[२२]

१० डिसेंबर १९४८ रोजी दार कमिशनने आपला अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात कमिशनने असे नमूद केले की, भाषिकराज्य निर्माण करण्याची वेळ अद्याप आलेली नाही. तसेच भाषावार प्रांतरचना ही भारताच्या एकात्मतेसाठी घातक ठरेल. दार कमिशनने प्रसिद्ध केलेल्या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. संपूर्ण महाराष्ट्रभर असंतोष निर्माण होऊन प्रक्षोभ उसळला. यामूळे मराठी भाषिकांच्या असंतोषाची जाणीव पंडित जवाहरलाल नेहरूंनाही झाली.

## १.४ जेव्हीपी समिती (त्रिसदस्य समिती)

काँग्रेसकडून दार कमिशनचा अहवाल २९ डिसेंबर १९४८ रोजी जयपूर अधिवेशनात फेटाळला गेला. त्यामुळे जयपूर काँग्रेस अधिवेशनात भाषावार प्रांतरचनेचा पुन्हा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व पट्टभी सीतारामय्या हे सदस्य होते. या तीन सदस्यांच्या अक्षरावरून ही समिती जे.व्ही.पी. समिती म्हणून ओळखली जाते. या समितीने ५ एप्रिल, १९४८ रोजी आपला अहवाल प्रसिद्ध केला. या समितीने भाषावार प्रांतरचना करण्याचे विरुद्ध धोक्याचा इशारा दिला. पण त्याचबरोबर हे ही मान्य केले की, लोकभावना जर प्रक्षुब्ध असतील तर लोकांची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने संभाव्य परिणाम लक्षात घेऊन व्यवहार्यता पडताळून पाहिली पाहिजे. महाराष्ट्राला मराठी

भाषिक प्रांत मिळेल, परंतु त्यात मुंबईचा समावेश केला जाणार नाही. जे.व्ही.पी. समितीच्या अहवालावर महाराष्ट्रभर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

## १.५ आंध्र राज्याची निर्मिती

आंध्र राज्याची निर्मिती व्हावी, यासाठी गांधीभक्त व काँग्रेस कार्यकर्ते श्री. पोट्टी श्रीरामलू यांनी प्राणांतिक उपोषण सुरू केले. ५८ दिवस उपोषण करून त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे आंध्र प्रदेशातील आंदोलन पेटले. त्यामध्ये तीन कोटी रुपयांचे नुकसान झाले. श्रीरामलू यांच्या मृत्यूचे पडसाद लोकसभेत उमटताच पंडित जवाहरलाल नेहरूंनी १९ डिसेंबर १९५२ रोजी लोकसभेत स्वतंत्र आंध्र राज्यनिर्मितीची घोषणा केली आणि आंध्र राज्य निर्माण झाले.

## १.६ नागपूर करार

संयुक्त महाराष्ट्राची मागणी सर्व समावेशक करून, तिची व्याप्ती वाढविण्यासाठी अकोले करार झालेला होता. सदर करारात दोन उपप्रांत शेवटचा प्रयत्न म्हणून महाविदर्भ राज्याची मागणी केलेली होती.

भावी संयुक्त महाराष्ट्रात येऊ पाहणाऱ्या विभागाला समानतेचा दर्जा मिळेल. या त्यांच्या भावना लक्षात घेऊन त्यांच्या विकासावर अधिकतर उपक्रम केला जाईल. असे स्वच्छ आश्वासन देणारा मूलगामी यावरूनाचा करार होणे आवश्यक होते. आणि

मराठवाड्याला त्यात सामील करून घ्यावयास पाहिजे होते. हा विचार नव्याने होऊन या तीनही विभागांतील प्रमुख पुढारी नागपूर येथे एकत्र जमले व त्यांनी अकोला करार रद्द करून २८ सप्टेंबर, १९५३ रोजी नवा करार केला. तोच नागपूर करार म्हणून ओळखला जातो. या करारानुसार विदर्भाला काही खास सवलती देऊन त्यास संयुक्त महाराष्ट्रासाठी अनुकूल करून घेतले. अशा पद्धतीने २१ ऑक्टोबर १९५३ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधींनी नागपूर करारास मान्यता दिली.

## १.७ राज्य पुनर्रचना आयोग (एस.फजल अली कमिशन)

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने राज्य पुनर्रचनेचे आश्वासन दिले होते. विशेषतः आंध्र प्रदेशच्या स्थापनेनंतर असे लक्षात आले की, प्रादेशिक भाषांच्या वाढत्या प्रभावामुळे हळूहळू भाषिक तत्त्वावर प्रांतांच्या निर्मितीची मागणी वाढू लागली होती. त्यामुळे राज्य पुनर्रचनेचा प्रश्न विशेष निकडीचा बनला. कारण भारताच्या नियोजनाच्या कार्यक्रमाची आखणी करताना अनेक अडचणी निर्माण झाल्या. वादग्रस्त विभागाला भांडवल गुंतवणूक करावयास सर्वसाधारण नाराजी दिसून आली. या सर्व बाबींचा प्रामुख्याने विचार करून पंडित नेहरूंनी लोकसभेत २२ डिसेंबर १९५३ रोजी राज्य पुनर्रचना आयोग नेमल्याचे घोषित केले. त्या आयोगाचे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश एस.फजल अली यांची पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. डॉ.हृदयनाथ कुंझरू व सरदार के. एम. पण्णीकर यांची नियुक्ती केली. आयोगाने सुमारे दीड वर्ष भाषावार प्रांतरचनेसंबंधी अभ्यास केला.

२७ ऑगस्ट १९५४ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाबरोबर शंकरराव देव, डॉ.धनंजयराव गाडगीळ, भाऊसाहेब हिरे यांनी पुणे येथे चर्चा केली. त्या वेळी एस.फजल अली यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रास अनुकूलता दर्शविली होती परंतु प्रत्यक्षात आयोगाने प्रतिकूल निर्णय दिला. आयोगाने गुजराती लोकांच्या दबावाला बळी पडून आपले मत फिरविले याबद्दल सर्वत्र टीका सुरू झाली.

### १.८ शंकरराव देव यांचा व्दिभाषिकांचा पर्याय

शंकरराव देव यांच्या मनात व्दिभाषिकांची कल्पना होती. १९ ऑक्टोबर १९५५ रोजी याबाबत डॉ. गाडगीळ यांच्याबरोबर त्यांनी चर्चा केली. गाडगीळ यांची अनुकूलता मिळताच हिरे व कुंटे यांना ही कल्पना सांगण्यात आली. चर्चेनंतर हिरे अनुकूल बनले, परंतु कुंटे यांना हा पर्याय मान्य नव्हता. डॉ. गाडगीळ यांच्याकडून देव यांनी कागद घेतल्याचे कुंटे यांनी पाहिले होते. त्यामुळे त्यांचे असे मत बनले की, विशाल द्वैभाषिकांचा पर्याय हा मूळचा डॉ. गाडगीळ यांनीच पुढे केला असला पाहिजे.

### १.९ त्रिराज्य प्रस्ताव योजनेविरुद्ध विरोधकांचे आंदोलन

मराठी भाषिकांचा तीव्र विरोध पाहून काँग्रेस वर्किंग कमिटीने ८ नोव्हेंबर १९५५ रोजी नवीन त्रिराज्याचा ठराव पारित केला. परंतु जनतेने प्रस्ताव साफ नाकारला. तेवढेच नाहीतर एक कृती समिती स्थापन केली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या ठरावाने विरोधी पक्ष नेत्यांचे समाधान झाले नाही. एस.एम.जोशी यांनी नोव्हेंबर १९५५ मध्ये

मुंबई येथे सभा घेतली व देव यांच्या हृदय परिवर्तनाचा मार्ग कुचकामी असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे १८ नोव्हेंबर १९५५ रोजी विधी मंडळाच्या बैठकीच्या दिवशी बंदी हुकूम मोडून प्रचंड मिरवणूक काढण्याचे आणि त्यांचे नेतृत्व सेनापती बापट यांनी नेतृत्व मिरवणुकीचे स्वीकारण्याचे जाहीर केले. संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी सत्याग्रह पुकारण्यात आला. ५०० सत्याग्रहींना अटक करण्यात आली. २० नोव्हेंबर १९५५ रोजी मोरारजी देसाई आणि स.का. पाटील यांची मुंबई चौपाटीवर जाहीर सभा होती. स्वयंसेवकांचा कडक बंदोबस्त होता. दोघेही (पाटी व देसाई) व्यासपीठावर चढताच सभेतील कांही जणांनी व्यासपीठाकडे दगड भिरकावले. त्यातील एक दगड मोरारजींना लागला. ते संतापून म्हणाले ''हिंसक मार्गाचा वापर करून महाराष्ट्राला मुंबई कधीही मिळणार नाही. स.का.पाटील यांनी मोरारजीच्या पुढे जाऊन अशी घोषणा केली की, ''अशा हिंसक मार्गाचा वापर केल्यास ५ वर्षांतच काय ५००० वर्षातही महाराष्ट्राला मुंबई मिळणार नाही.'' एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर पुढे जाऊन म्हणाले, ''जो पर्यंत चंद्र सूर्य आकाशात आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही.''[२३] या वाक्याने जनतेचा संताप उफाळून आला आणि सभा उधळली गेली. या कृतीमधून संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे दुसरे पर्व सुरू झाले.

## १.१० **संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीकडे वाटचाल**

विधानसभा व लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र काँग्रेसची पीछेहाट झालेली असल्यामुळे द्वैभाषिकांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.

असे पंडित नेहरूंचे मत बनू लागले होते. औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाच्या उद्‌घाटनाच्या वेळी पंडित नेहरूंनी केलेल्या भाषणावरून त्यांच्या विचारात बदल झाला आहे, असा अर्थ ध्वनित होऊ लागला होता. (२३ऑगस्ट१९५८) या भाषणात नेहरूंनी स्पष्ट केले की, ''संस्थेचा पूर्वीचा निर्णय बदलण्यासाठी सदस्यांची मने शांततेच्या मार्गाने वळविली तर मी आड येणार नाही.''[२४] पंडित नेहरूंकडे सार्वत्रिक निवडणुकीत मुंबई प्रदेश काँग्रेसला हादरा बसल्यामुळे स. का. पाटील यांनी पंडित नेहरूंकडे महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी पुनर्विचार करावा, अशी मागणी केली. पंडित नेहरूंनी स.का. पाटील यांची भूमिका फार गांभीर्याने घेतली.

## १.११ संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती

२६ ते २८ सप्टेंबर १९५९ला चंदीगड येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास इंदिरा गांधींनी या कामासाठी गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांची समिती नियुक्त करण्याचे जाहीर केले. ३ डिसेंबर १९५९ रोजी पंत यांनी समितीचा अहवाल काँग्रेस वर्किंग कमिटीला सादर केला. महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांतील अर्थ विषयक तपशिलांना यशवंतराव चव्हाण व जीवराव मेहता यांनी मान्यता दिली होती. हा ठराव ४ डिसेंबरला वर्किंग कमिटीने मान्य केला आणि तो २९ डिसेंबरला जनतेला समजला.

काँग्रेस श्रेष्ठींनी महाराष्ट्राच्या भावनेचा आदर करून नवीन राज्याचे जे विधेयक

तयार झाले त्यात गुजरात व मुंबई राज्य असा उल्लेख करण्यात आला. महाराष्ट्रात मुंबई राज्याबाबत तीव्र प्रतिक्रिया उमटली. अखेर लोकांची इच्छा व भावना लक्षात घेऊन नवे राज्य महाराष्ट्र या नावाने अस्तित्वात येईल, असे निश्चित केले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची लढाई अखेर अशा प्रकारे संपली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय चर्चा वाटाघाटी यामुळे साध्य करता आले. या आंदोलनात संयुक्त महाराष्ट्र समिती महागुजरात जनता परिषद, महाराष्ट्र व गुजरातमधील समितीगारांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. तर प्रदेश काँग्रेसने प्रारंभापासून वाटाघाटीचा मार्ग अवलंबिला. विरोधी पक्षाने शेवटच्या क्षणापर्यंत आंदोलन सुरू ठेवल्यामुळे वाटाघाटी फलद्रूप होण्यासाठी मदत झाली. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. केवळ आंदोलन तीव्र केल्याने राजकीय प्रश्न सुटतात असे सहसा घडत नाही. तथापि चळवळीमुळे सरकार वाटाघाटीस तयार होते आणि त्या वाटाघाटीतून निर्णय घेण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. संयुक्त महाराष्ट्र बाबत लढ्या दिसले ते असे की, विरोधी पक्षाने काँग्रेस पक्षाला जे आव्हान दिले त्याचा परिणाम म्हणून काँग्रेस श्रेष्ठीमध्ये महाराष्ट्राच्या मागणीची पूर्तता करण्याची जाणीव निर्माण झाली.

## १.१२ वृत्तपत्रांचा उदय

वृत्तपत्रे ही ब्रिटिश साम्राज्याच्या योगदानापैकी एक आहेत. इंग्रजांनी वृत्तपत्र ही संस्था बंगालमध्ये आणली तेथून याचे लोण महाराष्ट्रात पोहोचले. वृत्तपत्रांच्या निर्मितीपूर्वी कित्येक वर्षे मुद्रणकला अस्तित्वात होती. ज्ञानप्रसाराचे मूलभूत साधन म्हणून या कलेचे

विशेष महत्त्व आहे. ''इ.स.७ व्या शतकापासून चीनमध्ये मुद्रणकला अवगत होऊ लागली. सुंग घराण्याच्या पूर्वीही लाकडी अक्षरांचे टाइप पाडण्याची कला प्रचलित असावी, असे अनुमान उपलब्ध साधनावरून करता येते.''[२५]

मुद्रणकला अस्तित्वात आल्यामुळेच वृत्तपत्रांची निर्मिती झाली, असे ठामपणे म्हणता येत नसले तरी या कलेमुळे वृत्तपत्राचा उदय व विस्तार होणे सुलभ बनले हे नाकारता येत नाही. मुद्रणकलेमुळे वृत्तपत्राचा प्रसार झपाट्याने दूरवर करणे शक्य झाले. छापलेला शब्द दळणवळणाचे, संवादाचे एक महत्त्वाचे साधन बनला.

युरोपात १५ व्या शतकात मुद्रणकलेचा उगम झाला. तत्पूर्वी ज्युलियस सीझरच्या आधिपत्याखालील रोमन साम्राज्यात आजच्या वर्तमानपत्राचा जन्म झालेला दिसतो. सीझर रोज हस्तलिखित घोषणा काढायचा. त्याला 'ॲक्ट डायराना' म्हणजे रोजच्या घटना असे म्हणत. ''ख्रिस्तपूर्व ५९ मध्ये 'ॲक्टासिनटॉस' नावाचे हस्तलिखित येऊ लागले. त्यामध्ये सिनेटमधील चर्चेचे वृत्तांत असत. ही हस्तलिखित लोकांना वाचायला सोईच होईल, अशा जागी भिंतीवर चिटकवली जात.''[२६] या पत्रकामध्ये प्रामुख्याने सरकारी घोषणा, लोकांसाठी उपयुक्त सूचना व वेगवेगळे आदेश जाहीर केलेले असत. तसेच काही वेळा वेगवेगळ्या निरनिराळ्या दरबारातील वा महत्त्वाच्या केंद्रातील माहिती दिली जात असे.

युरोपातील मुद्रण कलेच्या विकासामध्ये जॉन गटेनबर्ग यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांनी काजळी व तेल यांचा शाईसारखा उपयोग करून पितळी साचाच्या साहय्याने

अक्षरे तयार केली. त्यामुळे वृत्तपत्रासारख्या संपर्क माध्यमांना चालना मिळाली. हस्तलिखित बातमीपत्रांची जागा लवकरच छापलेल्या पत्रांनी घेतली. दुमडलेले चौकोनी हॅन्डबिल असे त्यांचे यावरून होते व कारणपरत्वे ते प्रसिद्ध केले जात असे. ''१६ व्या शतकात फ्युगर (ऋससशी) कुटुंबाने प्रकाशित केलेले बातमीपत्र वृत्तपत्र विकासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो.''[२७] फ्युगर कुटुंबाचे दलाल जगातील बहुतेक भागातील व्यावसायिक व इतर घटनांचे तपशील एकत्र करून फ्युगर कुटुंबीयांकडे पाठवीत. असे जमा झालेले तपशील एकत्र करून त्यांचे बातमीपत्र तयार केले जाई. हे बातमीपत्र फ्युगर संघटनेच्या सर्व विभागांना माहिती देण्याकरिता वितरित केले जात असे. फ्युगर संघटनेच्या या संकल्पनेचा युरोप व इंग्लंडमध्ये प्रसार झपाट्याने होऊन इटली, जर्मनी, हंगेरी, स्पेन आणि फ्रान्स या देशांनी आठवड्यातून एकदा बातमीपत्र प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. तत्पूर्वी 'दि टू एन्काऊंटर ऑफ द बॅटल प्लॉडन फिल्ड' या नावाने १५१३ मध्ये वृत्तांत पुस्तिकेच्या रूपात पहिली युद्धकथा प्रसिद्ध झाली.''[२८] या पुस्तिकेत केवळ व्यापारी, राजकीय बातम्याच नव्हे तर वर्तमानकालीन घटनांवरील टीकाटिपणीची बिजेही आढळून येतात. ''मेक्सिको शहरात छापील यावरूनात पहिली बातमी १५४१ मध्ये प्रसिद्ध झाल्याची नोंद आहे.''[२९] वृत्तपत्राच्या निर्मितीपूर्वी बातम्या प्रस्तुत करण्याची प्रथा होती, हे यावरून स्पष्ट होते. विशिष्ट माहिती किंवा आदेश लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अशा न्यूमजलेटर्सची निर्मिती केली जात होती.

मागरिट बार्न्स यांची अशा पद्धतीची व्यापारी बातमीपत्रे ही भारतातील वृत्तपत्रांची उगमस्थाने होत असे म्हटले जाते. इंग्लंडमधून कलकत्ता येथे येणारी छापील दरपत्रेही

तेथील तयार मालाचे भाव आणि येथील कच्च्या मालाचा भाव याबाबतच्या माहितीचे आदान प्रदान करत असत. छापलेले अक्षर कसे असते व त्यातील कागदामुळे लोकांना व्यापार, उदीम, राजकारण करण्यासाठी कशी माहिती मिळते याबाबत कुतूहल निर्माण झाले. १७८० मध्ये बंगालमधील कलकत्ता येथे जेम्स ऑगस्टस हिकी यानी 'बेंगॉल गॅझेट' हे वृत्तपत्र सुरू केले. त्याचे शीर्षक मोठे अद्‌भुत होते. बेंगॉल गॅझेटप्रमाणेच त्याचे दुसरे उपनाव कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर असे होते व त्याद्वारे आर्थिक व व्यापारी माहिती लोकांना पोहोचावी असा हेतू होता. या पत्रावर हिकीने 'द पोलिटिकल ॲण्ड इकॉनॉमिकल विकली–ओपन टू ऑल बट इन्फल्युयन्स बाय नन' असे बिरुद लिहिले होते. याचा अर्थ असा होता की, हे पत्र सर्वांना खुले असलेले राजकीय व आर्थिक साप्ताहिक असणार आहे, परंतु ते कोणाच्याही दबावाखाली राहणार नाही.

इ.स.१७८० ते १८०० या २० वर्षांच्या काळात इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रे युरोपियनांच्याच मालकीची होती. त्यामुळे वृत्तपत्राचे स्वरूप निश्चित नव्हते. वृत्तपत्रात काय मजकूर असावा काय छापावे काय छापू नये या बाबत वृत्तपत्रामध्ये गोंधळच होता. स्वतः इंग्रज संपादकही नाराज होते. भारतीयांच्या मनातील राग तर प्रचंड होता. आधुनिक सोई उपलब्ध नसल्यामुळे सहा सहा महिन्यांच्या बातम्या ताज्या बातम्या म्हणून छापल्या जात होत्या. जर सरकार विरोधी बातमी छापली गेली तर संपादकांना हद्दपारीची शिक्षा होती. अशा परिस्थितीत निर्भय व मुक्त वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी जेम्स ऑगस्टस हिकीने इंग्रजी राजवटीविरुद्ध निर्णायक लढा दिला परंतु अखेर त्याला हौतात्म्य पत्करावे लागले. त्याने शेवटच्या अंकात असे लिहिले होते की, ''माझा देह

साखळदंडाने बांधला तरी मी सदैव वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कार करत राहील.''[३०] यावरून अगदी सुरुवातीच्या आरंभीच्या काळापासूनच भारतीय वृत्तपत्रांना विचार स्वातंत्र्याची लढाई द्यावी लागली. खुद्द इंग्रज संपादक असूनही त्या संपादकाला इंग्रजी सत्तेविरुद्ध झुंज दिल्याशिवाय वृत्तपत्र स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकले नाही हे एक कटू सत्य आहे. सामाजिक सुधारणांचा काळ लोटल्यानंतर पुढे लोकमान्य टिळकांनी 'केसरी' या पत्राच्या माध्यमातून वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा हा इतिहास घडवणारा ठरला. त्यामुळे सरकार विरोधात भूमिका घेऊन एखादी लढाई चालविणे म्हणजे शासनाचा रोष ओढवून घेणे असेच चित्र होते. संयुक्त महाराष्ट्राच्या भाषिक चळवळीचा इतिहास त्यास अपवाद नव्हता.

## १.१८ वृत्तपत्रांच्या निर्मितीपूर्वी भारतातील स्थिती

भारतीयाचा ब्रिटिश सत्ता सुस्थिर झाल्यानंतर शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान विज्ञानाशी भारतीयाचा परिचय होऊ लागला. इंग्रज राजवट स्थिर होण्यापूर्वी कुळाची प्रतिष्ठा, जातीची शुद्धता आणि वतनाचा अभिमान अशा मध्ययुगीन खुळचट कल्पना मूळ धरून होत्या. समाजसंस्था शाश्वत व ईश्वरनिर्मित आहे, अशी हिंदू धर्माची शिकवण असल्यामुळे समाजातील प्रगतीला हातभार लावण्याची जबाबदारी व्यक्तीवर असते, याचा विसर पडला होता. तद्‌वतच एकीकडे सामाजिक जीवनाचा अभाव होता. तर दुसरीकडे धार्मिक पगडा कायम होता. भारतीय समाजाचे सार्वजनिक जीवन या ना त्या धर्माने व्यापून टाकले होते. अशा वेळी जुन्या कल्पना आणि विचार सोडून नव्या

संजवटीने समाजसुधारणेत बदल करण्यास सुरुवात केली. वृत्तपत्रांचा उदय होण्यासाठी जे सार्वजनिक जीवन असावे लागते त्याचा या ठिकाणी अभाव होता. किंबहुना वृत्तपत्रांची गरज भासावी अशी स्थिती भारतात नव्हती. त्याच्याच जोडीला ''अस्थिर राजकीय व आर्थिक परिस्थिती आणि राष्ट्रीयतेचा अभाव यामुळे आधुनिक अर्थाने सामाजिक जीवन येथे अस्तित्वात नसल्याने त्यासाठी आवश्यक वृत्तपत्रांसारखी साधने, मुद्रणकला येऊनही लगेच अस्तित्वात आली नाहीत.''[३१] याउलट पाश्चात्त्य राष्ट्रांमधून मुद्रणकला अवगत असल्याने वृत्तपत्रांच्या निर्मितीला पोषक असे वातावरण निर्माण झाले. भारतात मुद्रणकला अस्तित्वात येण्यापूर्वी प्रभावीपणे संदेशाची देवाणघेवाण सुरू झाली होती. मोहर किंवा दगड शिलांवर कोरलेली अशोकाची आज्ञापत्रे संदेशवहनासाठी चोखाळलेला शब्दापलीकडचा एक मार्ग होता.

''सुरुवातीच्या काळात तारायंत्रे, टेलिप्रिंटर दूरध्वनी, फॅक्स यांसारख्या आधुनिक सोयी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे व्यक्तीमार्फत सांगावा पाठवणे, निरोप देणे, गुप्तहेर पाठवून माहिती घेणे, बातम्या पुरविणाऱ्या खबऱ्याकडून माहिती घेणे अशा माध्यमातून संदेशवहन होत असे म्हणजेच मुद्रणकलेच्या पूर्वी प्रसारमाध्यमांचे स्वरूप मर्यादित व काहीसे व्यक्तिगत होते. तोंडी निरोप देऊन, दवंडी पिटवून, भोंगे वाजवून, शिलालेख लिहून, ताम्रपट कोरून, घंटानाद करून, खासगी पत्रे व सरकारी पत्रे पाठवून बातम्यांचा प्रसार केला जात असे.'' [३२] अशा प्रकारे बातम्या पुरविण्याची पद्धत अवगत झाली पंधराव्या शतकात युरोपमध्ये व त्यापूर्वी चीझमध्ये मुद्रणकलेचा शोध लागला होता. भारतात ही कला शंभर वर्षानंतर आली. ''पोर्तुगीज धर्मप्रसारकांनी १५५० मध्ये

भारतात पहिलं मुद्रणयंत्र आणलं.''[३३] पोर्तुगीज धर्मप्रसारकांनी मुद्रण यंत्रावर धर्मग्रंथ आणि पत्रके छापण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्याच ख्रिश्चन धर्मप्रसारकांचे काम अधिक सुलभ झाले. मात्र वृत्तपत्रांच्या निर्मितीसाठी प्रत्यक्षपणे या धर्मप्रसारकांचा तसेच मुद्रणयंत्राचा तितकासा उपयोग झाला नाही. त्यामुळे भारतातील वृत्तपत्र छापून तयार व्हायला बराच काळ जावा लागला. पुढे भारतात ब्रिटिश राजवट स्थानापन्न झाल्यानंतर येथील जनतेला एकछत्री अंमल दळणवळणाच्या साधनामधील वृद्धी, कायदा व सुव्यवस्थेचे राज्य, शांतता आणि भौतिक संस्कृतीचा परिचय झाला. ब्रिटिशांनी समाजातील सर्व स्तराला सामावून घेण्याच्या संधी भारतीयांना उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे जुनाट व्यवस्थेला धक्के पोहोचून नवे सार्वजनिक जीवन सुरू झाले. यातूनच भारतातील वृत्तपत्रांची वाढ आणि विकास होण्यास सुरुवात झाली.

## १.१९ भारतातील वृत्तपत्रांचा उदय

भारताच्या इतिहासामध्ये १९ वे शतक हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कारण याच शतकातील सुरुवातीच्या काळात ब्रिटिश राजवट भारतात स्थिर झाली. इंग्रजी राजवटीमुळे भारताच्या नव्या युगाचा प्रारंभ झाला. इंग्रजांच्या शिस्तबद्ध व नियोजित कार्यक्षेत्रे प्रशासनामुळे पद्धती सुरू झाली. जुन्या चालीरीती, रूढी परंपरा, अंधश्रद्धा आणि जातिव्यवस्थेतील दोष निदर्शनास येऊ लागले. जुन्या रूढी परंपरा चालीरीती दूर केल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही याची जाणीव भारतीयांना होऊ लागली. युरोपमधून भारतात आलेल्या इंग्रज आणि अन्य पाश्चात्त्यांना वृत्तपत्रांसारख्या

साधनांची आपल्या देशात ओळख झाली होती. इंग्रजी भाषेमधील वृत्तपत्रे भारतात उपलब्ध होत असत. ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार स्थिरस्थावर झाल्यावर नोकरीनिमित्त अनेक पाश्चात्त्य अधिकारी भारतात आले. मूलतःच या अधिकाऱ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती अधिक होती. पत्र व्यवसायाची ओळख असल्याने इंग्रज अधिकाऱ्यांकडून तसे प्रयत्न झाले. ''भारतात पहिले वृत्तपत्र सुरू करण्याचा प्रयत्न कलकत्ता येथे १७७६ विल्यम बोल्टन यांनी केला होता.''[३४] बोल्ट्स हा कंपनीच्या सेवेत नोकरीला होता. त्याच वर्षी बोल्ट्सने कलकत्ता हाउसच्या दरवाजावर एक निवेदन चिकटवून त्यामध्ये व्यापार उद्योग व इंग्रजी जनतेची बातमी मिळण्याबाबत छापखान्याअभावी मोठी गैरसोय होत असून ती दूर करण्यासाठी छापखाना व अन्य सामग्री देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु कंपनी अधिकाऱ्यांचा रोष ओढवल्याने त्याला हद्दपार करण्यात आले. भारतात वृत्तपत्र सुरू करण्याचे त्याचे प्रयत्न विशेष नोंद घेण्यासारखे आहेत.

भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार वाढ झाल्यामुळे परवाना नसला तरी संपत्तीच्या लोभाने हिंदुस्थानात येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. संपूर्ण सत्ता कंपनीच्या हातात सत्ता असल्याने सत्तेत सहभागी असलेले आणि नसलेले अशी विभागणी झाली. यामधून काहींच्या मनात असंतोष निर्माण झाला. व्यापारा बरोबरच ईस्ट इंडिया कंपनीची पावले राजकीय सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने पडू लागली. कंपनीच्या कारभारात भ्रष्ट मागणीच्या शिरकाव झाला. ''जेम्स ऑगस्ट हिकी याने २९ जानेवारी १८८० रोजी कलकत्ता जनरल ॲडव्हायझर हे साप्ताहिक सुरू करून कंपनी सरकारचे वाभाडे काढण्यास सुरुवात केली.''[३५] जेम्स ऑगस्ट हिकी याचे हे वृत्तपत्र

'बेंगाल गॅझेट' किंवा 'हिकी गॅझेट' या नावाने ओळखले जाते. हिकी ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीला होता. तरीही हिकी ने आपल्या वाचवून कंपनीच्या कारभारावर टीकात्मक लिखाण सुरू केले. काही वेळा ही टीका वैयक्तिक स्वरूपाची असल्याने गव्हर्नर जनरल वॉरन हेटिंग्ज यांच्या रोषाला बळी पडावे लागले आणि मार्च १७८२ मध्ये आपले वृत्तपत्र बंद करावे लागले. हिकीच्या वृत्तपत्रातील लेखनाबाबत वाद असला तरी त्याने वृत्तपत्र स्वातंत्र्याचा धरलेला आग्रह विशेष उल्लेखनीय आहे. सरकारी रोषाला उत्तर देताना त्याने असे म्हटले आहे की, ''समाजात मुद्रणस्वातंत्र्य असणे आवश्यक असून प्रजाजनांना आपला विचार व मत माडण्यात मोकळीक असली पाहिजे.''[३६] हे वृत्तपत्राचे स्वातंत्र्य कायम ठेवताना हिकीला अनेकप्रसंगी सरकारशी संघर्ष करावा लागला. हिकीचे वर्तमानपत्र फार काळ चालले नसले तरी त्यामुळे भारतात पत्रकारितेला सुरुवात होऊन वृत्तपत्रांच्या विकासाला मोठी चालना मिळाली हे आपणास विसरताच येणार नाही.

जेम्स ऑगस्ट हिकीने वृत्तपत्र स्वातंत्र्याबाबत दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याच्या या उपक्रमामुळे अनेक मान्यवरांनी नावाजले आहे. प्रा. नाडिंग कृष्णमूर्ती यांनी हिकीचे वर्णन ''द फरगॉटन हिरो ऑफ इंडियन प्रेस''[३७] असे केले आहे. हिकीच्या गॅझेटनंतर १९१८ पर्यंतचा कालखंड हा ॲग्लो इंडियन वृत्तपत्रांचा काळ होता. हिकीचा अपवाद वगळता बहुतेक इंग्रजी वृत्तपत्रांनी कंपनी सरकारची तरफदारी करण्यातच आपली धन्यता मानली. पुढे राजाराम मोहन रॉय यांच्या प्रेरणेने बंगालमध्ये भाषिक वृत्तपत्रांचा उदय झाला. बंगालमधून त्याचे लोण महाराष्ट्रात येऊन पोहोचले. त्यांनी

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व जोपासून रणशिंग फुंकले.

## १.२० भारतीय भाषक वृत्तपत्रांची सुरुवात

इंग्रजी राजवटीत निघालेल्या वृत्तपत्रांमुळे भारतीयांना वृत्तपत्रकलेची जवळून ओळख झाली होती. सुरुवातीची वृत्तपत्रे इंग्रजी भाषेत असली तरी ती वृत्तपत्रे काही हिंदी लोकांच्या ती वाचनात होती. पाश्चात्त्य लोकांच्या आगमनाबरोबर इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य ज्ञानाची ओळख भारतीयांना होऊ लागली. त्या वेळची वृत्तपत्रे युरोपियनांनी त्यांच्याच लोकांसाठी चालवलेली असली तरी भारतीयांना वर्तमानपत्राच्या त्या माध्यमांचे महत्त्व लक्षात आलेले होते, त्याचाच एक भाग म्हणून ''१५ मे १८१६ रोजी बंगाली भाषेतील पहिले वृत्तपत्र 'बेंगाल गॅझेट' प्रसिद्ध करून गंगाधर भट्टाचार्य यांनी भारतीय वृत्तपत्र सृष्टीचा पाया घातला.''[३८]

इंग्रजी सत्तेचा बंगालशी अधिकचा संबंध असल्याने सुरुवातीच्या काळात नवविचारांचा प्रसार बंगालमध्ये होण्यास मदत झाली. याचबरोबर बंगालमध्ये ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी धर्मप्रसाराचे कार्य पूर्वीपासूनच सुरू केले होते. धर्मप्रसारकांना प्रचारासाठी वृत्तपत्रासारख्या माध्यमांची गरज वाटत होती. त्याचा धर्मप्रसाराचे महत्त्वाचे साधन म्हणून भारतातील विविध भाषांत बायबल छापण्याचा उपक्रम सुरू होता. ''श्रीरामपूरच्या विल्यम कॅरे यांनी एप्रिल १८१८ मध्ये 'दिग्दर्शन' हे बंगाली भाषेतील मासिक त्यांनी सुरू केले. त्यानंतर लगेचच २३ मे १८१८ रोजी 'समाचार दर्पण' हे बंगाली भाषेतील साप्ताहिक सुरू झाले.''[३९] देशी भाषेतील पहिली वृत्तपत्रे बंगाली भाषेत

सुरू झाली. तसेच अन्य काही भाषांतील वृत्तपत्रांची सुरुवातही बंगालमध्येच झाली, हे भारतीय पत्रकारितेचे वैशिष्ट्य मानावे लागेल. राजाराम मोहन रॉय यांनी ‘मीरत उल अखबार’ हे फारशी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राकडे ते सुधारणा कार्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणून पाहत होते. धार्मिक, सामाजिक व अन्य सुधारणांचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी समाजात ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. भारतातील महत्त्वाच्या भाषेमधील वृत्तपत्रे साधारणपणे एकाच काळात निघू लागली. गुजराती भाषेतील वृत्तपत्रे मात्र प्रथम मुंबईतून सुरू झाली. गुजरात वृत्तपत्रांची सुरुवात पारशी लोकांनी केली. ’मुंबईना समाचार’ हे १८२२ साली सुरू झालेले पहिले गुजराती वृत्तपत्र होय.’’[४०] म्हणजेच मराठी वृत्तपत्र सुरू होण्यापूर्वी १० वर्षाहून अधिक काळ मुंबईत पत्रकला अस्तित्वात होती. ब्रिटिश सत्ता देशाच्या निरनिराळ्या भागात जशी स्थिरावत गेली तशी भारतीय वृत्तपत्रांना चालना मिळत गेली. वृत्तपत्रांच्या माध्यमातून नवविचारांचा प्रसार करण्याच्या हेतूने अनेक देशी तरुण या कार्यात गुंतले होते. त्यामुळे भाषक पत्रकारितेमध्ये संख्यात्मक व उत्तरोत्तर गुणात्मक वृद्धी झपाट्याने होत गेली.

बंगलीमध्ये भवानीचरण बॅनर्जी यांनी ‘संवाद कौमुदी’ व ‘समाचार चंद्रिका’ अशी दोन वृत्तपत्रे सुरू केली. ते राजाराम मोहन रॉय यांचे कट्टर समर्थक होते. या दोन पत्रांनी तत्कालीन बंगालच्या मनाची समाज नांगरण करून समाज प्रबोधनासाठी पोषक पार्श्वभूमी तयार केली. या पत्रांच्या प्रबांधनाचे मूल्य अनन्यसाधारण होते. वृत्तपत्र स्वातंत्र्य, स्त्री–पुरुष समानता, अनिष्ट रूढी व प्रथांचे निर्मूलन इत्यादी कामास या पत्रांनी प्राधान्य दिले. १९२९ साली लॉर्ड विल्यम बेंटिकने बंगालमध्ये सतीची प्रथा

कायद्याने बंद केली. बेटिंगच्या या समाजसुधारणा चळवळीचे श्रेय बंगाली वृत्तपत्रांकडे जाते. समाजातील सुधारक लोकांनी एखादी चळवळ सुरू केली असता ती चळवळ उचलून धरणे आणि तिच्यासाठी पोषक विचारमंथन करणे ही वृत्तपत्रांची प्रमुख भूमिका होती. ऐरणीवर आलेले प्रश्न मांडण्यात आणि ते प्रश्न सोडविण्यात वृत्तपत्रांचा वाटा निश्चितच महत्त्वाचा ठरला.

## १.२१ मराठी वृत्तपत्रांची निर्मिती

भारतीयांना पाश्चात्त्य ज्ञान–विज्ञान व पत्रकलेची माहिती झाल्याने, बंगाली, फारशी, गुजराती व अन्य भाषांमध्ये वृत्तपत्रांची निर्मिती झाली. मुंबईहून गुजराती वृत्तपत्रे प्रसिद्ध होत असल्यामुळे शिक्षणक्षेत्रात जनजागृती होत गेली. अर्थातच वृत्तपत्राला पोषक वातावरण निर्माण झाले. शिवाय यापूर्वी मुंबईत मुद्रणकलाही अस्तित्वात होती. त्यामुळे पत्रकारितेला मुद्रणकलाही पोषक ठरली.

१९ व्या शतकाच्या प्रारंभापासून मराठी भाषकांना इंग्रजी भाषेचा व त्यातील विचारांचा परिचय होऊ लागला होता. इंग्रजी राजवटीमुळे जगामधील नावीन्याचा शोध घेणे शक्य होते. देशाच्या इतर भागाप्रमाणेच महाराष्ट्रातही सांस्कृतिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली. या प्रबांधनाचे साधन म्हणून हळूहळू वृत्तपत्रे व नियतकालिके सुरू झाली. ''मुंबईत पहिले वृत्तपत्र 'दर्पण' ६ जाने. १८३२ रोजी बाळशास्त्री यांनी सुरू केले.''[४१] इंग्रजी आणि मराठी या दोन भाषांत पाक्षिक रूपात ते प्रसिद्ध होत होते. ४ मे १८३२ पासून ते साप्ताहिक रूपात होऊ लागले.

या वृत्तपत्राचे प्रयोजन जांभेकरांनी नोव्हें. १८३२ मध्ये स्पष्ट करून त्यात त्यांनी आपल्या वृत्तपत्रांची उद्दिष्टे कथन केली होती. ''विलायतेतील कला, विद्या व कौशल्याचा परिचय व्हावा असा उद्देश 'दर्पण' सुरू करण्यामागे होता. शिवाय मनोरंजन करणे व 'चालते काळाची वर्तमान कळविणे' ही आपल्या वृत्तपत्रांची प्रयोजने असल्याचे त्यांनी म्हटले आहे.''[४२] हे वृत्तपत्र साडेआठ वर्षे चालले. एका बदनामीच्या खटल्यात जांभेकर यांना ८०० रुपये दंड झाला. बेअदबी प्रकरणाची झळ लागून १८४० मध्ये दर्पण बंद पडले. दर्पणाला मराठी वृत्तपत्राचा पाया घालून थोर परंपरा सुरू करण्याचा मान मिळाला. मात्र, 'दर्पण'पूर्वी मराठीमध्ये आणखी एक वृत्तपत्र सुरू असल्याचा उल्लेख केला जातो. 'मुंबापूर वर्तमान' हे मराठी पत्र २० जुलै १८२८ पासून सुरू झाले ही गोष्ट निर्विवाद दिसते. परंतु पत्राचा चालक व संपादक कोण होता, प्रकाशक कोण होता, पत्र किती काळ चालले यांचा काहीच पत्ता लागत नाही.''[४३] त्या वेळी कार्यरत असलेली 'बॉम्बे गॅझेट' 'बॉम्बे कुरिअर' अशी इंग्रजी आणि मुंबईना समाचार हे गुजराती भाषिक अंक चाळूनही सदरचे पत्र साप्ताहिक की मासिकच होते याबाबतची अधिक माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे मराठी भाषेतील पहिल्या वृत्तपत्राचा मान हा 'दर्पण'लाच जातो.

'दर्पण' पत्राचा पहिला अंक शुक्रवार ६ जानेवारी १८३२ रोजी बाहेर पडला. म्हणजेच हा काळ पेशवाईच्या अस्तानंतरचा आहे. या काळात इंग्रजी शिक्षणाची महाराष्ट्राला केवळ कोठे ओळख होऊ लागली होती. कला व विद्या यांचा प्रसार सुरू होता. ब्रिटिशांच्या सत्ता विस्ताराचा तो काळ होता. त्यामुळेच काळात इंग्रजी व मराठी

अशा दोन्ही भाषांत वृत्तपत्रे निघत असत. ‘दर्पण’ या मराठी वृत्तपत्राचे स्वरूपही तसेच होते. त्याला संपूर्ण मराठी वृत्तपत्र म्हणता येणार नाही. ’’संपूर्ण मराठी वृत्तपत्र म्हणून सूर्याजी कृष्णाजी यांनी १८४० मध्ये सुरू केलेले ‘मुंबई अखबार’ या वृत्तपत्राचा उल्लेख करावा लागेल.‘‘[४४] मुंबई अखबारच्या पहिल्या काही अंकात त्याचा उद्देश सांगणारी जाहिरात वजा प्रस्तावना छापली होती. पत्राचा आकार १७ द १३ इंच असून प्रत्येक पृष्ठात तीन कॉलम असत. अंकातील प्रस्तावनेवर २८ जून १८४० अशी तारीख आहे. अखबार पत्रात गाव खात्यासंबंधी नेमणुका बदल्या तसेच प्रांतोप्रांतीच्या इंग्रजी व अन्य भाषांतील बातम्यांची भाषांतरे दिलेली असत म्हणजेच ब्रिटिशांच्या आगमनामुळे संबंध आलेल्या पाश्चात्त्य ज्ञानाचा परिचय आपल्या स्वभाषेतून भारतीयांना करून देण्याचा प्रयत्न सुरू झाला.

पाश्चात्त्य जगात येत असलेले विचारांचे वारे प्रबोधनाला अनुरूप असून हे वारे परिवर्तनाला पोषक होते. ती बाब लक्षात घेऊन आरंभीच्या मराठी वृत्तपत्रांनी बंगाली पत्रांचे अनुकरण केले आणि समाज सुधारणा प्रक्रियेला गती दिली. मुंबई अखबार प्रमाणेच बाळशास्त्री जांभेकर यांच्या ’दर्पण’ पत्राने सुद्धा अन्य विदेशी वृत्तपत्रांतील उतारे देऊन समाजसुधारणेस पोषक विचारमंथन घडवून, महाराष्ट्राला समाज परिवर्तनाचे बाळकडू पाजले. जांभेकरांच्या दर्पणमध्ये ज्ञानविज्ञानाचा प्रसार, इतिहास व संस्कृतीचे जतन, स्त्री–पुरुष समानता तसेच अनिष्ट रूढी व प्रथांवर प्रखर हल्ले करण्यात आले. विशेषतः त्या काळात होत असलेल्या सक्तीच्या धर्मांतराच्या विरोधात सुद्धा दर्पणकारांनी निर्णायक भूमिका घेऊन शुद्धीकरणाची चळवळ जोपासली.

१८५७ पर्यंत महाराष्ट्रात जी वृत्तपत्रातील प्रगती झाली ती प्रामुख्याने शहरातच आढळते. त्यात पुणे, मुंबई ही शहरे अग्रेसर होती. 'दर्पण' नंतर 'मुंबई अखबार', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश', 'केसरी', 'काळ', 'तरुण भारत', 'प्रभात' अशी वृत्तपत्रे कालानुक्रमे प्रसिद्ध होत गेली. सुरुवातीच्या काळात वृत्तपत्राचा आवाका व वाचक वर्ग मर्यादित होता. मुंबई, पुणे अशा शहरातून सुरुवातीच्या वृत्तपत्रे निघत असल्याने याचा वाचक वर्ग विशेषतः शहरी असे ''इंग्रजी वृत्तपत्रामध्ये प्रामुख्याने शासकीय निर्णय, समाजातील घडामोडी आणि राजकीय बातम्या दिल्या जात होत्या.''[४५] त्यामुळे अशा पत्रातून स्थानिक गरजा भागविण्याचा प्रश्नच येत नव्हता. अगदी मर्यादित शहरी वाचकांपुरतीच ही पत्रकारिता असल्याने सुरुवातीच्या काळात तिचा म्हणावा तसा विकास झाला नाही. त्यातूनच जिल्हा व स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रांची गरज भासू लागली. ग्रामीण घटक व घडामोडींची दखल घेण्याच्या उद्देशाने अशा जिल्हा व प्रादेशिक वृत्तपत्रांचा उदय झाला. काशिनाथ फडके यांनी ठाणे येथे १८६६ मध्ये 'अरुणोदय' वृत्तपत्र सुरू केले. ''इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी अरुणोदयामधून राजकीय संघटनाबाबत लेखमाला प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतरच्या काळात झपाट्याने जिल्हापत्र निघण्यास सुरुवात झाली.''[४६] सुरुवातीची वृत्तपत्रेही व्यावसायिक नक्कीच नव्हती. परंतु समाजाविषयीची त्यांची बांधिलकी शंभर टक्के सच्ची होती. राजकीय जीवन फारसे संघटित झाले नव्हते. प्रांतीय स्तरावर लहान मोठ्या संघटना राजकीय व सामाजिक प्रबोधनाचे कार्य करीत होत्या. देशाचे राजकीय जीवन क्षितिजावर उगवलेले नसतानाही समाजाला प्रबोधन आणि मार्गदर्शन करण्याचे अवघड काम अनेक वर्तमान पत्रांची बजाविले. वृत्तपत्रेही प्राथमिक अवस्थेत  असतानाही समाज प्रबोधनाचे कार्य

त्यांनी मोठ्या जोरकसपणे बजावले. आर्थिक पाठिंबा नसल्यामुळे वृत्तपत्रांना अस्तित्व टिकवून ठेवणे अवघड जात होते. तरीही ‘सूर्योदय’ (ठाणे १८६७) खानदेश वैभव (धुळे १८६७), जैनसागर (कोल्हापूर १८६९) ‘पूना ऑब्झर्व्हर (पुणे १८५२), ज्ञानप्रकाश (पुणे १८४९) अशा वृत्तपत्रांची निर्मिती होऊन त्यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजाविली, हे नाकारता येत नाही.

## १.२२ **समारोप**

१९२० पूर्वी महाराष्ट्राच्या प्रमुख शहरातून, विभागीय राजधानीसारख्याप्रगत सांस्कृतिक केंद्रातून अनेक वृत्तपत्राचा उदय झाला होता. ‘प्रभाकर’, ‘ज्ञानप्रकाश’, ‘मित्रोदय’, ‘इंदूप्रकाश’, ‘दीनबंधू’, ‘केसरी’, ‘सुधाकर’, ‘काळ’, ‘संदेश’, ‘सकाळ’, ‘मराठा प्रभात’, ‘तरुण भारत’, ‘पुढारी’ ही वृत्तपत्रे महाराष्ट्रात विशेष गाजली. पुण्या–मुंबईची वृत्तपत्रे त्याकाळी राष्ट्रीय प्रश्नांचा खल करण्यात गुंतली होती. त्याचवेळी प्रादेशिक अस्मिता घेऊन त्या त्या भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इ. विविध विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी विभागीय वृत्तपत्रांच्या कार्यास प्रारंभ झाला. नागपूर, औरंगाबाद, धुळे, नाशिक, बेळगांव, सोलापूर, कोल्हापूर या शहरांतून अनेक नियतकालिके उदयास आली. ‘‘१९२० ते १९३७ या काळात महाराष्ट्रात १३७ नियतकालिके प्रसिद्ध होत असत.’’[४७] असे रा. गो. कानडे यांनी नमूद केले आहे. कोल्हापुरात ‘सत्यवादी’ व ’पुढारी’ औरंगाबाद ‘अजिंठा’, तसेच ‘मराठवाडा’, खानदेशात ‘आपला महाराष्ट्र’ व ‘जनशक्ती’, सोलापुरात ‘संचार’ व

‘समाचार’, नाशिक येथे ‘गावकरी’ व ‘देवदूत’, नागपूरमध्ये ‘नागपूरपत्रिका’ व ‘लोकमत’, बेळगावात ‘तरुण भारत’ व ‘रणझुंजार’, गोव्यात ‘गोमांतक’ व ‘नवप्रभा’, कोकणात ‘रत्नागिरी टाइम्स’, अशा वृत्तपत्रांनी व्यवसायांनी प्रादेशिक व जिल्हा पातळीवर जनमानसाची विलक्षण पकड घेतली. समाजसुधारणा, राजकारण, परकीय राजवट, अशा जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर खुलेपणाने लिहू लागली. कोणाचीही मुलाहिजा न ठेवता गाजलेली अनेक प्रकरणांवर प्रकाश टाकला. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांतील अनेक तक्रारींना अन्यायाला वाचा फोडली. विकासाच्या अनेक प्रश्नांवर आवाज उठविला.

मराठी वृत्तपत्रांची परंपरा उज्ज्वल आहे. ‘दर्पण–प्रभाकर’ काळातील वृत्तपत्रे तसेच ‘ज्ञानप्रकाश’ सारखी वृत्तपत्रे प्रबांधन घडवू लागली. ‘दिनबंधूच्या’ रूपृष्ठे समाजसुधारणेच्या चळवळीला वृत्तपत्रांनी गती दिली. ‘केसरी’ या वृत्तपत्राने प्रखर राष्ट्रवादी भूमिका घेतली. ‘सुधाकरणे‘ पुन्हा सुधारणेचा प्रवाह गतिमान केला. काळ व संदेशच्या रूपृष्ठे राष्ट्रवादाची धार आणखी तीव्र बनली. ‘लोकमान्य‘ ‘नवा काळ’ या वृत्तपत्रांनी मुंबईतील पत्रकारितेत नवा उत्साह संचारला. ‘सकाळ’ ने शास्त्रीय पत्रकारितेचा पाया घातला. ‘मराठा‘ ने संपूर्ण महाराष्ट्र साकारण्याचा प्रयत्न केला. ‘पुढारी’ सारख्या विभागीय वृत्तपत्रांनी महाराष्ट्राच्या समतोल विकासाचा मार्ग खुला केला. तर जिल्हा पत्रांनी जिल्हा स्तरावरील प्रश्न काळजीपूर्वक व जिव्हाळ्याने मांडले.

१९२० नंतर प्रामुख्याने दोन गोष्टी घडून आल्या. पहिल्या महायुद्धातील प्रगतीची

वार्ता देण्याची पद्धत सुरू झाली. त्यामुळे युध्दस्यवार्तारम्यः या संस्कृत सुभाषिताप्रमाणे महायुद्धकालीन युद्धाच्या वार्ता गतिमानपणे देण्याची पद्धत मराठी वृत्तपत्रांनी अवलंबिली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात 'केसरी'प्रमाणेच काळ व संदेश या वृत्तपत्रांना महत्त्व प्राप्त झाले. युद्धोत्तर राजकारणाची चर्चा वृत्तपत्रांत सुरू झाली. शिवाय स्वातंत्र्य लढ्यातील लोकमान्य टिळक, महात्मा गांधी प्रवाह, उजवे व डावे प्रवाह, कम्युनिष्टांचे राजकारण इत्यादींबाबत वृत्तपत्रे चर्चा करू लागली.

१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर टिळक युग संपले आणि महात्मा गांधी युगाचा प्रारंभ झाला. गांधीजींनी असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह आणि पुढे १९४२ची चले जाव चळवळ अशा अनेक मार्गांनी स्वातंत्र्याचा लढा ऐरणीवर आणला. या वेळी यंग इंडिया पत्रात चले जाव चळवळीवर भाष्य करताना गांधीजीही असे लिहिले होते, ''वाचकांनी काँग्रेसचे अंधभक्त बनू नये, आमचे काही चुकत असेल तर आम्हाला धडा द्यावा. तसेच बदलत्या राजकारणात आपल्या सामाजिक हितासाठी ध्येयधोरणांवर टीकाही करावी. ते पुढे म्हणाले की, येणारा काळ हा कसोटीचा काळ आहे. या काळात निर्णय आत्मपरीक्षणाची गरज आहे.''[४८] याचा अर्थ असा की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही सुद्धा एक निर्णायक चळवळ होती या चळवळीने काँग्रेसच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास सुरुवात केली. केसरीसह सर्व मराठी वृत्तपत्रांनी भाषावार प्रांतरचनेच्या बाबतीत काँग्रेसच्या भूमिकेचे मूल्यमापन करून त्यातून मार्ग काढण्यासाठी स्वतंत्र भूमिका घेतली. किती प्रभावी भूमिका घेतली होती हे स्पष्ट होते म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला दिशा

देण्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी किती परखड, निर्भीड व प्रभावी भूमिका घेतलेली होती हे यातून स्पष्ट होते. वृत्तपत्रांच्या कामगिरीचा अभ्यास करताना मराठी वृत्तपत्रांना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस गती देण्यासाठी कराव्या लागलेल्या संघर्षाचे चित्र यातून दिसते.

## तळटीपा

१) जैन अशोक : महाराष्ट्र शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती, जून १९९३ पृ.१६.

२) प्रा. फडके वाय. डी. : पॉलिटिक्स ॲण्ड लॅग्वेज हिमालय पब्लिशिंग हाउस प्रथमावृत्ती, १९७९. पृष्ठ क्र.१

३) सरकार जदुनाथ : शिवाजी ॲण्ड हिज टाइम्स, नवी दिल्ली,२०११, पृष्ठ क्र.८

४) साने रविकरण : लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र.१.

५) कित्ता : लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र. २–३

६) कित्ता : लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र. ४

७) महाजन व्ही. डी. : एशियंट इंडिया, एस. चांद ॲण्ड कंपनी, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ३९१

८) सहस्रबुद्धे पु. ग. : महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००३, पृष्ठ क्र. १५८

९) व्होरा राजेंद्र (संपा.) : समाजप्रबोधन पत्रिका पुणे (त्रैमासिक) वर्षे ३८ अंक १५५ एप्रिल जून २००१ पृ. ७५

१०) पेंडसे लालजी : महाराष्ट्राचे महामंथन, साहित्य सहकार संघ लि., दादर

मुंबई, पहिली आवृत्ती, १९९५ पृ.५४

११) विसपुते एस. एम. : माणूस नेता एसेम, चेताश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृत्ती, १ एप्रिल २००० पृ.१२५.

१२) फडके य. दि. : केशवराव जेधे, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,१२ नोव्हेंबर १९८२ पृ. २४६

१३) व्होरा राजेंद्र (संपा.): समाजप्रबोधन पत्रिका पुणे (त्रैमासिक) वर्षे ३८ अंक १५५ एप्रिल जून उपरोक्त पृ.७५.

१४) जोशी एस. एम. : मी एस. एम. कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे तृतीयावृत्ती १९८९ पृ. १८७.

१५) राजहंस बा. न. : संयुक्त महाराष्ट्र राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही प्रकाशन चिटणीस प्रजा सोशॅलिस्ट पार्टी (महाराष्ट्र) प्रथमावृत्ती १९५८ पृष्ठ क्र.१०.

१६) जैन अशोक : महाराष्ट्र शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती, जून उपरोक्त पृष्ठ क्र.१६.

१७) विसपुते एस. एस. : माणूस नेता एसेम, चेताश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृत्ती, १ एप्रिल २००० उपरोक्त पृष्ठ क्र.१२६.

१८) अत्रे प्र. के. : कऱ्हेचे पाणी खंड ३, दुसरी आवृत्ती, १९७६, पृष्ठ क्र.३८९

१९) जोशी एस. एम. : मी एस. एम. कॉन्टिनेण्टल प्रकाशन पुणे तृतीयावृत्ती १९८९ उपरोक्त १८७.

२०) जैन अशोक : महाराष्ट्र शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती, जून १९९३ उपरोक्त, पृष्ठ क्र.१७.

२१) फडके य. दि. : केशवराव जेधे उपरोक्त, पृष्ठ क्र.२४८—२४९

२२) पेंडसे लालजी : महाराष्ट्राचे महामंथन १९६५, साहित्य सहकार संघ, मुंबई, पृष्ठ नं.९३.

२३) साने रविकिरण : लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे,२००९, पृष्ठ नं. ११४

२४) फडके य. दि. : लोकराज्य यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक मार्च १९८५ पृष्ठ क्र. ८६

२५) गुप्ते आर. एस. : द हिस्ट्री ऑफ मॉडर्न चायना नॅशनॅलिझम ॲण्ड कम्युनिझम इन इंडिया स्टिर्लिंग प्रकाशन १९७४ पृष्ठ क्र. २४.

२६) सरकार चंचल : कहाणी वर्तमानपत्राची (अनुवाद : दिनकर गांगल) नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली १९८९ पृष्ठ क्र. ४.

२७) सुतार पटवर्धन : वर्तमानपत्राचा इतिहास शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ जुलै २००३ पृष्ठ क्र. ७.

२८) सरकार चंचल : कहाणी वर्तमानपत्राची (अनुवाद : दिनकर गांगल) नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९८९ पृष्ठ क्र. ६.

२९) सुतार पटवर्धन : वर्तमानपत्राचा इतिहास शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, जुलै २००३, पृष्ठ क्र.७.

३०) लेले रा. के. : वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे,१९८६ पृष्ठ क्र. ६५.

३१) कित्ता : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.१९.

३२) गोखले किरण : पत्रकारिता विद्या वृत्तसंकलन (लेख), भट गो. आ. मॅजिस्टीक प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००३, पृष्ठ क्र. ४८.

३३) सरकार चंचल : कहाणी वर्तमानपत्राची (अनुवाद : दिनगर गांगल) नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९८९ पृष्ठ क्र.८.

३४) राव चलपती : द प्रेस पृष्ठ क्र. १२.

३५) मूर्ती एन. के. : द फार गॉटन हिरो ऑफ इंडियन प्रेस, जे. ए. हिकी, विदुर खंड–१७ अंक–१ फेब्रुवारी १९८० पृष्ठ क्र.१५.

३६) लेले रा. के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास कॉन्टिनेण्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.२५.

३७) विदुरा : जे.ए.हिकी अॅण्ड इंडियन प्रेस, जानेवारी १९८०, पृष्ठ क्र.६

३८) सेन एस. पी. : इंडियन प्रेस कलकत्ता इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज १९६७ पृष्ठ क्र. १.

३९) लेले रा. के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास कॉन्टिनेण्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.४१.

४०) राव चलपती : द प्रेस पृष्ठ क्र. १०९.

४१) लेले रा. के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास कॉन्टिनेण्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.५४.

४२) अकलूजकर : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे अंतरंग, श्री विद्या प्रकाशन, सप्टेंबर प्रसन्नकुमार २००० पृष्ठ क्र.२.

४३) लेले रा. के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास कॉन्टिनेण्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.५६

४४) राव चलपती : द प्रेस पृष्ठ क्र. १०७

४५) सेन एस. पी. : द इंडियन प्रेस : राव वसंत द बिगनिंग ॲण्ड ग्रोथ ऑफ दी मराठी प्रेस कलकत्ता इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज, १९६७, पृष्ठ क्र. ५३.

४६) सेन एस. पी. : द इंडियन प्रेस : राव वसंत द बिगनिंग ॲण्ड ग्रोथ ऑफ दी मराठी प्रेस कलकत्ता इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज, १९६७, पृष्ठ क्र. ६१.

४७) कानडे रा. गो. : मराठी नियतकालिकांचा इतिहास कर्नाटक पब्लिशिंग हाउस १९३८ पृष्ठ क्र.५०.

४८) धारूरकर व्ही. एल. : मास कम्युनिकेशन ॲण्ड कल्चर, गांधीज कॉन्ट्रब्यूशन टू इंडियन जर्नालिझम.

# प्रकरण दुसरे

# प्रस्तावना व संशोधन आराखडा

२.१ प्रस्तावना

२.२ संशोधन पद्धती

२.३ सामाजिक संशोधन

२.४ वृत्तपत्रीय संशोधन

२.५ अभ्यास विषयाचे महत्त्व

२.६ संशोधनामागील उद्देश

२.७ गृहीतके

२.८ वर्णनात्मक संशोधन आराखडा

२.९ वर्णनात्मक संशोधन आराखड्यातील टप्पे

२.१० संशोधन सामग्रीची निवड

२.११ आशय विश्लेषण

२.१२ अन्य कागदपत्रांचे विश्लेषण

२.१३ मर्यादा

२.१४ साहित्य सर्वेक्षण

२.१५ विविध पुस्तकांतील माहितीचे विश्लेषण

२.१६ प्रबंधाचा आकृतिबंध

२.१७ समारोप

# प्रकरण दुसरे

# प्रस्तावना व संशोधन आराखडा

## २.१ प्रस्तावना

कार्ल पिअर्सन यांनी म्हटल्याप्रमाणे ''सत्याकडे जाण्यासाठी समीपचा मार्ग नाही''१ There is no shortcut to the truth... no way to gain knowledge of the universe except through the gateway of scientific method. सत्याकडे जाण्यास समीपचा मार्ग नाही. सर्व तथ्ये ही शास्त्रीय कसोटीच्या गवाक्षातून पडताळून घ्यावी लागतात. इतिहासासारख्या शास्त्रात तर सत्यशोधनाला विशेष महत्त्व आहे. कारण इतिहासकार सबळ पुराव्यांच्या आधारे असे सत्य शोधन करण्याचा प्रयत्न करत असतात. यामधून संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या संदर्भात वृत्तपत्रांची भूमिका तपासून घ्यावयाची आहे आणि त्यासाठी सत्यशोधन करावयाचे आहे. पुढे कार्ल पिअर्सन यांनी असे म्हटले आहे की, "The scientific method is one and some in all branches and that method is the method of all logically trained minds... the unity of all sciences consists alone in its method, not in its material, the man who classifies facts of any kind whatsoever, who sees their mutual relation and describes their sequences, is applying the scientific method and is a man of science."[२] कोणत्याही ज्ञानशाखेत तथ्यांचा क्रम ठरवणे, त्यांची वर्गवारी लावणे व संगतवार विश्लेषण करणे याला महत्त्व असते. विविध ज्ञानशाखेत मार्ग भिन्न असले तरी पद्धती या तर्कसंगत शुद्ध विश्लेषण प्रणालीवर आधारलेल्या असतात. त्यामुळे संशोधनाच्या बाबतीत कुठल्याही ज्ञान शाखेत अंतर्गातील अशा संगतवार विश्लेषणाला महत्त्व असते. इतिहास शास्त्रही त्यास अपवाद नाही. त्यामुळे सदर प्रकरणात संयुक्त महाराष्ट्र चळवळीत वृत्तपत्रांची भूमिका

तपासण्यासाठी योजिलेल्या संशोधन पद्धतीवर शास्त्रीय प्रकाश टाकला आहे. ज्ञानाच्या पद्धतीशीच मांडणीला शास्त्र असे म्हणतात व हे शास्त्र संपूर्णपणे वैज्ञानिक प्रणालीच्या वापरावर आधारलेले असते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात लोकशाही रुजावी, राष्ट्र सामर्थ्यवान राष्ट्र व्हावे यासाठी राज्याची पुनर्रचना करणे आवश्यक होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्यांच्या राज्य कारभारासाठी केवळ सोयीचे  असे प्रांत निर्माण केले. सर्व देशाचा कारभार त्या वेळी इंग्रजीत चालत असे. मात्र स्वातंत्र्यलढा चालू असताना जनतेचे प्रतिनिधित्व करणारा सर्वांत मोठा राजकीय पक्ष असलेल्या काँग्रेसने संघटनात्मक कार्यासाठी भाषावार विभाग केले होते. या भाषिक तत्त्वाच्या आधारे स्वतंत्र भारतात राज्याची पुनर्रचना व्हावी, असे दक्षिणेकडील राज्यांना तीव्रतेने वाटत होते.

भारतात सर्वांत अधिक लोक हिंदी भाषिक आहेत आणि ते मुख्यतः उत्तरेकडील भागात आहेत. भारताच्या एकात्मिकतेच्या दृष्टीने हिंदुस्थानी राष्ट्रभाषा व्हावी, असा एक प्रबळ मतप्रवाह स्वातंत्र्याच्या काळात होता. मात्र तमीळ, मल्याळम, तेलुगू  आणि कन्नड भाषिक जनतेला आणि तेथील अनेक नेत्यांना भारतात हिंदी भाषेचे वर्चस्व वाढू नये, असे वाटत होते. म्हणून आकाशवाणीवर हिंदीप्रमाणेच इंग्रजीतून कार्यक्रम व्हावेत आणि सर्व प्रदेशाच्या आकाशवाणीच्या केंद्रावर तेथील प्रादेशिक भाषांना मुख्य स्थान असावेत, अशी मागणी १९४८ पासूनच करीत होते. भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू हे अनेक बाबतीत प्रगतिशील विचारांचे होते. परंतु त्यांना दक्षिणेकडील जनतेच्या भाषिक आकांक्षाचे पुरेसे आकलन झालेले नव्हते. भारतात ज्याप्रमाणे विविध जाती धर्माचे लोक एकत्र राहतात., त्याचप्रमाणे वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक एका राज्यात असले

असतात, असे त्यांना वाटत होते. हैदराबाद राज्यामध्ये तेलुगू, कन्नड, आणि मराठी मातृभाषा असलेले, तसेच पूर्वीच्या निजामी राजवटीमुळे उर्दू भाषा बोलणारे अनेक लोक राहत होते. त्यामुळे असेच राज्य कायम राहावे, असे नेहरूंना वाटत होते. परंतु राज्यात सक्रिय असलेल्या भाषिक नेत्यांना त्या राज्याचे विभाजन व्हावे, असे वाटत होते.

## २.२ संशोधन पद्धती

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही एक राजकीय चळवळ होती. या चळवळीमध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध सामाजिक घटक सहभागी झाले होते. त्यामुळे या घटकांचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक संशोधन पद्धती उपयुक्त ठरते. भांडारकर यांच्या मते, ''सामाजिक संशोधन ही संज्ञा वेगवेगळ्या संशोधन प्रयत्नांच्या संदर्भात वापरली जाते.''[३] या संदर्भात प्रा. रा. ना. घाटोळे म्हणतात, ''संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासण्याची प्रक्रिया होय.''[४] पुढे घाटोळे असेही म्हणतात, ''सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न होय.''[५] गुरुनाथ नाडगोंडे यांनी म्हटले, ''समाजशास्त्रीय संशोधन कसे हाती घेतले जाते व कोणत्या पद्धतींचा त्यासाठी अवलंब केला जातो हे पाहण्यापूर्वी एका मूलभूत प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे, हा मूलभूत प्रश्न म्हणजे संशोधन.''[६]

इतिहास संशोधन ही एक अशी शाखा आहे, जी भूतकाळाचा विचार करते आणि वर्तमानकाळाचे पृथ्थकरण करून भविष्याविषयी अनुमान काढून सद्यःस्थितीममध्ये त्याचा उपयोग वर्तवते. इतिहाससंशोधन प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम साधनांवर आधारित असते. या संशोधनामध्ये अभ्यास पद्धतीला विशेष महत्त्व आहे. संशोधनाने जे

ज्ञान शोधले जाते व नव्याने पुढे येते ते केवळ संशोधनामध्ये शासकीय पद्धतीचा अवलंब केल्यानेच येते. यासाठी अभ्यासात सुव्यवस्थितपणा असावा लागतो. समर्पक पद्धतीने तसेच सूत्रबद्ध पद्धतीने अभ्यासविषयक सामग्रीचे संकलन करणे संशोधनामध्ये अभिप्रेत आहे. ''सुव्यवस्थित पद्धतीने घेतलेला शोध म्हणजे संशोधन होय, अशा संशोधनासाठी सामग्री जमा करताना तिचे विश्लेषण करताना शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा लागतो. यासाठी शास्त्रीय पद्धत समजावून घेणे आवश्यक आहे.''[७] सत्य शोधण्यासाठी कुठलाही आडमार्ग उपलब्ध नाही. शास्त्रीय पद्धतीच्या प्रवेशाशिवाय विश्वाचे ज्ञान मिळविण्याचा दुसरा मार्ग नाही. हे कार्ल पियर्सन यांचे मत या ठिकाणी योग्य वाटते शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्याने त्यापासून मिळणारे ज्ञान तपासून पाहता येते. म्हणजेच वस्तुनिष्ठ ज्ञान शास्त्रीय पद्धतीच्या अवलंबनाने मिळणे शक्य आहे. हे संशोधन सामाजिक संकेतांच्या आधारे पूर्ण करावयाचे असते. सदर प्रबंधामध्ये मराठी वृत्तपत्रांचा आशय हा अत्यंत महत्त्वाचा असून, त्यातील वार्ता व विचार हे चळवळीस कसे पोषक ठरले याबाबत येथे वर्णनात्मक आराखडा वापरून संशोधन करावयाचे आहे. एखाद्या घटकाचे किंवा विषयाचे आकलन करण्यासाठी जेव्हा सामग्रीचे वर्णन करावे लागते, तेव्हा तेथे वर्णनात्मक आराखडा उपयुक्त ठरतो. त्यामुळे या प्रकरणात वर्णनात्मक आराखडा का व कसा वापरला आहे, याचे विश्लेषण केले आहे.

## २.३ सामाजिक संशोधन

समाजविकासामध्ये सामाजिक संशोधनाला खास महत्त्व आहे. कोणत्याही समाजाविषयी त्याची वाटचाल, प्रगतीविषयी माहिती मिळविण्यासाठी संशोधनाची गरज असते. समाजात सातत्याने बदल घडत असतात. अनेक प्रवाह कार्यरत असतात. त्याचा

परिणाम संबंधित समाजाच्या वाटचालीवर होत असतो. हा परिणाम सुस्पष्ट नोंदवणे संशोधनामुळे शक्य होते. ''सामाजिक जीवनाचा अभ्यास तसेच विश्लेषण करणे आणि ज्ञानाची अचूकता अभ्यासण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा वापर करणे म्हणजेच सामाजिक संशोधन होय.''[८] असे टी.के. उन्नाथन यांनी म्हटले आहे. ज्ञानाची अचूकता तपासण्यासाठी तसेच सिद्धांताच्या बांधणीसाठी शास्त्रीय पद्धत महत्त्वाची असते. त्यामुळे अभ्यासविषयक तर्क संगतपणे मांडता येणे शक्य आहे.

स्लेसिंजर व स्टीफनसन यांनी एनसायक्लोपीडीया ऑफ सोशल सायन्सेसमध्ये सामाजिक शास्त्राची व्याख्या करताना म्हटले आहे, ''सामान्यीकरणाच्या हेतूने संकल्पना वा प्रतीके यांची सहेतुक हाताळणी करणे, प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढविणे, ज्ञानात सुधारणा करणे, ज्ञान प्रमाणित करणे व प्रमाणित ज्ञानाचा सिद्धांत निर्मितीसाठी व व्यवहारात उपयोग करणे, ही संशोधनाची वैशिष्ट्ये आहेत.''[९] याचा अर्थ असा की, सामाजिक संशोधनात साधनांच्या आधारे ज्ञानाचे प्रमाणीकरण करून व तथ्यांचे संकलन करून प्रस्थापित ज्ञानात नवी भर टाकणे याला महत्त्व असते. जॉन बेस्ट यांनी सामाजिक संशोधन ही प्रक्रिया स्पष्ट करताना अधिक अचूक व नेमके विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, ''खऱ्या अर्थाने, संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची अधिक नियमबद्ध वा आकारबद्ध, सुव्यवस्थित व सखोल अशी प्रक्रिया होय.''[१०] सामाजिक संशोधन ही जशी तथ्यसंकलनाची प्रक्रिया आहे, तसेच ती हेरिंग यांच्या मते, ''गैरलागू तथ्ये बाजूला काढण्याची प्रक्रिया आहे. बऱ्याच वेळा माहिती संकलित करत असताना अनेक प्रकारची जळमटे त्यामध्ये येतात. ती काळजीपूर्वक दूर करून त्यातील केवळ सत्याचा पोषक भाग तेवढाच निवडणे व त्याचे आकलन करणे

याला महत्त्व असते.''[११] संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबाबत सुद्धा माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असली तरी त्यातील अचूक व नेमकी तथ्ये शोधून त्यांचे सुसंगत सादरीकरण करणे आवश्यक आहे.

समाजातील संशोधनातील तथ्यांच्या संकलन प्रक्रियेत आवश्यक अशा काही मूलभूत घटकांचा विचार कसा करावा, याबाबत संधू व सिंग यांनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे ठरते. त्यांनी अशा सामाजिक संशोधनात पुढील महत्त्वाच्या घटकांवर भर दिला आहे.

१) समस्या शोधने व तिच्यावर उपाय सूचित करणे ही बाब संशोधनात मूलभूत असते. संशोधनातील समस्यांचे यावरून निश्चित करून त्यातील विविध घटकांतील परस्पर संबंध शोधावा लागतो.

२) तथ्यांचे सामान्यीकरण करताना पुढील आकलनासाठी काही नवे सिद्धांत मांडावे लागतात व हे सिद्धांत पूरक अशा अध्ययनासाठी पुढील काळात उपयोगी ठरतात.

३) अनुभवांचे सर्वेक्षण करून तसेच उपयोजित पुरावे संकलित करून संशोधनात नवी दृष्टी विकसित करता येते.

४) अचूक निरीक्षण आणि योग्य वर्णन या बाबी सामाजिक संशोधनात महत्त्वाच्या ठरतात.

५) सामाजिक संशोधनात नवीन तथ्ये मिळवावी लागतात. काही वेळा प्राथमिक साधने नव्याने उजेडात आणून नवे सूत्र मांडता येते. तसेच काही वेळा नवा दृष्टिकोन ठेवून जुन्या साधनांवर नवा प्रकाश टाकता येतो.

६) संशोधनात अन्वेषण प्रक्रिया महत्त्वाची असते. पूर्वी जे ज्ञान माहीत आहे त्याच्या पलीकडे जाऊन नव्याने सत्याचा शोध घ्यावा लागतो.

७) संशोधन हे वस्तुनिष्ठ, तर्कसंगत व उपयोजित असावे लागते. त्यासाठी वापरलेल्या पद्धती आणि तथ्ये संकलित करताना जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

८) संशोधनात संयम तसेच संतुलन कायम ठेवून सातत्यपूर्ण प्रयत्न करावे लागतात.

९) संशोधन ही निश्चितपणे पुराव्याची नोंद करून आणि हे पुरावे साधारणपणे मांडून त्या आधारे सत्य शोधन करण्याची प्रक्रिया असते.

१०) ''संशोधनात सत्य सांगण्यासाठी काही वेळा संशोधकाजवळ धाडस व निर्भीडपणा याबाबी असणे आवश्यक असते.''[१२] इतिहासासारख्या सामाजिक शास्त्रामध्ये फक्त शोधण्यासाठी परखड व निर्भीड दृष्टिकोन असतो.

या सर्व घटकांचा विचार करता सामाजिक शास्त्रातील हे सर्व संकेत तथ्य संकलनासाठी उपयुक्त ठरणारे आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत वृत्तपत्रांची भूमिका शोधताना या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचा या संशोधनात विचार केला जातो.

## २.४ वृत्तपत्रीय संशोधन

वृत्तपत्र ही इतिहासाची प्रयोगशाळा असते. वृत्तपत्रातील सामग्रीचा इतिहासाचे साधन म्हणून वापर करताना विश्वसनीयता, वस्तुनिष्ठता याबाबत तथ्ये पारखून घ्यावी लागतात. ऐतिहासिक संशोधन पद्धतीत या ज्ञानसंकलनाला विशेष महत्त्व आहे.

पी.व्ही. यंग यांच्या मते, "When research is conducted on the basis of historical dfata, the researcher is said to have followed historical approach. At times it would appear that all research is historical in its nature because to a very large extent, research depends on observations which the past. Historical research as such depends on observations which are non-repetitive."[१३] ऐतिहासिक संशोधनात गतकालीन तथ्यांचे संकलन व विश्लेषण याला महत्त्व असते. असे संकलन करताना ऐतिहासिक पुरावे लक्षात घ्यावे लागतात. तसे पाहिले तर कोणतेही संशोधन हे ऐतिहासिक असते म्हणजे ते गतकालीन पुराव्यांचे अध्ययन करणारे असते. त्यामुळे मागील घटनांचा अभ्यास करताना तथ्य पारखून घेऊन ही प्रणाली वापरावी लागते. या सर्व पार्श्वभूमीवर येथे सामाजिक पद्धतीचा परामर्श घ्यावयाचा आहे.

वृत्तपत्रे सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना त्यांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. अशा वेळी वृत्तपत्रांना सामाजिक जबाबदारीचे भान असावे लागते. जबाबदारीने काम करताना वृत्तपत्रांनी समाजापुढील प्रश्न कसे मांडले यावरून त्याची सामाजिक शक्ती किती प्रभावी आहे, हे लक्षात येते. वृत्तपत्र समाजाचे दर्पण असते. सामाजिक अंतरक्रियांचे यथार्थ प्रतिबिंब त्यामध्ये उमटत असते. वृत्तपत्र समाजाला योग्य ते वळण लावण्याचे काम समर्थपणे करू शकतात. मात्र यासाठी त्या वृत्तपत्रांत काम करणारे पत्रकार, वृत्तपत्रांचे संपादक व अन्य घटक समाजभान असणारे तसेच मानवी मूल्यांचा आदर करणारे असावे लागतात. पत्रकारांच्या दृष्टिकोनावरच वृत्तपत्रांची लोकाभिमुखता तसेच लोकप्रियता अवलंबून असते. भारतामध्ये समाज सुधारण्याची चळवळ, स्वातंत्र्य आंदोलनातील लोकसंग्राम, नवभारताची पुनर्रचना या तीनही पर्वांत भारतीय वृत्तपत्रांची बजावलेली भूमिका ही सदोष व्यवस्था बदलण्यासाठी आहे. वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यपूर्व

काळात केलेली कामगिरी विसता येणार नाही. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सुरू असलेल्या लढ्यात वृत्तपत्रे पत्रकार आणि सक्रिय होते. स्वातंत्र्यानंतर इथली लोकशाही व्यवस्था बळकट करण्यामकामी वृत्तपत्रांच्या भूमिकेविषयी अभ्यास करताना त्या–त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास अपरिहार्य ठरतो. संबंधित वृत्तपत्रांचे पत्रकार समाज जीवनातील घटना विविध घडामोडींचा साक्षीदार असतो किंबहुना या घडामोडीचा सूक्ष्म अभ्यास करून त्याला निश्चित साक्षेपी आकार देण्याचे काम करतो म्हणून संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांची भूमिका (१९२० ते १९६०) या विषयाचा अभ्यास करण्याचे निश्चित शोधप्रबंधातून निश्चित केलेले आहे.

## २.५ अभ्यास विषयाचे महत्त्व

संशोधनामध्ये वर्तमानकाळातील विश्लेषणाला फार महत्त्व आहे. विश्लेषणावरून आपणास एक नवीन दृष्टीने विषयाचे आकलन करता येणे शक्य होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ या आंदोलनाला भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. या आंदोलनात मराठी, गुजराती, उर्दू, हिंदी, तेलुगू भाषिक आपापसातील मतभेद विसरून उत्स्फूर्तपणे सामील झाले होते. या महत्त्वपूर्ण आंदोलनामध्ये लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांनी विशेषतः त्यातील ‘दैनिक केसरी’, ‘दै. प्रभात’, ‘दै. सकाळ’, दै. पुढारी’ व ‘दै. मराठा’ या वृत्तपत्रांचे बहुतेक संपादकांनी अस्पृश्यता निवारण, असहकार आंदोलन, कायदेभंगाची चळवळ अशा स्थानिक चळवळीत सक्रिय होऊन मोठे योगदान दिले. या अनुषंगाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या आंदोलन वृत्तपत्रांनी कशा प्रकारे हाताळले आहे, याबाबत महत्त्वाच्या आशय असून त्यामधून

वृत्तपत्रांनी केलेल्या लिखाणावर पहिल्यांदाच प्रकाश पडत आहे. कोणत्याही भाषेतील वृत्तपत्रेही त्या समाजाचे दर्पण असतात. त्यामधून समाजाचे आंतरक्रियांचे यथार्थ प्रतिबिंब उमटत असते. मार्क पिटर गेराल्ड यांच्या मतानुसार ''वृत्तपत्रांचा शिक्षण प्रक्रियेत उपयोग केल्या गेलेल्या शासन व विविध लोकशाही संस्थांच्या कार्यपद्धतीबद्दलही ज्ञान होते आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे काम वृत्तपत्रे समर्थपणे करू शकतात. मात्र यासाठी त्या वृत्तपत्रात काम करणारे पत्रकार, वृत्तपत्राचे संपादक व अन्य घटक समाजभान असणारे आणि मानवी मूल्यांचा आदर करणारे असावे लागतात. पत्रकाराच्या दृष्टिकांनावरूनच वृत्तपत्राची लोकाभिमुखता तसेच लोकप्रियता अवलंबून असते.

प्रस्तुत या प्रबंधामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीपेक्षा संबंधित वृत्तपत्रांच्या लिखाणावर अधिक भर देण्यात आला आहे. सामग्रीची निवड करून तिच्या आशयाचे विश्लेषण करताना केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक विश्लेषणावर भर दिलेला आहे. ही प्रक्रिया समतोल व सर्वसमावेशक व्हावी म्हणून भिन्न भिन्न विचारांच्या वृत्तपत्रांची निवड केली त्यातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा दृष्टिकोन तपासला आहे. थोडक्यात या अभ्यासाचे महत्त्व पुढील तीन मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१) महाराष्ट्राच्या स्थापनेला आज रोजी ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या अनुषंगाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे हे परिशीलन करून त्या आधारे या चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका तपासून घेतली असता त्यामधून या चळवळीचे विकसन कसे झाले, हे नव्याने समजून घेता येऊ शकेल.

२) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील उजवे, डावे, मध्यमार्गी प्रवाह आणि त्यांचे

परस्पर आंतरक्रिया वृत्तपत्रासारख्या माध्यमातून अधिक चांगल्या प्रकारे मांडता येणे शक्य आहे.

३) महाराष्ट्र हे एक प्रगतिशील राज्य आहे. या राज्याला समाज प्रबांधनाची जी ऐतिहासिक परंपरा आहे, ती परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त व दिशादर्शक ठरू शकेल, असा विश्वास आहे.

अशा प्रकारे या अभ्यासामधून वृत्तपत्राचे महत्त्व आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत अनन्यसाधारण आहे. कारण संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून आधुनिक महाराष्ट्राची जोपासना झाली आहे. ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी या अभ्यासाची मांडणी केली आहे.

## २.६ संशोधनामागील उद्देश

कोणत्याही संशोधनासाठी सर्वप्रथम उद्देश/उद्दिष्टे निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांची भूमिका (१९२०–१९६०) या विषयाचा अभ्यास करताना काही उद्देश उद्दिष्टे समोर ठेवण्यात आलेली आहेत. संशोधनामागील सुनिश्चित उद्दिष्टांचे महत्त्व सांगताना पु.ल.भांडारकर म्हणतात, ''संकल्पनांचे स्पष्टीकरण आणि सुयोग्य उद्दिष्ट यामुळे अभ्यास विषय चांगल्या प्रकारे हाताळता येतो.''[१४] तर प्रा. रा. ना. घाटोळे यांच्या मते, ''प्रत्येक समस्येशी संबंधित असे वातावरण उपलब्ध होणे आवश्यक असते.''[१५] अशा सर्व पैलूंचा विचार करता या ऐतिहासिक संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे नमूद निश्चित करता येतील.

१) देशाच्या इतिहासात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशा अनेक चळवळी झाल्या. महाराष्ट्राच्या किंबहुना देशाच्या इतिहासात संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीला महत्त्वपूर्ण स्थान आहे. अशा चळवळीचे लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या तसेच समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या वृत्तपत्रातून काही ठळक बाबी अज्ञात राहू नये, त्यांच्या सामाजिक आणि राजकीय भूमिका तपासून पाहण्यात हाच संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

२) वृत्तपत्राला साधारणतः सातव्या शतकापासूनचा इतिहास आहे. वृत्तपत्राने स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक चळवळी हाताळल्या आहेत. अनेक चळवळींना निश्चित दिशा देण्याचे प्रयत्न वृत्तपत्राने केले आहेत. त्यामुळे या महत्त्वपूर्ण लढ्यामधील वृत्तपत्रांची भूमिका तपासून पाहणे.

३) मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी समाजाच्या सर्व स्तरातील लोक पेटून उठले असतानाही समाजाला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या तत्कालीन वृत्तपत्रांच्या भूमिकेचा आढावा घेणे.

४) या चळवळीला काही वृत्तपत्रांचा विरोध असतानाही संयुक्त महाराष्ट्र चळवळ या आंदोलनाचे वार्तांकन करताना पत्रकारितेची तत्त्वे पाळली आहेत किंवा नाहीत, हे तपासणे विशेषतः या काळात वृत्तपत्रांनी दिलेल्या विविध बातम्या, लेख, अग्रलेख स्फुटलेखन यांचा अभ्यास करणे.

५) आंदोलनाच्या काळात चळवळ हाताळणाऱ्या नेत्यांनी आपली भूमिका विशद करताना वृत्तपत्रांची दिशाभूल पर्यायाने जनतेची दिशाभूल केली आहे का? हे तपासणे.

६) संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात वृत्तपत्रांनी घेतलेली भूमिका योग्य होती का? याचे विश्लेषण करणे.

७) वृत्तपत्रांच्या भाषाशैलीचा आढावा घेणे.

८) समाजकारण व राजकारण हे परस्परांशी निगडीत असले तरी समाजकारणात वृत्तपत्रांची भूमिका नेमकी कोणती होती, याबाबत त्यांच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.

९) आंदोलनाच्या काळात प्रसिद्ध झालेल्या काही व्यंगचित्रांचे दर्शन घडविणे.

## २.७ गृहीतके

कोणत्या विषयावर संशोधन करावयाचे आहे ते एकदा निश्चित झाल्यानंतर मग त्यातील समस्या अथवा संभाव्य प्रश्नांची उत्तरे, कोणती असू शकतात याचा विचार संशोधकास करावा लागतो. कोणत्याही विषयाची व्याप्ती इतकी मोठी असते की त्यातील अनेक तथ्ये आजूबाजूला पसरलेली असतात. त्यातून संशोधकास भाषातून जातो म्हणून संशोधकास नेमकेपणा आणण्यासाठी नेमक्या पैलूंचा संशोधनकांनी केलेला विचार म्हणजे गृहीतके होय. संशोधनात गृहीतके करणे अत्यंत महत्त्वाचे असते. वेगवेगळ्या विचारवंतांनी गृहीतके अथवा 'गृहतकृत्य' यांच्या संकल्पनेच्या व्याख्या केलेल्या आहेत. सी. टी. कुरिअन यांच्या मते, ''निरीक्षण अभ्यास विषयातील घटनेचे संभाव्य स्पष्टीकरण म्हणजेच गृहीतके होय.''[१६] "Hypothesis is a possible explanation of the Phenomenon under observation" बोगार्डस यांच्या मते, '' परीक्षण केल्याजाणाऱ्या विधानांना गृहितकृत्ये असे म्हणतात''. "Hypothesis is a proportion to be tested" वेबस्टर यांनी त्याचा शब्दकोशात दिलेल्या व्याख्येनुसार गृहीतकृत्य किंवा उपकल्पना म्हणजे गृहीत धरलेले विधान, तत्त्व किंवा अट होय.''[१७] गृहीतकाचे महत्त्व सांगताना प्रा.

गुड आणि हॅट यांनी म्हटले आहे की, ''गृहीतके अथवा उपकल्पना म्हणजे असे अनुमान की, जे तथ्य निरिक्षणावर आधारलेले असून, त्यामुळे भावी संशोधकाला चालना मिळते''[१८] जे पूर्वी माहिती आहे, ते पुन्हा तशाच शब्दात मांडण्यात आलेले नसते किंवा त्याला शास्त्रीय बैठक नसते. अशा वेळी सर्वांनाच माहीत असलेल्या गोष्टी देखील गृहीतकाच्या यावरूनात माडून त्याची चाचणी घेणे आवश्यक व उपयुक्त असते.

गृहीतके म्हणजे कच्चे निष्कर्ष असतात त्यामध्ये काही सूत्रे ही एखाद्या प्रमेयाच्या तपासणीसाठीही दिशादर्शक ठरतात. अशा प्रमेयांसंदर्भात अंतिम निष्कर्षांपर्यंत पोहोचण्यासाठी ही गृहीतके पोषक ठरतात. त्यांचे सूत्ररूप आकलन केल्यास निष्कर्ष काढणे सोपे जाते. म्हणून गृहीतके म्हणजे मनाने बनविलेली खरी कल्पना नाही हे लक्षात ठेवावे लागते.

वेबस्टर यांनी गृहीतके म्हणजे, ''गृहीत धरलेले विधान, तत्त्व, अथवा अट''[१९] असे म्हटले आहे, तर प्रा. पी. व्ही. यंग यांच्या मते, ''ज्यांच्या आधारे संशोधन कार्य करता येते असा विचार म्हणजे गृहीतके होय''[२०] यावरून संशोधनात गृहीतकांचे महत्त्व अधोरेखित होते. ज्या आधारावर संशोधन गृहीतके कृत्याची निवड करतो त्यातील संशोधकाचा अभ्यास कल्पना पत्रकारितेत, जीवनाविषयी दृष्टिकोन, वाचन, वेगवेगळे संबंध, विविध प्रकारावर संशोधकाला योग्य गृहीतके सुचविणे/सुचणे अवलंबून असतो. प्रत्येक घटनेत काही सिद्धांत हे पूर्वाअभ्यासातून अगोदरच मनात निर्माण झालेले असतात. परिस्थितीमुळे वेगवेगळी परिवर्तने घडून येतात. अशा परिवर्तनाच्या चक्रातून संशोधन करून प्रस्थापित करण्यात आलेली सिद्धांत कल्पना तशीच ठेवलेली आहे की बदललेली आहे हे गृहीतकांमुळे समजून येते. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात

वृत्तपत्रांनी आपापली गृहीतके काढलेली होती.

1) पत्रकारितेत जनतेच्या भावनांचा आदर करणे अपेक्षित असते. परंतु काही वृत्तपत्रांनी विशेषतः दै.'सकाळने' याचा फारसा विचार न करता आपली भूमिका जनतेवर लादण्याचा प्रयत्न केला.

2) आंदोलनाच्या काळात सर्व स्तरातील लोक या आंदोलनाला मुख्य केंद्रबिंदू मानून रस्त्यावर उतरले होते. त्यांची इतर वृत्तपत्रांनी दखल घेतली. मात्र याला दै. सकाळ अपवाद होते.

3) काही वृत्तपत्रांनी आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी विविध लेख आणि अग्रलेखातून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर टीका केली. त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र समितीकडून झालेल्या चांगल्या कामाची दखलही घेतली.

4) संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात आंदोलनाचे वार्तांकन करताना वृत्तपत्रांनी मिळालेल्या यशाबरोबरच अपयशाची ही जबाबदारी घेतली आहे.

5) संयुक्त महाराष्ट्र चळवळीला दै. 'सकाळ' या वृत्तपत्राने विरोध केला असला तरी दै. 'सकाळ'मधील सर्वच लिखाण संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विरोधात होते, असा अर्थ घेणे योग्य नाही.

बऱ्याच वेळेला संशोधक गृहीतके सिद्ध करण्याच्या मागे लागतो, जमा केलेली माहिती वळवून घेतो. गृहीतकाचे रूपांतर सिद्धांतात कसे होईल हे पाहतो म्हणून गृहीतके मार्ग कोठे जाणार आहे हे सांगण्याचे काम करतो परंतु ते संशोधनात अंतिम नसते. कोणत्याही संशोधनात निवडलेली गृहीतके स्पष्टपणे नोंदवून त्यांचे आकलन करावे लागते. ते आकलन विशेष महत्त्वाचे आहे. कारण अंतिम चरणात ही गृहीतके निष्कर्ष

काढताना पुन:श्च तपासून घ्यावी लागतात व ती सलगपणे मांडावी लागतात. या प्रत्येक गृहीतकांची पडताळणी करूनच शेवटच्या प्रकरणात तर्कसंगत व परस्परपूरक निष्कर्ष नोंदवले आहेत.

## २.८ वर्णनात्मक संशोधन आराखडा

संशोधनात अन्वेषणात्मक आराखड्याप्रमाणेच या संशोधन आराखड्यात बरीच माहिती बाहेरील तथ्यांच्या माध्यमातून संशोधकाला अपेक्षित असते म्हणून संशोधकांनी संशोधनातील सर्व मुद्द्यांचा सविस्तर आढावा घ्यावा लागतो. एखाद्या शोध समस्येबाबत तथ्यांचे वर्गीकरण करताना हा आराखडा वापरला जातो. वर्णनात्मक संशोधन आराखडा कसा वापरावा हे सांगताना प्रा. रा. ना. घाटोळे म्हणतात, ''एखाद्या समस्येशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करणे हा वर्णनात्मक शोध आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. असे विवेचन करता यावे म्हणून त्या विषयाच्या बाबतीत यथार्थ व पूर्ण माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक असते.''[२१] या प्रकारच्या अध्ययनामध्ये तथ्यांचे वर्णन व विश्लेषण करावे लागते. आधुनिक काळात सर्व ज्ञानांगे वर्णनप्रधान होत आहेत. त्या दृष्टीने वर्णनात्मक पद्धतीचे महत्त्व अनन्यसाधारण बनले आहे. शोध संकल्पनांच्या प्रारंभ अवस्थेत वर्णन पद्धतीस महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. वर्णनात्मक पद्धतीत विषयाचे घटक स्पष्ट नसल्याने या पृथ्नकरणाचा प्रश्न निर्माण झालेला नसतो. अशा वेळी वर्णनाद्वारे शोधविषयाचे यावरून स्पष्ट करण्यास या पद्धतीचा वापर होतो. शिवाय कोणत्याही शांधसंकल्पात जेव्हा शोध घ्यावयाचे कार्य संपते तेव्हा, याविषयी वर्णन करणे महत्त्वाचे असते.

कोणत्याही शोधाचे उद्दिष्ट नवे सत्य प्रकाशात आणणे हे असते. नवीन माहिती, नवे

ज्ञान, नवा सिद्धांत प्रस्थापित करणे यासंबंधी परस्पर जाणीव करून देणे, दृष्टिकोन मांडणे, नवी माहिती सादर करणे या संदर्भात महत्त्वाचे ठरतात. अशी यथार्थ व साधार माहिती नसेल त्याला ते वैज्ञानिक संशोधन म्हणविले जाणार नाही. वैज्ञानिक वर्णनाचा आधार हा वास्तविक व विश्वसनीय तथ्ये यात येतो. अशा प्रकारच्या अध्ययनामध्ये तथ्यांचे वर्णन करणे महत्त्वाचे असते. त्यातून अपेक्षित पैलूंवर नवा प्रकाश टाकता येतो. प्रा. रा. ना. घाटोळे म्हणतात, ''व्यक्ती, समूह किंवा प्रकार इत्यादी विषयांचे वर्णनात्मक विवरण करावयाचे आहे त्याला त्या विषयाशी संबंधित असलेल्या तथ्यांचे एक किंवा अधिक वैज्ञानिक पद्धती वापरून वास्तविक तथ्ये संकलित केली पाहिजेत. संशोधकाने अशी तथ्ये संकलित करण्याचा उद्देश ठेवला पाहिजे व त्या तथ्यांच्या आधारे संशोधनाचा आराखडा विकसित केला पाहिजे. अशा रीतीने तथ्याधिष्ठित माहितीच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण करणे म्हणजे वर्णनात्मक शोध आराखडा तयार करणे होय.''[२२] असा आराखडा तयार करून तथ्यांची शास्त्रीय क्रमवारी लावता येणे शक्य होते.

याबाबत डॉ. दु. का. संत यांनीही आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, ''वास्तविक वर्णनप्रधान पद्धती ही एखाद्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीची अत्यंत सामान्य वा श्रेष्ठ यापैकी काहीही नाही. महत्त्वाची बाब म्हणजे एखादा दृष्टिकोन हा आपल्या विशिष्ट प्रकारच्या समस्येची सोडवणूक करू शकतो की नाही ही आहे.''[२३] यावरून संशोधनाचे फलित सांगताना माहिती कशी मिळविली, हे सर्व पद्धतीने सांगितले जाते. ज्या ठिकाणी विषयाचे क्षेत्र व्यापक आहे त्या ठिकाणी ही वर्णनात्मक पद्धती विकसित होते. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात अभ्यासविषयातील समूह व्यक्ती यांच्या

लक्षणांचे वर्णन असते. उदाहरणार्थ एखाद्या शिक्षण संस्थेचा अभ्यास करण्यापूर्वी त्या संस्थेच्या इतिहास तिच्या स्थापनेच्या हेतू संस्थेत होऊन गेलेली आदर्श व्यक्ती त्यांनी केलेला त्याग, सध्याची शिक्षणपद्धती, संस्थेची प्रशासन शिक्षकवर्ग, विद्यार्थी शिक्षकामधील संबंध, शिक्षक व्यवस्थापन यांच्यातील संबंध, या बाबतीतील सर्व माहिती तपशिलाने संशोधकाजवळ असेल तरच त्याला वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग करता येईल.

**वर्णनात्मक संशोधन आराखड्याच्या अटी**

संशोधन करताना वर्णनात्मक संशोधनामधील आराखड्याच्या अटीही लक्षात घेतल्या पाहिजेत. खालील गोष्टींवर विशेष लक्ष द्यावे लागेल.

१) सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अध्ययन विषयाची निवड. ही निवड काळजीपूर्वक करावी लागते. शोधविषय असा असावा की, ''ज्या विषयाच्या बाबतीत आवश्यक संबंधित तथ्ये संकलित करता येतात,''[२४] ही वर्णनात्मक आराखड्याची पहिली अट आहे.

२) दुसरी अट अशी की, ज्या तंत्राचा वापर करून संबंधित व आवश्यक तथ्ये गोळा करावयाची आहेत, ''त्या तंत्राची निवड ही कौशल्याने व काळजीपूर्वक केली पाहिजे. तंत्राची निवड जर योग्य नसेल तर संशोधन बिनचूक होणार नाही. संशोधनात वैज्ञानिकता येणार नाही. वैज्ञानिकतेऐवजी तात्त्विकता उत्पन्न होईल, म्हणून तंत्राची निवड करणे ही दुसरी अट आहे.''[२५] वर्णनात्मक आराखडा अचूक तथ्य संकलनावर आधारलेला असतो.

३) निर्दोष वर्णनात्मक आराखडा तयार करण्यासाठी संशोधकाने आपल्या

संशोधनात आपले पूर्वग्रह, पक्षपातीपणा, गैरसमज इत्यादी दोषांचा प्रवेश होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ''कारण त्यामुळे वर्णनात पूर्वधारणा, पूर्वग्रह, पक्षपात इत्यादी दोष नकळत उमटतात. अतिशयोक्तीचा दोषही निर्माण होतो. म्हणून संशोधन करताना अथवा वर्णनात्मक आराखडा तयार करताना संशोधकाने तटस्थ व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा अवलंब केला पाहिजे.''[२६]

## २.९ वर्णनात्मक संशोधन आराखड्यातील टप्पे

या पार्श्वभूमीवर वर्णनात्मक संशोधनातील विविध पायऱ्यांचा अथवा टप्प्यांचा अभ्यास करणे सयुक्तिक ठरेल. वर्णनात्मक संशोधनाचे टप्पे खालील प्रमाणे वर्णनात्मक आराखडा हा अनेक दृष्टीने फलदायी ठरतो. प्रा. घाटोळे म्हणतात,

१) ''संशोधनाच्या उद्दिष्टांचे निरूपण करणे : या निरूपणात शोध विषयाशी संबंधित असलेल्या मौलिक प्रश्नांचा व उद्दिष्टांचा समावेश होतो. त्यामुळे असंबद्ध व अनावश्यक तथ्ये वगळता येतात श्रम आणि पैसा व्यर्थ खर्च होत नाही.''[२७]

२) तथ्य संकलनाबाबत योग्य ती काळजी घेतली पाहिजे. प्रा. रा. ना. घोटाळे म्हणतात ''तथ्यसंकलनाची तंत्रे : ही निवड काळजीपूर्वक करावी लागते. विषयाशी असंबद्ध असणारी तत्त्वे आकडे किंवा पुरावे टाळता यावेत म्हणून ही निवड आवश्यक आहे. आपल्या उद्दिष्टाला अनुरूप अशी कोणती संशोधन पद्धती उचित होईल? हे लक्षात घेऊन तिची निवड केली पाहिजे. उपयुक्त शोध पद्धतीच्या निवडीवर संशोधनाचे यश अवलंबून असते.''[२८]

३) नमुना निवड हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. प्रा.घाटोळे म्हणतात, ''एखाद्या समूहातील प्रत्येक घटकाचे व समूहाचे अध्ययन करणे हे कठीण

असते. म्हणून निवड करावी लागते व त्यांचे अध्ययन करून निष्कर्ष काढावे लागतात. अशी प्रातिनिधिक यावरूनाची निवड करताना पूर्वग्रह, पूर्वसुधारणा यापासून दूर राहणे आवश्यक असते.''[२९]

४) आकड्यांचे संकलन व त्यांचे निरीक्षण : नमुना निवड झाल्यानंतर वैज्ञानिक तंत्राच्या साहाय्याने नुसत्या आकड्यांचे संकलन न करता त्यांचे परीक्षणही करावे लागते. ''अनावश्यक बाबींचा त्यात समावेश होऊ नये, हा अशा परीक्षणाचा उद्देश असतो. यथार्थ व वास्तविक माहिती गोळा करणे हे मुलाखत घेणाऱ्या किंवा निरीक्षण करणाऱ्या व्यक्तीच्या प्रामाणिकतेवर निर्भर असते. तो प्रामाणिक व परिश्रमी असेल तरच यथार्थ माहिती गोळा होते.''[३०]

५) अहवाल अथवा प्रतिवेदन सादर करणे : ह्या प्रतिवेदनात शोध विषयांशी संबंधित तथ्यांचे विवरण आणि सामान्य निष्कर्ष असतात. प्रा. घाटोळे म्हणतात, ''हा अहवाल सादर करताना भाषेची काळजी घ्यावी लागते. भाषा साधी व सरळ हवी. अलंकारिक नको. कारण सालंकृत भाषेत अतिशयोक्ती असू शकते. अतिरंजकताही असू शकते. त्यामुळे अशा सालंकृत निवेदनाचे भिन्न भिन्न अर्थ निष्पन्न होतात.''[३१] हे सर्व टप्पे येथे काळजीपूर्वक लक्षात घेतले आहेत. त्यांचे आकलन केले असता असे दिसते की, हा आराखडा वापरताना कालबद्ध नियोजन महत्त्वाचे ठरते. त्यांची मीमांसा करताना सूत्ररूप चर्चा करून येथे पुढील दिशा ठरविली आहे. तथ्य संकलनाची साधने वापरून आणि त्यांची पद्धतशीर मांडणी करून हा अभ्यास पूर्ण करावयाचा आहे. या अभ्यासातील सर्व तथ्यांची मांडणी ही अशा प्रकारे शास्त्रशुद्ध करण्यावर भर दिला आहे.

## २.१० संशोधन सामग्रीची निवड

इतिहास हे साधनांच्या दयेवर चालणारे शास्त्र आहे. साधनांना त्यामुळे सूर्य व चंद्र म्हटले जाते. अंधारलेल्या ध्येयपथावरून सत्याचा प्रकाश शोधण्यासाठी ही साधने उपयुक्त ठरतात. या साधनांचे मूल्य तथ्य संकलनामध्ये अनन्यसाधारण महत्त्वाचे ठरते. याबाबत स. मा. गर्गे म्हणतात, ''सामाजिक इतिहासावर राजकीय प्रभाव पडतो हे खरे आहे. समाजाच्या जडणघडणीवर समकालीन सत्तेच्या राजकीय धोरणांचा परिणाम होणे अपरिहार्य असते हेही खरे आहे. किंबहुना अशा सत्तेच्या राजकारणामुळे समाजाला वेगळे वळण लागते हेही नाकारता येत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली म्हणजे सत्तेच्या इतिहासापासून समाजाचा इतिहास शोधणे किती जिकिरीचे आहे हे समजू शकेल.''[३२] संयुक्त महाराष्ट्र चळवळीने मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील द्विभाषिक मुंबई राज्याशी लढा दिला व त्यातून उज्ज्वल यश संपादन केले. या संघर्षात वृत्तपत्रे ही चळवळीच्या पाठीशी उभी राहिली. त्यामुळे लढा यशस्वी झाला. पुढे ते म्हणतात, ''सामाजिक पैलूंवर आणि समाजाच्या सांस्कृतिक जीवनावर भर देऊन इतिहासाचे विवेचन आणि विश्लेषण करणे अशक्य नाही.''[३३] संयुक्त महाराष्ट्राची ही चळवळ भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील आणि महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची जाज्वल्ल्य घटना आहे. म्हणून या चळवळीचे विश्लेषण करताना सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक अशा अनेक पैलूंचा चिकित्सक विचार करावा लागणार आहे. चळवळीचे विश्लेषण करताना सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अशा अनेक पैलूंचा विचार करावा लागणार आहे.

इतिहास संशोधन ही एक अशी शाखा आहे की, जी भूतकाळाचा विचार करते

वर्तमानकाळाचे पृथ:करण करून आणि भविष्याविषयी अनुमान काढून सद्यःस्थितीमध्ये त्याचा उपयोग वर्तवते. इतिहास संशोधन प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम साधनांवर आधारित असते, ही साधने लिखित, अलिखित व मौखिक संदर्भावर आधारित असतात.

या शोधनिबंधासाठी प्राथमिक साधनांमध्ये आंदोलनाच्या काळातील दै.'सकाळ', दै. 'केसरी', दै. 'पुढारी' दै. 'प्रभात' तसेच दै. 'मराठा' या वृत्तपत्रांच्या मूळ अंकाचे वाचन, निरीक्षण, तसेच आंदोलनाच्या काळात प्रसिद्ध झालेल्या मूळ पुस्तकांचा आधार घेतलेले आहेत. वरील वृत्तपत्रामधील जुन्या आठवणी, राजकीय आणि सामाजिक विषयावरील लेख, अग्रलेख, प्रशासकीय रिपोर्ट इत्यादींचा आधार घेतलेला आहे.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये ज्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. असे अनंत विष्णू आजगावकर, मृणाल केशव गोरे, दिनू रणदिवे, कॉ. गोविंद पंढरीनाथ पृष्ठसरे, दत्ता ताम्हाणे, वसंत आत्माराम मोरे, मधू शेटे, अरविंद वासुदेव नाचणे, भाई वैद्य, डॉ.बाबूभाई डबूवाला, पन्नालाल सुराणा आणि शांताबाई रानडे आदींना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी संदर्भात मुलाखती घेतल्या आहेत. त्यांनी दिलेल्या मुलाखतीतून संयुक्त महाराष्ट्र चळवळीच स्वरूप त्यात सहभागी असलेले वेगवेगळे घटक आणि वृत्तपत्राची भूमिका या विषयाचे अनेक पैलू उलगडणे शक्य झाले. मुलाखतकारांनी दिलेल्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे आधारे संदर्भ साधनाचा शोध घेतलेला आहे. उपलब्ध झालेल्या संदर्भ साधनाची उलटतपासणी करून संबंधित संदर्भ साहित्य लेखनासाठी वापरलेले आहे.

दुय्यम संदर्भसाधनांच्या मध्ये अप्रकाशित एम.फिल, पीएच.डी.चे प्रबंध, तसेच अनेक प्रकाशित संदर्भग्रंथाचा समावेश आहे. प्राथमिक आणि दुय्यम साधने संकलित करून उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून त्याआधारे निष्कर्ष काढलेले आहेत. त्या अनुषंगाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये वृत्तपत्रांची भूमिका किती महत्त्वपूर्ण राहिलेली आहे हे निश्चित केलेले आहे. प्रबंधाच्या संशोधनासाठी सकाळ वृत्तपत्राचे ग्रंथालय, पत्रकार संघाचे ग्रंथालय, एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनप्रणीत प्रा. मधू दंडवते ग्रंथालय, चाणक्य मंडल परिवार या संस्थेचे ग्रंथालय पुणे विद्यापीठातील डॉ. जयकर ग्रंथालय, विश्रामबागवाडा, शासकीय विभागीय ग्रंथालय, नगरवाचन ग्रंथालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे ग्रंथालय, गोखले इन्स्टिट्यूट, साधना साप्ताहिक, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर इत्यादी ग्रंथालयातील ग्रंथसंपदाचा आधार घेतलेला आहे.

## २.११ आशय विश्लेषण

अशा विश्लेषण तंत्राद्वारे गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय तसेच वस्तुनिष्ठ तथ्यात रूपांतर करता येते. पी. व्ही. यंग यांच्या मते, ''लिखित किंवा मौखिक साधनाद्वारे संकलित केलेल्या तथ्यांच्या पद्धतशीर वस्तुनिष्ठ व प्रमाणबद्ध अर्थ निवड करण्याच्या संशोधनात्मक तंत्राला आशय विश्लेषण म्हणतात.''[३४] या दृष्टीने हे तंत्र वृत्तपत्राच्या अभ्यासाला महत्त्वाचे आहे.

बॅरलसन यांनी आशय विश्लेषण या संशोधन तंत्राची शास्त्रीय व्याख्या केली आहे. त्यांनी म्हटले आहे, ''मुद्रित किंवा प्रसारमाध्यमातील सामग्रीचे संख्यात्मक किंवा

गुणात्मक विश्लेषण करण्याचे तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय.''[३५] फ्रेड ॲण्ड कर्लिअर यांच्या मते, ''चलांचे मापन व्यवस्थित, वस्तुनिष्ठ व संख्यात्मक पद्धतीने करण्यात परस्परसंबंधाचा अभ्यास व विश्लेषण करण्याचे तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय.''[३६]

वृत्तपत्रीय लिखाणाचे संशोधन हे केवळ संख्यात्मकदृष्ट्या मोजून आकलन होत नाही. या लिखाणाच्या गुणात्मक वेशिष्ट्यांचाही विचार करावा लागतो. कारण अग्रलेख किंवा लेख किती जागा व्यापतो, याला विशेष महत्त्व असत नाही. तर त्यातून कोणता आशय व्यक्त होतो तो किती प्रभावी आणि परिणामकारक आहे याला खास महत्त्व असते. म्हणून अशा संशोधनात संख्यात्मक विश्लेषणापेक्षा लेखनाच्या गुणात्मक विश्लेषणावर भर देणे उचित आणि आवश्यक ठरते.

अशा प्रकारच्या गुणात्मक आशय विश्लेषणामुळे उपलब्ध सामग्रीचे शास्त्रीय वर्गीकरण करून त्या आधारे तथ्यांची नव्याने जुळणी व फेरमांडणी करणे शक्य होणार आहे. गुणात्मक आशय विश्लेषणातून करावयाचे विवेचन हे मूळ प्रमेयास बळकटी आणणारे ठरू शकते. या संदर्भात डॉ. पु. ल. भांडारकर यांनी तीन हेतू सांगितले आहेत.

अ) आशय लक्षणांचे निर्देशन करण्यासाठीचे हेतू.

ब) आाशयामागील कारणे कोणती आहेत ते पडताळून पाहण्याचा हेतू.

क) ''आशयाचे परिणाम कोणते आहेत ते पाहण्याचे हेतू.''[३७]

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका पडताळून पाहण्यासाठी या तीनही हेतूंचा विचार संशोधनात करून त्यांचे अध्ययन करण्यावर भर दिला आहे.

आशय विश्लेषण या तंत्राच्या व्यवहार्य वापरातील तीन अडथळ्यांविषयी

प्रा.पु.ल. भांडारकर सांगतात,

**१) उमगस्त्रोतांचा नमुना निवडणे :** अध्ययनात कोणत्या वर्तमानपत्रांचा किंवा रेडिओ स्टेशन्सचा नमुना म्हणून समावेश करावयाचा हे ठरविणे आवश्यक आहे.

**२) कालनिर्धारण :** अध्ययनासाठी कालखंडाचे निर्धारण करणे आवश्यक आहे. अमुक अमुक कालातील अंकांचे परीक्षण करण्यात येईल, हे स्पष्टपणे ठरवून घेणे आवश्यक असते.

३) वर्तमानपत्रातील समग्र संज्ञापनांपैकी कोणत्या पैलूंचा अध्ययनात समावेश करावयाचा आहे, तेही ठरवून घेणे आवश्यक असते.''[३८]

त्यांचा वापर व विचार करून या अभ्यासाची तथ्ये पडताळून घ्यावयाची आहेत. त्यामुळे शोध समस्येबाबत तथ्यांच्या अधिक समीप जाता येऊ शकेल.

## २.१६ अन्य कागदपत्रांचे विश्लेषण

कागदपत्रे ऐतिहासिक ज्ञानाचा प्राण असून, ऐतिहासिक शोधाचे ते उगमस्थान असतात. कागदपत्रांच्या साह्याने इतिहासाचे, व्यक्तीचे विचार आणि कृती या संदर्भात ज्ञान मिळते. अशी कागदपत्रे मिळाल्यानंतर त्याची शहानिशा करावी लागते. या संदर्भात प्रा. पु. ल. भांडारकर म्हणतात, ''कागदपत्रे, पुस्तके, अहवाल इत्यादींचा उपयोग तथ्य प्राप्त करून घेण्यासाठी होऊ शकतो.''[३९]

प्रस्तुत संशोधनामध्ये 'सकाळ', 'केसरी', 'प्रभात', 'मराठा', 'पुढारी', तसेच 'साधना' साप्ताहिक व वृत्तपत्रांच्या मूळ प्रती मिळविण्यात आल्या. तसेच आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या व्यक्तींची पुस्तके, त्यांच्या मुलाखती व त्या काळातील प्रसिद्ध

झालेली मूळ पुस्तके, पत्रव्यवहार, आंदोलनात सहभागी झालेल्या विविध पत्रांच्या बैठकीचे इतिवृत्त, या आंदोलनाच्या संदर्भात प्रसिद्ध झालेली विविध पुस्तके आणि संशोधन पत्रिका व इतर सामग्रीचे संकलन करण्यात आले आहे. तसेच मुंबई, बेळगाव, पुणे येथे जाऊन संशोधकाने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकांचे इतिवृत्त तपासून घेतले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत केसरी या वृत्तपत्राने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. या चळवळीबाबत केसरीच्या १९५० ते १९६० या काळातील दैनिकांच्या संकलित केलेल्या फाईल्सचा अभ्यास प्रामुख्याने केला आहे. तसेच श्री. जयंतराव टिळक हे केसरीचे संपादक असताना त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीस अधिक गती दिली. त्यांनी केलेला पत्रव्यवहारही तेथे तपासून घेतला आहे. चळवळीतील प्रमुख नेते श्रीपाद अमृत डांगे, एस. एम. जोशी, आचार्य प्र. के. अत्रे यांनी केलेले आत्मचरित्रपर लिखाण तसेच या संदर्भात त्यांनी केलेला त्यांचा पत्रव्यवहाराचा शोध घेऊन त्यावरही प्रकाश टाकला आहे. य. दि. फडके यांनी आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास या शीर्षकांचे दोन खंड लिहिले आहेत. त्यामधून त्यांनी काही वृत्तपत्रांचे संदर्भ दिलेले आहेत. त्याही पुढे ऐक पाऊल टाकून संशोधकांनी कागदपत्रे व पत्रव्यवहार पाहण्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर येथे असलेल्या पुराभिलेख कार्यालयास भेट देऊन जुनी कागदपत्रे तपासून त्याची खात्री केलेली आहे. कारण इतिहासाच्या संशोधनामध्ये प्राथमिक साधनाचे महत्त्व अग्रस्थानी असते, ही बाब लक्षात घेऊन त्या अनुषंगाने त्यावर अधिक भर दिलेला असून प्राथमिक माहितीचा उपयोग प्रबंधाच्या अभ्यासात केलेला आहे.

## २.१३ मर्यादा

कोणत्याही सामाजिक संशोधनात काही मर्यादांचे भान ठेवावे लागते. प्रामुख्याने आशय विश्लेषणाचे तंत्र वापरतानासुद्धा काही मर्यादा येतात. रा. ना. घाटोळे म्हणतात, ''गुणात्मक तथ्यावरून परिणामात्मक व वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढणे कठीण असते. अनेकदा संशोधक मूळ विषय सोडून आडमार्गाला जातो. तसेच गुणात्मक तथ्यांचे विश्लेषण करताना पक्षपाती दृष्टिकोन टाळणे असंभव होते.''[४०] या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनातील मर्यादा खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) प्रस्तुत संशोधन प्रबंध अभ्यास म्हणजे आंदोलनाच्या काळातील वार्तांकन करणारे विविध वृत्तपत्रांचे मालक व संपादकांचे चरित्र नाही.

२) संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा काळातील काही वृत्तपत्रांच्या संपादकांनी स्वतःच्या आत्मचरित्राव्यतिरिक्त इतर कोणतेही पुस्तक लिहिले नसल्यामुळे त्यांनी केवळ आपल्या वृत्तपत्रात लिहिलेले लेख, बातम्या आणि भाषणाचाच आधार प्रबंधातून घेतलेला आहे.

३) आंदोलनाच्या काळात काही वृत्तपत्रे नियमित प्रसिद्ध होत असत, मात्र वाहतुकीअभावी तेच वृत्तपत्र इतर भागांत उशिरा मिळत असल्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना आंदोलनाची माहिती उशिरा मिळत असे.

४) संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, अग्रलेख तसेच आंदोलन पुरस्कर्त्यांनी विविध ठिकाणी केलेली भाषणे व त्यांचे चरित्र वाचनानंतर जे निदर्शनास आले ते नम्रपणे प्रबंधातून मांडण्याचा आणि विश्लेषित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

५) हा अभ्यास 'केसरी', 'पुढारी', 'प्रभात', 'मराठा', 'सकाळ' या पाच प्रमुख वृत्तपत्रांच्या भूमिकेची चर्चा करणारा आहे. या काळातील अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यांनी हा लोकलढा उचलून धरला. परंतु स्थळ आणि काळ यांच्या मर्यादा लक्षात घेऊन आणि साधन सामग्रीच्या अनुपलब्धतेमुळे हे सर्व साहित्य अथक प्रयत्न करून ही संशोधनासाठी वापरता येणे शक्य झाले नाही. त्यामुळे 'केसरी', 'पुढारी', 'प्रभात', 'मराठा', 'सकाळ' या पाच वृत्तपत्रांच्या भूमिकेवरच अभ्यासातून लक्ष केंद्रित करण्यात आले.

## २.१४ साहित्य सर्वेक्षण

कोणत्याही सामाजिक संशोधनामध्ये साहित्य सर्वेक्षणाला विशेष महत्त्व असते. कारण असे साहित्य सर्वेक्षण केल्यामुळे अभ्यास विषयाच्या संदर्भात संशोधन कसे करण्यात आले आहे, त्यामध्ये काही दोष आहेत का तसेच त्यातील मर्यादांवर कशी मात करावी या प्रश्नांची उत्तरे सापडतात. साहित्य सर्वेक्षणाचे महत्त्व सांगताना पु.ल.भांडारकर म्हणतात, ''संशोधनकर्त्यांनी निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबंधित साहित्याचे वाचन व मनन हा सामाजिक संशोधनातील एक महत्त्वाचा भाग होय.''[४१] हे लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनास बळकटी प्राप्त करून देण्यासाठी प्रबंधामधून येथे थोडक्यात संदर्भ साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

सामाजिक संशोधनामध्ये प्रकाशित साहित्याच्या सर्वेक्षणाला विशेष महत्त्व आहे. ''अशा अध्ययनासाठी संशोधनकर्त्याने प्रथमतः ज्या विषयाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंधित साहित्य वाचून काढावे असे वाचन करीत असताना त्या साहित्याच्या आधारे

काही गृहीतके मांडता येण्यासारखे आहेत काय याकडे त्याने सतत लक्ष ठेवावे लागते.''[४२] या अभ्यासामध्ये सुद्धा प्रकाशित सामग्रीवर योग्य ते लक्ष केंद्रित करून काही विषयघटकांच्या बाबतीत आधीच्या संशोधनकर्त्यांनी काही सर्वेक्षण केले आहे याचीही पडताळणी करून पाहिलेली आहे.

प्रा. रा. ना. घाटोळे म्हणतात, ''संबंधित साहित्याचे अध्ययन किंवा साहित्य सर्वेक्षण ही पहिली आवश्यक अट आहे. कारण त्याशिवाय त्या विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होत नाही. अशा प्रारंभिक ज्ञानाशिवाय किंवा सैद्धांतिक आधाराशिवाय शोध कार्य करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय.''[४३] तसे होऊ नये म्हणून संशोधकाला प्रकाशित साहित्याच्या आधारे काही नवीन मांडणी करावी लागते. या संशोधन प्रकल्पात उपलब्ध प्रकाशित साहित्याचे वर्गीकरण करून त्याबाबत एक नवी दृष्टी विकसित केलेली आहे. ''महत्त्वाच्या विषयावर केंद्रित व्हावे प्रबंधातून मागील आढावा घेण्यात आलेला आहे.''[४४] असा आढावा घेत असताना प्रत्येक ग्रंथातील किंवा संदर्भ सामग्रीतील महत्त्वाचा घटक कोणता आहे, तो या संशोधनास उपयुक्त कसा आहे, ते येथे पडताळून पाहिले आहे. अभ्यास विषयाबाबतचे अनेक दृष्टिकोन समजून घेण्यासाठी आणि त्या पलीकडे जाऊन विषयाचा शोध घेण्यासाठी हे आकलन पोषक ठरलेले आहे. शिवाय असा अभ्यास करताना पूर्वसूरींच्या संशोधनातील उणिवा कोणत्या आहेत आणि त्या कशा दूर करता येतील याचा विचार यातून जाणीवपूर्वक केलेला आहे.

## २.१५ विविध पुस्तकांतील माहितीचे विश्लेषण

### १) संयुक्त महाराष्ट्राचे महाभारतः सत्यान्वेषी : १९५८

या पुस्तकाची प्रस्तावना साकारताना संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस एस. एम. जोशी यांनी असे लिहिले आहे की, स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर स्वाभाविकताच भाषिक राज्याच्या निमितीच्या प्रश्नाला असामान्य महत्त्व प्राप्त झाले. त्यातही आंध्र, महाराष्ट्र आणि नंतर महागुजरात या प्रदेशातील चळवळींना विशेष रंग चढला. महाराष्ट्रात तर चिमुकले महाभारतच घडले. मुंबई शहर हे त्यातील कुरुक्षेत्र ठरले. महाभारतातल्याप्रमाणे शिष्टाचार, कारस्थाने, आत्याचरण, फसवेगिरी, दृष्ट दावे कुटिल नीती इत्यादी सर्व वाममार्गाचा अवलंब आजच्या सत्याग्रही आणि अहिंसक म्हणून सतत मिरविणाऱ्या राजकर्त्यां पक्षातले व त्यांच्या पुढाऱ्यांनी केले. आपल्या हुकमतीत असलेल्या बहुसंख्य इंग्रजी आणि अन्य भाषांत चालणाऱ्या वृत्तपत्रांद्वारे असाह्य आणि दुष्ट प्रचार करून त्यांनी मराठी जनतेला बदनाम केले आणि अन्य भाषा बोलणाऱ्या भारतीय जनतेपासून मराठी जनतेला अलग पाडले. अजूनही तो प्रकार चालू आहे हा सदर इतिहास ताजा असला तरी घटना इतक्या झपाट्याने बदलले की, सर्वसामान्य माणसाला या सर्व घटनांचे क्रमवार स्मरणही राहू नये. अशा वेळी हा समग्र इतिहास एके ठिकाणी ग्रंथीत करून सांगणाऱ्या एक पुस्तिकेची निवड फार भासत होती. या पुस्तिकेमुळे ही एक महत्त्वाची गरज पूर्ण केली आहे. यावरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी सत्यान्वेषी यांनी लिहिलेल्या संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत या ग्रंथातील माहितीचे योगदान किती बहुमोल आहे, याची खात्री पटते.

लोकमताची कदर न करता सत्तासंपत्तीच्या जोरावर अन्यायाचा वरवंटा

काँग्रेसवाले चालू ठेवीत आहेत. त्याबद्दल जनताही रुष्ट आहे. परंतु काँग्रेस शिवाय दुसरे कोणी ही इतक्या भल्या रीतीने कारभार चालवू शकणार नाहीत असा भ्रमबुद्धीचा प्रचार काँग्रेसवाले निर्माण करीत असतात मग लोकांनाही तसेच वाटू लागले आहे. सत्यान्वे यांनी या ग्रंथात केलेली मीमांसा अर्थपूर्ण आहे. ते म्हणतात, ''प्रतापगड निदर्शनासाठी समितीने केलेल्या आवाहनाला मराठी जनतेने अंतःकरणपूर्वक उत्साहाने साथ दिली आणि विरोधकांनाही मान्य करणे भाग पडले. इतक्या शिस्तीने व संयमाने निदर्शने करून संयुक्त महाराष्ट्रवादी जनतेच्या रक्तात काँग्रेसनिगडित जातीयतेचे विष भिनू शकत नाही. हे सहप्रयोग दाखविले''[४५] म्हणून सदर ग्रंथातून घेतलेल्या घटना या संशोधनासाठी पूरक व पोषक ठरणार आहेत.

### २) संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी : माधव गडकरी : १९८५

१९८५ साली महाराष्ट्र राज्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त लोकसत्ता या दैनिकाच्या अंकाच्या पहिल्या पृष्ठावर या लढ्यात महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या नेत्यांवर एक लेखमालाच प्रसिद्ध झाली होती. ते सर्व लेख संग्रहित करून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र लयातील महारथी या नावाने एक सहासष्ट पृष्ठी पुस्तिका लिहिली. त्यामधून प्रामुख्याने या संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळात या नेत्यांना जनआंदोलनाची साथ मिळाल्यावर ते कसे यशस्वी झाले, याबाबत त्याच्या कार्याबद्दलची माहिती पुस्तिकेमधून लिहिलेली आहे.

माधव गडकरी यांनी पुस्तिकेमधून केलेल्या सर्वांच्या कार्याचे विश्लेषण महत्त्वाचे आहे. चिंतामणराव देशमुख यांचा संदर्भ देऊन गडकरी या ग्रंथात म्हणतात, ''पंतप्रधानांनी आणि या त्रिसदस्य समितीने, संपूर्ण मंत्रिमंडळाने त्यांना न दिलेले

अधिकार स्वतः बळकाविले आणि निर्णय घेतला. याहीपेक्षा अधिक अरेरावीचे आणि अशिष्टपणाचे वर्तन पंतप्रधान आणि गृहमंत्री यांनी केले. ते म्हणजे नोव्हेंबर १९५५ आणि जानेवारी १९५६ मध्ये मुंबई येथे जे गोळीबार झाले त्याची चौकशी करावी ही माझी विनंती नाकारणे.''[४६] हे विवेचन या संयुक्त महाराष्ट्र निर्मिती कार्यासाठी आणि १०६ हुतात्म्यांनी जे बलिदान दिले. त्याबाबतचा एक ज्वलंत पुरावा म्हणून संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त आहे. संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी या पुस्तिकेमधून जे महारथी नमूद केलेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**या महारथींमध्ये**

१. सेनापती बापट,
२. सत्त्वशील नेते : शंकरराव देव – दैव देते पण कर्म नेते
३. नैतिक शक्ती : एस.एम. जोशी
४. लोकनेते : कॉ. डांगे
५. लेखणी आणि वाणीचे सम्राट : आचार्य अत्रे
६. आधुनिक रामशास्त्री : चिंतामणराव देशमुख
७. सत्ता सोडवणारे : डॉ. नरवणे
८. सत्य पुराव्यानिशी मांडणारे : डॉ. वसंत रणदिवे

### ३) महाराष्ट्राचे महामंथन : लालजी पेंडसे

लालजी पेंडसे हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स्वतः सहभागी झाले होते. लालजी पेंडसे यांनी लिहिलेल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना दत्तो वामन पोतदार

यांनी असे लिहिले आहे की, महाराष्ट्र हे नाव आजचे नाही तर सुमारे दोन हजार वर्षे इतके जुने आहे. शिलालेखात महाराष्ट्र म्हणून उल्लेख आला आहे. ज्ञानेश्वरीत महाराष्ट्र मंडळ असा शब्द आला आहे. महाराष्ट्र देशाच्या व्यवस्थेत लक्षण म्हणून मराठी भाषा सांगितली आहे. महाराष्ट्राला महंत राष्ट्र म्हणजे थोर राष्ट्र असेही म्हटले आहे. महाराष्ट्राचे महामंथन या पुस्तकात संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या एवढ्या प्रचंड आंदोलनासंबंधी महाराष्ट्र सारस्वतांच्या पृष्ठ भांडारात काहीतरी असणे अपेक्षित आहे. या पुस्तकात प्रामुख्याने जे कोणी पुढाकाराने वावरले, अडचणींना तोंड देताना काय आणि तड गाठताना त्यांनी काय योजना केल्या, महाराष्ट्र राज्य झाले तर त्यात काय काय घडावे अशी त्यांची व जनतेची अपेक्षा होती. एकभाषी राज्याविषयी मूलभूत विचारसरणी काय होती अन् अपेक्षा काय होत्या, याचीही माहिती या ग्रंथात आहे. या माहितीवरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील जनमानसासाठी काय अपेक्षा होती, हे प्रतिबिंबित होते.

लालजी पेंडसे हे या लढ्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होते. त्यांचे सूक्ष्म व वस्तुनिष्ठ विश्लेषण हा या ग्रंथाचा गाभा आहे. त्यांनी या ग्रंथाच्या शेवटी असे म्हटले आहे की, ''समग्र प्रादेशिक जीवन व सर्वसामान्य जनतेचे संतुलित जीवन यांच्या तुलनेने हे जुजबी प्रकारच मानले पाहिजेत. तर मग महाराष्ट्र झाला म्हणजे नेमके काय झाले, काय होणे शिल्लक राहिले, या शिलकी बाबी संबंधाने शासनाची वृत्ती कशी आहे हे सांगितले पाहिजे.''[४७] या लालजी पेंडसे यांच्या मताचा उपयोग प्रबंध संशोधनातील माहितीसाठी निश्चितच होणार आहे.

**४) संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज : संपादक प्रा.भगवान काळे**

१९८५ साली महाराष्ट्र राज्याचा रौप्यमहोत्सव राज्यभर धूमधडाक्यात साजरा

झाला. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी मराठी माणसाने दिलेला लढा, राज्याच्या निर्मितीचा मंगल सोहळा, अशा रोमांचकारी इतिहासाबरोबरच मराठी माणूस त्यावेळी सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, उद्योग, आणि नाट्य इत्यादी क्षेत्रात कुठे होता. यावर मुक्त चिंतन करणारे लेख या ग्रंथात त्यांनी संपादित केले आहेत. या लढाईमध्ये अग्रस्थानी असलेले एस. एम. जोशी, काकासाहेब गाडगीळ, जयवंतराव टिळक, नानासाहेब गोरे, चिंतामणराव देशमुख यांनी स्वतः लेख लिहिले आहेत. चळवळीमध्ये त्यांना आलेले अनुभव त्यांच्या लेखातून आपणास पाहावयास मिळतात. त्या दृष्टीने या पुस्तकाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रा. भगवान काळे यांनी संपादित केलेल्या या ग्रंथामधील आशय हा त्यांनी मोठ्या परिश्रमाने एकत्रितपणे मांडलेला आहे. त्यातील दुर्मिळ लेखांचे संकलन मार्गदर्शक व उपयुक्यात ठरणारे आहे. त्यांनी या ग्रंथाच्या प्रास्ताविकात म्हटले आहे की, ''संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सर्व पक्ष एकजुटीने उभे राहिले यास काही पार्श्वभूमी होती. लोकांवर जेव्हा अन्याय केला जातो तेव्हा एकत्र येण्याची महाराष्ट्राची प्रथा या वेळीही दिसून आली''[४८] अशा प्रकारे या ग्रंथामधून चळवळीमधील लढ्यात महाराष्ट्रातील जनता एकजुटीने कशी सहभागी झाली याची माहिती यांच्या संशोधन कार्यातील ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी उपयोग झालेला आहे.

### ५) मुंबईनगरी : प्रा. न. र. फाटक

सुप्रसिद्ध इतिहास संशोधक, नामवंत पत्रकार, अधिकारी आणि साहित्यिक प्रा. नरहर रघुनाथ फाटक यांनी मुंबई महापालिकेच्या ४ एप्रिल १९७३च्या शताब्दी वर्षानिमित्ताने महाराष्ट्राची राजधानी असलेल्या या गौरवशाली शहराचा अव्वल इंग्रजीतील

जुना इतिहास कथन करणारा एक ग्रंथ पालिकेतर्फे प्रकाशित केला.

मुंबई महापालिकेचा ऐतिहासिक दर्शन लेखमाला सिव्हिल जर्नल या मासिकात प्रसिद्ध केली होती. त्यातून १९६० साठी एक ग्रंथ साकारला गेला. सदर ग्रंथामधून मुंबईची राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या भरभराट होण्यास कोणी कसा हातभार लावला याबद्दलची माहिती त्यात दिलेली होती. या पुस्तकात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत मुंबई शहराचा विकास कसा झाला त्या सर्वांगीण विकासाला मुंबईच्या काही ज्येष्ठ कर्तबगार नागरिकांनी कसा हातभार लावला याचे वर्णन केले आहे. या पुस्तकाच्या पहिल्या भागात मुंबई शहराचा इतिहास आहे. तर दुसऱ्या भागात अर्वाचीन मुंबई घडवणाऱ्या नागरिकांचे वर्णन यथोचित होते. त्यातील पहिल्या भागात १६० पृष्ठांत विभागलेली २० प्रकरणे आहेत. तर दुसऱ्या भागात १५ प्रकरणे आहेत ते २४४ पृष्ठांत विभागलेले आहेत. प्रकरण १४ हे वृत्तपत्रांच्या संदर्भातील माहितीचे आहे तर विसाव्या प्रकरणात छापखाने, वृत्तपत्रे, ग्रंथ यांच्या समावेशाचे आहे.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची वाटचाल अभ्यासताना, या ग्रंथामधील वृत्तपत्रांची ऐतिहासिक पार्श्वभूमी बहुमोल ठरलेली आहे. या ग्रंथामध्ये प्रा. न. र. फाटक म्हणतात, ''धर्म देश यांच्या भेदानुसार येथील वस्तीचाही प्रकार आहे. हिंदू मराठी भाषकांची वस्ती गिरगाव भागात जास्त तर गुजराथी समाजाची भुलेश्वर, काळबादेवी येथे अधिक त्या पलीकडे भेंडीबाझार, शेख मेमन या नावांच्या भागातच प्रामुख्याने मुसलमान राहतात आणि आपल्या उपजीविकेचा व्यवहार करतात''[४९] यावरून या ग्रंथामधून आलेल्या आशयाचे महत्त्व संशोधनासाठी किती उपयुक्त आहे हे लक्षात येते.

## ६) विसाव्या शतकातील महाराष्ट्र : य. दि. फडके

'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' या शीर्षकाखाली डॉ.य. दि. फडके यांनी महाराष्ट्रातली राजकीय स्थिती आठ खंडांतून समर्पकपणे मांडलेली आहे. त्यातील खंड सातवा व खंड आठवा हा प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्राचा लढा या विषयाच्या संदर्भात आहे. खंड सातवा आणि आठवा या खंडातून त्यांनी या लढ्यात सहभागी झालेले नेते यांच्या मुलाखती व त्यांचे पत्रव्यवहार तसेच त्यांचे लेख अशा अस्सल कागदपत्रांच्या माध्यमातून वाचकांच्या समोर त्यांनी संयुक्यात महाराष्ट्राचा लढा मोठ्या समर्पकपणे उभा केला आहे. हे दोन्ही खंड अस्सल कागदपत्रांच्या माध्यमातून मांडले असल्यामुळे ते अधिक विश्वसनीय ठरलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील वाचकाला कसलीही शंका घेण्यास वाव नाही. त्यामुळे अभ्यासाच्या दृष्टीने हे खंड महत्त्वपूर्ण आहेत. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास अनुभवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला हे दोन्ही खंड उपयोगी ठरणारे आहेत. तसेच त्यांनी स्वतः संयुक्त महाराष्ट्र चळवळ व काँग्रेस या विषयावर ही संशोधन केलेले आहे. त्यांच्या या ग्रंथात तत्त्व आणि व्यवहार या दोन दृष्टीने विशेष महत्त्व आहे. या चळवळीच्या वाटचालीचे मूल्यमापन करताना ते म्हणतात, ''जनआंदोलनातून नेतृत्व उदयाला येत असते असे म्हणतात. १९५६ च्या रक्तरंजित जानेवारीत प्रक्षुब्ध लोकांच्या संतापाचा उत्स्फुर्त उद्रेक होत असताना एकट्याने हिंसाचाराला आवर घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या एस.एम. जोशींच्या रूपृष्ठे ताज्या दमाच्या नव्या नेतृत्वाचा उदय झाला आणि अन्यायाविरुद्ध लढा देण्यास मराठी भाषक सज्ज झाले.''[५०] अशा प्रकारे य.दि.फडके यांनी केलेली मीमांसा अर्थपूर्ण असून, त्यांचे विश्लेषण संशोधनासाठी निश्चितच पथदर्शक ठरणार आहे.

## ७) संयुक्त महाराष्ट्राचे मारेकरी : डॉ. गो. वि. देशमुख

महागुजरातची भर मुंबई प्रांतात पडल्यावर गुजराती भाषकांचे पारडे प्रांतिक विधिमंडळात आणि प्रांतिक राजकारणात पूर्वीपेक्षा जड होणार असून त्यामुळे मुंबई शहरावरील भांडवलशाहीची पकड अधिक मजबूत होणार आहे आणि मुंबई प्रांतात अंतर्भूत असलेला महाराष्ट्राचा भाग कायमचा आर्थिक परावलंबी ठेवण्याची संधी भांडवलशाहीला मिळणार आहे, हे सांगावयास कोणी ज्योतिषी नको आहे. महाराष्ट्राला हे अस्वलाचे आलिंगन नको आहे. महाराष्ट्राला गुजरातचे अस्तित्व अनिष्ट वाटत नाही. उलट भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाला अनुरूप असलेलीच ही गोष्ट असल्याने महाराष्ट्राला त्यासंबंधी आनंदच वाटतो. मात्र महागुजरातने विरारपर्यंत हातपाय पसरू नयेत, महाराष्ट्रातील मुंबईवर पापदृष्टी ठेवू नये आणि महाराष्ट्राला आपल्या बाहुपाशात कवटाळून त्याला कायमचा गुदमरून टाकण्याची कल्पना मनात आणू नये. एवढेच संयुक्त महाराष्ट्र वाद्यांचे म्हणणे आहे.

देशमुख यांनी या ग्रंथामध्ये जे निर्भीड आणि सडेतोड विश्लेषण केले आहे ते काही दृष्टीने महत्त्वाचे आहे. देशमुख यांच्या मते एकी ही वाटत असली तरी त्यामध्ये काही सत्याचा अंश आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी या ग्रंथात म्हटले आहे की, ''मराठी कारागिराला शिल्लक टाकणे तर राहोच, पण रोजचा आपला खर्च भागविणेही मुश्किलीचे होत असते. बहुतेक कारागीर यामुळे कर्जबाजारीच होत असतात.''[५१] हे विवेचन कामगाराच्या स्थितीच्या अभ्यासासाठी पूरक ठरणारे आहे.

## ८) संयुक्त महाराष्ट्राची समस्या : ह. रा. महाजनी

प्रस्तुत पुस्तकामध्ये ह. रा. महाजनी यांनी मुंबईसह संयुक्यात महाराष्ट्राची

मागणी कशी योग्य होती; परंतु त्यांनी ज्या पद्धतीने त्याचा लढा दिला आहे ती पद्धत मात्र चुकीची होती. असे स्पष्टपणे मांडले आहे. लोकमान्य टिळक असेपर्यंत या शहराचे महाराष्ट्राशी संबंध फार जिव्हाळ्याचे होते. पण त्यांच्यानंतर मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळे पडत चालले होते. या शहराचा महाराष्ट्राशी वैचारिक संबंध किती राहिला. या शहराच्या आंतरराष्ट्रीय व औद्योगिक जीवनामध्ये महाराष्ट्रीयांना कोणते स्थान होते. या शहराच्या राजकीय जीवनावर महाराष्ट्रीयांनी आपली छाप पाडली का, असे अनेक प्रश्न विचारात घेऊन जी काही उत्तरे येतील यावर मुंबई महाराष्ट्राला मिळविण्याचे उत्तर अवलंबून आहे. त्यांच्या मते ही उत्तरे फार आशादायक नाहीत. मुंबईत आलो की, आपण एखाद्या परक्या प्रांतात आलो आहोत, या भावनेनेच ते या शहरात वागत असत. या शहरावर आपली बौद्धिक छाप पाडण्याइतकी त्यांच्या अंगात कुवतही नसल्याची खंत त्यांनी व्यक्यात केली. सर्व परिणामांमुळे मुंबई महाराष्ट्रापासून दुरावली, ती आपण स्वतःहून चूक केल्याची खंत त्यांनी शेवटी व्यक्त केलेली आहे.

ह. रा. महाजनी हे ‘लोकसत्ता’ या पत्राचे संपादक होते. त्यांची मते ही त्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण व सहभागातून व्यक्त झालेली होती. महाजनी म्हणतात, ‘‘संयुक्त महाराष्ट्राचे घटक राज्य बनविले गेले असते तर महाराष्ट्रातील सुशिक्षित मध्यम वर्गाचे सहकार्य मिळविता आले असते. भाषावाद या नावाचा एक नवा वाद कल्पून हा जो गदारोळ माजविण्यात आला, तो सावज नसताना रान उठविण्याच्या धर्तीचा होता’’[५२] यावरून आपणास लढ्यातील वृत्तपत्रांची कामगिरी स्पष्टपणे सहआधार मांडता येते.

## ९) आगरकर लेखसंगह : गणेश प्रभाकर प्रधान

**प्रकाशक साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती १९६०**

या पुस्तकातून प्रा. गोपाळ गणेश आगरकर यांच्या लेखांचा संग्रह आहे. प्रा. गोपाळ गणेश आगरकर सुरुवातीला दैनिक केसरीचे संस्थापक संपादक होते. या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी राजकीय व सामाजिक विचारांचा प्रसार निर्भयपणे समाजापुढे मांडण्यास सुरुवात केली. मात्र नंतरच्या काळात सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा यावरून टिळक व आगरकर यांच्यात तीव्र आधी मतभेद झाले. त्यामुळे प्रा. गो. ग. आगरकर यांनी केसरीच्या संपादक पदाचा राजीनामा देऊन त्यांनी 'सुधारक' या नावाचे नवीन वृत्तपत्र काढले. सुधारकाचे ब्रीदवाक्य असे होते 'इष्ट असेल ते बोलणार साध्य असेल ते करणार' याप्रमाणेच आगरकरांनी आधी कृती केली आणि मगच भाष्य केले.

या पुस्तकातून लेखकाने लोकमान्य टिळक आणि आगरकर यांच्या लेखनाची तुलना केली आहे. दोघांचे लेखनातील तुलना करताना पृष्ठ क्रमांक. १६ वर ते लिहितात की, टिळकांप्रमाणे आगरकरांनीही स्वातंत्र्याच्या आकांक्षाचे समर्थन केले असले तरी दोघांच्या भूमिकेतील एक फरक असा होता की, टिळक आपल्या लेखातून स्वातंत्र्य उपभोगणे आमची परंपरा आहे. असे मांडत असत तर आगरकर आणि आपण स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी सक्षम असले पाहिजे असं मांडत असत.

गोपाळ गणेश आगरकर हे सुधारणावादी विचारांचे होते. हे सर्वांना ज्ञात आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर उपभोगण्याची तयारी भारतीयांची असली पाहिजे. त्यासाठी त्यांनी स्वतः आधी बदल करून घेतला पाहिजे. नागरिकांना निरक्षरता,

अंधश्रद्धा, गरीब अशा अनेक समस्यांनी ग्रासले आहे. या समस्या दूर करून मगच स्वातंत्र्याचा विचार करावा, असे त्यांना वाटत असे. लेखक याबाबत पृष्ठ क्र.१२ वर लिहितात की, आगरकरांचे सर्व लेख काळजीपूर्वक वाचले तर असे आढळून येईल की, त्यांना जी जीवनमूल्ये अभिप्रेत होती. त्यामुळेच त्यांच्या ऐहिक निष्ठेतून भोगवाद न निघता व्यक्ती व समाज यांच्या सुखासंबंधीचे मौलिक विचार व्यक्त झालेले दिसतात.

पुस्तकात लेखकाने आगरकरांच्या लेखांचे तीन विभाग केलेले आहेत. पहिल्या भागात कर्मकांड, धर्मकल्पना, देवता, विवाह निराकरण अथवा घटस्फोट आदी विषय. दुसऱ्या विभागात सामाजिक सुधारणा करण्यासंबंधी लेखन केले आहे, तर विभाग तीनमध्ये सुधारक काढण्याचा हेतू, तरुण सुशिक्षितास विज्ञापना, महराष्ट्रीयास अनावृत्त पत्र, पांचजन्याचा हंगाम–शिमगा यांसारख्या विषयांवर लेखन केलेले आहे.

आगरकरांच्या लेखांचा अभ्यास केल्यानंतर आपणास असे जाणवते की, त्याचा सामाजिक सुधारणा करण्यावरच भर होता. त्याच विषयावर त्यांचा आग्रह होता. सुधारकाच्या माध्यमातून त्यांनी आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला. ‘सुधारक’ हे वृत्तपत्र जून १८९५पर्यंत म्हणजेच आगरकरांच्या मृत्यूपर्यंत चालले. १७ जून १८९५ रोजी आगरकरांचे निधन झाले. त्यानंतर ’सुधारक’ सुरू करण्याचे कोणी प्रयत्न केल्याचे दिसत नाही.

टिळक–आगरकर यांच्यात झालेला आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा हा वाद महाराष्ट्राचे वैचारिक पोषण करणारा ठरला. या खंडाच्या प्रस्तावनेमध्ये प्रा. प्रधान म्हणतात, ’‘जे जे अत्यंत योग्य असते तेच तरते बाकीचे लयास जाते. हे सृष्टीच्या घडामोडीत अनादी काळापासून साम्राज्य करीत आलेले तत्त्व कोणाच्या लक्षात

येवो अगर न येवो स्थावर आणि जंगम सजीव आणि निर्जीव सृष्टीचे व्यापार तदनुरोधाने होत आहेत. राज्य, धर्म, समाज, एतद्विषयक एकूण एक कल्पना व आचार या तत्त्वाच्या झपाट्यात सापडून अमुक तगणार व तमुक बुडणार असा शेरा त्यावर पडतो.'' [५३] खंडातील हे विवेचन या संशोधनासाठी उपयुक्त ठरलेले आहे.

**१०) मराठी वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास : रा. के. लेले**

**अ. अ. कुलकर्णी, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, विजयानगर,पुणे.**

**पहिली आवृत्ती १९८४**

मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासासंबंधीची माहिती आपण वेगवेगळ्या पुस्तकातून वाचतो, परंतु हा इतिहास एकत्रितपणे आपल्याला वाचायला मिळतो तो रा. के. लेले यांच्या 'मराठी वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास' या पुस्तकातूनच मराठी वृत्तपत्रसृष्टीसंबंधी आपल्याला कोणतीही माहिती हवी असेल तर केवळ रा. के. लेले यांचे हे पुस्तक खूप उपयोगी पडते. संशोधकांना मार्गदर्शक म्हणून या पुस्तकाचा आधार घ्यावाच लागतो. रा.के. लेले यांनीदेखील शंभर वर्षाचा आढावा आपल्या या एक हजार एकशे त्रेसष्ट पृष्ठी भल्या मोठ्या ग्रंथात घेतलेला आहे.

पुस्तकात एकूण २३ प्रकरणे आहेत वृत्तपत्रांचे पूर्वज या प्रकरणात श्री. लेले यांनी कालानुसार त्या त्या वृत्तपत्रांची तपशीलवार माहिती दिली आहे. अगदी 'दर्पण'पासून तर सध्याच्या आघाडीच्या दैनिकांची ही दखल त्यांनी या वेळी घेतलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने वृत्तपत्र कसे सुरू झाले. प्रारंभी त्यांची भूमिका काय होती. संबंधित वृत्तपत्रात काय काय प्रसिद्ध केले जात असे. वृत्तपत्रांच्या संपादकांची माहिती. त्यांची विचारसरणी, त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये वृत्तपत्रातून कोणत्या विषयावर लेखन

प्रसिद्ध होत असे, याचा आढावा श्री. लेले यांनी घेतला आहे. प्रत्येक कालखंडात अत्यंत तपशीलवार माहिती दिलेली असून, त्यात जिल्हावार वृत्तपत्रांची माहितीही देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्राबरोबरच भारतातील प्रमुख शहरांतील वृत्तपत्रांचा देखील आढावा त्यांनी घेतलेला आहे. भारतात ग्वाल्हेर, धार, देवास, इत्यादी मराठी संस्थानातून प्रसिद्ध होणारे वृत्तपत्रे तसेच गोवा, काशी, बेळगाव, धारवाड इत्यादी भागांत, तसेच हैदराबाद संस्थान या ठिकाणी जेथे वृत्तपत्रे निघाली त्या ठिकाणची माहिती सदर पुस्तकात दिली आहे. केवळ त्यांचा इतिहासच नाही तर सद्यःस्थितीत त्या वृत्तपत्रांची काय परिस्थिती आहे याबाबतचे संदर्भही श्री. लेले यांनी पुस्तकातून दिलेले आहेत.

'हिंदू पंच' हे मराठीतील पहिले व्यंगचित्र देणारे वृत्तपत्राचे मोठे छायाचित्र देण्यात आले आहे. या छायाचित्रात नक्षीमध्ये हिंदू पंचचे नाव टाकलेले आहे. एका बाजूला हिंदू मध्ये पगडीधारी माणूस (संपादक) त्याच्या उजवीकडे विदूषक आणि डावीकडे साधा माणूस असे चित्र आहे. तर त्यानंतर हिंदू आणि पंच हे दोन शब्द आहेत. त्यावर बुधवार सायंकाळ तारीख ५ माहे जून सन १९०४ अंक २२ असे नमूद केलेले आहे. युगप्रवर्तक ठरलेल्या लोकमान्य टिळकांच्या केसरीचा ४ जानेवारी १८८१ चा अंक तसेच ब्राह्मणेतर पक्षाचे नामवंत पत्र विजयी मराठाचा पुण्याहून प्रसिद्ध झालेला सोमवार १२ सप्टेंबर १९२७चा अंक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वृत्तपत्र 'बहिष्कृत भारत' या अंकाचा ३ माहे एप्रिल रविवार १९२७ चा अंक यांचे छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. हे वृत्तपत्र पाहणे फार दुरापास्त झालेले आहे. त्यांची इतकी सुस्पष्ट छायाचित्र श्री. लेले यांनी पुस्तकातून दिलेली आहेत.

रा. के. लेले यांनी लिहिलेला हा ग्रंथ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका तपासण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेला आहे. या ग्रंथामधील काही तपशील उपयुक्त आणि पूरक ठरला आहे. रा. के. लेले म्हणतात, ''कुतूहल आणि सुरक्षितता या माणसाच्या सहज प्रवृत्ती आहेत. आजूबाजूच्या माणसांविषयी माहिती मिळविण्याची कृती माणसांत रानटी अवस्थेपासून आहे. सुरक्षिततेच्या प्रवृत्तीमुळे आपली संकटस्थानी ओळखून त्यापासून दूर राहण्याचा सावधपणा माणूस नेहमीच बाळगीत आलेला आहे''[५४] यावरून मानवामधील अज्ञान गोष्टींची माहिती मिळविण्याची आहे आणि अभ्यासाची बैठक स्पष्ट करता येते.

## २.१६ प्रबंधाचा आकृतिबंध/गोषवारा

संशोधनाच्या प्रक्रिये बाबत अभ्यासक आणि विद्यार्थ्यांमध्ये समजपेक्षा गैरसमजच अधिक असतात. संशोधन ही क्लिष्ट आणि जटिल प्रक्रिया असून ती दीर्घकाळ चालणारी असते असा गोड गैरसमज आहे. परंतु संशोधक जसे जसे संशोधन करतो तशी ही प्रक्रिया अत्यंत सोपी होत जाऊन आपली जिज्ञासा वाढविते. मनापासून आनंद घेऊन संशोधक संशोधनात जितका सहभागी होईल तितकाच अधिक आनंद त्यात मिळतो. प्रत्येक संशोधनामध्ये प्रबंधाचा आकृतिबंध महत्त्वाचा असतो. संशोधनाची प्रक्रिया पूर्ण करून प्रबंधाचा आकृतिबंध मांडता येतो. याबाबत प्रा. पु. ल. भांडारकर आणि विल्कीन्सन म्हणतात, "Frequently, an exploratory study is concerned with an ara of subject matter in which explicit hypotheses have not yet been formulated the researcher's task then is to review the available material with an eye on the possibilities of developing hypothesis from it.In some areas of the

subject matter"[५५] असे नमूद करून ते पुढे म्हणतात, "Hypothesies may have been stated by previous research workers. The researcher has to take stock of these various hypothesies with a view to evaluating their usefulness for further reserarch and to consider whether they suggest any new hypothesies." [५६]

त्याही पुढे जाऊन त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, "A researcher working in the field of socioloty will find that such publications accepted by universities, etc. affored a rich store of valuable clues. In addition to there general sources, some governmental agencies and voluntary organizations publish listings or summaries of research in their special fields of service." [५७]

यावरून आपले संशोधन कसे केले जाणार आहे, ते स्पष्ट करता येते.

या संशोधन प्रबंधातील अंतिम निष्कर्ष मांडण्यापूर्वी प्रकरणनिहाय प्रथांचा थोडक्यात गोषवारा द्यावा लागेल. प्रकरणनिहाय शीर्षक त्यातील आशय आणि निष्कर्ष याचा तपशील खालील नमूद केल्याप्रमाणे आहे.

**प्रकरण : १– संयुक्त महाराष्ट्र चळवळ उदय विकास आणि वृत्तपत्रांची भूमिका**

या पहिल्या प्रकरणात अभ्यास विषयाची पार्श्वभूमी नमूद केलेली आहे. या प्रकरणातून वृत्तपत्राचा उदय, वृत्तपत्रनिर्मितीपूर्वी भारतातील परिस्थिती, भारतातील वृत्तपत्रांचा उदय, मराठी वृत्तपत्रांची निर्मिती आणि विकास इत्यादी पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान, साहित्य महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची स्थिती, मुंबई शहर आणि प्रांतात वृत्तपत्र सुरू करण्याचे श्रेय कोणाला दिले जाते. वृत्तपत्राबाबत सरकारचे धोरण इत्यादी स्पष्ट करून संशोधनात पुढील अभ्यासाची दिशा मांडलेली आहे.

**प्रकरण : २— प्रस्तावना व संशोधन आराखडा**

या प्रकरणामध्ये सामाजिक संशोधन पद्धती, सामाजिक संशोधन वृत्तपत्रीय संशोधन संशोधनाचे उद्देश, गृहीतके, संशोधन सामग्रीची निवड, अन्य कागदपत्रांचे विश्लेषण, संशोधन मर्यादा, वर्णनात्मक संशोधन आराखडा, आशय विश्लेषण, साहित्य सर्वेक्षण प्रकाशित साहित्याचे समालोचन, असा प्रबंधाचा आकृतिबंध स्पष्ट करून संशोधन आणि संशोधनाचा आराखडा का व कसा वापरला आहे, ते स्पष्ट केलेले आहे.

**प्रकरण : ३— संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका**

या प्रकरणामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेल्या पाच मराठी वृत्तपत्रांच्या कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दैनिक 'पुढारी', 'प्रभात', 'सकाळ', 'मराठा' व 'केसरी' या वृत्तपत्रांची कामगिरी संदर्भ देऊन स्पष्ट केली आहे. यापैकी दैनिक सकाळ वगळता अन्य चार वृत्तपत्रे ही संयुक्त महाराष्ट्रवादी असून, त्यांनी वेळोवेळी विविध प्रश्नांवर चळवळीस प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या कामगिरीचा साधार, सखोल व टीकात्मक दृष्टीने परामर्श घेतला आहे.

**प्रकरण : ४ — संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांनी हाताळलेली विविध आंदोलने**

या प्रकरणामध्ये संशोधनाचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. तसेच दहा वर्षातील संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तसेच विविध राजकीय पक्ष व चळवळी यातील कांही पैलूंवर प्रकाश टाकला आहे. प्रामुख्याने काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, कम्युनिष्ट पक्षाच्या कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. तसेच १९५७

च्या सार्वत्रिक निवडणुका, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारूढ पुतळ्याच्या उद्‌घाटनाचे वेळी केलेले १९५७ चे प्रतापगडचे आंदोलन, एस. एम. जोशी यांच्या आठवणीत संदर्भ इत्यादींचा परामर्श घेतला आहे व शेवटी वृत्तपत्रांच्या भूमिकेचे समालोचन केले आहे.

**प्रकरण : ५ निष्कर्ष**

या प्रकरणामध्ये प्रथम प्रकरण निहाय सारांश आहे. त्यानंतर ठळक निष्कर्ष मांडले आहेत. नवी सैद्धांतिक मांडणी देऊन अभ्यास विषयावर अंतिम भाष्य केले आहे.

या सर्व बाबींचे नव्याने विश्लेषण करून या प्रबंधात संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांनी बजावलेल्या भूमिकेचे शास्त्रीय व समतोल विवेचन करावयाचे आहे. त्यासाठी हे अध्ययन पूरक ठरू शकते. या अभ्यासाला त्यामुळे विशेष महत्त्व आहे. कारण २०१० साली महाराष्ट्र राज्य निर्मितीला ५० वर्षे पूर्ण झालेली आहेत.

स्वातंत्रपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात या संपादकांनी पत्रकार म्हणून तसेच चळवळीचे नेते म्हणून केलेली कामगिरी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पत्रकारितेचा उपयोग त्यांनी समाजप्रबोधनासाठी राजकीय आणि चळवळींना उठाव देण्यासाठी सर्वांगीण सुधारणेबाबतची मते जनमानसात रुजविण्यासाठी तसेच राष्ट्रीयत्वाची भावना जोपासण्यासाठी केला. त्यामुळे या प्रमुख संपादकांची आणि पत्रकारांची भूमिका ग्रंथ, वृत्तपत्रे आणि अन्य प्रकाशित सामग्रीच्या आधारे तपासून घेऊन त्याची प्रभावी मीमांसा या प्रकरणात केली आहे. पुढील प्रकरणांमध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका मांडण्यावर भर दिला आहे.

## २.१७ समारोप

संशोधन प्रबंधामध्ये संशोधन करण्याच्या विविध पद्धतीची माहिती करून दिलेली आहे. महाराष्ट्रातील युवा पिढीला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची तपशीलवार माहिती व्हावी या दृष्टीने या विषयाची निवड केलेली आहे. चळवळीसाठी ज्या ज्या घटकांचे योगदान लाभलेले आहे त्याची माहितीही सहआधार घेतलेली आहे. प्रत्यक्ष लढ्यात सहभागी असलेल्या आणि त्याचे सक्रिय योगदान लाभलेल्या अनेक व्यक्तींच्या मुलाखती स्वतः घेऊन तत्कालीन लढ्यातील स्थान स्पष्ट केले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या संशोधन आराखड्यावर प्रकाश टाकला आहे. प्रथम सामाजिक संशोधन वृत्तपत्रविषयक संशोधन या याचा परामर्श घेऊन त्यानंतर तथ्य संकलनाच्या प्रणालींवर भर दिलेला आहे. त्याचप्रमाणे प्रबंधातील वर्णनात्मक संशोधन आराखडा का व कसा वापरला हे स्पष्ट केले आहे. प्रस्तुत संशोधन हे वृत्तपत्रांच्या साधनावर आधारलेले असल्यामुळे प्रबंधातील आशय विश्लेषणाची पद्धती कशी व का वापरली यावर भर दिलेला आहे. समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम असलेल्या वृत्तपत्राची सामग्रीची निवड केलेली आहे. प्रबंध विषयासंदर्भात निवडलेल्या वृत्तपत्रातून आलेल्या सामग्रीचे अध्ययन करण्यावर भर दिला आहे. असे अध्ययन करताना तथ्यांचे संकलन, विश्लेषण व अन्वेषण या बाबींवर प्रकाश टाकला आहे. शिवाय अभ्यास विषयाच्या मर्यादा स्पष्ट करून त्या अनुषंगाने त्यांची कारणमीमांसा केली आहे.

## २.१८ संशोधनाची फलिते

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांच्या भूमिकेबाबत आतापर्यंत य.दी.फडके,

प्रा.भगवान काळे, लालजी पेंडसे इत्यादींनी ग्रंथ लिहिलेले आहेत. परंतु हे अध्ययन यापूर्वी झालेल्या संशोधनापेक्षा पुढील तीन अंगानी वेगळे आहेत.

१) या अभ्यासात सरधोपट मार्गाने चर्चा न करता पाच प्रमुख वृत्तपत्राची निवड करून त्यांची या चळवळीमधील भूमिका तपासली आहे.

२) वृत्तपत्रे निवडताना केवळ चळवळीच्या बाजूचे वृत्तपत्रे निवडले नाही तर सकाळसारख्या तटस्थ व विरोधी वृत्तपत्राची सुद्धा दखल घेतलेली आहे.

३) वृत्तपत्रातील लेख, अग्रलेख आणि बातम्या इत्यादी तारखानिहाय नोंद करून चिकित्सा केलेली आहे.

**या संशोधनातील संभाव्य फलिते खालीलप्रमाणे सांगता येतील.**

१) भाषिक वृत्तपत्राने महाराष्ट्रात अभूतपूर्व जागृती घडवून आणली त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या ऐक्यासाठी पोषक वातावरण तयार झाले.

२) विदर्भ, मराठवाडा हे प्रदेश महाराष्ट्राशी जोडले गेल्यामुळे होणारे लाभ वृत्तपत्राने प्रतिपादन केले आहे.

३) वृत्तपत्रांनी महाराष्ट्र विरोधी घटकावर टीका करून त्यांचे खरे स्वरूप जनतेपुढे ठेवले त्यामुळे संयुक्त महाराष्ट्रावादी विचार आणि पक्ष एकत्र येऊ शकले.

४) विविध दबावगट तसेच छोट्या छोट्या संघटना यांना एकत्र करून त्यांना भक्कमपणे बांधण्याचे श्रेय वृत्तपत्रांकडे जाते.

५) भाषिक वृत्तपत्राने वेळोवेळी ठाम भूमिका घेऊन महाराष्ट्र विरोधी शक्तींना चोख प्रत्युत्तर दिले.

६) साहित्य संमेलने सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध प्रकारच्या परिषदांतून

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची जडणघडण करण्यात आली. त्यासाठी वृत्तपत्रांनी विचाराची मशागत केली.

अशा प्रकारे या प्रबंधातून मराठी वृत्तपत्रांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ बजावलेल्या भूमिकेवर चौफर प्रकाश टाकू शकली. ही सर्व या संशोधनातील फलिते असतील.

## तळटीपा

१) Pearson Karl : The Grammer of Science, Blak London, Third Edition, 1911, P.129.

२) Ibid : The Grammer of Science, Black London, Third Edition, 1911, P. 130

३) भांडारकर पु. ल. : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७, पृष्ठ क्र.१७

४) घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन– तत्त्वे व पध्दती, श्री.मंगेश प्रकाशन नागपूर, २००८–२००९, पृष्ठ क्र.५

५) कित्ता. : समाजशास्त्रीय संशोधन– तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, २००८–२००९, पृष्ठ क्र.५

६) नाडगोंडे गुरुनाथ : समाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन कोल्हापूर, १९८६, पृष्ठ क्र.१२

७) Pearson Karl : The Grammer of Science. 3rd Edition. A & C Back, London, 1912, Pg. No.185

८) Umithan : T.K.W. Indradev Yogendrasing towards & Social culture in India. Pg. No.24.

९) एन्सायक्लोपीडिया : मॅकमिलन बुक कंपनी, ११४४, खंड, दखख न्यूयॉर्क ऑफ सोशल सायन्सेस

१०) बेस्ट जे. डब्ल्यू. : रिसर्च इन एज्युकेशन, प्रेन्टिस हॉल ऑफ इंडिया,१९६३ पृ.४

११) हेरिंग : हेरिंग, रिसर्च फॉर पब्लिक पॉलिसी, द ब्रुकिंग्स

इन्स्टिट्यूट १९६१, पृ.१५

१२) Sandhu A.N.& Singh Amarjit : Research Methodology in Social Sciences, Himalaya Publishing House, Mumba,2001, n¥ð> H«$.13

१३) Ibid : Research Methodology in Social Sciences, Himalaya Publishing House, Mumbai, 2001, पृष्ठ क्र.१४

१४) भांडारकर पु. ल. : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७, पृ. ६२.

१५) घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन– तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९, पृ. ७६

१६) डॉ.मायी सुनिल : सामाजिक संशोधन पद्धती डायमण्ड पब्लिकेशन पृ. क्र. ३१

१७) डॉ. मायी सुनील : सामाजिक संशोधन पद्धती डायमंड पब्लिकेशन पृ.क्र.३१

१८) प्रा. गुड व हॅट : सामाजिक संशोधन पद्धती, पु. ल. भांडारकर, आवृत्ती ४ थी, २०००, पृ.९७

१९) प्रा. वेबस्टर : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती (अनु.प्रा.रा.ना. घाटोळे) सातवी आवृत्ती, २००० मंगेश प्रकाशन,पृ.४१

२०) प्रा. यंग पी. व्ही. : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती (अनु. प्रा. रा. ना. घाटोळे) सातवी आवृत्ती, २००० मंगेश प्रकाशन, पृ. ४०

२१) प्रा. घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९ पृ. ६२

२२) कित्ता : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९ पृ. ६८

२३) डॉ. संत दु. का. : शोध विज्ञानकोश –समाधान संदर्भ ग्रंथ, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. २३४

२४) घाटोळे रा.ना. : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,२००८–०९, पृ. ६०

२५) कित्ता : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९, पृ. ६१

२६) कित्ता : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९, पृ. ६१

२७) Jahoda Satish, : Research Methods in Social Relations, Mathew and Cook Dywash Co.Ltd., 1969, P.31

२८) Ibid : Research Methods in Social Relations, Mathew and Co.Ltd., 1969, P.31

२९) Ibid : Research Methods in Social Relations, Mathew and Co.Ltd., 1969, P.31

३०) Ibid, : Research Methods in Social Relations, Mathew and Co.Ltd., 1969, P.31

३१) Ibid, : Research Methods in Social Relations, Mathew and Co.Ltd., 1969, P.31

३२) गर्गे स. मा. : इतिहासाचा सामाजिक वेध, मानसम्मान प्रकाशन, पुणे १९९५, पृ. क्र. ५.

३३) कित्ता : इतिहासाचा सामाजिक वेध, मानसम्मान प्रकाशन, पुणे १९९५, पृ.क्र.५.

३४) प्रा. यंग पी. व्ही. : समाजशास्त्रीय संशोधन (अनु. डॉ. वा. भा. पाटील) प्रथम आवृत्ती, १९९८ मंगेश प्रकाशन, पृ. २९

३५) भांडारकर पु.ल. : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७ पृ.क्र.२३३

३६) कित्ता : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७ पृ.क्र.१३

३७) कित्ता : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७ पृ.क्र.२३५

३८) कित्ता : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७ पृ.क्र.२३८

३९) कित्ता : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९९९ पृ.क्र.२८९

४०) घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पध्दती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९, पृ.क्र.१७७

४१) भांडारकर पु. ल. : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७ पृ.क्र.२३७

४२) कित्ता : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७ पृ. क्र. २३८

४३) घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पध्दती, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९, पृ.क्र.५८

४४) कित्ता : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पध्दती, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८–०९, पृ.क्र.५८

४५) सत्यान्वेषी : संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत (प्रकाशकाचे नाव आढळत नाही) पृष्ठ क्र. ८७.

४६) गडकरी माधव : संयुक्त महाराष्ट्र चढ्यातील महारथी, मनोविकास प्रकाशन, मुंबई, पृ. क्र. ६४

४७) पेंडसे लालजी : महाराष्ट्राचे महामन्थन १९६५, साहित्य सहकार संघ, मुंबई, पृ. क्र. ५६६

४८) प्रा. काळे भगवान : संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, पृ. क्र. ३०

४९) प्रा.फाटक न.र. : मुंबई नगरी, मौज प्रिंटिंग ब्यूरो खटाववाडी, गिरगाव, मुंबई, पृ.क्र.३१

५०) फडके य.दी. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ७, श्री. विद्या प्रकाशन, पुणे,पृ. क्र. २४७

५१) डॉ. देशमुख गो. वि. : संयुक्त महाराष्ट्राचे मारेकरी, प्रकाशकाचे नाव आढळत नाही, पृ. क्र. ५३

५२) महाजनी ह. रा. : संयुक्त महाराष्ट्राची समस्या, केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाऊस चिराबाझार, मुंबई, पृ. क्र.८७.

५३) प्रधान गणेश प्रभाकर: आगरकर लेखसंग्रह, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती १९६०, पृ.क्र.२६०

५४) लेले रा.के. : मराठी वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे, पृ. क्र .८

५५) Bhandarkar P. : Methodology and Techniques of Social Research, L., Wilkinson T.S. Himalaya Publishing House, Mumbai, 2007, P. 105

५६) Ibid : Methodology and Techniques of Social Research, Himalaya Publishing House, Mumbai, 2007,P.105

५७) Ibid : Methodology and Techniques of Social Research, Himalaya Publishing House, Mumbai, 2007,P.105

## प्रकरण तिसरे

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका

## १.१ दैनिक ‘पुढारी’

१.१.१ शिक्षण

१.१.२ ग.गो.जाधव यांची संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील भूमिका :

१.१.३ मराठी साहित्य संमेलन व संयुक्त महाराष्ट्र

१.१.४ एस.फाजलअली कमिशनचा अहवाल

१.१.५ मुंबई महापालिकेचा ठराव

१.१.६ श्री.शंकरराव देव यांचे उपोषण

१.१.७ मुंबई बाबतची तडजोड

१.१.८ सीमा प्रश्नाबाबत ग.गो.जाधव यांची भूमिका

१.१.९ कामगारासंदर्भात काँग्रेसचे धोरण

१.१.१० अविश्वास ठराव

१.१.११ विशाल महाराष्ट्र)

१.१.१२ महाराष्ट्र राज्याचे स्वागत

## १.२ दैनिक ‘प्रभात’

१.२.१ शिक्षण

१.२.२ वा.रा.कोठारी यांची संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील भूमिका

१.२.३ महाराष्ट्र पंचक

१.२.४ मुंबईचा प्रश्न

१.२.५ सरकारच्या भूमिकेवर वा.रा.कोठारींची टीका

१.२.६ मुंबईतील गोळीबार

१.२.७ हक्कभंग प्रकरण

**१.३ दैनिक 'मराठा'**

१.३.१ शिक्षण

१.३.२ आचार्य अत्रे आणि पत्रकारिता

१.३.३ दै.मराठा आणि आचार्य अत्रे

१.३.४ परंपरा आणि प्रवाह

१.३.५ समालोचन

**१.४ दै. 'सकाळ'**

१.४.१ शिक्षण

१.४.२ डॉ.नानासाहेब परूळेकर यांची पत्रकारितादेशाच्या फाळणीबाबत दै. 'सकाळ' ची भूमिका

१.४.३ देशाच्या फाळणीबाबत दै. 'सकाळ' ची भूमिका

१.४.४ संयुक्त महाराष्ट्र समितीतील घटक पक्ष व दै.सकाळ

१.४.५ कॉँग्रेस पक्ष व दै. 'सकाळ'

१.४.६ भाषिक राज्याबाबत दै. 'सकाळ' ची भूमिका

१.४.७ संयुक्त महाराष्ट्र चळवळ व दै.'सकाळ'

१.४.८ समालोचन

**१.५ दै. 'केसरी'**

१.५.१ जयंत श्रीधर टिळक (१२–१०–१९२१)

१.५.२ संयुक्त महाराष्ट्राचा लढा

१.५.३ भाषावार प्रांतरचनेची मागणी

१.५.४ भाषावार प्रांतरचनेची समस्या

१.५.५ नागपूर करार

१.५.६ राज्य पुनर्रचना समितीच्या शिफारशी

१.५.७ देवांचे महाद्वैभाषिक

१.५.८ संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे निवेदन

१.५.९ मुंबई विधानसभेवर विराट मोर्चा

१.५.१० 'मुंबईत रावणराज्य' : गोळीबार

१.५.११ संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला तोंड लागले

१.५.१२ चिंतामणराव देशमुखांचा राजीनामा

१.५.१३ मोरारजी देसाई यांना जनतेच्या कर्फ्यू

१.५.१४ निवडणुकीत समितीचा विजय

१.५.१५ प्रतापगडावरील निदर्शने

१.५.१६ व्दिभाषिक भंगण्याच्या मार्गावर

१.५.१७ सोनियाचा दिवस

१.५.१८ समालोच

१.५.१९ वृत्तपत्रांच्या कामगिरीचे मूल्यमापन

# प्रकरण तिसरे

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका

## प्रस्तावना

लोकशाही देशात सार्वजनिक जीवनात वृत्तपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते, जनहित आणि जनतेचे स्वातंत्र्य यांची जणू ती रखवालदारच असतात. म्हणून वृत्तपत्रांना समाज जीवनाचा आरसा म्हटले जाते. याशिवाय तत्कालीन समाजाचा दृष्टिकोन वृत्तपत्रावरून व्यक्त होतो. पत्रकारितेचे विद्यार्थी संशोधनासाठी वृत्तपत्रावर अवलंबून असतात. वृत्तपत्राच्या माहितीला तत्कालीन मूल्य असते. वृत्तपत्रे लोकशाही समाजाचे सांस्कृतिक पर्यावरण आणि लोकमत यांची जडणघडण करतात. समाजमनावर आपल्या विचारांचे संस्कार रुजविण्याचे कार्य वृत्तपत्रे करतात. माहिती देणे, विश्लेषण करणे, मनोरंजन करणे, शिक्षण देणे ही वृत्तपत्राची चार प्रमुख कार्ये असतात. त्यांपैकी शिक्षण आणि प्रबोधन ही कार्ये राजकीय जागरणासाठी पोषक ठरतात. वृत्तपत्रांनी तयार केलेली राजकीय जागृती ही मराठी वृत्तपत्राच्या बाबतीत संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील कळीची भूमिका होती.

## ३.१ दैनिक पुढारी ग. गो. जाधव यांचा परिचय

दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्राचे मालक संपादक गणपत गोविंदराव जाधव यांचा जन्म ४ मे १९०८ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा या प्रसिद्ध गावी झाला. गगनबावडा हे पंत अमात्यांच्या जहागिरीचे गाव होते. त्यांच्या जन्मादिवशी विनायक चतुर्थी होती, म्हणून त्यांचे नाव गणपती असे ठेवण्यात आले. ग. गो. जाधव यांचे वडील

गवंडी काम करीत असत. घरची परिस्थिती अत्यंत बेताची होती. गवंडी कामानिमित्त गोविंदरावांची भटकंती सतत सुरू असे. जिथं काम मिळेल तिथं त्यांचा मुक्काम असे. त्यामुळे त्यांनी ग. गो. जाधव यांना आजोळी गगनबावडा येथे आजोळी पाठविण्यात आले. गणपतरावांचे बालपण आजोळीच गेले. शिक्षणासाठी त्यांना कोल्हापुरात राहणे गरजेचे असल्याने शुक्रवार पेठेमध्ये ते राहावयास आले आणि तेथूनच शिक्षणाची सुरुवात झाली.

### ३.१.१ शिक्षण

गगनबावड्यातून शिक्षणासाठी कोल्हापूर येथे आल्यानंतर शुक्रवार पेठेतील घराजवळ असलेल्या शाळा क्र. ३ (आताचे बॅ. खर्डेकर विद्यालय) येथे दाखल करण्यात आले. या शाळेतून ते दुसरीच्या वर्गातून पास झाले. इयत्ता तिसरी जवळच असलेल्या ख्रिश्चन हायस्कूलमधून पूर्ण केले. त्यांनी शिवाजी पेठेतील दौलतराव विद्यालयात चौथीच्या वर्गात प्रवेश घेतला. चार पुढील इयत्तेसाठी भिंतीतील शिक्षणापेक्षा त्यांना स्वच्छंदी जीवन आवडत असे. त्यामुळे ते शाळेत जाण्याचा कंटाळा करून अंबाबाईच्या देवळात दप्तराची व्यवस्था लावून खेळात गुंतून जात असत. वडील गोविंदराव त्यांच्या गवंडी कामामुळे त्यांना सतत वेगवेगळ्या गावी जावे लागत असे. ''एकदा ते हुक्केरी चिक्कोडी परिसरात कामानिमित्त जाताना गणपतरावांनाही सोबत घेऊन गेले. त्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला''[१] त्यामुळे ग. गो. जाधव यांना अभ्यासासाठी संघर्ष करावा लागला. एक दीड वर्षाचा हा काळ शिक्षणाविना गेला. गोविंदराव परत गगनबावड्याला आले, त्यामुळे त्यांना तेथील पाचवीच्या वर्गात दाखल करण्यात आले.

तेथे त्यांना शिक्षणाची गोडी लागली. ''मला गगनबावड्याच्या शाळेनेच घडविले असे ते अभिमानाने सांगतात.''[२] कोणत्याही वृत्तपत्राचा संपादक हा शालेय शिक्षणातून होणाऱ्या संस्कारातून घडत असतो हे खरे आहे. त्याप्रमाणे ग.गो.जाधव यांच्यात शिक्षणाची आवड वाढल्याने त्यांना चांगले गुण मिळू लागले. १९२५ मध्ये ते फायनलची परीक्षा चांगल्या गुणवत्तेने उत्तीर्ण झाले. बावड्यातील शाळेत असताना जोपासलेला वाचनाचा छंद त्यांना आयुष्यभरात उपयोगी पडला.

सातवीच्या वर्गाची सोय बावड्याला नसल्यामुळे त्यांना शिक्षणासाठी कोल्हापुरात यावे लागले. देशपांडे मास्तरांचे इंग्रजीचे वर्ग भरत असत. त्यामधून एका वर्षात इंग्रजीच्या तीन इयत्ता करण्याची सोय होती. गणपतरावांनी या ठिकाणी प्रवेश घेतला व तिसरी इंग्रजी इयत्ता पास झाले. चौथीची पुस्तके घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागले. ''घरच्या परिस्थितीमुळे गणपतरावांना शिक्षण पूर्ण करता आले नाही.''[३] ती परिस्थिती बेताची  असली तरी ते डगमगले नाहीत. त्यांनी आपला संघर्ष चालूच ठेवला. वाचणाच्या लागलेल्या आवडीमधून ते सत्यशोधक समाजाकडे वळले. महात्मा गांधी यांच्या प्रभावाने त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात ही सहभाग घेतला. ग.गो.जाधव यांचा गौरव ग्रंथ १९८२ साली दैनिक पुढारीच्या वतीने प्रकाशित करण्यात आला. डॉ. एस. एस. भोसले यांनी संपादन केलेल्या या खंडप्राय ग्रंथामध्ये ग.गो.जाधव यांच्या समग्र जीवनकार्यावर प्रकाश टाकलेला आहे. त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अनेक बाबींचा परामर्श घेतला आहे.

### ३.१.२ ग. गो. जाधव यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील भूमिका

स्वतंत्र भारताच्या चळवळीमध्ये ग. गो. जाधव यांनी अखंड भारताचे समर्थन केले होते. छोटे छोटे प्रदेश स्वतःला स्वतंत्र मानू लागले तर भारताचे अखंडत्व धोक्यात येईल फु टीर शक्यता प्रभावी बनून देशाची शकले होतील, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली होती आणि त्यांनी सार्वभौम संस्थाने यालाही विरोध केला होता. देशातील काही संस्थानांनी आपण सार्वभौम असल्याचे जाहीर करताच संस्थानांची भूमिका कशी देशहिताच्या कशी आड येते आहे, हे त्यांनी निर्भीडपणे सांगितले होते. मुंबई राज्याच्या पुनर्रचनेवेळी मुंबई महाराष्ट्रातच सामील व्हावी अशी भूमिका घेतली होती. या काळात महाराष्ट्रात अनेक राजकीय आंदोलने सुरू झाली. या आंदोलनाच्या प्रक्षुब्ध काळात गणपतराव जाधवांनी आपल्या पुढारी दैनिकात अत्यंत सावधानतेने, संयमाने व जबाबदारीने लेखन केले. त्यांनी आपल्या लिखाणातून जनतेची आणि नेत्यांचीही मने भडकावली नाहीत तर संयमाने सर्वांना मार्गदर्शन केले. शिवाय कोणत्याही पक्षाचा अथवा व्यक्तींचा मिंधेपणा पत्करला नाही. त्यांनी स्वतंत्र धोरण ठेवून मोठ्या अस्मितेने आपल्या ‘पुढारी’ दैनिकाचे संपादन केले. न्यायदानात जशी न्यायमूर्तींची निःपक्षपाती भूमिका असते तशीच भूमिका संपादकाची पुढारीकारांनी वठवली. आपल्या संपूर्ण वृत्तपत्रीय जीवनात गणपतराव जाधव यांनी न्यायालयातील न्यायाधीशांच्या निःपक्षपाती भूमिकेचेच मराठी वृत्तपत्रात दर्शन घडविले. त्यांनी कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता त्यांनी स्वाभिमान राखून ताठ मानेने आणि अशाच भूमिकेला शोभणाऱ्या नम्रपणे मराठी वृत्तपत्र व्यवसायात आपली आदर्श प्रतिमा निर्माण केली. म्हणून त्यांच्या कार्याला राजकीय महत्त्व आहे. भास्करराव जाधव, दीनानाथ जवळकर, काकासाहेब लिमये, (कै). रामचंद्र

जाधव यांच्याकडून त्यांना राजकीय धडे मिळाले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही त्यांनी आपली ठाम भूमिका मांडली. त्यांनी मांडलेली भूमिका त्याच्या वेळोवेळी केलेल्या लेखनातून प्रकट झाली आहे. ग. गो. जाधव यांचे हे कार्य फारसे प्रकाशमान झालेले नाही. असे निर्भय कार्य करूनही त्यामुळे त्यांच्या काही अपेक्षित पैलूंवर यातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा जवळ जवळ २५ ते ३० वर्षे चालला होता. या व्यापक लढ्यात सेनापती बापटांपासून ते दाजीबा देसाई पर्यंत अनेक रथीमहारथी शर्थीने लढले. त्यापैकी काहींनी बलिदानही दिले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हे एक जनआंदोलन होते. मात्र या जनआंदोलनाचा विचारांती पक्की बैठक होती. ''संयुक्त महाराष्ट्र ही चळवळ सुरू झाली तेव्हा राजकीय पक्षाची संबंध नसलेल्या कर्तृत्ववान व्यक्तीचे एक मंडळ नेमण्यात आले होते. त्यांचे प्रमुख होते प्रबोधनकार के. सी. ठाकरे, सेनापती बापट, प्रभातचे संपादक वालचंद कोठारी आणि माधवराव बागल हे त्या पंचकाचे इतर स्तंभ होते.''[४] संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये पंचकांनी केलेल्या जागृतीस पुढारी या वृत्तपत्राचे संपादक ग. गो.जाधव यांनी उचलून धरले.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी झालेल्या आंदोलनात कोल्हापूर जनतेचा सुरुवातीपासून अखेरपर्यंत सिंहाचा वाटा होता. या आंदोलनाचा पाया घालणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी माधवराव बागल हे एक होते. कोल्हापूर जिल्ह्यातील संयुक्त महाराष्ट्र परिषद दिनांक ११ मार्च १९४९ रोजी रात्री खासबाग मैदानात अत्यंत उत्साहात पार पडली. या परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव मोरे आणि उद्घाटक ना. म. जोशी होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात शंकरराव मोरे यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे वर्गीय व

आर्थिक यावरून स्पष्ट करून हे आंदोलन देशाला दुर्बल बनविणारे नसल्याचे स्पष्ट केले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी वर्गीय लढ्याची घोषणा करणारा ठराव या परिषदेने एकमताने मंजूर केला. ठरावावर के. सी. ठाकरे व नाना पाटील यांची जोरदार भाषणे झाली. कोल्हापूरच्या या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा वृत्तांत ''दै. 'पुढारी'ने दि. १२ मार्च १९४९च्या अंकात पहिल्या पृष्ठावर दिला आहे.''[५] त्यावरून आपल्या पसिरसरात होणाऱ्या जनआंदोलनाची दाद पुढारी कशी तत्परतेने दखल घेत होता हे स्पष्ट होते. या परिषदेपूर्वी काही दिवस श्री. न. वि. गाडगीळ व शंकरराव देव यांनी देशाच्या राजधानीत मुंबईसह महाराष्ट्राची मागणी केली आहे. जानेवारी १९५१ चा सुरुवातीला ठाणे जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषदही पार पडली. भाषावार प्रांतरचनेच्या दृष्टीने हे अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे ठरणारे होते. सदर परिषदेचे अध्यक्ष समाजवादी पक्षाचे साथी माधवराव गायकवाड होते. परिषदेचे उद्‌घाटन शे. का. पक्षाचे नेते श्री. शंकरराव मोरे यांनी केले. ठाणे परिषदेचे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले. भाषावार प्रांतरचनेसंबंधी ठाणे परिषदेत पुढील ठराव मंजूर करण्यात आला. ''लोकशाही भारतातील जनसमुदायामध्ये एकोपा वाढवून त्याला बलवान करण्याकरिता व स्वराज्याचे लोण प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचून समाजवादी भारताचे संघराज्य निर्माण करण्याकरिता भारताची घटक राज्य स्वायत्तता, एकात्म एकभाषी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व सलग भूप्रदेश व्यापणारी अत्यंत आवश्यक आहे.''[६] श्री.शंकरराव मोरे यांनी आपल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उघडपणे चळवळीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. परिषदेचे अध्यक्ष माधवराव गायकवाड यांनीही आपल्या भाषणात तोच मुद्दा परंतु थोड्या वेगळ्या पद्धतीने मांडला. संयुक्त महाराष्ट्र दिनांक ११

जानेवारी १९५१च्या पुढारीच्या अग्रलेखात चळवळीची नवी दिशा या सदराखाली ठाणे जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा आढावा घेऊन तिचे लढ्यातील ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट झाले आहे. त्या अनुषंगाने 'पुढारी' या पत्रामध्ये वेळोवेळी लिहिण्यात आलेले अग्रलेख हे त्यांनी भूमिकांचे प्रतिबिंब ठरतात. त्यामुळे दै. पुढारीमधील अग्रलेखाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अग्रलेखामधील खालीलप्रमाणे अभिप्राय चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

''श्री. शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूरला झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेने नवी दिशा दाखविली आहे. ठाण्याच्या या परिषदेने निःसंदिग्धपणे पुढचे पाऊल टाकले आहे. संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्याबाबत कोणत्याच पक्षाचे दुमत राहिलेले नाही. पण सर्वपक्षीय कडबोळे उपयुक्त ठरण्याचे दिवस संपले असल्याने हा प्रश्न पक्षाने आपापल्या परीने नेटाने लावणे क्रमप्राप्त झाले आहे व ते इष्ट होय.''[७] संयुक्त महाराष्ट्राची न्याय मागणी डावलणाऱ्या काँग्रेसला ही चळवळ जहाल गटाच्या हाती गेली तर कुरकुरण्याचे कारण नाही व त्यामुळे होणाऱ्या परिणामांचे खापर तिने स्वतःवर ओढवून घेतले पाहिजे.

दिनांक ८ मार्च १९४९ रोजी सायंकाळी ६.३० वाजता कोल्हापूर येथे बिंदू चौकात समाजवादी पक्षाच्या पाटणा अधिवेशनाचा संदेश प्रस्तुत करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची प्रमुख नेते एस. एम. जोशी यांचे व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाचा 'पुढारीने सविस्तर वृत्तांतही'' प्रसिद्ध केला आहे. श्री. जोशी आपल्या व्याख्यानात म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्र मागणी विरुद्ध तात्काळ काँग्रेसचे सर्वांत मोठे नेते आहेत, त्यांनी भांडवलदारांची बाजू घेतल्याचे स्पष्ट दिसत आहे. कारण संयुक्त

म्हणून मुंबईची फारकत करण्याचे हे कटकारस्थान शिजले आहे. ते भांडवलदारांना खूष करण्यासाठीचे होते. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यास त्या महाराष्ट्राची भूमी समाजवादास फार उपयुक्त आहे. म्हणून त्यांना महाराष्ट्राची निर्मिती नको आहे.''[८] याप्रमाणे काँग्रेसवर टीकेवरून ते पुढे म्हणाले, ''महात्मा गांधींच्या खुनानंतर काँग्रेस ही आता शेतकऱ्यांची, कामगारांची राहिलेली नाही. उलट शेतकरी, कामगारांचा कैवार घेणाऱ्या संघटना काँग्रेसमधून बाहेर पडाव्यात असे धोरण आखण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर शेतकरी कामगारांच्या संघटना दडपण्याचे धोरण आजवर काँग्रेस सरकारने स्वीकारले आहे. १९५० साली दिल्ली येथे महाराष्ट्र भवनाच्या उद्घाटनप्रसंगी भारताचे तत्कालीन कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 'पुढारी'च्या दिल्ली प्रतिनिधीने मुलाखत घेऊन संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या संदर्भातील त्यांचे मनोगत जाणून घेतले. त्यांनी दिलेली मुलाखत अत्यंत महत्त्वाची असून, ती संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नैतिक बळ व आत्मविश्वास वाढविणारी आहे. त्या मुलाखतीमधील प्रसिद्ध झालेला दैनिक पुढारी वृत्तांत पुढीलप्रमाणे आहे.

''भारतीय गणराज्य स्थापन झाले, पण स्वतंत्र नि संयुक्त महाराष्ट्र मुंबईसह अद्याप व्हायचा आहे. त्या करिता महाराष्ट्रातही स्वस्थ बसून कार्य होणार नाही तर महाराष्ट्र धर्म संस्कृती नि उन्नती या करिता संघटित झाले पाहिजे. अटकेपार मराठ्यांनी झेंडे लावले हा इतिहास जुना आहे. आपण तो पुनर्रपी घडवून आणला पाहिजे. शत्रूंशी झुंज घेण्यास व देण्यास सदैव तयार झाले पाहिजे. मराठी बाणा कोणत्याही प्रसंगी सोडता कामा नये. एकमेका साह्य करून अवघे धरू सुपंथ असा तेजस्वी संदेश डॉ. आंबेडकरांनी दिला.''[९] भारतीय घटनेच्या शिल्पकारांनी संयुक्त महाराष्ट्र

निर्मितीबाबतचे आरपारचे परखड मत मांडले आणि हे घटनाकाराचे मत आम जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम दैनिक ‘पुढारी’ यांनी करून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ बळकट करण्यास हातभार लावला. दिनांक १६ जुलै १९५३ च्या अग्रलेखात ‘पुढारी’कार ग. गो. जाधव यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी संदर्भात पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे. मुंबईचे महसूलमंत्री भाऊसाहेब हिरे यांनी कल्याण येथे भाषण करताना ‘‘संयुक्त महाराष्ट्राची चळवळ करण्याची हीच वेळ आहे. असे सांगितले एप्रिल महिन्यात पंडित नेहरूंनी जेव्हा बेगळगावला भेट दिली तेव्हा आंध्रनिर्मितीनंतर भाषावार प्रांतरचनेने स्थापनेसाठी एक वर्षाच्या आत समिती नेमण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. महाराष्ट्र जर या वेळी स्वस्थ राहिला तर अंतिम महाराष्ट्राचे हित होणार नाही. सध्याचा काळ बंडाळीचा आहे अशी वाटेल ती टीका झाली तरी मेंदू ठिकाणावर ठेवून सामोपचाराने झुंज देण्याचा हा काळ आहे. महाराष्ट्राला आपल्या राज्यनिर्मितीच्या सदैव तयारीत राहिले पाहिजे. ऐक्याच्या मागणीने चळवळ पुढे रेटण्यात यावी.’’[१०] याप्रमाणे हिरे यांनी आपले मत मांडले या मताला दैनिक पुढारीने अग्रलेख लिहून महसूल मंत्र्याचे मत जनतेला वाचनासाठी उपलब्ध करून दिले.

### ३.१.३ मराठी साहित्य संमेलन व संयुक्त महाराष्ट्र

साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही नेहमीच एक महत्त्वाचा विषय ठरली. त्यातील चर्चा व ठराव हे प्रभावी जनमताचे निदर्शक ठरतात. ३६वे अखिल भारतीय साहित्य संमेलन अहमदनगर येथे १९५३ साली झाले. त्याबाबत दै. ‘पुढारी’ ४ नोव्हेंबर १९५३ च्या आपल्या अग्रलेखात खालील मत व्यक्त केले.

संमेलनाच्या अध्यक्ष निवडीत वि.द.घाटे संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावरून निवडून आले. मुंबई प्रश्नावरून श्री. दादासाहेब मावळकर अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीत पराभूत झाले. या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवरून त्यासाठी झालेल्या नागपूरकरांस पाठिंबा देण्याचे ठराव पास झाले. मराठी भाषेच्या व महाराष्ट्रीय जनतेच्या इच्छा पूर्ण होणे व खरी लोकशाही स्थापन होणे याचाच पाठपुरावा या संमेलनाने केला. संमेलनापूर्वी मुंबईत मराठी साहित्य संघाच्या वतीने झालेल्या सत्काराच्या वेळी श्री. घाटे म्हणाले की, ''संय्रुत महाराष्ट्राच्या आड पक्ष आला तर त्याला मी विरोध करेन, आपण भाषावार राज्यांच्या व त्यांच्या भाषणांचा मूलभूत दृष्टीने विचार करून चांगला पुरस्कार केला आहे. त्यांनी या वेळी नागपूरकरांचाही उल्लेख केला.''[११] बृहन्महाराष्ट्र परिषदेचे २९वे वार्षिक अधिवेशन दिल्ली येथे झाले, या परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब हिरे होते. आपली भाषिक राज्याची मागणी ही जनतेची मागणी झालेली आहे. आम्ही ज्याला सलग, अखंड संयुक्त महाराष्ट्र अशी विविध नावे देतो ती नावे सुशिक्षित शेतकरी बोलत नसेल परंतु मला माझी गाऱ्हाणी माझ्या भाषेत बोलू द्या आणि त्या भाषेतच तो ऐकणारा राज्यकर्ता मला हवा आहे, हे मागणे त्यांनी मांडले. १७% श्रीमंत वर्ग ८२% गरिबांवर किती काळ आपली अनियंत्रित सत्ता ठेवू शकेल, हा प्रश्न हिंदुस्थानातील ७ लाख खेड्यांचा  आहे एका प्रांतिक नव्हे तर साऱ्या देशानेच या विषमतेला दूर करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्रावर हा अन्याय का? असे जळजळीत उद्‌गार श्री.हिरे यांनी काढले. या परिषदेचे स्वागताध्यक्ष खासदार न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ होते. ''परिषदेचा सदर वृत्तांत अधिवेशनाचे महत्त्व लक्षात घेऊन 'पुढारी'ने १५ नोव्हेंबर १९५३च्या आपल्या अग्रलेखात त्याची विशेष नोंद घेतल्याचे आढळते.''[१२] दै. पुढारीने

महाराष्ट्रातील नेत्याचे मनोगत सर्वसामान्य मानसापर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या अग्रलेखासारख्या शीर्षकात स्थान देऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीला मोठी प्रसिद्धी दिली.

### ३.१.४. एस. फाजलअली कमिशनचा अहवाल

देशभर चालू झालेल्या राज्याच्या पुनर्रचनेसंदर्भातील आंदोलनामुळे भारत सरकारला वेगळा विचार करावा लागला. म्हणून भारत सरकारने भारतीय संघातील राज्यांच्या पुनर्रचनेसंदर्भात प्रत्येक घटक राज्याची प्रजा तसेच समग्र भारत स्पष्ट या दोाघांचेही कल्याण साधले जावे, याच दृष्टीने एस. फाजलअली कमिशन नेमले. तसेच राज्याच्या पुनर्रचनेसंदर्भात जनतेच्या कोणत्याही प्रकारच्या सूचना विचारात घेण्याचे कमिशनला स्वातंत्र्य दिले होते. एस. फाजलअलीच्या नेतृत्वाखाली राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल १० ऑक्टोबर १९५५ रोजी प्रसिद्ध झाला. कमिशनने विदर्भाचे स्वतंत्र राज्य व संपूर्ण गुजराती प्रदेशासह मराठवाडा धरून मुंबईच्या व्दिभाषिक राज्याची शिफारस केली आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी कमिशन ने नाकारली या अहवालात एकूण १६ राज्ये सुचविली होती. काश्मीर सोडून बाकी सर्व १४ राज्यांना पाया प्रत्यक्षात भाषेची एकी हाच धरला होता. या अहवालाबाबतचे पुढारीने आपल्या अग्रलेखात खालील प्रतिक्रिया व्यक्त केली.

‘‘महाराष्ट्राच्या बाबतीत राष्ट्रऐक्याच्या नावाखाली अन्याय केला आहे. मुंबई हैद्राबाद व मध्य प्रदेशात सर्व मराठी भाषिक ज्यांचा मुंबई राजधानीसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करावा, अशी मागणी असताना फाजलअली कमिशनने विदर्भाचे वेगळे राज्य

सुचविले आहे.''[१३] गुजरातचे पारडे जड करण्यासाठी मुंबईत मराठी गुजराती भाषिकांचे संमिश्र राज्य लादले असून त्यात सौराष्ट्र व कच्छ यांचा समावेश केला आहे. श्री. शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत गेलेल्या महाराष्ट्र कॉंग्रेस शिष्टमंडळाला पंडित नेहरूंनी राष्ट्रत्वाच्या भावनेने सहकार्य केले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने केलेला ठराव हा एक त्यातील टप्पा होता. या टप्प्यावर न थांबता संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सर्वांची पावली पडले पाहिजेत. अशी भूमिका दैनिक पुढारीने घेऊन आपली अचूक व मार्मिक प्रतिक्रिया दिली होती.

### ३.१.५ मुंबई महापालिकेचा ठराव

मुंबई ही तत्कालीन द्विभाषिक राज्याची राजधानी होती. त्यामुळे मुंबई मनपामध्ये संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर झालेले मंथन हा या अभ्यासाचा महत्त्वाचा पैलू ठरतो. मुंबई महापालिकेची दिनांक २३ डिसेंबर १९५५ रोजी सर्वसाधारण सभा झाली. या सभेत प्रजा समाजवादी यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व महागुजरात अशी दोन राज्ये स्थापण्याची मागणी करणारा ठराव मांडला प्रत्यक्षात या ठरावावर सहा सभा झाल्या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या कल्पनेला मुंबई पार्लमेंटमधील प्रांतिक कायदेमंडळावर निवडून गेलेले सभासद आणि मुंबई पालिकेतील सदस्याचा त्याला विरोध आहे, असे स.का.पाटील यांना वाटत होते. हा ठराव ६३ विरुद्ध ० मतांनी अंकातील ''अग्रलेखात ठराव पास झाल्याचे स. का. पाटील यांना धडा मिळाला, जनतेचा कल त्यांना समजला तसेच परप्रांतीय लोकांनाही त्यामुळे धडा मिळाला, असे मत व्यक्त केले.''[१४] शिवाय दिनांक २१ नोव्हेंबर १९५५ रोजी एकत्र येऊन जनतेने

मोठ्या संख्येने निदर्शने केल्यामुळेच जनतेला विजय मिळाला. या विजयाची दखल घेऊन काँग्रेस श्रेष्ठींनी तत्काळ घेऊन महाराष्ट्राला न्याय दिला. असेही मत दैनिक 'पुढारी'ने व्यक्त केले होते.

### ३.१.६ श्री. शंकरराव देव यांचे उपोषण

शंकरराव देव हे काँग्रेसचे ज्येष्ठ गांधीवादी नेते व विचारवंत होते. महाराष्ट्रावर त्यांचा वैचारिक प्रभाव होता. संयुक्त महाराष्ट्रासाठी त्यांनी उपोषण घोषित केले होते. दै. पुढारीने याची दाद घेऊन 'पुढारी' च्या दिनांक २९ जानेवारी १९५६ च्या अग्रलेखात शंकरराव देवांच्या उपोषणाबाबत व त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकांची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.''[१५] मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे, यासाठी शंकरराव देव यांनी दिनांक ३ फेब्रुवारी १९५६ पासून ११ दिवसांचे उपोषण जाहीर केले. त्यासंबंधीचे निवेदनही काढले. त्या निवेदनात त्यांनी आपल्या निर्णयामागचे कारण सांगितले ''गेल्या १०–१२ दिवसांत मुंबईत व महाराष्ट्राच्या इतर भागात दंगलीचे जे प्रकार झाले त्यामुळे व्यथित होऊन हे करत होते. श्री. देव यांनी काँग्रेस श्रेष्ठींचे विशेषतः पंतप्रधान पंडित नेहरूचे मन वळवण्याची फार मोठी आशा बाळगली होती. सर्व पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेला सर्व अधिकार दिले. संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर त्यांनी ठाम भूमिका घेतल्याचे सरदार पटेल यांनी त्यांच्या राजकीय आयुष्यास फार मोठा धक्का दिला. महाराष्ट्राच्या नेत्याविषयी जनतेत गैरसमज व्हावा, हे इष्ट नव्हे. म्हणून श्री. देव यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा, सरकारही अन्यायाच्या व दडपशाहीला बाजूला ठेवून जनतेला दूषणे देणारे उपोषण रद्द करावे, असे मत 'पुढारी'ने व्यक्त केले आहे.''[१६]

### ३.१.७ मुंबईबाबतचे तडजोड

लोकसभेत राज्य पुनर्रचना विधेयकावर चर्चा चालू असताना मुंबईच्या भविष्याविषयी विविध सदस्यांनी जी भूमिका मांडली तिचा 'पुढारी'च्या दिनांक ६ एप्रिल १९५६ च्या अग्रलेखात परामर्श घेण्यात आला होता. अग्रलेखातील आलेले अभिप्राय पुढीलप्रमाणे ''राज्यपुनर्रचना विधेयकावर लोकसभेत चर्चा चालू आहे, ते विचारात घेता सरकारला मुंबईच्या प्रश्नावर महाराष्ट्राचे समाधान होईल अशी तडजोड करावी लागेल असे वाटत. काही अपवाद वगळता सर्वांनी मुंबई महाराष्ट्रात घालावी, असे मत व्यक्त केले''[१७] यावेळी अर्थमंत्री ना. चिंतामणराव देशमुख यांनी राजीनामा दिला. त्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. ते कुलाबा मतदारसंघातील खासदार होते. या जिल्ह्याचे नव्हे तर कोकण भागाचे जीवन मुंबईवर अवलंबून आहे. त्यांनी यापूर्वीच राजीनाम्याचा निर्णय घेतला होता. बाब लक्षात घेऊन श्री. काकासाहेब गाडगीळ आपल्या भाषणातून मुंबई ही महाराष्ट्राची असून, आज ना उद्या ती महाराष्ट्रात सामील करण्याची निःसंदिग्ध घोषणा पंडित नेहरूंनी करावी व महाराष्ट्राची राजधानी मुंबई ठेवण्यास मान्यता द्यावी, असे मत व्यक्त केले होते.

### ३.१.८ सीमा प्रश्नाबाबत ग. गो. जाधव यांची भूमिका

दै. 'पुढारी' वृत्तपत्र कोल्हापूरहून निघत होते. बेळगाव हा सीमेलगतचा जिल्हा होता. त्यामुळे सीमा प्रश्नावर या पत्राची भूमिका रोखठोक होती. मुंबई राज्याच्या पुनर्रचनेच्या वेळी त्यांनी मुंबई महाराष्ट्रातच सामील व्हावी, अशी भूमिका घेतली होती. या संदर्भात अभ्यास करण्यासाठी महागुजरात परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिती

स्थापन करण्यात आली होती. परंतु मुंबई महाराष्ट्रात जोडण्यात गुजरात प्रदेश कॉंग्रेस आणि चेंबर्स ऑङ्ग कॉमर्स यांचा विरोध होता. तसेच त्यांनी त्रिराज्य योजनेचा पुरस्कार चालविला होता. संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई महाराष्ट्रात राहावी, असाच आग्रह धरला होता. ''देशात दुर्भिल्याची स्थिती आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे संकटपर्व सुरू असताना असा लढा करणे अनुचित ठरेल व तसा लढा सुरू केला तर इतर सर्व तातडीचे प्रश्न त्या लढ्याने झाकाळले जातील आणि मुंबई राज्याच्या आर्थिक प्रगतीस खीळ बसेल,''[१८] असा इशारा दिला होता. राज्याच्या हिताच्या आड येणारी कोणतीही कृती महाराष्ट्र व गुजरातच्या बाजूने होऊ नये याची काळजी उभय नेत्यांनी घ्यावी. अशी विनंती त्यांनी केली होती. देशात अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. शिवाय दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम करावे लागतील, अशा स्थितीत सीमाप्रश्नावरून आंदोलने करणे योग्य नाही, असा सल्ला त्यांनी उभय राज्यांना दिला होता.

डिसेंबर १९५७ च्या स्वतंत्र विदर्भाच्या मागणीने जोर धरला होता. अनेक छोटी छोटी राज्ये भाग स्वतंत्र अस्तित्वासाठी पुढे सरसावले होती. पंतप्रधान पंडित नेहरू यांनी या मागणीकडे दुर्लक्ष करून स्वतंत्र विदर्भाची गरज नसल्याचे सूचित केले होते. विदर्भात असंतोष आहे, तिथे महाविदर्भाची मागणी जोर धरत आहे. असे चित्र निर्माण झाल्यानंतर ग. गो. जाधव यांनी तेथील जनतेला प्रथम विश्वासात घ्यावे लागेल. असे सूचित केले होते. ''संयुक्त महाराष्ट्र समितीने या भागातील जनतेचा पाठिंबा मिळविला पाहिजे.''[१९] अशी सूचना केली होती. महाविदर्भाची मागणी नेमकी कुणाची आहे. तसेच त्या प्रदेशात खरोखरच असंतोष आहे का? याची खातरजमा करून

घेतल्यानंतरच पुढील पाऊल उचलणे शक्य होणार आहे. म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीने सर्वप्रथम त्या प्रदेशातील जनतेचा पाठिंबा मिळविला पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

### ३.१.९ कामगाराबाबत काँग्रेसचे धोरण

दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्राने अनेक प्रश्नांवर भाष्य केले होते. तत्कालीन परिस्थितीमध्ये कामगारांचा प्रश्न हा ऐरणीवर आला होता. कामगारांसंदर्भात काँग्रेसचे धोरण काय होते याचेही विवेचन ग.गो. जाधव यांनी केले होते. फेब्रुवारी १९४८ मध्ये देशात अनेक ठिकाणी आपल्या मागण्यासाठी कामगारांनी संप केले होते. असे संप राष्ट्रहिताला बाधक असल्याने कामगारांनी चर्चेतून प्रश्न सोडवावे, अशी भूमिका काँग्रेसने घेतली होती. या भूमिकेचे समर्थन करून ग.गो. जाधव यांनी कष्टकऱ्यांना पंडित नेहरू यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्याचा सल्ला दिला होता. ''आपला देश सध्या संकटात सापडला आहे, सरकारपुढे अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत, अशा स्थितीत सरकारला अडचणीत टाकणारे व देशाचे उत्पन्न घटविणारे संप वगैरे प्रकार शक्य तिके टाळून कामगारांनी पंडित नेहरू यांच्या हाकेला ओ देणे आवश्यक आहे''[२०] असे मत व्यक्त केले होते यामुळे अगोदर दरिद्री असलेल्या कामगारांना सर्व त्याग करावा लागेल. हे खरे आहे परंतु कामगारांनी व शेतकऱ्यांनी देशाच्या स्वातंत्र्याकरिता आजवर जसा स्वार्थ त्याग केला, तसा या संकटाच्या काळी थोडासा त्याग दाखविला तर तो वाया जाणार नाही. महात्मा गांधी यांच्याप्रमाणेच पंडित नेहरूच्या हातात कामगार हित सुरक्षित राहील व योग्य वेळ येताच ते कामगारांचे प्रश्न हाताळतील अशी खात्री

बाळगण्यात हरकत नाही. असेही मत जाधव यांनी व्यक्त केले होते.

### ३.१.१० अविश्वास ठराव

एखादा लढा ऐरणीवर आला असता मांडला जाणारा अविश्वास ठराव ही एक वळण देणारी घटना असते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गुजरातच्या पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १०६ लोक ठार झाले होते. न्यायालयीन चौकशीला सरकारने नकार दिला होता. तेव्हा विरोधी पक्षांनी सरकारविरुद्ध अविश्वास ठराव मांडून ठराव चर्चेत आल्यावर ३९ विरुद्ध २२४ मतांनी तो फेटाळला गेला होता. सरकार पक्षाचे बहुमत असल्यामुळेच तो ठराव फेटाळला गेला. मुंबई राज्यात स्वातंत्र्यातील काळात ११८५ वेळा आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या आठ वर्षात ३८२ वेळा गोळीबार झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी चर्चेच्या वेळी दिली. याची 'पुढारी'ने नोंद घेऊन दिनांक १८ ऑक्टोबर १९५६ च्या आपल्या अग्रलेखात त्यावर सडेतोड टिका केली आहे. अग्रलेखात असे म्हटले होते की, ''महात्मा गांधी या वेळी असते तर त्यांना आपल्या शिष्यांनी चालविलेला हा प्रकार पाहून लाजेने मान खाली घालावी लागली असती. विरोधी पक्षाच्या आमदारांनी जे विचार मांडले त्यापेक्षा वेगळे विचार काँग्रेस आमदारांचे नव्हते. मात्र पक्षशिस्तीमुळे त्यांना ते मांडता येत नाहीत त्यामुळे अविश्वासाचा ठराव फेटाळला गेला असला तरी, त्यांचा हेतू साध्य झाला आहे, हे नाकारता येत नाही.''[२१] संयुक्त महाराष्ट्राचे सरचिटणीस एस.एम.जोशी यांनी आपल्याला पदमुक्त करण्याची विनंती केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचे समितीमधील मतभेद चव्हाट्यावर आले. त्याचीही 'पुढारी'ने आपल्या अग्रलेखात यथायोग्य नोंद घेतल्याचे आढळून येते. संयुक्त महाराष्ट्र समितीचे

सरचिटणीस श्री.एस.एम. जोशी यांनी सरचिटणीसपदावरून आपणास मुक्त करावे, अशी विनंती समितीच्या ता. २० नोव्हेंबर १९५९ च्या जनरल कौन्सिलच्या बैठकीत केली असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. श्री. जोशी यांच्यासारख्या कार्यकर्त्यास समितीच्या या जबाबदारीच्या जागेतून मोकळे होण्याची अगदी घाई व्हावी, यात बराच खोल मथितार्थ असला पाहिजे. समितीतील मंडळींनी जोशींच्या वर असा आरोप ठेवला की, पंडित नेहरूंनी यांनी मुंबईस भेट दिली असता श्री. जोशी यांनी घाईने त्यांच्याशी गुप्त यावरूनाच्या वाटाघाटी केल्या आणि या वाटाघाटीतील त्यांनी आपल्या पक्षाच्या वतीने काही वेगळी भूमिका पंतप्रधानांना निवेदन केली. हा आरोप समितीतील इतर पक्ष श्री. जोशी यांच्यावर करीत होते. त्यामुळे श्री. जोशी त्यांनी जबाबदारीतून मुक्त करण्यास सांगत होते.''[२२] असे स्पष्ट मत दैनिक 'पुढारी'ने दिनांक २४ नोव्हेंबर १९५९ च्या अंकातील अग्रलेखात आंदोलनातील अनेक घडामोडीचा वृत्तांत आपल्या शैलीने जनतेसमोर मांडलेला होता.

### ३.१.११ विशाल महाराष्ट्र

ग. गो. जाधव यांनी १७ मार्च १९६० दैनिक पुढारीच्या अग्रलेखात विशाल महाराष्ट्राच्या बाबतीत खालील मत प्रतिपादन केले होते. गुजरात सरकारच्या स्थापनेनंतर राहिलेल्या मुंबई राज्यास महाराष्ट्र राज्य असे संबोधण्यात येईल, अशी अधिकृत घोषणा दिनांक १५ मार्च १९६० रोजी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी केली, या घोषणाला अधिकृत म्हटले त्याचे कारण की, उर्वरित मुंबई राज्यास कसे संबोधावे, यासंबंधी कॉंग्रेसच्या वरिष्ठांनी आग्रह धरलेला नसून, याबाबत

विधानसभेने निर्णय घ्यावा. नामदार मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या निवासस्थानी दिनांक १४ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र असे उर्वरित मुंबई राज्यास संबोधावे असा निर्णय एकमताने घेण्यात आला. ''मराठी भाषिकांचे एकछत्री राज्य निर्माण व्हावे, यासाठी नामदार चव्हाणांना श्रीमती इंदिरा गांधी यांचे सहाय्य अधिक झाले. अर्थात महाराष्ट्र यामुळे श्रीमती गांधी व पर्यायाने पंतप्रधान नेहरू यांच्याबद्दलही कृतज्ञ असेल आणि श्री. चव्हाणांना धन्यवाद देईल.''[२३] असे मत दै. पुढारीनी व्यक्त केले होते. यावरून यशवंतराव चव्हाण यांच्या मनात नेहरू घराणेविषयक जो कृतज्ञता भाव होता तो प्रकट होतो. चव्हाण यांनी पंडित नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्याविषयी प्रकट केलेला हा आदरभाव त्यांनी शेवटपर्यंत जोपासला होता. हे त्यांचे वेगळेपण येथे नमूद केले पाहिजे.

### ३.१.१२ महाराष्ट्र राज्याचे स्वागत

दै. 'पुढारी' या वृत्तपत्राने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे स्वागत केल्याचे दिसते. या संदर्भातील या वृत्तपत्राचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. २ एप्रिल १९६० च्या अग्रलेखात पुढारी भावी महाराष्ट्र राज्याचे स्वागत केले होते. ''नवीन महाराष्ट्र राज्याची स्थापना दिनांक १ मे १९६० रोजी होणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मदिन असल्याने त्याला जोडून हा सोहळा केला जावा, ही सूचना सर्वांनी मान्य केली. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे मुंबईतील जाहीर सभेत भाषण करताना महाराष्ट्र राज्याचे उद्‌घाटन करतील आणि रात्री राजभवनावर नवीन महाराष्ट्र राज्याचा मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा होईल, कोकणवासीय व इतर जनतेतर्फे मुंबईत नामदार यशवंतराव चव्हाण यांचा सत्कार झाला. सत्कारात बोलताना

नामदार चव्हाण म्हणाले, 'केवळ मुंबई नव्हे तर जिल्ह्यांच्या शहरात आणि प्रत्येक खेड्यात दिवाळीप्रमाणे हा उत्सव साजरा करावा शिवाय महाराष्ट्राची राष्ट्रप्रेमाची आणि बंधुभावाची शिकवण व संयुक्त महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण उद्धार याबाबतीत भाषणे घडवून आणणे, हेही आम्हास इष्ट व आवश्यक वाटते.''[२४] संयुक्त महाराष्ट्र राज्यनिर्मितीचे स्वप्न अखेर खरे ठरले. समितीच्या चळवळीकडे पंतप्रधान पंडित नेहरू आणि काँग्रेस या दोघांनाही विनंती मान्य करावी लागली. त्याप्रमाणे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. या प्रसंगी झालेल्या अग्रलेखात दैनिक 'पुढारी'ने खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते.'' महाराष्ट्र जन्माला आला ऐतिहासिक आणि भौगोलिक सत्य प्रतिष्ठित झाले. भारताच्या राजकीय क्षितिजावर एक नवीन तारा उदयाला आला आहे. मराठी माणसाच्या दृष्टीने ही घटना विलक्षणीय आहे. महाराष्ट्राची स्थापना ही भौगोलिक बाब आहे. महाराष्ट्राची स्थापना ही ऐतिहासिक घटना आहे. इतिहासात आज महाराष्ट्राने जो तेजस्वी कालखंड निर्माण केला त्याच तेजाच्या पार्श्वभूमीवर आजचा महाराष्ट्र प्रस्थापित आहे. या नव्या महाराष्ट्र राज्याचे सूत्रधार मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील कूट प्रश्न अचूक हेरले. महाराष्ट्राच्या नाडीचे ठोके इतके अचूक मोजणारा नेता महाराष्ट्राला लाभला ही महाराष्ट्राच्या दृष्टीने फार भाग्याची गोष्ट आहे.''[२५] या अभिप्रायावरून स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्याचा आनंद पुढारीलाही कसा झाला होता हे त्यांनी अग्रलेखातून लिहिलेल्या शब्दावरून प्रतिपादीत होते. हे यश महाराष्ट्र एकीचे होते. निःस्वार्थी नेत्यांच्या प्रेरणेतून आकाराला आलेल्या जनआंदोलनाचे होते. संयुक्त महाराष्ट्र लढ्यासाठी व मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती व्हावी म्हणून यासाठी अनेकांनी

आत्मबलिदान करून, महाराष्ट्राची आपल्या रक्तातून निर्मिती केली. हाच खरा १ मे १९६० सोनियाचा दिवस म्हणून ओळखला जातो. म्हणून आपण अभिमानाने सांगू शकतो की, मुंबईसह महाराष्ट्र माझा आहे. अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राचा लढा संपला आणि मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या लोकलढ्यामधील जनचळवळ सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे आणि संपूर्ण जागृतीचे श्रेय दैनिक 'पुढारी' या वृत्तात्राकडे जाते.

## ३.२ दैनिक 'प्रभात'

दैनिक 'प्रभात' या वृत्तपत्राचे मालक संपादक वालचंद रामचंद्र कोठारी होते. यांचा ''जन्म १३ सप्टेंबर १९८२ रोजी माढा तालुक्यातील बावी या खेडेगावी झाला.''[२६] आपल्या आडनावामागे गावाचे नाव देण्याची पद्धत महाराष्ट्रात प्रचलित आहे. ही पद्धत कोठारी कुटुंबामध्येही होती. बावी गावी जन्म झाल्यामुळे बावी गावचे कोठारी म्हणून त्यांना बावीकर कोठारी या नावानेही ओळखले जाई. त्यांचे मूळ गाव गुजरातमधील हिंमतनगर जिल्ह्यातील साबळी होते. त्यांचे कुटुंब काही पिढ्यांपूर्वी गुजरातहून स्थलांतर करून महाराष्ट्रातील बावीसारख्या लहान खेड्यात स्थायिक झाले. ''त्यांचा दिगंबर जैन दशा गुजराती समाज महाराष्ट्रात अल्पसंख्याक असून, सर्वत्र विखुरलेला होता.''[२७] अशा जैन समाजात जन्माला येऊन सुद्धा कोठारी हे महाराष्ट्र जीवनाशी एकरूप होते. तसेच त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत उडी घेऊन महाराष्ट्र संस्कृतीचे जतनही केले. वा. रा. कोठारींच्या वडिलांचे नाव रामचंद्र अबाचंद कोठारी व आईचे नाव जमनाबाई कोठारी असे होते. कोठारीचा जन्म, बालपण व शिक्षण

या बाबींचा विचार केला असता त्यांची पत्रकारिता कशी विकसित झाली ते स्पष्ट होते. पत्रकाराला मिळणारे शिक्षण हे त्याच्या जीवनावर संस्कार करणारे असते, हे लक्षात घेऊन वा. रा. कोठारी यांच्या शैक्षणिक वाटचालीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

### ३.२.१ शिक्षण

वा. रा. कोठारी यांचे शिक्षण हे प्रतिकूल परिस्थितीत झाले, पण त्यांनी चार भिंतीतील शिक्षणापेक्षा समाज शिक्षणावर अधिक भर दिला आणि त्यासाठी पत्रकारितेचे सारखे शिवधनुष्य उचलले. आपले मामा शिवलाल मुकुंदचंद गांधी यांचेकडे राहून वा. रा. कोठारी यांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पंढरपूर येथे केले. ''तेथील व्हिक्टोरिया ज्युबिली हायस्कूलमधून १९०८ मध्ये मॅट्रिक परीक्षा पास झाले.''[२८] पंढरपूर येथे शिकल्यामुळे त्यांच्या मनावर महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा प्रभाव पडला आणि ते महाराष्ट्राचे पुरस्कर्ते बनले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्या वेळी मुंबईतील ताडदेव येथील गुमानजी जैन बोर्डिंग हाउस या वसतिगृहात ते राहत होते. जुन्या आठवणी या स्वलिखित पुस्तकात ते लिहितात, 'मी आर्ट्स कोर्सची पहिली दोन वर्षे विल्सन कॉलेजात काढली. ''किंबहुना दीडच वर्ष इंटेरची दुसरी टर्म मी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये काढली.'' [२९] अशा प्रकारे वा. रा. कोठारी यांनी विविध शहरात आपले शिक्षण पूर्ण केल्यामुळे त्यांच्या मनावर महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या पाऊलखुणा वाढत गेल्या. यानंतर १९१२ मध्ये पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण

झाले. बी.ए.च्या वार्षिक परीक्षेवेळी पूर्वी तोंडी परीक्षा असे त्यांना सर्वच पेपरमधून उत्कृष्ट मार्क होते. पण तोंडी परीक्षेच्या वेळी पुण्यात खूप पाऊस पडत होता. ज्या हॉलमध्ये त्यांची तोंडी परीक्षा सुरू होती तेथे पत्रा होता. पावसाच्या थेंबाच्या आवाजामुळे त्यांना एक प्रश्नच ऐकू आला नाही. त्यांनी उत्तर चुकीचे दिले. परीक्षकांनी त्यांचे मार्क कमी केले हे त्यांना समजल्यावरून ते वरपर्यंत गेले व वरिष्ठांना वस्तुस्थिती सांगितली परत त्यांची तोंडी परीक्षा घेतली गेली. त्यांनी ते मार्क मिळविलेच; परंतु आपल्यामधील आत्मविश्वासाची आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती जोपासली. अशा स्वरूपाच्या घटनांमधून पुढील काळात पत्रकारितेच्या क्षेत्रात असामान्य भरारी घेतली. प्रभात वृत्तपत्र काढून मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात एक अभूतपूर्व असा प्रयोग केला. त्यांचे हे वृत्तपत्र विद्येच्या माहेरघरी म्हणजे पुणेनगरीत आजही चालू आहे. या वृत्तपत्राने केवळ पुण्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर आपली छाप टाकली आहे. या वृत्तपत्रात पुण्यातील समकालीन जीवन तसेच महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन इत्यादी पैलूंचे प्रतिबिंब उमटले आहे. दैनिक प्रभात या वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये आपला सहभाग कसा नोंदविला, चळवळीला हातभार कसा लावला, वृत्तपत्रांची भूमिका काय होती याचा मागोवा खालीलप्रमाणे–

### ३.२.२ वा. रा. कोठारी यांची संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील भूमिका

संयुक्त महाराष्ट्र आंदोलन पाच वर्षे सुरू होते. आंदोलनामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांची संख्याही मोठी होती. अनेक वृत्तपत्रांनी त्यात समावेश होता. त्यामध्ये वा. रा. कोठारींच्या प्रभात या वृत्तपत्राचा समावेश करावा लागतो.

वा.रा.कोठारी यांनी आपल्या दैनिकात संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये योगदान दिले होते. त्यांपैकी संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी आपल्या प्रभात (१९३८) या वृत्तपत्रातून त्यांनी सर्वंकष व विपुल लेखन केले. याबाबत त्यांनी 'प्रभात' वृत्तपत्रामध्ये सल्लागार म्हणून काम करणारे श. वि. राशिनकर म्हणतात, ''वा. रा. कोठारी यांनी प्रभातकार कोठारी म्हणून लौकिक संपादन केला. हा लौकिक त्यांच्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाने सार्थ ठरला. वा. रा. कोठारींच्या जीवनातील सर्वांत मोठी घटना म्हणून या चळवळीकडे पहावे लागते.''[३०] यावरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत वा. रा. कोठारी यांनी तनमनधन अर्पण केल्याचे दिसून येते. सुरुवातीच्या काळात वा. रा. कोठारी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनास अनुकूल नव्हते. त्यांच्या मते भाषावार प्रांतरचनेपेक्षा राष्ट्रापुढील इतर अनेक समस्या सोडविण्यासाठी आपले सारे सामर्थ्य व कौशल्य खर्ची खालावे. दार, जे.व्ही.पी आणि फझलअली या आयोगाच्या अहवालानंतर महाराष्ट्रावर झालेला अन्याय लक्षात येताच त्यांच्या भूमिकेत विलक्षण फरक पडला. 'प्रभात' या वृत्तपत्राच्या माध्यमातून या चळवळीसाठी सहभाग घेण्याचे स्पष्टीकरण देताना ते लिहितात. ज्यांची राजधानी मुंबई आहे असा मराठी भाषा बोलणाऱ्याचा प्रांत तयार झाला असता तर मी हे आंदोलन हाती घेतले नसते. किंबहुना असे आंदोलन झालेच नसते. परंतु चक्रे भलत्याच दिशेने फिरू लागली. महाराष्ट्राची सर्व बाजूंनी लांडगेतोड करण्यात येऊ लागली. असे स्पष्ट करून वा. रा. कोठारी यांनी सत्यावर भेदक प्रकाश टाकला व पुढे ते असे नमूद करतात, ''बेळगाव, कारवार वगैरे मराठी भाषिक भाग कर्नाटकाला द्यावयाचा, काही गुजरातेत घालवायचा व उरलेला महाराष्ट्र सुद्धा जेणेकरून त्यावर गुजराती धनिकशहांचे वर्चस्व राहील अशा चौकटीत बसवावयाचा

हा विचार प्रबळ झाला. पाच वर्षापर्यंत मुंबई शहर केंद्रशासित याचा अर्थ असा की, कोणीतरी कमिशनर दिल्ली सरकारने नेमावयाचा व त्याने मुंबईची सारी व्यवस्था पाहायची, म्हणजे म्युनिसिपल कारभार सुद्धा नाही. मग विधानसभा, लोकांनी ती निवडणे, लोकशाही उपभोगणे वगैरे गोष्टी दूरच्या. अर्थात हा मुंबईच्या नागरिकांवर आणि मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाणार असल्याने महाराष्ट्रावर मोठा अन्याय होता. या अन्यायाच्या निराकरणासाठी मला संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी व्हावे लागले.''[३१] या त्यांच्या भूमिकेवरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीविषयी त्यांच्या मनात किती आदर आणि विश्वास होता हे प्रकट होते. या आदर आणि विश्वासामुळेच त्यांनी सक्रिय संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला आणि आपल्या वृत्तपत्रातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा पुरस्कारही केला याबाबतची संयुक्त चळवळीतील त्यांच्या योगदानाची माहिती त्या काळातील दैनिक प्रभातचे अंक आणि फाईल्स अभ्यासल्यानंतरच आपल्या लक्षात येते.

वर्ष १९५५ मध्ये या चळवळीची पहिली बैठक सोलापूर येथे झाली. तद्‌नंतर 'प्रभात'च्या माध्यमातून महाराष्ट्रावर झालेला अन्याय निवारण्यासाठी वा. रा. कोठारींनी निर्भीडपणे लढा दिला. त्यांना या चळवळीत सहभाग होण्यासाठी स्वतःहाचा कोणताही वैयक्तिक अथवा राजकीय हेतू महत्त्वाकांक्षा नव्हती, तर महाराष्ट्रावरील अन्याय दूर व्हावा, या एकाच हेतूने वा. रा. कोठारी या चळवळीकडे ओढले गेले होते. मुंबई हा या चळवळीचा केंद्रबिंदू होता. मुंबई महाराष्ट्रातच असावी की केंद्रशासित की, गुजरातला द्यावी यासाठीही रस्सीखेच चालू होती. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्र ही भूमिका संयुक्त महाराष्ट्र समितीने घेतली होती. या भूमिकेचा पाठपुरावा करताना 'कोठारी' लिहितात,

''संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न म्हणजे केवळ भाषिक राज्याचा प्रश्न नसून तो लोकशाहीचा व समाजवादाचा प्रश्न आहे. आपल्याला जर लढा यशस्वी करावयाचा असेल तर त्याचे लोकशाही अधिष्ठान व्यापक व खंबीर बनविले पाहिजे. मराठी जनतेवर झालेला अन्याय ताबडतोब किंवा नजीकच्या भविष्यकाळात दूर होण्याचा संभव दिसत नाही. किंबहुना पुढच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेसचा सर्व मराठी मुलखात पराभव केल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य होणे कठीणच आहे, असे आम्हास वाटते. यासाठी जनतेला लागत व संघटित केले पाहिजे.''[३२] असे आपले परखड मत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी विषयी त्यांनी व्यक्त केले होते. महाराष्ट्रातील बहुतेक वृत्तपत्रांची हीच भूमिका होती. काँग्रेस पक्षाला वठणीवर आणल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राचा होणार नाही, हे वा. रा. कोठारी यांनी ओळखले होते. त्यांच्या विचारांचे दूरदर्शी प्रतिबिंब प्रभात मधील केलेल्या लेखनातून उमटलेले आहे. दै. प्रभातामधून आलेले अग्रलेख आणि इतर अभ्यासल्यावर त्यांचा आत्मविश्वास व संकल्पना किती दूर दृष्टीची होती हे स्पष्ट होते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची बाजू मांडत असताना ते लिहितात, ''लोकशाही रुजवायची याचा अर्थ लोकांनी आपले राज्यकर्ते निवडायचे, पण राज्यकर्त्यांनी लोकमत लक्षात घेऊन राज्यकारभार चालवायचा. जात, वंश, धर्म, याहूनही भाषेचे बंधन प्रबळ आहे. यासाठी एक भाषा बोलणारे लोक एकत्र येणे आवश्यक आहे. महाराष्ट्रीयांच्या संस्कृतीचे उगमस्थान व स्फूर्तिस्थान ग्रंथसंपत्ती हेच आहे. त्या संस्कृतीची जोपासना व आविष्कृती हे सारे मराठी भाषिक एकत्र आल्यानेच होणार आहे. म्हणूनच वेगवेगळ्या प्रांतात अथवा राज्यात विभागलेला महाराष्ट्र एकत्र आणण्याचा उद्देश दृष्टीपुढे ठेवला. संयुक्त महाराष्ट्र पुरस्कर्ते कार्य करीत आहेत.''[३३] कोठारी यांनी आपल्या लेखनातून

अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राची अनेक वेळेलाही केल्याचे आपणास दिसते. वकिली केली आहे. त्यामागे त्यांचा कोणताही स्वार्थ नव्हता उलट त्यात सेवा व समर्पण हीच भावना ठेवून या भावनेने ते लिहीत होते. संयुक्त महाराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र संस्कृतीचे रक्षण करणारी व्यवस्था असेल, असा कोठारी यांच्या लेखनाचा सूर होता. त्यांनी आपल्या वृत्तपत्रातील वार्ता, लेख, अग्रलेख यामधून आपल्या भूमिका प्रभावीपणे जनतेसमोर मांडल्या आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी जनमानसाची मने प्रज्ज्वलित केली.

वा. रा. कोठारी यांची एक स्वतंत्र लेखनशैली होती ते आपले अग्रलेख मालिका यावरून लिहीत. त्यांच्या अग्रलेखाचे बऱ्याच वेळा दहा ते पंधरा भाग असत. एखादा मुद्दा घ्यावयाचा व तो सलगपणे लावून धरवयाचा ही त्यांची नवी पद्धत असे. विचारांचे सातत्य, आग्रह आणि परखड मत प्रतिपादन, बिनतोड युक्तिवाद यामुळे त्यांचा अग्रलेख एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान घेऊन प्रकट होत असे. अनेक मराठी वाचक त्यांच्या या सलग विचार करण्याच्या पद्धतीचे कौतुक करत असत. एखाद्या प्रश्नावर 'प्रभात' काय म्हणतो एवढी दखल पुण्यासारख्या सुसंस्कृत मध्यमवर्गीय शहरातील लोकांनी घ्यावी, यातच 'प्रभात'चे आणि ते मोठ्या खुबीने चालविणाऱ्याचे मोठेपण यामधून दिसून येते.

### ३.२.३ महाराष्ट्र पंचक

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात महाराष्ट्र पंचक एकत्र आणण्यात वा. रा. कोठारींचा मोठा सहभाग होता. महाराष्ट्रावर अन्याय करून द्विभाषिक लादले, याबद्दल वा.रा.कोठारींनी सुरुवातीला एकाकी झुंज दिली आणि आपल्या 'प्रभात'मधून सरकारला

विरोध केला. ''एकाकी कार्य करण्यापेक्षा सेनापती बापट, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, भाई माधवराव बागल, आचार्य अत्रे आणि स्वतः वा. रा. कोठारी एकत्र आले.''[३४] हे सव ेजण पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अग्रभागी राहिले व त्यांनी महाराष्ट्राचा ऐक्यभाव जोपासण्यासाठी संघर्ष केला. त्यालाच महाराष्ट्र पंचक म्हणून ओळखले जाई. या पंचकाच्या साहाय्याने चळवळीस मार्गदर्शन करणे, प्रसंगी संयुक्त महाराष्ट्र समितीतील घट पक्षांच्या नेत्यांची मते आणि मतांतरे याबाबत संबंधितांना जाहीर जाणीव करून देण,े असे दुहेरी काम वा. रा. कोठारींनी समर्थपणे केले. या पाच अपक्ष नेत्यांनी केवळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र ह्या एकभाषी राज्याच्या निर्मितीचा ध्यास घेतला होता. त्यांच्यापैकी कोणालाही अधिकारपदाचा मोह नव्हता. पक्षनिष्ठा की महाराष्ट्रनिष्ठा असा पेच चळवळीच्या अन्य नेत्यांना पडत असे. तो हे पाच जण अपक्ष असल्यामुळे त्यांना पडत नसे. या संदर्भात प्रभातचे माजी संपादक माधव खंडकर लिहितात, ''महाराष्ट्र पंचकाने महारष्ट्र समितीच्या पदाधिकारावर न जाता समितीला मार्गदर्शन केले. या पंचकामुळे महाराष्ट्र समितीच्या कार्यास वजनही प्राप्त झाले.''[३५] अशा पंचकापैकी वा.रा.कोठारी हे एक प्रमुख होते हे आपल्याला विसरताच येणार नाही. कोठारी हे महाराष्ट्रातील पाच प्रमुख संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांपैकी होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला उचलून धरले आणि तिच्यासाठी आपल्या प्रभात या वृत्तपत्रातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी पोषक वातावरण तयार केले. वा. रा. कोठारी हे चळवळीचे एक प्रमुख समर्थक असल्यामुळे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विविध आंदोलनात सक्रियपणे सहभाग घेतला व लढा यशस्वी होईपर्यंत निर्णायकपणे संघर्ष करण्याचा पवित्रा घेतला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये प्रमुख पाच पक्ष होते. या संदर्भात य. दि. फडके लिहितात, संयुक्त महाराष्ट्र समितीत पाच प्रमुख घटक पक्ष होते. त्यात प्रामुख्याने कम्युनिष्ट पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, डॉ. राममनोहर लोहिया यांच्या पुढाकाराने १९५५ च्या अखेरीस स्थापन झालेला समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आणि हिंदू महासभा या पाच पक्षांचा उल्लेख आचार्य अत्रे पाच पांडवांचा पक्ष अशा शब्दांत करीत असले, तरी त्यांच्यामध्ये मात्रभाव वाढण्याऐवजी भाऊबंदकीच जास्त माजत गेली. ''१ मे १९५६ रोजी सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, माधवराव बागल, वा. रा. कोठारी आणि प्र. के. अत्रे यांनी संयुुत पत्रक काढून ह्या पाच विरोधी पक्षांच्या आघाडीचे रूपांतर एका व्यापक लोकशाही पक्षांची स्थापना करण्यात व्हावे, असे आवाहन केले. या पक्षात सर्व पुरोगामी विचाराच्या स्वतंत्र व्यक्ती यांचा समावेश करण्यात यावा, असे ह्या पाच अपक्ष नेत्यांचे म्हणणे होते.''[३६] म्हणूनच या सर्वांनी एकत्रितपणे येऊन एक नवी आघाडी स्थापन केली. त्यामुळेच महाराष्ट्राला एक नवीन नेतृत्व मिळाले. यामध्ये य. दि. फडके यांनी मांडलेले हे सूत्र महाराष्ट्र पंचकाच्या भूमिकेचे रास्त विश्लेषण करणारे आहे. त्यांनी समकालीन महाराष्ट्राच्या जीवनातील या पाच नेत्यांचे स्थान स्पष्ट केले आहे व त्यांची रोखठोक भूमिका प्रामुख्याने मांडलेली आहे.

या पाच विरोधी पक्षाबाबत आचार्य अत्रे यांचे वर्णन अत्यंत मार्मिकपणाचे आहे. त्यांनी पाच विरोधी पक्ष आणि पाच नेते यांचे वर्णन पांडवांचा पक्ष असे सार्थपणे केले होते. त्यामुळे त्यांना यातील लढाई पांडव आणि कौरवांची वाटते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील महाभारत समजून घेत असताना हे कौरव आणि पांडव यांच्यातील युद्ध

कोणत्या निर्णायक अवस्थेला पोहोचले होते याची कल्पना आपणास येते.

### ३.२.४ मुंबईचा प्रश्न

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोरारजींच्या तावडीतून आणि गुजरातच्या विळख्यातून मुंबईची सुटका करणे, हा एक येथे महत्त्वाचा मुद्दा होय. या प्रश्नावर सुद्धा वा.रा. कोठारी यांनी निर्भीड भूमिका घेतली. त्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे असाच आग्रह धरला होता. या आग्रहाचे पडसाद प्रभातच्या अंकातून पडल्याचे आपणास दिसून येतात.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात मुंबई कोणाची या प्रश्नावर वा.रा.कोठारींनी वेगळी भूमिका घेतली सडेतोड टीकाही केली. सुरुवातीला गुजराती मंडळीची मुंबई हे सहराज्य असावे, अशी मागणी होती. ''मुंबई स्वतंत्र झाल्यास मुंबई विधिमंडळात बहुमत मिळविणे व मर्जीप्रमाणे कारभार करणे हा त्यातील उद्देश होता. परंतु मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करावा, असा ठराव होताच मोरारजी व गुजराती भांडवलदार गडबडले व त्यांनी मुंबई केंद्रशासित राज्य करावे, अशी मागणी केंद्राकडे केली.''[३७] याला विरोध करण्यासाठी वा.रा.कोठारी यांच्या सारख्या विचारवंतांनी पुढाकार घेतला, गुजराती लोकांच्या रक्ताने व अश्रूंनी मुंबईची वाढ झाली आहे, गुजराती समाज मुंबईचा आत्मा आहे. मुंबई शहर हे तर महाराष्ट्रात गेले तर गुजराती समाजाला कोणतेही स्थान असणार नाही. म्हणून त्यांनी केंद्रशासित मुंबईची मागणी केली. या संदर्भात १ मे १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यसभेत भाषण झाले, त्यात ते म्हणाले, ''मुंबई शहर आमचे आहे, असा महाराष्ट्रीयन दावा करीत असताना आमचे गुजराती मित्र कोणत्या

आधारावर मुंबई शहरावर हक्क सांगतात, हे मला माहीत नाही. ते करीत असलेला दावा हा एक प्रकारचा सुविधाकार आहे (जज्ममेंट) म्हणता येईल, सुविधाकारांसबंधी भारतातील कायद्याने चिरभोग सुविधाकार, खाजगी सुविधाकार, प्रवेशाचा सुविधाकार वगैरे प्रकारांना मान्यता दिली आहे.''[३८] या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणामधून ते स्वतःसुद्धा मुंबई महाराष्ट्राकडेच असावी याच विचाराचे होते आणि त्यांचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीस पाठिंबा होता असे दिसते.

गुजराती मित्रांनी मुंबई शहरावर आपला हक्क सांगितला होता. या गुजराती भांडवलदाराच्या या मागणीवर भाष्य करताना वा. रा. कोठारी म्हणतात, ''पाच वर्षे मुंबई केंद्रशासित ठेवण्यामागे गुजराती भांडवलदाराचा वेगळा डाव आहे. या पाच वर्षांच्या हुकूमशाहीत ते लोक अशा काही कारवाया करतील की, ज्यायोगे मुंबईतील मराठी लोकसंख्या बऱ्याच अंशाने कमी व्हावी व उरलेले महाराष्ट्रीय नरम यावेत''[३९] मुंबई केंद्रशासित करण्याची गुजराती लोकांची मागणी मान्य करावी व त्यानंतर गुजरात, महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या सर्वांचे एक मोठे द्विभाषिक राज्य करावे अशी मागणी पुढे आली. परंतु गुजराती लोकांचा त्यास विरोध होता. कारण गुजराती लोकसंख्या दोन कोटी, तर महाराष्ट्राची लोकसंख्या साडेतीन कोटी होती. त्यामुळे ही बाब त्यांना पटण्यासारखी नव्हती, तसेच महाराष्ट्रातूनही त्यास फारसा पाठिंबा मिळणार नाही याची त्यांना जाणीव होती.

### ३.२.५ सरकारच्या भूमिकेवर वा. रा. कोठारींची टीका

३० ऑगस्ट १९५६ रोजी द्विभाषिक महाराष्ट्र राज्याचा ठराव मंजूर होऊन

नोव्हेंबर १९५६ मध्ये यशवंतराव चव्हाण नव्या द्विभाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले, या वेळी केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार येथे काँग्रेस पक्षाचे सरकार असल्याने संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी काँग्रेसची आहे, असे वा.रा.कोठारींना वाटत असे, पण प्रत्यक्ष हा प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेसकडून दिरंगाई होत आहे असे ठाम बनल्याने ते लिहितात, ''या प्रकरणी मुख्य जबाबदारी काँग्रेसची आहे इतर सर्वांनी कंबर कसली व काँग्रेसने हातपाय गाळले तर काही सुद्धा होणार नाही''[४०] काँग्रेस सरकारच्या श्रेष्ठींनी महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांचे पाणी जोखले होते. या आंदोलनात केंद्रीय काँग्रेस ने आपल्यावर नाराज होतील म्हणून महाराष्ट्रीय नेते कातडी बचावाची भूमिका स्वीकारीत होते. त्यामुळे अखिल भारतीय काँग्रेसची आज्ञा पाळली पाहिजे, असा ठराव जेव्हा महाराष्ट्रातील काँग्रेसने संमत केला तेव्हा वा.रा.कोठारी यांनी त्याचा समाचार अत्यंत कठोर टीकेतून पुढील प्रमाणे घेतला, ''राजकारणात मतदारांना जितके महत्त्व आहे तितके दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला नाही, राजकीय पक्ष सत्तेसाठी हपापलेले असतात, पण सत्तेचे उगमस्थान लोकांच्या मतदानाच्या अधिकारात आहे, उद्या जर काँग्रेस श्रेष्ठींना दिसून आले की, मुंबईबाबतचा निर्णय जर आपण फिरविला नाही तर, महाराष्ट्रातून कॉग्रेस नष्ट होऊन आपला विरोधी हट्ट क्षणभरही पुढे चालविणार नाहीत, म्हणूनच आम्ही हे प्रथमपासून सांगत आलो आहोत, की महाराष्ट्रातल्या काँग्रेस पक्षाने या कामी पुढाकार घ्यावा व श्रेष्ठींना निर्धाराने कळवावे की, महाराष्ट्रीयांची मागणी मान्य झाली नाही तर आम्ही सर्व जण काँग्रेसचा त्याग करू त्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेस औषधालाही शिल्लक राहणार नाही, याची दक्षता घेऊ. एवढी इच्छा जर काँग्रेसवाल्यांनी दाखवली तर आज महाराष्ट्रीयांचे उद्दिष्ट

यापूर्वीच तडीस गेले असते, परंतु लोकांनी काँग्रेस श्रेष्ठींपुढे अत्यंत नरमाईचे व बोटचेपे व स्वाभिमानशून्य धोरण स्वीकारून ते स्वस्थ बसले.''[४१] यावरून वृत्तपत्रांनी जरी जनमताचा रेटा उभा करत असले तरी देखील बऱ्याच वेळा सत्ताधारी पक्ष कसा वागतो यावरून राजकारण ठरत असते. मुंबईच्या प्रश्नावर काँग्रेस पक्षाने घेतलेल्या भूमिकेवर अशा प्रकारे वारंवार टीका होत दोन्हीकडे काँग्रेस पक्षाची सत्ता असतानाही मुंबईच्या प्रश्नावर काँग्रेस पक्षानी घेतलेली निष्क्रिय भूमिका वा. रा. कोठारी यांना मुळीच आवडली नाही, म्हणून त्यांनी कठोर टीका करून तिजचा समाचार घेतला यावरून त्यांची आंदोलनातील भूमिका किती स्पष्ट होती हे सिद्ध होते.

### ३.२.६ मुंबईतील गोळीबार

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रमुख केंद्र मुंबई होते. या चळवळीसाठी मुंबईत शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्या आंदोलकांवर मोरारजीभाई देसाई यांनी गोळीबार करून १०६ जणांना यमसदनास पाठविले. या घटनेवर भाष्य करताना वा. रा. कोठारी म्हणतात, ''सभेत पुरस्कार करणाऱ्या मुंबईतील शेकडो पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना स्थानबद्ध केले, आणि मग प्रक्षोभाचे निमित्त करून शहरभर हजारो गोळीबार केले. शेकडो मराठी माणसे यमसदनास पाठविली. त्याप्रमाणे केवळ महाराष्ट्रातच लोकशाहीचाच नव्हे तर सामान्य मानवतेचा व सभ्यतेचाही खून करण्यात आला आहे. पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले.''[४२] त्यानंतर मोरारजींच्या या गोळीबाराच्या कृत्याचा वा.रा.कोठारींनी जाहीरपणे आपल्या लिखाणातून निषेध केला. मुंदडा प्रकरणात न्या. छगनलालकडून दोषी ठरविल्या गेलेल्या टी.टी.कृष्णमचारी यांच्या जागी मोरारजी

देसाई यांची केंद्रीय अर्थमंत्री म्हणून १९५८ मध्ये नेमणूक होताच, १४ मार्च १९५८ रोजीच्या 'प्रभात'च्या अंकात गोळीबार मंत्री मोरारजींच्या हाती भारताची अर्थसूत्रे या शीर्षकाखाली वा.रा.कोठारींनी एक अग्रलेख लिहिला त्यामध्ये ते लिहितात, ''नवी दिल्ली दि. : १३ मुंबईमध्ये १०५ जणांना गोळ्या घालून यमसदनास पाठविणारे व द्विभाषिक लादण्याची कारवाई करून लोकशाहीचा खून करणारे मुंबईचे माजी मुख्यमंत्री श्री.मोरारजी देसाई यांना भारत सरकारमधील अत्यंत महत्त्वाचे अर्थ खाते देण्यात आले. पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांनी लोकशाहीचा सूड घेतला आणि मोरारजींना त्यांच्या जनसेवेचे पारितोषिक दिले.''[४३] टी. टी. कृष्णमचारी यांच्या राजीनाम्यामुळे रिकामे झालेले अर्थमंत्र्याचे खाते श्री. मोरारजी देसाई यांना कसलाही अनुभव नसतानाही देण्यात आले होते. या नेमणुकीचे वैशिष्ट्य असे की, या विषयीची मोरारजीभाईंना बिलकूल माहिती नव्हती. दोन सव्वादोन वर्षांपूर्वी मुंबईत व इतरत्र जी असंतोषाची परिस्थिती निर्माण झाली तीत हजारो कामगार पुढाऱ्यांना आधीच अटक करून त्यात ताज्या असंतोषाची भर घातली, व या ताज्या असंतोषाचे निमित्त करून केवळ सहा दिवसांत पाचशे गोळीबार केले. त्यांना राज्य कारभारातून जो काय बहुमूल्य अनुभव मिळाला तो हाच. ''अर्थमंत्री या नात्याने काम करण्यास कधी इतका नालायक इसम पुढे आला नसेल, असल्या इसमाला हे खाते दिले म्हणून पंतप्रधान पंडित नेहरू यांची तारीफ करावी की, या खात्याचा भार वाहण्यास पुढे आल्याबद्दल मोरारजीची तारीफ करावी हेच कळत नाही, कारणे काहीही असोत अर्थ खात्यातील ही नेमणूक राष्ट्राच्या हितसंबंधांना अपायकारक ठरल्यावाचून राहणार नाही.''[४४] चिंतामणराव देशमुख यांच्या राजीनाम्याची बातमी कळताच त्याची नोंद दै. प्रभातने अग्रलेखात घेऊन देशमुखांच्या

अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याच्या भूमिकेचे स्वागत आणि समर्थन करून ते लिहितात, ''मुंबईप्रकरणी अन्याय ईर्षेला बळी पडून नेहरूंनी (अर्थमंत्री) चिंतामणरावांसारख्या थोर व कर्तबगार सहकाऱ्याचे सहकार्य गमावले.''[४५] काँग्रेसच्या भूमिकवर अखेरपर्यंत मर्मस्थळी टीका करीत असताना संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविणे हे कर्तव्य काँग्रेसने पार पाडले पाहिजे, अशी आग्रहाची सूचना देण्यास वा.रा.कोठारी आणि दैनिक प्रभात कधीच विसरले नाहीत.

यावरून कोठारी हे वस्तुनिष्ठ भूमिका घेत होते आणि सत्य कटू असले तरी ते प्रभावीपणे मांडत होते, असे म्हणता येईल. कोठारी यांच्या भूमिकेचे आणि त्यांच्या परखड मत प्रतिपादनाचे वैशिष्ट्य लक्षात घेता असे दिसते की, त्यांनी मोरारजी देसाई यांच्या चुकांवर कठोर प्रहार केलेले होते आणि अशा अन्यायकारक सरकारला जागा दाखविण्याची भाषा त्यांनी मांडली होती असेच दिसून येते.

१९५७ मधील मुंबई राज्याच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या विरोधात एास एक उमेदवार उभा करण्याचे ठरले होते. त्यामुळे समितीला १३० पैकी १०० जागा मिळाल्या पण विदर्भ–मराठवाड्यात माघार घ्यावी लागली. त्यामुळे काँग्रेस पुन्हा सत्तेवर आली. ''या अपयशाचे कारण एस.एम.चे मौन असे जाहीरपणे वा. रा. कोठारींनी लिहिले.''[४६] आपल्या अपयशाची कारणमीमांसा करून त्यांच्या हातून झालेल्या चुका आणि त्यामुळे झालेली हानी यांचे विश्लेषण नेमकेपणाने केले. या निवडणुकीच्या निमित्ताने कोठारींना पत्रकार व समितीच्या मंडळींनी आपले पाय जमिनीत रोवून आपले लक्ष फक्त लक्ष्यावर ठेवले पाहिजे, याचे उत्कृष्ट उदाहरण पत्रकारितेतून घालून दिले. या संदर्भात विनोबाजींच्या वृत्तीवर त्यांनी टीका केले ते म्हणतात, विनोबाजीचा हा दौरा

म्हणजे काँग्रेसची घडी महाराष्ट्रात निट बसावी यासाठी सोडलेले ब्रम्हास्त्र आहे. कॉग्रेसचे जुलूम व महाराष्ट्रात बस्तान मराठी मुलखात बसविण्याचा जो उपक्रम विनोबांच्याद्वारे होत आहे तो हाणून पाडला पाहिजे. भूदानाचार्य विनोबाजी हे पंडित नेहरूंचे व नामदार चव्हाणांचे दोस्त म्हणून महाराष्ट्रात आले आहेत. आणि त्या वृत्तीनेच बोलणार व वागणार आहेत मग त्यांच्याकडून काय अपेक्षा करावी, अशी सडेतोड टीका केली.

कोठारी यांनी अशा प्रकारे विनोबासह अनेक काँग्रेसधार्जिण्या विचारवंतांवर तोफ डागल्याचे दिसून येते. कोठारी यांनी सरकारविरोधी ठाम भूमिका घेतल्यामुळे प्रभात पत्र केवळ पुण्यातच नव्हे तर पुण्याच्या बाहेर अनेक जिल्ह्यांतून व शहरांतून वाचले जाऊ लागले आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ ऐरणीवर आली असता या मुद्द्यावर 'प्रभात'कार कोठारी काय म्हणतात, ते समजावून घेण्याचा प्रयत्न मराठी वाचक आग्रहाने करू लागले होते.

### ३.२.७ हक्कभंग प्रकरण

गोवा मुक्तीसाठी सत्याग्रहपर्व सुरू असतानाच राज्य पुनर्रचना आयोग मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी धुडकावून लावील, ही शक्यता दिसू लागलीच मुंबईसह महाराष्ट्राच्या निर्मितीचा प्रश्न सोडविण्याची मुख्यतः जबाबदारी सत्तारूढ काँग्रेस पक्षाची होती. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या बोटचेपेपणा व धरसोडीचे धोरण आणि काँग्रेस श्रेष्ठींचा या मागणीला असलेला प्रखर विरोध लक्षात घेता विरोधी पक्षांनी एकजूट करून, प्रयत्न केले तरच हा प्रश्न सुटण्याची आशा होती. संयुक्त महाराष्ट्र समितीतील घटक पक्ष परस्परांत भांडून बखेडा माजवू लागले की, वा.रा.कोठारी या

ङ्कु टीर प्रवृत्तीवर प्रखर टीका करत असत. १९५७च्या निवडणुकीमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीने पुरस्कृत केलेल्या अनेक उमेदवारांना मोठा विजय मिळाला त्याचा लाभ समितीच्या आमदारांनी मुंबई राज्याच्या कायदेमंडळात अडवणुकीचे धोरण स्वीकारून आणि सरकारला पेचात धरावे असे कोठारी यांना वाटत होते. त्यामुळे १४ जून १९५७ रोजीच्या 'प्रभात'च्या अंकात 'प्रभात'कारांनी अग्रलेखात नमूद केले आहे. ''गिल्ला केला पाहिजे, कायदेमंडळाला मंडईचे अथवा मच्छी बाजाराचे स्वरूप आणून दिले पाहिजे, पाजीपणाचे वर्तन करणाऱ्याबरोबर पार्लमेंटरी अथवा दुसऱ्या कसल्याही शिष्टपणाची कसलीही तमा बाळगण्याची जरुरी नाही. अध्यक्षांचे रूलिंग धाब्यावर बसविले पाहिजेत, सभागृह सोडून जाण्याचा हुकमत ुतकारला पाहिजे.''[४७] दै.प्रभातमधील अशा प्रकारचे वा. रा.कोठारी यांचे लिखाण संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या दिशेने किती जहाल स्वरूपाचे होते याची प्रचीती येते. म्हणूनच त्यांच्या या प्रभातमधील अग्रलेखाची सरकारने दखल घेऊन प्रभात मधील अग्रलेखाबाबतचे प्रकरण हक्कभंग समितीकडे सोपविण्यात आले. सभागृहाची अप्रतिष्ठा होईल असे वर्तन करण्यास वा. रा. कोठारी चिथावणी देत आहेत असाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. सतारूढ काँग्रेस पक्षाच्या नेत्यानी तर हक्कभंग समितीने कोठारी यांना बिनशर्त माफी मागावयास लावावी आणि स्वखर्चाने ती बातमी सर्व वर्तमानपत्रातून छापावी अशी सूचना केली. परंतु कोठारी डगमगले नाहीत. त्यांनी आपले म्हणणे रास्त असल्याचा निर्वाळा दिला. आपणही १९२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत विजयी होऊन मुंबई प्रांताच्या कायदे मंडळाचे सन्मानीय सदस्य होतो याची आठवणही त्यांनी काँग्रेस नेत्यांना करून दिली. वा. रा. कोठारी यांच्या अग्रलेखावरील वादाच्या निमित्ताने संयुक्त महाराष्ट्र समितीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले.

सभागृहातील कामकाजाचे यिम पाळावेत आणि त्याची प्रतिष्ठा सांभाळावी असे एस.एम.जोशींचे मत होते, तर समितीच्या आमदारांनी चढाईचे धोरण स्वीकारून कामकाज सुरळीत चालविणे अशक्य होईल अशी परिस्थिती निर्माण करावी असाच आग्रह कोठारींनी धरला होता. कोठारींना कडक ताकीद द्यावी, असा मुख्यमंत्री चव्हाणांनी ठराव मांडला तेव्हा कडक शब्द वगळावा, अशी एस. एम. जोशी यांनी उपसूचना मांडली ती चव्हाणांनी मान्य केली आणि २१० विरुद्ध ८६ मतांनी तो ठराव मंजूर झाला. यावरून असे स्पष्ट होते की, वा.रा. कोठारी यांच्या प्रभातमधील संयुक्त महाराष्ट्र निर्मिती संदर्भातील मताची सभागृहालाही नोंद घ्यावी लागली होती.

प्रभात पत्राने ठाम भूमिका घेऊन संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर सरकारची झोपच उडवून दिली होती असे म्हणता येईल. कोठारी हक्कभंग किंवा अन्य कोणत्याही तरतुदींना घाबरत नव्हते. त्यांनी शेवटपर्यंत आपला निर्भय बाणा कधीच सोडला नाही. महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण शपथ घेतली आहे व ती प्राणपणाने लढवून सिद्धीस नेऊ, असा प्रभात पत्राचा दावा होता व तो वा. रा. कोठारी यांनी करून दाखविला.

अशा प्रकारे दैनिक प्रभात या वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये बजावलेली ऐतिहासिक कामगिरी लक्षणीय ठरली होती. ‘मोडेल पण वाकणार नाही अशी दृढ बाणा ‘प्रभात’कार वा. रा. कोठारी यांनी ठाम भूमिका घेतली होती. त्यांनी काळाच्या पुढे जाऊन प्रभात या पत्राला अग्रेसर रूप दिले. म्हणूनच या वृत्तपत्राच्या ऐतिहासिक कार्याचे महत्त्व आधुनिक महाराष्ट्र कधीही विसरणार नाही. ‘प्रभात‘चे संपादक वा. रा. कोठारी हे संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करणाऱ्या पाच प्रमुख खंद्या वीरांपैकीच एक होते. या पत्राने समाज, संस्कृती ती व लोकहित जपण्याचा प्रयत्न करून महाराष्ट्र धर्म

पाळला, असेच म्हणावे लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबाबत आघाडीवर झुंजारपणे लढा दिल्यामुळे प्रभात या पत्राचे स्थान महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात भक्कम झाले असे म्हणता येईल. कोठारी यांची प्रदीर्घ लेखनाची तर्कसंगत युक्तिवाद करण्याची आणि निर्भीड व सडेतोड मते मांडण्याची परंपरा 'प्रभात' या पत्राने पुढील काळातही चालविली. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा ऐन शिखरावर पोहोचला, प्रभात या वृत्तपत्राने केलेले स्फूर्तिदायक लेखन या पत्राच्या ऐतिहासिक कामगिरीची निश्चितच साक्ष पटविणारे आहे.

## ३.३ दैनिक 'मराठा'

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 'मराठा' हे वृत्तपत्र जनतेच्या आशा–आकांक्षा प्रकट करणारे एक प्रभावी वृत्तपत्र बनले होते. ''भले तरी देऊ कासेची लंगोटी नाठाळाचे माथी देऊ काठी' हे संत तुकाराम महाराजांचे नाठाळाच्या बाबतीतील वचन मराठा या पत्राचे आपले ब्रीदवाक्य बनविले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे मुखपत्र म्हणून दैनिक मराठा या पत्राने काम पाहिले आणि पुढे महाराष्ट्र राज्यात स्थापनेनंतर सुद्धा पुढील पंधरा वर्ष हे पत्र निर्विघ्नपणे संपूर्ण महाराष्ट्र समितीचे मुखपत्र म्हणून काम करू लागले. बेळगाव, कारवार, औराद, भालकीसह संपूर्ण महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशी आग्रही भूमिका या पत्राने १९६० नंतरही पंधरा वर्षे घेतली होती. 'मराठा'पत्राच्या अग्रलेखावर महाराष्ट्राच्या शिवशक्तीची सिंहगर्जना असे शीर्षक लिहिले जात असे.

परखड आणि आक्रमक लेखन, निर्भयपणे मत व्यक्त करण्याची परंपरा यामुळेच 'मराठा' हे वृत्तपत्र संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जनतेच्या गळ्यातील ताईत

बनले व या वृत्तपत्राने संपूर्ण महाराष्ट्रात लोकजागृतीचे रणसिंग फुंकले. अगदी खेडे आणि तालुका पातळीपर्यंत 'मराठा' या वृत्तपत्रामधून आलेल्या लेखनाचे सामुदायिक वाचन होत असे. 'मराठा' या पत्राने मराठी तरुणांच्या मनाची जडणघडण केली त्यामुळे आधुनिक महाराष्ट्रातील तरुणांची पहिली पिढी उभी राहिली, असेच वर्णन करावे लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील एक अग्रगण्य वृत्तपत्र म्हणून 'मराठा' या दैनिकाला स्थान द्यावे लागेल.

दैनिक 'मराठा' या वृत्तपत्राचे मालक संपादक आचार्य प्रल्हाद केशव अत्रे होते. यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यामधील सासवडनजीक कोडीत या गावी १३ ऑगस्ट १८९८ साली एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. जन्माच्या आधीपासून आचार्य अत्रे सासवडला राहायला आले होते. आचार्यांचे वडील टिळक आगरकरांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकले, पण मॅट्रिक होऊ शकले नाहीत. त्यानंतर त्यांनी अनेक नोकऱ्या केल्या. त्यांचा स्वभाव रागीट असल्यामुळे त्यांचे कोणाशीच कुठेच जमले नाही. म्हणून शेवटी त्यांना आपल्या गावाकडे ''सासवडला म्युनिसिपालटीचे सेक्रेटरी म्हणून नोकरी करावी लागली. ते सेक्रेटरी असल्याने त्यांच्या घरी लोकांची नेहमी वर्दळ असे.''[४८]

## ३.३.१ शिक्षण

आचार्य अत्रे वयाच्या पाचव्या वर्षी शाळेत दाखल झाले. अत्रे यांची लहान वयात त्यांची शरीरयष्टी अंगाने किरकोळ होते. दंगामस्ती दांडगाई करण्याकडे त्यांचा कल नव्हता. ते शिकत असलेली मराठी शाळा पेशव्यांच्या ऐतिहासिक वाड्यात भरत असे. कोणतीही चांगली गोष्ट दिसली अथवा आवडली, की ती आपल्याला आलीच पाहिजे

असा त्यांचा नेहमी अट्टहास होता. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या भावे स्कूलने १९०६ साली सासवड येथे इंग्रजी शाळा सुरू केली. ती झाली नसती तर आपण व्हर्नाकुलर फायनल होऊन कुठेतरी कुलकर्णी, तलाठी किंवा प्राथमिक शिक्षक झालो असतो. परंतु ''१९११ मध्ये अत्रे यांनी पुण्याच्या भावे स्कूलमध्ये चौथीत प्रवेश घेतला''[४९] अशा परिस्थितीतही आचार्य अत्रे यांच्या शिक्षणाची व जीवनाची घोडदौड चालू राहिली व पुढे ते शिक्षकही झाले. आणि वयाच्या १४ व्या १५ व्या वर्षी महाराष्ट्र मोहरा ही कादंबरी लिहिली अत्र्यांना क्रिकेटप्रमाणे वक्तृत्वाची आवड होती. त्यांची स्मरणशक्ती उत्तम होती. त्यांचा आवाज त्या वेळीही खणखणीत होता. त्यांना कायद्याच्या शिक्षणात विशेष रस होता. वयाच्या १७ व्या वर्षी वडिलांच्या निधनामुळे त्यांना लहान वयात नोकरी करणे भाग पडले. मुंबईला नोकरी व कॉलेज दोन्ही होईल या हिशेबाने ते मुंबईत राहिले. परंतु घरगुती अडचणींमुळे कायद्याचे शिक्षण त्यांनी अर्धवट सोडले. घरातील थोरला मुलगा असल्यामुळे ''१९१९ ला बी.ए.ची परीक्षा दिल्या दिल्या पुण्याच्या मिलिटरी अकाऊंटस अंतर्गत एफडीओ कार्यालयात एकशे दहा रुपये पगारावर त्यांची नियुक्ती झाली.''[५०] अत्रे यांचे वकील होण्याचे स्वप्न होते परंतु ते काही पूर्ण होऊ शकले नाही. मात्र त्यांना न्याय खाते तसेच कोर्ट खटले याविषयी शेवटपर्यंत अत्यंत कुतूहल होते व त्या कुतूहलापोटी ते कायदेविषयक ज्ञान आवडीने सर्व जाणून घेत असत.

आचार्य अत्रे यांचे जीवन हे अनेक चढउतार आणि सुरस व निरस आणि यशस्वी अयशस्वी अशा विविध घटनांनी भरलेले आहे. एखादे कोडे सोडवत जावे तर उलट त्याचा गुंता वाढत याप्रमाणे त्यांचे जीवन झाले. तसेच त्यांच्या जीवनाचे एकही अंग

नाही की, ज्याचा आचार्य अत्रे यांच्या अंगाशी त्यांचा सुतराम संबंध आला नाही. भर्डा न्यू हायस्कूलमध्ये क्रिकेटची मॅच विद्यार्थी विरुद्ध शिक्षक संघ अशी ठेवली असता २१ वर्षीय अत्र्यांनी आपले शतक पूर्ण केले आणि क्रिकेटच्या जगतात मोठा इतिहास घडविला याचा अर्थ एकच आहे की, अत्रे जे जे क्षेत्र हाताळत होते तेथे विजयाचे ध्वज लावूनच पुढे जात होते.

डिसेंबर १९२१ मध्ये आचार्य अत्रे यांची पुण्यातील कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत १३५ रुपयांच्या पगारावर नेमणूक झाली. आचार्य अत्रे यांनी या शाळेचा कायापालट केला. तेथे त्यांनी प्रयोगशाळा, शाळेसाठी कुंपण, पुस्तकासाठी कपाटे, आधुनिक पद्धतीचे डेस्क आणि प्रयोगशाळेसाठी मोठमोठे टेबल, घडवंच्या याची तरतूद करण्याची सार्वजनिक निधी गोळा केला. स्वतः बरोबरच आचार्य अत्रे यांनी शाळेचे नावही केले. ''१६ मे १९२२ रोजी वयाच्या २४ व्या वर्षी काशी नावाच्या मुलीशी त्यांचा विवाह झाला. काशीची विवाहानंतर लीलावती झाली. घरच्या गरिबीमुळे ऋण काढून लग्न सोहळा पार पडला व पुढे कर्ज फिटण्यापूर्वीच त्यांची पत्नी वारली.''[५१]

याप्रमाणे आचार्य अत्र्यांचा सर्व जीवनपट पाहिला असता काही विचार मनात येतो की, अत्रे यांचा एवढ्या आयुष्यातील सर्व चढउतारात अत्रे एवढे स्थिर कसे राहू शकले आणि वाङ्मयीन तपश्चर्या पण त्यांनी कशी चालूच ठेवली होती?

आचार्य अत्रे यांनी आपल्या आयुष्याची २० वर्षे शिक्षण क्षेत्राला दिली. त्यांनी त्यांच्या शिक्षणाची २० वर्षे तेजस्वी क्रांतिकारी आणि देदीप्यमान ठरली. शिक्षणक्षेत्रात स्वतःचा खास ठसा उमटविला होता. अत्रे यांनी शिक्षण क्षेत्रात किती काम करतो पगार मिळतो व आपण किती करतो याकडे लक्ष दिले नाही. त्यांनी शाळेचे ब्रीदवाक्यच ठेवले

होते की, सेवा व त्याग याचप्रमाणे त्यांच्या जीवनाचे ध्येयही होते. आयुष्यात जे करायचे त्यात स्वतःला झोकून द्यायचे आणि आपल्या कर्तृत्वाचा आलेख, नकाशा तेथे उमटवूनच तेथून पुढे जायचे. हे त्यांच्या जीवनाचे अंग बनले होते. आपल्या जीवनात भरलेल्या नाट्याचा अत्रेंनी पुरेपूर अनुभव घेतला. त्यांच्या आयुष्यात अशा काही घटना घडल्या की, त्यांना आपले जीवनामध्ये असे काही होईल याची सुतराम शक्यता नव्हती. ते घडल्यावर त्याला सामोरे जाणे हेच त्यांच्या हाती राहिले होते. अत्र्यांचा बोलबाला सर्वत्र क्षेत्रात आलेला होता. शिक्षणक्षेत्रातील कामगिरीमुळे त्यांची नेमणूक निरनिराळ्या कमिट्यांवर आणि परीक्षा मंडळांवर झालेली होती. अनेक शैक्षणिक परिषदांमध्ये अध्यक्ष किंवा पाठ देणारा शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. अशा या उत्तुंग यशाच्या शिखरावर असतानाच जनतेला फसविणाऱ्या टोळीच्या एका भयंकर कटातला आरोपी म्हणून सरकारने जाहीरपणे निर्देश करावा या गोष्टीचे आचार्य अत्र्यांना अतोनात दुःख झाले व त्यामुळेच जीवनातल्या चांगल्या गोष्टींवरचा विश्वास उडाला.

उभ्या आयुष्याच्या काळात असे विपरीत घडूनसुद्धा आचार्य अत्रे कधीही डगमगले नाहीत. त्यांच्यावर अनेक वेळा बदनामीचे खटले झाले, अनेक हक्कभंग प्रस्ताव आले. परंतु आचार्य अत्रे खचून न जाता यांनी संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार सातत्याने केला. आपल्या लिखाणातून चळवळीस विरोध करणाऱ्या सत्ताधारी काँग्रेस पक्षातील नेत्यांचे वाभाडे काढले. अनेक वेळा त्यांचे वस्त्रहरण केले. त्यामुळे 'मराठा' हे वृत्तपत्र थोड्याच काळात लोकप्रियतेच्या यशोशिखरावर पोहोचले. या पार्श्वभूमीवर आचार्य अत्रे यांच्या पत्रकारितेचे मर्म समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते.

### ३.३.२ आचार्य अत्रे आणि पत्रकारिता

आचार्य प्र. के. अत्रे यांना पत्रकारितेचा प्रचंड अनुभव होता. त्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी आपल्या साप्ताहिक नवयुग व दै. 'मराठा' या वृत्तपत्रातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला विरोध करणाऱ्यावर जोरदार टीका केली. ''१९२३ साली अत्र्यांनी अध्यापन मासिक सुरू केले १९२६ आणि १९२९ साली अनुक्रमे 'रत्नाकर' व 'मनोरमा' मासिके सुरू केली. नवे अध्यापन मासिक व इलाखा शिक्षक मासिक अनुक्रमे १९३५ आणि १९३९ साली काढले. परंतु आपले राजकारणाविषयी लेखन प्रामुख्याने त्यांनी केले आहे. नवयुग साप्ताहिक, जयहिंद सांज दैनिक व मराठा दैनिक सांज मराठ्यातूनच केले. जयहिंद सांज दैनिक २ जून १९४७ रोजी सुरू केले. पण ते वर्षभरच चालले. १५ नोव्हेंबर १९५६ रोजी मराठा दैनिक सुरू केलेले हयात असेपर्यंत चालूच होते. ''पुढील काळात त्यांच्यापश्चातही काही वर्षे सुरू राहिले नवयुग साप्ताहिक त्यांनी १९ जानेवारी १९४०ला सुरू केले आणि ते ८ जुलै १९६२ रोजी बंद केले.''[५२] या साप्ताहिकमधून वृत्तपत्राचे संपादक आचार्य अत्रे असं त्यांचे नांव महाराष्ट्राला वेगळ्या अर्थाने परिचित होऊ लागले. तत्पूर्वी नाटककार कवी, विडंबनकार आणि एक उत्तम शिक्षक म्हणून ते परिचित होतेच उत्कृष्ट वक्ते म्हणूनही त्यांचा विलक्षण बोलबाला झाला होता. या त्यांच्या बहुआयामी वक्तृत्वामुळेच ते राजकारणासारख्या क्षेत्रात खेचले गेले. त्यांच्या राजकीय कारकीर्दीमुळेच नवयुग साप्ताहिकाचा जन्म झाला.

पत्रकारिताही त्या वेळी दुधारी तलवारी सारखी होती. एखाद्याच्या हातून एखादा गुन्हा घडला तर तो पोलिसांच्या ससेमिऱ्यापेक्षा वृत्तपत्रांच्या ससेमिऱ्याला घाबरे. घाबऱ्याघुबऱ्या अवस्थेत तो 'मराठा' कार्यालय गाठी व त्यांना पाया पडून विनवण्या करी

की, 'साहेब हे छापू नका.' याउलट एखाद्या स्त्रीवर काही अन्याय झाला असेल तर ती स्त्री न्याय मागण्यासाठी पोलिस खात्याऐवजी 'शिवशक्ती' कार्यालयात पळे, कारण तिला माहीत होते की, अत्र्यांची जरबच अशी जबरदस्त आहे की, त्यांच्याकरवीच या गोष्टीचा बंदोबस्त होऊन आपल्याला नक्कीच न्याय मिळेल.

आचार्य अत्रे यांनी एखाद्याला जो शब्द दिला तो त्यांनी कधीही मोडला नाही. वाणी, लेखणी यावर विलक्षण प्रभुत्व संपादन केलेले होते. त्यांची स्मरणशक्ती आणि निरीक्षण शक्ती प्रचंड होती. एक उदाहरण स्मरण शक्तीचे असे की, एकदा व्याख्यानासाठी गोव्याला ते गेले असता त्यांना बातमी मिळाली की चर्चिल वारले तर दुसऱ्या दिवशीच्या मराठ्याच्या अग्रलेखात चर्चिल विषय घेऊन अग्रलेखात काय काय लिहा हे दत्तू बांदेकरला फोनवर २० मिनिटं ते सांगत होते. वास्तविक तेथे एका व्याख्यानासाठी गेले होते. परंतु अग्रलेखांसंबंधीचे सर्व सांगून झाल्यावर त्यांनी शांतपणे उभे राहून आपले भाषण पार पाडले. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांचा दरारा जनतेला नव्हे तर सरकारला सुद्धा होता. या गोष्टीला प्रचंड नैतिक धैर्य असावे लागते. १९०२ साली 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?'' अग्रलेख लिहिणारे लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्योत्तर काळात व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी ज्या लोकांनी, राजकीय नेत्यांनी सक्त विरोध केला. जाहीर भाषणे वेगळी केली व कृती जेव्हा त्या विरोधात केली, ते हे 'काँग्रेसचे पंधरा हरामखोर', 'जवाहरलाल की जहरीलाल' अशा प्रकारचे कठोर प्रहार करण्यास आचार्य अत्रे यांनी मागे पुढे पाहिले नाही की परिणामांची तमा बाळगली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हकनाक बळी गेलेल्या १०६ हुतात्म्यावरूनही अत्र्यांनी सरकारच्या धोरणाविरुद्ध दंड थोपटले होते. मराठ्याचे

ब्रीद वाक्यच होते, 'भले तरी देऊ कासेची लंगोटी नाठाळाच्या माथा देऊ काठी' महाराष्ट्राचा विनोदवीर, हसणारा सिंह, मराठी व महाराष्ट्र प्रेमी, अचाट कार्यशक्तीचा आणि अफाट कर्तृत्वाचा चालताबोलता अजस्त्र ज्ञानकोश आचार्यांच्या बाबतीत असेच म्हणता येईल.

वृत्तपत्रसृष्टीवर त्यांना साहाय्य केले, ते 'काकासाहेब लिमये' आणि अनंतराव गद्रे ह्या दोघांनीच अत्र्यांच्या प्रत्येक क्षेत्रातील पदार्पणाचे एक वैशिष्ट्य आहे की, आयुष्यात अमुक एक गोष्ट करावयाची ठरवून त्यांनी कधीच केली नाही. योगायोगाने ते ओढले गेले आणि त्या त्या क्षेत्रात त्यांनी ध्रुवताऱ्यासारखे आढळ स्थान प्राप्त करून ठेवले. त्यांच्या बाबतीत ध्रुवारी जागा ती ध्रुवाचीच. असे म्हणता येईल. 'नवयुग चित्रपट लि.'चीही स्थापना केली होती. बापूराव राजगुरू हे त्यांचे एक सहकारी त्यांच्या छापखान्यात 'दैनिक लोकशक्ती' हे पत्र छापीत त्या पत्राची मालकी 'राष्ट्रीय सुविचार प्रसारक मंडळी' ची होती. त्याची व्यवस्था राजगुरूच पाहत. राजगुरू इकडे येऊन मिळाले म्हणून लोकशक्तीची व्यवस्था राजगुरूंच्या हातून काढून स्वतःकडे घ्यावयाचे एकाएकी ठरले. नोकरवर्ग व संपादकीय एकदम बेकार होऊन घरी बसली. तेव्हा त्यांना काम देण्याच्या हेतूने अत्र्यांनी 'नवयुग' काढण्याचे ठरवले. अत्र्यांचे चित्रपट पण गाजतील त्याची जाहिरात होईल, वृत्तपत्रपण निघेल व बेकारांना काम पण मिळेल. 'अत्रे उवाच' हे सदर पहिल्यापासून अत्र्यांनी लिहिण्यास सुरुवात केली. साहित्य, विनोद आणि टीका ही तर 'नवयुग'ची प्रधान अंगे होती. आपल्या वृत्तपत्रातून महाराष्ट्राची अस्मिता जोपासण्याचे कामही त्यांनी केले. ते महाराष्ट्र संस्कृतीचे अभिव्यक्ती होते. त्याबरोबर पुरोगामी राजकीय दृष्टिकोन असावा ह्यावर कटाक्ष असे. राजकारणामध्ये

विनोद उत्पन्न करण्याचे निरनिराळे प्रयोग 'नवयुग'मधून अत्र्यांनी चालू केले. 'काचेच्या कपाटातील सिंह' हा वीर सावरकरांवर प्रखर टीका करणारा एक लेख प्रसिद्ध झाला. तो अत्र्यांनी लिहिला नव्हता तरी त्यांना रोष ओढवून घ्यावा लागला. नागपूरला चित्रपटांच्या भागाची विक्री करण्यास गेलेल्या अत्र्यांना सावरकरांच्या अनुयायांनी मारण्याचा बेत केला होता. ''वृत्तपत्राच्या संपादकाला नुसते लोकप्रियतेचे सन्मान मिळत नाही. पण त्याबरोबर बडगा ही मिळतो.''[५३] यावरून आचार्य अत्रे यांना कठीण प्रसंगातून जावे लागते याची प्रचिती येते.

झुंज देणे, हेच अत्र्यांच्या एकूण जीवनाचे सूत्र होय. ती सामाजिक असो, राजकीय असो, चित्रपटकार म्हणून असो, नाटककार म्हणून असो, टीकाकार म्हणून असो की एखाद्या वृत्तपत्राचा संपादक म्हणून असो. नागपुराकडील त्यांच्या अनुयायांमध्ये भयंकर खळबळ उडाली. जाहीर सभा भरवून त्यांनी 'नवयुग'च्या अंकाची होळी केली. फौजदारी फिर्यादीचे सत्र सुरू झाले. 'नवयुग'चा प्रसार फार होऊ लागला. तेल्यातांबोळ्यांचे आणि न्हाव्यासापरटांचे पत्र आहे, अशी कित्येक जण त्याची टवाळी करू लागले. परंतु ते डगमगले नाहीत.

''वृत्तपत्र व्यवसाय म्हणजे विशेष करून राजकारण असा अर्थ गाडगीळांना अभिप्रेत होता.''[५४] यावरून आचार्य अत्रे यांना त्यांच्या विरोधकांची कशी झुंज द्यावी लागली याची प्रचिती येते. एखादा साहित्यिक असेल तर त्याला वृत्तव्यवसाय किंवा राजकारण कळत नाही हा गाडगीळांचा युक्तिवाद तर्कशुद्ध नाही. फडके यांच्या बाबतीत असलेला गाडगीळांचा अभिप्राय अत्र्यांच्या बाबतीत लागू होत नाही. असे म्हणतात, 'कलेची हानी झाली आहे'. 'गाडगीळ' ह्यांचे माझ्याबद्दलचे हे उद्‌गार स्नेहाचे आणि

सद्‌भावनेचे आहेत. कलेची हानी झाली हे त्यांचे म्हणणे पुष्कळ अंशी खरे आहे, पण 'माझ्या कलावृत्ती'मुळे, 'मला राजकारणाचे आकलन झालेले नाही' हा त्यांचा आक्षेप मात्र विवाद्य आहे. नेहरू पटेलांपासून अत्र्यांनी कुणालाही सोडले नाही. समाजहिताच्या दृष्टीने जे चूक होते ते चूकच म्हटले पाहिजे व ज्याची त्याची ती चूक ज्याची त्याला दाखवली पाहिजे. अत्रे खऱ्याचे पाठीराखे, पुराव्याचे पक्के आणि वाट्टेल तशी बेजबाबदारपणे विधाने न करणारे होते. त्यामुळेच इतरांच्याकडून एखादी चूक क्षुल्लक जरी झाली तरी त्या चुककर्त्याने 'माझी चूक झाली' असे कबूल करेपर्यंत अत्रे त्याचा पिच्छा सोडीत नसत. पुणेरी पगडीचा मान राखणारे जसे ते होते तसेच 'पुणेरी जोडे', 'शाल जोडी'तही द्यायला मागे पुढे पाहिले नाही.

'नवयुग'ची तलवार चालवताना माझ्या हातून चुका झालेल्याच नाहीत, असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. झाल्या पुष्कळ चुका झाल्या. कित्येकांना वाजवीपेक्षा जास्त दुखापती झाल्या, अगदी होऊ नयेत तेथे झाल्या, पण त्या अजाणता झाल्या. अविचाराने झाल्या. उत्साहाच्या अतिरेकाने झाल्या पण स्वार्थबुद्धीने, दुष्टपणाने किंवा सुडाच्या भावनेने मी माझी लेखणी कधीही चालवलेली नाही. द्वेष बुद्धीने टीका, अनेक वेळा अत्र्यांवर वाटेल तसे आळ घेतलेले आहेत, पण भिडेने, वशिल्याने किंवा पैशाच्या मोबदल्याने, ''मी माझ्या लेखणीचा दुरुपयोग वा क्रिय कधीही या आयुष्यात केलेला नाही.''[५५] मी कामाचा आणि प्रेमाचा दास आहे. माझ्या जीवनाची काही निश्चित ध्येय आहेत. विनोदाचे अमोघ शस्त्र माझ्या हाती आहे. त्यामुळे फारच थोड्या लोकांची डाळ आजपर्यंत माझ्यापुढे शिजलेली आहे. गैरलागू आणि अद्वातद्वा शिव्या देण्यापलीकडे माझ्या विरोधकांना माझ्याविरुद्ध काहीही करता आले नाही.

''कुठे 'नवयुग'ला 'नग्नयुग' म्हण किंवा 'आचार्य' म्हणायच्या ऐवजी 'आचारी' म्हण ह्याच्या पलीकडे शत्रूच्या बुद्धीचा पल्ला फारसा गेलेला आढळत नाही. विनोदाला 'अश्लील' बोलावयाचे आणि टीकेला 'शिव्या' म्हणावयाच्या ही मूर्ख आणि लुच्च्या टीकाकारांची नेहमीचीच युक्ती आहे. 'नवयुग' हे जर केवळ अश्लील लिहिणारे आणि शिवीगाळ करणारे रटाळ आणि टवाळ पत्र असते तर महाराष्ट्रात त्याला एवढी प्रतिष्ठा आणि लोकप्रियता कदापि प्राप्त झाली नसती.''[५६] याप्रमाणे आचार्य अत्रे यांनी आपल्या धारदार लेखणीच्या लिखाणाचे समर्थनच केलेले होते.

ढोंगी आणि भंपक लोकांच्या पाठीत 'नवयुग'ने जसे तडाखे आणि बडगे मारलेले आहेत, त्याप्रमाणे गुणी आणि पराक्रमी लोकांना डोक्यावर घेऊन नाचण्यामध्येही 'नवयुग' हा नेहमी आघाडीवर राहिला होता. स्वातंत्र्याच्या चळवळीतही बेचाळीसच्या क्रांतिवीरांची स्फूर्तिदायक चरित्रे एकामागून एक खास अंग देऊन प्रकाशित करण्यात 'नवयुग' कायमच आघाडीवर राहिला होता. ''वृत्तपत्र व्यवसायात मी माझे हृदय कधीही गमावले नाही. हे माझ्या वृत्तपत्रीय जीवनाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहे. तात्यासाहेब केळकर सरदार वल्लभभाई पटेल व महात्मा गांधी यांच्यावर नवयुगात जे मृत्युलेख लिहिले त्यात त्यांच्या अंध भक्तांपेक्षाही अधिक मार्मिकतेने आणि रसिकतेने मी त्यांच्या गुणांचा नि कर्तृत्वांचा गौरव केला आहे.''[५७] अशी नवयुगाची थोरवी त्यांनी मांडली. नवयुग एका अर्थाने माझे आत्मचरित्रच आहे, असे अत्रे सांगून म्हणतात, ''माझ्या जीवनाचा तो एक धावता इतिहास आहे. लेखन हा तर माझा श्वास आहे. माझे हृदय साहित्यात आहे. मन नाटकात आहे. डोके चित्रपटात आहे. पाय देशकारणाची वाट चालत आहेत. त्यामुळे माझे साहित्य, माझी नाटके, माझा चित्रपट, व्यवसाय किंवा

माझी देशसेवा ह्या सर्वांचा बरावाईट संसर्ग नवयुगला लागलेला आहे. त्यामुळे माझ्या विविध आणि संमिश्र व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब म्हणजेच नवयुग असे समीकरण होऊन बसलेले आहे.''[५८] यावरून आचार्य अत्रे यांनी आपली पत्रकारिता जपणाऱ्या नवयुगचा नेहमी गौरव केलेला होता, हे स्पष्ट होते. वृत्तपत्र लेखन म्हणजे सुळावरची पोळी आहे. पत्रकाराचे जीवन म्हणजे अनन्वित श्रमांचे,कष्टांचे, यातनांचे, तळमळीचे, निःश्वासाचे, जागरणाचे, घामाचे आणि रक्ताचे पाणी करण्याचे जीवन होय. महान ध्येयांच्या साधनेसाठी अर्पित केलेले ते जीवन आहे. म्हणूनच त्यात कृतार्थता आहे. अशी त्यांची पत्रकारितेत बाबतची धारणा होती.

आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' वृत्तपत्राचा जन्म १५ नोव्हेंबर १९५६ रोजी झाला आणि 'मराठा'शी चहाचा 'कप' असे समीकरण तयार झाले. ते पूर्वी 'नवयुग'बाबत झाले. नंतर मराठाबाबत होते. 'मराठा' दैनिक महाराष्ट्रातील एक लोकप्रिय, अग्रणी असे वृत्तपत्र होते, राजकीय, साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक घडामोर्डीविषयी मराठाची प्रतिमा काय आहे? हे वाचण्यासाठी जनता उत्सुक असे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी तर वृत्तपत्रांना आणखीच मागणी असे. एखाद्या सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तीचे निधन झाल्यावर तिच्यावरचे अग्रलेख, मृत्युलेख लिहावेत तर अत्र्यांनीच, व्यक्तिचित्रे, व्यंगचित्रे रेखाटावीत तर अत्र्यांनी, टोपणनावे, निनावे व नावे अशा वेगवेगळ्या प्रकारचे लेखन आचार्य अत्र्यांनी केले. समितीत अत्रे स्थानापन्न झाले होते. त्यांना आपले समितीचे मुखपत्र निघालेले पाहून अतिशय आनंद झाला. पहिला अंक फारच चटकदार होता. त्याचा बोलबाला सर्वत्र होऊ लागला. पत्रकार परिषदेसाठी रशियाच्या दौऱ्यावर अत्रे गेले तेव्हा आणि त्याआधी सुद्धा अत्र्यांचे काम

कधी प्रचाराचे, कधी अधिवेशनाचे, कधी पत्रकार परिषद असे चालत असे. मराठासाठी खास 'शिवशक्ती' कार्यालयाचे उद्‌घाटन झाले. ३ वर्षांत स्वतःच्या इमारतीत स्वतःचा पेपर. महाराष्ट्राविषयी अपार प्रेम व अभिमान आणि मराठी माणसाविषयीचा जिव्हाळा असल्यामुळेच यातून 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' जोमाने उभी राहिली. आचार्य अत्रेचा चळवळीचे अग्रणी होते. त्यांची सिंहगर्जना होती ती वेळीच दिल्लीपर्यंत पोहोचत असे. कोणत्याही प्रश्नावर सरकारला नमायला लावण्याइतकी ताकद आचार्य अत्र्यांच्या वाणीत आणि लेखणीत होती.

आचार्य अत्रे यांचा तो काळ 'संयुक्त महाराष्ट्र चळवळी'चा होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी अत्र्यांनी आपल्या जिवाचे अक्षरशः रान केले होते. त्यांचे जवळचे चळवळीत साथीदार ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, कॉ. अमृत डांगे होते. आचार्य अत्रे यांनी महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा अक्षरशः पिंजून काढला. एकानंतर एक सभा घेऊन, संमेलने घेऊन ते जोरदार विचार मंथन घडवीत असत. तरुणवर्ग, मध्यमवर्ग तसेच ग्रामीण जनतेपर्यंत संयुक्त महाराष्ट्राचा संदेश पोहोचविण्याचे सर्वस्वी श्रेय आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना दिले जाते.

### ३.३.३ दै. 'मराठा'आणि आचार्य अत्रे

१० ऑक्टोबर १९५५ साली फाजलअली कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालात मराठी भाषिकांची मागणी नाकारण्यात आली होती. यामुळे स्वतंत्र मराठी भाषिकांचे राज्य अस्तित्वात यावे यासाठी सर्व विरोधक एकत्र आले. त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली आणि आंदोलन पेटले. तत्कालीन मुख्यमंत्री

मोरारजीभाई देसाई यांनी मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य स्थापनेच्या मागणीला तीव्र विरोध केला होता. बेळगाव कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, या मागणीने सर्वत्र जोर धरला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला हळूहळू आंदोलनाचे स्वरूप आले आणि आंदोलनातून महासंग्राम उभा राहिला. महाराष्ट्रातील आंदोलनात राजकीय नेते, विचारवंत समाजधुरीण पत्रकार आणि वर्तमान पत्रे सामील झाली होती. यामध्ये वर्तमानपत्रांचा उल्लेख मुद्दाम करावा लागतो. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे कुंड मराठी वृत्तपत्रांनी व लढवय्या पत्रकारांनी पेटवून ते सतत धगधगते ठेवले. याच काळात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी शिवाजी पार्कवर सभा होऊ लागल्या १८ नोव्हेंबर १९५५ रोजी लढ्याला तोंड फुटून चळवळीमध्ये जोर धरला काँग्रेसेत्तर सर्व पक्ष एकत्र आले त्यातून संयुक्त महाराष्ट्राच्या समितीची स्थापना झाली. या आंदोलनाच्या बातम्या मुंबईतील इंग्रजी वृत्तपत्रे देत नसत. कारण ते या चळवळीकडे अपेक्षेने पाहत होते. 'नवा काळ' 'प्रभात' 'केसरी' हीच मराठी वृत्तपत्रे या आंदोलनाचे समर्थन करीत राहिली. लोकसत्ता व नवशक्ती या दैनिकांची मालकी अमराठी भाषिकांची होती. 'नवशक्ती'मध्ये प्रभाकर पा. वा. पाध्ये, गाडगीळ यांसारखे खंदे पत्रकार होते. तर लोकसत्ताची धुरा रॉयवादी पत्रकार ह. रा. महाजनी सांभाळत होते. परंतु त्या वृत्तपत्राच्या संपादकावर चळवळीसंबंधीचे वार्तांकन करण्याबाबत मर्यादा होत्या. पुण्याच्या दैनिक 'सकाळ'चे धोरण भाषावार प्रांतरचनेच्या विरोधी होते. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र आपले स्वतंत्र आंदोलनासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असा विचार आचार्य अत्रे यांच्या मनात आला आणि त्यातून वृत्तपत्राची निर्मिती झाली.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा लढा लढण्यासाठीच संयुक्त महाराष्ट्र समिती

स्थापन झाली होती. या समितीच्या पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा विभागातील नेत्यांची व कार्यकर्त्यांची एक परिषद मुंबई येथील शिवाजी पार्क मैदानावर ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर १९५६ रोजी महाद्विभाषिकाविरोधी परिषद भरविण्यात आली होती. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी प्रचंड मोठी जाहीर सभा झाली, एवढी मोठी परिषद होऊनही तिची संपूर्ण बातमीसुद्धा मुंबईतील मराठी पत्रांनी न दिल्याबद्दल सभेचे अध्यक्ष माधवराव बागल ह्यांनी खेद व्यक्त केला, आणि ''ह्या महाराष्ट्रद्रोही भांडवलशाही पत्रांना तुम्ही हात देखील लावता कामा नये'', असे जनतेला त्यांनी आवाहन केले. आवाहनाला लोकांनी प्रचंड प्रतिवाद दिला. त्याचबरोबर आचार्य अत्रे ह्यांनी लवकरच संयुक्त महाराष्ट्रवादी पत्र काढावे, अशी मागणीही लोकांनी केली. याची दखल घेऊन आचार्य अत्रे ह्यांनी लगोलग सभेतच जाहीर केले की, ''आपण जर मदत करणार असाल तर येत्या विजयादशमीपासून मी नवे दैनिक काढतो! लोकांनी टाळ्यांचा कडकडाट करून संमती दर्शविली.''[५९] पण पत्रासाठी त्या वेळी जेव्हा पेट्या फिरविण्यात आल्या तेव्हा फक्त ६२ रुपये १२ आणे जमा झाले. याच सभेत, सेनापती बापट ह्यांनी पत्राचे नाव 'मराठा' ठेवावे असे उत्स्फूर्तपणे सुचविले. आचार्य अत्रे यांनी सेनापती बापट यांची ही सूचना मान्य केली व आपल्या पत्राचे मराठा असे नाव ठेवले.

आचार्य अत्रे यांनी जनतेला दैनिक पत्र काढण्याचे जाहीर आश्वासन दिले खरे, पण ती गोष्ट सोपी नव्हती.'' पैशाची काय आणि कशी सोय करावयाची हा प्रश्नच होता. दैनिक पत्र काढण्यास नुसत्या सदिच्छा व लोकांचा उदंड उत्साह पुरा पडत नाही. अत्रे यांची अशी कल्पना होती की, संयुक्त महाराष्ट्र समितीचे पत्र म्हणून हे दैनिक चालविले जाईल. म्हणून समितीच्या घटक पक्षांनी या पत्राचे प्रत्येकी पाच हजार रुपये याचे भाग

घ्यावेत, अशी विनंती अत्रे यांनी केली. पण तिचा काहीही उपयोग झाला नाही. कोणीही गंभीरपणे या विनंतीची दखल घेतली नाही. केवळ कॉम्रेड डांगे यांनी व्यक्तिशः तीन हजार रुपये दिले. आचार्य अत्रे 'नवयुग' साप्ताहिक जवळजवळ सोळा–सतरा वर्षे चालवीत होते. त्यांच्याजवळ दैनिक चालविण्याचा जो अनुभव होता तो एका छोट्या सायंदैनिकाचा होता. आचार्य अत्रे यांचे जवळचे ज्ञानप्रकाशचे मित्र काकासाहेब लिमये यांनी, तुम्ही दुसरे वाटेल ते करा, पण दैनिक वृत्तपत्र काढण्याच्या भानगडीत पडू नका, असे निक्षून अत्र्यांना सांगितले होते. तरीही हा सल्ला झुगारून जनतेच्या आग्रहास्तव १९४७ साली अत्रे यांनी 'जयहिंद' नावाचे सायंदैनिक काढून ते वर्षभर चालविले होते. स्वातंत्र्याबरोबर झालेल्या फाळणीने भयानक अत्याचार झाले. त्यातून रक्ताचे पाट वाहिले. हजारो स्त्री–पुरुषांची, वृद्ध, बालकांची कत्तल झाली, लक्षावधी लोकांची ससेहोलपट झाली. त्या साऱ्या भीषण घटनांविरुद्ध आचार्य अत्रे यांनी 'नवयुग' या साप्ताहिकातून आग ओकण्याची मोहीम सुरू केली होती. पण त्यांचे ''नवयुग'' पत्र साप्ताहिक होते. आठवड्यातून एकदाच याद्वारा आवाज उठविता येत होता. पण तेवढ्याने अत्रे यांचे समाधान होत नव्हते. अत्याचाराच्या कहाण्या आणि दुःखितांचे अश्रू यांचा दररोज परिस्फोट करण्याची व त्यावर जळजळीत टीकास्त्र सोडण्याची गरज अत्रे यांना वाटत होती. म्हणून 'जय हिंद' हे सायंदैनिक त्यांनी सुरू केले. त्याचे संपादक ग. बा. ऊर्फ भाऊसाहेब नेवाळकर होते. श्री. रा. बिवलकर हे त्यांचे प्रमुख सहाय्यक होते. अत्रे स्वतःही त्यात भरपूर लेखन करीत. त्या वेळी अत्रे यांच्या हाती अत्रे प्रिंटिंग प्रेस हा छापखाना होता. तरीही एक वर्षापेक्षा अधिक काळ दैनिकाचा संसार ते चालवू शकले नाहीत.

समितीच्या घटक पक्षांकडून पैशांबाबत प्रतिसाद मिळाला नसला तरी, पण मात्र काढण्याची जाहीर घोषणा करून आचार्य अत्रे मराठी जनतेशी एक प्रकारे प्रतिज्ञाबद्ध झाले होते. यामुळे काहीही करून दैनिक काढणे हे त्यांचे कर्तव्य होऊन बसले होते. त्यामुळे अत्रे यांना शेवटी उधारीचा आणि कर्जाचा मार्ग स्वीकारावा लागला. दैनिक 'मराठा'चा पहिला अंक ८ नोव्हेंबर १९५६ रोजी प्रसिद्ध होईल, असे जाहीर करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात ७ नोव्हेंबर १९५६ रोजी जेव्हा अंक मुद्रणयंत्रातून बाहेर पडला तेव्हा त्याचे स्वरूप समाधानकारक नव्हते. म्हणून सतत आठ दिवस नमुना अंक काढण्याचे ठरवून संपादन तंत्रात रोजच्या रोज नवनवीन सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रयोगामुळे संपादकाचा आत्मविश्वास वाढला. यामधून अखेर, १५ नोव्हेंबर १९५६ रोजी सकाळी मराठाचा पहिला अंक अधिकृतरीत्या बाहेर पडला. पहिल्याच दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला, काही दिवसांतच आकडा २५ हजारांवर गेला.

'मराठा' वृत्तपत्राच्या शिरोभागी 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा। हे ब्रीदवाक्य, श्री शिवछत्रपती, महात्मा फुले व लोकमान्य टिळक ह्या तीन देवतांची चित्रेही होती. पुढे ह्या चित्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चित्रांचाही समावेश करण्यात आला. ''भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथा' ही संत तुकाराम महाराजांची उक्ती अग्रलेखाच्यावर टाकण्यात आली होती. पहिल्या अंकात पहिल्याच पृष्ठावर सेनापती पा. म. बापट ह्यांचा पुढील आशीर्वाद छापला होता. आपले दैनिक मराठी स्त्री–पुरुषांना रोजच्या रोज त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देईल आणि चालू लोकशाहीच्या लढ्यात त्यांना स्फूर्ती देऊन मार्गदर्शन करील

अशी मला खात्री आहे.''[६०] या वरून आचार्य अत्रे यांची भूमिका स्पष्ट होते. महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यावर त्यांनी भर दिला. कम्युनिस्ट नेते कॉ. डांगे ह्यांनी म्हटले होते की, 'दैनिक मराठा' पत्र संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील एका आणीबाणीच्या प्रसंगी सुरू होत आहे... आजच्या उद्ध्वस्त महाराष्ट्रीय जीवनाची लोकशाहीच्या पायावर नव्याने उभारणी करणारा किमान कार्यक्रम जनतेच्या मनावर खोलवर बिंबवावयाचा आहे. भांडवलदारी वृत्तपत्रांना तोंड देऊन हे कार्य पार पाडण्याच्या प्रतिज्ञेने जन्माला येणारे 'मराठा' हे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाला लाभलेले एक प्रभावी अस्त्रच आहे. कवी सुरेश भट यांची 'मराठा' ही स्फूर्तिदायक कविताही पहिल्या अंकात छापली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीचे एस. एम. जोशी आदी नेते यांचेही संदेश पहिल्या अंकात होते. मराठी जनतेचा आवाज या मथळ्याखाली अत्र्यांनी पहिला अग्रलेख लिहिला. राज्यकर्त्यांवर आणि सत्तारूढ पक्षांवर प्रहार करताना वृत्तपत्र व्यवसायाच्या मूलभूत तत्त्वाशी दैनिक मराठा कधीही द्रोह करणार नाही, असे आश्वासन त्यांनी आपल्या अग्रलेखात दिले होते.

अंकामधून अग्रलेखाखेरीज 'ढाल तलवार', 'पाचामुखी', 'कोपरखळ्या' अशी वेगवेगळी सदरेही होती. पहिल्या अंकात संपादक अत्रे यांनी लिहिलेल्या अग्रलेखाचा मथळा होता. 'मराठी जनतेचा आवाज' हा मथळा सार्थच होता. कारण, मराठी जनतेच्या आवाजाने दैनिक काढण्याची हाक दिली होती, आणि मराठी जनतेचे सुखदुःख, रागलोभ, चीड–संताप, व्यथा–सौख्य हे सर्व खड्या आवाजात सांगण्यासाठी 'मराठा' खरा झालेला होता. अग्रलेखात प्रारंभी असे म्हटले होते, ''महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृत ती, भाषा आणि साहित्य ज्यांनी निर्माण केले त्या महन्मंगल महापुरुषांचे

भक्तिभावाने स्मरण करून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात ज्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले, त्या हुतात्म्यांना वंदन करून आणि तीन कोटी मराठी जनतेच्या चरणांवर आदराने मस्तक ठेवून, संयुक्त महाराष्ट्राच्या सेवेसाठी आम्ही 'मराठा' दैनिक आजपासून सुरू करीत आहोत.''[६१] अशी अग्रलेखाची सुरुवात केलेली होती. तर अग्रलेखाचा शेवट असा होता, ''दैनिक मराठा हा कोणत्याही राजकीय पक्षाचा नाही. तीन कोटी मराठी जनतेचा पक्ष हाच त्याचा पक्ष. तीन कोटी मराठी जनतेचा आवाज हाच त्याचा आवाज, सत्य सांगताना कोणताही पक्षपात तो करणार नाही. काँग्रेसच्या सभेला पाच हजार माणसे असली तरी त्या पाच हजारांचे तो पन्नास हजार करणार नाही आणि 'संयुक्त महाराष्ट्र समिती'च्या सभेला दोन हजार माणसे असली तर त्या दोन हजारांचे तो वीस हजार करणार नाही. राज्यकर्त्यांवर आणि सत्तारूढ पक्षांवर टीकेचे प्रहार करताना वृत्तपत्र व्यवसायाच्या मूलभूत तत्त्वांशी दैनिक मराठा जसा द्रोह करणार नाही, तसाच त्याचा महाराष्ट्राभिमान त्याच्या भारतनिष्ठेला कधीही धोका देणार नाही. तीन कोटी मराठी जनतेच्या अस्मितेवर आणि अस्तित्वावर असलेल्या ''महाद्विभाषिकां''च्या संकटाचा प्राणपणाने प्रतिकार करणे, हे दैनिक मराठाचे ब्रीद आहे.''[६२] दैनिकाचा प्रारंभ आणि शेवट यातून लिहिलेल्या मथळ्यांतून संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे पत्राची किती प्रचिती भावना स्पष्ट होती हे स्पष्ट होते.

नोव्हेंबर १९५६ मध्ये 'मराठा' सुरू झाला आणि मार्च १९५७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. ''संयुक्त महाराष्ट्र समितीने आपले अधिकृत उमेदवार निवडणुकीसाठी उभे केले होते. त्यांचा प्रचार करण्याची कामगिरी 'मराठा''ने उत्तम रितीने पार पाडली. समितीला पश्चिम महाराष्ट्रात भरघोस यश मिळाले. चळवळीच्या

ऐन मोक्यावर एक प्रकारे 'मराठा' निघाला होता. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत सुद्धा समितीला बहुमत मिळवून देण्यात 'मराठा'चा सिंहाचा वाटा होता. ज्या मुंबई शहरासाठी एवढे रण माजले होते, त्या शहरावर संयुक्त महाराष्ट्र समितीने आपला झेंडा फडकावून विरोधकांना चारीमुंड्या साफ चीत केले.

१३ ऑगस्ट १९५८ रोजी सेनापती बापट ह्यांच्या हस्ते 'मराठा'च्या पायाचा दगड बसविण्यात आला. ५ जून १९५९ रोजी स्वतःच्या वास्तूत मालकीच्या रोटरीवर दैनिक 'मराठा'चा पहिला अंक छापण्यात आला. ''१५ नोव्हेंबर १९५९ रोजी, तिसऱ्या वाढदिवसाच्या दिवशी 'मराठा'च्या 'शिवशक्ती' इमारतीचे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले''[६३] त्या वेळी लिहिलेल्या अग्रलेखात 'मराठा' काढण्याचा संकल्प कसा झाला, 'मराठा'चा प्रत्यक्ष जन्म कसा झाला, त्याचा दरारा कसा वाढत गेला, इत्यादी तपशीलवार वर्णन मोठ्या अभिमानाने लोकांपुढे मांडण्यात आले होते. ''तसेच खपाच्या दृष्टीने 'दैनिक मराठा' हे महाराष्ट्रातील तीन अग्रगण्य दैनिकांमधले एक अग्रेसर दैनिक होते. दैनिकाच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी मार्गात जो कोणी आड येईल त्याची खैर नाही. असा इशाराच दिलेला होता. राजकीय द्वेषाच्या आणि व्यावसायिक मत्सराच्या भांडवलावर 'दैनिक मराठा'सारख्या कट्टर महाराष्ट्रनिष्ठ वृत्तपत्राचे नुकसान करण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याचे मराठी जनता अक्षरशः थोबाड फोडल्यावाचून राहणार नाही! ''साडेतीन कोटी मराठी जनतेचे संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार व्हावे आणि महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचे राज्य यावे यापेक्षा 'दैनिक मराठा'ला दुसरे कोणतेही धोरण नाही वा राजकारण नाही. त्याचे गोत्र श्री शिवछत्रपती, त्याचे प्रवर तीन–फुले, टिळक नि आंबेडकर अन् त्याचा पक्ष एक–मराठी जनतेचा! ह्यापेक्षा

स्वतःबदल सांगण्यासारखे अधिक त्याच्याजवळ काही नाही,''[६४] असे आत्मविश्वासपूर्वक म्हटले होते. यावरून पत्राचा दृढनिश्चय कसा होता आणि निश्चयाच्या पूर्ततेसाठी किती प्रभावी भूमिका वाढविली याची प्रचिती येते.

'मराठा' पत्राचे दुसरे संपादक शिरीष पै यांनी या संदर्भात एका मुलाखतीत अलीकडेच असे म्हटले आहे की, ''आणीबाणीतील जाहिराती बंद होण्याचा प्रहार व कामगारांचे संप यामुळे पत्राची आर्थिक स्थिती बिघडली. शिवाय, बँकेचे कर्ज होतेच. यामुळे दैनिक चालविणे पूर्णतः अशक्य झाल्याने 'मराठा' बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी, मराठी उद्योगपती, काही संस्था यांच्याकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कोणीही मदतीचा हात पुढे केला नाही. पण संपूर्ण प्रेस व इमारत विकून बँकेचे कर्ज फेडण्यात आले व कामगारांना सर्व देणी देऊन त्यांना मुक्त करण्यात आले.''[६५] 'मराठा' पत्र अक्षरशः शून्यातून उभे राहिले. ते केवळ जनतेच्या उत्स्फूर्त पाठिंब्यावरच, आचार्य अत्रे यांची धडाडी व दांडगे व्यक्तिमत्त्व यामुळेच 'मराठा' उभा राहू शकला. 'मराठा' सुरू करताना स्वतःचे कार्यालय नव्हते, छापखाना नव्हता, यंत्रसामग्रीही नव्हती. दैनिकाचा अवाढव्य पसारा मांडण्यासाठी जेथे लाखो रुपयांचे भांडवल हवे तेथे, पत्र काढताना खात्यावर पुरे सत्तर रुपयेही नव्हते. कागदांची टंचाई व वाढत जाणारी महागाई यामुळे दैनिक वृत्तपत्र सुरू करण्याला परिस्थिती अनुकूल नव्हती. सरकारच्या विरोधात उभ्या राहिलेल्या चळवळीच्या प्रचारासाठी निघणाऱ्या दैनिकाला सरकारकडून मदत तर राहोच, पण अडथळे निर्माण केले जाण्याची शक्यता अधिक होती. अशा स्थितीत 'मराठा' निघाला आणि पाहता पाहतो तो वाढला. सर्व बाजूंनी तो सुसज्ज झाला. काही काळ महाराष्ट्रावर त्याने राज्य केले. पण जितक्या झपाट्याने तो

वाढला तितक्याच वेगाने त्वरित तो घसरत जाऊन एक दिवस नावही शिल्लक राहणार नाही, असा त्याचा अस्त झाला. सर्व दृष्टीशी सुसज्जता व खपाच्या दृष्टीने स्थैर्य असतानाही पत्राला टिकाऊपणा लाभला नाही. अवघ्या वीस वर्षात उच्च टोक गाठले आणि ''मराठा'' रसातळालाही गेला. मराठा पत्राचा हा वैभवशाली खेळ केवळ दोन दशकाचाच राहिला होता. कारण हे पत्र व्यक्ती प्रधान होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दबदबा होता. तेव्हा आचार्य अत्रे यांची विलक्षण छाप होती. ती कमी झाली आणि हे पत्र दुबळे झाले.

'मराठा' पत्र काढताना अत्रे यांची अपेक्षा व इच्छा असताही, संयुक्त महाराष्ट्र समितीतील कोणत्याही घटक पक्षाने या पत्राला साहाय्य केले नाही. यामुळे वैयक्तिक जबाबदारी व लोकांचा सक्रिय पाठिंबा यांच्या जोरावर अत्रे यांनी पत्र सुरू केले, वाढविले. आणि वैभवावर पोहोचविले. उत्साहाच्या भरात पुढचा विचार मात्र नीट झाला नसावा. पत्र टिकाऊ होण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले टाकली गेली की नाही याविषयी शंका वाटते. दूरवरचा विचार करण्याची वृत्ती अत्रे यांच्याजवळ नव्हती, तो त्यांचा पिंड नव्हता, लोकांच्या मदतीवर आणि पाठिंब्यावर उभे राहिलेले पत्र त्यांनी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या हाती ठेवले. कंपनीच्या संचालकांत फक्त अत्रे त्यांचे नजीकचे कुटुंबीयच होते. यामुळे अत्रे स्वतः उभे होते, तोपर्यंत सर्व व्यवस्थित राहिले. पण त्यांचे नंतर मात्र ते स्थैर्य उरले नाही. व्यक्तिगत जबाबदारी पत्करून अत्रे ह्यांनी धाडसाने पत्र काढले लोकांचा पाठिंबा असला तरी त्याला मर्यादा होती. यामुळे त्यांना कर्जाच्या बोजावरच पुढची उभारणी करावी लागली. हा बोजा सांभाळून पत्र चालविण्याची व्यवस्था करणे आवश्यक होते. अत्रे हयात असेपर्यंत धास्ती नव्हती. त्यांच्या स्वतःच्या प्रभावी

व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर सर्व निभावून नेता येत होते. पण त्यांच्या हयातीतच पत्राचा पहिला तोरा कमी होत असल्याचा अनुभव येऊ लागला होता. एका व्यक्तीवर संस्था उभी राहिली, तरी ती टिकाऊ करण्यासाठी तिला स्वतंत्र अस्तित्व येणे आवश्यक असते. 'मराठा' च्या बाबतीत हे झाले नाही. अत्रे यांच्या वैयक्तिक धाडसाने 'मराठा' पत्राचा संसार उभा राहिला, हे खरे. यामुळे पत्र त्यांनी खासगी मालकीनेच ठेवले. अत्रे यांची वृत्ती परंपराभिमानी होती. शिवाय, त्यांची आत्मनिष्ठाही प्रखर होती. यामुळे पत्राला सार्वजनिक स्वरूप देण्याचा विचार त्यांनी केल्याचे आठवण येत नाही. अत्रे यांचे व्यक्तिमत्त्व गर्दीचे, समुदायाचे होते पण त्यांच्यातील 'मी' पण तेवढेच प्रभावी होते. जनतेच्या उत्साहातून निर्माण झालेली संस्था त्यांनी जनतेच्या स्वाधीन केली नाही. प्रायव्हेट लिमिटेड कौटुंबिक कंपनीच्या ऐवजी सार्वजनिक ट्रस्टचे स्वरूप त्यांनी संस्थेला दिले असते, तर कदाचित 'मराठा' पत्र असे पाहता पाहता लुप्त झाले नसते. पण तसे झाले नाही. त्यांच्या पश्चात यामुळे पत्र त्यांच्या कुटुंबीयांच्याच ताब्यात राहिले. पण त्यांच्याजवळ अत्रे यांच्या एवढे व्यक्तिमत्त्व नव्हते, वा पत्र अगदी व्यावसायिक दृष्टीने व्यवस्थित चालविण्याचा बकुबही नव्हता. शिरीष पै या अत्र्यांनंतर संपादक झाल्या खऱ्या! पण वृत्तपत्र हे त्यांचे क्षेत्र नव्हते. व्यवस्थापनात त्यांच्या पतीच्या हाती सूत्रे गेली. पण त्यांनाही पत्र सांभाळणे जमले नाही. अत्रे कितीही धाडसी व कर्तबगार असले तरी, एखादी संस्था चालवावयास लागणारी शिस्त, योजनाबद्ध आखणी, हिशेबीपणा त्यांच्याजवळ नव्हता. त्यामुळेच पुढचा अनर्थ ओढवला. असे मत नोंदविले तरी ते गैरलागू ठरू नये कारण व्यक्तिप्रधान वृत्तपत्राची नेहमी वाताहत होते. कारण संस्थात्मक जीवनाचे भान त्यांना राहत नाही.

१९५७ च्या सार्वजनिक निवडणुकीचे  काळात, म्हणजे 'मराठा' सुरू झाल्यावर चार सहा महिन्यांतच 'सांज मराठा' हे सांय दैनिक सुरू करण्यात आले होते. १५ फेब्रुवारी १९५७ रोजी त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. हे सांयदैनिकही उत्तम चालत होते. पण संस्थाच संपल्यावर या सायंदैनिकाचाही शेवट झाला. त्याचे सूत्रधार म्हणून सुरुवातीला एक ज्येष्ठ पत्रकार 'नवा काळ' चे माजी सहसंपादक के. रा. पुरोहित हे काम पाहत असत.

### ३.३.४ परंपरा आणि प्रवाह

आचार्य अत्रे हे महाराष्ट्रातील निकोप व तेजस्वी परंपरेचे पाईक होते. त्यांनी केलेली पत्रकारिता ही सत्यासाठीची पत्रकारिता होती. अन्याय व अत्याचार कुठेही घडो, त्याचे अचूक शरसंधान करणार आणि लोकांना न्याय मिळवून देणार असा त्यांचा बाणा होता. पत्रकार हा जेव्हा प्रभावी वक्ता असतो, तेव्हा तो जनमताचा कौल आग्रहाने व बुलंदपणे मांडत असतो, हे आचार्य अत्रे यांचे अग्रलेख वाचताना तसेच त्यांच्या भाषणाचे वृत्तांत वाचताना पटू लागते. मेणाहून मऊ आणि वज्राहून कठोर असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते अत्रे यांनी जसे आक्रमकत्व अग्रलेख लिहिले तसेच त्यांनी समाधीवरील अश्रू पुसणारे भावगर्भ अग्रलेखही लिहिले. थोर पुरुषांच्या कामगिरीवर त्यांनी लिहिलेले अग्रलेख ग्रंथ पृष्ठे प्रकाशित झाले आहेत. पं. जवाहरलाल नेहरू, स्वा. सावरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या जीवनकार्यावर डॉ.प्रकाश टाकणारे त्यांनी लिहिलेले अग्रलेख आजही मराठी साहित्याचा एक अमर ठेवा बनले आहेत. त्याची साहित्य सारस्वतातील कामगिरी अत्यंत अतुलनीय आणि बहुमोल ठरलेली आहे. पण त्याहीपेक्षा

महत्त्वाची बाब म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे खंदे पुरस्कर्ते म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात त्याची जी नोंद झाली ती कोणालाही पुसता येणार नाही. त्यातच त्यांच्या कामगिरीची थोरवी सामावलेली होती. नवयुग पत्राला जे जमले नाही ते कार्य त्यांनी मराठा या दैनिकाच्या माध्यमातून करून दाखविले  आणि सारा महाराष्ट्र आपल्या बुलंद विचारांनी पुलकित केला. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारा प्रतिभाशाली महामानव असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील त्यांचे योगदान महाराष्ट्राला कधीच विसरता येणार नाही.

मराठी वृत्तपत्रांत विष्णुशास्त्री, शिवरामपंत परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा परंपराभिमानी संप्रदाय आहे. अत्रे यांनी तीच परंपरा पुढे चालविली. तोच त्यांचा प्रकृतिधर्म होता. यामुळे पत्रावर आपली छाप हवी, अशी त्यांनी भावना असे. संपादकाच्या नावाने पत्राची ओळख पटणाऱ्या परंपरेच्या मोशीतील अत्रे हे एक संपादक होते. स्वतःचे व्यक्तिमत्त्व पुढे उभे करण्याची त्यांची वृत्ती होती. आजच्या वृत्तपत्रांना स्वतःचे असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते व त्यात संपादकांचे व्यक्तिमत्त्व विलीन झालेले असते, किमान आजच्या ते पत्रात प्रकर्षाने जाणवत नाही. अत्रे यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्यातील संपादकावर कुरघोडी करणारे होते. आपण केलेल्या कार्याची तर ते जाहिरात करीतच असत, पण त्यांच्या व्याख्यानांचेही प्रदीर्घ अहवाल ''मराठा''त प्रसिद्ध होत असत. कोणत्याही दैनिकाचा संपादक आपल्याच पत्रात आपली एवढी प्रसिद्ध करीत नाही. आपले पत्र लोकांना दाखविण्याची, त्याबाबत सांगण्याची अत्रे यांना दांडगी हौस होती. दैनिक पत्रात आपल्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब पडले पाहिजे, असे त्यांना मनापासून वाटत असे. दैनिक हे आपले व्यक्तिगत व्यासपीठ आहे, ही त्यांची

भावना एवढी तीव्र असावी की, आपल्या नातवांच्या मुंजीबद्दल आठस्तंभी मथळा ठळक अक्षरात छापताना त्यांना कशाचीही जराही खंत वाटली नाही. अत्रे ह्यांच्या या हव्यासाबद्दल प्रबोधनकार ठाकरे ह्यांनी अत्रे गौरव ग्रंथात आपले सडेतोड मत त्यांच्या हयातीतच मांडले होते... ''न्यूज पेपर असो वा व्ह्युज पेर असो, त्याच्या संपादकाची भूमिका ठरलेली आहे. महाराष्ट्रात तरी ती एक परंपरा म्हणून आदरिली जाते. जनतेचा आवाज, तिच्या भावना, आशा आकांक्षा यांना यथातथ्य व्यक्त करणारा, ही ती भूमिका, संपादन–कार्यात त्यांचे व्यक्तिमत्त्व हिशोबात घेतले जात असले, तरी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे कसलेही थेर तेथे त्याला करता येत नाहीत. लोकमताचा बोलका प्रतिनिधी या नात्याने ते व्यक्तिमत्त्व लोकमतांतच विरलेले असले पाहिजे. ही महाराष्ट्राची थोर परंपरा संपादक अत्रे यांनी दुखविली आहे. येथेही त्यांची पिण्डप्रसिध्द आत्मस्तोमाची लालसा इतकी बळावली, की अत्रे महाशयांच्या लहान मोठ्या फोटोशिवाय, व्याख्यानांच्या लांबलांब अहवालाशिवाय, सत्काराच्या रसाळ वर्णनाशिवाय एकही अंक सुना जात नाहीसा झाला आहे. त्यामुळे हे न्यूज पेपर आहे की फक्त 'अत्रे बुलेटिन' आहे, महाराष्ट्राचे लढाऊ दैनिक आहे की, संपादक अत्रे महाशयांच्या दैनंदिन चरित्राची बखर–बतावणी आहे, याची घरोघरी चर्चाचिकित्सा चालते आणि टीकाही होते. आपल्याच साप्ताहिकात, दैनिकात आपणच आपली स्तुती किती मर्यादेपर्यंत करावी आणि करवूनही घ्यावी, याचे ताळतंत्रच त्यांनी लाथाडले आहे. लो. टिळकांचा 'केसरी' घ्या, परांजप्यांचा 'काळ' घ्या, अच्युतरावांचा 'संदेश' आठवा, फार काय मुंबईचा 'नवा काळ' पाहा अथवा पुण्याचा 'प्रभात' पाहा, कोणतेही इंग्रजी, मराठी, गुजराती वर्तमानपत्र तपासा, त्यात संपादकाच्या वैयक्तिक भलेबुरेपणाचा मजकूर शोधूनही सापडायचा नाही.

लोकमताचे वारे कसे वाहताहेत, तेवढेच आणि तितकेच दाखविणारे आपण अक्षरशः 'त्रयस्थ आणि मध्यस्थ' (माऊथपीस) आहोत, आपल्याला जर काही थोरपणा आलेलाच असेल तर तो इतरांनी गावा नि सांगावा, आपणच आपली टिमकी वाजवीत बसलो तर लोक काय म्हणतील, विचारवंत आपली किंमत काय करतील, हा परंपरेचा धाक बाळगणारे संपादक होते नि आहेत. 'अत्रे यांचा हा न्याराच पवित्रा त्या परंपरेतील पावित्र्य दुखावीत आहे. इतकेच नव्हे तर, पुढे मागे हे आत्मस्तोमाचे व्यसन त्यांच्या इतर व्यसनांपेक्षा विशेष जाचक ठरण्याचा संभव आहे.''[६६] आचार्य अत्रे यांच्या पत्रकारितेला काही मर्यादा होत्या हे तेव्हा त्यांना कळले नाही पण त्यांच्या उत्तर काळात ही उणीव दिसून आली. प्रबोधनकारांचा हा उतारा दीघ आहे, पण तो सुस्पष्ट व विशेष बोलका आहे. त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज नसली तरी आचार्य अत्रे यांनी यातील कशाचेही भान न ठेवता आपलीच हातोटी दैनिकातून कशी चालू ठेवली यावर निश्चितच प्रकाश पडतो.

प्रबोधनकारांसारख्या अनेक टीका वेगवेगळ्या माध्यमांतून होत असल्या, तरी आपल्या घणाघाती प्रहारांनी अत्रे यांनी विरोधकांचे वाभाडे काढून त्यांना सळो की पळो करून सोडले होते. काकासाहेब लिमये ह्यांच्या संपादनाचे रहस्य सांगताना अत्रे यांनी म्हटले होते की, वृत्तपत्र हे व्यापक समाज जीवनाशी जितके समरस होईल तितके ते जास्त लोकप्रिय व प्रभावी होईल. अत्रे ह्यांनी स्वतः ते रहस्य आत्मसात केले होते. जीवनाविषयीचे सर्वंकष आकर्षण अत्रे यांच्या पत्र व्यवसायाला उपकारक ठरले. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचेही अनुकरण अत्रे यांच्या वृत्तपत्रीय लेखनात आढळते. अच्युतरावांप्रमाणे अत्रे यांच्या लेखणीत काव्य, विनोद, वक्तृत्व यांचा मिलाफ झालेला

होताच. पण अच्युतरावांची भव्यतेची आवड अत्र्यांच्या ठिकाणी उत्कर्ष पावली होती. लेख लिहिताना अत्रे ह्यांच्या डोळ्यांपुढे त्यांचा वाचकवर्ग नेहमी उभा असे व हा वाचकवर्ग मूठभर चोखंदळ रसिकांचा नसे, तर तो बहुजन समाजातील असे. ज्या गोष्टींचा ते पुरस्कार करीत त्या गोष्टीवर त्या त्या क्षणी तरी त्यांची नितान्त निष्ठा असे. याचा अर्थ असा की आचार्य अत्रे महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागात राहणाऱ्या वाचकांच्या विचार करत असे. त्यांची वृत्ती बहिर्मुख होती. जे आपण अनुभवले, पाहिजे ते लोकांना सांगण्याच्या त्यांच्या उत्साहाला पार नव्हता. त्यांचे लेखन कमालीचे सुबोध व प्रसन्न असे. रकानेच्या रकाने मजकूर अतिशय सोप्या व डौलदार भाषेत ते लिहू शकत असत. ‘आषाढस्य प्रथम दिवसे’ या संग्रहात एकत्रित केलेले त्यांचे ‘मराठा’तील अग्रलेख किंवा त्यांचे मृत्युलेख ह्या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. अशा लेखांतून त्यांच्या कार्यशक्तीचा, जिव्हाळ्याचा प्रत्यय येतो. आडदांड वाटणारा हा संपादक अंतःकरणाचा कोमल व बालसुलभ होता, हे जाणवते. लेखनाबद्दल व वाचकाबद्दल त्याला विलक्षण जिव्हाळा होता. आचार्य अत्रे आत्माभिमानी स्वप्रसिद्धीसाठीचा हव्यास, आणि मीपणाचा हव्यास असलेले असले तरी, त्यांनी मराठामधून केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या विपुल लेखनावर अनेक संपादकांनी अनुकूल आणि प्रतिकूल असे आपले दोन्ही प्रकारचे अभिप्राय आचार्य अत्रे यांचा संपादकांच्या संदर्भात नोंदविलेला आहे.

आचार्य अत्रे यांच्या शरीरातील पहेलवानी मस्तीमुळे की काय, पण विरोधकांबरोबर कुस्ती खेळण्याची खुमखुमी आचार्य अत्रे यांना फार असे. उपहास, उपरोधाने एखाद्याला हास्यास्पद करणे त्यांना चांगलेच साधे. त्याचबरोबर एखाद्याविषयी राग आला की, कोणताही मुलाहिजा न ठेवता अत्र्यांच्या लेखणीचा अनावर असा

स्वैरसंचार होई. रागाच्या भरात संयम तर राहोच, पण कोणत्या शब्दांचा आपण वापर करतो याचेही भान त्यांना राहत नसे. त्यांचा हा अवतार त्या वेळच्या क्षणिक रागापुरताच असे. तरीसुद्धा त्यांच्या मुद्रित शब्दांनी व्हायची ती हानी होऊनच जात असे. प्रत्येक मराठी माणसाच्या अभिरुचीवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो याचे मात्र त्यांना भान राहत नसे. अत्रे यांच्या लेखनात संयमाला जागा नसल्याने, प्रतिपक्षाचे मुद्दे खोडून काढण्यापेक्षा त्यांची टवाळी करण्याकडे त्यांचा जास्त अधिक कल असे. त्यासाठी मग त्या व्यक्तीचे व्यंग, आजार, आई–बाप, इत्यादींचा सहज उद्धार होऊन जाई. हरामखोर, नराधम, राक्षस, सैतान, अशा शब्दांची खैरात केली जात असे. जोडेपट्टीची भाषा सहज वापरली जाई. एखाद्याच्या म्हातारपणाचा उल्लेख थेरडेपणा, तोंडाचे बोळके झालेला असा करण्यात येत असे. अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या शैलीचा अत्रे यांच्यावर परिणाम झालेला होता. पण शेवटी कोल्हटकर वाहत जाऊन टिळकांवरच घसरले. उपरोधातून नालस्ती करण्यात अत्रे कोल्हटकरांच्याही पुढे गेले. नालस्ती हे त्यांच्या हातातील प्रभावी शस्त्र ठरले. वैयक्तिक कुचाळकी आणि निंदा–नालस्ती करताना बेभान होऊन लेखन करण्याचा गुण टिळक–आगरकरांच्या लेखनातही आढळतो. त्यांच्या बाबतीत ती अपवादात्मक बाब होती. पण अत्रे यांच्याबाबत जणू ती नित्याची बाब झाली होती. 'नवयुग'मध्ये होते तेच 'मराठा'त कायम राहिले, व नित्य दररोज घडू लागले. अस्सल शिवराळपणा व विकृत प्रसिद्धी हा त्यांच्या संपादकत्वाचा जणू स्थायिभाव झाला होता. असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

आचार्य अत्र्यांना शिव्यांच्या आणि निंदानालस्तीच्या क्षेत्रात पृथ्वीतील निर्वीर झाल्यासारखे वाटते. कोणाचा बाप, कोणाचा पोषाख, कोणाचे व्यंग कोणाचे आजार

अशातले काहीही प्रतिपक्षावर हल्ला चढविताना पुरते... 'मराठा'कारांसारख्या प्रवृत्तीच्या पत्रांना अस्तपक्षी व सरळ रीतीने काही करणेच शक्य नसते. सूक्ष्म रीतीने बघितले तर आपल्याला हे सहज पटेल की, कोणाला ना कोणाला लोळविल्याखेरीज, कोणाची ना कोणाची सतत टवाळी केल्याखेरीज ही तृष्णा शमतच नाही. 'यामुळे कधी नेहरूंची, कधी यशवंतरावांची, कधी एस. एम. जोशींची, कधी नानासाहेब गोरे यांची, तर कधी कन्नमवारांची पाठ पुरविताना अत्रे दिसतात. ज्या एस. एम. जोशींना अत्र्यांनी डोक्यावर घेतले त्यांच्यावर नंतर टीका करताना अत्यंत गलिच्छ शब्द वापरताना अत्रे यांना जराही दिक्कत वाटली नाही.''[६७] त्यांच्या टीकेची पातळी घसरत असे त्यामुळे मध्यमवर्गीय वाचक त्याच्यापासून दूर जात असत.

अत्रे यांच्या 'बेगुमान भालेराई'ला 'आदेश'कार पु. भा. भावे यांनी कसे नमविले त्याचा मागे उल्लेख केला आहे. त्यानंतर 'मार्मिक'कारांनी व त्यांचे वडील प्रबोधनकार ठाकरे ह्यांनी अत्रे ह्यांचा पुरेपूर समाचार घेऊन अत्रे यांचे तोंड गप्प केले. पण ही उदाहरणे आपणास अपवादानेच सापडतात. नाहीतर अत्रे यांच्या माऱ्याने अनेकांना घायाळ केले. या गोष्टीचा अतिरेक झाल्यामुळे ती अधिक निषेधार्ह ठरते. अत्रे यांच्या संपादकीय कर्तृत्वात अनेक चांगले गुण होते. परंतु गलिच्छ टीका पद्धतीने त्यांनी टीका केली होती.

आचार्य अत्रे यांनी आपल्या अग्रलेखातून व लेखांतून शिवराळपणाचा वापर केल्यामुळे 'मराठा'त लिहिणाऱ्या इतरांच्या लेखनातही तसाच प्रकार आढळे. 'मराठा'मधील बातम्यांतूनही त्या त्या व्यक्तींच्या नावाचे विकृत रूप वापरले जात असल्याची अनेक दाहणरणे आहेत. डॉ. नरवणे यांचे नाव बातमीतही 'तिंबूनाना' असेच

लिहिले जाई. अशी इतरही अनेक उदाहरणे सहज काढून दाखवता येतील. ‘ढाल तलवार’ या सदरात एकदा, ‘नवा काळ’कर्ते खाडिलकर पितापुत्रांना ‘शेणकिडे’ ही पदवी देण्यात आली होती. अत्र्यांच्या शिवराळपणाचा कित्ता त्यांचे सहकारीही गिरवीत असत, असे दिसून येते. अत्रे यांच्या अशा या टीकाटिप्पणींचा एक वेगळा वाचकवर्ग होता पण तो केवळ खेड्यातच होता शहरातील सज्जन माणसे मात्र त्यांच्या या शिवराळ टीकेमुळे त्यांच्यापासून दूर राहत.

‘मराठा’ पत्राला संपादक अत्रे यांच्यामुळे यश लाभले हे खरे असले तरी, पण वृत्तपत्र हे सांघिक काम असल्याने इतर अनेकांची मदत या वृत्तपत्राला लाभलेला होते. विनायक भावे हे प्रथमपासून ‘मराठा’चे सहसंपादक होते व अत्रे यांच्या शैलीने लेखन करीत असत. नामवंत पत्रकार र. गो. सरदेसाई ‘मराठा’त दीर्घकाळ होते. वृत्तसंपादक म्हणून त्यांनी काम केले. अग्रलेखही तेच लिहीत. अत्रे यांच्या नावावर जमा झालेले व गाजलेले काही मृत्युलेख सरदेसाई यांनीच लिहिलेले होते. सरदेसाई यांनी वृत्तपत्र संपादकाची जबाबदारी बरीच वर्षे सांभाळली होती. दीर्घ अनुभव, साक्षेपी दृष्टी व चतुरस्त्रता यामुळे सरदेसाई कोणतेही काम सारख्याच दक्षतेने करू शकत असत. माहितीच्या दृष्टीने तर ते एक ज्ञानकोशच होते. यामुळे संदर्भाच्या बाबतीत त्यांचा विशेष उपयोग होत असे. कामगार क्षेत्रात व राजकीय क्षेत्रात काम केलेले कॉम्रेड गो. द. साने हे, काही काळ सहसंपादक होते. रामभाऊ उटगी यांनी वृत्तसंपादक आणि सहसंपादक म्हणून शेवटपर्यंत काम पाहिले. आता ‘महाराष्ट्र टाइम्स’ दैनिकाचे सहसंपादक असलेले अनंत मराठे हे प्रारंभीच्या काळात वृत्तसंपादक होते. नाटककार व समीक्षक आत्माराम सावंत, नामवंत नाटककार विजय तेंडुलकर, वि.म.तथा अण्णा फणसे, कवी रॉक

कार्व्हालो, वसंत सोपारकर, कवी नारायण पेडणेकर, बाळाराव सावरकर, व. मा. देशपांडे, प्रभाकर नेवगी, मधुकर भावे, चंद्रकांत गुप्ते, मनोहर पिंगळे, अशोक पडबिद्री, वसंत मोरे, मुसळे, पारकर इत्यादी अनेक लोक संपादक मंडळात होते. दत्त आंबेकर, विनायक गोखले, पवार या छायाचित्रकारांचाही उल्लेख येथे करणे आवश्यक आहे.

### ३.३.५ समालोचन

अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' या पत्राने घेतलेली वेगवेगळी भूमिका विलक्षण असल्याने दिसून येते. हे पत्र जनतेच्या चळवळीचे मुखपत्र बनले आणि या पत्राने राजकारण, अर्थकारण, साहित्य, समाज व संस्कृती अशा सर्व क्षेत्रांवर आपलातून ठसा उमटविला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐरणीवर आणून महाराष्ट्रातील जे मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकात, मध्य भारतात व हैदराबाद राज्यात होते त्या प्रदेशांना एकत्र आणण्यासाठी आचार्य अत्रे यांनी केलेला खटाटोप हा इतिहासाचे प्रवाह बदलणारा होता. असेच म्हणता येईल. येथे 'झाले बहु, होतील बहु परी यासम' असेच आचार्य अत्रे यांच्या कामगिरीचे वर्णन करावे लागेल. आचार्य अत्रे यांच्या मराठा पत्राने एखाद्या बुलंद तोफेप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ समर्थपणे लढविली आणि जनमताचा प्रवाह आपल्या बाजूने खेचून आणला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला गती, शक्ती आणि स्फूर्ती देण्यात 'मराठा' पत्राने बजावलेल्या कामगिरीला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही, तसेच म्हणावे लागेल. कारण या पत्राने सर्व मराठी वृत्तपत्रांचे नेतृत्व केले आणि अखेर संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश खेचून आणला. या पत्रातील लेख, अग्रलेख, वार्ता या सर्वांचे अध्ययन केले

असता, त्यामधून लिहिलेला प्रत्येक शब्द हा संयुक्त महाराष्ट्र हाच मंत्र जपत असल्याचे दिसून येते. आपल्या पत्राच्या प्रत्येक स्तंभातून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला कायमच उचलून धरले, त्यामुळेच आचार्य अत्रे यांनी चालविलेल्या वेगवेगळ्या वृत्तपत्राचे सदरे योगदान होते असेच नमूद करावे लागेल.

## ३.४ दै. 'सकाळ'

'सकाळ' हे वृत्तपत्र महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनलेले आहे. या पत्राचा पाया कोलंबिया विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असलेल्या डॉ. ना. भि. परुळेकर यांनी घातला. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन डॉ. परुळेकरांनी वृत्तपत्र व्यवसाय लोकाभिमुख केला. त्यांना बनारस हिंदू विद्यापीठात प्राध्यापक म्हणून पं. मदनमोहन मालवीय यांनी निमंत्रित केले होते. पण चार भिंतीमध्ये प्राध्यापक होण्यापेक्षा आपण लोकशिक्षक होऊ या प्रांजळ भावनेने त्यांनी वर्तमानपत्र सुरू केले. सकाळ या पत्रामध्ये सामान्य माणसाच्या भावना कायमच व्यक्त करत त्यांनी जनतेचे ज्वलंत प्रश्न मांडले. गोवऱ्या लावणाऱ्या बाईचे चित्र पहिल्यांदा सकाळ या वृत्तपत्रात छापून आले. तसेच ग्रामीण महाराष्ट्रातील लोकांच्या बिकट समस्यांचा कायमच शोध घेऊन हिरिरीने मांडण्याचे काम 'सकाळ' या वृत्तपत्राने केले. एक तटस्थ मध्यस्थ या नात्याने सकाळ या पत्राने वस्तुनिष्ठ, पारदर्शी आणि संयमित लेखनाचा पुरस्कार केला. 'सकाळ' पत्राचे अग्रलेख शांत, समतोल व संयमित असते.

'सकाळ' पत्रातील अग्रलेखांची भाषा कधीही सनसनाटी किंवा भावनिक नव्हती. सकाळ पत्र समतोल व यथायोग्य विश्लेषणावर भर देणारे होते. बातमी पवित्र

असते व प्रतिक्रिया या मुक्त असतात हे सूत्र घेऊन या वृत्तपत्राने सर्वांच्या बातम्या प्रकाशित करण्याचे धोरण अनुसरले. संयुक्त महाराष्ट्राच्या काळात या वृत्तपत्राने घेतलेली भूमिका या भागात अभ्यासलेली आहे. त्यासाठी प्रथम परुळेकरांचे जीवन व कार्य यावर प्रकाश टाकला आहे. त्यानंतर 'सकाळ' पत्रातील काही पुरावे देऊन या प्रश्नावर संपादकांनी मांडलेली मते व विचार यांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील या पत्राची भूमिका समजून घेण्यास आणि आकलन होण्यास निश्चितच फलदायी ठरू शकेल.

''२० सप्टेंबर १८९७ रोजी एका शेतकरी कुटुंबात कोल्हापूर जिल्ह्यातील गोडची या खेडेगावी एक मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात डॉ. नानासाहेब परुळेकर यांचा जन्म झाला.''[६८] लहान वयातच त्यांच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे घरची पूर्ण जबाबदारी त्यांच्यावर पडली होती. गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे ते कोल्हापूरला आले. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे ते वार लावून जेवत असत, त्यामुळे डॉ. परुळेकर यांना वार लावून अनेक कुटुंबाकडे जेवण करण्याची सोय झाली. काही वर्षे कोल्हापूरला काढल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते १९०९ साली त्यांनी पुणे शहर गाठले.

### ३.४.१ शिक्षण

पुणे शहरात अनाथ व गरीब मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टीने पुण्यातील बाळूकाका कानिटकर व दादासाहेब केतकर तसेच प्रो. रामभाऊ पटवर्धन यांच्या प्रयत्नाने अनाथ विद्यार्थिगृहाची स्थापना केली होती. कानिटकरांनी डॉ. परुळेकर

यांची राहण्याची व जेवणाची सोय केली. नूतन मराठी या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत त्यांनी प्रवेश घेतला. त्यांना अनेक नामवंत शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले होते. त्यापैकी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे एक शिक्षक होते.

डॉ. परुळेकर हे अनाथ विद्यार्थिगृहात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांसाठी काही उपक्रम सुरू केले होते. त्यात प्रामुख्याने विद्यार्थी नावाचे हस्तलिखित मासिक होते. त्या मासिकाच्या पहिल्या अंकाचे संपादन करण्याची संधी डॉ. परुळेकर यांना मिळाली. त्या वेळी ते अवघे १७ वर्षाचे होते. त्या मासिकातील अग्रलेख डॉ. परुळेकरांनी लिहिले, या हस्तलिखितामध्ये प्रामुख्याने कोणत्या बाबींना स्थान द्यायचे या संदर्भातील माहिती डॉ. परुळेकर यांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केली आहे.

''दर महिन्याला हे मासिक मी व्यवस्थित काढी. विद्यार्थी या मासिकात स्फुटे, अग्रलेख असत, प्रचलित प्रश्नांवर चर्चा, त्याखेरीज मोठ्यांची चरित्रे, प्रवास वर्णने, पत्रव्यवहार, प्रासंगिक बोल, पुस्तकांची पोच, अभिप्राय असा विविध विषयांवरील मजकूर असे.''[६९] विद्यार्थी या मासिकात समाजातील विशेष घडणाऱ्या घटनेला अग्रलेखात स्थान दिल्याने या मासिकाने वाचकांमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. विविध विषयांवरील मजकुरामुळे विविध पातळीवरील वाचकवर्ग या मासिकाशी जोडला गेला होता.

१९१७ साली डॉ. परुळेकर हे शालान्त प्रमाणपत्र परीक्षा चांगल्या श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. पुढील उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील सर परशुराम भाऊ महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९२० साली ते तत्त्वज्ञान विषय घेऊन बी.ए.मध्ये पदवीधर झाले. पदवीनंतर १९२१ ते २३ या दोन वर्षाच्या कालावधीत त्यांनी अनाथ

विद्यार्थिगृहाच्या महाराष्ट्र विद्यालयात अध्यापन केले. त्यांच्या जवळचे मित्र शंकर कृष्णा मराठे डॉ. परुळेकर हुशार असल्यामुळे त्यांनी पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत यावे, असे सुचविले. पण घरची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्यांना शक्य वाटत नव्हते. या संदर्भात ते लिहितात, ''त्याच वेळी त्यांना दोन व्यक्तींकडून आर्थिक मदत झाली, त्यात प्रामुख्याने अंमळनेरच्या न्यू प्रताप मिलचे मालक श्रीमंत प्रतापशेठ यांनी तत्त्वज्ञान विषयात अमेरिकेत जात आहेत, हे समजल्यावर चार हजार रुपयांची मदत केली.''[७०] मुंबईचे अनंत शिवाजी देसाई (टोपीवाले) यांना शिक्षणाविषयी फार आस्था होती. एक लाख रुपये त्यांनी बाजूला काढून ठेवले होते. त्या पैशाच्या ठेवीपोटी मिळणाऱ्या व्याजामधून शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्याला ते शिष्यवृत्ती देत असत. डॉ. परुळेकर यांचा देसाई यांचेसी पूर्वीपासूनच परिचय होता. एवढ्या रुपयांच्या पाठिंब्यावर तत्त्वज्ञान विषयात एम.ए. आणि पीएच.डी. करण्यासाठी १९२३ साली डॉ. परुळेकर हे अमेरिकेला गेले. तेथूनच खऱ्या अर्थाने परुळेकरांच्या शिक्षणाला एक वेगळी दिशा मिळाली.

अमेरिकेत शिक्षण घेत असताना त्यांनी एम. ए. च्या अभ्यासक्रमात वृत्तव्यवसाय हा विषय निवडला होता. त्याचा याच विषयात पुढे त्यांनी कर्तृत्व गाजवले. अमेरिकेतील शिक्षणाच्या काळात एकीकडे त्यांचा पत्रकार म्हणून जडणघडण होण्यास सुरुवात झाली. वृत्तपत्राच्या सैद्धांतिक शिक्षणाऐवजी विविध प्रकारच्या वृत्तपत्रांचे, नियतकालिकांचे वाचन निरीक्षण हाच खरा अभ्यास होता. अमेरिकेत शिक्षण घेताना त्यांनी वृत्तपत्र या विषयांच्या संदर्भात कोणकोणत्या बाबींना त्यांनी स्थान दिले या संदर्भात ते लिहितात की, ''वृत्तविद्येतील एक बारकावे त्यांनी टिपून घेतले. त्यातील

रहस्य जाणून घेतले. वृत्तपत्रात चाकरी असता काम नये, विषयाची निवड व मांडणी यामध्ये प्रयत्नपूर्वक विविधता आणावी लागते.''[७१] परुळेकराच्या या दृष्टिकोनामुळे पत्रकारिता हा विषय हा एक सुज्ञ अभ्यासकाचा ही विषय आहे. याकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले आणि आपल्या पत्रकारितेला सूक्ष्म निरीक्षण आणि परीक्षणाची जोड दिली.

प्रदेशात शिक्षण घेत असताना डॉ. परुळेकरांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले तरीही त्यांनी अनेक अडचणींवर संयमाने मात करीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले या कालावधीत शिष्यवृत्तीचा एक त्यांना आधार मिळालेला होता. आपल्या आत्मचरित्रात ते म्हणतात, ''कोणालाही जी आपत्ती वाटली असती, तिच्या दुसऱ्या बाजूला आणखी वेगळे जग होते. एका दृष्टीने ही शिष्यवृत्ती बुडाली, ती एक भली गोष्ट झाली, असे मला वाटते. नाही तर मी पुस्तकी विद्या करीत राहिलो असतो.''[७२] यावरून परुळेकरांनी आपली वाटचाल अत्यंत खडतर परिस्थितीतून पुढे सुरू ठेवली हेच स्पष्ट होते.

### ३.४.२ डॉ. नानासाहेब परुळेकर यांची पत्रकारिता

डॉ. नानासाहेब परुळेकर यांचे उच्च शिक्षण अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य देशात झाल्यामुळे त्यांनी विविध विषयावर लिखाण करून वृत्तपत्र व्यवसायात आपला एक वेगळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला. मायदेशी परतल्यानंतर परुळेकरांनी १९३२ ला सकाळ या वृत्तपत्राला प्रारंभ केला. दैनिक सकाळ ही मराठी वृत्तपत्रांत एक मोलाची भर पडली. डॉ. परुळेकरांनी अमेरिकेतील वास्तव्यास विद्या संपादन करताना ताज्या बातमीचे महत्त्व जाणले होते. वृत्तपत्र हे समाजाचे प्रबोधन तसेच लोकशिक्षणाचे एक

महत्त्वाचे माध्यम आहे. तसेच ते समाजातील केवळ चार बुद्धिवादी लोकांसाठी नसून समाजातील, सर्व स्तरांतील लोकांचे आहे. हे त्यांनी जाणून होते. म्हणून त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून राजकारण, समाजकारण याच बरोबर शिक्षण, न्याय बाजार तसेच जीवनाच्या सांस्कृतिक घडामोडींची माहिती दिलेली दिसते.

१९४६च्या सुमारास मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा ही जनतेची मागणीही राज्यात जोर धरू लागली होती. सुरुवातीच्या काळात शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेने केंद्र सरकारकडे वारंवार विनंत्या करून सामोपचाराने ही मागणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु काँग्रेस श्रेष्ठींनी विविध सबबी पुढे करून ही त्यांची मागणी वारंवार धुडकावली. त्यामुळे आपली मागणी रास्त असतानाही केंद्र सरकार महाराष्ट्रावर अन्याय करीत आहे, असे त्यांना वाटू लागले. त्यातच राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. अहवालामुळे मराठी भाषिकांच्या भावनेला पारावार उरला नाही. प्रक्षोभ जनसागर रस्त्यावर उतरला सरकारने दडपशाही करून जमावाला काबूत आणण्यासाठी अश्रुधूर व गोळीबार केला. त्या गोळीबारात १०६ नागरिक हुतात्मा झाले. यावरून स्पष्ट होते की, परुळेकरांनी केवळ पत्रकारिताच केली नाही तर त्याच बरोबर त्यांनी समाजकारण व राजकारण अशा सामाजिक विषयालाही तितकेच महत्त्व दिले.

परुळेकरांनी आपल्या ‘सकाळ’ या वृत्तपत्रामध्ये समाजकारण व लोकशिक्षणावर भर दिला होता. ‘सकाळ’ या पत्राने अनेक घटनेचे वर्तमान दिले आहेत, परंतु ते तटस्थपणे दिलेले आहेत. ‘सकाळ‘च्या धोरणानुसार माहिती लोकांसमोर ठेवावयाची, मते लोकांनी बनवावीत असा त्यांचा दृष्टिकोन होता. ’सकाळ‘कार

नानासाहेब परुळेकर हे आपली पत्रकारिता तटस्थ व वस्तुनिष्ठपणे करत असत. कोणत्याही प्रकारची सनसनाटी किंवा अतिश्योक्ती आपल्या वृत्तपत्राद्वारे होऊ नये, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे प्रश्न कोणताही असो, ते काटेकोरपणे विचार करून वस्तुनिष्ठ मते मांडत आणि समतोल दृष्टीने त्यावर भाष्य करत असत.

### ३.४.३ देशाच्या फाळणीबाबत दै. 'सकाळ'ची भूमिका

पत्रकारितेबरोबरच परुळेकरांनी एक पत्रकार म्हणून समाजातील राजकीय सामाजिक घडामोडींवर लक्ष केंद्रित केले होते. त्यांनी भाषिक राज्यांच्या मागणीला विरोध दर्शविला. भाषिक राज्यांच्या स्थापनेमुळे लोकांमध्ये संकुचित प्रांतवाद, जातीयवाद, भाषावाद दृढमूल होईल आणि यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला, अखंडत्वाला धोका पोहोचेल, असा युक्तिवाद करून डॉ. परुळेकरांनी भाषिक राज्याच्या निर्मितीला विरोध केला होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश भारत सोडून जाणार व देशाला स्वातंत्र्य मिळणार हे समजल्यानंतर बॅ. जिना यांनी धर्माच्या नावावर वेगळ्या पाकिस्तानची मागणी केली. त्यासाठी त्यांनी १९४६ च्या दशकात मोठ्या प्रमाणात रक्तपात घडवून आणला. त्यामुळे राज्यकर्त्यांना नाखुशीने देशाची फाळणी करावी लागली. याबद्दल डॉ. परुळेकर यांनी राज्यकर्त्यांना दोषी धरले. ते म्हणाले, ''देशाच्या फाळणीला आजचे राज्यकर्ते कारणीभूत असल्यामुळे, त्यांच्या हाती सत्ता असेपर्यंत या दुर्दैवी घटनेच्या पुढे इतिहास येणार नाही.''[७३] अशा प्रकारे परुळेकरांची भूमिका स्पष्ट होती त्यांनी आपल्या भूमिकेत समाजहिताला प्राधान्य दिले होते.

देश पातळीवरही परुळेकरांची भूमिका इतकी स्पष्ट होती की, देशाची फाळणी होऊ नये. देश अखंड राहावा असे त्यांचे मत होते. परंतु बॅ. जिना यांनी धर्माच्या नावावर वेगळ्या पाकिस्तानची मागणी केली व ती आमच्या नवीन पिढीतील नेत्यांनी तत्काळ मान्य केली. शिवाय समोरचा व्यक्ती काय म्हणतो त्याचे म्हणणे ऐकून न घेता स्वतःचाच विचार पुढे रेटणाऱ्या नेत्यांचा त्यांनी निषेध करून डॉ. परुळेकरांनी त्यांच्यावर अनेकदा टीका केली आहे. ते म्हणतात, ''देशाच्या फाळणीला इतिहास लिहिण्याचे हे स्थान नव्हे, आपला ज्यांच्याशी मतभेद आहे त्यांचे ऐकून घेण्याऐवजी त्याचा नुसता अव्हेर करण्याची, असहकाराची प्रवृत्ती नव्या राजकारणात आली आहे.''[७४] राजकारणात वाटाघाटी असतात, देवघेव असते, आजचा काळ उद्या तसाच राहत नाही, तो बदलतो, त्या बदलत्या काळात आपण आणखी फायदा मिळवू शकतो. जहालांच्या दृष्टीने हा विचार मवाळ असला तरी, दोन देशातील वाटाघाटी आणि समजूतदारपणा वाढविण्याचा तो धागा आहे असे त्यांचे विचार होते.

डॉ. परुळेकर यांनी देशाच्या फाळणीला विरोध केलेला होता. त्यांना अखंड हिंदुस्थान या दृष्टीने त्यांचे विचार होते. देशाचे तुकडे झाल्याने देश कमकुवत होतो. ज्यामुळे इतर देशांतील लोक आपल्या देशावर सहज आक्रमण करतील अशी त्यांची भावना होती. पाकिस्तानची मागणी करणाऱ्या बॅ. जिनांची महात्मा गांधी यांच्यापासून सर्वांनी भारतातील त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. परंतु बॅ. जिना आपल्या वेगळ्या पाकिस्तानच्या मागणी मतापासून थोडेही मागे हटण्यास तयार नव्हते. हा इतिहास डॉ. परुळेकर यांच्या पुढे जिवंत होता. म्हणून भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला पाठिंबा दिला नाही.

भाषावार प्रांतरचना केल्यामुळे देश कमकुवत होईल, अशी त्यांची धारणा होती. राज्य पुनर्रचना आयोगातील सरदार पणीकर यांच्याशी चर्चा करून करताना डॉ. परुळेकर म्हणाले, ''महाराज जिनांनी देशाचे तीन तुकडे केले, तुम्ही आता तेरा करीत आहात, यात देशाचा घात आहे. असे मला वाटते. भाषावार रचना हे विष आहे. त्यातून प्रांतात भाषावार अल्पसंख्याक निर्माण होतील.''[७५] वेगळ्या राज्यनिर्मितीच्या संदर्भात डॉ. परुळेकर यांनी दिलेला हा इशारा मोठा अर्थपूर्ण होता.

### ३.४.४ संयुक्त महाराष्ट्र, घटक पक्ष व दै.'सकाळ'

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी जी समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीच्या नेत्यावर त्यांनी टीका केली. मुळात त्यांना कम्युनिष्ट पक्षाची विचारसरणी मान्य नव्हती. समितीच्या नावाखाली त्यांनी पक्षाची ध्येय धोरणे पुढे करून सत्ता हस्तगत करण्याचा त्यांचा डाव आहे, असे डॉ. परुळेकर यांना वारंवार वाटत होते. सर्वच पक्षांची ध्येय धोरणे पाहिली असता संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवर ही एकजूट झाली आहे ती त्या त्या पक्षाच्या तात्त्विक भूमिकेतून निघालेली आहे. संयुक्त महाराष्ट्राची ही मागणी मान्य झाली तर, ह्या पक्षावर फार मोठे गंडांतर येणार होते. याचाही काही भाग नव्हता लोकभावनांचा पक्षनिष्ठ राजकारणाकरिता उपयोग करून घेण्याकरिता हा सारा उद्योग चालू आहे असे त्यांचे मत होते. सामान्य लोक चिडले आहेत. महाराष्ट्राचे स्वतंत्र घटक राज्य असावे, महाराष्ट्रीय नेत्यांना अखिल भारतीय राजकारणात मानाचे स्थान असावे, महाराष्ट्राला आर्थिक विकासाचा योग्य वाटा मिळावा या लोकांच्या आशा आकांक्षा आहेत. संयुक्त आघाडीत सामील झालेल्या घटकपक्षांना

या लोकभावनांचा फायदा घेऊन पक्षनिष्ठ राजकारणाचे घोडे पुढे दामटावयाचे आहे. आपल्या पक्षांची लोकप्रियता वाढवायची आहे, असेच डॉ. परुळेकर यांना वाटत होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या आघाडीच्या नावाखाली महाराष्ट्रात आपल्या पक्षाला लोकप्रियता मिळवून महाराष्ट्राची सत्ता संपादन करण्याचा कम्युनिष्टांचा डाव आहे. त्यामुळे त्यांची विचारसरणी देशाच्या हिताच्या दृष्टीने घातक आहे, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे ते याबाबत म्हणतात, ''तोंडाने लोकशाही म्हणता आमच्या राज्यकर्त्यांनी समाजवादाच्या नावाखाली कम्युनिष्ट तत्त्वे अंगीकारली आहेत. कम्युनिष्ट रशियाशी वीस वर्षाचा मित्रत्वाचा करार केला आहे. मार्क्सवादी कम्युनिष्टांना राज्यात भागीदार करून ठेवले आहे.'' [७६] आजच्या निवडणुकांत, कायदेमंडळात, राज्यकारभारात आमचे नवे समाजवादी सहकारी असून, शिवाय रशिया त्यांचा अंतस्थ सल्लागार, शस्त्रे पुरविणारा, निरनिराळ्या व्यवहारातील भागीदार, अशा नाना वाटांनी या देशावर कम्युनिझमची सावली पसरत चालली आहे. वास्तविक कम्युनिझम आणि लोकशाही म्हणजे खाटीक व गाय यांची सांगड घालून देण्यासारखे आहे आणि तो खाटीक गाईचा शेवट लावल्याखेरीज स्वस्त बसणार नाही. असे डॉ. परुळेकरांचे मत होते त्याअनुषंगाने संयुक्त महाराष्ट्राच्या नावाखाली समितीत सहभागी झालेला प्रत्येक पक्ष आपल्या पक्षाची विचारसरणी व लोकप्रियता मिळविण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. त्यामुळे १९५६ च्या दशकात या प्रत्येक पक्षामध्ये मतभेद वाढलेले होते. त्यामुळे लढ्यातील अपक्षांच्या पंचायतीतील सर्व नेते त्रस्थ व अस्वस्थ होते.

१९५५ च्या समितीच्या बैठकीमध्ये काही असंतुष्ट नेते बाहेर पडून त्यांनी अखिल भारतीय मजूर किसान पक्ष स्थापन करण्याचे ठरविले. या निर्णयावर दिनांक १

फेब्रुवारी १९५५ च्या अंकातील अग्रलेख दैनिक 'सकाळ' डाव्यांचा एक नवा पक्ष या शीर्षकाखाली छोटे पक्ष स्थापन करण्याच्या कृतीवर टीका केली आहे. ते लिहितात की, ''आत्तापर्यंतच्या काळात जे काही पक्ष निर्माण झाले आहेत त्यांची वैचारिक भूमिका काही वेगळी नाही. संबंधित पक्षाच्या नावातच आलटून पालटून कम्युनिष्टांचीच नावे असल्याचा उल्लेख केला आहे. असे पक्ष निर्माण होणे म्हणजेच कम्युनिष्टांच्या फाटाफुटीची कल्पना येते.''[७७] या डॉ. परुळेकर यांच्या मतावरून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ किती गांभीर्याने घेतली हे दिसून येते.

१२ मार्च ते १५ मार्च १९५६ या काळात नवी मुंबई येथे प्रजा समाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक भरली. १६ मार्चला मुंबईव्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्रात समितीच्या वतीने सत्याग्रह सुरू होणार हे लक्षात घेऊन प्रजासमाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने जो ठराव पारित केला तो एस.एम.जोशी आणि प्रजासमाजवादी पक्षाच्या महाराष्ट्र शाखेला आणि सर्व सहकाऱ्यांना पसंत पडला नाही. कारण पक्षाच्या घटक असलेल्या शाखांतील सदस्यांनी सत्याग्रहात भाग घेऊ नये तसेच सत्याग्रहाची मोहीम संघटित करू नये, असे ठरावात म्हटलेले होते. त्यामुळे पक्षादेशाचा भंग करणे एस.एम. व बा.न.राजहंस यांनी केला. या दोघांनी राष्ट्रीय कार्यकारिणीचा ठराव प्रसिद्ध होताच एक पत्रक काढून समितीचा सत्याग्रह चालू राहणार, असे जाहीर केले. अशा प्रजासमाजवादी पक्षांच्या व नेत्यांच्या भूमिकेविषयी डॉ. परुळेकर यांनी १८ मार्च १९५६ च्या अंकात प्रजासमाजवाद्यांचा गोंधळ हा अग्रलेख लिहून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीतील छोट्या पक्षावर टीका केली आहे. या अग्रलेखात पक्षातील मतभेदावर आणि पक्षाला ओहोटीबाबत ते लिहितात, ''प्रजासमाजवादी पक्षाच्या

कार्यकारिणीची बैठक दिल्लीत नुकतीच भरून प्रांतरचना प्रश्नावर पक्षाने सत्याग्रह करू नये, असा ठराव पास झाला. पक्षाची मध्यवर्ती कार्यकारिणी असा आदेश देताना प्रांतिक नेते मात्र त्याप्रमाणे वागताना दिसून येत नाहीत. १५ मार्चला ठराव झाला. त्याच दिवशी सत्याग्रह सुरू झाला ज्या संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे हा सत्याग्रह चालू झाला ती स्थापण्यात पक्षाचे महाराष्ट्रातील एक प्रमुख नेते एस. एम. जोशी यांनी पुढाकार घेतला होता. पुढे या पक्षाची एवढी वाताहत झाली की, लोहिया गट या पक्षातून बाहेर पडला, आचार्य नरेंद्र देव यांच्या निधनाने त्यांचा मोठा आधार नाहीसा झाला. आचार्य कृपलानी व सौ. सुचेता कृपलानी दोघांनीही अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दिला.''[७८] यावरून संयुक्त महाराष्ट्र चळवळ प्रत्येक व्यक्तीने संबंधित पक्षांनी किती गांभीर्याने घेतली होती हे स्पष्ट होते. नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने नावारूपाला आलेली संयुक्त महाराष्ट्र समिती निवडणुका संपल्यानंतर टिकून कशी राहील अशी, ती टिकविण्यात हितसंबंध गुंतलेल्या व्यक्ती आणि संघटनांना घोर चिंता लागली आहे. असे उपहासात्मक लिखाण करून त्यांनी ६ एप्रिल १९५७ च्या अंगात 'समितीला राजकीय दीक्षा' हा अग्रलेख लिहून समितीतील पक्षावर टीका केली आहे, त्यात ते लिहितात की, ''संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हेच समितीचे एकमेव ध्येय आहे. अशा विचित्र परिस्थितीने एकत्र आले आणि सुखी संसार करू म्हणावे, अशातली गत या संघटनेत दाखल झालेल्यांची होती. पण समितीत सामील झालेल्या बारभाईच्या कारभारात एक विचार नसल्यामुळे काही दिवसांतच त्यांचे बेगडी रूपच समाजासमोर येईल.''[७९] या अग्रलेखातील 'सकाळ'चे मत विचारात घेतल्यास सकाळचे धोरण संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विरोधी होते, असेच म्हणता येईल.

### ३.४.५ काँग्रेस पक्ष व दै. सकाळ

१ डिसेंबर १९५५ रोजी फलटण येथील मालोजी नाईक निंबाळकरांच्या मनमोहन राजवाड्यात उत्तर सातारा जिल्हा काँग्रेसची सभा भरली होती. त्या मेळाव्याला मार्गदर्शन करताना नामदार यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र आणि नेहरू, असा जर प्रश्न निर्माण झाला तर मी डोळे झाकून नेहरू यांचेच नेतृत्व मान्य करीन, असे वक्तव्य केले. त्या दिवशी मराठी भाषिक मंत्र्यांनी जी वक्तव्ये केली ती शंकरराव देव यांच्यावर उघडउघड टीका करणारी होती. त्याचबरोबर देवांच्या मार्गदर्शनाने वागणाऱ्या भाऊसाहेब हिऱ्यांचे नेतृत्व या त्रयींनी झुगारून दिल्याची साक्ष देणारी होती. त्यांच्या या वक्तव्याने मात्र संयुक्त महाराष्ट्र परिषदेत अस्वस्थता पसरली. यशवंतराव चव्हाण यांचे वक्तव्य कोणालाही पसंत पडले नाही. त्यांना विरोधकांच्या मोठ्या टीकेला सामोरे जावे लागले. या फलटणच्या बंडाचा नानासाहेब परुळेकर यांनी ३ डिसेंबर १९५५ च्या अंकात नेतेपणातील परवड असा अग्रलेख लिहून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झटणारे काँग्रेसश्रेष्ठी किती ढोंगी आहेत. यावर परखड टीका केली. ''मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी मुंबई काँग्रेस पक्षासह सर्वच पक्षांचे नेते लढत होते. शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली १९४६ पासून संयुक्त महाराष्ट्र परिषद अस्तित्वात होती. देवांचे प्रयत्न पाहता प्रत्येक बैठकीस यशवंतराव चव्हाण यांच्यासह सर्वच सहकारी देवांचे गुणगान गात, देवांचे नेतृत्व आम्हाला लाभते हे आमचे मोठे भाग्य होय.''[८०] या प्रमाणे देवांचे कौतुक सर्वत्र केले जात होते. परंतु २ नोव्हेंबर १९५५ मध्ये फलटण येथे उत्तर सातारा जिल्हा काँग्रेसच्या बैठकीत कमिटीच्या बैठकीत बोलताना यशवंतराव चव्हाण म्हणाले, ''मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामध्ये श्री. देव यांचे

नेतृत्व मला मुळीच मान्य नाही. मुंबई हातची गेली तर मुळीच समाधान होणार नाही. परंतु तो एकमेव मार्ग आहे. अशी माझी ठाम भूमिका आहे. तथापि देव यांच्याबद्दल माझ्या मनात आदर आहे. या नेत्यांच्या धरसोड वृत्तीची दखल घेऊन ते लिहितात की, पुणे येथे गेल्या दोन महिन्यात भेटलेल्या महाराष्ट्र प्रदेश कमिटीच्या बैठकीत झालेली भाषणे, या दृष्टीने तपासून पाहण्यासारखी आहेत. या संदर्भात त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्याशी चर्चाही केली होती. दिनांक २४ सप्टेंबर १९५५ च्या अग्रलेखात 'पुढारीपण गमावेल' या शिर्षकाखाली अग्रलेखाद्वारे त्यांनी पुढाऱ्यांवर टीका केली ते लिहितात की, ''या लढ्यातील काही नागरिकांना भाषेवरून प्रांतरचना व्हावी असे मनापासून वाटत नाही. परंतु इतर लोक करतात किंवा म्हणतात आपणही म्हणावयाचे या उद्देशाने समितीच्या कोणत्याही सभा मेळावे, आंदोलनात सहभागी होतात जर राजकारणी लोकांना भाषेवरून भांडणे लावून आपला स्वार्थ साधावयाचा आहे.''[८१]

एखाद्या भाषेचा विकास दुसऱ्या भारतीय भाषेच्या विकासाच्या मार्गातला अडथळा बनतो ही कल्पनाच विचित्र आहे. भाषेला मी सर्वांत जास्त महत्त्व देत असलो तरी तिचे राज्याबरोबर साहचर्य मानण्यास तयार नाही. हैदराबाद राज्याचे विघटन होऊ नये, असे मला आजही वाटते. पण परिस्थितीचे दडपण इतके जबरदस्त आहे की, मला त्या राज्याचे विघटन स्वीकारणे भाग आहे. या चर्चेच्या अनुषंगाने त्यांनी २३ डिसेंबर १९५५ च्या पं. नेहरूंचा सल्ला या अग्रलेखात त्यांनी घेतलेल्या भूमिकेचे महत्त्व सांगतिले आहे. त्यात त्यांनी असे लिहिले आहे की, ''प्रांतरचना समितीच्या अहवालावर संसदेत चर्चा करण्यात आली. यात नेहरूंचा ७१ वा क्रमांक होता. प्रांतरचना समितीच्या अहवालावर बोलताना नेहरू म्हणाले की, हे पूर्ण केंद्र सरकारचे मत नसून माझे

वैयक्तिक आहे याचा खुलासा करून ते म्हणाले, प्रांतरचनेत द्विभाषिक राहणे कसे योग्य आहे.''[८२] यावरून पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची प्रांतरचनेची संदर्भातील भूमिका किती स्पष्ट होती, हे दिसून येते.

ऑक्टोबर महिन्यात पंतप्रधान पंडित नेहरू यांनी अहमदाबादला भेट दिली. २ ऑक्टोबरला नेहरूंची तेथे सभा झाली. त्याच वेळी महागुजरात सभेने त्या सभेवर बहिष्कार टाकला होता. त्या वेळी त्यांनी इतर ठिकाणी वेगळी सभा आयोजित केली होती. ३ ऑक्टोबरला गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू हर्षद भाई दिवेटिया यांच्या निमंत्रणावरून त्यांनी विद्यापीठाला भेट दिली. त्या वेळी विद्यार्थ्यांनी हातात काळे निशाण दाखवून मोठ्या प्रमाणात निदर्शन केली. अमने महागुजरात जोईये, महागुजरात लेके रहें, वुई वाँट महागुजरात ह्या घोषणेने तेथील परिसर दणाणून सोडले. कोणीही नेहरूंचे भाषण ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांविषयी ना नादान, नालायक, जंगली जनावर अशा शेलक्या शब्दाचा वापर केला. या संदर्भात डॉ. परुळेकर यांनी ५ ऑक्टोबर १९५६ रोजी पं. नेहरूंच्या सभेत 'गोंधळ' या मथळ्याखाली लिहिलेल्या अग्रलेखात त्यांनी नेहरूंची प्रशंसा केली आहे. ते लिहितात की, ''मुले आवडत असणाऱ्या जगातील नेत्यांपैकी पं.नेहरू हे एक आहेत ते लिहितात की, यात चुकीचे काही नाही. मात्र द्विभाषिक संदर्भात विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया काय आहे हे जाणण्यासाठी मी मुद्दाम तुम्हाला भेटीसाठी आलो आहे. मात्र अगोदर आमची मागणी मान्य, करा मगच बोला असे काही विद्यार्थ्यांचे गट नेते नेहरूंच्या पुढे बोलून सभेत गोंधळ करू लागले. त्यांच्या हातात काळे झेंडे होते. बऱ्याच वेळेला सांगूनही जमाव काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता.''[८३] या संदर्भात त्यांनी ४ ऑक्टोबर १९५६ सकाळच्या अंकात

झालेली बातमी प्रसिद्ध केली आहे ते पुढीलप्रमाणे लिहितात– नेहरूंची सभा उधळण्याचा प्रयत्न काळी निशाणे घेऊन विद्यार्थ्यांनी निदर्शने पार्लमेंट निर्णयात बदल अशक्य : पं. नेहरू ''नेहरू आज सकाळी गुजरात विद्यापीठातील चार हजार विद्यार्थ्यांच्या मेळाव्यापुढे भाषण करीत असता विद्यार्थ्यांच्या एका गटाने सतत घोषणा चालू ठेवून अडथळे आणले ही निदर्शने जुलूम, जबरदस्तीची, चिडखोर वृत्तीने निराळा बनलेल्या आणि अवखळ वृत्तीचे द्योतक आहे. असे नेहरूंनी वर्णन करून विद्यार्थी अशा तऱ्हेने वागल्याबद्दल आपणास लाज वाटते, असे मत व्यक्त केले.''[८४] सकाळ पत्रामधील अशा प्रकारचे विविध संदर्भ लक्षात घेता असे दिसते की, हे वृत्तपत्र संयुक्त महाराष्ट्र चळवळीस प्रतिकूलच होते. त्यामुळे या वृत्तपत्राने वेळोवेळी वेगळ्या मथळ्यामधून या चळवळीवर टीका केल्याचे दिसून येते. आता अशा पार्श्वभूमीवर भाषिक राज्यांच्या निर्मितीबाबत 'सकाळ' या वृत्तपत्राने कोणती भूमिका घेतली होती, त्याचे सुस्पष्ट विश्लेषण करता येईल.

### ३.४.६ भाषिक राज्याबाबत दै. 'सकाळ'ची भूमिका

डॉ. नानासाहेब परुळेकर यांना वाटत होते की, मुंबई प्रांतातील मराठी व गुजराती समाजबांधव गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. डॉ. परुळेकर हे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्याशी या विषयावर चर्चा करताना म्हणाले, ''कृपा करून हे द्विभाषिक तरी मोडू नका. गुजरात व महाराष्ट्र हे स्वभावाने एकमेकांत मिसळणारे, इतिहास व भूगोलाने एकमेकांच्या जवळ आणलेले, एक दुसऱ्याला पूरक तेव्हा निदान हे द्विभाषिक कायम ठेवा, उद्या कदाचित भाषिक प्रांतरचनेविरुद्ध लोकमत जागे झाले, तर हे

द्विभाषिक त्यांना उदाहरण होईल.'' त्यांनी मराठी भाषेचे योगदान मान्य केले आहे. डॉ. परुळेकर आणि पंतप्रधान यांच्यातील संभाषणावरून असे स्पष्ट होते की, डॉ. परुळेकर यांनी द्विभाषिक चर्चा आणि त्या अनुषंगाने विभाजनाच्या चर्चेला कधीच स्थान दिले नाही.

बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली, ऑफिशियल लँग्वेज कमिशन : म्हणजे सरकारी भाषा कोणती असावी, अध्यक्षतेखाली निर्णय घेण्यासाठी एक कमिशन नेमण्यात आले होते. त्या कमिशनपुढे डॉ. परुळेकर यांची साक्ष झाली तेव्हा ते म्हणाले, ''ही भाषेची भांडणे पुरे झाली. जनतेने एक भाषा निवडावी माझ्याजवळ सत्ता असती तर ती एक ठेवून बाकी चौदा भाषांचे गाठोडे करून हिंदी महासागरात ते मी बुडवून टाकले असते.''[८५] याच्या समर्थनात ते म्हणतात, कोणत्याही देशी भाषेबद्दल मला अनादर नाही. मराठी भाषा ही समृद्ध आहे. हे मी दृष्टिआड करीत नाही. परंतु राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त जनतेच्या विचारांची पातळी वर आणावयाची असेल तर, बाकी सर्व भाषा काही असल्या तरी देशासाठी शिक्षणाचे माध्यम म्हणून आणि विचारविनिमयाचे साधन म्हणून एक भाषा असावी आणि या कामी हिंदीखेरीज दुसरी भाषा दिसत नाही. दुर्दैवाने हिंदीदेखील मराठी, बंगाली, तमिळी भाषांच्या मानाने मागासलेली आहे.

ऑक्टोबर महिन्यात फाजल अली कमिशन ओरिसा आणि पश्चिम बंगाल या प्रांतात येणार होते. याच वेळी गोलपाडा जिल्हा पश्चिम बंगालचा की आसामचा यावर मोठ्या प्रमाणात वाद झाला होता. संबंधित भागातील काही नागरिकांनी आपल्या भाषेत पाट्या बदलण्याचे आदेश दिले व त्यासाठी मोठी दहशत बसविली त्यांच्या या दहशतीचा

‘सकाळ’ वृत्तपत्रांनी १४ एप्रिल १९५५च्या अंकात भाषिक वादातून गुंडगिरी या अग्रलेखाद्वारे दहशतीचा खरपूस समाचार घेतला. ‘‘भाषावार फाळणी ताबडतोब झालीच पाहिजे आणि तीही आम्ही म्हणू त्या पद्धतीनेच असा दुराग्रह धरणारे लोक या वादाच्या तथाकथित सरसीमांच्या दोन्ही अंगास भरपूर संख्येने असून, त्यांच्या कारवाया अखंड चालू आहेत.’’[८६] आपल्या भाषेत राज्य कारभार चालावे अशी मागणी सर्वत्र जोर धरीत असताना ‘सकाळ’ वृत्तपत्रांनी २४ डिसेंबर १९५५ अंकात ‘भाषेची अडचण का’ या मथळ्याखाली अग्रलेख लिहिला.

‘‘हिदुस्थानमध्ये इतर प्रांतीय भाषा शिकणे अवघड का जावे आणि त्यासाठी अडून का बसावे यापुढे देशातील व्यापार, उद्योग आणि दळणवळण हे पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणावर आंतरप्रांतीय होत जाणार असून त्यात केवळ स्वतःची भाषा धरून भागणार नाही. भाषावारी प्रांतरचनेमुळे आज ज्या भावना उचंबळल्या आहेत, त्या शांत करण्यासाठी काही अंतर प्रांतीय उपाय योजले पाहिजे. त्यात केवळ स्वतःची भाषा धरून भागणार नाही.’’[८७] संयुक्त महाराष्ट्र चळवळी संदर्भातील परुळेकरांची प्रतिगामी भूमिका ही वेळोवेळी त्यांच्या अग्रलेखातून व्यक्त होताना दिसते आहे. त्याचबरोबर आपल्या सकाळ दैनिकाने कसा हातभार लावला आहे, याचे महत्त्व सांगितले आहे. ‘‘मुंबई द्विभाषिक प्रांत झाला. हा सकाळचा विजय आहे. असे निरोप आणि पत्रे अनेकांकडून येत आहेत, परंतु तो देशातील एकराष्ट्रीयत्वाचा खरा विजय होता. गेली शंभर वर्षे ही भावना लोकांत जागृत करून शेवटी त्यातून स्वातंत्र्य प्राप्त झाले. तो प्रयत्न जे करीत आले ते नेते अगर त्यांची स्मृती आणि सामान्य जनता यांच्या अंतःकरणातील देशभक्ती यांचा हा विजय असून या पुण्यसंचितावर काजळ फासण्यासाठी जे पुढे आले

होते त्यांचा हा पराजय होय.''[८८] पुढील राजकारणात हा जुना कोळसा निराळे वळसे देऊन उगाळण्याचा प्रयत्न होणार हे धरून चालले पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र हा एक ज्यांना चळवळीचा आधार झाला होता तो आधार गेल्यावर उघडे पडले असले तरी पुन्हा दुसरा काहीतरी आसरा शोधीत राहतील यात शंका नाही असे आपले परखड मत मांडलेले होते.

भाषावार प्रांतरचनेनुसार मराठी बहुभाषिक असलेला भाग निपाणी म्हैसूर राज्यात गेला आहे. त्यामुळे निपाणी शहर परिसरातील बहुतेक मराठी विद्यार्थी कोल्हापुरातला राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेतात. गरीब कुटुंबातील विद्यार्थी असल्यामुळे त्यांना शिक्षणासाठी अर्धनादारी मिळत होती. परंतु भाषावार प्रांतरचनेमुळे निपाणी म्हैसूर राज्यात गेल्यामुळे कॉलेजच्या प्राचार्यांनी तुम्ही दुसऱ्या प्रांतात असल्यामुळे तुम्हाला या वर्षापासून नादारी मिळणार नाही, असे सांगितले त्यामुळे या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गदा येण्याची भीती होती. नेमकी ही बाब हेरून डॉ. परुळेकर यांनी सीमा भागातील विद्यार्थ्यांबाबत राष्ट्रीयतेस लागलेली कीड २ सप्टेंबर १९५७ अग्रलेखाद्वारे त्यांची व्यथा मांडली आहे ते याबाबत लिहितात की, ''अशी प्रांतीय भेदाभेद न मानता निपाणी भागातील विद्यार्थ्यांची सवलत काढून न घेता सरकार चालू ठेवावे. एकतर आपणाला म्हैसूर राज्यात घालू नये महाराष्ट्रात राहू द्यावे असा निपाणीकराचा पूर्वीपासून आग्रह होता.''[८९] केवळ भाषावार मागणी म्हणजे त्यांची मागणी मान्य करणे अपेक्षित होते. हे होते तर ते विद्यार्थी परप्रांतीय होत नव्हते हेच स्पष्ट होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, म्हणून दिनांक १५ डिसेंबर १९५५ रोजी आचार्य स. ज. भागवत यांच्या अध्यक्षतेखाली टिळक

स्मारक मंदिर पुणे येथे विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता. सुमारे तीनशे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. समितीने या मेळाव्याला जरी संयुक्त महाराष्ट्र परिषद म्हटले तरी ते चुकीचे कसे आहे हे ठासून सांगितले तसेच याबाबत १७ डिसेंबर १९५५ रोजीच्या अंकात विद्यार्थ्यांची ही वाट नव्हे. या अग्रलेखामधून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या नेत्यांवर टीका करून जमलेल्या विद्यार्थ्यांना त्यांना सल्ला दिला. ते लिहितात की, ''परिषद म्हटली तरी परिषदांचे घटक प्रतिनियुक्तीचे प्रमाण त्यांना निवडून देण्याची पद्धत असे काहीच नसल्यामुळे ती परिषद नसून मेळावा होता. विद्यार्थ्यांनी चळवळीत भाग घेणे किंवा ती खेचून बाहेरच्यांनी चिथावणी देणे कितपत श्रेयस्कर हा खरा प्रश्न आहे. मेळाव्याचे उद्‌घाटन महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी केले. फर्ग्युसन कॉलेजचे गणिताचे प्राध्यापक ए.बी.शहा यांनी मेळाव्यात भाग घेऊन प्रास्ताविक भाषण केले.''[१०] यातून विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेऊ नये, असा सल्ला 'सकाळ'कारांनी दिला होता. तुम्ही राजकारणाचा अभ्यास करा, पण राजकारणात उडी घेऊ नका, अशी त्यांची भूमिका होती. संयुक्त महाराष्ट्राच चळवळीत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे हा 'सकाळ'चा महत्त्वाचा उद्देश होता, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

### ३.४.७ संयुक्त महाराष्ट्र चळवळ व दै. 'सकाळ'

द्विभाषिक राज्य मोडून संयुक्त मुंबई अशी महाराष्ट्राची निर्मिती होणार याच्या बातम्या वेगवेगळ्या वृत्तपत्रांत येत होत्या. अशा घटनेला काँग्रेसच्या नेत्यांकडून दुजोरा मिळत होता. ही गोष्ट डॉ. परुळेकर यांनी हेरून ४ सप्टेंबर १९५९ अशा घटनेला अंकात 'पराभव कोणाचा' या मथळ्याखाली अग्रलेख लिहून आपल्या मनातील सर्वच भावनांना

वाट करून दिली होती. अग्रलेखातून त्यांना द्विभाषिक मोडल्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणीव करून ते लिहितात,''एका चांगल्या उद्देशाने आपण या संयुक्त महाराष्ट्र चळवळीला विरोध करत असल्याचे त्यांनी कबूल करून हा 'सकाळ' चा तर पराभव आहेच, परंतु त्याचबरोबर महाराष्ट्रातील आम जनतेचाही पराभव असल्याचे त्यांनी या अग्रलेखातून स्पष्ट केले. त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखातील काही महत्त्वाचे मुद्दे देता येतील.

द्विभाषिक मुंबई प्रांताची आता पुन्हा भाषावार विभागणी होणार असून, देशाच्या फाळणीचा हा शेवटचा तुकडा महाराष्ट्राच्या भूमीवर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या कारकीर्दीत पडावा हे दुर्दैव होय. कदाचित हा शेवटचा नसून, यानंतर आणखी तुकडे पाडावयाचे असतील. भाष्यावारी विषय हा मुळी असा आहे की, तो एकदा प्राशन केल्यावर शरीराच्या सांध्यासांध्यामध्ये जाऊन खिळखिळे केल्याखेरीज राहणार नाही. मुंबई प्रांत द्विभाषिक असताना महाराष्ट्र आणि गुजरात यापैकी कुणाची हानी झाली किंवा प्रगती खुंटली व ती अडचण आता एक भाषिकाने दूर होणार, असे बिलकूल नाही. हे खरे की, मंत्रिपदाच्या जागा वाढतील, प्रत्येक खात्यात एक एक सेक्रेटरी आहेत, तेथे दोन होतील. नोकऱ्यावर जातवाले आणि भाषावाले डोळा लावून राहतील.

राजकारणात स्थानिक गट आणि राजकीय पुढारी यांतील कोणाची तरी पोळी विकेल परंतु सामान्य जनतेच्या जीवनात काहीच फरक होणार नाही. संयुक्त महाराष्ट्र झाल्यामुळे आपल्या अंगावर यशाची तकाकी आली, असे त्यांचे त्यांना वाटत नाही. त्यातले जे द्रोण, भीष्म, असे जे अतिरथी, महारथी श्री देव, गाडगीळ, हिरे व मंडळी झालाच पाहिजे म्हणून आकाश पाताळ एक करीत होती त्यांना ही घटना खरोखरीच

घडून आल्यावर हिरमुसल्यासारखे झाले असले पाहिजे. कारण संयुक्त महाराष्ट्र झाला तर तो श्री. चव्हाणांनी केला आपण नाही असे वैषम्य त्यांना वाटते. इकडे पुढाऱ्यांची ही स्थिती तर सर्वसामान्य तथाकथित जनतेत कुठे दिवे नाहीत, रोषणाई नाही, स्वस्त नाही, समाधान नाही ते या नव्या रचनेबद्दल विन्मुख आहेत. त्याचे कारण महाराष्ट्रातील जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न भाषावार प्रांतरचनेपासून अगदी वेगळे आहेत. शिक्षण, वाढणारी बेकारी, महागाई भरमसाठ वाढली आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय समाजाची वाहतात होत आहे. महाराष्ट्र शेतीप्रधान, पण या प्रांतात शेतकऱ्यांना निश्चितपणे ही आपली शेती टिकेल त्यातून आपणाला चांगले दिवस येतील असे वाटत नाही. राज्यकारभार लोकांपासून अधिकाधिक दूर होत चालला असून, त्याची कामे कमी होत आहेत. या सर्व कारणामुळे संयुक्त महाराष्ट्र होतो म्हटल्याने महाराष्ट्रीय जनतेच्या मनाला भरते येत नाही. त्यांच्या भावना त्यांचे दुःख आणि अशा अगदी वेगवेगळ्या प्रकारच्या आणि वेगवेगळ्या ठिकाणी आहेत त्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात नाहीत. पण एक गोष्ट अगदी या ठिकाणी सांगू इच्छितो भाषावार विरुद्ध आमचा एकंदर आग्रह आणि 'सकाळ' ने केलेल्या चळवळ पाहता, घटना म्हणजे 'सकाळ' चा पराभव असे कोणी म्हणेल तो पराभव यांत मुळीच शंका नाही, व दुर्दैवाने तो एवढ्यापुरता नसून असा पराभव अनेक वेळी झालेला आहे. आमचा आग्रह देशाची फाळणी होता कामा नये भाषावार प्रांतरचना नको, कायद्याने दारूबंदी अखेर घातक होईल, कूळकायद्यात अन्याय आहे, इंग्रजी बोलू नका, त्यात तरुण पिढीच्या शिक्षणाची हानी आहे. उद्योग धंद्याची भरभराट राष्ट्रीयीकरण नको त्यात सरकारी नोकरशाही मात्र वाढेल, घाऊक धान्य खरेदीसाठी सरकारची मक्तेदारी नको, शेतजमिनीची कालमर्यादा करणारा कायदा

घातकी आहे, अशा प्रत्येक बाबतीत आम्ही निषेध करीत आलो आणि त्याविरुद्ध आग्रह धरला तरी निर्णय अखेर उलट लागला. या प्रमाणे सकाळने आपल्या लेखणीतून संयुक्त महाराष्ट्र विभाजनाबाबत साकारले होते. सकाळ एकाच शब्दात स्पष्ट करतो की, ''हा 'सकाळ'चा पराभव तर खराच, परंतु याच बरोबर त्यात जनतेचा पराभव आहे. याबद्दल आम्हास अधिक वाईट वाटते.''[९१] अशा प्रकारे परुळेकरांनी आपल्या विचारातून संतुलन साधण्याचा प्रयत्न केला होता. पराभवातही विजय मानण्याची परंपरा त्यांनी जोपासली होती, असे यातून दिसते.

सध्याचा द्विभाषिक मुंबई प्रांत आणखी ३३ दिवसांनी इतिहासजमा होईल, आणि त्याचे जागी गुजरात व महाराष्ट्र असे दोन प्रांत अस्तित्वात येतील या नव्या रचनेत आपले स्थान कोठे आणि अडगळ कशामुळे होईल, याचा शोध राजकीय पक्ष घेऊ लागले आहेत. भाषिक चळवळीच्या अनुषंगाने अस्तित्वात आलेला बोलबाला झालेल्या अगर मेदोवृद्धी झालेल्या व्यक्तीप्रमाणे वजन वाढलेल्या लहान–मोठ्या पक्षापुढे जगावे की मरावे, हा प्रश्न आहे. त्याचा त्यांनी स्वतःच लवकर निर्णय घेतला नाही तर जनतेच्या उपेक्षेने ते नक्कीच मरतील. अशा प्रकारे सरकारने भाषावार प्रांतनिर्मितीच्या विरोधात भूमिका घेऊन वेळोवेळी त्याचे समर्थन केलेले होते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ यशस्वी झाली. महाराष्ट्र राज्याचा जन्म झाला, परंतु 'सकाळ' या पत्राचा सुरुवातीपासून भाषिक राज्याला विरोध होता. भाषावार प्रांतरचना आणि भाषिक राज्याच्या निर्मितीमुळे संकुचित भावना तयार होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती. डॉ. परुळेकरांची आणि पं.नेहरू यांची अधिक जुळणारी होती. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सकाळ पत्राच्या तटस्थ भूमिकेमुळेच

'मराठा', 'प्रभात', 'पुढारी' यांसारख्या संयुक्त महाराष्ट्रवादी वृत्तपत्रांना वाचकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनुकूल व प्रतिकूल मतांच्या विचारप्रवाहातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळकटी मिळत गेली. दैनिक सकाळमधून घेतलेल्या त्यांच्या आग्रही मताबद्दल डॉ. परुळेकर यांच्यावर टीका झाली. परंतु पर्वा न करता त्यांनी आपली रोखठोक मते मांडली व आपल्या भूमिकेस ठाम राहून अनेक सुसंगत वार्ता, अग्रलेख व लेख छापले. कोणत्याही प्रसंगामध्ये आपल्या विचारांची त्यांनी तडजोड केलेली नाही. कोणतेही वृत्तपत्र जेव्हा एखादी भूमिका घेते, तेव्हा ते सर्वांनाच संतुष्ट करू शकत नाही. काही लोक त्यातून नाराज होतात, परंतु अशी नाराजी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत 'सकाळ' वृत्तपत्राला अनुभवावी लागली. तरीही आपल्या दृढ व भक्कम मतांमध्ये त्यांनी कधीही तडजोड केली नाही. आपल्याला जे पटते, भावते तेच मांडावयाचे अशी डॉ. परुळेकरांची लोकशाहीनिष्ठ भूमिका होती. 'सकाळ'च्या प्रतिकूल मतास विरोध करून महाराष्ट्र पंचकाने संयुक्त महाराष्ट्राची वेगळी भूमिका घेऊन आपली वृत्तपत्रे लोकांपर्यंत पोहोचविली होती. 'सकाळ'सुद्धा महाराष्ट्रातील तटस्थ वाचकांच्या भूमिका घेऊन आपापली मते मांडत राहिला यश अपयशाची पर्वा न करता 'सकाळ' हे वृत्तपत्र आपल्या प्रबोधन कार्यात आपल्या परीने आपले मत आपली भूमिका वाढविण्यात यशस्वी झाले असे म्हणता येईल.

**वृत्तपत्रीय समालोचन**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील 'सकाळ' वृत्तपत्राची भूमिका ऐतिहासिक दृष्टीने तपासली असता पुढील काही तथ्ये समोर येतात.

१) 'सकाळ' या वृत्तपत्राचे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर हे स्वतः तत्त्वज्ञानाचे

डॉक्टरेट होते. त्यामुळे त्यांनी भावनेच्या आहारी न जाता शास्त्रीय दृष्टीने कोणतीही भूमिका तपासून घेतली. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुद्धा तेवढ्याच चिकित्सक दृष्टीने पडताळून घेतली. त्यांच्या शास्त्रीय चिकित्सक दृष्टीचा प्रत्यय त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या अग्रलेखांतून येतो वेळ प्रसंगी त्यांनी आपल्या अग्रलेखांतून संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांवर प्रखर टीका केली होती. केवळ भावनिक भूमिका न घेता ते सत्य पारखून शब्दात व आपली मते मांडलेली होती. त्यांच्या वेगवेगळ्या अग्रलेखामधील सत्यान्वेषी निर्भीड मते ही सुसंगत आणि तेवढीच शास्त्रीय आहेत. त्यांच्या शास्त्रीय भूमिकेचेच प्रत्यंतर त्यांच्या अग्रलेखांमधून येते.

२) डॉ. परुळेकरांना असे वाटत होते की, मुंबई राज्यामध्ये मराठी गुजराती हे भाषिक समूह एकत्र गुण्यागोविंदाने राहत आहेत. त्यांच्यामध्ये भाषिक तेढ निर्माण करणे गैर आहे.

३) समितीच्या नेत्यांचे विचार आणि त्यांची मते यांची पडताळणी करताना डॉ. परुळेकरांनी त्यांच्यावर परखड शब्दात टीका केली होती.

४) डॉ. परुळेकरांच्या अग्रलेखांतील त्यांचे विचार हे लोकप्रियतेकडे झुकणारे निश्चितच नव्हते. त्यांनी घेतलेली भूमिका ही स्वतंत्र प्रज्ञेवर आधारलेली होती. तरीही त्यांनी आपल्या अग्रलेखांतून द्विभाषिक मुंबई राज्याचे अप्रत्यक्ष समर्थन केल्याचे आपणास दिसून येते.

अशा संक्षिप्त समालोचनावरून असे स्पष्ट होईल की, संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील 'सकाळ' वृत्तपत्राची भूमिका ही अन्य वृत्तपत्रांपेक्षा वेगळी होती. कारण त्यांनी आपली मते

ही स्वतःच्या ठाम भूमिकेवर आधारून विकसित केलेली होती. आपली भूमिका ठरविताना ती तात्पुरती नव्हे तर दीर्घकालीन विचाराचा परामर्ष घेऊनच आपली स्वतंत्र विकसित करण्यात आलेली होती. 'सकाळ' वृत्तपत्रांनी प्रवाहाच्या बाजूने नव्हे तर आपली स्वतंत्र वेगळी भूमिका घेऊन ती शेवटपर्यंत तडीस नेली.

## ३.५ दै. 'केसरी'

भारतातील वृत्तपत्राच्या इतिहासात 'केसरी' या वृत्तपत्राचे स्थान अनन्य साधारण आहे. 'केसरी'सारखे देशी भाषेतील प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र हे साऱ्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे आणि विशेषतः त्यातील जहाल राष्ट्रवादी विचारसरणीच्या लोकांचे मुखपत्र बनले, हा खरोखरच अभूतपूर्व विक्रम होता. काही वेळा कारावास सोसूनही 'केसरी' कर्त्यांनी इंग्रजी राजवटीत जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध जुलूम दडपशाहीविरुद्ध निर्भयपणे झुंज दिली. आणि असंख्य देशभक्तांना स्फूर्ती दिली. लोकांच्या असंतोषाप्रमाणे त्यांच्या आशा आकांक्षांनाही 'केसरी'ने वाचा फोडली. अर्ज विनंत्यांच्या राजकारणाऐवजी जनआंदोलनाची कास 'केसरी'ने धरली. 'केसरी' कर्त्यांनी शब्द हे सदैव शस्त्रासारखे परजले. केसरी हे नुसते वृत्तपत्र नव्हते तर मुख्यतः ते जनतेचे मतपत्र होते. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या अनुषंगाने अभ्यास करीत असताना 'केसरी'च्या स्थापनेपासून त्यांच्या संपादका सह थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

गो. ग. आगरकर, लोकमान्य टिळक, कृ. प्र. खाडिलकर, न. चिं. केळकर, ज. स. करंदीकर, वा. कृ. भावे, ग. वि. केतकर, दा. वि. गोखले ह्या सर्व मान्यवरांनी १८११ ते १९५० या काळात 'केसरी'चे संपादक म्हणून काम केले. सदरच्या काळात या संपादकांनी वृत्तपत्रावर ब्रिटीशांची कठोर निर्बंध असतानाही स्वातंत्र्या भारताच्या

चळवळीमध्ये सरकारच्या चुकीच्या ध्येयधोरणावर कडक शब्दात प्रहार करून जनमत जागविले. तसेच जनतेचे संघटन तयार केले. त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचे आंदोलन ग्रामिण भागापर्यंत केसरीच्या माध्यमातून पोहचविले. स्वातंत्र्य चळवळीतील याच कार्याचा वारसा संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनामध्येही केसरी वृत्तपत्राच्या संपादकांनी तेवत ठेवला. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये केसरी वृत्तपत्राचे स्थान अग्रभागी होते. २ जून १९५० रोजी जयवंतराव टिळक, 'केसरी' व 'सह्यादी'पत्राचे संपादक म्हणून कामगिरी बजावली. त्यांनी लोकमान्य टिळकांचा वारसा पुढे चालविला. १९५० ते १९६० हे दशक संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे जडणीघडणीचे दशक होते. या काळात सभोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ आकलन करून जयवंतराव टिळक यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पोषक विचारांची मशागत केली. या त्यांच्या दूरदृष्टीमुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीपुढे कोणत्या अडचणी आहेत, कशा प्रकारे त्यावर मात करावी ते स्पष्ट होऊ शकले. जयवंतरावांची तत्कालीन सर्व पक्ष व नेत्यांशी जवळीक होती. राजकीय विचारधारा आणि महाराष्ट्रातील पक्ष आणि उपपक्ष यांचीही त्यांना सखोल माहिती होती. त्यामुळे त्यापुढे त्यांनी कधीही जुळवून घेत, कधी संघर्ष करून तर कधी सामोपचाराची भूमिका घेऊन प्रश्न पुढे रेटला. जयवंतरावांची भूमिका ही रास्त समन्वयाची आणि सर्वांना पुढे घेऊन जावयाची होती. त्यामुळे त्यांचे कर्तृत्व दुहेरी स्वरूपात फुलत गेले. एकतर त्यांनी 'केसरी' या पत्राचे रूपांतर दैनिकामध्ये करण्याचा संकल्प केला व तो तडीस नेला. दुसरे म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील विविध घटकांत समन्वय साधून ही चळवळ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दुसऱ्या प्रयत्नास संयुक्त महाराष्ट्र चळवळीला इतिहासात विशेष महत्त्व आहे.

### ३.५.१ जयंत श्रीधर टिळक (१२.१०.१९२१–२३.०४.२००१)

भावे स्कूल व न्यू इंग्लिश स्कूल, पुणे, फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून मुंबई विद्यापीठाची पदवी (१९४२) रानडे इन्स्टिट्यूटमध्ये रसायनशास्त्रात एम.एमसीसाठी संशोधन, श्री. जयंतरावांचा विवाह दि. ३ मे १९४५ रोजी इंदू केतकर (चिपळूण) यांच्याशी पुण्यामध्ये झाला. कॅ. न. चिं. केळकरांच्या प्रोत्साहनाने श्री. जयंतराव टिळक दि.१/५/१९४५ला ‘केसरी’मध्ये उपसंपादक म्हणून दाखल झाले. पाच वर्षांच्या आत दि. २ जून १९५० रोजी ते केसरी व सह्याद्रीचे मुख्य संपादक झाले. शिवाय, केसरी—मराठाचे विश्वस्त म्हणूनही त्यांची नियुक्ती झाली. दि. १ जानेवारी १९५७ पासून ते मराठा या इंग्रजी नियतकालिकाचेही संपादक झाले. ’केसरी’ आरंभापासून साप्ताहिक वृत्तपत्र होते. कै. तात्यासाहेब केळकरांनी १९२९ मध्ये ते द्विसाप्ताहिक केले. श्री. जयंतराव टिळक संपादक झाल्यानंतर त्यांनी रविवारच्या ‘केसरी’ची जोड देऊन ते प्रथम त्रिसाप्ताहिक केले. दि. ८ ऑक्टोबर १९६२ ला विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी ‘केसरी’चे दैनिकात रूपांतर केले. दैनिक केसरी तर यशस्वी झालाच, पण रविवारचा ‘केसरी’ आकर्षक पद्धतीने काढला जात असल्याने लोकप्रिय झाला. त्याचबरोबर श्री. जयंतरावांनी ‘केसरी’चे परंपरागत वैशिष्ट्य ‘मतपत्र’ म्हणून कायम टिकविले. संपादकीय कामगिरीबरोबरच श्री.जयंतरावांनी ‘केसरी’च्या मुद्रणव्यवस्थेतही लक्ष घालून प्रथम जर्मन प्लामाग आणि नंतर केसरीच्या शताब्दी महोत्सवाच्या सुमाराला अमेरिकन गॉस जलद रोटरी मुद्रण यंत्र आयात करून वाढती मागणी वेळापत्रकानुसार भागवण्याची तरतूद केली.

श्री. जयंतरावांनी ‘सह्याद्री’ या केळकरांनी सुरू केलेल्या मासिकाचेही संपादन

केले. सध्या 'सह्याद्री' फक्त वर्षातून एकदाच दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होतो. मराठा या इंग्रजी मासिकाचे त्यांनी वार्षिकमध्ये रूपांतर केले. दि. १६ जून १९८० रोजी त्यांचा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश झाल्यावर त्यांनी 'केसरी'च्या संपादकत्वाचा राजीनामा दिला. केसरीच्या संपादकीय परंपरेनुसार श्री. जयंतरावांनी 'सातारा जलमंदिर' प्रकरणी सरकारवर निर्भीड टीका केल्याबद्दल त्यांच्यावर खटला भरण्यात आला व त्यांना दंडाची शिक्षा झाली. गोवा विमोचन चळवळीत त्यांनी प्रामुख्याने भाग घेतला. गोवा विमोचन समितीचे चिटणीसपद त्यांनी जबाबदारीने सांभाळले. बेळगाव सीमा सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी तीन महिने कारावास भोगला. तांत्रिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या केलेल्या कार्यामुळे 'केसरी'ला प्रगत व आधुनिक प्राप्त झाले. 'केसरी'ची व जयवंतरावांची नाळ अशा प्रकारे ज्वलंत लोकचळवळीशी यथार्थपणे जुळली गेल्याची दिसून येते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे ते एक प्रमुख पुरस्कर्ते होते. १९५७ मध्ये ते संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे मुंबई विधान सभेवर निवडून आले. (१४ मार्च १९५७) संयुक्त महाराष्ट्र समिती विधानसभा पक्षाचे ते खजिनदार होते. संपूर्ण महाराष्ट्र समितीचे ते सरचिटणीस होते आणि संपूर्ण महाराष्ट्र समितीतर्फे १९६८ मध्ये लोकसभा व राज्य विधानसभांच्या निवडणुका होऊन इंदिरा काँग्रेस पक्षाचा प्रचंड विजय झाला. तेव्हा महाराष्ट्र राज्यात श्री. अ. र. अंतुले यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या मंत्रिमंडळात श्री. जयंतराव टिळकांचा समावेश होऊन दि. १६ जूनला त्यांचा मंत्री म्हणून शपथविधी झाला. त्यांच्याकडे ऊर्जा, खेळ, युवक सेवा व सांस्कृतिक कार्य ही खाती सोपवण्यात आली होती. दि. ७ जुलै १९८० रोजी ते महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून

निवडले गेले. महाराष्ट्रातील प्रमुख सार्वजनिक कार्यकर्त्यांमध्ये श्री. जयंतराव टिळकांची गणना होत असून ते एक उत्तम दर्जाचे वक्ते होते. टिळक स्मारक मंदिर ट्रस्टचे ते विश्वस्त व अध्यक्ष होते. टिळक पर्स फंड व शिवाजी मंदिर संस्थेचेही ते विश्वस्त आहेत. पुणे विद्यापीठाच्या कोर्टाचे ते पदवीधरांतर्फे सभासद होते. पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीचेही ते काही काळ सभासद होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियामक मंडळावर ते कार्यरत होते. याशिवाय डेक्कन एज्युकेशन सोसायटी, गणेशोत्सव मंडळ, वक्तृत्वोत्तेजक सभा, वसंत व्याख्यानमाला इत्यादी संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी काम केले असून, या संस्थांशी अजूनही त्यांचे संबंध आहेत.

पुण्यातील लोकमान्य टिळक स्मारक मंदिराची उभारणी, समग्र टिळक वाङ्मयाच्या सात खंडांचे प्रकाशन व दिल्लीमधील लोकमान्य टिळकांच्या पूर्णाकृती पुतळ्याची स्थापना, ही त्यांच्या अभिमानास्पद कामगिरीमध्ये गणना करता येईल. १९६१ मध्ये पृष्ठशेतच्या वेळी अनाथ हिंदू महिला आश्रमातील सुमारे शे–दीडशे स्त्रिया आणि लहान मुली यांची शर्थीने सुटका केल्याबद्दल त्यांना 'वीर गायधनी पारितोषिक' देण्यात आले होते.

अमेरिकन सरकारच्या आमंत्रणावरून श्री.जयंतरावांनी पत्रकार या नात्याने १९५८ आणि १९७१ मध्ये अमेरिकेचा दौरा केला. त्या वेळी ते महिनाभर युरोपीय देशांनाही भेटी देऊन आले. माजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याबरोबर त्यांनी १९६० मध्ये रशियाचा दौरा केला. १९७२ मध्ये पत्रकार म्हणून ते पुन्हा रशियाला जाऊन आले. जर्मन प्रजासत्ताक सरकार व राष्ट्रकुटुंबीय संबंध कार्यालयाच्या निमंत्रणावरून त्यांनी १९६६ मध्ये पश्चिम जर्मनी व ब्रिटन या देशांचा दौरा केला होता. १९७९ मध्ये

त्यांनी पुन्हा अमेरिका व पश्चिम युरोपीय देशांना भेटी दिल्या होत्या. देशामध्ये व जगामध्ये चालू असलेल्या राजकीय संक्रमणांची ते अचूक नोंद घेत असत.

गुलाबाची मशागत करण्याची त्यांना आवड होती. ते पुणे रोझ सोसायटीचे अध्यक्ष होते. गुलाब प्रदर्शनात त्यांनी अनेक पारितोषिके पटकाविली होती. त्याचबरोबर शिकार हा एक छंद त्यांनी जोपासला असून त्या नावाने एक पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. 'अशी ही दिल्ली' (दोन भागात) हे त्यांचे दुसरे प्रकाशन असून, ते खासदार असताना त्यांना आलेल्या अनुभवांचा व त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाचा परिपाक यामध्ये मनोवेधक त्यांच्या शैलीत आपल्याला वाचायला मिळतो.

जयंत श्रीधर टिळक यांच्या काळात 'केसरी' साप्ताहिकाचे दैनिकात रूपांतर झाले आणि त्यांनी 'केसरी' या पत्राद्वारे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उचलून धरली. त्यांनी समाजकारण व राजकारणात प्रवेश करून 'केसरी'ची प्रतिष्ठा उंचावलेली होती.

## ३.५.२ संयुक्त महाराष्ट्राचा लढा

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रतिष्ठापनेसाठी प्रथम महाराष्ट्र परिषद व पुढे त्यातून काँग्रेसश्रेष्ठींच्या दबावामुळे महाराष्ट्र काँग्रेसने अंग काढून घेतल्यानंतर निर्माण झालेल्या समितीस केसरीने सर्वतोपरी पाठिंबा दिला. अकोला करार, नागपूर करार आदींच्या द्वारे विदर्भही या आंदोलनात सामील झाला. एक बापूजी अणे व त्यांची नाग–विदर्भ समिती हाच काय तो अपवाद होता. पण 'केसरी'ने भीष्मपितामह अशा अणेंच्याविरुद्धही लिहिण्यास कमी केले नाही. नाग–विदर्भातील काही नेते, तसेच सांगली, कोल्हापूरकडील काही नेते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीने ''केसरी महाराष्ट्रात मराठेशाही प्रस्थापित करील'' अशी टीकाही केली होती. १९४८च्या जाळपोळीने या

मंडळींचा सारासार विवेक बोथट झाला होता. त्यांनाही 'केसरी'स सांगावे लागले की, ''मरणांनी ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, साऱ्यांच्याच गोवऱ्या एकाच स्मशानात रचल्या जावयाच्या आहेत. मग जातीयवाद काहींच्या अंगी मुरला आहे म्हणून महाराष्ट्राच्या हिताचा घात कशासाठी करावा?''[९२] अशा प्रकारे 'केसरी'पत्राने रास्त भूमिका घेऊन जातीयवादी प्रवृत्तींवर परखड टीका केली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या या चळवळीत विदर्भाप्रमाणे मराठवाडाही सामील झाला होता. त्या वेळच्या मराठवाडा पत्राचे संपादक आनंद कृष्ण वाघमारे यांनी त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाद्वारे ही भूमिका यशस्वीपणे मांडली होती. मराठवाडा स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वाखाली कसलीही अट न घालता! संयुक्त महाराष्ट्र परिषद मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पुनःपुनः उच्चार करीत तरी ही महाराष्ट्र काँग्रेसने श्री. शंकरराव देव यांची पर्यायी योजना मान्य करून बृहन् मुंबई राज्यात द्वैभाषिक कारभाराचा प्रयोग करून पाहण्यास संमती दिली होती. जयवंतराव टिळक हे या सर्व परिस्थितीचा अचूक वेध घेऊन त्यावर भाष्य करत असत.

राज्य पुनर्रचना समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर मात्र मोराजींनी काँग्रेसपक्षीयांनी चळवळीत भाग घेऊ नये अशी मुस्कटदाबीची आदेश दिला होता. फाझल अली कमिशनने महाराष्ट्रावर जाणूनबुजून अन्याय करणाऱ्या शिफारशी केल्या होत्या. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचे मोठे कारस्थान चालू होते. सार्वमताची सूचनाही पुढे आली होती. त्यात मोरारजींनी तर मुंबईतील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर सरकार उलथून पाडून मुंबई शहराचा जबरदस्तीने ताबा घेण्यासाठी दंगल करविली गेली असा गंभीर आरोप केला होता. या बाबत दैनिक 'केसरी' दि. २६ फेब्रुवारी १९५६

च्या अग्रलेखात लिहितो, ''वस्तुतः मुंबई महाराष्ट्रात राहावी याविषयी लोकमत इतके स्पष्ट किंबहुना प्रखर आहे की, तेथे सार्वमताची जरुरी आता उरली नाही. मुंबईबाबतच्या जुलमी व तत्त्वशून्य निर्णयाचा ताबडतोब फेरविचार केला तरच अपयश टळेल व टिकाऊ राज्य पुनर्घटनेचे श्रेय मिळेल.''[९३] अशा प्रकारे 'केसरी' हे वृत्तपत्र अशा वेळी काँग्रेस पक्षाचे समर्थन करत स्वतंत्र निर्भय मते मांडताना आपणास दिसते. याचा प्रत्यक्ष आपणाला वेळोवेळी केसरीतील अग्रलेखातून आपणास येतो. 'दिल्लीचा बादशाही थाट व मुंबईतील कोतवाली' असा अग्रलेखास मथळा टाकून मोराजींचा पोलिसी खाक्या व पंडित नेहरूंच्या 'थंडा करके खाओ' या वृत्तीवर 'केसरी'ने प्रकाश टाकला. संयुक्त महाराष्ट्राची न्याय मागणी फलद्रुप झाली नसल्यामुळे महाराष्ट्रीय जनतेत विफलतेची व नैराश्याची भावना दिसू लागली होती. याचा उल्लेख करून 'केसरी' दि. १६ मार्च १९५६ च्या वृत्तपत्रात लिहितो, ''महाराष्ट्र राज्याच्या सीमेवरचे बेळगाव कारवारसारखे अनेक मराठीभाषक मुलूख दांडगाईने दुसऱ्या राज्यात ढकलले गेले असून, त्यापायी वीस लाख मराठीभाषकांची जाचक कुचंबणा होणार आहे. या अन्यायाचे परिमार्जन झाले पाहिजे. मुंबईचा व सीमा–विभागांचा अन्याय महाराष्ट्रीय जनतेला मान्य नाही हेच शांततामय सत्याग्रहाने महाराष्ट्र साऱ्या देशाला नम्रतेने सांगत आहे.''[९४] केसरी' वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अशा प्रकारे रोखठोक समर्थन केले होते. प्रसंगी काँग्रेस पक्ष व मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांचीही पर्वा न करता यांच्यावर कडक टीका करण्याची एकही संधी केसरी वृत्तपत्राने सोडलेली नव्हती. यावरून जयवंतराव टिळक यांचा संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावरील आक्रमक पवित्रा प्रकट होतो.

राजाय पुनर्रचनेचे विधेयक दिल्लीच्या हुकूमशहाने तयार करून महाराष्ट्राचा घात करण्याचे ठरविले होते. याबाबत 'केसरी'ने २७ मार्च १९५६ रोजीच्या अंकातून कडाडून हल्ला केला. त्यात केसरी म्हणतो– ''सभासदांची मुस्कटदाबी करून त्यांच्याकडून हे विधेयक (विधानसभेत) संमत करून घ्यावयाचे आणि केंद्रीय लोकसभेत त्यावरील चर्चेचा फार्स उरकून घेऊन लोकमताने ते संमत झाले अशी शेखी मिरवायची हे लोकशाहीचे विडंबन होय.''[९५] अशा कडवट टीका 'केसरी' वृत्तपत्राने करून मोरारजी देसाई यांच्या सरकारवर टीकेचे कोरडे ओढले होते. पंडित नेहरूंना हळूहळू महाराष्ट्राची ही तीव्र भावना उमजली. १९५७ च्याच्या निवडणुकीत तर सर्वत्र काँगेसने सपाटून मार खाल्ला होता. याबाबत केसरी १५ मार्च १९५७च्या अंकात लिहितो, ''मतदारांना द्वैभाषिक राज्य नको आहे हेच महाराष्ट्र काँग्रेसच्या निवडणुकीतील अपयशाने सिद्ध झाले, केवळ विदर्भ व गुजरात येथे काँग्रेसचे उमेदवार निवडून आल्याने द्वैभाषिक मुंबई राज्यात काँग्रेसचे मंत्रिमंडळ आले.' महाराष्ट्राप्रमाणे गुजरातेतही स्वतंत्र गुर्जरत्वासाठी मागणी वाढती होती. अखेरीस द्वैभाषिकाचा प्रयोग सोडून द्यावा लागला.''[९६] यावरून केसरी वृत्तपत्राची भूमिका ही सुसंगत आणि संयुक्त महाराष्ट्राला पोषक असल्याचेच दिसून येते. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. इंदिराजी तेव्हा काँग्रेसच्या अध्यक्षा होत्या. त्यांची या कामी मोठी मदत झाली. २१ नोव्हेंबर १९५५ च्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सीताराम पवार बळी पडला. कौन्सिल हॉलवर महाराष्ट्राचा बावटा लावीनच हा त्याचा निर्धार १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना होऊन पुरा झाला. संयुक्त महाराष्ट्र समितीचे जयंतराव टिळक सरचिटणीस होते. तरीही त्यांनी आपल्या 'केसरी' या वृत्तपत्रातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा

धडाडीने पुरस्कार केला व अनेक वेळा लढ्यातून स्वतः भाग घेतला त्यामुळे जयंतराव टिळकांचे स्वप्न साकार झाले असे म्हणता येईल.

### ३.५.३ भाषावार प्रांतरचनेची मागणी

सार्वत्रिक निवडणुकांमुळे गाजलेल्या या वर्षातच भाषावार प्रांतरचनेचा प्रस्ताव संसदेपुढे मांडण्यात आला होता. स्वतंत्र आंध्र राज्याची मागणीही याच काळात पुढे आली होती. भाषावार प्रांत रचनेच्या सूचक हालचाली जुलै १९५२ मध्ये सुरू झाल्या होत्या. या मागण्यांवर व्यावहारिक विचार करून विभिन्न प्रांतनिर्मितीच्या दृष्टीने एक आयोग (कमिशन) नेमण्याबाबत विचारविनिमय सुरू होऊन यासंबंधीचा बिनसरकारी ठराव पश्चिम बंगालचे कम्युनिष्ट सदस्य श्री.तुषार चटर्जी यांनी संसदेत १२ जुलै रोजी मांडला. परंतु त्या वेळी तो अर्थातच असंमत झाला. हा ठराव अवेळी आल्याचे मत गृहमंत्री काटजू यांनी व्यक्त केले होते. ७७ विरुद्ध २६१ मतांनी तो हा ठराव फेटाळण्यात आला. महाराष्ट्रात २० ऑगस्ट १९५२ रोजी अमरावती येथे भाषावार प्रांतरचना परिषदेचे अधिवेशन घेण्यात आले. त्याचे प्रतिबिंब केसरी वृत्तपत्राच्या बातम्यांमध्ये उमटले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमधील लहान लहान घटना सुद्धा केसरीने वेगवेगळ्या मथळ्याखाली लिहून जनतेसमोर मांडल्या होत्या. या काळातील केसरीच्या संपादकांचे संशोधकाने अवलोकन करून त्यावर नवा प्रकाश टाकला आहे.

वर्ष १९५२ च्या अखेरीस स्वतंत्र आंध्रच्या चळवळीने जोर धरला होता. मागणीसाठी श्री.पोट्टी श्रीरामुले यांनी ५८ दिवस उपोषण केले. १५ डिसेंबर ५२ रोजी याच उपोषणात त्यांचा अंत झाला. या गंभीर घटनेनंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची १८ डिसेंबर

१९५२ रोजी बैठक झाली.''आंध्रासाठी बलिदान या १९ डिसेंबरच्या अग्रलेखांत 'केसरी'ने भाषावार प्रांतरचनेस पाठिंबा दिला आहे.''[९७] केसरी वृत्तपत्रातील हा अग्रलेख महत्त्वपूर्ण आणि वाचनीय असून या अग्रलेखाचे महत्त्व धोरणात्मक दृष्टीने अत्यंत मोठे ठरते. वृत्तपत्राने उठविलेल्या पार्श्वभूमीवर केंद्राला आंध्र प्रदेशाबाबत निर्णय घेणे भाग पडले. शेवटी दि. २६ मार्च १९५३ रोजी पंडित नेहरूंना आंध्र राज्याची घोषणा करावी लागली. स्वतंत्र आंध्रच्या मान्यतेमुळे इतर भाषिकांचेही दडपण वाढू लागले. म्हणून सरकारला १९ डिसेंबर १९५३ मध्ये राज्याची पुनर्रचना करण्यासाठी एक समिती (कमिशन) नेमावे लागले. या कमिशनमध्ये एस.फाजलअली अध्यक्ष तर पण्णीकर आणि कुंझरू हे या समितीचे सदस्य होते. महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळ पडलेला होता. दुष्काळामुळे जनता हैराण झालेली होती. दुष्काळावरील उपाययोजनांबाबत सरकार उदासीन होते. तेव्हा महाराष्ट्रातील या भीषण दुष्काळात जनतेची बाजू शासनासमोर मांडण्याची 'केसरी'ने पराकाष्ठा केली. १४ डिसेंबरच्या १९५२ रोजीच्या अग्रलेखात 'केसरी' वृत्तपत्राने महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांत पडलेल्या दुष्काळाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली होती. २१ डिसेंबर १९५२ च्या अंकातील स्फुटलेखनात ''दुष्काळ निवारणाबाबत सरकारी दिरंगाई''[९८] केसरी या वृत्तपत्राने दुष्काळाचीही दाद घेऊन ठाम भूमिका घेतली आणि आपली मते प्रखरपणे मांडली आणि या शिषकाखाली सरकारच्या चालढकलीच्या धोरणावर कठोर टीका केली होती. अशा प्रकारे जयंतराव टिळक अनेक वेळा आपली निर्भय मते मांडून केसरी या पत्राची ठाम भूमिका प्रकट करताना दिसत होते. दुष्काळ आणि शेतीपूरक अन्य प्रश्न केसरी पत्राने सबंध महाराष्ट्रातील प्रश्न मांडले व ते सोडवण्याचा प्रयत्न केला.

### ३.५.४ भाषावार प्रांतरचनेची समस्या

१५ जानेवारी १९५३ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन हैदराबाद येथे भरले होते. या अधिवेशनामधूनही भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचे पडसाद उमटले. स्वतंत्र आंध्राला मान्यता दिल्यामुळे भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला जोर आलेला होता. अर्थात या संदर्भात पंडित नेहरू यांची भूमिका समजणे अवघड होते. भाषावार प्रांतरचनेस नेहरूंची भूमिका मुळात फारशी अनुकूल अशी नव्हतीच तरीही अधिवेशनात महामंत्री या नात्याने ते कोणती भूमिका मांडतात याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष होते. विषयनियामक मंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्रातर्फे हिरे आणि काकासाहेब गाडगीळ यांनी महाराष्ट्राची बाजू मांडली. परंतु नेहरूंनी या विषयाला वेगळीच कलाटणी देऊन ते म्हणाले, ''केवळ भाषेच्या तत्त्वांवर प्रांतांची रचना करणे योग्य होणार नाही. दुसऱ्याही महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. देशापुढे आर्थिक समस्या आहेत. पंचवार्षिक योजना आहे, त्याचे काय होणार ? स्वतंत्र आंध्र प्रांताची आपण निर्मिती केली पण त्याचा अनुभव काय येतो ते पाहिले.''[९९] नेहरूंच्या अशा भूमिकेमुळे भाषावार प्रांतरचनेसंबंधीचा विषय बेमुदत तहकूब करण्याचा ठराव अधिवेशनात मांडण्यात आला, व तो संमतही झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सुरुवातीला भाषावार प्रांतरचनेचे मागणीच्या पुरस्कार करणाऱ्या काकासाहेब गाडगीळांनीच ऐनवेळी हा ठराव मांडला होता! याचा अर्थ असा की, आंध्र राज्य निर्मितीनंतर पंतप्रधान नेहरूंची चिंता अधिक वाढली होती; पण 'केसरी'ने त्याची फिकीर न करता त्या वेळी महाराष्ट्राची बाजू मांडली आणि ती जनमत तयार करून उचलून ही धरली होती.

आंध्र प्रदेशच्या स्वतंत्र निर्मितीमुळे भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला सर्वत्र जोर चढलेला

होता. यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने आक्रमक यावरून धारण केले होते. या ठिकाणी राज्य पुनर्रचना समितीची स्थापना, नागपूर करार व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची पूर्वतयारी या घटनांचा उल्लेख करणे जरूर आहे. जयंतराव टिळक यांनी दृष्टिपथात येते असलेला महाराष्ट्र डोळ्यांसमोर पाहिला होता. महाराष्ट्रातील सर्व घटक प्रदेश या घटनेवर एकत्र येऊन त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी नागपूर करारावर सह्या केल्या होत्या. त्यावरही केसरीने भाष्य केल्याचे दिसून येते. अशा प्रकारे महाराष्ट्रातील ज्वलंत व जिवंत प्रश्नावर केसरी वृत्तपत्राने जी भूमिका घेतली होती तीच निर्णायक ठरली. नागपूर कराराचे केसरीने स्वागत केले व सारा महाराष्ट्र पुन्हा एकत्र येत आहे त्याचा आनंद व्यक्त केला आहे.

### ३.५.५ नागपूर करार

सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होणे नजीकच्या काळात शक्य नाही, असे वाटू लागल्याने स्वतंत्र वऱ्हाडची मागणी पुढे आली. या मागणीला संयुक्त महाराष्ट्र परिषदेने पाठिंबा द्यावा यासाठी श्री. रामराव देशमुख यांच्या मध्यस्थीने मुंबईत कार्यकर्त्यांची एक बैठक बोलावण्यात आली होती या प्रश्नाचा व्यापक पातळीवर विचार करण्यासाठी २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर येथे एक बैठक बोलवण्यात आली. या बैठकीला महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा अशा तीन भागांतील कार्यकर्ते व पुढारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबई, मध्य प्रदेश व हैदराबाद अशा तीन राज्यातील मराठी भाषिक असा एकसंध संलग्न महाराष्ट्र स्थापन करावा व मुंबई ही राजधानी असावी असा ठराव या बैठकीत मांडण्यात आला. विधानसभेची वर्षातून एक तरी बैठक नागपूरला घ्यावी असेही ठरवण्यात आले. हा मसुदा अकरा–कलमी होता.

म्हणूनच ते 'नागपूरचा अकरा–कलमी करार' म्हणून ओळखला जाऊ लागला. या करारावर महाविदर्भातर्फे रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, रा.कृ. पाटील, शेषराव वानखेडे यांनी सह्या केल्या. पश्चिम महाराष्ट्रतर्फे भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे यांनी तर मराठवाड्यातर्फे देवीसिंह चौहान आणि लक्ष्मणराव भाटकर यांनी सह्या केल्या. श्री. शंकरराव देव व स्वामी रामानंद तीर्थ यांनी चर्चेत सहभाग घेतला, परंतु त्यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या नाहीत. नागपूर– कराराचे 'केसरी'ने वृत्तपत्राने स्वागत करून त्या अनुषंगाने २ ऑक्टोबर १९५३च्या केसरीच्या अंकात ''प्रगतीचे पुढचे पाऊल'' या शीर्षकाच्या अग्रलेखात 'केसरी' ने या करारामुळे भाषावार प्रांतरचनेच्या मागणीस पाठिंबा मिळेल असे सूचित केले. यावरून जयवंतराव टिळक यांनी केसरी वृत्तपत्रामधून भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करून संयुक्त महाराष्ट्राचा मार्ग कसा सुलभ होत आहे याचे दृश्य चित्र जनतेला दाखविले. केसरीचा हा अग्रलेख संशोधकाने काळजीपूर्वक वाचावा म्हणजे तो अग्रलेख संयुक्त महाराष्ट्राची नांदीच म्हटले पाहिजे हे कळेल.

नागपूर–कराराचे सर्वत्र स्वागत झाले, खरे परंतु मुंबईतील भांडवलदार मंडळी व त्यांचे पाठीराखे मात्र या कराराने अस्वस्थ झाले. त्यातूनच पुढे मुंबईच्या भवितव्यासंबंधी चर्चा सुरू झाली. मुंबई स्वतंत्र ठेवण्याची मागणी करणारा एक गट पुढे आला. श्री. स. का. पाटील या गटाचे प्रमुख होते. भाषावार प्रांतरचनेच्या गोंधळात मुंबईचे स्वतंत्र अस्तित्व कायम राहणार नाही, याबद्दल स. का. पाटील यांना भीती वाटत होती. त्यामुळेच मुंबई स्वतंत्र राहिली तरच मुंबईचे संमिश्र व रमणीय जीवन सुरक्षित व अबाधित राहील, असा सूर पाटील यांनी लावला होता. पाटील यांच्या भूमिकेवर संयुक्त

महाराष्ट्र परिषदेच्या नेत्यांनी टीकेची झोड उठविली. संयुक्त महाराष्ट्रातूनच मुंबई वेगळी काढण्याचा हा कुटील डाव आहे, असे मत सर्वत्र व्यक्त होऊ लागले. केसरी पत्रानेही स. का. पाटील यांच्यावर परखड टीका केली.

'मुंबई ही काही पाटील—मावंकरांची खासगी मालमत्ता नव्हे' असे उद्‌गार काकासाहेब गाडगीळ यांनी काढले. नागपूर—करारामुळे सर्वच बाजूंनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या मागणीला बळ येन लागले. 'संयुक्त महाराष्ट्र हे आजचे साध्य व उद्याचे साधन आहे. संयुक्त महाराष्ट्र हा काही हट्टी पोरांचा छंद आणि खेळ नव्हे, तर ते डोळ्यांसमोर असलेले एक ध्येय आहे' असे सूचक उद्‌गार प्रसिद्ध साहित्यिक घाटे यांनी महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अहमदाबाद येथील ३६ व्या अधिवेशनात काढले. त्यांचे हे विचार स्पष्ट व पारदर्शी होते. त्या विचारातील सत्य घटना तितकीच महत्त्वाची होती.

### ३.५.६ राज्य पुनर्रचना समितीच्या शिफारशी

गोव्याचा मुक्तिसंग्राम धगधगत असतानाच द्विभाषिक राज्याचे डावपेच लढविले जात होते. राज्यपुनर्रचना समितीचा अहवाल लवकरच सादर होणार होता. या अहवालाच्या प्रसिद्धीपूर्वीच वातावरण तयार होऊ लागले होते. अहवालाच्या शिफारशीमुळे महाराष्ट्रात प्रचंड जनक्षोभ निर्माण होईल याचीही शासनाला जाणीव होती. तरीही त्यावेळच्या केंद्र सरकारने, तसेच मोराजींच्या मुंबई सरकारने काँग्रेस महासमितीने घेतलेल्या आडमुठ्या भूमिकेमुळे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला तोंड फुटले. गोव्याप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यांतही 'केसरी'ने केलेली कामगिरी अजोड म्हणावी लागेल. 'केसरी' वृत्तपत्रांनी घेतलेली भूमिका इतिहास घडविणारी ठरली होती.

गोवे आंदोलनाची तीव्रता एकीकडे कमी होत असतानाच राज्यपुनर्रचना

समितीच्या अहवालाचे वेध लागण्यास सुरुवात झाली. समितीच्या शिफारशींबद्दल अनेक तर्ककुतर्क करण्यात येते होते. संभाव्य शिफारशींबाबत अंदाजही व्यक्त करण्यात येत होते. या शिफारशींच्या संदर्भात प्रक्षोभ होण्याची शक्यता होती. केंद्र शासनाला त्याची पूर्वजाणीव असल्याने प्रांतरचनेच्या निर्णयाच्या निमित्ताने दंगल केल्यास सरकार कडक उपाय योजणार असल्याचा इशारा राज्य व केंद्र शासनाने दिला. बेकायदा व हिंसक निदर्शने चालू देणार नाही, असे मुंबई शासनाने जाहीर केले. यावरून मुंबई शासन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या विरोधात आहे, असे संकेत दिसत होते. पण केसरी पत्र डगमले नाही. मुंबई सर करण्यावर केसरीने वारंवार तोफ डागली.

### ३.५.७ देवांचे महाद्वैभाषिक

राज्य पुनर्रचनेच्या शिफरशी प्रकाशित होताच एकच वादळ उठले. चर्चेचे व परिषदांचे गुऱ्हाळ सुरू झाले. पर्याय सुचविण्यास प्रारंभ झाला. समतोल द्वैभाषिक, तीन राजे मुंबई केंद्रशासित करून विदर्भासह संपूर्ण मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य असे एकामागून एक पर्याय सुचविण्यात येऊ लागले या शिफारशींवर टीका करताना 'केसरी' ने ११ ऑक्टोबर ५५ च्या अग्रलेखात ''भारतात महाराष्ट्र नाही''[१००] असे उपरोधिक भाष्य केले. केसरीने लिहिलेला हा अग्रलेख महत्त्वाचा असून त्यामध्ये उपरोधी शैलीद्वारे सत्य कथन केले. भाषिक तत्त्व मान्य करून मुंबई द्वैभाषिक ठेवण्याच्या शिफारशींवर सर्व स्तरांमधून कडाडून हल्ला चढविण्यात आला. फाजलअल्ली कमिशनच्या शिफारशींमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर लिहिताना 'केसरी'ने दिनांक १४ ऑक्टोबर ५५ च्या अग्रलेखात संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य होईपर्यंत लढ चालू ठेवण्याचे आवाहन केले होते. 'सीमेवरील मराठी जनता' या शीर्षकामधून २१ ऑक्टोबर १९५५ च्या

अग्रलेखात ‘केसरी’ म्हणतो, ‘‘राज्य–पुनर्रचना समितीने आपल्या निर्णयामध्ये बेळगाव–कारवार या मराठी सीमा प्रदेशातील जनतेवर अन्याय केला आहे. सीमाविषयक शिफारशी चुकीच्या व अनमूलक आहेत. त्या स्वीकारल्यास देशभर नसते कलह माजून राहतील. संयुक्त महाराष्ट्राच्या सीमेवरील जनतेने आपली न्याय्य मागणी नाउमेद न होता मांडावी.’’[१०१] केसरीने अशीच ठोस भूमिका सातत्याने घेतली होती. केसरीने या सर्व परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करूनच तपशीलवार त्यांचे विश्लेषण केलेले आहे.

### ३.५.८ संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे निवेदन

फाजलअली कमिशनच्या शिफारसीवर टीका करताना खरी तोफ डागली होती ती धनंजयराव गाडगीळ यांच्या निवेदनावर! हे निवेदन करण्यामागे धनंजयरावांचे विद्वत्तापूर्ण परीक्षण कारणीभूत होते. डॉ. गाडगीळांनी समितीच्या तत्त्वहीन अहवालावर चौफेर हल्ला चढविणारी पुस्तिका लिहिली ‘‘सम ऑब्झर्व्हेशन्स ऑन द रिपोर्ट ऑफ द स्टेट्स रिऑर्गनायझेशन कमिशन’’ ही पुस्तिका संयुक्त महाराष्ट्र परिषदेने प्रकाशित केली. सर्व मराठी जनतेची व्यथा नव्हे, तर प्रचंड क्षोभही या पुस्तिकेतून व्यक्त झालेला होता. केसरीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी पोषक वातावरण तयार केले.

श्री.गाडगीळ या पुस्तिकेत म्हणतात ‘‘शिफारशी महाराष्ट्रावर जाणूनबुजून अन्याय करणाऱ्या आहेत. मराठीभाषकांना कनिष्ठ प्रतीचे नागरिक बनविण्याचा डाव यामागे आहे. विदर्भातील एका मोठ्या गटाच्या मताला झिडकारून स्वतंत्र राज्य बनविले आहे तर अन्य मराठी भाषकांना एका द्वैभाषिक राज्यात कोंबण्यात आले आहे. शिफारशी पूर्णतः पक्षपाती, अशास्त्रीय व परस्परविरोधी आहेत. ‘‘संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करण्यातच महाराष्ट्राचे हित आहे, असे उद्‌गार म.म.पोतदार यांनी पुण्यात

भरलेल्या शनिवारवाड्यावरील सभेत काढले. गाळगीळ व पोतदार यांची मते परस्परपूरक होती संयुक्त महाराष्ट्राची बाजू जे कोणी घेतील त्यांची मते केसरीने नेहमीच उचलून धरलेली होती.

द्वैभाषिक राज्यावर उलटसुलट मतांचा गदारोळ चालू असतानाच त्रिराज्याची सूचना काँग्रेस कार्यकारिणीने मांडली होती. मुंबईचे द्वैभाषिक राज्य करण्याची फेररचना मंडळाच्या शिफारशीस मुंबई प्रांतिक काँग्रेसचा विरोध असल्याने ती स्वीकारण्याचा आग्रह धरू नये, उलट मुंबई शहर, गुजरात व महाराष्ट्र अशी तीन राज्यात स्थापन करावीत, गुजरात राज्यांत हल्लीच्या मुंबई राज्यातील गुजराती भाग, कच्छ, सौराष्ट्र यांचा समावेश करावा, महाराष्ट्रात मुंबई राज्यातील मुलूख हैदराबाद राज्यातील मराठवाडा, मध्य प्रदेशांतील मराठी जिल्हे यांचा समावेश करावा असा आशयाचा ठराव काँग्रेस कार्यकारिणीने १० नोव्हेंबर रोजी केला होता. १३ नोव्हेंबर १९५५ च्या अंकातील 'मुंबईचा लचका तोडला' या अग्रलेखात 'केसरी' म्हणतो, ''फाजलअली कमिशनने अन्याय्य शिफारशींनी महाराष्ट्राला जखमी केले. त्यावर काँग्रेस कार्यकारिणीने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची शिफारस करून मीठ चोळले आहे. हा निर्णय अखेरपर्यंत कायम राहिला, तर महाराष्ट्राच्या आशाआकांक्षा धुळीला मिळतील.''[१०२] मुंबईचा लचका तोडला हा केसरीचा अग्रलेख महत्त्वाचा असून त्यामध्ये केसरीने केंद्र सरकारची पर्वा न करता आपल्या अग्रलेखामधून ते त्यांच्यावर तुटून पडलेला होता. केसरीच्या या अग्रलेखामध्ये संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर पत्राची ठाम भूमिका स्पष्ट होते.

निराशा, निषेध, संताप, विषाद अशा संमिश्र भावनांतून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन मार्ग क्रमण करीत होते. शिवाजी पार्कवरील जाहीर सभेत शंकरराव

देवांनी मुंबई अलग करून तिचे निराळे राज्य बनविण्याच्या सूचनेस आपण प्राणपणाने विरोध करू, असे जाहीर केले. संयुक्त महाराष्ट्राच्या या आंदोलनात मराठी महिलाही मागे नव्हत्या. केवळ मुंबईत महिलांच्या दोन परिषदा झाल्या होत्या. एका परिषदेचे उद्‌घाटन सौ. सुमतीबाई गोरे यांनी केले तर दुसऱ्याचे उद्‌घाटन उर्दू कथालेखिका इस्मत चुगताई यांनी केले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महिलांचा सहभाग लक्षणीय होता असे केसरीतील संदर्भावरून दिसून येते. महिला सहभागाचे अनेक पुरावे केसरीच्या स्तंभातून प्रकट होतात. महिलांच्या सहभागाची व्यापकता ही या अभ्यासातील ज्वलंत संशोधनाचा विषय होऊ शकेल.

### ३.५.९ 'मुंबईत रावणराज्य' : गोळीबार

२१ नोव्हेंबरचा १९५५ दिवस उजाडला तोच मुळी बंदच्या आणि पोलिस बंदोबस्ताच्या वातावरणात मुंबईत रस्त्यारस्त्यांवर, नाक्यानाक्यांवर पोलिसांची फिरती गस्त होती. ट्राम, बस, रेल्वे आणि स्टेशनावर पोलिस व होमगार्ड्‌सचा खडा पहारा होता. गिरण्या, कारखाने बंद होते संपावरील कामगार मोर्च्यात सहभागी होण्यासाठी सकाळी दहापासून ओव्हेल मैदानाच्या दिशेने निघाले होते. दादर परळहून घोषणा देत झुंडीच्या झुंड चालल्या होत्या. फोर्ट भागांत तर रस्ते, गल्ल्याबोळ पोलिसांनी अडविले होते. फ्लोरा फाऊन्टनच्या चौकात तर लढाईप्रमाणेच पोलिसांनी व्यूहरचना केली होती. पोलिस आयुक्त श्री. बाबुलाल शहा यांच्याकडे सर्व बंदोबस्ताची सूत्रे होती. विधानसभा हे निदर्शकांचे लक्ष्य होते. पोलिसांनी अडविले तरी विधानसभेवर जायचेच असा कार्यकर्त्यांचा निर्धारच होता. तर फ्लोरा फाऊंटनच्या पुढे जाऊ द्यायचे नाही असा

पोलिसांचा निर्धार होता. मुंबई विद्यापीठापाशी पोलिसांनी फळी उभारून रस्ता रोखून धरला होता. त्यामागे बंदूकधारी पोलिसांची पथके होती. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली पहिली तुकडी दुपारी एक वाजता निघाली. ङ्कटपाथवरून रस्त्यावर पाऊल टाकताच लाठीमार सुरू झाला. लाठीमार चुकवीत लोक पुढे जात होते. फ्लोरा फाऊंटनचे पोलिसांचेकडे भेदून लोक पुढे सरकले आणि अचानक अश्रुधुराची नळकांडी फुटू लागली. जवळच मोटारीत बसलेले शंकरराव देव हे सर्व पाहत होते. तोच पोलिसांनी बंदुकांची फैरी झाडली. लाठ्या, अश्रुधूर आणि गोळीबार अशा तडाख्यात निदर्शक सापडले. जमावाची पांगापांग आणि अश्रुधूर गोळीबार आस खेळ दुपारी चारपर्यंत सुरू होता. तेवढ्यात एस. एम. जोशी नौशेर भरुचा आणि अमूल देसाई विधानसभेतून तेथे येऊन धडकले. मिरवणुकीने चौपाटीवर जाऊन सभा घेण्याची व पोलिसांच्या लाउडस्पीकरची गाडी वापरण्याची परवानगी मिळाल्याने एस.एम.भरूचा यांनी जमावाला चौपाटीवर जाण्याचे आवाहन केले. या तीन पुढाऱ्यांनी व्हॅनवर उभे राहून भाषणे केली. या भाषणांतील आवाहनाप्रमाणे लाखोंचा जमाव शांतपणे चौपाटीवर गेला. लोकमान्यांच्या पुतळ्यापुढे जाहीर सभा झाली. ही सभा विराट म्हणजे चार ते सहा लाखांची होती. एस. एम. जोशी, कॉ. डांगे, शंकरराव देव यांची या सभेतील भाषणे संस्मरणीय ठरली. या भाषणाचा केसरी पत्रातील वृत्तांत खूपच वाचनीय आहे आणि तो तेवढाच पारदर्शी आहे. यावरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील केसरी वृत्तपत्रांनी घेतलेली भूमिका किती प्रभावी व अनुकूल होती हेच स्पष्ट होते.

२१ नोव्हेंबरच्या गोळीबाराचे व जाहीर सभेचे पडसाद उमटले ते २२ रोजी सकाळी वृत्तपत्रे प्रसिद्ध झाल्यानंतर! 'केसरी'ने दिलेल्या वृत्तानुसार त्या दिवशी

गोळीबारांत १० ठार २६६ जखमी झाले तर 'नवाकाळ'च्या वृत्तानुसार १५ ठार व ३०० जखमी झाले. सुमारे ४०० जणांना अटक झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील हे पहिले १५ बळी! या अमानुष गोळीबारासंबंधात सर्वच वृत्तपत्रांनी मोरारजीभाईच्या शासनावर प्रखर टीकेची तोफ डागली. ठिकठिकाणी या अत्याचाराचा निषेध होऊ लागला. दरम्यान विधानसभेतील त्रिराज्याचा ठरावही बारगळला. केसरी पत्राने गोळीबाराचे जे वर्तमान दिले आहे त्या मध्ये सरकारचा निषेध करण्याचाच भाव दिसून येतो त्यातून जयवंतरावांची भूमिका संयुक्त महाराष्ट्रवादी असल्याचे कायमच दिसून येते. केसरी पत्र आक्रमक होत गेले व लढाही तीव्र होत गेला.

पोलिस बळाच्या साह्याने लढा चिरडण्याचा प्रयत्न करणाऱ्या मोरारजीभाईच्या कृत्यावर 'केसरी'ने २२ व २५ नोव्हेंबर १९५५ च्या अंकातील अग्रलेखात जळजळीत टीका केली. 'लोकशाहीची क्रूर विटंबना' या २२ नोव्हेंबरच्या अग्रलेखांत मुंबईतील प्रक्षोभाला मोरारजीच जबाबदार असल्याचे म्हटले आहे.''[१०३] केसरीचा हा अग्रलेख संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक महत्त्वाचा क्षण टिपणारा आहे. केसरीने मोरारजी सरकारची वाभाडे काढले होते. २३ नोव्हेंबर १९५५ला पुण्यात शनिवारवाड्यावर झालेल्या सभेतही मोरारजीभाई व सालाझार एकाच माळेतील आहेत असे अनेक वक्त्यांनी सांगून त्यांच्या कडक शब्दात खरपूस समाचार घेतलेला होता. 'मुंबईतील रावणराज्य' या २५ नोव्हेंबरच्या अंकातील अग्रलेखाचा येथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या अग्रलेखांत प्रारंभी लोकमान्यांच्या १३ जुलै १८९७ च्या अग्रलेखातील अवतरण दिले आहे हे असे : ...''राज्यांतील सर्व व्यवस्था येथे तेथे आपल्या सामर्थ्याचा डोल मारून करणे म्हणजे रावणराज्याचेच अनुकरण होय... राज्य करणे

म्हणजे जेथे तेथे आपली तलवार काढून, मानवा, तू काय समजलास, तुला सुपारीच्या खांडासारखा खाऊन टाकीन, जाळीन, पोळीन अशा तऱ्हेने लोकांस भिववीत सुटणे नव्हे.

या अग्रलेखांत 'केसरी' म्हणतो, ''मुंबईतील घटनांनी अंतःकरण व्यथित होणार नाही अशी व्यक्ती क्वचित सापडेल. मुंबईतील गोळीबार हा राक्षसी गोळीबार आहे. मोरारजींच्या भूमिकेबद्दल काही न लिहावे तितके बरे. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला शह देण्यासाठी स्वतःच्या बंगल्यावर गुजराती नेत्यांची बैठक होऊन परवापर्यंत आपण का केले याचा त्यांनीच आपल्या मनाशी आढावा घ्यावा.''[१०४] केसरीच्या अग्रलेखातील हा आकडा प्रभावी सत्य सांगणारा आहे. त्यामधील मते मोरारजी सरकारचा दंभस्फोट करणारी होती. मोरारजींच्या संगिनीमुळे मुंबई शांत राहिली या अपप्रचारावरही अग्रलेखांत टीकेची झोड उठविण्यात आली होती. केसरीने घेतलेली परखड आणि ठाम भूमिका ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नैतिक धैर्य उंचाविणारी होती. त्यामुळे काँग्रेसी मोरारजी सरकारचे वस्त्रहरण करणे सहजशक्य झाले होते. यावरून जयवंतराव टिळक यांचा निर्धार व संकल्प स्वागतार्ह होता यात शंका नाही.

### ३.५.१० संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला तोंड फुटले

संयुक्त महाराष्ट्राची आणि गोव्याची चळवळ चालूच होती. गोवे विमोचन समितीच्या बैठका 'केसरी' कार्यालयात होत होत्या. मुंबईत दि. १६ ला संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांची धरपकड झाल्याने सर्वत्र खळबळ माजली होती. ४३५ जणांना अटक झाल्या होत्या. या घडामोडी बाबत दुसऱ्या दिवशीचा केसरीने आपल्या अंकात स्पष्टपणे इशारा दिला : ''अन्याय कोणीही करो, तो सहन करण्याची महाराष्ट्राला सवय

नसल्याने न्याय मिळेपर्यंत त्यागपूर्वक झगडत राहण्याचा  आपला बाणा या वेळीही महाराष्ट्र खरा करून दाखवील.''[१०५] केसरीच्या भूमिकेमध्ये सातत्य असून प्रसंगी नेहरूंवर टीका करून आणि मोरारजी सरकारचे वस्त्रहरण करून केसरीकार आपली भूमिका ठामपणे मांडते. महाराष्ट्राचा मुंबईवरील नैतिक हक्क महामंत्री नेहरू यांना मान्य होता, पण तरीही मुंबई केंद्रशासितच राहील असे त्यांनी जाहीर केले. हा निर्णय जाहीर होण्यापूर्वीच नेत्यांची मुंबईत धरपकड झाली. या सर्व घटनांची बारीक सारीक नोंदीचे वर्तमान केसरी वृत्तपत्रामधून प्रकट झालेली होती.

मुंबईतल्या जुलमी धरपकडीच्या निषेधार्थ पुण्यामध्येही हरताळ पडला. संध्याकाळी बाबूराव सणस यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर केंद्रीय मंत्रिमंडळातील महाराष्ट्रीय मंत्र्यांनी व राज्याच्या मंत्रिमंडळाने राजीनामे द्यावेत असा निर्णय महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या बैठकीत कॉंग्रेस भवनात झाला होता. याच वेळी सर्वपक्षीय नागरिकांचा मोर्चा श्री. जयंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस भवनावर गेला होता मुंबईतली परिस्थिती आटोक्याबाहेर गेली होती. हरताळ, निदर्शने यांनी उग्र यावरून धारण केले होते. पोलिसांनी अनन्वित अत्याचार केले होते. अनेक वेळा गोळीबार केला होता. याबद्दल केसरीने २२ जानेवारीच्या अग्रलेखात म्हटले होते, ''मोरारजीभाईंनी आता आपण होऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याचा भलेपणा दाखववावा.. संतप्त महाराष्ट्रीयांनी संयम सोडू नये.''[१०६] केसरी पत्राचा हा अग्रलेख अत्यंत महत्त्वाचा असून त्यामध्ये मोरारजीवर सरळ सरळ टीका करून त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या राजीनाम्याला स्पर्श केलेला होता. महाराष्ट्रातील मंत्र्यांनी राजीनामे दिले खरे, परंतु पक्षश्रेष्ठींच्या आदेशामुळे राजीनामे परत घेतले.

याबद्दल केसरीने 'महाराष्ट्र काँग्रेसची शोकांतिका'[१०७] हा अग्रलेख लिहिला होता. सरकारच्या निर्णयामुळे आणि दडपशाहीमुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा थांबला नाही. बेळगावमध्ये दि. ९ मार्च रोजी श्री. जयंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह झाला. त्या सत्याग्रहाबद्दल श्री. टिळक यांना १५ दिवस साधी कैद झाली होती. महाराष्ट्रात ठिकठिकाणी सत्याग्रह चालूच होता. दिल्लीतही सत्याग्रहाची एक तुकडी गेली होती. कर्नाटकातील कंग्राळी येथील सत्याग्रही बाळू मिळतकर यांचे हिंडलगा तुरुंगात असतानाच निधन झाले होते. होसूरकर नावाच्या एका सत्याग्रह्यांचेही येथेच निधन झाले होते. या संदर्भात केसरीने दि. १३ मे १९५५ च्या अंकात इशारा देऊन महाराष्ट्र काँग्रेसची शोकांतिका हा अग्रलेख काँग्रेस पक्षाच्या बोटचेपेपणा प्रकाश टाकून प्रखर टीका करणारा होता. प्रश्न जसे ऐरणीवर येत होते तसे केसरी पत्र त्यावर अचूक प्रहार करत असत.

जूनच्या सुरुवातीलाच काँग्रेस महासमितीचे मुंबईत अधिवेशन झाले, हे अधिवेशन संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणांनीच गाजले. अधिवेशनाला या वेळी पंधरा हजारांवर लोक जमले होते. ठीक ठिकाणी घोषणा चालू होत्या. या वेळी ६८९ जणांना अटक झाली आणि दगडफेक करणाऱ्या जमावावर पोलिसांनी लाठीहल्ला केला. यावर केसरीने आपल्या ५ जूनमध्ये लिहिलेल्या अग्रलेखात म्हटले होते, ''सत्तारूढ काँग्रेसने व पं. नेहरू प्रभृती नेत्यांनी आत्मनिरीक्षण करण्याची ही वेळ आहे... हिंसाचाराच्या एकतर्फी धिक्कारातून या देशात हिंसात्मक हुकूमशाहीची मुळेच पक्की होण्याचा फार मोठा धोका आहे.''[१०८] असा इशारा केसरीने दिला होता. केसरीने पत्राने केंद्राच्या महाराष्ट्र विरोधी भूमिकेवर केलेली टीका लक्षणीय म्हटली पाहिजे. ही टीका

झोंबणारी तर शिवाय काँग्रेस पक्षावर रोखठोक टीका करणारीही होती. केसरीकार जयवंतराव टिळक या काळात अनेक वेळा काँग्रेसविरोधी भूमिका घेत असत त्यांचे हे उदाहरण होते.

### ३.५.११ चिंतामणराव देशमुखांचा राजीनामा

मुंबईबद्दलच्या घेतलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ अखेर केंद्रीय अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. लोकसभेत त्यांनी स्पष्टपणे विचारले, होशियापूरच्या लाठीहल्ल्याची चौकशी होऊ शकते तर मुंबईतील गोळीबाराची चौकशी का होऊ नये? नेहरूंच्या मनात महाराष्ट्राविषयी द्वेषबुद्धी नाही, पण काँग्रेसमधील काही बड्या पुढाऱ्यांचे मनात ती आहे. मंत्रिमंडळाच्या पूर्वसंमतीशिवाय मुंबईबाबत दोन महत्त्वाचे निर्णय करण्यात आले अशी माझी तक्रार आहे. यावरून चिंतामणराव देशमुख यांची महाराष्ट्राविषयी किती परखड मत होते हेच त्यातून अधोरेखित होते. केसरीने चिंतामणराव देशमुखांच्या भूमिकेचे स्वागत व समर्थन केले.

दि.२२ जून १९५६ च्या केसरीत दैवालाही नमविणारे खंदे वीरांगणी' हा अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्यात म्हटले होते, ''मुंबईच राजधानी असणे हा महाराष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे, असे बजावणारे सत्याग्रही टिळकांची चिकाटी, त्यांचे धैर्य व त्यांचा स्वार्थत्याग यांचा शतांश जरी आचरणात आणतील तरी आपली मुंबई महाराष्ट्रातच मिळेल.''[१०९] केसरीच्या अग्रलेखामधील मते टिळकांच्या ठोस मतास पूरक असल्याचे दिसून येते त्यावरून केसरी वृत्तपत्राची निर्णायक भूमिका स्पष्ट होते. लो.टिळक आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यांची सुरेख सांगड केसरीने घालून दिली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची झगडत राहण्याचे आपले ब्रीद केसरीने क्षणभरही बाजूला

ठेवले नाही. त्या वर्षी टिळक पुण्यतिथी सत्याग्रहाने गाजली. पुण्यात हजारावर सत्याग्रह्यांनी सत्याग्रह केला. महिलांच्या तुकडीचे नेतृत्व सौ. इंदूताई टिळक यांनी केले होते. या दिवशी पं. नेहरू पुण्यात होते. त्यांच्या सभेमध्येही सत्यागृहींनी निदर्शने केली.

संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीत कच्छ, सौराष्ट्र, गुजरात यांसह विशाल द्वैभाषिकाचा ठराव संमत होता. 'गुजरातचे नाक कापून महाराष्ट्राला अपशकून' या अग्रलेखांत केसरीने म्हटले होते, ''ऐनवेळी मराठी व गुजराती जनतेला विश्वासात न घेता राजकारणी लोकांनी व गुजराती भांडवलवाल्यांनी संयुक्त महाराष्ट्र उधळण्याचा डाव साधला हे कबूल केले पाहिजे. पण इतका महत्त्वाचा व दुरपरिणामी प्रश्न न्याय संमिश्र राज्यामुळे चुटकीसरशी निघाला असे समजणे दूरदर्शीपणाचे ठरले.''केसरीने यावेळी मांडलेली अशा मते ही धाडसी नव्हती तर तेवढीच निर्णायक होती. केसरी वृत्तपत्राने सभोवतीच्या परिस्थितीचे आकलन करून सत्य घटना व घडामोडीवर अचूकपणे भाष्य केले होते. केसरीची वस्तुनिष्ठताही राजकीय शहाणपणावर आधारलेली होती.

### ३.५.१२ मोरारजी देसाई यांना जनता कर्फ्यू

विशाल द्वैभाषिक राज्याच्या निर्णयाला गुजरातमधून जोरदार विरोध झाला. त्यामुळे लोकांनी मुख्यमंत्री श्री. मोरारजी देसाई यांच्या राजीनाम्याची मागणी करून जनता कर्फ्यू पाळला. उपोषणाचे सत्र सुरू केले होते. यावर केसरीने अग्रलेखात म्हटले होते. ''राज्य पुनर्घटनेच्या पोरखेळात काँग्रेस सरकारने जेवढी लोकशाहीची विटंबना केली तेवढी इतरत्र क्वचितच झाली असेल. ''संयुक्त महाराष्ट्र या विषयाला केसरीने प्राधान्य दिलेले होते. तरीही सुवेझ प्रश्न, इंग्रजीला जीवदान, मागासलेल्या वर्गीचा प्रश्न, पाकिस्तानी महामंत्र्याचा राजीनामा, नवी पाकिस्तानी राजवट, शिक्षित

बेकारांची दुर्दशा यांसारख्या महत्त्वाच्या ज्वलंत प्रश्नांकडेही केसरीने दुर्लक्ष केलेले नव्हते. मात्र संयुक्त महाराष्ट्र या विषयाला प्राधान्य होते. नव्या द्विभाषिक राज्याच्या विधिमंडळ काँग्रेसमधील नव्या नेत्याची निवड झाली तेव्हा श्री. मोरारजी देसाई मुख्यमंत्रिपदावरून दूर झाले. यशवंतराव चव्हाण नवे मुख्यमंत्री झाले. विशाल द्वैभाषिक राज्याचा हा प्रयोग टिकणार नाही हे स्पष्टच होते. एक नोव्हेंबरला बेळगाव निपाणी–कारवार भागात 'काळा दिन' पाळण्यात आला. सरकारविरोधी असंतोष कसा प्रकट होत होता याचे चित्र केसरीत उमटले आहे. केसरी मधील हा अग्रलेख महाराष्ट्रातील जनतेची न्याय बाजू मांडणारा असून त्यातून जनतेचा आवाज प्रकट करणारा होता.

### ३.५.१३ निवडणुकीत समितीचा विजय

संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबईतील लोकसभेच्या चार आणि विधानसभेच्या चोवीस जागांसाठी आपले उमेदवार निश्चित केले महाराष्ट्रात इतर जागांसाठी ही उमेदवार जाहीर केले. बहुतेक ठिकाणी एकास एक अशीच काँग्रेसविरुद्ध लढत होती. सर्वत्र संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू झाला होता. सभा–मेळावे भरत होते. यातून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या दृष्टीने अनुकूल वातावरण तयार होत होते. केसरी पत्राच्या फायली चाळल्या असता या पत्राने संयुक्त महाराष्ट्र चळवळीस उचलून धरल्याचे दिसते.

गोवे विमोचनाचा प्रश्न तडीस लावण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन समितीचे नेते निवडणूक–प्रचारामधून करीत होते. काँग्रेसच्या प्रचारार्थ होणाऱ्या सभांतूनही श्रोते हेच प्रश्न उपस्थित करीत असत.

काकासाहेब गाडगीळ यांना पुण्यात ठिकठिकाणी या प्रश्नांना तोंड द्यावे लागले. मार्चच्या पहिल्या आठवड्यांत मतदान झाले आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार बहुसंख्येने विजयी झाले. गुजरातेतही महागुजरात जनता परिषदेचे उमेदवार विजयी झाले. बेळगाव कारवार भागांत महाराष्ट्र एकीकरण समितीला भरघोस यश मिळाले. पुण्यामधून काकासाहेब गाडगीळांचा पराभव करून ना. ग. गोरे विजयी झाले. एस. एम. जोशी, विष्णुपंत चितळे दोघेही विजयी झालेच; पण शिवाजीनगरमधील प्रतिष्ठेची जागा श्री. जयंतराव टिळक यांनी १८ हजारांवर मतांनी जिंकून समितीच्या यशावर कळस चढवला. मालोजीराव नाईक निंबाळकर आणि गणपतराव तपासे हे दोघे मंत्री पराभूत झाले. त्याचप्रमाणे मुस्तफा फकी हे राज्याचे मंत्री आणि खंडूभाई देसाई हे केंद्रीय मंत्री पराभूत झाले. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने लोकसभेच्या चौदा जागा जिंकल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांना ५१ टक्के, काँग्रेसला ४७ टक्के, व अपक्ष उमेदवारांना दोन टक्के मते मिळाली. या विषयाबद्दल केसरीने लागोपाठ अग्रलेख लिहिले होते. त्यांपैकी १९ मार्चच्या अग्रलेखात संयुक्त महाराष्ट्र समितीवरील जबाबदारीची जाणीव करून दिली होती. दुसऱ्या अग्रलेखात केसरीने म्हटले होते, ''काँग्रेस श्रेष्ठींनी हे लोकमत नीट समजावून घ्यावे आणि महाराष्ट्र काँग्रेसने मोरारजी ढेबर यांना न जुमानता आपली अपयशाची रास्त कारणपरंपरा वरिष्ठांना स्पष्टपणे सांगून टाकावी म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती लवकर करण्याचा मार्ग मोकळा होईल. ''[११०] अशा प्रकारे केसरीने सातत्याने ३ अग्रलेख लिहून संयुक्त महाराष्ट्राची बाजू लावून धरणेचे काम केले.

निवडणुकीतील पराभवाची कारणमीमांसा करताना महाराष्ट्रातील मतदारांचा कौल, माना व जनतेची लोकशाही मार्गावरची श्रद्धा उंडू देऊ नका, असा सल्ला

श्री.काकासाहेब गाडगीळ यांनी दिला होता. विशाल मुंबई राज्याच्या नव्या मंत्रिमंडळाचे नेतृत्व श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याकडेच आहे. तथापि सर्वसाधारण मराठी माणूस काँग्रेसच्या धोरणावर असंतुष्ट होता, तरीही जवाहरलाल नेहरू महाराष्ट्र विरोधी भूमिका घेत होते. केसरी पत्राने नेहरूंच्या महाराष्ट्रविरोधी भूमिकेवर परखड टीका केली.

### ३.५.१४ प्रतापगडावरील निदर्शने

विशाल द्वैभाषिकाच्या कारभाराविरुद्ध सर्वत्र असंतोष होता, वऱ्हाडात तर हा असंतोष सतत वाढत होता. 'राजकीयदृष्ट्या द्वैभाषिक राज्य यशस्वी झालेले नाही' अशी कबुली श्री. यशवंतराव चव्हाण यांनी औरंगाबादेत दिली होती. नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीला प्रतापगडावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी पंतप्रधान पंडित नेहरू येणार होते. या वेळी संय्रुत महाराष्ट्र समितीतर्फे निदर्शने होणार होती. मोरारजी देसाई यांनी शिवाजी महाराजांबद्दल काढलेल्या उद्‌गारांच्या निषेधार्थ ही निदर्शने होती. ती टाळण्यासाठी श्री. चव्हाण यांनी पुष्कळ प्रयत्न केले. श्री. देसाई यांनी असे उद्‌गार काढलेच नसल्याचा खुलासा आपल्याकडे केला असे खुद्द पं. नेहरूंनीही श्री. एस. एम. जोशी यांना पत्राने कळविले होते. परंतु या पत्रव्यवहारातून काही साध्य झाले नाही ८ ऑक्टोबरच्या अंकात 'संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रसंगोचित कार्य' या मथळ्याखाली केसरीने लिहिलेल्या अग्रलेखात म्हटले होते, ''पंडितजींनी मोरारजींकडून समर्थक खुलासा करवून घ्यावा अथवा त्यांना खेदप्रदर्शन करण्यास भाग पाडावे. विशेषतः शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी महामंत्री येथे यावयाचे असल्यास मोराजींनी छत्रपतींना दैवत मानणाऱ्या महाराष्ट्रावर जो गंभीर दोषारोप केला त्याचे संपूर्ण निराकरण व्हावे, आणि संयुक्त महाराष्ट्राच्या हितशत्रूंनी जी अर्वाच्य अपप्रचार मोहीम

चालविली आहे तिला कायमचा पूर्णविराम पं. नेहरूंनी द्यावा.''[१११] संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे निदर्शनाची तयारी जोरात चालू होती. त्याच वेळी ही निदर्शने जातीय असल्याचा, नेहरूविरोधी असल्याचा, प्रचार काँग्रेसतर्फे चालू होता. तरीही 'केसरी' वृत्तपत्राने लिहिलेला हा अग्रलेख ठाम बाजू घेणार होता हे सत्य प्रतिबिंबित होते.

दि. २८ रोजी वाईचा परिसर निदर्शकांनी फुलला, संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणांनी निनादला. मिळेल त्या वाहनाने किंवा पायीसुद्धा निदर्शक येत होते. 'केसरीने २९ नोव्हेंबर पंडितजी दिशाभूल का करता? या खास अग्रलेखात म्हटले होते, ''संयुक्त महाराष्ट्राची गेली दहा वर्षे मागणी करणाऱ्या मराठी जनतेविरुद्ध अपप्रचाराची जी निरर्थक मोहीम थैलीशहांच्या प्रेरणेने चालली आहे, तिला स्वहस्ते कायमचा पूर्णविराम देण्याची सुसंधी पंडितजींना महाराष्ट्रभेटीत लाभली आहे ती संधी साधून त्यांनी मोरारजींचा अश्लाघ्य उद्‌गाराचे यथायोग्य स्पष्टीकरण अजूनही करावे.''[११२] 'केसरी'च्या या अग्रलेखामधील खडा सवाल हा मुख्यमंत्री मोरारजींची टोपी उडविणारा होता.

पं. नेहरूंच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण दि. ३० नोव्हेंबरला झाले. पण संयुक्त महाराष्ट्राची घोषणा ऐकताच त्यांना कार्यक्रमाला जावे लागले. त्यानंतर पुण्यात झालेल्या भाषणांत निदर्शनांबद्दल खेद व्यक्त करून पं. नेहरू म्हणाले, ''द्वैभाषिकांबद्दल महाराष्ट्रात असंतोष आहे हे खरे आहे. पण सध्याच्या द्वैभाषिकांतच महाराष्ट्राचे अधिक कल्याण आहे असे मला वाटते. ''दि. ३ नोव्हेंबरच्या अंकात 'केसरी'ने म्हटले होते, ''सध्याच्या द्वैभाषिक मुंबई राज्याच्या निर्मितीमागे काही सयुक्तिक कारणपरंपरा आहे हे महामंत्र्यांना या राज्यातील जनतेला पटवून देता आले नाही.. महाराष्ट्राबद्दल आपल्या मनात आकस नाही असे पं. नेहरू पुनःपुन्हा कळवळून म्हणाले. मग महाराष्ट्रीय

जनतेवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यास ते आढेवेढे का घेत आहेत?''[११३] पंतप्रधान पंडित नेहरूंच्या मताबद्दलची थेट शंका उपस्थित करून त्यांच्या मतावर कडक टीका करणारा हा अग्रलेख चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. हा अग्रलेख केसरीच्या पूर्वपरंपरेस साजेसा व निर्भीड अग्रलेख होता.

द्वैभाषिकांबद्दल पं. नेहरूंनी पुण्यात काढलेले उद्‌गार महाराष्ट्र समितीला अनुकूल आहेत, अशा समजुतीने काँग्रेसच्या गोटात खळबळ उडाली, दरम्यान, मुंबई महापालिकेप्रमाणे पुण्याची महापालिका आणि बेळगावची पालिकाही संयुक्त महाराष्ट्र समितीने जिंकली. पुण्याच्या पालिकेतील ६५ पैकी ४८ जागा समितीने जिंकल्या, यावरून महाराष्ट्राचा कल व कौल स्पष्ट दिसत होता. समितीचा विजय म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या दिशेने दिलेला कौल आहे, अशा प्रतिक्रिया व्यक्त होत होत्या.

### ३.५.१५ द्वैभाषिक भंगण्याच्या मार्गावर

१९५९ च्या प्रारंभी नागपूर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात तीन ठराव संमत झाले. त्यातील आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि भारताचे परराष्ट्रीय धोरण हा ठराव मुख्य होता. 'केसरी'ने या विषयावरील अग्रलेखात म्हटले होते, पंडितजींसारख्या अव्वल दर्जाच्या नेत्याने भारताच्या घरगुती समस्यांवर लक्ष केंद्रित करावे. भारत सरकारच्या दुर्बलतेचा कठोर पुरावा गोमांतक व पाकिस्तान या दोन्ही प्रकरणांत ढळढळीतपणे आढळतो.

काँग्रेसचे अध्यक्ष यू. एन. ढेबर यांनी मुदत पूर्ण होण्यापूर्वीच पदाचा राजीनामा दिला आणि त्यांच्या जागी श्रीमती. इंदिरा गांधी यांची एकमताने निवड झाली. देशाच्या विकासकार्यात विविध पक्षांचे सहकार्य घेण्याचा विचार त्यांनी प्रथमच व्यक्त केला.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लढा–समितीने सीमा–लढा व्यापक करण्यासाठी सुमारे शंभर गावांत साराबंदी चळवळ सुरू केली होती. या चळवळीला प्रचंड अनेक गावांमधून चांगले यश मिळाले. त्याचे प्रतिबिंब केसरी पत्रातील बातम्या व स्‍फुट लेखात उमटले आहे.

संयुक्त महाराष्ट्र समितीने केलेले आवाहनानुसार जुलैमध्ये मराठी मुलखांत सर्वत्र सीमा–दिन पाळण्यात आला होता. समितीने मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. याबाबत 'केसरी'ने आपल्या १७ जुलैच्या १९५९ अग्रलेखात म्हटले होते, ''मुख्यमंत्र्यांनी दिल्लीचे दार जोराने ठोठावावे. या कामी सारे मतभेद विसरून महाराष्ट्रातील जनता त्यांना एकमुखाने पाठिंबा देईल... आता सीमाविरोधाबाहेरील जनतेने साहाय्याला धावून गेले पाहिजे.''[११४] 'केसरी'चे हे विवेचन महत्त्वाचे आहे. त्यामध्ये परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्याचे सत्य कथन, अचूकपणे आपल्या अग्रलेखातून केले होते.

गुजरातमध्ये द्वैभाषिकांविरोधी असंतोष वाढत होता. जनता परिषदेचे मुंबई सरकारवरील आरोपपत्र, असहकाराचे आंदोलन, हुतात्मादिनाची दंगल या साऱ्यातून असंतोष घुमसत राहिला होता. महाराष्ट्रात काँग्रसचे खासदार केशवराव जेधे यांनीही सीमा प्रश्नाचा व संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न पुण्यामध्ये स्वातंत्र्यदिनीच सभेत उपस्थित केला होता.

दरम्यानचे काळात दिल्लीतही द्वैभाषिकाच्या फेरविचाराची चर्चा सुरू झाली होती. यशवंतराव चव्हाण चर्चेसाठी दिल्लीला गेले होते. पं. नेहरू व पंत यांच्याशी झालेल्या त्यांच्या चर्चेत सीमावादासाठी लवाद नेमण्याचे ठरले. द्वैभाषिकाचे विभाजन

करून गुजरातचे वेगळे राज्य आणि मुंबईसह महाराष्ट्राचे वेगळे राज्य निर्माण करण्याचे ठरले. विदर्भाच्या नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्रात राहण्यास संमती दिल्याने काम आणखी सोपे झाले. गुजरातमध्ये देसाई यांनी विभाजनाचा निर्णय अटळ असल्याचे स्पष्ट केले होते. पुण्यात ऑक्टोबर महिन्यात झालेल्या सभेत अशीच घोषणा केली होती; परंतु ती थोडीशी संदिग्ध होती.

नव्या राज्यात डांग, नवापूर, उंचरगाव यांचे दान गुजरातच्या हातावर पडणार होते. या नव्या राज्याचे नाव मुंबई राज्य ठेवण्याचे ठरले. याबाबत दि. २७ डिसेंबरच्या अग्रलेखात केसरीने म्हटले होते, ''नव्या राज्याला मुंबई राज्यच म्हणण्याचा एवढा हट्ट काँग्रेसश्रेष्ठांनी का धरावा हे आम्हास समजत नाही... महाराष्ट्र या नावाखातर एवढे मोठे बलिदान झाल्यानंतर महाराष्ट्राच्या जनतेचे स्वतःच्या घटक राज्यासाठी त्या नावाचा आग्रह धरला तर त्या भावनेचा अनादर राज्यकर्त्यांनी करू नये. मुंबई हे नाव मोठे असले तरी महाराष्ट्र हे नामाभिधान त्याहूनही मोठे आहे.''[११५] अशी जाणीव केसरीने काँग्रेस पक्षश्रेष्ठींनाही करून महाराष्ट्राबद्दलची आपली भूमिका स्पष्ट केली होती. यावरून केसरी वृत्तपत्राची महाराष्ट्रबद्दलची अस्मिता स्पष्ट होते. केसरीचा महाराष्ट्र संस्कृतीवर ठाम विश्वास होता.

गुजरातची तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्राच्या काल्पनिक शिलकीतून सालोसाल खंडणी देण्याच्या निर्णयावर 'केसरी'ने टीका केली होती. ''महाराष्ट्राच्या उत्तरसीमेचे मन मानेल त्याप्रमाणे लचके तोडणाऱ्या या काँग्रेसश्रेष्ठींना महाराष्ट्राच्या दक्षिण सीमेचा प्रश्न अजून सोडविता आलेला नाही ही घटना संतापजनक असली तरी उद्‌बोधक आहे.'' हे आवर्जून मांडून बेळगाव कारवार यांच्या सीमेबद्दलही स्पष्ट मत

नोंदविलेले होते.

'केसरी'चे संपादक श्री. जयंतराव टिळक यांनी बेळगावला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि ११ फेब्रुवारीला मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची भेट घेऊन बेळगाव भागातल्या भीषण अत्याचारांचे इतिवृत्त कथन केले. श्रीयुत टिळक यांच्या इतिवृत्तावरून मुख्यमंत्री यांनी पंडित नेहरूकडे स्वतंत्र निवेदन सादर केले. समितीच्या नेत्यांनीही पं. नेहरूंची राजधानीत जाऊन भेट घेतली आणि त्यांच्याशी याबाबत वाटाघाटी केल्या. 'बेळगाव येल्लूरच्या अत्याचाराबाबत इशारा' या १२ फेब्रुवारी १९६० च्या अग्रलेखात 'केसरी'ने असे लिहिले, ''केंद्रीय गृहमंत्री पं. पंत आपली अभिवचने पाळण्याऐवजी डोळ्यांवर कातडे ओढून घेऊन बसलेले दिसतात. त्यांची ही झोप उडविण्याकरिता किती अत्याचार होण्याची जरुरी आहे, असे वैतागाने एखादा बेळगावकर म्हणाला तर त्यास उत्तर काय?''[११६] असा ठाम प्रश्न बेळगावप्रश्नावर 'केसरी'कारांनी विचारतात. 'म्हैसूरच्या सत्ताधाऱ्यांचा दुर्योधनी हट्ट' या दि. ६ मार्च १९६० रोजी लिहिलेल्या अग्रलेखांत 'केसरी'ने असे लिहिले आहे की, ''महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमावादासंबंधी म्हैसूरच्या विधिमंडळात जी चर्चा झाली ती अनेक दृष्टीने उद्‌बोधक आहे. या चर्चेत 'म्हैसूर राज्याचा एक इंच प्रदेशही आम्ही सोडणार नाहीत', असे श्रीमती. लक्ष्मी अम्मा या कॉँग्रेसपक्षीय सभासद म्हणाल्या. दिल्लीतील सत्ताधाऱ्यांनी या गंभीर परिस्थितीची काळजीपूर्वक दखल घ्यावी व तुटेपर्यंत न ताणता हा प्रश्न आता त्वरित निकाली काढावा हेच श्रेयस्कर होय.''[११७] यावरून केसरी महाराष्ट्राबरोबरच सीमाप्रश्नाबद्दलही किती जागरूक होता हेच दिसून येते. केसरी पत्राची ही ठाम भूमिका सुसंगत व तेवढीच स्पष्ट होती.

'केसरी'ने यानंतरच्या अग्रलेखातही द्वैभाषिकांच्या विभाजनाचे दोष उघड करून सांगितले. १४ मार्च १९६० रोजी राज्याच्या विधानसभेत द्वैभाषिक विभाजनाचे विधेयक सादर झाले. 'आजचा प्रसंग ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. या वेळी माझ्या मनात आनंदाच्या व दुःखाच्या संमिश्र भावना उठत आहेत. जनतेच्या फार दिवसांच्या आशा–आकांक्षा सुफलित होत आहेत. याबद्दल मला आनंद वाटतो. पण फार दिवस एकत्र नांदलेले दोन भाऊ अलग होत आहेत, याचे दुःख होते' अशा शब्दांत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आमच्या भावना विधानसभेत व्यक्त केल्या. 'या विधेयकात सीमांच्या बाबतीत मात्र सर्व तत्त्वशून्य व्यवहार झाला आहे', अशी टीका समितीचे नेते, श्री.व्ही.डी. देशपांडे यांनी केली होती. नव्या राज्याचे नाव 'महाराष्ट्र राज्य' असे असावे, असा एकमुखी निर्णय काँग्रेसच्या आमदारांनी केला. हिंदू महासभेने हे नाव यापूर्वीच सुचविले होते. गुजरात राज्याच्या पदरात मालमत्तेच्या विभागणीत झुकते माप टाकण्यात आले होते. महाराष्ट्र व गुजरात अशी दोन भाषिक राज्ये निर्माण झाली आणि मुंबई महाराष्ट्राला मिळाली हा संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा नैतिक विजय होता. या विजया मुळेच १ मे १९६० रोजी स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य' स्थापन झाले. 'केसरी' वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्र चळवळीस घेतलेली कणखर भूमिका जनमत तयार करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली.

### ३.५.१६ सोनियाचा दिवस

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या दिवशीच 'केसरी'ने महाराष्ट्र राज्यनिर्मितीचा 'सोनियाच्या दिवस' हा विशेष अग्रलेख लिहिला आणि त्या अग्रलेखात लोकमान्य टिळकांचे पुढील उद्‌गार शिरोभागी घातले, ''महाराष्ट्र भाषा बोलणाऱ्यांचा एक भाग मुंबई

इलाख्यात, दुसरा भाग मध्य प्रांतात, तिसरा वऱ्हाडात आणि चौथा गायकवाडीत अगर होळकरशाहीत अशी सद्यःस्थिती आहे. हिंदुस्थानचे हल्ली जे राजकीय विभाग आहेत, ते काही ऐतिहासिक कारणांवरून व कित्येक स्थळी काकतालीय न्यायाने झाले आहेत.''[११८] लोकमान्य टिळकांचे मत उद्युक्त करून 'केसरी'ने लोकमान्य टिळकांच्या मताचा आधार घेतला आणि संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन केले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस 'केसरी'ने पाठिंबा दिला होता, सीमालढ्यांतही एकजूट टिकावा असा धोशा 'केसरी'ने सतत चालविला होता, त्याचबरोबर टिळकांच्या सर्वांगीण विकास धोरणानुसार नव्या राज्य सरकारच्या औद्योगिक धोरणाकडे 'केसरी'ने आवर्जून लक्ष पुरविले होते, याबाबतीत नवराज्य निर्मितीच्या प्रसंगी काढलेल्या खास अंकात 'केसरी'ने लिहिले होते की, 'महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विकास सरकारी धोरणावर अवलंबून आहे. केंद्रीय सरकारचे धोरण अनेक दृष्टीने आक्षेपार्ह आहे. 'राज्य सरकारचे धोरण भावी काळात काय राहणार आहे, असा सवालही 'केसरी'कारांनी विचारला होता. नव्या महाराष्ट्राचे स्वरूप व कार्य कसे असावे याची काही चित्रेही 'केसरी'ने रेखाटली होती. यावरून केसरी पत्राची दूरदृष्टी स्पष्ट होते.

त्याच वर्षातील मराठी साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष प्रा. रा. श्री. जोग यांच्या भाषणात स्वाभाविकच संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न प्रतिबिंबित झाला. संयुक्त महाराष्ट्र झाला असला तरीही अखिल महाराष्ट्र झाला नाही. याबद्दल संमेलनाध्यक्षांनी आपल्या भाषणात जी बोच व्यक्त केली, तिचा परामर्श 'केसरी'ने ८ मे १९६० रोजी लिहिलेल्या 'साहित्य संमेलनाध्यक्ष प्रा. जोग यांचे मार्गदर्शन' या अग्रलेखातून आवर्जून घेतला होता. त्या अग्रलेखात म्हटले होते, ''भाषानिवृद्धीच्या दृष्टीने, संयुक्त महाराष्ट्र

निर्मितीचा मराठीच्या अभ्यासक्रमास जो आनंद व्हायचा तो शुद्ध व संपूर्ण असू शकणार नाही. प्रा. जोग यांनी अध्यक्षीय भाषणाच्या प्रारंभीच यासंबंधी समर्पकपणे व्यक्त केलेल्या भावनेशी मराठीचा अभिमान असणारी प्रत्येक व्यक्ती, सहमत होईल.''[११९] प्रा.जोग यांचे मत उचलून धरून 'केसरी'ने मराठीच्या उत्कर्ष भविष्यावर प्रकाश टाकलेला होता.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बुरुजाला हळूहळू खिंडार पडत चालले होते. समितीचे सरचिटणीस एस. एम. जोशी यांचे म्हणणे होते की, संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य यापुढे फक्त सीमा–प्रश्न सोडविण्यापुरतेच मर्यादित ठेवावे. असा ठराव १४ मे १९६० रोजी मुंबई येथे झालेल्या समितीच्या सर्वसाधारण सभेत त्यांनी मांडला, पण तो ठराव फेटाळला गेला. त्यामुळे एस. एम. जोशींनी समितीचे सरचिटणीसपद सोडले. समितीचा कायम पक्ष बनविण्यासही प्रजासमाजवादी पक्षाचे सहकार्यवाह ना. ग. गोरे यांनी विरोध केला होता. दिनांक ४ जून १९६० रोजी पुण्यात फर्ग्युसन कॉलेजच्या पटांगणात काँग्रेस महासमितीचे अधिवेशन भरले. त्या वेळी महाराष्ट्र एकीकरण समिती आणि संयुक्त महाराष्ट्र समिती यांच्याद्वारा सीमा–प्रश्नावर प्रचंड मोर्चा काढण्यात आला होता. याच दिवशी मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांनी 'केसरी' कार्यालयात येऊन समितीच्या नेत्यांबरोबर चर्चा केली होती. 'आजचा मोर्चा म्हणजे भावी चळवळीचा मुहूर्त आहे', असे त्याच दिवशी शनिवारवाड्यासमोर भरलेल्या प्रचंड जाहीर सभेत समिती नेत्यांनी गर्जून सांगितले. सीमा–प्रश्नावर वादंग चालू असतानाच संयुक्त महाराष्ट्र समितीतून बाहेर पडण्याच्या निर्णयावर प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीने ६ जून १९६० रोजी शिक्कामोर्तब केले. त्याच दिवशी सीमा–प्रश्नाबाबत फेरविचार करण्यासाठी

चार सदस्यांची समिती नेमली गेली. केंद्रीय गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनीही त्या प्रश्नांबद्दल झालेल्या चर्चेत भाग घेतला. आदल्या दिवशी पं. पंतांची 'केसरी' कार्यालयात विविध संस्थांतर्फे सत्कार करण्यात आला होता. अशा प्रकारचे वेगवेगळे तपशील केसरीच्या अंकात आलेले होते आणि ते निश्चितच संयुक्त महाराष्ट्राला पोषक ठरले. संयुक्त महाराष्ट्रास अनुरूप व अचूक वातावरण तयार करण्यावर केसरीचा भर होता.

अशा प्रकारे इंग्रजाविरुद्ध लेखणीने लढणाऱ्या आणि स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या लोकमान्यांच्या 'केसरी'ने संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोठी ऐतिहासिक भूमिका पार पाडली. त्यांच्या लढाऊ व अभ्यासू बाण्यामुळे 'केसरी'ची सुयक्त महाराष्ट्र प्रश्नावरील भूमिका सुसंगत आणि तेवढीच यथायोग्य अशीच राहिलेली होती. काळाची पावले ओळखून 'केसरी'या वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उचलून धरली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला लोकाभिमुख करण्यात आणि महाराष्ट्रातील जनतेच्या मनात ही चळवळ खऱ्या अर्थाने रुजविण्यात 'केसरी' या पत्राने महत्त्वाची भूमिका पार पाडली आणि पुन्हा एकदा लोकमान्यांचा लढाऊ बाणा 'केसरी'ने दाखवून दिला. या काळात जनतेची नाडी ओळखून 'केसरी' पत्र वागले. त्यामुळे दैनिक केसरी जयंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात गावोगावी पोहोचला आणि या पत्राने 'मराठा' प्रमाणेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या यशात सिंहाचा वाटा उचलला, हे सत्य आपणास कधीही विसरताच येणार नाही.

### ३.५.१७ समालोचन

संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अग्रभागी असलेल्या महाराष्ट्रातील वृत्तपत्रांमध्ये 'केसरी' हे वृत्तपत्र प्रमुख वृत्तपत्र होते. या पत्राचे संपादक जयवंतराव टिळक हे लोकमान्य टिळकांचे नातू होते. त्यांनी 'केसरी' वृत्तपत्राच्या व टिळकांच्या भूमिकेशी सुसंगत अशी भूमिका घेतली आणि उचलून धरली चळवळीच्या यशामधून भारत आणि हैदराबाद राज्यात विखुरलेले मराठी भाषक समुदाय महाराष्ट्र राज्यात एकत्र यावे अशीच 'केसरी' वृत्तपत्राची तळमळ होती. समान भाषा समान सहमती आणि समसमान समस्या पाहता त्या सोडविण्यासाठी सर्व मराठीभाषकांनी एकत्र यायला हवे ही 'केसरी' वृत्तपत्राची भूमिका नेहमीच राहिलेली होती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत पोषक अशी भूमिका घेऊन ही चळवळ जोरदारपणे मांडण्याचे श्रेय 'केसरी' वृत्तपत्राकडे जाते. या पत्रातील वेगवेगळ्या विषयाखालील अग्रलेखांनी त्या काळात संयुक्त महाराष्ट्राची भूमिका प्रभावीपणे मांडली होती. त्यामुळेच 'केसरी' वृत्तपत्रातील अग्रलेखांना विलक्षण तेज चढल्याचे दिसून येते. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यामुळे महाराष्ट्राचे राजकीय सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक ऐक्य स्थापन होईल ही भूमिका घेऊन 'केसरी' वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे समर्थन केले होते. या पत्राचा संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी सिंहाचा वाटा होता.

प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुद्ध लढा देण्याचे आणि अन्यायाला वाचा फोडण्याचे लोकमान्य टिळकांचे जे धोरण होते तेच 'केसरी' वृत्तपत्राने पुढे जोमाने चालविले. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही बरीचशी संघटित व एकसंध महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी पोषक ठरेल यात शंकाच नाही. केसरीच्या सकाळ

योगदानातून नवा इतिहास घडू शकेल, असा विश्वास 'केसरी'चे संपादक जयवंतराव टिळक यांना वाटत होता. त्यांच्या अग्रलेखातील सर्व सुसंगत मुद्दे विचार हे या भूमिकेशी पूरक पोषक आणि एकरूप असेच ठरले. 'केसरी' पत्राने संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये बजावलेल्या विलक्षण तेजोमयी कार्याचा प्रभाव हा तत्कालीन राष्ट्रीय राजकारणावर पडलेला होता. त्यामुळे 'केसरी' पत्र जी भूमिका घेत होते त्याचा प्रभाव हा केंद्रातील सरकारवही पडणार ही भूमिका रास्त होती. 'केसरी' कर्ते सामान्य माणसाच्या भूमिका लक्षात घेऊन त्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्र चळवळ गतीने पुढे घेऊन जात होते. त्यामुळेच ही चळवळ ग्रामीण भागात सुद्धा झपाट्याने पोहोचली होती. 'केसरी' पत्रातील ही सर्व लेखन संपदा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यासली असता, आपणास असे दिसून येते की, केसरीतील सूत्ररूप विवेचन हे ठाम आणि निश्चयी भूमिकेवर आधारलेले होते. 'केसरी' वृत्तपत्राच्या या निर्धाराचे प्रत्यंतर त्यातील चर्चा अग्रलेख लेखकांच्या अभ्यासावरून दिसून येते. केसरी वृत्तपत्रातील प्रत्येक आणि वेगवेगळ्या प्रकाशित झालेली सामग्री ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे दृष्टीने समर्थन करणारी आणि बहुमोल योगदान देणारीच ठरलेली होती. या निवडक सामग्रीचे संकलित टिपन केसरी पत्राने छोट्या पत्रिकेच्या स्वरूपात प्रकाशीत करावी.

### ३.५.१८ वृत्तपत्रांच्या कामगिरीचे समालोचन

अशा प्रकारे या प्रकरणात महाराष्ट्रातील 'अग्रगण्य', 'पुढारी', 'प्रभात', 'मराठा', 'सकाळ' व 'केसरी' या पाच वृत्तपत्रांच्या कामगिरीचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला. ज्या योगे सदर वृत्तपत्रांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये प्रतिबिंब कसे उमटविले यावर भाष्य करण्यात आले. प्रथमतः त्या त्या संबंधित वृत्तपत्राच्या

संपादकांची कामगिरी स्पष्ट करून त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उगम, विकास आणि फलश्रुती या दृष्टीने या चळवळीतील निगडीत असलेल्या योग्य त्या भूमिकांवर भाष्य करण्यात आले. द्विभाषिक मुंबई राज्यातील महाराष्ट्राची फरफट कशी होत होती, विविध प्रांतामध्ये मराठी भाषक समूह कसे विखुरले गेले होते, त्यांना नागपूर कराराने कसे एकत्रित जोडण्यात आले या सर्व घटनावर प्रकाश टाकलेला व विशेषतः मोरारजी सरकारने शांतपणे चळवळ करणाऱ्या मराठीभाषकांवर गोळीबार का? व कशासाठी केला, त्याचा मोठा उद्रेक का झाला यावर सुद्धा वस्तुस्थिती दर्शक प्रकाश टाकण्यात आला.

वर नमूद केलेल्या वेगवेगळ्या अग्रगण्य मराठी वृत्तपत्रातील बातम्या मथळे, स्फुटलेखन आणि संपादकीय अग्रलेखांचे तौलनिक मूल्य मापन केले असता आपणास असा निष्कर्ष काढता येईल की, अभ्यासलेल्या पाच दैनिक वृत्तपत्रांपैकी दैनिक ‘सकाळ’ चा अपवाद अथवा प्रतिगामी धोरण वगळता, इतर चार वृत्तपत्रांनी महाराष्ट्राचे मराठी भाषिक ऐक्य मोठ्या धैर्याने उचलून धरले. जनमानसामध्ये मराठी भाषिक प्रति प्रीतीची भावना रुजवली. तळागाळातील बहुतांश वर्गाना एकत्र आणून त्यांचे परिवर्तन जनचळवळीमध्ये केले. प्रचंड मोठी जनचळवळ उभी केली. त्यामुळेच १ मे १९६० हा सोनियाचा दिवस उगवला आणि मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे स्वप्न साकार झाले. जयवंतराव टिळक यांचे अष्टपैलू नेतृत्व केसरी पत्राने घेतलेली झेप यामुळे महाराष्ट्राचा मंगल कलश एका दशकात दिल्लीहून मुंबईला पोहोचला होता. हे या अभ्यासाचे सार होते.

## तळटीपा

५) कुंभार भैरव : पद्मश्री डॉ. ग.गो.जाधव प्रथम स्मृतिदिन विशेष पुरवणी दै. पुढारी २० मे १९८८ पृष्ठ क्र.९

६) भोसले ए. एस. : पुढारीकार ग. गो. जाधव गौरव ग्रंथ अमृतमहोत्सवी प्रकाशन १९८२ पृष्ठ क्र. २७

७) लेले रा. के. : मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, द्वितीयावृत्ती २००४ पृ. क्र. ८१७

८) कणबरकर रा. कृ वः भाई माधवराव बागल संक्षिप्त चरित्र, पृ. क्र. ६५.६६ कॉ. रमेश जाधव

९) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक १२ मार्च १९४९ पृष्ठ क्र.१

१०) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक ८ मार्च १९४९ पृष्ठ क्र.३

११) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक ११ जानेवारी १९५१ पृष्ठ क्र.२

१२) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक १८ एप्रिल १९४९ पृष्ठ क्र.१

१३) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक ५ फेब्रुवारी १९५३ पृष्ठ क्र.२

१४) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक १६ जुलै १९५३ पृष्ठ क्र.२

१५) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक ४ नोव्हेंबर १९५३ पृष्ठ क्र.२

१६) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक १५ नोव्हेंबर १९५३ पृष्ठ क्र.२

१७) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक २ ऑक्टोबर १९५५ पृष्ठ क्र.२

१८) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक २४ डिसेंबर १९५५ पृष्ठ क्र.२

१९) दै.'पुढारी'कोल्हापूर : दिनांक २९ जानेवारी१९५६ पृष्ठ क्र.२

२०) दै.‘पुढारी’कोल्हापूर : दिनांक ३ फेब्रुवारी १९५६ पृष्ठ क्र.२

२१) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक ६ एप्रिल १९५६ पृष्ठ क्र.२

२२) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक ६ एप्रिल १९५६ पृष्ठ क्र.२

२३) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक ८ डिसेंबर १९५७ पृष्ठ क्र.२

२४) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक १७ फेब्रुवारी१९४८ पृष्ठ क्र.२

२५) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक १८ ऑक्टोबर पृष्ठ क्र.२

२६) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक २४ नोव्हेंबर १९५९ पृष्ठ क्र.२

२७) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक १७ मार्च १९६० पृष्ठ क्र.२

२८) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक २ एप्रिल १९६० पृष्ठ क्र.२

२९) दै.‘पुढारी’ कोल्हापूर : दिनांक १ मे १९६० पृष्ठ क्र.२

३०) शहा, वष्ट, राशिनकर : १९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्य :
(संपादक) वा.रा.कोठारी जन्मशताब्दी समिती पुणे,पृष्ठ क्र.३५

३१) कित्ता : १९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्य :
वा.रा.कोठारी जन्मशताब्दी समिती पुणे,पृष्ठ क्र.१६६

३२) कित्ता : १९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्य :
वा.रा.कोठारी जन्मशताब्दी समिती पुणे,पृष्ठ क्र.३५

३३) कोठारी वा. रा. १९७३ : जुन्या आठवणी संकल्प प्रकाशन,पुणे,पृष्ठ क्र.९०

३४) शहा, वष्ट, राशिनकर : १९९३ प्रभातकार वा. रा. कोठारी विचार व कार्य
:(संपादक) वा. रा. कोठारी जन्मशताब्दी समिती पुणे, पृष्ठ क्र. ४१

३५) कित्ता : १९९३ प्रभातकार वा. रा. कोठारी विचार व कार्य :

वा.रा.कोठारी जन्मशताब्दी समिती पुणे,पृष्ठ क्र.१५०

३६) दैनिक 'प्रभात' : दिनांक १४.०२.१९५८ पृष्ठ क्र.२

३७) दैनिक 'प्रभात' : दिनांक ११.१२.१९५८ पृष्ठ क्र.२

३८) माळी मा. गो. व इतर : भाई माधवराव बागल (निवडकलेखसंग्रह) महाराष्ट्र राज्य (संपादक)साहित्य आणि संस्कृती मंडळ : पुणे

३९) खंडकर माधव : १९९३ कुशल व्यवस्थापक आणि व्यवहारी मालक (लेख) पृष्ठ क्र.६६

४०) फडके य.दि. : २० व्या शतकातील महाराष्ट्र खंड ८ (२००७) श्री.विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र.५८

४१) शिंदे अनिल : संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन १९९३ पृष्ठ क्र.२४५

४२) फडके य. दि. : २०व्या शतकातील महाराष्ट्र खंड ८ (२००७) श्री.विद्या प्रकाशन, पुणे,पृष्ठ क्र.६०

४३) दैनिक 'प्रभात' : दिनांक ०७.०६.१९५६ पृष्ठ क्र.२

४४) दैनिक 'प्रभात' : दिनांक ०६.१०.१९५५ पृष्ठ क्र.२

४५) दैनिक 'प्रभात' : दिनांक २७.०१.१९५५ पृष्ठ क्र.२

४६) दैनिक 'प्रभात' : दिनांक २९.०७.१९५८ पृष्ठ क्र.२

४७) दैनिक 'प्रभात' : दिनांक ०४.०३.१९५८ पृष्ठ क्र.२

४८) शहा, वष्ट, राशिनकर :१९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्यः वा. रा. (संपादक) कोठारी जन्मशताब्दी समिती, पुणे, पृष्ठ क्र. २५६

४९) शिंदे अनिल : संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन,१९९३ पृष्ठ क्र.२५० आणि २५१

५०) शहा, वष्ट, राशिनकर : १९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्यः वा. रा. (संपादक) कोठारी जन्मशताब्दी समिती, पुणे, पृष्ठ क्र. २५३

५१) दैनिक 'प्रभात' : दिनांक २४.०६.१९५७ पृष्ठ क्र.२

५२) अत्रे प्र. के. : मी कसा झालो? परचुरे प्रकाशन मंदिर मुंबईः११वी आवृत्ती पृष्ठ क्र.४

५३) अत्रे प्र. के. : कऱ्हेचे पाणी : खंड १ ला परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई : पृष्ठ क्र.६८

५४) काळे वि.र. : आचार्य अत्रे महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व : वसंत बुक स्टॉल दादर मुंबई पृष्ठ क्र.१७

५५) अत्रे प्र. के. : कऱ्हेचे पाणी : खंड १ ला परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई : पृष्ठ क्र.२७६/७७

५६) अत्रे प्र. के. : झालाच पाहिजे : डिंपल पब्लिकेशन मुंबई पृष्ठ क्र.९७

५७) अत्रे प्र. के. : मी कसा झालो : परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ११ वी आवृत्ती पृष्ठ क्र.३४१

५८) कित्ता : मी कसा झालो : परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ११ वी आवृत्ती पृष्ठ क्र.३६३

५९) कित्ता : मी कसा झालो : परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ११ वी

आवृत्ती पृष्ठ क्र.३६९

६०) कित्ता : मी कसा झालो : परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ११ वी आवृत्ती पृष्ठ क्र.३७०

६१) कित्ता : मी कसा झालो : परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ११ वी आवृत्ती पृष्ठ क्र.३६७

६२) कित्ता : मी कसा झालो : परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ११ वी आवृत्ती पृष्ठ क्र. ३६८

६३) काळे प्र. के. : आचार्य अत्रे महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व ३ वसंत बुक स्टॉल, दादर, मुंबई पृष्ठ क्र.१८९

६४) कित्ता : आचार्य अत्रे महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व ३ वसंत बुक स्टॉल, दादर,मुंबई पृष्ठ क्र.१९१

६५) अत्रे प्र. के. : कऱ्हेचे पाणी : खंड ५ वा परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई : ७ वी आवृत्ती पृष्ठ क्र.३२२

६६) कित्ता : कऱ्हेचे पाणी : खंड ५ वा परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई : ७ वी आवृत्ती पृष्ठ क्र.३२२

६७) कित्ता : कऱ्हेचे पाणी : खंड ५ वा परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई : ७ वी आवृत्ती पृष्ठ क्र.६०१

६८) कित्ता : कऱ्हेचे पाणी : खंड ५ वा परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई : ७ वी आवृत्ती पृष्ठ क्र.६०४–६०५

६९) दैनिक 'मराठा' : दि.११/११/१९५९

७०) ठाकरे प्रबोधनकार : वास्तवतेच्या चष्म्यातून आचार्य अत्रे : अत्रे विविध दर्शन संपादक कृ.पा.कुलकर्णी व इतर मुंबई १९५८ पृ.क्र.२४–२५

७१) चव्हाण नित्यानंद : आचार्य अत्र्यांची शिवशक्ती : मुंबई सकाळ १२ नोव्हेंबर १९८३ पृष्ठ क्र.४

७२) डॉ. परुळेकर ना. भि. : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.५९

७३) कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.५९

७४) कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.५९

७५) कर्वे स्वाती : सकाळ वृत्तपत्र आणि वृत्तसमूह न्यू एज प्रिंटिंग, प्रेस मुंबई पृष्ठ क्र. १५

७६) डॉ. परुळेकर ना. भि. : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.१०३ आणि १०४

७७) कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.१९४ आणि ९५

७८) कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.७२

७९) कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ

क्र.१९७

८०) कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.२०६

८१) दै. 'सकाळ' :१ फेब्रुवारी १९५५ चा अग्रलेख (डाव्यांचा एक नवा पक्ष)

८२) दै. 'सकाळ' :१८मार्च १९५६ चा अग्रलेख (प्रजा समाजवाद्यांचा गोंधळ)

८३) दै. 'सकाळ' :६ एप्रिल १९५७ चा अग्रलेख (समितीला राजकीय दिशा)

८४) दै. 'सकाळ' :३ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (नेतेपणाची परवड)

८५) दै. 'सकाळ' :२४ सप्टेंबर १९५५ चा अग्रलेख (पुढारपण गमावेल भीती)

८६) दै. 'सकाळ' : २३ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (नेहरूंचा सल्ला)

८७) दै. 'सकाळ' : ५ ऑक्टोबर १९५६ चा अग्रलेख (पं.नेहरूच्या सभेत गोंधळ)

८८) दै. 'सकाळ' : ४ ऑक्टोबर १९५६ ची बातमी.

८९) दै. 'सकाळ' : निरोप घेता आत्मचरित्र सकाळ प्रकाशन पुणे : पृष्ठ क्र.१५४

९०) दै. 'सकाळ' : १४ एप्रिल १९५६ चा अग्रलेख (भाषिक वादातून गुंडगिरी)

९१) दै. 'सकाळ' : २४ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (भाषेची अडचण का)

९२) दै. 'सकाळ' : ११ डिसेंबर १९५६चा अग्रलेख (हा विजय कुणाचा)

९३) दै. 'सकाळ' : २ सप्टेंबर १९५७ अग्रलेख (राष्ट्रीयतेस लागलेली

कीड)

९४) दै .'सकाळ' : १७ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (विद्यार्थ्यांची ही वाट नव्हे)

९५) दै. 'सकाळ' : ४ सप्टेंबर १९५९ चा अग्रलेख (पराभव कोणाचा)

९६) दै. 'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.५०

९७) दै. 'केसरी' : २६ फेब्रुवारी १९५६ चा अग्रलेख (दिल्लीच्या बादशाही थाट व मुंबईतील कोतवाली)

९८) दै. 'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.५१

९९) दै. 'केसरी' : २७ मार्च१९५६ चा अग्रलेख (महाराष्ट्राचा घात करण्याचे ठरविले)

१००) दै.'केसरी' : १५ मार्च १९५७ चा अग्रलेख (मतदारांनो द्विभाषिक राज्य नको)

१०१) दै. 'केसरी' : १९ डिसेंबर १९५२ चा अग्रलेख (आंध्रासाठी बलिदान)

१०२) दै. 'केसरी' : २१ डिसेंबर १९५२ चा अग्रलेख (दुष्काळ निवारण्याबाबत सरकारची दिरंगाई)

१०३) दै. 'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३०३

१०४) दै. 'केसरी' : २ ऑक्टोबर १९५३ चा अग्रलेख (प्रगतीचे पुढचे पाऊल)

१०५) दै.'केसरी' : ११ ऑक्टोबर १९५५ चा अग्रलेख (भारतात महाराष्ट्र नाही)

१०६) दै .'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३०७

१०७) दै. 'केसरी' : २५ नोव्हेंबर १९५५ चा अग्रलेख (मुंबईतील रावण राज्य)

१०८) दै. 'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां. सी. कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३९९

१०९) दै. 'केसरी' : २५ नोव्हेंबर १९५५ चा अग्रलेख (मुंबईतील रावण राज्य)

११०) दै. 'केसरी' : १७ नोव्हेंबर १९५५ चा अग्रलेख (महाराष्ट्रा काँग्रेसची शोकांतीका)

१११) दै. 'केसरी' : २२ जानेवारी १९५६ चा अग्रलेख

(लोकशाहीची क्रूर विटंबना)

११२) दै.'केसरी' १८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३९५

११३) कित्ता : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३१४

११४) दै. 'केसरी' : २२ जून १९५६ चा अग्रलेख

(देवालाही नमविणारे खंदे विराग्रणी)

११५) दै. 'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३१८

११६) दै. 'केसरी' : ८ ऑक्टोबर १९५८ चा अग्रलेख

(संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रसंगोचित कार्य)

११७) दै.'केसरी' : २९ नोव्हेंबर१९५६ चा अग्रलेख

(पंडितजी दिशाभूल का करता)

११८) दै.'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३१९

११९) दै. 'केसरी' : १७ जुलै १९५९ चा अग्रलेख

(मुख्यमंत्र्यांनी दिल्लीचे दार ठोठावावेत)

१२०) दै. 'केसरी'१८८१–१९८१ : वैचारिक संदर्भ आणि वाटचाल प्रकाशन व मुद्रक पां.सी.कुलकर्णी केसरी मुद्रणालय नारायण पेठ, पुणे,पृष्ठ क्र.३२५

१२१) दै. 'केसरी' : १२ फेब्रुवारी १९६० चा अग्रलेख

(बेळगाव येलूरच्या अत्याचाराबाबत इशारा)

१२२) दै.'केसरी' : ६ मार्च १९६० चा अग्रलेख

(महाराष्ट्रावर लादलेली जबर खंडणी)

१२३) दै.'केसरी' : ८ मे १९६० चा अग्रलेख

(प्राध्यापक जोग यांचे मार्गदर्शन)

# प्रकरण चौथे

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांनी हाताळलेली विविध आंदोलने

४.१ प्रस्तावना :

४.२ संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि सोशॅलिस्ट पार्टी :

४.३ १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुका

४.४ १९५७ चे प्रतापगडचे आंदोलन

४.५ एस.एम.जोशी यांच्या आठवणीप्रमाणे

४.६ समालोचन

## प्रकरण चौथे

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांनी हाताळलेली विविध आंदोलने

**प्रस्तावना :**

वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा व चळवळीचा इतिहास असतो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा अभ्यास करताना या प्रकरणात वृत्तपत्रांनी हाताळलेल्या आंदोलनाचा आढावा द्यावाच लागतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात लोकशाही रुजावी, भारत सामर्थ्यवान व्हावा यासाठी राज्याची पुनर्रचना करणे आवश्यक होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्यांच्या राज्यकारभारासाठी सोयीचे असे प्रांत निर्माण केले होते. देशाचा कारभार त्या वेळी इंग्रजीत चालू होता. मात्र, स्वातंत्र्यलढा चालू असताना जनतेचे प्रतिनिधित्व करणारा सर्वांत मोठा राजकीय पक्ष असलेल्या काँग्रेसने संघटनात्मक कार्यासाठी भाषावार विभाग केले होते. या भाषिक तत्त्वाच्या आधारेच स्वतंत्र भारतात राज्याची पुनर्रचना व्हावी असेच अनेकांना विशेषतः दक्षिणेकडील राज्यांना तीव्रतेने वाटत होते. भारतात सर्वांत अधिक लोक हिंदीभाषक आहेत. आणि ते मुख्यतः उत्तरेकडील भागामध्ये आहेत. भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीने हिंदी ही राष्ट्रभाषा व्हावी, असा एक प्रबल मतप्रवाह स्वातंत्र्याच्या काळात होता. मात्र तमिळ, मल्याळम, तेलुगू आणि कन्नड भाषक जनतेला आणि तेथील अनेक नेत्यांना भारतात हिंदी भोषेचे वर्चस्व वाढू नये, असे वाटत होते. म्हणून ते आकाशवाणीच्या केंद्रावर तेथील प्रादेशिक भाषांनाच मुख्य स्थान असावे, अशी मागणी ते १९४८ पासूनच करीत होते. देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू हे खऱ्या अर्थाने प्रगतिशील विचारांचे होते. परंतु त्यांना

दक्षिणेकडील जनतेच्या भाषिक आकांक्षांचे पुरेसे आकलन झालेले नव्हते. भारतात ज्याप्रमाणे विविध धर्माचे लोक एकत्र राहतात, त्याचप्रमाणे वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक एका राज्यात असले तर सांस्कृतिक दृष्ट्या ते स्वागतार्ह ठरेल, असे त्यांना वाटत होते. हैदराबाद राज्यामध्ये तेलुगू, कन्नड आणि मराठी मातृभाषा असलेले तसेच पूर्वीच्या निजामी राजवटीमुळे उर्दू भाषा बोलणारेही अनेक लोक होते. हे राज्य कायम राहावे असे पंडित नेहरूंना वाटत होते.  परंतु हैदराबाद राज्यातील भाषक नेत्यांना मात्र त्या राज्याचे विभाजन व्हावे असे वाटत होते.

हैदराबाद राज्यातील तेलुगू, कन्नडी, मराठी भाषक प्रभागांना आपापल्या राज्यात राहण्याची इच्छा होती. तेलुगू भाषेच्या अभिमानाने पोटी रामलू याने आंध्र प्रदेशासाठी स्वतःचे आत्मदहन करून घेतले. त्यानंतरच या प्रश्नाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. हैदराबाद राज्यातील मराठी भाषिक जनतेला महाराष्ट्रात सामील व्हावे, असे वाटत होते. गोदाकाठचा मराठवाडा हा भाग औरंगाबाद, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, बीड या पाच जिल्ह्याचा होता. हैदराबादहून १९३४ ते १९५६ या काळात प्रकाशित होणाऱ्या मराठवाडा या साप्ताहिकातील अनेक अंकामधून मराठी भाषा व संस्कृतीची संस्थानात कशी कोंडी होत होती ते स्पष्ट झालेले होते. मराठवाड्यातील जनतेवर निजामी राजवटीचे चौफेर सांस्कृतिक आक्रमण होत होते. त्यापासून मुक्त होऊन महाराष्ट्राच्या अन्य मराठी भाषिक जनतेबरोबरच आपणही नांदावे, अशी मराठवाड्यातील जनतेची सार्थ आणि माफक इच्छा होती. म्हणूनच मराठवाड्यातील जनतेने त्यासाठी स्वेच्छेने नागपूर करारावर सह्या करून महाराष्ट्रात बिनशर्त विलीन होण्याचे ठरविले. मराठवाडा प्रदेशाच्या वतीने नागपूर करारावर हैदराबाद राज्याचे पहिले शिक्षणमंत्री देवीसिंग चौहान

यांनी सह्या केल्या होत्या.

याच काळात या आंदोलनातील मुंबई प्रांतातील काही वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यात प्रामुख्याने आचार्य अत्रे यांचे साप्ताहिक नवयुग, नैनिक मराठा, भागवत बंधूचे मौज साप्ताहिक, आ. कृ. वाघमारे व अनंत भालेराव यांचा 'मराठवाडा', वा. रा. कोठारींचे दैनिक 'प्रभात', गजानन माडखोलकर संपादक असलेले नागपूरचे दैनिक 'तरुण भारत', अमरावतीचे उदय, महाराष्ट्र कम्युनिष्ट पक्षाचे मुखपत्र युगांतर अशा वृत्तपत्रांचा समावेश होता. ही सर्व वृत्तपत्रे महाराष्ट्र चळवळीच्या बाजूने अनुकूल होती. मात्र, डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या सकाळ वृत्तपत्रात प्रतीक चळवळीच्या प्रतिकूल मताचे होते. भाषावार प्रांतरचना करणे का आवश्यक आहे, त्यांची मागणी लक्षात आली नाही असे समितीच्या लोकांना वाटत होते. त्यांचे म्हणणे असे होते की, लोकशाही मध्ये प्रत्येकाला आपले आचार विचार स्वातंत्र्य आहे. भारताच्या संसदेत किंवा विधान सभेतील कारभार हा त्या त्या भाषेमध्ये चालला पाहिजे. कारण एखाद्या भागीतील व्यक्ती आमदार म्हणून निवडून आली तरी त्याला विधान सभेतील कारभाराबद्दलची माहिती झाली तरच तो आपले म्हणणे मांडेल अन्यथा त्याला काहीच नाही समजले तर तो आपले म्हणणे मांडू शकणार नाही. त्यामुळे भाषावार प्रांताची आवश्यकता आहे, असे संयुक्त महाराष्ट्र परिषद व समिती यांचे म्हणणे होते. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस व प्रजासमाजवादी पक्षाचे नेते एस.एम.जोशी यांनी मी संयुक्त महाराष्ट्राची मागणी का उचलून धरली याबाबत लिहिले आहे की, १९५२ मध्ये विधानसभेवर निवडून गेल्यानंतर तेथील परिस्थिती पाहिल्यानंतर मात्र आता मला असे वाटू लागले की, ''देशात लोकराज्य व्हावयाचे असेल तर शासनाचा

कारभार स्थानिक भाषेतून चालला पाहिजे.''[१] पण मुंबई प्रांताच्या विधानसभेत मात्र सर्व कारभार इंग्रजीतून चालेल एस.एम.जोशी यांनी केलेले हे निवेदन अर्थपूर्ण आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व भाषिक प्रदेश एकत्र आले असता त्यातून जनतेच्या आशा आकांक्षा सफल होण्यासाठी मदत होऊ शकेल. लोकप्रतिनिधींना आपले प्रश्न मनापासून पोटतिडकीने मांडता येतील आणि शेती, उद्योग, शिक्षण अशा विविध क्षेत्रात महाराष्ट्र एक नवी गरुडझेप घेऊ शकेल. विविध कारणांमुळे दीर्घकाळ दूरवर फेकलेले मराठी भाषिक समूह एकत्र येतील, आणि ते गुण्यागोविंदाने नांदू लागतील, असा त्यांचा विश्वास होता.

लोकशाहीमध्ये प्रत्येकाचे मत स्वातंत्र्य असले तरी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात या मताला फारसे कोणी महत्त्व दिले नाही. त्या वेळी महाराष्ट्राच्या विरोधात जो कोणी बोलेल त्याला राष्ट्रद्रोही, नमक हराम, भागूबाई अशा शब्दांनी विशेषण लावली जात होती. विरोधी बोलणाऱ्या लोकांना आपले मत कोणी व्यक्त करू देत नव्हते. अशीच समितीमधील लोकांची भूमिका ठरली होती. त्या वेळची परिस्थिती अशी होती. समितीच्या अजेंड्यामध्ये वैचारिक भूमिकेला काहीही महत्त्व नव्हते. १९५७ च्या सार्वजनिक निवडणुकीतील समितीच्या प्रचाराचा रोख पाहिला असता स्पष्टपणे असे लक्षात येईल. या आंदोलनात महाराष्ट्रावर अन्याय झाला आहे व महाराष्ट्राचा अपमान आहे. या दोन मुख्य भावना आढळून येतात. महाराष्ट्राला खच्ची करण्याचा कट आहे, असे नेहमी बोलले जात असे. महाराष्ट्राच्या इतिहासाला आवाहन करून महाराष्ट्र हा अन्याय व अपमान कधीही सहन करणार नाही, जिंजीच्या लढा महाराष्ट्र पुन्हा लढवेल, असा आवेश प्रकट होत होता. त्यांच्या या आव्हानाला कोणी

प्रतिसाद दिला नाही किंवा सांस्कृतिक राष्ट्रवादाशी सहमत होऊ शकत नव्हते ते केवळ विरोधक झाले नाहीत. त्यांना महाराष्ट्रद्रोही ठरविण्यात येत होते. मतभेद हा मानला जातच नव्हता. त्याला गुन्ह्याचे स्वरूप देण्यात येत होते. मतभेद व्यक्त करणाऱ्या लोकांवर अप्रामाणिकपणाचा आरोप करणे महाराष्ट्रद्रोही, सूर्याजी पिसाळ अशा शेलक्या शिव्या हासडत होते. या सर्व घटना घडण्यामागे केवळ समितीच नव्हे तर इतर सर्वच पक्ष जबाबदार आहेत. या संदर्भातील निरोप आपल्या आत्मचरित्रात लिहिताना डॉ. परुळेकर यांनी खाली नमूद केले आहे की, ''हा कदाचित गांधी युगातील नव्या नेत्यांचा प्रतिनिधित्वातील दोष असावा. त्याला विरोध नको, एकमेव आपली मत्ता, आपले राज्य असले पाहिजे, विरोध खणून काढून धुळीस मिळवला पाहिजे.''[२]

डॉ. परुळेकरांचा रोख संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांकडे आहे, ही बाब सूर्य प्रकाशा एवढीच स्वच्छ असल्याचे दिसते. त्या वेळचे नेते अहंगंडाने पछाडलेले होते आणि त्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या पलीकडे काहीही दिसत नव्हते, असे त्यांना म्हणावयाचे आहे. डॉ. परुळेकरांनी अमेरिकेत राहून लोकशाही समाज पाहिला होता. एकमेकांच्या मतांचा आदर तेथे केला जात असे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातसुद्धा परमताचा आदर केला पाहिजे आणि एकमेकांना समजावून घेऊन काम केले पाहिजे तरच लोकशाही समाज वाढू शकेल असाच डॉ. परुळेकरांचा आग्रह होता. भाषिक राज्ये निर्माण झाली म्हणजे सर्व प्रश्न जादूच्या कांडीसारखी सुटणार नाहीत याची त्यांना खात्री पटली होती. त्यामुळे विरोध पत्करूनही डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी आपली मते परखडपणे मांडली होती. डॉ.परुळेकरांचे हे विधान स्पष्ट आहे. त्यांनी सत्यकथनाबाबत ठोस मते मांडून टीकाही केली आहे. लोकशाहीत प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य आहे.

त्यामुळे एखाद्या घटनेबद्दल इतरांना काय वाटते हे समजणे महत्त्वाचे आहे.

भाषेच्या आधारावर प्रांतरचना होऊ नये, असे 'सकाळ' चे संपादक डॉ. परुळेकर यांना प्रामुख्याने वाटत होते. त्यामुळे ते मुंबई प्रांतातील मराठी व गुजराती समाजबांधव गुण्यागोविंदाने एकत्र राहत असताना त्यांच्याच भाषेबरोबर ते एकमेकांची भाषा शिकत आहेत. संस्कृती अंगीकारत आहेत. ते एकमेकांशी मनाने एकत्र येत असताना आपण त्यांचे भाषेच्या आधारावर तुकडे का करीत आहोत ''ते केवळ आपल्या पुढाऱ्यांच्या स्वार्थासाठी हे सर्व चालले आहे.''[३]

डॉ. परुळेकरांचा हा विचार उदार व सहिष्णू होता. त्यांची मते समजावून घ्यावीत व त्याचा आदर करावा, अशी मानसिकता त्या वेळच्या मराठी नेत्यांमध्ये नव्हती. सर्व पक्षांतील मराठी नेते भाषावार प्रांत रचनेच्या भावनेने एकवटलेले होते. त्यांना आता कोणताही उपदेशाचा सल्ला नको होता. आपले म्हणणे विवेकी आहे, विचारशील आहे, ते सत्यावर आधारलेले आहे, केंद्र सरकार मात्र मुद्दाम महाराष्ट्र विरोधी भूमिका घेत आहे. केंद्राच्या या भूमिकेचा एकजुटीने विरोध केला पाहिजे, तरच संयुक्त महाराष्ट्र साकार होऊ शकेल या आग्रहाने पेटलेले समितीचे नेते विचार व विवेकाच्या पलीकडे जाऊन समान भावनेने व हितसंबंधाने बांधले गेलेले आहेत.

मुंबई राज्य बहुभाषिक होतेच. त्या वेळी या संदर्भात अशा घटना घडतच होत्या. या संदर्भात ह. रा. महाजनी यांनी लिहिले आहे की, ''खरे म्हटले तर मुंबई राज्य पूर्वीदेखील बहुभाषिकच होते, पूर्वी ते त्रैभाषक होते आता ते द्विभाषिक झाले आहे. एवढाच काय तो फरक. परंतु मुंबई राज्य कधीच एकभाषिक नव्हते.''[४]

ह. रा. महाजनी यांचे भाष्य सत्य, वस्तुनिष्ठ आणि अचूकतेवर आधारलेले होते.

महाजनी यांचे मत परुळेकर यांच्यापेक्षा सत्याच्या अधिक जवळ असणारे आहे. त्यामुळे महाजनी यांनी त्या वेळच्या महाराष्ट्रात गुजराती, मराठी, कानडी असे तीन भाषा बोलणारे लोक होते. मुंबई राज्यातले हे तीन भाषा बोलणारे लोक पुढे केवळ मराठी व गुजराती उरले. अर्थातच मुंबई राज्यात गुण्यागोविंदाने राहणाऱ्या समाजात भांड्याला भांडे लागावे तशा अधूनमधून कुरबुरी झाल्या. परंतु त्याचा स्फोट कधीही झाला नाही. भाषिक समूह एकत्र आल्याने लोकांची मने सांधली जातील, समान सांस्कृतिक धागा मजबूत होईल आणि त्यांचे प्रश्नही सुटतील, अशी भावना संयुक्त महाराष्ट्र समिती रुजवत होती. या भावनेने यथार्थ वर्णन महाजनी यांनी करून त्या आधारे सभोवतीची सत्य परिस्थिती परखडपणे मांडली होती.

भाषावार प्रांतरचना या सोयीच्या आहेत. त्यातच महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या दोन प्रांतांना भाषावार प्रांतरचनेचा पाठिंबा मिळावा. कारण अशी तेथील बहुतांशी नागरिकांची मागणी होती. याचे कारण असे की, महाराष्ट्राच्या मागे महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे. तसेच, आंध्रामागे विजयनगरचा गौरवशाली इतिहास आहे. त्यातच तेथील बहुतेक नागरिकांचा दृष्टिकोन हा भाषावार प्रांत रचनेकडे सोय म्हणून पाहण्याचा होता. कारभाराची सोय, शासनाची सोय, या दृष्टीने भाषावार प्रांत रचना झाली तर बरे. पण शेवटी हा प्रश्न सोयीचा आहे. ''त्यामुळे दमादमाने व गरजेनुसार हा प्रश्न सोडविला तरी चालेल. हा प्रश्न सोडविल्यामुळे फार मोठा फायदा होईल किंवा न सोडविल्यामुळे खूप मोठे नुकसान होईल असे काही नाही. म्हणून या प्रश्नाची घाई करू नये, असे काँग्रेसच्या नेत्यांना वाटत होते.''[५] मात्र डॉ. परुळेकरांना असे वाटत होते की, भाषावार प्रांतरचना ही पूर्णपणे चुकीची निर्माण होईल. भारतीय नागरिकांना एका प्रांतातून

दुसऱ्या प्रांतात गेल्यास परदेशात गेल्यासारखे वाटेल. त्यामुळे सर्व प्रांतांना सामावून घेणारी पूर्ण देशासाठी एकच भाषा असावी, असे त्यांना तीव्रतेने वाटत होते.

एका भाषक राज्याबाबत आपले मत मांडताना नरहर कुरुंदकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'संयुक्त महाराष्ट्र काल आणि आजम या पुस्तकात लेख लिहिताना असे लिहिले आहे की, ''भाषावार प्रांत रचना या संदर्भात विचार करावयाचा असेल तर तो दोन पातळीवर करावा लागेल. पहिली पातळी म्हणजे या देशात १५० वर्षे इंग्रजाचे राज्य होते. जिल्हा, प्रांत, केंद्र सरकार यांचा कारभार इंग्रजीतून चालत होता. इंग्रजीचा एवढे जयघोष चालू असून सुद्धा १५० वर्षात २ टक्के लोकांना फक्त पुरेशा प्रमाणात इंग्रजी आत्मसात करता आली.''[६]

कुरुंदकर यांनी कठोर सत्य परखडपणे मांडले आहे. इंग्रजी राज्यात सुद्धा इंग्रजी भाषा रुजली नाही. लोकव्यवहार हा त्या त्या भागातील प्रादेशिक भाषेतच चालू होता. मग स्वातंत्र्यानंतर या भाषांना राजभाषेचे यावरून का देऊ नये, असा सुस्पष्ट सवाल त्यांनी मांडला होता.

पुणे पालिकेच्या सत्तेवर असणाऱ्या समितीच्या महापौर व उपमहापौर यांच्यावर 'मराठामचे संपादक व समितीचे आचार्य अत्रे यांनी आपल्या 'मराठा' या दैनिकातून टीका केली होती. त्यामुळे समितीच्या बैठकीत त्यांचा निषेध करण्यात आला. त्या वेळी अशा लिखाणाबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली होती. त्यामुळे 'सकाळकार डॉ. परुळेकर यांनी 'सोंगाड्याचा संकल्प' हा अग्रलेख लिहून अत्रे यांच्या लिखाणावर टीका केली होती. त्या अग्रलेखात 'सकाळ' ने असे नमूद केले आहे की, ''आचार्य अत्रे यांनी मराठी वृत्तपत्रात शिष्ट संमत मराठी भाषेची जडणघडण बदलून टाकण्याचा चंग बांधला

आणि मराठीत इरसाल गालीप्रदानाला अत्रे यांचा उल्लेख तमाशातील सोंगाड्या असा करून यापुढे त्यांना जरा जपूनच बोलावे असे ठरविले.''[७]

डॉ. परुळेकर व आचार्य अत्रे यांच्यातील हा वादविवाद सत्तेचा नव्हता तर तात्त्विक विचारांचा होता. मते व दृष्टिकोन भिन्न होते. पण त्यांचा निग्रह सत्याकडे जाण्याचा होता. डॉ. परुळेकरांच्या प्रगल्भ चिंतनातून प्रकट झालेल्या या काळातील अग्रलेखांना वेगळे महत्त्व होते. जरी ते संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधात असले तरी त्यांचे म्हणणे काय आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न अनेक सुशिक्षित मराठी तरुण करत होते.

अत्रे यांच्या लेखणीत नराधम या शब्दाला आक्षेप घेताना त्यांची तुलना नथुराम गोडसेंशी केली आहे. फासावर जाण्यापूर्वी आपल्या दैनिक अग्रणीतून पं. नेहरूंना नराधम म्हणणाऱ्या नथुराम गोडसेंचा वारसा ते हौसेने आपल्या दैनिक 'मराठा' तून चालवीत आहेत. हरामखोर, भक्षक इत्यादी शब्द त्यांचे नित्याचेच आहेत. या पत्राचा जन्मच मुळी अशा अर्वाच्य आणि बेछूट लिखाणासाठी झालेला आहे. त्यात या पुढे असले लिखाण करणार नाही. हा संकल्प प्रसिद्ध व्हावा हे एक विडंबनच आहे. तसेच दै. 'मराठाम वृत्तपत्राचे संपादक आचार्य प्र. के. अत्रे यांनी देखील संयुक्त महाराष्ट्राला ज्यांनी कोणी विरोध केला त्यांच्यावर आपल्या वृत्तपत्रातून सडकून टीका केली आहे. १ डिसेंबर १९५५ रोजी फलटण येथील मालोजी नाईक निंबाळकरांच्या मनमोहन राजवाड्यात उत्तर सातारा जिल्हा काँग्रेसची सभा भरली होती. त्या मेळाव्याला नामदार यशवंतराव चव्हाण यांनी मार्गदर्शन केले होते. त्यात संयुक्त महाराष्ट्र आणि नेहरू, असा त्यांनी जर प्रश्न निर्माण झाला तर मी डोळे झाकून नेहरू यांचेच नेतृत्व मान्य करीन. असे वक्तव्य केले. त्या दिवशी मराठी भाषक मंत्र्यांनी जी वक्तव्ये केली ती शंकरराव देव यांच्यावर

उघडउघड टीका करणारी होती. त्याचबरोबर देवांच्या मार्गदर्शनाने वागणाऱ्या भाऊसाहेब हिऱ्यांचे नेतृत्व या त्रयींनी झुगारून दिल्याची साक्ष देणारी होती. त्यांच्या या वक्तव्याने मात्र संयुक्त महाराष्ट्र परिषदेत अस्वस्थता पसरली. यशवंतराव चव्हाण यांचे हे वक्तव्य कोणालाही पसंत पडले नाही. त्यांना विरोधकांच्या मोठ्या टीकेला सामोरे जावे लागले. या विषयासंदर्भात माधवराव बागल यांनी 'केसरीमच्या अंकात लेख लिहून यशवंतराव यांच्या बेताल बोलण्यावर टीका केली आहे.''श्री. यशवंतराव चव्हाण फार हुशार आहेत. मुत्सद्दी आहेत. व्यवहारी आहेत. स्वतःच्या स्वार्थी उक्तीला व कृतीला नैतिक मुलामा चढविण्याचे अजब कौशल्य त्यांच्यात आहे. ''[८]

बागल यांच्या या लेखनातून यशवंतराव चव्हाण यांची लोकप्रियता त्या काळात कशी घसरली होती याची आपणास प्रचिती येते. बागल यांनी दोन भिन्न कालखंडातील यशवंतरावांच्या मतांची तुलना करून त्यांच्या उक्ती आणि कृतीवर सडकून टीका केली होती. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील चढ उतार पाहता या चळवळीचे यावरून कसे बदलत गेले हे या सर्व लेखावरून स्पष्ट होते. डॉ.परुळेकर, भाई माधवराव बागल, आचार्य प्र. के. अत्रे यांच्या लेखनातील मते व दृष्टिकोन पाहता महाराष्ट्रावरील प्रेम आणि नेहरूंना विरोध या दोन मुद्यांवर अनेक विचारवंत एकत्र आल्याचे दिसतात.

आचार्य अत्र्यांनी त्यांना सूर्याजी पिसाळ म्हणून महाराष्ट्रद्रोही ठरविले होते. १८ डिसेंबर १९५५ च्या नवयुग अंकात, फलटणचे तीन हरामखोर, या शीर्षकाच्या लेखात यशवंतराव चव्हाण, तपासे आणि नाईक निंबाळकर यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. ''किती गमजा मारशील रे यशवंता, झालाच मधला, मंत्री की सैतान, या शीर्षकाच्या लेखनातून अत्र्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्यावर करंटा, महाराष्ट्रद्रोही,

नमकहराम, भागूबाई, ढोंगी, सैतान अशा शिवराळ भाषेत श्री. यशवंतराव चव्हाण यांचा समाचार घेतला आहे.''[९] आचार्य अत्रे यांच्या या भूमिकेवर नानासाहेब परुळेकरांनी आचार्य अत्रे यांच्या शैलीवर व त्यांच्या आकांक्षांवर टीका केली असून त्यांनी समतोल दृष्टिकोन कांडला आहे.

वरील लेखाच्या संदर्भात आचार्य अत्रे जे काही बोलले होते ते १८ डिसेंबरच्या 'नवयुग' अंकात आचार्य अत्रे यांनी देवांच्या पाठीत खंजीर तीन राज्यांचा, यळकोट–हा लेख लिहून काँग्रेसवर टीका केली होती. ते लिहितात, की ''कसलेले परिवर्तन करायला श्री. देव भंगलेल्या हिऱ्यासह दिल्लीला निघून गेले. तिथे त्यांनी काय केले ते यथावकाश कळेलच. पण महाराष्ट्र मात्र फलटण मांडले. त्यांच्या नेतृत्वाने सपशेल परिवर्तन म्हणजे उलटे पालटे झाले.''[१०]

यशवंतराव चव्हाण यांचीही भूमिका नेहरू आणि काँग्रेस पक्ष यांना बलवान करणारी होती. पण संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांना मात्र ही भूमिका साफ चुकीची आहे, त्यामुळे महाराष्ट्राचे नुकसान झाले व होणार आहे याची खात्री पटली होती. यशवंतराव यांची भूमिका आचार्य अत्रे यांच्यासह संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सर्व नेत्यांना चुकीचे वाटत होते. यशवंतरावांचा मात्र आपले नेतृत्व आणि आपला पक्ष यांच्याबरोबर राहणेच योग्य वाटत होते. केंद्रीय नेतृत्वाच्या भावना दुखावल्या जातील. अशी कोणतीही कृती यशवंतरावांनी केली असती तर त्यांचे महाराष्ट्रातील स्थान डळमळीत झाले असते आणि त्यांना काँग्रेस पक्षातून अर्धचंद्र मिळाला असता. हे लक्षात घेऊनच यशवंतरावांनी निष्ठा, नेतृत्व आणि देशहित ही तीन तत्त्वे समोर ठेवून काँग्रेस पक्षाबरोबर एकनिष्ठ आणि एकजुटीने राहण्याचा निर्णय घेतला व तो योग्य होता, हेच पुढे इतिहासाने दाखवून दिले.

महाराष्ट्रातील राजकारणात आपले प्रतिस्पर्धी भाऊसाहेब हिरे आहेत हे त्यांनी ओळखले होते. मुंबई प्रांताच्या राजकारणात मोरारजी हे सर्वश्रेष्ठ होते. त्यांना ना.चव्हाण यांनी कधीच दुखवले नाही. तसेच नेहरू, पंत, आझाद, यांचेबाबतीतही त्यांनी आपले धोरण वेगळे ठरविले होते. त्यांच्याकडून काहीही आले तरी ते त्यांना शिरसावंद्य असे. १९५२ ला मिळालेले मंत्रिपद धोक्यात येईल असे वर्तन त्यांनी कधीच केले नाही.

यशवंतराव चव्हाण यांचे राजकारण हे स्वहित व पक्षहित जपणारे होते. त्यांनी पं.नेहरूंची मर्जी संपादन केली होती व नेहरूंना न दुखवता राजकीय वाटचाल करण्यावर त्यांचा भर होता. यशवंतराव चव्हाण हे धूर्त मुत्सद्दी राजकारणी होते. त्यांनी नेहरूंना दुखावले नाही. काँग्रेस पक्षाला सोडले नाही, मध्यवर्ती नेतृत्वाला वाईट वाटेल असे कोणतेही पाऊल टाकले नाही. त्यांना याची कल्पना होती, जोपर्यंत नेहरूंना पटणार नाही तोपर्यंत ते संयुक्त महाराष्ट्र घोषित करणार नाहीत. या संदर्भात यशवंतरावांची भूमिका थांबा आणि वाट पहा अशी होती. योग्य वेळ आल्यावर केंद्र महाराष्ट्राची मागणी मान्य करेल, तोपर्यंत शांत राहिले पाहिजे, असा त्यांचा सबुरीचा सल्ला आंदोलकांना होता. विरोधकांना त्यांची भूमिका वेळकाढूपणाची आहे असे वाटत होते. पण चव्हाण मात्र आपली भूमिका सोडायला तयार नव्हते.

संयुक्त महाराष्ट्र समिती हा पक्ष नव्हता ती एक आघाडी असून ती एक होती, युती होती. यातील प्रत्येक घटना पक्ष या लढ्याकडे कसा पाहत होता आणि त्यांचे नेते समितीच्या सुरात सूर मिसळताना कोणती भूमिका घेत होते याबाबत काळजीपूर्वक विवेचन करण्याची गरज निर्माण होते. त्यासाठी प्रत्येक पक्षाच्या भूमिका स्वतंत्रपणे पडताळून पाहिल्या पाहिजेत. या अनुषंगाने पुढील मते विचारात घेण्यासारखी आहेत.

त्यामुळे पक्षाचे ध्येयधोरण, कार्यक्रम, नेत्यांच्या भूमिका याबाबतीत सलग विचारविनिमय करणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्रातील विविध पक्ष व संघटनांबाबत वृत्तपत्रांनी खालीलप्रमाणे भूमिका घेतलेली होती.

**संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि सोशॅलिस्ट पार्टी :**

समाजवादी पक्ष हा एक अखिल भारतीय पक्ष होता. या पक्षातील नेते, विचारवंत आणि ध्येयवादी कार्यकर्त्यांनी युक्त होते. या पक्षाचे उत्तर प्रदेश, बिहार,महाराष्ट्र इत्यादी प्रांतात चांगले काम होते. या पक्षाचा वादविवाद, मतमतांतरे मांडण्यावर आग्रह होता. अनुयायी कमी व नेते जास्त असे या पक्षाचे यावरून अगदी आरंभापासून होते. विविध राजकीय व आर्थिक प्रश्नांवर पक्षाच्या अधिवेशनातही वादळी चर्चा होत असे. टीका आणि प्रतिटीका होऊन आपली मते आग्रहीपणे मांडली जात असत. त्यामुळे प्रश्न सुटण्यापेक्षा ते अधिक गुंतागुंतीचे होत.

एखाद्या प्रश्नावर या पक्षामध्ये एवढी वादळे होत तर काही वेळा मते न पटल्यामुळे पक्षातील प्रमुख नेते वेगळी चूल मांडत आणि आपला पक्षच खरा आहे हे आवर्जून असत. त्यामुळे या पक्षाला आरंभापासून आजपर्यंत दुहीचा फार मोठा शाप लागला आहे, हे दिसून येते. वैयक्तिक अहंकार, वैचारिक मतभेद आणि एकमेकांतील असहमती यामुळे हा पक्ष जर्जर होत गेला. परंतु प्रत्येक वेळी संकटातून बाहेर पडून या पक्षातील नेत्यांनी पक्ष संघटना जपण्याचा प्रयत्न केला. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर सुद्धा या पक्षातील नेत्यांमध्ये अनेक प्रकारचे मतभेद होते. त्यांच्या मतमतांतराचा

महाराष्ट्रातील राजकारणावर प्रभाव पडला आणि त्यातून समाजवादी पक्षातील मतभेद हे उघड झाले होते.

डिसेंबर १९५५ च्या शेवटच्या आठवड्यात प्रजासमाजवादी पक्षाचे अधिवेशन गया येथे भरले होते. डॉ. राममनोहर लोहिया यांच्या पाठीराख्याने वेगळी फूट पाडून त्यांनी त्याच कालावधीत आपले वेगळे अधिवेशन हैदराबाद येथे घेऊन त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेवर ठाम भूमिका बजावणारे प्रजासमाजवादी पक्षात फूट पडलेली समितीतील इतर सहकारी पक्षांनाही त्यांची चिंता वाटत होती. त्यामुळे १९ जानेवारीला महाराष्ट्र प्रांतिक सोशॅलिस्ट पार्टीच्या चिटणिसांनी काढलेल्या पत्रकात असे म्हटले होते की, ''आता मार्ग काय एकच, व्यक्तिगत उपवास करून, जनतेला स्वस्थ बसण्याचा आदेश देणे कुचकामी ठरेल, सामुदायिक प्रतिकार शक्य नसेल तेथे वैयक्तिक कायदेभंग आणि सत्याग्रह याचा अवलंब केला पाहिजे.''[११] अशा प्रकारे पक्षाने योग्य भूमिका घेऊन कार्यकर्त्यांना लढण्यासाठी सज्ज राहण्याचे शिक्षण दिले होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्रजा समाजवादी पक्षात काही नेत्यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे पक्षात पडलेल्या मु टीचा संदर्भ देऊन डॉ.परुळेकर यांनी ३० डिसेंबर १९५५ च्या 'सकाळ' च्या अंकात 'कुस्तीगीर पुढारी' मथळ्याखाली अग्रलेख लिहून आपले मत व्यक्त केले होते. त्यात त्यांनी असे नमूद केले होते की, ''समाजवादी पक्षात फूट पाडून त्यातील एका गटाने नेते डॉ. राममनोहर लोहिया यांनी जो नवा पक्ष काढला त्याची प्रख्यात परिषद दक्षिण हैदराबाद येथे भरली. तर प्रजा सोशॅलिस्ट पक्षाचे अधिवेशन गया येथे भरले. प्रजा समाजवादी पक्ष व कम्युनिष्ट

पक्ष यांच्यात तात्त्विक फरक राहिला नाही,''[१२] अशी टीकाही त्यांनी या अग्रलेखातून केली होती. डॉ. नानासाहेब परुळेकरांनी सकाळ'मधून दोन डाव्या पक्षातील धोरण व कार्यपद्धतीची तुलना करून त्यावर यथोचित भाष्य केले होते.

राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल १० ऑक्टोबर १९५५ला प्रसिद्ध होणार होता. परंतु त्या अगोदरच या आयोगाचा गोपनीय अहवाल काही साप्ताहिक, आणि वृत्तपत्राच्या बातम्यांच्या पृष्ठे प्रसिद्ध होऊ लागला होता. आयोगाचा अहवाल मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधात जाणार असे वाटू लागल्यानेच त्या अहवालाला विरोध करण्याचा आंदोलकांनी निश्चय केला होता. ९ ऑक्टोबर १९५५ च्या 'युगांतर' या अंकात प्रज्ञा समाजवादी पक्षाचे नेते एस. एम. जोशी यांनी २ ऑक्टोबरला जाहीर केलेली घोषणा प्रसिद्ध झाली आहे. ''अशी, संयुक्त महाराष्ट्रासाठी असहकार चळवळ पुकारण्याची आमच्या पक्षाची तयारी आहे.''[१३] संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस एस. एम. जोशी यांच्या भूमिकेमुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला मोठे बळ मिळाले आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिक संघटित झाली.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा, या एकाच गोष्टीने सर्व स्तरातील जनता आपले मतभेद विसरून एकत्र आली होती. त्यात विशेषतः कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात होता. शिवाय या लढ्याचा अनेकांनी ध्यास घेतला होता. कोणत्याही पक्षाचा अधिकृत झेंडा खांद्यावर न घेता, केवळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात यावा, असे अनेकांना वाटत होते. त्यात के. सी. ठाकरे, आचार्य अत्रे, पुण्यातील दैनिक 'प्रभात' चे वालचंद कोठारी व माधवराव बागल हे अपक्ष नेते आघाडीवर होते. राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशी प्रसिद्ध होऊ लागताच या नेत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्वस्थता पसरली

होती. त्यामुळे सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्षाबद्दल आपुलकी वाटणारे माधवराव बागल यांच्या दृष्टीने ही घटना संतापजनक होते. त्यामुळे 'युगांतर' साप्ताहिकाच्या २ ऑक्टोबरच्या अंकात त्यांनी लेख लिहून आपला संताप व्यक्त केला होता. त्यात त्यांनी असे नमूद केले होते की, ''बहुजन समाज पक्षाने काँग्रेसमध्ये जावे या मतावर मी आलो होतो. पण संयुक्त महाराष्ट्राविरुद्ध काँग्रेस गेल्यास तर मी काँग्रेसला सर्व शक्ती एकवटून विरोध केल्याशिवाय राहणार नाही.''[१४] माधवराव बागल यांच्या भूमिकेमुळेच बहुजन समाजातील अनेक लोक काँग्रेसविरोधी बनले आणि त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये स्वतःला झोकून दिले.

या सर्व घटनेबाबत काँग्रेस पक्षाने कोणतीही ठोस भूमिका न घेतल्यामुळे सर्व जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी प्रचंड संताप व्यक्त होत होता. या वाढत्या संतापाबाबत अपक्ष नेते शांतता राखण्यासाठी आवाहन लोकांना करीत होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी आयोगाने नाकारली तरी मनाचा तोल ढळू देऊ नका, डोकी शांत ठेवा, कोणत्याही चिथावणीला बळी पडू नका, वातावरण शांत राखा, अशा आशयाचे पत्रक मुंबई सरकारने प्रस्तुत केले होते. ''त्यामुळे घबराट निर्माण होणार नाही का, या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री मोरारजी देसाई म्हणाले जनतेमध्ये आधीच घबराट उत्पन्न झालेली आहे म्हणून तर सरकारला पत्रक काढावे लागले.''[१५] मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांची ही भूमिका संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पूर्ण विरोधात होती हेच स्पष्टपणे अधोरेखित होते. या काळात क्रिया आणि प्रतिक्रिया याद्वारे लोकांचा असंतोष प्रकट होऊ लागला आणि त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र चळवळ आकार घेत होती.

कोल्हापूर जिल्ह्यात संतापलेल्या जनतेला माधवराव बागल यांनी एक पत्रक काढून मार्गदर्शन केले होते. त्या पत्रात त्यांनी असे नमूद केले होते की,''निकाल विरुद्ध लागल्यास गांगरण्याचे कारण नाही. महाराष्ट्र परिषद योग्य वेळी मार्गदर्शन करीलच. सभा, मिरवणुका, हरताळ याबद्दलचा आदेश कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र एकीकरण परिषद घेईल. लोकांनी स्वतःच्या जबाबदारीवर कार्यक्रम अंगावर घेऊ नयेत. संयम म्हणजे भीरूपणा नव्हे. सभा तातडीने घेतली जाईलच. परंतु याच दरम्यान राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल १० ऑक्टोबर १९५५ रोजी प्रसिद्ध झाला. त्यामुळे मुंबई प्रांतातील मराठी भाषकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली. त्यामुळे संतप्त जनता निदर्शने, हरताळ करू लागली. या नागरिकांच्या वाढत्या संतापाला आवर घालण्यासाठी व त्यांनी काढलेल्या पत्रकांचा तसेच जनतेच्या प्रतिक्रियांचा समाचार घेताना डॉ.परुळेकर यांनी १२ ऑक्टोबर १९५५ च्या अंकात 'यात रुसण्यासारखे कायम हा अग्रलेख लिहून त्यांनी संतापलेल्या जनतेचा समाचार घेतला. त्यात असे नमूद केले होते की, ''अहवाल येणाऱ्या गोष्टीची कल्पना लोकांना बरेच दिवस अगोदर होती. काही प्रांताचे मुख्यमंत्री त्यावर जाहीर बोललेत. अहवालातील सूचना आणि सूर अगोदरच कळून चुकला असल्यामुळे प्रसिद्धीनंतरची प्रतिक्रिया एकाही स्वयंस्फूर्त नसून पूर्व विचाराने बनलेली होती.''[१६] अशा प्रकारे डॉ. परुळेकर आपल्या भूमिकेवर ठाम होते. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर व चळवळीच्या नेत्यांच्या पावित्र्यावर टीका करण्याची एकही संधी ते सोडत नव्हते हेच यातून स्पष्ट होते.

भाषावार प्रांतरचनेची कटुता आणि विखारीपणा देशात पसरविण्यात सगळ्यात मोठा वाटा काँग्रेस पक्षाचा होता. परंतु काँग्रेसने आता समजूतदारपणा दाखविण्याचे

ठरविले ही गोष्ट निश्चितच चांगली होती. परंतु यात भांडण्यासारखे काही नाही. महाराष्ट्रात विदर्भ नव्हता हैदराबादमधील पाच जिल्हे नवीन यामध्ये आहेत. पूर्वीप्रमाणेच प्रांतात मुंबई कायम राहणार आहे. आता फक्त त्याबरोबर येणारे गुजराथी नकोत एवढ्याच कारणाकरता कोणी भांडू म्हणेल तर त्याला लोकांचा पाठिंबा मिळणार नाही. तसा तर मुंबईचा वेगळा प्रांत करून संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करावयास हवी होती, असे एखाददुसरा पुढारी निराशेने उद्‌गार काढतो. परंतु मुंबई वेगळी करावयाची असती तर कोकणपट्टी, पुणे, सातारा, नाशिक येथपर्यंत भाग आम्हास मुंबई हवी असे म्हणाले असते आणि शिलकी संयुक्त महाराष्ट्र नकाशात खरोखरीच पुढे उरला असता का? याची कल्पना केली पाहिजे. हा अहवाल समितीच्या विरोधात गेल्यामुळे डॉ. परुळेकरांना विशेष आनंद झाला होता. त्यामुळे त्यांनी ११ ऑक्टोबर १९५५ रोजी ‘एक राष्ट्रीयत्वाचा विजय या शीर्षकाखाली सकाळमध्ये अग्रलेख लिहून त्यांनी या अहवालसंदर्भात समाधान व्यक्त करून त्यांनी त्यात असे नमूद केले होते, ‘‘प्रांतरचना समितीच्या अहवालाने देशाची एक मोठी कामगिरी केली असेल तर एक भाषा, एक प्रांत म्हणजे केवळ भाषेला धरून प्रांतरचना हे तत्त्व खोटे असल्याचा निकाल दिला.’’[१७] डॉ. परुळेकरांचा हा अग्रलेख मुंबई प्रांताच्या सरकारच्या भूमिकेचे समर्थन करणारा आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीचा समाजवादी पक्ष हा एक घटक पक्ष होता व या पक्षाचे महाराष्ट्रातील नेते एस.एम.जोशी आणि ना.ग.गोरे यांचे समितीमधील स्थान आदराचे होते. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी आणि निर्मितीनंतर या नेत्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली होती.

समितीमधील नेत्यांचे कार्य संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पोषक असे होते. हे सर्व

नेते विचारशील व ध्येयवादी होते. त्यातील प्रमुख नेते मराठीभाषक असल्यामुळे त्यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाबद्दल कमालीची आस्था होती. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात हे नेते काँग्रेस पक्षात होते. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक प्रश्नावरून काँग्रेस नेत्यांशी मतभेद झाल्यामुळे त्यांनी पक्षाला रामराम ठोकला आणि स्वतंत्र समाजवादी पक्ष स्थापन केला. समाजवादी पक्षाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीला नैतिक पाठिंबा देऊन विविध जनआंदोलनात सक्रियपण सहभाग घेऊन महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. समाजवादी पक्ष हा संयुक्त महाराष्ट्र समितीचा एक घटक पक्ष बनला आणि चळवळीतील यशापयशाचे खापर  इतर घटक पक्षांप्रमाणे या पक्षावर फोडण्यात आले होते.

## १९५७ मधील सार्वजनिक निवडणूक

मुंबई प्रांताच्या सार्वत्रिक निवडणूक मार्च १९५७ मध्ये झाल्या. त्यात पश्चिम महाराष्ट्रात समितीने घवघवीत यश मिळविले तर काँग्रेसचा मानहानिकारक पराभव झाला होता. त्यामुळे काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करण्याचे पंतप्रधान नेहरू यांनी जाहीर केले असले तरी म्हैसूर व महाराष्ट्र सीमावाद संपलेला नव्हता. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र समितीचे माजी सरचिटणीस एस.एम.जोशी यांनी पनवेल येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना म्हैसूर, महाराष्ट्र सीमावाद सोडविण्यासाठी महाराष्ट्राने एकतर्फी पुढाकार घ्यावा लागला तरी घ्यावा आणि सध्या महाराष्ट्र राज्यात समाविष्ट असलेला कन्नड भाषिक विभाग म्हैसूरला देऊन टाकावा, अशी सूचना केली. या सूचनेचे ‘सकाळ’ कार यांनी स्वागत केले असले तरी श्री. जोशी यांनी उशिरा घेतलेल्या या भूमिकेवर मात्र टीका केली. ही

सूचना महत्त्वाची आहे, समजूतदारपणाची आहे. इतर पक्षांनी मतभेद न आणता सहभागी व्हावयास हवे. ही सूचना मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांनी प्रथम मांडली असती तर एस. एम. जोशी यांच्यासह साऱ्यांनी लाचारी, शरणागती, असा गिल्ला केला असता, अशी आहे समितीची राजकारणाची परंपरा. एस. एम. जोशी सोय सत्य बोलले तरी त्यांचे स्वागत व्हावयास हवे. परंतु डॉ. परुळेकर यांनी सदर सकाळच्या लेखात असे लिहिले होते की, ''संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये कम्युनिष्टांच्या वर्चस्वाखाली काम करीत असताना श्री.जोशी हेही कम्युनिष्टांची अतिरेकी भाषा बोलत होते आणि अतिरेकी भाषेत कम्युनिष्ट आघाडीवर राहिलेले दिसले की, आपल्याला एवढा पल्ला झेपणार नाही असे वाटूनच की काय ते गप्प बसत. जोशी यांच्या मौनात आपल्याला विध्वंसक योजनेची १०० टक्के सहानुभूती आणि संमती आहे. असे कम्युनिष्ट परस्पर गृहीत धरीत, कम्युनिष्टांच्या आंतरराष्ट्रीय वर्चस्वाखाली समितीचेही धेरणही अराष्ट्रीय राहणार.''[१८] अशा प्रकारे डॉ.परुळेकरांना यांनी कम्युनिष्ट आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस एस.एम.जोशी या दोहोंवर टीका करून एक दगडात दोन पक्षी मारले होते.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रात नागपूर कराराचे सर्वत्र मोठ्या प्रमाणात स्वागत होत असले तरी डॉ. परुळेकरांनी त्या विषयावर ११ जानेवारी १९५६ च्या सकाळमधील अंकात 'संयुक्त आणि विभक्त' असा अग्रलेख लिहून त्यात असे नमूद केले होते की, ''संयुक्त महाराष्ट्राच्या नव्या जमान्यात नागपूर कराराने दुहीची बीजे आणली. त्याचे अनुकरण मराठवाड्याने केले मग फाटामु टीत आणखी भर पडेल, अशी भीती आम्ही प्रकट केली होती.''[१९] आज ही भीती खरी ठरली आहे. विदर्भ व मराठवाडा हे दोन्ही भाग पश्चिम महाराष्ट्राच्या विरोधात असंतुष्ट झाले आहेत. त्यामुळे डॉ. परुळेकरांचे सत्य

घटनेवरील आधारलेले मत हे समाजाला खरोखर डोळ्यांत अंजन घालणारे होते.

१६ जानेवारीला मुंबई केंद्रशासित करण्याची नेहरूंनी आकाशवाणीवरून घोषणा केली होती. त्यामुळे खवळलेल्या जनतेच्या संतापाला पारावार उरला नाही. त्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. केंद्र सरकार मुंबईचे स्वतंत्र राज्य करून भांडवलशाहीच्या ताब्यात देण्याचा काँग्रेस प्रयत्न करत आहे. या विचाराने संतापलेल्या जनतेच्या मनात या निर्णयाने आगीत तेल ओतल्यासारखे झाले. त्यातच मुंबई शहरासह, बेळगाव, पुणे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात निदर्शने, धरणे, आंदोलने, संप, हरताळ झाले. सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित करून काही प्रमुख नेत्यांची सकाळीच धरपकड केली होती. हे आंदोलन मोडून काढण्यासाठी मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी लाठीहल्ला, अश्रुधुराचा मारा करण्याचा जो डाव आखला होता त्यामुळे तर आपल्यावर अन्याय होत आहे, अशा भावनेने सर्वसामान्य मराठी माणसाच्या मनाने उचल खाल्ली. त्यामुळे जनता आणखीनच प्रक्षुब्ध झाली. प्रचंड प्रमाणात निदर्शने करू लागली. आंदोलन चिरडून काढण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. त्यानंतरच्या काळात मुंबई शहरात काही समाजकंठकांमार्फत मोठ्या प्रमाणावर लुटालुटीच्या घटना घडल्या. शाहीर अमर शेख यांनी आपल्या २० तारखेच्या रोजनिशीत त्यांचा उल्लेख केलेला आढळून येतो.‘‘आज लुटालुटीला सुमार नव्हता. माझ्या भागातही लूट व गोळीबार सुरू झाला. मी प्रथम टॅक्सी घेऊन शांतीचा प्रचार करीत बी.सी.वर व शिवाजी पार्क, लालबागकडे निघालो.’’[२०] यावरून तत्कालीन मुंबईमधील चळवळीचे चित्र स्पष्ट होते. तसेच, अमर शेख यांच्यासारखा ध्येयवादी कार्यकर्ता सभोवतालच्या परिस्थितीमुळे किती झाला होता याची प्रचिती येते. त्यामुळे या

काळात अमर शेख यांचे प्रांजळ सत्यकथन येथे महत्त्वाचे आहे.

सरला कारखानीस यांनी आपल्या पुस्तकात ६७ व्यक्तींनी प्राण गमावल्याचे नमूद केले आहे. ''१७ ते २० जानेवारीपर्यंत गोळीबारात प्राण गमावलेल्या माणसांत ६७ नावांचा उल्लेख केलेला आढळतो. त्यात प्रामुख्याने १७ जानेवारीस, २,१८ जानेवारीस २७, १९ जानेवारीस १६ तर २० जानेवारीस २२ अशा एकूण ६७ नावांचा समावेश आहे.''[२१] दैनिक 'सकाळ' च्या अंकात मात्र ता. १७ व १८ जानेवारीस मृत्यू पावलेल्या बातमीचा काहीही उल्लेख आढळत नाही. त्यांनी १९ जानेवारी १९५६ च्या अंकात एक बातमी प्रसिद्ध केली ती अशी,

''मुंबईत ११४ वेळा गोळीबार १० ठार २५० तर पुण्यात लुटालुटीच्या घटना घडत असताना प्रजासमाजवादी पक्षनेते एस. एम. जोशी यांनी बुधवार पेठेतील समाजकंटकापासून एक सिंध्याचे दुकान लुटत असताना ते लुटण्यापासून कसे वाचविले याची बातमी प्रसिद्ध झाली आहे.''[२२]

संयुक्त महाराष्ट्राला 'सकाळ' ने विरोध केला आहे, ही भावना मनात ठेवून त्या संध्याकाळी संतप्त जमाव 'सकाळ' कार्यालयावर चालून गेला. त्यांनी दगडफेक केली. या संदर्भातील त्यांनी बातमी प्रसिद्ध केली आहे. (सकाळच्या इमारतीवर दगडफेक) या सर्व आंदोलनाच्या काळात पोलिसांनी आंदोलकांवर पर्यायाने जनतेवर कशा पद्धतीने अन्याय केला होता याची माहिती वेगवेगळ्या पुस्तकांतून व अहवालातून मिळते. या काळात पोलिसांनी गोळीबार किती क्रूरपणे व चुकीच्या पद्धतीने केला होता याचीही माहिती 'संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत' या पुस्तकात नमूद केल्याचे दिसून येते. ''झालेल्या जखमा क्रूरपणाचा कळस करणाऱ्या होत्या. २४ लोकांच्या कवटीतून गोळ्या गेल्या

होत्या. १६ लोकांच्या छातीतून आरपार गेल्या होत्या. २ लोकांच्या बुबुळातून नेमबाजी झाली होती. १७ जणांच्या पोटातून आतडी लोळवण्यात आली होती. तर दोन माणसांच्या ढुंगणातून गोळ्या झाडण्याचे सैतानी कृत्य करण्यात आले होते.''[२३] यावरून मुंबईमध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात झालेला गोळीबार किती क्रूर आणि अमानवी होता याची सत्यता पटते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील ही घटना मोरारजी देसाई सरकारच्या महाराष्ट्रविरोधी भावनेचे प्रत्यंतर घडविते.

१६ जानेवारी ते २१ जानेवारी या अशांततेच्या काळात प्रक्षुब्ध जमावाने गैरप्रकार केले, तर समाजकंटकांनी धुमाकूळ घातल्याचा अनुभव अनेक नेत्यांना आला. ''गांधीटोपी जाळली जात होती. या सर्वांची व काँग्रेसची सर्वत्र छीः थूः होत होती. अशा वातावरणात मी सरकारी मोटारीतून गांधी टोपी घालून तेथे पोहोचलो. हिरे, चव्हाण, प्रभृती मंत्री मोरारजींच्या कृपेने सरकारी विमानाने व सरकारी बंदोबस्तात आले. विमानतळावर जाताना गाडीवरील ध्वज व आपल्या पांढऱ्या टोप्या त्यांनी उतरविल्या होत्या असे म्हणतात.''[२४] अशा प्रकारच्या घटनामळे जनतेमध्ये सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या विरोधात असंतोष किती तीव्र झाला होता याची जाणीव होते.

कोल्हापुरातील घटनेसंबंधी माधवराव बागल यांनी आपल्या आत्मवृत्तात लिहिले होते की, ''सभेत पोलिसांच्या अत्याचारामुळे अनेक लोक जखमी झाले. याच जखमींत तोरसकर हा होता. तो पुढे मरण पावून हुतात्मा झाला. दुसरे दिवशी जाळपोळीचे काही प्रकार झाले. जिल्हा मॅजिस्ट्रेटरी शहरात १४४ कलम पुकारून मिरवणूक, घोषणा करणे, पाचपेक्षा अधिकांचा जमाव जमा करणे, प्रतिमांच्या प्रेतयात्रा काढणेस बंदी करणारा हुकूम काढला तरी दंगल काबूत येऊ शकली नाही. मंगळवार पोलीस चौकीला आग लावण्याचा

प्रयत्न झाला.''[२५] या घटनेवरून संयुक्त महाराष्ट्र चळवळ कोल्हापूर परिसरातही किती ऐरणीवर आली होती याची ओळख पटते. माधवराव बागल यांनी रंगविलेले चित्र अतिशयोक्तीचे नसून ते या चळवळीच्या संदर्भात घडलेल्या घटनेवरून वस्तुनिष्ठ असल्याचे 'पुढारी' या वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचल्या असता स्पष्ट दिसते.

अप्पासाहेब पटवर्धनांना आलेला अनुभव : या काळात पटवर्धनांना कल्याण ते मुंबई लोकलने प्रवास करीत असताना त्यांना काही समाजकंटकाचे दर्शन झाले. त्यामुळे त्यांनीही चिंता व्यक्त केली. मुंबई महाराष्ट्राला मिळाली पाहिजे नाही मिळाली तर तिची राखरांगोळी करून टाकू, असे उद्‌गार त्यांना ऐकायला मिळाले. ते १७ जानेवारी रोजी पुण्याहून रत्नागिरीला जात असताना थेट मोटारसर्व्हिस बंद असल्यामुळे संगमेश्वरला चालवीत असलेल्या कार्यालयात त्यांनी मुक्काम केला. तेथे त्यांनी एक विनंतीपत्र लिहून काढले. ''त्यात मुंबईतील महाराष्ट्रीयांनी राग आवरून दंगे थांबवावेत, असे आवाहन केले. नेहरूंच्या घोषणांमुळे महाराष्ट्राचा अवमान झाला किंवा त्यावर अन्याय झाला असे मानण्याचे कारण बदनाम होत आहे.''[२६] अप्पा पटवर्धन यांचे हे निवेदन सत्य अनुभव सांगणारे होते. महाराष्ट्रातील जनमत काँग्रेस पर्यायाने पंडित नेहरू विरोधी जाऊ नये म्हणून अप्पा पटवर्धन यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते.

''संप, निदर्शने, तोडफोड आणि जाळपोळ मार्गाने दिल्लीवर दडपण आणून मुंबई नव्या प्रांतात जोडून घेऊ, अशी कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. आज मध्यवर्ती सरकारने एकत्र आणले आहे. हे एक समाधान आणि सुचिन्ह असून तीन कोट मराठी जनता एकत्रित आल्याबद्दल आपण विशेष समाधान मानले पाहिजे.''[२७] डॉ.

नानासाहेब परुळेकर यांनी शांतता व संयम राखून झालेल्या निर्णयाचे महाराष्ट्रातील जनतेने स्वागत करावे, अशी समजूतदार भूमिका घेतली होती. कारण डॉ. परुळेकर यांच्या 'सकाळ' पत्राची भूमिका मवाळ व तडजोडीची होती.

प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पंडित नेहरू यांच्या हस्ते शनिवार दि. ३० नोव्हेंबर रोजी करण्याचे ठरले असून ते त्यांना अशक्य करून टाकण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे गडावर आणि आजूबाजूला प्रचंड निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात मुंबई राज्यात निवडून आलेले समितीचे १३२ आमदार व खासदार हे सर्व जणच भाग घेणार आहेत. त्यासाठी शनिवारवाड्यावर घेण्यात आलेल्या विराट सभेत बोलताना आचार्य अत्रे म्हणाले, ''नेहरू प्रतापगडावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन करण्यास येतो, त्याला अधिकार काय ज्यांनी द्विभाषिक लादण्याचा कसोशीने प्रयत्न केला अशा महाराष्ट्रद्रोही माणसाचे अपवित्र हात पवित्र माणसाच्या पुतळ्याचे उद्घाटनाकरिता कशाला. त्यासाठी समिती आपले प्राण पणाला लावून निदर्शने करणार. नेहरूला उद्घाटन करण्याचा काय अधिकार पोहोचतो. मोरारजीने माफी मागितली पाहिजे. ज्या काँग्रेसचे बारसे आम्ही १९३८ मध्ये साजरे केले त्याचा खड्डा खणण्याचा प्रसंग असून त्यासाठी आज मला येथे जावे लागले. प्रत्येक ठिकाणी आम्ही काँग्रेसचा मुडदा पाडणार.'' या आचार्य यांच्या विधानावरून काँगेस आणि पंतप्रधान नेहरूंनी महाराष्ट्राविषयी प्रतिगामी भूमिका घेतल्याबाबत किती राग होता हे स्पष्ट होते. यांच्या अशा विधानाचा 'सकाळ' कार डॉ. परुळेकर यांनी १२ ऑक्टोबर १९५७ च्या 'समितीचे राजकारणम या शीर्षकाखाली असे लिहिले होते.

''राजकारणाचा अतिरेक कसा बुद्धिभ्रंश करू शकतो, त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. मोरारजींनाच काय पंतप्रधानांना काढावयाचे झाले तर त्यांना कायदेमंडळाची वाट मोकळी आहे. बहुमत करून त्यांना खुशाल घालवून देता येईल. परंतु हा सरळ मार्ग समितीवाल्यांना लांब पल्ल्याचा नको वाटतो. हिमालयापासून सेतुरामेश्वरपर्यंत हा देश एक राष्ट्र असून त्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात कोठेही जाण्याचा नागरिकांना अधिकार आहे.''[२८] यावरून असे दिसते की, डॉ. परुळेकर यांना भाषिक मतभेदाचा सीमाप्रश्न हा राष्ट्रीय एकात्मतेच्या पुढे दुय्यम स्वरूपाचा वाटतो. त्यामुळे डॉ. परुळेकरांनी अशी समन्वयाची भूमिका घेतल्याचे दिसून येते.

या सत्याग्रहाच्या संदर्भात समितीच्या झालेल्या निर्णयासंदर्भात डॉ.परुळेकर यांनी १७ जुलै १९५६ च्या अंकात, सत्याग्रह काय साधणार, या शीर्षकाखाली या सत्याग्रहाच्या निर्णयावर टीका केली होती. त्यातून त्यांनी सत्याग्रहामुळे समिती स्वतंत्र मुंबई करण्याच्या कसे विरोधात आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. श्री.पाटसकर यांनी त्यात मोठे योगदान देऊन मुंबईबाबत तडजोड जवळ जवळ घडवून आणली होती. त्यामुळे मुंबईचा प्रश्न देखील सुटण्याच्या मार्गावर होता. परंतु त्याला ठरावीक महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी विरोध केला आणि हीही संधी गमावली. श्री.पाटसकरांची योजना मुंबईचा निर्णय पार्लमेंटने घ्यावा त्याला मुदत पाच वर्षाऐवजी तीन वर्षाची करावी आणि बहुमताने निर्णय लागावा अशी होती. दुसऱ्याला यश मग ते चांगल्या कामाचे असले तरी त्यांना मोठेपणा मिळून आपण मागे पडू,असा मत्सर वाटताच पाटसकरांनी योजना हाणून पाडली होती. ''विदर्भासह द्विभाषिक प्रांत शक्य झाला असता तर त्यात देवांना यश येणार होते. तीही योजना तेव्हा धुडकावून लावण्यात मत्सराचा भाग काही

लहान नव्हता.''[२९] यावरून डॉ.परुळेकरांना महाराष्ट्राच्या ऐक्याबाबत अनेक प्रकारच्या भूमिका विचारात घेतल्याचे दिसून येते. त्यांनी अशा प्रसंगातून संयुक्त महाराष्ट्र समितीपेक्षा वेगळी मते मांडली होती आणि संयुक्त महाराष्ट्र समितीला काटशह देण्याचा प्रयत्न केला होता.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी मराठी जनतेने मोठ्या प्रमाणात आंदोलन केले. त्याचा परिणाम म्हणून केंद्र सरकारने प्रांत रचनेच्या बिलावर पार्लमेंन्टमध्ये चर्चा करण्याचे ठरविले व काही अभिप्राय प्रसिद्ध केले. त्या अनुषंगाने 'सकाळ' कारांनी १८ जुलै १९५६ च्या अंकात यातून काय मिळविले असा अग्रलेख लिहिला ''भाषावार प्रांत रचनेच्या बिलावर सिलेक्ट कमिटीचा अभिप्राय प्रसिद्ध झाला असून पार्लमेंटच्या खास अधिवेशनापुढे चर्चेसाठी ते येणार आहे. अहवालात १० भिन्न मतपत्रिका असून त्यातील एक मामासाहेब देवगिरीकर आणि गणपतराव आळतेकर यांच्या सहीची आहे. तिचा मुख्य आशय असा की, भौगोलिकदृष्ट्या मुंबई महाराष्ट्राची असल्याने ती आत्ताच त्याच्या स्वाधीन करावी. ते तूर्त शक्य नसेल तर निदान पाच वर्षांची मुदत घालू नये.''[३०] अशा प्रकारचे मत 'सकाळ' ने व्यक्त केलेले होते. डॉ.परुळेकरांनी तर अनेक वेळा समिती नेत्यांच्या खिल्ली उडवली होती. त्यांच्या दबावानंतरही मुंबईचा प्रश्न कसा लोंबकळत होता ते दाखविण्यासाठीच डॉ. परुळेकरांनी सदरचा अग्रलेख लिहिला होता असे दिसून येते.

### १९५७ चे प्रतापगडचे सार्वत्रिक आंदोलन

१९५७च्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला होता. २५ वर्षांपासून महाराष्ट्रावर असलेल्या कॉंग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला संयुक्त महाराष्ट्र समितीने आवाहन

उभे केले होते. मुंबई महापालिका लोकल बोर्ड व इतर महापालिकेत कॉँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे केंद्र सरकारने जे महाराष्ट्रावर द्विभाषिक लादले होते ते स्थिरस्थावर करण्यासाठी द्विभाषिक मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याचे उद्‌घाटन पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते करण्याचे ठरविले होते. तर याला विरोध करण्याचा संयुक्त महाराष्ट्र समितीने निर्णय घेतला होता. त्याअनुषंगाने पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या आगमनावेळी शिस्तीत परंतु प्रचंड निदर्शने करण्याचे ठरले. त्याची पूर्वतयारी म्हणून समितीच्या नेत्यांनी वेगवेगळ्या भागात याची माहिती देण्याचे ठरविले होते. त्याचाच एक भाग म्हणून पुण्यात शनिवार वाड्यापुढे हिंदू महासभेतर्फे अफझलखान वधानिमित्त सभा भरविण्यात आली होती. त्या प्रसंगाला शिवद्ग्विजय दिन असे नाव देण्यात आले होते. अध्यक्ष खासदार केशवराव जेधे होते तर जयवंतराव टिळक, वा.ब.गोगटे, आचार्य अत्रे यांचे मुख्य भाषण होते. १९५७ च्या दशकात प्रतापगड प्रकरणाच्या निमित्ताने ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद उफाळून आला होता. केशवराव जेधे यांचे ज्येष्ठ बंधू बाबूराव जेधे हे जुन्या ब्राह्मणेत्तर पक्षाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रतापगड प्रकरणाच्या निमित्ताने काढलेल्या एका पत्रकात जातीयवादाचे बीज किती मोठ्या प्रमाणात रुजले होते याचा अंदाज येईल. ''शिवाजी महाराज हयात होते तेव्हा तर भिक्षुकांचा विरोध होताच. पण ते त्यांच्या मृत्यूनंतरही आजतागायत ब्राह्मण लोक त्यांच्यामागे हात धुऊन लागलेले आहेत. शिवस्मारकाच्या प्रत्येक चळवळीस त्याचा विरोध असतो. समितीची ही निदर्शने त्याच शिवद्वेष्ट्या ब्राह्मणी परंपरेतली आहेत.''[३१] यशवंत दीनानाथ फडके यांनी हा संदर्भ देऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील छुपा

ब्राह्मण व ब्राह्मणेतर वाद स्पष्ट केला होता. त्याचाच एक भाग म्हणून प्रतापगडच्या आंदोलनाच्या वेळी वेगवेगळी पद्धत अवलंबली जात होती.

या सर्व घटनेचा सविस्तर समाचार आचार्य अत्रे यांनी घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरणाप्रसंगी होणाऱ्या जातीयवादाच्या प्रचाराचे खंडन करताना आचार्य अत्रे स्पष्ट भूमिका मांडतात की, या खादीवाल्या गाढवांना सांगितले कोणी? समितीच्या पुढारी मंडळामध्ये नाना पाटील, माधवराव बागल, व्ही. एन. पाटील, दत्ता देशमुख, उल्हासराव पाटील, ल. मा. पाटील, यशवंतराव मोहिते आणि दाजीबा देसाई हे मराठा प्रबोधनकार केशवराव ठाकरे, बी. टी. रणदिवे, मो. वा. दोंदे यांच्यासारखे कायस्थ, वालचंद कोठारी, भाऊसाहेब राऊत, बापूराव जगताप, सावळाराम पाटकर हे ब्राह्मणेतर साथी पीटर अल्वारिस, साथी एस.एम.पिंटो यांच्यासारखे ख्रिस्ती होते. कर्मवीर भाऊराव गायकवाड, रा.धों.भंडारे, बापूसाहेब कांबळे हे बौद्ध, नौशेर भरूचा पार्शी आणि अमर शेख, हरून अन्सारी, निहाल अहमद हे मुस्लीम यांचा समावेश होता. जे समितीशी एकनिष्ठ आहेत. त्याला समितीत स्थान असल्याचे सांगून अत्र्यांनी 'झालाच पाहिजे' या पुस्तकात असे नमूद केले होते.''संयुक्त महाराष्ट्राशी हरामखोरी करणारे सारे सूर्याजी पिसाळ, चंद्रराव मोरे आणि कलुशा शुब्जी यांना आश्रय देणारा काँग्रेस हा एकच पक्ष हा पांजरापोळ आता शिल्लक उरला आहे. काँग्रेसमधल्या जातीयवादी मंडळींना ब्राह्मणांचे एवढे वावडे वाटते तर शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे उद्‌घाटन करावयाला पंडित नेहरूसारख्या काश्मीरच्या ब्राह्मणाला का बोलावले हो, का त्यांना काश्मीरचा ब्राह्मण तेवढा चालतो अन् महाराष्ट्रातला चालत नाही होय.''[३२] या लिखाणावरून आचार्य अत्रे यांचा युक्तिवाद किती स्पष्ट होता, हे

दिसून येते.

या काळात जातिवाचक प्रचार मोठ्या प्रमाणात झाला होता. तसेच त्याची पत्रके देखील सरकारी गाडीतून वाटली गेल्याची बकुळी खुद्द यशवंतराव चव्हाण यांनी 'विधिमंडळातील निवडक भाषणे' या पुस्तकात लिहिताना म्हटले, ''जातीय पत्रके वाटण्यात आलेली आहेत. ही गोष्ट खरी आहे. अद्यापपर्यंत तसा निश्चित पुरावा हाती आलेला नाही. पण हाती आलेल्या पुराव्यांवरून ती पत्रके सरकारी मोटारीतून वाटली नाहीत, असे म्हणावयास हरकत नाही.''[३३] यावरून आचार्य अत्रे यांनी केलेली टीका ही जातीयवादी काँग्रेस नेत्यांचे वस्त्रहरण करणारी होती. त्यामुळे काँग्रेस दुटप्पी चाल आचार्य अत्रे यांदी याद्वारे उघड केली होती.

२७ नोव्हेंबर १९५७ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे होणाऱ्या निदर्शकाना विरोध करण्यासाठी पुण्यात शनिवारवाड्यासमोर भरलेल्या सभेच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना तुळशीदास जाधव आणि शंकरराव मोरे समितीच्या नेत्यांवर टीका करताना म्हणतात, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद आम्हाला काढावयाचा नव्हता. कारण आम्ही तो पूर्वीच गाढून टाकला पण प्रतापगडावर निदर्शने करण्याचा निर्णय घेऊन समितीचे नेते तो वाद पुन्हा उकरू पाहत आहेत आणि आमचा उपहास करीत आहेत. तो वाद उकरून काढणाऱ्यांनी हे नीट ध्यानात ठेवावे की, गांधीवधापूर्वी आम्हाला उपहासाने हसणाऱ्यांचे दात गांधीवधानंतर हसायला देखील शिल्लक राहिले नाहीत. समितीचे नेते यशाने धुंद होऊन प्रथम चव्हाण आणि नंतर नेहरू या क्रमाने त्याचा ग्रास करण्याचा विचार करीत आहेत. अशा रीतीने ते शिवाजीचाही ग्रास करतील. पण त्यांनी ध्यानात ठेवावे की, समितीने आपला हट्ट सोडला नाही तर प्रतापगडावर अफजलखानाच्या कबरीजवळ

त्यांचीही सोय लावल्याशिवाय राहणार नाही.

आचार्य अत्रेंनी या वक्तव्याचा समाचार घेताना ३० नोव्हेंबरच्या नवयुगच्या अंकात असे लिहिले होते की, ''मोरे हे पाजी, बेशरम,हलकट आहेत. महाराष्ट्राचे आपण माओत्से तुंग होणार अशी गर्जना करणारा हा शिवाजीनगरचा सिंह, शेवटी नेहरूंच्या वाटीतल्या दुधासाठी मॅऊ मॅऊ करणारे एक मरतुकडे मांजर ठरला. ''[३४] आचार्य अत्रे यांच्या खास उपरोधक शैलीतील या उताऱ्यावरून त्याचा परखडपणा स्पष्ट होतो. मोरे यांची तुलना मांजराशी केली होती त्यांची भूमिका काँग्रेसकडे कशी झुकली यावर भाष्य केले होते.

पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते करावयाच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी आंदोलन करावे किंवा नाही या मताबाबत संयुक्त महाराष्ट्र समितीत एकमत असल्याचे आढळून येत नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या युगपुरुषांच्या पुतळ्याचे अनावरण देशाचे पंतप्रधान असलेल्या व्यक्तीच्या हस्ते होणार हे महाराष्ट्राचे भाग्य असताना त्यांच्यासमोर निदर्शने करणे, त्यात अडथळा आणणे हे योग्य नसल्याचे अनेकांचे मत होते. आंदोलन करण्याच्या निर्णयाच्या विरोधात सर्व प्रथम मजदूर किसान पक्षाचे रघुनाथ खांडीकर प्रथम आवाज उठवला. २९ ऑक्टोबरला सांगलीत भाषण करताना ते म्हणाले, ''निदर्शने करण्याचा निर्णय समितीने घेतलेला नसून विधानसभेतील समितीच्या आमदारांनी घेतलेला असल्यामुळे तो समितीवर बंधनकारक नाही. योग्य वेळी मी हा प्रश्न समितीच्या सभेतही मांडणार आहे.''[३५] यावरून समिती नेत्यांची दुहेरी चाल स्पष्ट होते. परंतु त्यांना तसे करण्यावाचून दुसरा मार्गही नव्हता.

ए. एस. डांगे यांनी 'मराठाम या पत्रास पाठविलेल्या पत्रात त्यांनी आपली भूमिका

स्पष्टपणे मांडली आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की,''मोरारजी देसाई शिवाजीला वाईट म्हटले तर त्याचा खुलासा नेहरूंकडून का मागावा. त्या उद्‌गाराबद्दल नेहरूंच्या हस्ते होणाऱ्या उद्‌घाटनाला विरोध कशाला. म्हणून मी या भूमिकेवरून त्या उद्‌घाटनाला विरोध करीत नाही.''[३६] अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते अमृत डांगे यांनी ऐनवेळी घेतलेली भूमिका समितीच्या इतर नेत्यापेक्षा थोडी वेगळी होती.

एस. एम. जोशी यांनी समितीच्या एका कार्यक्रमाच्या निमित्ताने नागपूरला गेले असता तेथील काही संयुक्त महाराष्ट्रविरोधी लोकांनी एस. एम. जोशी यांना काळे झेंडे दाखवून निदर्शने केली. तेथील कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, मोरारजी देसाई यांनी अजूनही कबूल करावे की, अमेरिकन विद्यार्थ्यांशी बोलताना शिवाजी आणि अफजलखान यांचा उल्लेख केला नव्हता. तसे त्यांनी केले तर प्रतापगडावर नियोजित निदर्शने आम्ही रद्द करू. या त्यांच्या विधानावर व इतर समितीतील लोकांच्या मतावर डॉ.परुळेकर यांनी १९ नोव्हेंबर १९५७ च्या अंकात माघार बिनशर्तच हवी, या शीर्षकाखाली समितीतील नेते वेळ पाहून घेत असलेल्या भूमिकेवर त्यांनी कठोर टीका केली होती. ''संयुक्त महाराष्ट्र समिती, या ऐसपैस नावाखाली गोळा झालेल्या बारभाईत प्रथमपासून कार्य, कार्यक्रम व भाषेत कमालीची विसंगती आहे. आता तो बेबनाव अधिकाधिक उघडा पडू लागला वाढत्या प्रमाणात जनतेच्या निदर्शनास येऊ लागला आहे. ''[३७] डॉ. परुळेकर यांनी समितीच्या नेत्यांवर टीका करून त्यांचे मुखवटे स्पष्ट केले होते. डॉ. परुळेकरांना संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन निरर्थक वाटत होते. त्यांना विविध भाषिक समूह एकत्र राहिल्याने काही बिघडत नाही असेच वाटत होते. थोडक्यात त्यांनी मुख्यमंत्री मोरारजी देसाई व पंतप्रधान पंडित नेहरू यांचीच भूमिका उचलून धरली

होती. त्यामुळे समितीच्या नेत्यावर परखड टीका करण्याची कोणतीही संधी डॉ. परुळेकर सोडत नव्हते.

पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरण होणाऱ्या कार्यक्रमाच्या वेळी निदर्शने करण्याच्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्र समितीने मोठ्या प्रमाणात तयारी केली होती. म्हणून कार्यक्रमाच्या आदल्या दिवसापासूनच महाराष्ट्रातील जनता मोठ्या प्रमाणात प्रतापगडाकडे चालून येत होती. यात प्रामुख्याने पंडित नेहरू यांचा निषेध करण्यासाठी मिळेल त्या वाहनांनी, सायकलवर आणि पायी वाटचाल करीत होते. हे आंदोलन यशस्वी होऊ नये यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने साम,दाम,दंड या नीतीचा अवलंब केला होता. परंतु निदर्शकांवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. या संदर्भात लालजी पेंडसे यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे की, ''निदर्शकांना घाबरवून सोडण्यासाठी हे धावते प्रदर्शन होते. असाही प्रवाद होता. तेवढ्यात किसनवीर आदी शेलकी मंडळी टेहळणी करून गेली तेव्हा रात्री हल्ला होणार अशाही कंड्या उठल्या. थंडी कडाक्याची होती. लोक शेकाट्या पेटवून जमावाने सारी रात्र जागत बसले होते. पहाट होत आली आणि पेव मु टले तशी चोहोबाजूने खेडोपाड्याच्या माणसांची रीघ लागली. हजारो लोक एकत्र आले. दीड-दोन मैलाचा रस्ता दुतर्फा गच्च भरून गेला.''[३८]

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी महाराष्ट्रातील आम जनता हरप्रकारे त्याची मागणी करीत होती. मात्र केंद्र सरकार प्रतिसाद देत नव्हते. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी आतुर झालेली जनता बेधुंद होत चालली होती. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा हाच एकमेव प्रश्न त्यांच्यासमोर होता. यावरून प्रतापगडावर

झालेली निदर्शने ही समितीच्या नेत्यांमध्ये नैतिक बळ वाढविणारे होते. पंतप्रधान नेहरूंना या अगोदर एवढ्या जनक्षोभाला कधीही सामोरे जावे लागले नाही. हे आंदोलन पाहून आता संयुक्त महाराष्ट्र दिला पाहिजे, अशीच भावना नेहरूंच्या अंतःकरणात निर्माण झाली होती.

प्रतापगडाच्या आंदोलनात पंडित नेहरू यांच्यावर नैतिक दबाव निर्माण झाला होता. महाराष्ट्राचे जनमत हे द्विभाषकाच्या बाजूने नव्हे तर संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने आहे हे नेहरूंनी उघड्या डोळ्यांनी पाहिले होते. तसेच त्यांना प्राप्त झालेले अनेक गोपनीय अहवाल हे सुद्धा जनमत संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने आहेत हेच सांगणारे होते. प्रतापगडाच्या आंदोलनामधून प्रामुख्याने तीन बाबी समोर आल्या त्या अशा–

- संयुक्त महाराष्ट्राची स्थापना ही बाब ऐतिहासिक वास्तव आहे आणि महाराष्ट्रातील सर्व पक्ष हे संयुक्त महाराष्ट्राच्या उभारणीसाठी एकत्र आले आहेत. संयुक्त महाराष्ट्र समिती हे त्यांचे संघटित रूप आहे, हे नेहरूंच्या लक्षात आले.
- प्रतापगडाच्या आंदोलनामुळे छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत आहेत आणि त्यांच्याबद्दल कोणताही अपशब्द मराठी माणूस सहन करणार नाही हे नेहरू यांनी ओळखले. त्यामुळे त्यांना दिलगिरी व्यक्त करावी लागली.
- प्रक्षुब्ध जनमत आणि लोकांचा वाढता दबाव पाहता आपण सर्व मराठी भाषकांचे राज्य महाराष्ट्र स्थापन करण्यास विरोध केला तर काँग्रेस पक्षाची अवस्था बिकट

होईल आणि महाराष्ट्रातून या पक्षाची फार मोठी पीछेहाट होईल ही बाब नेहरूंच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांना अखेर संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने कौल द्यावा लागला.

- संयुक्त महाराष्ट्राची आवश्यकता नेहरूंना पटविण्यात यशवंतराव चव्हाण सफल झाले आणि त्यांचे महाराष्ट्रातील नेतृत्व अभंग राहिले. यशवंतरावांनी एवढी चतुराई दाखविली की, संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश हा यशवंतराव चव्हाण यांनीच आणला अशी भावना तयार झाली.

**एस. एम. जोशी यांच्या आठवणीप्रमाणे**

५ नोव्हेंबर रोजीच्या निदर्शनासंबंधीचा समितीने केलेला ठराव आचार्य अत्रे आणि एस. एम. जोशी यांनी संयुक्तपणे केला होता. समारंभाचा मुख्य हेतू महाराजांबद्दल आदर व्यक्त करण्याचा नसून द्विभाषिक मजबूत करण्याचा आहे. म्हणून नेहरूंच्या आगमनाप्रसंगी जनतेने प्रतापगडावर मोर्चा काढून आपली तीव्र नापसंती व्यक्त करावी, असे ठरावात करण्यात आले होते. नेहरूंच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय पोलिस आले होते. ते निदर्शकांना रस्त्याच्या कडेला उभे राहू देईनात तेव्हा निदर्शक आणि केंद्रीय पोलिस यांच्यामध्ये भांडण सुरू झाले ते मिटविले एस.एम.जोशी यांनी त्यांनी निदर्शकांना असे सांगितले– ''तुम्ही उभे रहा तुमच्यापुढे पोलिसांची भिंत उभी राहू देणार नाही. त्यांनी पोलिसांना सांगितले निदर्शक मागच्या बाजूला उभे राहतील. ते रांगेत असतील. पोलिस दूरदूर असले पाहिजेत. निदर्शकांना नेहरू दिसले पाहिजेत व नेहरूंना निदर्शक.''[३९] समिती निदर्शकांना वाईजवळ घाटात अडविले. गडावर जाण्यास परवानगी नसल्याने

तेथेच बसून प्रतापगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी निषेध करण्यासाठी जाणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या निदर्शकांचे जथ्यास वाईपासून एक मैल पसरणी घाटाच्या पायथ्यांशी पोलिसांनी आज सकाळी अडविले. आपणास यापुढे जाता येणार नाही, असे त्यांनी निदर्शकांच्या पुढाऱ्यांना सांगितले.

(या घटनेच्या संदर्भातील सविस्तर बातमी दैनिक सकाळ ३० नोव्हेंबरच्या अंकात पृष्ठ क्रमांक १ वर उपलब्ध आहे) देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू पुतळा अनावरण कार्यक्रमाला येणार आहेत म्हणून डॉ. परुळेकर यांना मनस्वी आनंद झाला. त्यांनी आपल्या ३० नोव्हेंबर १९५७ च्या वृत्तपत्रात प्रतापगड या नावाच्या अग्रलेखात नमूद केले होते की, त्यांनी प्रतापगड, या शीर्षकाच्या अग्रलेखात नेहरूंचे स्वागत केले आहे. तसेच निदर्शने करणाऱ्या समितीला त्यांनी दोष दिला आहे. त्यातील महत्त्वाचे मुद्दे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आज येत आहेत. त्यांचे महाराष्ट्राचे वतीने आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो. या ठिकाणी सह्याद्रीच्या कुशीत महाराष्ट्र मोठा झाला ते आमचे कुळघर त्यांना पाहावयास मिळेल.

''आमचा कला आणि वैभव आमच्या या किल्ल्यात साठवलेले आहे. आमचे पंतप्रधान रसिक आहेत. कलेची दृष्टीने प्रतापगडाकडे पाहतील तर एक नुसताच लष्करी संरक्षणाचा किल्ला नसून सहस्त्रशीर्ष सह्याद्रीच्या एका डोक्यावर ठेवलेला कलापूर्ण मुकुट आहे. ते सर्व पाहून त्यांना अचंबित वाटल्याशिवाय राहणार नाही.''[४०]

पंतप्रधान नेहरू यांना ठरल्याप्रमाणे समितीच्या नेत्यांनी व निदर्शकांनी निदर्शनासाठी जमलेल्या लोकांनी नेहरूविरोधी घोषणा देऊन, मुंबईसह संयुक्त

महाराष्ट्राची मागणी केली. या आंदोलनामुळे पंतप्रधान नेहरूंचे मन परिवर्तन झाले व खऱ्या अर्थाने येथून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्याची चर्चा सुरू झाली. या संदर्भात यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेल्या 'ऋणानुबंधम पुस्तकात या घटनेची माहिती नमूद केलेली आहे. ते लिहितात ''प्रतापगडावरचा समारंभ व त्या वेळची झालेली निदर्शने व या निदर्शनाचे झालेले नियंत्रण यांचा नेहरूच्या मनावर चांगला परिणाम झाला. नेहरूंनाही लोकांची प्रचंड निदर्शने पाहता आली. त्यांच्या भावना ओळखता आल्या. निदर्शने प्रचंड होती. पण लोक संयमाने वागे याचाही नेहरूंच्या मनावर परिणाम झाला. आपल्या सभातूनही ते लोकांशी बोलले त्या वेळी त्यांच्या लक्षात आले की, आम्ही जरी द्विभाषिक राबवीत आहोत तरीही लोकांच्या मनात काही संदेह आहे. ''[४१]

काँग्रेस पक्षामध्ये बदल होऊन, १९५९ साली इंदिरा गांधी अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. दरम्यानच्या काळात त्यांनी महाराष्ट्राचा दौरा केला. त्या वेळी लोकांनी व राजकर्त्यांनी व्यक्त केलेला प्रतिक्रिया ऐकून द्विभाषिक राज्यही न टिकणारी गोष्ट आहे, ही बाब त्यांनी हेरली होती. ६ सप्टेंबर १९५९ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. इंदिरा गांधी यांनी संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर खूपच समजूतदार भूमिका घेऊन या विषयावर चर्चा झाली आणि १९ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येण्याची घोषणा केली. त्यानंतर १ मे १९६० रोजी मुंबईच्या राजभवनाच्या दरबार हॉलमध्ये पंडित नेहरू यांनी विजेचे बटण दाबताच महाराष्ट्राचा नकाशा झळू लागला व अनेक वर्षांपासून चालत आलेल्या एका भव्य आंदोलनाच्या रूपातून महाराष्ट्राची निर्मिती या भव्य स्वप्नाची पूर्तता झाली.

यावरून यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणेच एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, श्रीपाद अमृत डांगे, लालजी पेंडसे, भाई उद्धवराव पाटील, आचार्य अत्रे यांसारख्या अनेक नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ संघटित केली होती. त्यामध्ये उजवे, डावे, मध्यममार्गी असे अनेक पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जनतेचा लढा संघटित केला. कोणताही लढा हा केवळ एका पक्षाचे चालत नाही किंवा एका नेत्याने संघटित होत नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत समाजवादी पक्ष, कम्युनिष्ट पक्ष, लाल निशाण गट इत्यादी अनेक पक्षांचे नेते समितीच्या झेंड्याखाली एकत्र आले व त्यांनी अभूतपूर्व ऐक्य दाखविले. जनतेचा लढा संघटित केला. लोकांच्या मनात असलेला असंतोष त्यांनी प्रकट केला आणि या असंतोषातून संयुक्त महाराष्ट्राचा बुलंद आवाज अधिक प्रभावीपणे प्रकट झाला. म्हणून संयुक्त महाराष्ट्राचे यश हे कोणा एका नेत्याच्या किंवा पक्षाच्या प्रयत्नामुळे घडून आले असे नाही तर विविध पक्ष, त्यांचे नेते, त्यांनी चालविलेले लढे, त्यांची आंदोलने आणि वृत्तपत्रांची जागृती या सर्व कारणांमुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ यशस्वी झाली होती.

या लढ्याचे श्रेय कोणा एका पक्षाला किंवा गटाला देता येणार नाही. जनतेच्या सामुदायिक इच्छाशक्तीचा तो एक आविष्कार होता. त्यामुळे जनआंदोलने संघटित झाली. लोकशक्तीपुढे सरकारला नांगी टाकावी लागली आणि पं. नेहरूसारख्या धुरंधर नेत्याला महाराष्ट्रापुढे नमते घ्यावे लागले. याचे सर्व श्रेय अर्थातच महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी बजावलेल्या निर्भीड आणि ठाम भूमिकेकडेच जाते.

**समालोचन**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वेगवेगळी आंदोलने आणि वर्तमानपत्रांतील

घेतलेली परखड निर्भीड भूमिका त्यामुळे समाज जीवनावर त्याचे पडलेले पडसाद हाच प्रकरणाचा गाभा होता. वर्तमानपत्रांच्या फाईल्स, कात्रणे व विविध ग्रंथांतील लेखन यांचा आधार घेतला असता असे दिसते की, तत्कालीन वृत्तपत्रांनी सुमारे दहा वर्षे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा सतत पाठपुरावा केला होता. महाराष्ट्राच्या विविध भागांत जी आंदोलने झाले त्याची दखल घेऊन त्याचाच महत्त्व वर्तमानपत्रांची प्रभावीपणे मांडले. मुंबईचा गोळीबार असो, प्रताप गडावरील निदर्शने असोत की, अन्य एखादी चळवळ असा. वर्तमानपत्रे आपल्या कामात कधीही मागे राहिली नाहीत. किंबहुना बऱ्याच वेळा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या पाच घटक पक्षांत फाटाफूट, मतभेद आणि वादविवाद असूनही वर्तमानपत्रांनी या चळवळीस उचलून मोठ्या तळमळीने धरले आणि सर्व प्रकारच्या वादावर पडता घालून अंतिम हेतू चांगला असल्यामुळे चळवळ यशस्वी करण्यावर भर दिला. यश अपयशाचे अनेक चढ–उतार पाहत असता, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी झाली आणि नेहरूंच्याच हस्ते शिवरायांच्या महाराष्ट्राची पुन्हा स्थापना झाली, हे ऐतिहासिक यश संपादन करण्यात वर्तमानपत्रांनी बजावलेली कामगिरी अत्यंत लक्षणीय ठरली.

आचार्य अत्रे यांचा ‘मराठा, कोठारी यांचा ‘प्रभात’ तसेच ग. गो. जाधव यांचा ‘पुढारी अशा वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्राची भूमिका उचलून धरली, तर ‘सकाळकार डॉ.नानासाहेब परुळेकर यांनी प्रतिकूल भूमिका घेऊन त्यास विरोध केला होता. त्यांचा हा विरोध काही तत्त्वावर आधारलेला होता. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य असून, स्वातंत्र्यानंतर विविध भाषक समूहांनी एकत्र गुण्यागोविंदाने राहून राष्ट्राच्या विकासाला हातभार लावला असे त्यांचे मत होते. बहुभाषिक राज्यांच्या एकत्र

अस्तित्वावर नेहरू यांचा भर होता. त्यामुळे डॉ.परुळेकरांनी त्यांचा हा सिद्धांत दैनिक 'सकाळ' मधून उचलून धरला आणि काळाप्रमाणेच बदलण्याचा आग्रह धरणारे मराठी नेते व पक्ष हे समितीच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा पुरस्कार करत होते. या सर्व पक्षांना आचार्य अत्रे यांनी दमदार वैचारिक नेतृत्व दिले. अत्रे यांची भाषा प्रखर होती. त्यांनी विरोधकांवर तुटून पडून प्रतिपक्षाचा नैतिक आणि वैचारिक पराभव केला. डॉ.परुळेकर यांच्यासारखे आग्रही मत मांडणारे संपादक मात्र ठाम राहिले. त्यांनी आचार्य अत्रे यांच्यावर 'सोंगाड्याचा संकल्प' असा अग्रलेख लिहिला आणि अत्रे यांचे वस्त्रहरण केले. या काळातील वृत्तपत्रांतील वादविवाद, तर्कवितर्क, हल्ले आणि प्रतिहल्ले यांचे दर्शन तत्कालीन वृत्तपत्रांच्या फाईल वाचतानाच घडते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील नेत्यांनी केलेल्या कामगिरीचा विचार करता समितीच्या नेत्यांना लौकिक अर्थाने सत्तापदे मिळाली नाहीत. पण जनतेच्या हृदय सिंहासनावर त्यांना ते नक्कीच स्थान मिळाले आणि ते कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.        काळाचा प्रवाह कितीही पुढे गेला, महाराष्ट्राच्या इतिहासाने कितीही आवर्तने घेतली, कितीही संक्रमणे झाली तरीही संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा संघर्षमय इतिहास कोणीही कधीच पुसून टाकू शकणार नाही. समितीच्या नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद होते, ही बाब खरी आहे. त्यांच्यातील किमान समान कार्यक्रम एकच होता, तो म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करणे होय. आपला पक्ष, संघटना आणि त्यांचे स्वहित या सर्वांना तिलांजली देऊन अनेक पक्ष एकत्र आले. अनेक पक्षांनी आपला अहंकार आणि स्वार्थ सोडून देऊन संयुक्त महाराष्ट्राच्या झेंड्याखाली जोरदार लढा चालविला, दबावगट निर्माण केले आणि प्रचाराची धार कधीही सौम्य होऊ दिली नाही. त्यामुळेच जनमत सदैव तापलेले पाहिजे.

आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' पत्राने चळ्याचे मुखपत्र म्हणून काम पाहिले. शिवाय जयंतराव टिळक यांच्या 'केसरी' पत्राने सुद्धा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उचलून धरली आणि लो.टिळकांनी आपला लढाऊ बाणा पुन्हा एकदा सिद्ध केला. त्यांच्या या गौरवशाली परंपरेस अनुसरून मराठी वृत्तपत्राने सुद्धा त्याग, समर्पण आणि संघर्ष ही मूल्ये जबरदस्तपणे उचलून धरली त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राचा लढा यशस्वी झाला. जेव्हा नेते हतबल झाले, पक्षही दुबळे झाले अशा वेळी वृत्तपत्रे आणि पत्रकार यांनी कंबर कसली. प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा लढा चालविला आणि जनमानसाचा आवाज बुलंद करत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी केली. मुख्य लढा आणि उपलढे, तसेच मुख्य आंदोलन आणि उपआंदोलने यांचा विचार करता असे दिसून येते की, संयुक्त महाराष्ट्राचा लढा यशस्वी करण्यात आणि विजयश्री खेचून आणण्यात मराठी वृत्तपत्रांनी बजावलेली कामगिरी स्पृहणीय होती. त्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या उभारणीत मराठी वृत्तपत्रांनी बजावलेले कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.

कोणताही लढा हा यशस्वी होण्यासाठी असंतोष लागतो पण या असंतोषाचे संघटन करावे लागते आणि त्यास बुलंद आवाज प्राप्त करून देण्यासाठी समर्थ नेतृत्व हवे असते. इतस्ततः संयुक्त प्रांत आणि हैदराबाद संस्थानात विखुरलेला महाराष्ट्राचा भाग एकत्र करून संयुक्त महाराष्ट्र उभारल्यामुळे मराठी भाषा व संस्कृतीच्या विकासाला एक नवी सुवर्णसंधी प्राप्त झाली. कृषी, सहकार आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये एका नव्या नेतृत्वाचा उदय झाला आणि हे नेतृत्व इतिहासाला कलाटणी देणारे दमदारपणे नवी वाटचाल करणारे होते. पं. नेहरू हे सुरूवातीस स्वतंत्र महाराष्ट्र राज्य उभारणीस

अनुकूल नव्हते. परंतु प्रतापगडाच्या आंदोलनावेळी त्यांनी मराठी जनतेच्या प्रक्षुब्ध भावना प्रचंड निदर्शनाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवल्या आणि त्यांच्या जिवंत भावना लक्षात घेऊनच हा लढा उभा असताना इतिहासाची पावले ओळखून महाराष्ट्राच्या बाजूने कौल दिला. नेहरू यांच्यावर वैचारिक व मानसिक दबाव वृत्तपत्रांनीच निर्माण केला होता आणि यशवंतराव चव्हाण यांनी धूर्तपणे, चतुराईने नेहरूंचा कल वळवण्यात यश मिळविले आणि प्रतिकूल असलेला लढा अनुकूलतेकडे झुकत गेला. अखेर १ मे १९६० या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. सांगलीच्या गूळ मार्केट यार्डावर झालेल्या सभेत यशवंतराव चव्हाण यांनी राज्य कोणाचे मराठ्यांचे की मराठी भाषिकांचे या माडखोलकरांच्या अग्रलेखास आपल्या सभेतून चोख उत्तर दिले आणि नवे 'महाराष्ट्र राज्य' हे सर्व मराठी भाषिकांचे राज्य असेल याची ग्वाही दिली. महाराष्ट्राचे राजकीय ऐक्य, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समृद्धीची दिशा बळकट करणारे ठरणार आहे हे लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला एक तेजस्वी रूप प्राप्त करून दिले. वृत्तपत्रांनी चळ्याचे यज्ञकुंड सतत पेटते ठेवले. त्यामध्ये विचारांची समिधा अर्पण केली. त्यामुळे महाराष्ट्र राज्य एक नवा इतिहास घडवू शकले.

## तळटीपा

१. प्रा. काळे भगवान संपादक : संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज : संकेत प्रकाशन जालना : पृष्ठ क्र.१० (हा लेख एस. एम. जोशी यांनी स्वतः लिहिला आहे)

२. डॉ. परूळेकर नानासाहेब : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन : पुणे पृष्ठ १९७

३. कित्ता : निरोप घेता आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन :पुणे पृष्ठ ९८

४. महाजनी ह. रा. : संयुक्त महाराष्ट्राची समस्या : १९५७ केशव भिकाजी ढवळे प्रकाशन : मुंबई:पृष्ठ क्र.२७

५. डॉ. परुळेकर नानासाहेब : निरोप घेता : आत्मचरित्र : सकाळ प्रकाशन :पुणे पृष्ठ क्र. १४५

६. प्रा. काळे भगवान संपादक : संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज : संकेत प्रकाशन जालना : पृष्ठ क्र. ९४ (हा लेख नरहर कुरुंदकर यांनी स्वतः लिहिला आहे)

७. दै 'सकाळ' : अग्रलेख : सोंगाड्याचा संकल्प : २७ जुलै १९५९

८. दै. 'केसरी' : लेख : माधवराव बागल यांचा लेख : ६ डिसेंबर १९५५

९. साप्ताहिक नवयुग : १८ डिसेंबर १९५५ ची बातमी

१०. कित्ता : १८ डिसेंबर १९५५ ची बातमी

११. बागाईतकार सदाशिव : संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि सोशलिस्ट पार्टी : पृष्ठ क्र.६

१२. दै.'सकाळ' : अग्रलेख : कुस्तीगीर पुढारी : ३० डिसेंबर १९५५ पृष्ठ क्र.६

१३. 'साप्ताहिक युगांतर' : ९ ऑक्टोबर १९५५

१४. 'साप्ताहिक युगांतर' : २ ऑक्टोबर १९५५

१५. अत्रे प्र. के. : कऱ्हेचे पाणी : खंड ५ वा : तिसरी आवृत्ती १९८९ परचुरे प्रकाशन १९६८ पृष्ठ क्र.९४

१६. दै. 'सकाळ' : अग्रलेख : यात रुसण्यासारखे काय १२ ऑक्टोबर १९५५

१७. दै. 'सकाळ' : अग्रलेख : एक राष्ट्रीयत्वाचा विजय :११ ऑक्टोबर १९५५

१८. दै. 'सकाळ' : अग्रलेख २० मे १९६०

१९. दै. 'सकाळ' : अग्रलेख : संयुक्त आणि विभक्त ११ जानेवारी १९५६

२०. शेख मल्लिका अमर : सूर एका वादळाचा : १९९२ :मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई : पृष्ठ क्र. २४

२१. कारखानीस सरला : संयुक्त महाराष्ट्राच्या हुतात्म्याची कहाणी : एप्रिल १९५६

२२. दै. 'सकाळ' : बातमी : १९ जानेवारी १९५६ च्या अंकातील

२३. सत्यान्वेषी : संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत : १९५८ : पृष्ठ क्र.३७

२४. कुंटे नाना : वाटचाल : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळः मुंबई : पृष्ठ क्र.२२७

२५. बागल माधवराव : जीवनप्रवाह भाग : ३:१९५७ : संपादक हंटरकार खंडेराव गोपाळराव बागल यांचे निवडक लेख पृष्ठ क्र.५४

२६. पटवर्धन अप्पा : जीवनयात्रा :१९७१ : परमधाम विद्यापीठ प्रकाशन वर्धा पृष्ठ क्र. ६४६

२७. दै. ‘सकाळ‘ : अग्रलेख : ‘महाराष्ट्राचा प्रश्न‘ : १९जानेवारी १९५६

२८. दै. ‘सकाळ‘ : अग्रलेख : ‘समितीचे राजकारण‘: १२ऑक्टोबर १९५७

२९. दै. ‘सकाळ‘ : अग्रलेखः‘सत्याग्रह काय साधणार‘१७ जाने.१९५६

३०. दै. ‘सकाळ‘ : अग्रलेखः‘यातून काय मिळविले‘१८जूलै १९५६

३१. फडके य.दी. : केशवराव जेधेःश्री.विद्या प्रकाशन पुणे प्रथमावृत्तीः१२ नोव्हेंबर १९८२ःपृष्ठ क्र.२६३

३२. अत्रे प्र.क्र. : झालाच पाहिजेः प्रथमावृत्ती १९८४ कॉन्टिनेन्टल प्रकाशनः पुणे पृष्ठ क्र.२७९

३३. चव्हाण यशवंतराव : विधिमंडळातील निवडक भाषणेःखंड१पृष्ठ क्र.६१ ते ६५

३४. नवयुग : ३० नोव्हेंबर १९५७

३५. दै. ‘मराठा‘ : ३ नोव्हेंबर १९५७

३६. दै. ‘मराठा‘ : ५नोव्हेंबर १९५७

३७. दै. ‘सकाळ‘ : अग्रलेख : माघार बिनशर्त हवी : १९नोव्हेंबर १९५७

३८. पेंडसे लालजी : महाराष्ट्राचे महामंथनः१९६५साहित्य सहकार संघः मुंबई पृष्ठ क्र.६०७

३९. जोशी एस. एम. : मी एसेम : आत्मकथाः प्रथमावृत्ती : १९८४ कॉन्टिनेण्टल प्रकाशनः पुणेःपृष्ठ क्र.२१९

४०. दै. ‘सकाळ‘ : अग्रलेख : प्रतापगड : ३० नोव्हेंबर १९५९

४१. चव्हाण यशवंतराव : ऋणानुबंधःप्रेस्टिज पब्लिकेशन सदाशिव पेठ, पुणे द्वितीय आवृत्ती : १९८६ पृष्ठ क्र. ८७

## प्रकरण पाचवे

# निष्कर्ष

५.१ प्रस्तावना

५.२ प्रकरणनिहाय सारांश

५.३ ठळक निष्कर्ष

५.४ कामगिरीचे समालोचन

५.५ नवी सैद्धांतिक मांडणी

५.६ उपसंहार

## प्रकरण पाचवे

# निष्कर्ष

### ५.१ प्रस्तावना

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक प्रभावी लोकचळवळ ठरली. कारण या चळवळीमधील सामान्य माणसाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला. या चळवळीला प्राप्त झालेला जनाधार एवढा व्यापक होता की, प्राचीन काळापासून ते आधुनिक काळपर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासात जे परिवर्तन घडून आले ते सर्व चळवळीचे पोषण करण्यासाठी फलदायी ठरले. त्यामुळे या चळवळीचा पाया अधिक मजबूत झाला. या चळवळीने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आधार भक्कम केले आणि महाराष्ट्राच्या भावी विकासाची प्रभावी बैठक त्याद्वारे विकसित झाली. महाराष्ट्र संस्कृतीची मूलगामी दिशा अधिक व्यापक झाली त्यातून महाराष्ट्रधर्म अधिक सर्वसमावेशक बनला. मराठा तितुका मेळवावा व महाराष्ट्र धर्म वाढवावा हा समर्थ रामदासांचा विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये आला. या लोकचळवळीतून जे मन्वंतर घडून आले ते महाराष्ट्र जीवनाला संजीवनी देणारे ठरले.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, समर्थ रामदास अशा संतांनी महाराष्ट्राची जी सत्त्वधारा जोपासलेली होती ती अधिक परिपुष्ट झाली. या लढ्याला अधिक व्यापक रूप प्राप्त होत असताना प्रा. गं. बा. सरदार, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे इत्यादींनी महाराष्ट्र संस्कृती या नावाने महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. त्यामुळे त्यांनी घेतलेला सांस्कृतिक जीवनाचा धांडोळा हा महाराष्ट्र संस्कृतीचे व्यक्तिमत्त्व अधिक उन्नत आणि

विकसित करण्यासाठी पोषक ठरला. महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये राहणाऱ्या लोकांचे सामाजिक व सांस्कृतिक ऐक्य, त्यांच्या समसमान सांस्कृतिक सुवर्णधाग्यात असते व हा धागा संयुक्त महाराष्ट्र चळवळीने अधिक विकसित केला. त्यासाठी आवश्यक ती वैचारिक बैठक महाराष्ट्रातील प्रमुख वृत्तपत्रांनी प्राप्त करून दिली. त्यांनी महाराष्ट्राचे लोकजीवन समाजातील वैचारिक धारणेतून ढवळून काढले. परिणामी सीमावर्ती भागामध्ये विखुरलेला मराठी माणूस एकत्र आला. तनमनधन समर्पित करून तो महाराष्ट्राची सत्त्वधारा जपण्यासाठी सिद्ध झाला. त्याच्या भावी परिवर्तनासाठी आवश्यक अशी कार्यप्रेरणा देण्याचे कार्य मराठी भाषक वृत्तपत्रांनी केले.

१. समान सांस्कृतिक विचारांची बैठक मजबूत करून त्या आधारे समान विकासासाठी जाणीवजागृती करणे आवश्यक असते, हे वृत्तपत्रांनी विचारपूर्वक ओळखले.
२. भविष्यकाळामध्ये महाराष्ट्राचे ऐक्य मजबूत करण्यासाठी समान ध्येय व समान आव्हानांना सामोरे जाण्यासाठी वृत्तपत्रांनी पोषक अशी मूल्यप्रेरणा जागृत केली.
३. संयुक्त महाराष्ट्राच्या मार्गात अडसर ठरणारे केंद्र सरकारचे धोरण, द्विभाषिक मुंबई राज्यामध्ये मोरारजीभाई देसाई यांचे नेतृत्व ठामपणे विरोध करून वृत्तपत्रांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी पोषक वातावरणनिर्मिती केली.

ही सूत्रे या प्रबंधातील शास्त्रीय अभ्यासातून पुढे आली आहेत.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ व वृत्तपत्रांची भूमिका या विषयाच्या अनुषंगाने वृत्तपत्रांच्या कामगिरीबाबत विचार करावयाचे झाल्यास प्रत्येक प्रकरणामधून घेतलेला

परामर्श विचारात घ्यावा लागेल.

## ५.२ प्रकरणनिहाय सारांश

प्रकरण : १– संयुक्त महाराष्ट्र चळवळ उदय विकास आणि वृत्तपत्रांची भूमिका या पहिल्या प्रकरणात अभ्यासविषयाची पार्श्वभूमी सांगितली आहे. या प्रकरणात वृत्तपत्रांचा उदय, वृत्तपत्रनिर्मितीपूर्वी भारतातील तत्कालीन परिस्थिती, भारतातील वृत्तपत्रांचा उदय, मराठी वृत्तपत्रांची निर्मिती आणि विकास इत्यादी पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीपूर्वी मराठी वृत्तपत्रांची स्थिती स्पष्ट करून अभ्यासाची दिशा निश्चित केलेली आहे.

प्रकरण २– प्रस्तावना व संशोधन आराखडा या प्रकरणामध्ये सामाजिक संशोधन पद्धती, संशोधनाचे उद्देश, गृहीतके, संशोधन सामग्रीची निवड, अन्य कागदपत्रांचे विश्लेषण, संशोधन मर्यादा, वर्णनात्मक संशोधन आराखडा, आशय विश्लेषण, प्रकाशित साहित्याचे समालोचन, प्रबंधाचा आकृतिबंध स्पष्ट करून व संशोधनाचा आराखडा का व कसा वापरला आहे ते स्पष्ट केले आहे.

प्रकरण : ३– संयुक्त महाराष्ट्र चळवळीत वृत्तपत्रांची भूमिका या प्रकरणामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेल्या पाच मराठी वृत्तपत्रांच्या कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दैनिक पुढारी, दैनिक प्रभात, दैनिक सकाळ, दैनिक मराठा व दैनिक केसरी या वृत्तपत्रांची कामगिरी संदर्भ देऊन स्पष्ट केलेली आहे. यापैकी सकाळ या वृत्तपत्राने घेतलेली प्रतिकूल भूमिका वगळता अन्य चार वृत्तपत्रे ही संयुक्त महाराष्ट्रवादी असून त्यांनी वेळोवेळी विविध प्रश्नांवर चळवळीस प्रोत्साहन दिले

आहे. त्यांच्या कामगिरीचा साधार, सखोल व टीकात्मक दृष्टीने परामर्श घेतला आहे.

प्रकरण : ४– संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांनी हाताळलेली विविध आंदोलने या प्रकरणातून संशोधनाचा दृष्टिकोन स्पष्ट करून मागील दहा वर्षातील संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तसेच विविध राजकीय पक्ष व चळवळी यातील काही पैलूंवर प्रकाश टाकला आहे. प्रामुख्याने काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, कम्युनिष्ट पक्ष यावर प्रकाश टाकला आहे. तसेच १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुका, १९५७ चे प्रतापगडचे आंदोलन, एस.एम.जोशी यांच्या आठवणीचा संदर्भ इत्यादी परामर्श घेतला आहे आणि शेवटी वृत्तपत्रांचा भूमिकेचे समालोचन केले आहे.

प्रकरण : ५– निष्कर्ष या प्रकरणामधून प्रथम प्रकरणनिहाय सारांश दिला आहे त्यानंतर ठळक निष्कर्ष मांडले आहेत. नवी सैद्धांतिक मांडणी देऊन अभ्यास विषयावर अंतिम भाष्य केले आहे.

## ५.३ ठळक निष्कर्ष

कोणत्याही सामाजिक संशोधनामध्ये उद्दिष्टे व गृहीतकांची तपासणी करून ठळक निष्कर्ष मांडावे लागतात. हे सर्व सूत्ररूपृष्ठे मांडताना त्यांचा तर्कशुद्ध सुसंगत आणि तेवढाच पाठपुरावा करावयाचा असतो. या अभ्यासाचे हे प्रगत उत्क्रांत रूप लक्षात घेता त्याची पूरक व पोषक अशी मांडणी महत्त्वाची ठरते.

शास्त्रीय अभ्यासाची मांडणी करून विविध मुलाखती आणि वृत्तपत्रांच्या आशयाच्या सामग्रीचे विश्लेषण केले असता या अभ्यासाची नवी मीमांसा करणे शक्य झाले आहे. ज्या प्रमुख मराठी पत्रांचे आशय विश्लेषण केले आणि ज्या प्रमुख नेत्यांच्या मुलाखती घेतल्या त्यामधून प्रकट झालेली काही संशोधन परत्वे मांडता येतील.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये मराठी वृत्तपत्रांची बजावलेल्या भूमिकांचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करून काही ठळक निष्कर्ष समोर आलेले आहेत.

१. देशाच्या विविध भागामध्ये विखुरलेल्या महाराष्ट्र एकत्र एकसंध व संघटित करण्यामध्ये मराठी वृत्तपत्रांनी प्रभावी भूमिका पार पाडली आहे. त्यांच्या विचार जागरणातूनच नवा महाराष्ट्र उभा राहिला.

२. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या मराठवाडा विदर्भ या प्रदेशातील लोक आणि त्यांची संस्कृती ही मराठी भाषेचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यांना एकत्र आणणे ही काळाची गरज होती. हे ओळखून त्यादृष्टीने वृत्तपत्रांनी नवी जागृती केली.

३. त्या त्या प्रदेशामध्ये मराठी भाषा व संस्कृतीचे शोषण होत असे. निजामी राजवटीत मराठवाडा प्रदेशात चौफेर सांस्कृतिक आक्रमण होते असे अशा वेळी मराठवाडा विभागातील निजाम विजय मराठवाडा या पत्रांनी मराठी भाषेच्या दुरवस्थेवर प्रकाश टाकला. आनंद कृष्णा वाघमारे यांच्या मराठवाडा साप्ताहिकातील अग्रलेखांनी अभूतपूर्व जागृती घडवून आणली. त्यामुळे महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐक्य घडू शकले.

४. विविध प्रदेशात विखुरलेले मराठी भाषक सांस्कृतिक ऐक्यामुळे एकत्र आले. मराठी वृत्तपत्रांनी महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐक्य भक्कम करण्याचा प्रयत्न केला.

५. मराठी वृत्तपत्रे काळाच्या पुढे जाऊन दूरदृष्टीने समस्यांकडे पाहत होती. त्यामुळे त्यांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला.

६. सह्याद्रीचे वारे हे ऐक्याच्या दिशेने वाहत आहे हे वृत्तपत्रांनी अचूकपणे ओळखून व त्या दिशेने दमदार पावले टाकली.

७. वृत्तपत्रांनी आपल्या बातम्या, स्फुटलेखन, अग्रलेख आणि विशेष लेखांद्वारे अभूतपूर्व जागृती घडवून आणली. आचार्य अत्रे यांनी तर वृत्तपत्रातून केवळ प्रयत्न केला नाही तर त्यांनी हा प्रश्नच ऐरणीवर आणला.

८. महाराष्ट्राच्या शिवशक्तीची सिंहगर्जना करून 'मराठा' या पत्राने संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे रणशिंग फुंकले व पुढे महाराष्ट्र उभा राहिला.

९. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये राजकीय पक्ष, दबाव गट व विविध स्थानिक नेते यापेक्षाही वृत्तपत्रे अधिक प्रभावी ठरली. संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश अशा प्रकारे मराठी वृत्तपत्रांनी आणला हे विसरता कामा नये.

## ५.४ कामगिरीचे मूल्यमापन

वृत्तपत्राच्या भूमिकेबद्दल विचार करावयाचा झाला तर दैनिक 'मराठा' या वृत्तपत्राचा खास उल्लेख केला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र एकभाषिक मराठी राज्याची चळवळ सुरू झाली त्या वेळी 'मराठा' हे वृत्तपत्र अस्तित्वात नव्हते. चळवळीसाठी म्हणूनच मराठा वृत्तपत्राची उभारणी झाली हे आवर्जून नमूद करावे लागेल.

१ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. त्याबद्दल 'मराठा' दैनिकाची कृतकृत्यता व्यक्त करणे, हे स्वाभाविक होते. वर्धापनदिनाच्या अंकात असे म्हटले होते. ज्या उद्देशासाठी दैनिक 'मराठा'चा जन्म झाला, तो उद्देश मोठ्या अंशाने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रयत्नाने आणि साडेतीन कोटी मराठी जनतेच्या पराक्रमाने अखेर साध्य झाला आणि मुंबई राजधानी असलेले महाराष्ट्राचे नवे राज्य भारतीय संघराज्यात अवतीर्ण झाले. कॉंग्रेसने नाक मुठीत धरून द्विभाषिक राज्याला शेवटी मूठमाती दिली. कॉंग्रेसचा असा भयानक पराभव आणि मराठी जनतेचा असा

अभूतपूर्व विजय आजपर्यंत कधी झाला नव्हता. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात ’दैनिक मराठा’ तळहातावर शिर घेऊन लढला हे सर्वांना माहीतच आहे. म्हणून महाराष्ट्र (राज्य) निर्माण झालेले बघून त्याच्या हर्षाला आणि कृतार्थतेला काही सीमाच उरली नाही. महाराष्ट्रातील जनतेची खरी सिंहगर्जना केवळ दैनिक ‘मराठा’च्या स्तंभातून प्रकट होते. बाकीची मराठी दैनिके आणि पत्रेही जरी मराठी भाषेत होत असली तरी त्यांचा पिंड, बाणा आणि जडणघडण मराठी नाही हे उघड आहे.. संयुक्त महाराष्ट्र समितीचे लढाऊ आणि विधायक राजकारण महाराष्ट्रासमोर निर्भयपणे मांडणारे मराठी जनतेचे एकमेव पत्र म्हणजे ’दैनिक मराठा’ ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे.. मुंबईचा नि महाराष्ट्राचा प्रश्न जसा सत्याग्रहाने सुटला, त्याप्रमाणे सीमेचा प्रश्न सुद्धा सत्याग्रहाने सुटणार हा समितीचा सिद्धांत आहे. त्या सिद्धांताची गगनभेदी गर्जना ‘दैनिक मराठा’ करीत राहणार. त्याचबरोबर समितीने तयार केलेला समाजवादी कार्यक्रम तपशिलासह मराठी जनतेला समजावून सांगण्याचे कार्य ’मराठा’ला यापुढे करावे लागणार आहे... काँग्रेस पक्षाचे लवकरात लवकर सत्तेवरून उच्चाटन करून कष्टकरी जनतेच्या ऐक्यावर आधारलेले समितीचे लोकशाही सरकार महाराष्ट्रात आणल्याखेरीज मराठी जनतेचे कल्याण, विकास किंवा प्रगती होणार नाही आणि भारतात महाराष्ट्राची मान उंच होणार नाही, अशी ‘दैनिक मराठा’ची अढळ श्रद्धा आहे. (मराठा १६ नोव्हेंबर १९६०) ‘मराठा’ने व्यक्त केलेल्या भावना त्याच्या उद्दिष्टाशी सुसंगतच होत्या. परंतु त्यामध्ये भविष्याविषयीचा भोळा भावच अधिक आढळतो. दै. ‘मराठा’ या वृत्तपत्राचे संपादक आचार्य अत्रे यांचे अष्टपैलू कर्तृत्व आणि त्यांची प्रेरणा अनेकदा प्रक्षोभक असणारी भाषाशैली हे एक मोठे हत्यार होते. उपहासाचे व विनोदाचे हत्यार त्यांनी अतिशय समर्थपणे वापरले हे त्यामुळे

मराठा हे दैनिक संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे एक हत्यार म्हणूनच राहिले होते. देशातील व इतर कोणत्याही जनआंदोलनात मराठा वृत्तपत्राने जशी भागीदारी केली त्या दर्जाची व त्या तीव्रतेची कामगिरी इतर कोणत्याही वृत्तपत्राने बजावलेली संशोधनातून आढळत नाही.

'मराठा' वृत्तपत्र हे एक आदर्श पत्र व्हावे असा आचार्य अत्रे यांना सतत ध्यास होता. त्यामुळेच जनतेच्या मनात मराठा वृत्तपत्राने एक वेगळी प्रतिमा निर्माण केली. मराठा बातम्यांसाठी वाचला जात नसे, अधूनमधून संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनाबाबत घडणाऱ्या घटनेवर अत्रे काय म्हणतात हे जाणून घेण्यासाठी लोक 'मराठा'चे अंक घेत. मराठीतील पहिले मतपत्र होण्याचा मान अत्र्यांनी आपल्या लेखणीच्या जोरावर 'मराठा' वृत्तपत्राला मिळवून दिला.

कामगार वर्गाशीही अत्र्यांचे संबंध जवळकीचे होते. त्यामुळे मराठाच्या सर्व कामगारांच्या मनात अत्रेविषयी अपार प्रेम होते. 'मराठा'चं कार्यालय ही कामाची कचेरी न राहता ते प्रेमाने जोडलेल्या एका कुटुंबातील माणसाचं जणू एक राहतच घर बनलं होतं.

महाराष्ट्राला विरोध करणाऱ्या शत्रूला मात्र अत्रे यांच्याजवळ क्षमा नव्हती. महाराष्ट्राच्या सेवे शिवाय इतर दुसरा महान गुण ओळखत नव्हते. त्यांच्या हातून जरी काही चुका घडल्या काही अपराध घडले तरी पण त्या चुका एका महापुरुषांच्या आहेत याची जाणीव जनसामान्यांना होती. त्यांच्या लिखाणातून खळबळून वाहणारा महाराष्ट्र प्रेमाचा लोंढा इतका शुद्ध आणि निर्मळ होता की, त्यांच्या चुका त्यांचे अपराध नजरेआड करून जनतेने अपार प्रेम देऊन प्रेमानेच त्यांना डोक्यावर घेतले. इतका लोभ कुठल्याही पत्रकाराच्या वाट्याला कदाचित आला नसेल.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे संदर्भ उत्कृष्ट उदाहरण आचार्य अत्रे यांच्या दैनिक

मराठीमधील अग्रलेखांचे देता येतील. चळवळीला विरोध करणाऱ्या विषयी लिहिताना आचार्य अत्रे यांच्याप्रमाणे वा.रा.कोठारी यांचा लेखनालाही धार आलेली होती असे दिसते. आचार्य अत्रे यांच्याप्रमाणे कोठारी यांचे लेखन घणाघाती वार करणारे कदाचित नसेल पण त्यांच्या लेखणीने विवेकाचे व औचित्याचे भान कोठेही सोडलेले नाही. याची प्रकर्षाने नोंद द्यावी लागते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा यांचा जोरदार पुरस्कार करताना वा.रा.कोठारी यांनी आपल्या लेखणीने सत्तारूढ काँग्रेस पक्षाचे वाभाडे काढले. सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, माधवराव बागल, आचर्य अत्रे आणि स्वतः वालचंद कोठारी या अपक्ष पंचायतांनी संयुक्त महाराष्ट्र समिती  परस्परांशी सतत होणाऱ्या स्पर्धा करणाऱ्या राजकीय पक्षांना आवरण्याचा आपल्या परीने प्रयत्न केलेला आहे.

राज्यपुनर्रचना आयोग मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी धुडकावून लावील ही शक्यता दिसू लागली होती. मुंबईसह महाराष्ट्राच्या निर्मितीचा प्रश्न सोडविण्याची मूलतः जबाबदारी सत्तारूढ काँग्रेस पक्षाची होती. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांचे बोटचेपेपणा व धरसोडीचे धोरण आणि काँग्रेस श्रेष्ठींचा या मागणीला असलेला प्रखर विरोध लक्षात घेता विरोधी पक्षांनी एकजूट करून, प्रयत्न केले तरच हा प्रश्न सुटण्याची शक्यता होती हे वा.रा. कोठारींनी पुरेपूर ओळखून होते. म्हणून तर त्यांनी समितीतील घटक पक्षांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले.

१९५९ मध्ये वा.रा.कोठारी यांनी ‘शिवचरित्र’ हा ग्रंथ लिहिला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या स्फोटक आणि संघर्षपूर्ण वातावरणामध्ये महाराष्ट्रीयन जनतेचे प्रेरणास्थान असलेल्या शिवाजी महाराजांचे चरित्र लिहून मुंबईसह महाराष्ट्राचे स्वप्न साकार करावे या

मुख्य हेतूने ग्रंथलेखन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण हिंदुस्थानात स्वातंत्र्याची आणि स्वाभिमानाची ज्योत पेटवली. शिवाजी महाराजांची हीच प्रेरणा संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील नेत्यांची, जनतेने व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने घ्यावी या मुख्य भूमिकेतून हे ग्रंथलिखाण करून चळवळीस प्रोत्साहित ठेवण्याची कर्तव्यपूर्ती केली आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी आर्थिक ताण सहन करून तसेच अनेक मनाविरुद्ध घटना घडूनसुद्धा त्यांनी वैचारिक आणि सक्रिय योगदान दिले म्हणूनच त्यांच्या कार्याची नोंद म्हणावी तशी घेण्यात आलेली नाही.

भारतातील वृत्तपत्राच्या इतिहासात 'केसरी' वृत्तपत्राचे स्थान अनन्यसाधारण आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात गायकवाड वाडा व 'केसरी'चे कार्यालय हे या चळवळीचे कार्यालयच बनलेले होते.

'दैनिक पुढारी' या वृत्तपत्राचे मालक संपादक गणपत गोविंदराव जाधव तथा ग. गो. जाधव यांनी ही अखंड भारताचेच समर्थन केले होते. छोटे छोटे प्रदेश स्वतःला स्वतंत्र मानू लागले तर स्वतंत्र भारताचे अखंडत्व धोक्यात येईल व फुटीर शक्ती प्रभावी बनून देशाची शकले होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली होती. अखंडत्वाचे तत्त्व जाणूनच म्हणून त्यांनी सार्वभौम संस्थानाही विरोध केलेला होता. देशातील काही संस्थानांनी आपण सार्वभौम असल्याचे जाहीर करताच त्यांची भूमिका कशी देशहिताच्या आड येत आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. मुंबई राज्याच्या पुनर्रचनेच्या वेळी ही त्यांनी मुंबई महाराष्ट्रातच सामील व्हावे अशी भूमिका घेतलेली होती. या काळात महाराष्ट्रात अनेक राजकीय आंदोलने झाली. या आंदोलनाच्या प्रक्षुब्ध काळात गणपतराव जाधवांनी आपल्या 'पुढारी' दैनिकात अत्यंत सावधानतेने, संयमाने व जबाबदारीने

लेखन केले. त्यांनी आपल्या लिखाणाने जनतेची आणि नेत्यांचीही मने भडकावली नाहीत. त्यांनी संयमाने सर्वांना लेखणीतून मार्गदर्शन केले. कोणत्याही पक्षाचा अथवा व्यक्तीचा मिंधेपणा न स्वीकारता पत्करला नाही. त्यांनी स्वतंत्र धोरणाने आणि अस्मितेने आपल्या दैनिकाचे संपादन केले. आपल्या संपूर्ण वृत्तपत्रीय जीवनात गणपतराव जाधव यांनी न्यायाधीशांच्या निःपक्षपाती भूमिकेचेच मराठी वृत्तपत्रातून दर्शन घडविले. कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता त्यांनी स्वाभिमान राखून ताठ मानेने आणि या भूमिकेला शोभणाऱ्या नम्रपणाने त्यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायात आपली वेगळी आदर्श प्रतिमा निर्माण केली. त्यांचे राजकीय महत्त्व मोठे आहे. त्यांना राजकीय धडे भास्करराव जाधव, दीनानाथ जवळकर, काकासाहेब लिमये कै. रामचंद्र जाधव अशा वरिष्ठांकडून मिळाले. त्यामुळेच त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात आपली स्वतंत्र ठाम भूमिका मांडली. त्यामुळेच समसमान ध्येय आणि उद्दिष्टे सफल होण्यासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. ही जाणीव मराठी माणसामध्ये निर्माण होऊन तो एकत्र येऊन संघर्ष करण्यासाठी सक्रिय झाला. मराठी मानसाला उडण्यासाठी त्यांच्या पंखातील बळ हे वृत्तपत्रांनीच दिले. समाजातील सर्व थरामध्ये विकासाचे, प्रगतीचे आणि एकतेचे विचारमंथन होऊ लागले आणि याच विचारमंथनातून एक नवा प्रगतीचा व स्वावलंबनाचा प्रभावी मार्ग विकसित झाला. त्यातून महाराष्ट्र जीवनाची एक प्रभावी एकसंध बैठक प्राप्त झाली आणि तीच प्रगतीची गरुडझेप घेण्यासाठी पोषक ठरली.

ग. गो. जाधव यांच्यावर महात्मा गांधी आणि काँग्रेस पक्षाचा निश्चितच प्रभाव होता. असे असूनही त्यांना काँग्रेसची सर्वच धोरणे मान्य नव्हती. इतर कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा त्यांना काँग्रेस जवळची वाटत होती. त्यामुळेच त्यांनी संयुक्त महाराष्ट्र

चळवळीत भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण या दोन्ही बहुजनातील नेत्यांच्या मागे खंबीरपणे उभा राहण्याची भूमिका घेतलेली होती. त्यांनी काँग्रेसच्या चांगल्या निर्णयाचे त्यांनी मोकळ्या मनाने कौतुक केले तर दुसरीकडे जे अनिष्ट आहे त्यावर सडकून टीकाही केली. ग.गो.जाधव हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सतत कार्यरत राहून त्यांनी चळवळीमधून महाराष्ट्राची बाजू परखडपणे मांडलेली होती.

### ५.५ नवी सैद्धांतिक मांडणी

वृत्तपत्रामधून होणारे प्रबोधन आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या चर्चा त्या प्रामुख्याने चार मूलभूत तत्त्वावर आधारलेल्या असतात. त्यामुळे माहिती देणे, विश्लेषण करणे, शिक्षण देणे आणि मनोरंजन करणे ही वृत्तपत्रांची मूलभूत कर्तव्ये ठरतात. मराठी वृत्तपत्रांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर पसरलेल्या मराठी वाचकांना संयुक्त महाराष्ट्र एकत्र येण्याची गरज, आवश्यकता व त्याचे फायदे प्रतिपादन केले. उद्दिष्टांमध्ये सफल होण्यासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. ही जाणीव मराठी वृत्तपत्राने समर्थपणे निर्माण होऊन एकत्र येऊन संघर्ष करण्यासाठी सक्रिय झाला.

मराठी वृत्तपत्रांनी आपल्या कार्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळीबाबत शास्त्रीय चिकित्सक दृष्टिकोन विकसित केला. वृत्तपत्रांनी चळवळीच्या यशस्वी होण्यासाठी तिच्या मार्गात कोणते अडथळे आहेत व ते कसे दूर करता येतील याबाबत विश्लेषण केले. द्विभाषिक मुंबई राज्याचे नेतृत्व करणारेच मोरारजी देसाई हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या मार्गामध्ये अडथळा होते ही बाब लक्षात येताच मराठी वृत्तपत्रामध्ये अग्रणी असलेल्या प्रमुख वृत्तपत्रांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. त्यामुळे मोरारजी देसाई यांचा दुटप्पीपणा समाजासमोर आला.

मोरारजी देसाई यांच्याप्रमाणेच भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे मनही महाराष्ट्राबाबत प्रतिकूल आहे, हे लक्षात येताच प्रत्यक्ष त्यांच्यावर व त्यांचे समर्थन करणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्यावरही टीका करण्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी मागेपुढे पाहिले नाही. अशा प्रकारे चळवळीतील आपला मित्र व शत्रू कोण आहेत, याबाबत मूल्यभेद कसा असला पाहिजे हे ओळखून वृत्तपत्रांनी आपल्या विचारयुद्धाची मांडणी केली. लढा जेव्हा ऐरणीवर आला तेव्हा तो अधिक यशस्वी करण्यासाठी वृत्तपत्रांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. वृत्तपत्राचे हे सर्व मन्वंतर घडून आले ते केवळ आचार्य प्र. के. अत्रे यांच्यासारख्या धुरंधर संपादकाने आपल्या लेखणीचे शस्त्र बनविले त्यामुळेच आचार्य अत्रे यांनी प्रभावी विश्लेषण करत त्यांनी लढ्याच्या बाजूने प्रचंड जनमत वळविले. त्यांचा बिनतोड युक्तिवाद हा लढ्याला फलदायी बनविणारा ठरला यात शंका घेण्याचे कारणच नाही.

सत्याचे विश्लेषण करून संयुक्त महाराष्ट्राचा लढा नेटाने पुढे नेण्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी यथार्थ दिग्दर्शन केले. त्यांच्या सडेतोड व परखड अशा मतदर्शनामुळे चळवळीचे विरोधक गलितगात्र झाले. अनेक विरोधकांनी आपला मतप्रवाह बदलून चळवळीचा जोर पाहून चळवळीमध्ये हिरिरीने भाग घेतले त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राच्या मार्गातील अडसर व अडथळे दूर होऊन या लढ्याने चळवळीचा मार्ग सुकर केला. प्रस्तुत लोकलढा हा जर खरोखर कोणामुळे यशस्वी झाला तर त्याचे उत्तर असेल तो वृत्तपत्रांमुळे हे विसरता कामा नये. लेखणीच्या जबरदस्त फटक्याने विरोधक नामोहरम झाले. त्यांच्या विरोधाची धार बोथट झाली. त्यांच्या मनात चळवळीविषयी सकारात्मक भावना निर्माण झाली.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामधील मराठी भाषक वृत्तपत्रांचे कार्य लक्षात घेता असे दिसून येते की, समाजाचे प्रबोधन करणे हा या पत्रांच्या कार्याचा गाभा होता. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा गतीने पुढे नेत असताना लोकशिक्षण देण्याचे आणि लढ्याचा रेटा कायम ठेवण्याचे कार्य या वृत्तपत्रांनी करावे लागले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला यथायोग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य आचार्य अत्रे यांच्यासारख्या धुरंधर संपादकाने केले. लढा कसा पुढे न्यायचा, वेळ पडली तर तो कुठे थांबवायचा व पुन्हा वायू वेगाने कसा पुऐ न्यायचा हे सर्व वृत्तपत्रांनी अचूकपणे ओळखले होते. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीला वेगाने गती मिळाली ही बाब प्रामुख्याने विचारपूर्वक मांडणी करून आपणास लक्षात घ्यावी लागते. प्रत्येक दिवशी नवनवीन कल्पना मांडून त्या सामान्य जनतेला कळतील आणि भावतील याची दक्षता घेतली. वृत्तपत्रांनी आपल्या प्रभावशाली विचार जागरांमधून नवे मन्वंतर घडवून आणले. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला अभूतपूर्व सर्व स्तरातून पाठिंबा मिळाला.

वृत्तपत्रांनी समग्र महाराष्ट्र जीवन विचारपूर्वक ढवळून काढले वृत्तपत्रांच्या विचारमंथनातूनच संयुक्त महाराष्ट्राचे नवनीत बाहेर पडले. संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे सर्व विचारपर्व हे विवेकावर आधारलेले होते. वर्तमानपत्रांनी घेतलेली भूमिका ही सक्रिय लोकसहभागास प्रेरक ठरली.

लढ्यातील न्याय बाजू कोणाची आणि कोणती आहे, हे बहुजन समाजाला समजावून सांगण्याचे संपूर्ण श्रेय हे मराठी वृत्तपत्रांनाच द्यावे लागते. सर्व वृत्तपत्रांनी एकतेच्या भावनेने निर्णायक पाऊल टाकण्यासाठी अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेतला. चळवळीतील नेत्यांना प्रखर आणि तेवढ्याच प्रभावशाली असा प्रगतीचा मार्ग दाखविला.

गतकालीन वैभवशाली महाराष्ट्र पुन्हा उभा रहावा आणि राष्ट्राच्या विकासप्रक्रियेत सतत अग्रेसर म्हणजे सर्वांत पुढे कसा राहील याचाच विचार मराठी वृत्तपत्रांनी सदैव केला. त्यांच्या ज्ञानयज्ञातूनच उभा राहिलेल्या लोकचळवळीचा महान यज्ञामुळेच महाराष्ट्राच्या प्रगतीच्या भावी दिशा उजळल्या. नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एक प्रकारचा निर्णायक व ठोस असा सामुदायिक पुरुषार्थ अभिप्रेत असतो तो पुरुषार्थ जागृत करण्याचे ऐतिहासिक कार्य मराठी वृत्तपत्रांनी केले असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र एकसंधपणे उभा राहिल्याने त्यांच्या सामुदायिक पुरुषार्थातून त्यांची राजकीय संस्कृती तेवढीच प्रकट होईल असा वृत्तपत्रांना आत्मविश्वास होता.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी वृत्तपत्रांची भूमिकाही अशा प्रकारे तेवढीच निर्णायक आणि पथदर्शक ठरली. यामधूनच वृत्तपत्रांच्या चळवळीसाठी संपादकांची साधना प्रकट होते. साधना त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेतून प्रकट झाली. सर्वच वृत्तपत्रांनी सारखीच भूमिका घेतली असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये थोडासा अंशात्मक फरक असला तरी बहुतेक वृत्तपत्रांचा कल हा संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने होता, असेच ठामपणे म्हणता येईल.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काही धुरीणांच्या मुलाखतीही घेण्यात आल्या आहेत. या सर्व मुलाखतीवरून असे दिसून येते की, वृत्तपत्रांनी काळानुरूप संयुक्त महाराष्ट्राचा लढा यशस्वी करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. त्यांच्या भूमिकांमध्ये एकाच प्रकारची सुसंगती दिसून येते. चळवळीचा लढा ऐरणीवर आला असताना त्याला पोषक मार्गदर्शन करून तो पुढे नेण्याचे कार्य मराठी वृत्तपत्रांनी केले आहे, हे येथे प्रामुख्याने नमूद करावेच लागेल.

## ५.६ उपसंहार

प्रस्तुत प्रबंधामधून करण्यात आलेली सर्व मांडणी ही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील वृत्तपत्रांची भूमिका स्पष्ट करणारी आहे. 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून ते 'मराठा'चे संपादक आचार्य प्र. के. अत्रे यांच्यापर्यंत अनेक संपादकांनी महाराष्ट्र संस्कृतीची जडणघडण करण्याचा प्रयत्न केला. १८३२ ते १८८० हा प्रारंभीचा ५० वर्षांचा काळच समाजसुधारणा, पत्रकारितेचा होता. म्हणूनच या काळात 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश' अशा वृत्तपत्रांनी सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला. १८८१ मध्ये लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांनी 'केसरी' वृत्तपत्राचा प्रारंभ केला.

लोकमान्य टिळकांचा राजकीय सुधारणेवर तर गोपाळ गणेश आगरकरांचा सामाजिक सुधारणांवर भर होता. टिळक युगामधील वृत्तपत्रांचे कार्य हे समाजप्रबोधनावर नव्हे तर राजकीय जागृतीवर आधारलेले होते. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही चतुःसूत्री लोकमान्य टिळकांनी मांडली आणि त्यातूनच राजकीय जागृतीस प्रारंभ झाला. सर्व मराठीभाषकांचे संघटन करण्याची गरज टिळकांनी प्रतिपादन केली होती. त्यांच्या या विचारामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीची बीजे आढळून येतात. लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर तसेच पुढील काळात ग. वि. केतकर, जयंतराव टिळक इत्यादी केसरीच्या संपादकांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विचार सतत तेवत ठेवला. त्यामुळेच त्यांच्या विचारमंथनातून संयुक्त महाराष्ट्राचा मार्ग अधिक प्रकाशमान झाला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मराठीभाषकांनी एकत्र यावे हा विचार सर्व प्रथम मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या शहरांतील वृत्तपत्रांनी पहिल्यांदा उचलून

धरला. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळ मिळाले.

'पुढारी', 'प्रभात' त्याचप्रमाणे अन्य वृत्तपत्रांचे कार्यही पूरक व पोषक ठरल्याचे दिसून येते. मुख्य महानगरातील वृत्तपत्रांना पोषक अशीच भूमिका विभागीय आणि जिल्हास्तरीय वृत्तपत्रांनी घेतलेली होती. सर्व वर्तमानपत्रांमधील लेख, अग्रलेख आणि वार्ता या लढ्यास पोषक ठरल्या. ज्यायोगे या लढ्यामधील सहभागी कार्यकर्त्यांना नवी दृष्टी मिळाली/लाभली. स्थल, कालपरत्वे एखादा लढा सुनिश्चितपणे पुढे नेण्यासाठी दूर दृष्टी विचार व दृष्टिकोन लागतो. प्रभात, नवयुग या साप्ताहिकांमधून आणि नंतर 'मराठा' या दैनिकातून आचार्य प्र. के. अत्रे यांनी विचारपूर्वक संयुक्त महाराष्ट्र चळवळीस उचलून धरले. त्यांच्या चिंतन व मंथनातून एक नवी प्रकाश वाट प्रकट झाली आणि ती वाट इतर वृत्तपत्रांनीही स्वीकारली. पुढारी असो की, मराठा या वृत्तपत्रांनी त्यांचा ध्येयवाद उचलून धरला आणि महाराष्ट्रामध्ये सर्वदूर पसरलेला मराठीभाषक पट्टा हा एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. मराठी वृत्तपत्रांनी हा लढा ऐरणीवर आला असताना, त्याला निर्णायक यश प्राप्त व्हावे म्हणून नवी दिशा आणि बैठक प्राप्त करून दिली. १९५० ते १९६० या शेवटच्या दशकाच्या १० वर्षांच्या कालखंडामध्ये मराठी वृत्तपत्रांना अधिक निर्णायक आणि ठाम भूमिका घ्यावी लागली. त्यामुळे मराठी वृत्तपत्रांना आपल्या सर्व क्षमतांचा वापर करून निर्णायक यश संपादन करणे शक्य झाले हे येथे प्रामुख्याने नमूद केलेच पाहिजे.

वृत्तपत्रांनी केलेले कार्य हे महाराष्ट्राचे राजकीय, आर्थिक, सामाजिक व संस्कृतीचे ऐक्य टिकविण्यासाठी महाराष्ट्र संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी अत्यंत पोषक ठरले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी सर्व समाज नक्कीच ऐक्याने एकरूप आणि समरस होईल यावर सर्व मराठी वृत्तपत्रांचा विश्वास होता. त्यामुळे मराठी वृत्तपत्रे अशा

ऐक्यासाठीच कटिबद्ध झाली होती. त्यांचे वैचारिक नेतृत्व हे आचार्य अत्रे यांच्यासारख्या अष्टपैलू संपादकाने केले. त्यामुळेच या लढ्याचे यश अधिक प्रकाशमान झाले. या प्रबंधातील सर्व मांडणीत पुढील तीन सूत्रानुसार मांड्ली आहे.

१. मराठी वृत्तपत्रांनी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळेच इतिहासाच्या प्रवाहाला वळण देऊ शकली.
२. नव्या युगामध्ये महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्यासाठी महाराष्ट्राचे प्रादेशिक ऐक्य आवश्यक आहे हे त्यांनी नमूद केले.
३. लढा ऐरवणीव आता असता वृत्तपत्रांनी प्रभावी जनमत संघटन करून लोकशिक्षणाचा मार्ग जोपासला.

ही तीन सूत्रे या प्रबंधाच्या सखोल अभ्यासातून पुढे आली आहेत. हेच या अभ्यासाचे सार होय. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात मराठी वृत्तपत्रांची कामगिरी प्रशंसनीय आणि अतुलनीय होती यात शंकाच नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी प्रेरक व पोषक असा सामुदायिक पुरुषार्थ हा मराठी वृत्तपत्रांनी जागृत केला. त्यानीच हा नंदादीप तेवत राहिला. त्यांच्या प्रकाशातच संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश पुढे आला आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य हे नूतन राज्य स्थापन झाले.

## परिशिष्टे क्र. १

## प्रश्नावली

मुलाखतकाराचे नाव :– ——————————————————————

पत्ता :–

जन्मतारीख :–

लिंग :–

व्यवसाय :–

मुलाखतीचा ठिकाण :–

दिनांक :–

४. आपण संयुक्त महाराष्ट्र चळवळीविषयी परिचित आहात काय? असल्यास चळवळीकडे वळण्याची प्रेरणा कशी मिळाली?

५. संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर कोणकोणत्या वृत्तपत्रांचा प्रभाव होता?

६. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विचारसरणीविरोधी असलेल्या वृत्तपत्रांच्या भूमिकेबद्दल आपले मत काय?

७. संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर वृत्तपत्रांचा कसा प्रभाव होता?

८. संयुक्त महाराष्ट्र चळवळी संदर्भात स्थानिक वृत्तपत्रांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल आपले मत काय?

९. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात आंदोलन करण्याची अनोखी पद्धत कशी होती? आपल्याकडील एखाद्या घटनेचे उदाहरण

१०. वृत्तपत्रांच्या भूमिकेमुळे समाजात जनजागृती निर्माण झाली. त्यामुळे संयुक्त

महाराष्ट्र चळवळीला बळ मिळाले असे आपणास वाटते काय?

११. मराठी वृत्तपत्रांच्या भूमिकेमुळे परिसरातील जनता संयुक्त महाराष्ट्र चळवळीकडे ओढली गेली आणि चळवळ यशस्वी झाली याचे श्रेय आपण कोणाला द्याल?

१२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या संदर्भात आज मागे वळून पाहिल्यावर आपणास काय वाटते?

१३. संयुक्त महाराष्ट्र चळवळ केवळ वर्तमानपत्रांमुळे यशस्वी झाली, असे आपणास वाटते काय?

१४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची दखल सरकार पातळीवर वेळोवळी घेतली गेली असे आपणाास वाटते काय?

१५. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या संदर्भातील आपल्या आठवणी जतन, किंवा लिहून ठेवल्या आहेत काय?

१६. प्राप्त परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्र चळवळ परिपूर्ण झाली, असे आपणास वाटते काय?

१७. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उद्देश पूर्णतः सफल न होण्यामागची कारणे काय आहेत? याबद्दल आपले मत काय?

## परिशिष्टे क्र. २

नाव : अनंत विष्णू आजगावकर

पत्ता : मु. पो. उत्तूर ता. आजरा, जि.,कोल्हापूर.

जन्मतारीख : १० सप्टेंबर १९३०

लिंग : पुरुष

व्यवसाय : शैक्षणिक कार्य

मुलाखतीचा ठिकाण : डॉ. जे. पी. नाईक महाविद्यालय, उत्तूर, ता. आजरा जि. कोल्हापूर

मुलाखतीचा दिनांक : १३/०६/२०१२

वेळ : दुपारी १२ वाजता

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक अनंत विष्णू आजगावकर यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील उत्तूर या खेडेगावात १० सप्टेंबर १९३० रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती बेताचीच होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण उत्तूर (ता. आजरा) आणि पिंपळगाव (ता. भुदरगड) येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण गडहिंग्लज व महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथे झाले. शिक्षण घेत असताना शाळाकरी वयात भेटलेल्या शहापूरकर आणि गोंधळी गुरुजीमुळे त्यांच्यावर साने गुरुजींचे विचार व राष्ट्र सेवादलाचे संस्कार झाले. महाविद्यालयीन शिक्षण ते कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात घेत असताना जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, बॅ. नाथ पै, यांच्यासारख्या समाजवादी नेत्यांच्या विचाराने प्रभावित होऊन राष्ट्र सेवादलात

सहभागी झाले. तो काळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळालाच पाहिजे या चळवळीने भारावलेला होता. या काळात विद्यार्थी व कामगार संघटनांशी संपर्क आला. त्या माध्यमातून कार्य करीत असताना त्यांना कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी संघाचे सचिवपद मिळाले. ते त्यांनी उत्तमरीत्या सांभाळले. कायद्याचे शिक्षण घेऊन वकील व्हावे, अशी घरच्या लोकांची तीव्र इच्छा असूनही राष्ट्र सेवादल व आंतरभारतीच्या प्रभावामुळे मी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत ओढला गेलो.

श्री. अनंतराव आजगावकर हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत पूर्णपणे स्वतःला झोकून दिलेले एक व्यक्तिमत्त्व होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ म्हणजे एक झंझावात होता. मोर्चे, निदर्शने, सत्याग्रह, संप, हरताळ, प्रभातफेऱ्या, कोपरासभा या माध्यमांतून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी रेटत होते. त्या काळात जनतेचा सहभाग हा अभूतपूर्व असा होता. या चळवळीमध्ये कोल्हापूर जिल्ह्याचा मोठा सहभाग होता. आचार्य प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी, क्रांतिसिंह नाना पाटील, भाई माधवराव बागल, कॉ. अमृत डांगे, दत्ता पाटील, नाथ पै. डॉ. नरवणे या नेत्यांच्या परिसरात सारख्या सभा चालू असत. त्यामुळे या सभांची माहिती आपल्या पंचक्रोशीत देणे, तसेच जनतेने त्यात सहभागी होण्यासाठी प्रयत्न करणे. कोल्हापूर जिल्ह्यात आचार्य अत्रे यांचे 'मराठा' वृत्तपत्र, तसेच वा. रा. कोठारीचे 'प्रभात', गो. ग. जाधव यांचे 'पुढारी' त्याचप्रमाणे इतर जिल्हावृत्ते यांचे गावागावांतून सामूहिक वाचर करणे व चळवळी संदर्भातील इतर भागातील घडामोडी जाणून घेणे, इतर जनतेला माहिती देणे. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी संदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी शाहीर अण्णाभाऊ साठे तसेच अमर शेख व सहकारी शाहिरांच्या आपल्या परिसरात कलापथकांचे आयोजन

करून कोल्हापूर जिल्ह्यात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जनजागृती करण्याचे काम श्री. आजगावकर यांनी केले आहे.

३० नोव्हेंबर १९५७ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील अश्वारूढ पुतळ्याचे तत्कालीन देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते अनावरण होणार होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचा या कार्यक्रमाला विरोध होता. समितीचे म्हणणे एवढेच होते की, अगोदर शिवबांचा महाराष्ट्र मराठी राज्य करा मग होऊ द्या अनावरण, हीच भूमिका निदर्शने करून मांडण्यासाठी समितीचे लाखो कार्यकर्ते अगोदरपासूनच वाईजवळील पसरणी घाटात ठाण मांडून बसले होते. या निदर्शनासाठी श्री. आजगावकर कोल्हापूर जिल्ह्यातून सहभागी झाले होते. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर ते वाई हा सायकलवरून प्रचार करीत प्रवास केला होता.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे ते मंतरलेले दिवस होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी अगदी सर्वसामान्यातील सामान्य नागरिकाचा यात मोठ्या प्रमाणात सहभाग होता. जनतेच्या रेट्यामुळे काँग्रेस सरकारला या चळवळीपुढे झुकावे लागल्याचे ते सांगतात. ही जनजागृती निर्माण करण्यासाठी वृत्तपत्रांची खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली. विशेषतः आचार्य अत्रे यांचे दै. 'मराठा', तसेच वा. रा. कोठारीचे 'प्रभात' ही वृत्तपत्रे अग्रस्थानी होती. सद्यःस्थितीत या चळवळीचा उद्देश सफल झाला आहे असे वाटत असले तरी आजही सीमा भागातील जनता महाराष्ट्रात आली नाही, याचे शल्य आहे. या संवेदनशील प्रश्नावर कोणीही कसलेही राजकारण न आणता, दंगे, धोपे न करता सामोपचाराने हा प्रश्न सुटावा अशी अपेक्षा श्री. आजगावकर यांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्री. अनंतराव आजगावकर यांनी या चळवळीत घेतलेल्या सक्रिय सहभाग व दिलेल्या योगदानाबद्दल या चळवळीत त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

नाव : श्रीमती मृणाल केशव गोरे

पत्ता : केशव गोरे स्मारक, आरे रोड, गोरेगाव, मुंबई (पश्चिम)

जन्मतारीख : २४ जून १९२८

लिंग : स्त्री

व्यवसाय : सामाजिक व राजकीय कार्य

मुलाखतीचा ठिकाण : केशव गोरे स्मारक, आरे रोड, गोरेगाव, मुंबई (पश्चिम)

मुलाखतीचा दिनांक : १०/०२/२०१२

वेळ : सकाळी ११ वाजता.

शिस्तप्रिय व सुखवस्तू मोहिले कुटुंबात २४ जून १९२८ रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मृणालताई गोरे यांचा जन्म झाला. मृणालताईचे वडील मुंबईत नावाजलेल्या एल्फिस्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. सहा भावंडांपैकी तिघे डॉक्टर तर दोन इंजिनिअर होते. त्यामुळे मृणालताईनीही डॉक्टर व्हावे, अशी त्यांच्या कुटुंबाची इच्छा होती. त्या इच्छेप्रमाणे १९४७ ला केईएमला एमबीबीएसला त्यांनी प्रवेश घेतला. तो काळ स्वातंत्र्याच्या चळवळीने भारावलेला होता. मृणालताईमधील चळवळी मुलगी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. एस. एम. जोशी, मधू लिमये, भाऊसाहेब रानडे, डॉ. राममनोहर लोहिया, साने गुरुजी, आचार्य नरेंद्र देव, युसूफ मेहेर यांच्या भाषणांनी प्रभावित झालेल्या मृणालताईंनी वैद्यकीय शिक्षण सोडून राष्ट्र सेवादलाच्या माध्यमातून सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले. राष्ट्र सेवादलात कार्यरत असताना सेवा दलातील केशव ऊर्फ बंडू गोरे या तरुणाशी ओळख झाली व १९४८ला त्यांनी भिन्न जातीय विवाह केला.

स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचना व्हावी यासाठी पहिल्यापासून समाजवादी व कम्युनिष्ट पक्ष संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आघाडीवर होते. त्यामुळे मृणालताई यांचा सहभाग या चळवळीत होता. या काळात मोठमोठे मोर्चे निघत होते. एकीकडे शाहीर अमर शेख व अण्णा भाऊ साठे व त्यांचे सहकारी यांचे पोवाडे गाजत होते. दुसरीकडे जनतेच्या सत्तेची ज्योत जागती, गर्जा संयुक्त भारती... बहुत असोत सुंदर संपन्न की महाप्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा.... या गाण्यांच्या रेकॉर्डस सगळीकडे वाजत होत्या. ही गाणी ऐकताच लोक सभांना यायचे. या वेळी गोदूताई परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली, मृणालताई, अहिल्याबाई रांगणेकर, प्रेमा पुरब, प्रमिला दंडवते, तारा रेड्डी, सुंदर नवलकर; तसेच पुण्याच्या कमलताई भागवत, मालतीबाई तुळपुळे सहकारी महिला या चळवळीत महिला आंदोलनाचे नेतृत्व करीत होत्या. या चळवळीत केवळ पुणे, मुंबईच्याच महिला आंदोलनात नव्हत्या तर सातारा, कोल्हापूर, नाशिक, मराठवाडा, खान्देश, विदर्भ येथील महिलांचीही मोठी उपस्थिती होती. यात सर्वच स्तरांतील महिलांचा सहभाग होता.

शिवाजी पार्क हे तेव्हाचे सभांचे ठिकाण. आज यापैकी बहुतेक महिला हयात नाहीत. पण मला या क्षणी अहिल्याताईची आठवण होते. त्यांचा खूप मोठा सहभाग यात असायचा. या सभांना लोक बोलवावे लागत नसे. अगदी महिला स्वतःहून येत. घरचं सांभाळून त्या आंदोलनासाठी वेळ काढत. या काळात जवळजवळ रोज कोठे न कुठे मोर्चे निघत. एका ठिकाणी मोर्चा निघाला असं कळलं की, लोक कोणत्या नेत्याची वाट न पाहता आपल्या भागात मोर्चा आयोजित करत. मला विशेष वाटते की, मुंबई मंत्रालयावर गेलेल्या मोर्चात अशा काही महिला होत्या की, राजाभाई टॉवर मंत्रालयात त्यांनी यापूर्वी

कधी पाहिलेला नव्हता. आपला महाराष्ट्र होतोय त्यात आपलाही सहभाग असला पाहिजे अशी एकमेव भावना सर्व महिलांच्या मनात निर्माण झाली होती. कोणाच्याही प्रभावाखाली त्या आल्या नव्हत्या ही मुंबई आमचीच आहे हे त्यांनी हृदयात साठविले होते.

नेहरू आपल्याला देत नाहीयेत पण मुंबई महाराष्ट्राचीच आहे, हा विचार मनामनांत होता. स.का.पाटील यांच्यावर रोष होताच. पण पंतप्रधान नेहरू खरं तर देशातले लोकप्रिय नेते असूनही या काळात मात्र त्यांच्याबद्दल कडवटपणा सगळ्यांच्या मनात होता. आचार्य अत्रे हे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील कळीचं व्यक्तिमत्त्व ते सभांमध्ये तर या दोन्ही नेत्यांची ऐकी की तैसी करत होतेच पण या चळवळीत जनजागृतीची महत्त्वाची भूमिका बजावणारे दै. 'मराठा' या वृत्तपत्रातून त्यांनी अवघ्या मुंबईला एकत्र करण्याचे मोठे कार्य केले. आपल्या या वृत्तपत्रातून ते जनतेला आवाहन करत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, तुमच्या मुलांसाठी, आपल्या पुढच्या पिढीला सुखाचे दिवस यावेत, यासाठी आपण आज लढायला हवं. अत्रेंच्या या आवाहनामुळे या लढ्याला महिलांचा सहभाग वाढतच होता. त्यामुळे 'मराठा' या दैनिकाने या आंदोलनात जनजागृती निर्माण करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मुंबई तर 'मराठा', 'नवा काळ' या वृत्तपत्रांखेरीज इतर कोणतेही वृत्तपत्र मला आठवत नाही.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ केवळ भाषावार प्रांतरचना एवढ्या एकाच मागणीसाठी होती असे वाटत नाही. मराठीभाषक राज्य व मुंबई हा या लढ्यामागील मुख्य उद्देश होता हे खरे आहे. परंतु हा लढा भांडवलशाहीविरोधी होता. इथे सर्व मारवाडी, गुजराती उद्योगपती असेल, त्यांनी भले भांडवल घातलेही असेल परंतु श्रम आमचेच होते.

खरी मुंबई आमचीच आहे. मुंबई श्रमजीवींच्या श्रमातून निर्माण झाली आहे. मुंबई आम्ही घडविली आहे. अशी भावना या लढ्यात होती. महिलांनी आमच्यावर मोठ्या प्रमाणात विश्वास टाकला होता. उद्या मोर्चा आहे एवढाच निरोप गेला की, दुसऱ्या दिवशी प्रचंड संख्येने महिला गोळा होत होत्या. याचे आज आश्चर्य वाटते. गिरणी कामगार संपावर गेले. संपकाळात बरेच कामगार गावाकडे गेले. हे लोण खेडोपाडीही पसरले. घरोघरी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची भूमिका समजली फार मोठी एकजूट तयार झाली.

गेल्या ५० वर्षात काँग्रेससारख्या कळसूत्री बाहुल्यांच्या हातात सत्ता गेली आहे व आमचा भ्रमनिराश झाला. लोकशाही समाजवादी महाराष्ट्र निर्माण करण्याचे आमचे स्वप्न अपुरेच राहिले आहे. तिकडे सीमा भागातील मराठी बांधव आजही हलाखीचे जीवन जगत आहेत. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात पुन्हा विभागणी व्हावी अशी तथाकथित बुद्धिवाद्यांचा सूर ऐकू येत आहे. मुंबईसह महाराष्ट्र टिकलाच पाहिजे. विदर्भाची अस्मिता वेगळी आहे. त्यांची तुलना मुंबईशी होऊ शकत नाही. मुंबई वेगळी करण्याचा यदाकदाचित पुन्हा प्रत्न झालाच तर पुन्हा एकदा लोक पेटून उठतील व पुन्हा एकदा त्याच जोमात मृणाल गोरे लढ्यात उतरतील यात शंकाच नाही.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | श्री. दिनू रणदिवे |
| पत्ता | : | घामट टेरेस, दादर पश्चिम मुंबई |
| जन्मतारीख | : | २४ जून १९२८ |
| लिंग | : | पुरुष |
| व्यवसाय | : | सामाजिक कार्य |
| मुलाखतीचा ठिकाण | : | घामट टेरेस, दादर पश्चिम मुंबई |
| मुलाखतीचा दिनांक | : | १५/०८/२०१२ |
| वेळ | : | सकाळी ११ वाजता |

ज्येष्ठ पत्रकार स्तंभलेखक दिनू रणदिवे यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील चिंचणी या खेडेगावी १५ सप्टेंबर १९२५ रोजी झाला. शालेय वयातच त्यांना वाचन व लिखाणाची सवय होती. तो काळ स्वातंत्र्याच्या चळवळीने भारलेला होता. त्यामुळे वयाच्या १७ व्या वर्षी १० वी ला असताना 'चलेजाव' आंदोलनात सक्रिय सहभाग होता. १९४२–४३च्या दरम्यान विदर्भातील आष्टी चिमूर या गावात गोळीबार होऊन १० ते १२ लोक मृत्युमुखी पडले होते. या घटनेचे 'हितवाद' या इंग्रजी वृत्तपत्रात ब्रिटिश सरकारच्या दबावाला न जुमानता या घटनेचे मोठया प्रमाणात लिखाण केले. ही घटनाच मी पत्रकार होण्यास कारणीभूत ठरली. आणि माझा 'चलेजाव' आंदोलनावरील पहिला लेख मुंबईतील 'धनुर्धारी' या साप्ताहिकात ऑगस्ट १९४३ प्रसिद्ध झाला.

१९४६ला स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या माध्यमातून भाषावार प्रांतरचना मिळावी अशी मागणी होत होतीच. पण या लढ्याला खऱ्या अर्थाने १९५५ च्या

सुमारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. जनतेला काय ती झिंग चढली होती. साऱ्या महाराष्ट्राला दोन चार दिवस नव्हे तर पाच वर्षे मुंबईसह महाराष्ट्र निर्माण करण्याची मागणी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडून मान्य करून घेण्यात आली. त्याचवेळी ही झिंग उतरली. आणि या राज्याच्या निर्मितीस विरोध करणारे नेहरू यांनीच अखेर मुंबईत येऊन या राज्याचे उद्‌घाटन केले. परंतु या अन्यायाचे निराकरण करून घेण्यासाठी मराठी भाषकांना आणि त्यांना साथ देणाऱ्याकाही इतर भाषकांना पाच वर्षे संघर्ष करावा लागला.

या घटनेचे मोठे उदाहरण म्हणजे २१ नोव्हेंबर १९५५ रोजी फोर्ट विभागात पोलिसांनी निदर्शकांवर अत्यंत निर्दयपणे केलेला गोळीबार व या गोळीबाराला घाबरणारे ते निदर्शक नव्हते. पोलिस निदर्शकावर गोळ्यांचा वर्षाव करत होत, तर निदर्शक त्याला दगडांनी उत्तर देत होते. अनेक निदर्शकांचे तेथे प्राण गेले, कित्येकांना पोलिसांनी जखमी करून टाकले. परंतु शेवटी अशी वेळ आली की, बंदूकधारी पोलिसांना तेथून पळ काढावा लागला. गर्द निळ्या गणवेशातील हाती बंदूक असलेले पोलिस माघारी पळत सुटले असल्याचे ते दृश्य आजही माझ्या डोळ्यांपुढून पुसले जात नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, या सहस्त्रमुखातून बाहेर पडणाऱ्या घोषणांनी तो सारा परिसर दुमदुमून गेला होता. या घोषणा एवढ्या जोरात होत्या की, असे वाटे की, या घोषणांच्या आवाजाच्या अपघातामुळे तेथील जुन्या बांधणीच्या दगडी इमारतींना तडे तर जाणार नाहीत ना.

निदर्शकांनाही तेथे मोठी किंमत मोजावी लागली. अवघ्या दोन–तीन तासांत पंधरा निदर्शकांचे प्राण पोलिसांनी घेतले. तेथे जखमी किती झाले याची मोजदादही झाली नाही.

हवी ती किंमत घ्या पण आम्ही संयुक्त महाराष्ट्र मिळविणारच, असा निर्धार निदर्शकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. या बहादूर निदर्शकांनी तेथे जणू इतिहासच लिहिला. म्हणूनच त्या स्थानावर हुतात्मा स्मारक उभे राहिले आहे.

अशा गंभीर परिस्थितीच्या वेळी नेत्यांची खरी कसोटी लागते. निदर्शकांनी बंदूकधारी पोलिसांना पळवून लावले असतानाच विधानसभेच्या अधिवेशनातून एस. एम. जोशी, डॉ. अमूल देसाई, ॲड नौशेर भरूचा हे तीन आमदार आपल्या इतर सहकाऱ्यांसह त्या निदर्शनाच्या ठिकाणी आले आणि हातवारे करून निदर्शकांना सीटीओवरून सागर किनाऱ्याकडे निघण्यास सांगितले. रणरणत्या उन्हात सुमारे दोन–तीन लाखांचा जमाव या प्रमुख नेत्यांनी गिरगाव चौपाटीवर नेला. या विराट सभेत मोठ्या संख्येने उपस्थिती होती ती गिरणी कामगारांची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांची कधी कधी वाटे की, ती निदर्शने आणि चौपाटीवरील विराट सभा कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनी पाहिली असावी आणि त्या वेळी डोक्यात मुद्रित झालेल्या दृश्यामुळे प्रेरणा मिळाल्याने चिनी आक्रमणाच्या वेळी त्यांनी हे गीत रचले असावे. त्यांच्या या गीताच्या पहिल्या ओळी होत्या 'माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू, जिंकू किंवा मरू जिंकू किंवा मरू'. कारण तशाच जिद्दीने संयुक्त महाराष्ट्राचा लढा सामान्यजनांनी श्रमिकांनी लढविला. विजय मिळाल्याशिवाय थांबायचे नाही, अशा निर्धारानेच अगदी सर्वसामान्य जनतेने हा लढा चालविला.

हे घडले कसे मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे लोकांना या प्रश्नावर झिंग चढली होती. मराठीभाषकावर या प्रश्नावर अन्याय होत असल्याचे पाहून इतर भाषकही त्यांना पाठिंबा देण्यास पुढे येऊ लागले. त्यामुळे मराठी भाषकांचे हे आंदोलन सर्व भाषकांचे

आंदोलन झाले. या प्रश्नावर मुंबईत जी पहिली परिषद झाली ती तरुणांची सर्वभाषक परिषद होती. दादर युवक सभेचा त्याबाबत पुढाकार होता. त्या परिषदेचे वाक्य होते संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी सर्व भाषक युवक. या परिषदेचे अध्यक्ष होते प्रभाकर कुंटे, मी सरचिटणीस होतो. अशोक पडबिद्री, उपेंद्र वैद्य, विजया वैद्य, ॲड. लक्ष्मण पाटील हे इतर पदाधिकारी होते.

या आंदोलनासाठी आपण काहीतरी करावे, अशी माझी फार इच्छा होती. त्यामुळे मी युवक सभा नावाच्या संघटनेची स्थापना केली होती व त्याचे कार्यवाह पद भूषविले. मराठी भाषेत संयुक्त महाराष्ट्राबाबत प्राधान्याने बातम्या छापून याव्यात म्हणून मी संयुक्त महाराष्ट्र पत्रिका हे साप्ताहिक पैशाचा अभाव असतानाही सुरू केले. आठवडाभरातच या साप्ताहिकाचा प्रभाव इतका वाढला की, त्याचा खप ५० हजारांवर गेला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात भाग घेतल्यामुळे मला ४ महिन्यांचा तुरुंगवासही भोगावा लागला होता.

असे होते संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन. कोणतीही कटुता न देता या आंदोलनाने बरेच काही सोसून संयुक्त महाराष्ट्र निर्माण करून दाखविला. या आंदोलनातील युवकांना एक प्रकारची झिंग चढली होती. परंतु कोणतेही हीन कृत्य आपल्या हातून होऊ न देता सरकारला त्यांनी पराभूत केले आणि प्रसंगी अशक्य वाटणारे संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न त्यांनी अखेर साकार करून दाखविले.

नाव : कॉ. गोविंद पंढरीनाथ पानसरे

पत्ता : १७ आयडियल सोसायटी, सागरमाळ ई–वार्ड,

कोल्हापूर ४१६ ६०८.

जन्मगाव : मु. पो. कोल्हार, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर

जन्मतारीख : २६ नोव्हेंबर १९३३

लिंग : पुरुष

व्यवसाय : सामाजिक व राजकीय कार्य

मुलाखतीचा ठिकाण : ६३५ सी वार्ड, रेडप्लॅन बिल्डिंग, बिंदू चौक कोल्हापूर

मुलाखतीचा दिनांक : १३/०६/२०१२

वेळ : सायंकाळी ७ वाजता

कॉ. गोविंद पंढरीनाथा पानसरे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील कोल्हार या खेडेगावी दि. २६ नोव्हेंबर १९३३ रोजी झाला. आई वडील शेतकरी शेतमजूर तिथं प्राथमिक शिक्षण झालं. पत्की म्हणून त्यांचे शिक्षक होते. राष्ट्र सेवादलाच्या संस्कारात वाढलेले ते मूळचे मलकापूरचे होते. त्यांच्यामुळे कॉ. पानसरे शिकण्यासाठी म्हणून कोल्हापूरला आहे. ते राजर्षी शाहू महाराजांचे कार्य ऐकून इथल्या तत्कालीन प्रिन्स शिवाजी मोफत मराठा बोर्डिंग हाउसमध्ये प्रवेश घेतला. राहणे, जेवण, शिक्षण फुकट असलं तरी खर्च असायचाच. त्या वेळी बिंदू चौकात बुक स्टॉल द रिपब्लिकन नावाच वृत्तपत्र विक्री केंद्र होतं. तिथं त्यांनी वर्तमानपत्र वाटायची नोकरी मिळवली. मुळात वाचनाची आवड, खिशात पैसे नाहीत, वाचनही होईना व पैसेही मिळतील हा विचार एकीकडे शिक्षण, दुसरीकडे जगणं जगाव कसं ते या दिवसांनी त्यांना शिकविले. दिवसभर

काम, रात्री अभ्यास असं करीत ते पदवीधर झाले. दरम्यान, त्यांना तत्कालीन नगरपालिकेत शिपायाची नोकरी मिळाली. ती त्यांनी पत्करली आणि एलएल.बी.चा अभ्यास सुरू केला. या कालावधीत तेही पूर्ण केले आणि त्यांना नगरपालिकेच्या शाळेत प्राथमिक शिक्षक करण्यात आले. हे त्यांच्या धडपडीचे बक्षीस होते. राष्ट्र सेवा दलाच्या संस्कारामुळे प्रारंभी ते समाजवादी विचाराकडे आकृष्ट झाले. मग त्यांना मार्क्स भेटला. तो त्यांचा कायमचा साथी झाला. या सर्वच डाव्या पक्षांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळावा असे वाटत होते. त्यामुळे सर्वच भागात मोठ्या प्रमाणात आंदोलने सुरू होती. त्यामध्ये कोल्हापूर हे एक प्रबळ केंद्र होते. या पक्षाचे नेते कॉ.अमृत डांगे या चळवळीचे नेते होते. त्यामुळे कॉ. पानसरे या चळवळीकडे ओढले गेले. इतकेच नव्हे तर ते कोल्हापूर जिल्हा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जिल्हा कार्यकारिणीचे ऑफिस सेक्रेटरी म्हणून शेवटपर्यंत काम पाहिले.

वर्तमानपत्राच्या भूमिकेबद्दल विचार करावयाचा झाला तर दै. ‘मराठा’ या वृत्तपत्राचा खास उल्लेख केला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र एकभाषाक मराठी राज्याची चळवळ सुरू झाली त्यापूर्वी मराठा हे वृत्तपत्र अस्तित्वात नव्हते. चळवळीसाठी म्हणून हे निर्माण करण्यात आले आणि चळवळींनी त्याची उभारणी केली. या वृत्तपत्राचे संपादक आचार्य अत्रे यांचे अष्टपैलू कर्तृत्व आणि त्यांची प्रेरणादायी अनेकदा प्रक्षोभक असणारी भाषाशैली एक मोठे हत्यार होते. उपहासाचे व विनोदाचे हत्यार त्यांनी अतिशय समर्थपणे वापरले. त्यामुळे मराठा हे दैनिक संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे एक हत्यार होते. देशातील व इतर कोणत्याही जनआंदोलनात ‘मराठा’ वृत्तपत्राने जशी भागीदारी केली त्या दर्जाची व त्या तीव्रतेची कामगिरी इतर कोणत्याही चळवळीत कोणत्याही वृत्तपत्राने

बजावलेली मला माहीत नाही.

दै. ’मराठा’ खालोखाल वालचंद कोठारी यांच्या संपादकाखालील दै. ‘प्रभात’ याचा उल्लेख करावा लागेल. त्यांनाही तर्कशुद्ध पद्धतीने आणि भारदार शैलीने एकभाषक मराठी राज्याचा पुरस्कार केला. आचार्य अत्रे आणि वालचंद कोठारी यांनी प्रत्यक्ष आंदोलनात भागीदारी केली. ते नुसते संपादक नव्हते, आंदोलनाचे नेते व कार्यकर्ते होते. सभा संमेलनापासून ते प्रत्यक्ष तुरुंगवास पत्करण्यापर्यंत त्यांची भागीदारी होती. वर्तमानपत्रांच्या संपादकांनी अशा रीतीने आंदोलनास सहभाग केल्याचे उदाहरण फार कमी आहे.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दिवसांत दररोज सत्याग्रह करायचा असा तो काळ होता. या सत्याग्रहात किमानपक्षी दहा लोकांनी तरी सामील झाले पाहिजे अशी अपेक्षा होती. समितीतल्या प्रत्येक घटकपक्षांना दिवसदेखील वाटून दिले होते. त्या त्या दिवशी त्या त्या पक्षांनी आपापले सत्याग्रही घेऊन यावेत. त्या दिवसाचा आपापला नेतादेखील त्यांनीच ठरवावा अशी पद्धत होती. तसे म्हणाल तर भाई माधवराव बागल हे त्या काळातले कोल्हापुरातले मोठे नावाजलेले पुढारी होते. त्याबद्दल कुणाचेच दुमत असणार नाही. परिणामी त्या काळात त्यांना स्थानिक वर्तमानपत्रांतून भरपूर प्रसिद्धी देखील मिळायची. दररोज त्यांचे नाव स्थानिक वृत्तपत्रांतून भरपूर प्रसिद्ध व्हायचेच. त्या काळात कोल्हापुरात दै. ’पुढारी’, ’सत्यवादी’, दै. ‘समाज’, दै. ’नवसंदेश’ ही वृत्तपत्रे मोठ्या दिमाखात निघायची. या वर्तमान पत्रांना मी स्वत रोज बातमीच्या रूपृष्ठे या सत्याग्रहात भाग घेतलेल्या सत्याग्रहींची नावे लिहून कळवीत होतो. त्यांच्या निरोप समारंभाच्या बातम्या देणे, त्या प्रसिद्ध कशा होतील हे पाहणे माझे काम होते. त्या काळात

बंदोबस्तासाठी असलेले सर्व पोलिस सर्व सहभागी सत्याग्रहींना बऱ्याच वेळेला दुपारी अटक करायचे आणि सूर्यास्तानंतर सोडून द्यायचे. स्थानिक चार वृत्तपत्रांतून सन्मानाने आपले नाव छापून तर येतेच पण सीमाभागातल्या लढ्याला पाठिंबा दर्शविण्यासाठी आपलाही तेवढाच खारीचा वाटा या भूमिकेतून बरेचसे लोक या सत्याग्रहात सामील होत होते.

३० नोव्हेंबर १९५७ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील अश्वारूढ पुतळ्याचे तत्कालीन देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते अनावरण होणार होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचा या कार्यक्रमाला विरोध होता. आम्ही कोल्हापूर जिल्ह्यातून सहभागी झालो होतो. कार्यक्रम तर भव्यदिव्य असाच होता. समारंभासाठी गाड्या ट्रक भरभरून लोक जात होते. पण पोलिस मात्र वाटेतच या उत्साही कार्यकर्त्यांना अडवत होते. काही लोक काँग्रेसचे झेंडे लावून नेहरूंच्या स्वागताला जात होते. त्यांना मात्र कोण आडवत नव्हते हे आमच्यातल्या वसंतराव पंदे यांनी हेरले. त्यांनी काँग्रेसची गाडी उभी केली आणि त्याच्या गाडीवरचा एक झेंडा मागितला. तो आमच्या गाडीला लावला. आंदोलकांच्या जवळ जाईपर्यंत आम्ही तो तसाच ठेवला आणि नंतर काढून टाकला. परिणामी नेहरूंच्या सभेत घोषणा देऊन गोंधळ घालावयाला आम्हाला संधी मिळाली. त्याचा पुरेपूर फायदा घेतला.

काँग्रेसच्या सभा कोल्हापुरात आम्ही नेहमीच उधळायचो. पाच पन्नास लोक एकत्रित यायचे आणि हे काँग्रेसवाले गर्दीसाठी नेहमी ट्रक भरून लोक आणायचे. सभा उधळण्याची अनेक तंत्रे त्या काळात आम्ही विकसित केलेली होती. सभा ऐन रंगात आली असतानाच बेडक्या पकडून सफेत फेकायच्या, गाढवाच्या शेपटीला मोकळा डब्बा

बांधायचा आणि गाढव सभेत घुसवायचे, टोमॅटो, अंडी फेकणे, घोषणा देणे हे नेहमीच चालू असायचे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची सभा कॉमर्स कॉलेजमध्ये आयोजित केली होती. सभेला मी आणि गोव्याचे बेन डिसोझा तसेच भुताडिया आडनावाचा टेलर असे तिघेजण गेलो होतो. सभा ऐन रंगात आली असतानाच लोक मध्येच उठून जायचे. काय तर वक्त्यांच लक्ष येनकेन प्रकारे विचलित व्हावे ही यामागची धारणा असायची. नेहमीच्या सवयींप्रमाणे आमचा भुताडिया उठला आणि व्यासपीठासमोरच्या दारावरून जाताना, त्याने नेरकोटात लपवून ठेवलेला एक मेलेला साप श्री. जोशींच्या गळ्यात घालण्याचा प्रयत्न केला. जोशी घाबरले, इतक्यात आम्ही सभागृहातल्या खुर्च्या भिरकावल्या ती सभा आम्ही उधळली.

तुळशीदास जाधव यांनी बिंदू चौकात सुरू असलेली सभा उधळण्यासाठी आम्ही कार्यकर्ते प्रयत्न करीत होतो. त्यासाठी आम्ही श्री. जाधव यांना ऐकू जाईल अशा आवाजात उगीचच कुणाची रं सभा, कोण बोलतोय, त्याला काय कळतंय अशी शेरेबाजी व उगीचच भांडल्याचे नाटक करीत होतो. पण आमच्या या गोंधळाकडे मात्र हा वक्ता ढुंकूनही पाहत नव्हता की विचलित होत नव्हता. तेवढ्यात आमच्यातला एकानं शक्कल लढवली आणि मोठ्यांनी राष्ट्रगीत म्हणायला सुरुवात केली. तसा उपस्थित जनसमुदाय राष्ट्रगीताला उभा राहिला आणि अशा प्रकारे श्री. जाधवांची सभा उधळली.

अशा अनेक गमतीजमतीच्या माध्यमातून काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सभा उधळण्याचे काम तसेच प्रभात फेऱ्या, कोपरासभा अशी अनेक कामे आम्ही या चळवळीसाठी केली आहेत.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | दत्तात्रय बाळकृष्ण ताम्हणे |
| पत्ता | : | श्री. राहुल नाचणे ७०२, अमृत सोसायटी, मुलुंड (पूर्व) ४१ |
| जन्मतारीख | : | १३ एप्रिल १९१३ |
| लिंग | : | पुरुष |
| व्यवसाय | : | सामाजिक कार्य |
| मुलाखतीचा ठिकाण | : | ७०२, अमृत सोसायटी, मुलुंड पूर्व ४१ |
| मुलाखतीचा दिनांक | : | १३/०६/२०१३ |
| वेळ | : | सायंकाळी ४ वाजता. |

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय बाळकृष्ण ताम्हणे यांचा जन्म कोकणात १३ एप्रिल १९१३ रोजी झाला. बालपण खेड्यातच गेले. त्यामुळे ते ग्रामीण जीवनाशी समरस राहिले. वडील पोस्ट मास्तर होते. दत्ताजींनी गरिबीतच शिक्षण घेऊन पुढे इंजिनिअरिंगसाठी आयआयटीत प्रवेश घेतला. दत्ताजींना तीन भावंडे. ज्येष्ठ बंधू अण्णा ताम्हणे, ते नोकरी करू लागले. तर दुसरे नाथा ताम्हणे यांनी वकिली व्यवसायात चांगला जम बसविला. घरच्या लोकांनी प्रोत्साहन दिल्यामुळेच दत्ताजी स्वातंत्र्य संग्रामात उतरले. त्या काळी महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी भारतात चालविलेली चळवळ व त्यामागची तळमळ पाहून त्यांना हुरूप आला व आपणही या चळवळीत सहभागी व्हावे असे वाटले. त्यामुळे वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी ते स्वातंत्र्यसंग्रामात हिरिरीने उतरले.

दत्ताजी ताम्हणे यांना प्रत्यक्ष गांधीजींच्या आश्रमात काम करण्याचे भाग्य लाभले.

तिथे दत्ताजींना घाणीच्या पाट्याही उचलाव्या लागल्या. त्यामुळे गांधीजींचे शिष्य होण्याचेही भाग्य त्यांना लाभले. पुढे गांधीजींनी सोपविलेली कामे करणे, सहकाऱ्यांसमवेत विविध ठिकाणी जाऊन लोकप्रबोधनाचे आणि स्वातंत्र्य चळवळीचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी ते पूर्णवेळ सक्रिय राहिले. त्या वेळी दत्ताजींसह काही स्वातंत्र्यसैनिकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आयुष्यभर अविवाहित राहण्याची शपथ गांधीजींसमोर घेतली. आज वयाची एकशेपाचवी ओलांडूनही ते अविवाहित आहेत. जालियनवाला बाग हत्याकांड, मिठाचा सत्याग्रह, चलेजाव चळवळ, ९ ऑगस्ट १९४५चा मुंबईतील क्रांतिदिन अशा महत्त्वाच्या प्रसंगी सहकाऱ्यांसमवेत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढत राहिले.

तो काळ स्वातंत्र्याच्या लढाई तसेच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळालाच पाहिजे, या चळवळीने भारावलेला होता. त्या वेळी दत्ताजींनी या चळवळीत स्वतःला झोकून दिले. त्या वेळी ते संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे आमदारकीला उभे राहिले. त्या वेळी त्यांनी उत्तर भाईंदर ते बेलापूर पट्टा या भागाचा दौरा करून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला होता. त्यामुळे पूर्वीचा साष्टी तालुका व आत्ताचा ठाणे तालुका हा समाजवाद्यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाऊ लागला. दत्ताजी विधानसभेवर दोन वेळा आमदार म्हणून निवडून गेले. त्या वेळी ताम्हणे यांनी विधानसभेत द्विभाषिकांवरील अभ्यासपूर्ण केलेले भाषण महत्त्वपूर्ण ठरले.

श्री. दत्ताजी ताम्हणे यांच्यावर महात्मा गांधीजी व साने गुरुजी यांच्या विचारांचा पगडा होता. त्यामुळे ते राष्ट्र सेवा दलातही हिरिरीने काम करीत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत पूर्णपणे स्वतःला झोकून दिलेले ते एक व्यक्तिमत्त्व होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ म्हणजे एक झंझावात होता. मोर्चे, निदर्शने, सत्याग्रह, संप, हरताळ,

प्रभातफेऱ्या, कोपरासभा, या माध्यमातून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी रेटत होते. त्या काळात जनतेचा सहभाग हा अभूतपूर्व असा होता. आचार्य प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी, क्रांतिसिंह नाना पाटील, भाई माधवराव बागल, कॉ.अमृत डांगे, दत्ता पाटील, नाथा पै, डॉ. नरवणे, या नेत्यांच्या या परिसरात सारख्या सभा चालू असत. त्यामुळे या सभांची माहिती आपल्या पंचक्रोशीत देणे, सेच जनतेने त्यात सहभागी होण्यासाठी प्रयत्न करणे.

वर्तमानपत्रांच्या भूमिकेबद्दल विचार करावयाचा झाला तर दै. 'मराठा' या वृत्तपत्राचा खाास उल्लेख केला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र एकभाषक मराठी राज्याची चळवळ सुरू झाली त्यापूर्वी 'मराठा' हे वृत्तपत्र अस्तित्वात नव्हते. चळवळीसाठी म्हणून हे निर्माण करण्यात आले आणि चळवळींनी त्याची उभारणी केली. यशा वृत्तपत्राचे संपादक आचार्य अत्रे यांचे अष्टपैलू कर्तृत्व आणि त्यांची प्रेरणादायी, अनेकदा प्रक्षोभक असणारी भाषाशैली एक मोठे हत्यार होते. उपहासाचे व विनोदाचे हत्यार त्यांनी अतिशय समर्थपणे वापरले. त्यामुळे 'मराठा' हे दैनिक संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे एक हत्यार होते. देशातील व इतर कोणत्याही जनआंदोलनात 'मराठा' वृत्तपत्राने जशी भागीदारी केली त्या दर्जाची व त्या तीव्रतेची कामगिरी इतर कोणत्याही चळवळीत कोणत्याही वृत्तपत्राने बजावलेले मला माहीत नाही.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे ते दिवस मंतरलेले होते. मुंबईसह महाराष्ट्राच्या मागणीसाठी अगदी सर्वसामान्यांतील सामान्य नागरिकांचा यात मोठ्या प्रमाणात सहभाग होता आणि जनतेच्या रेट्यामुळेच काँग्रेस सरकारला या चळवळीपुढे झुकावे लागल्याचे ते सांगतात. ही जनजागृती निर्माण करण्यासाठी वृत्तपत्रांची खूप मोठ्या प्रमाणात मदत

झाली. विशेषतः आचार्य अत्रे यांचे दै. 'मराठा' तसेच वा. रा. कोठारींचे 'प्रभात' वृत्तपत्र ही अग्रस्थानी होती. ती त्यामुळे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्री. दत्ताजी ताम्हणे यांनी या चळवळीत घेतलेल्या सक्रिय सहभाग व दिलेल्या योगदानाबद्दल या चळवळीत त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | श्री. वसंत आत्माराम मोरे |
| पत्ता | : | ६७/२, आरामनगर, वेसावे, पश्चिम अंधेरी, मुंबई ४०० ०६१ |
| मूळगाव | : | पिंपर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी |
| जन्मतारीख | : | १ जानेवारी १९२६ |
| लिंग | : | पुरुष |
| व्यवसाय | : | सामाजिक कार्य व पत्रकारिता |
| मुलाखतीचा ठिकाण | : | ६७/२, आरामनगर, वेसावे, पश्चिम अंधेरी मुंबई ४०० ०६१ |
| मुलाखतीचा दिनांक | : | ०९/०४/२०१३ |
| वेळ | : | सायंकाळी ८ वाजता. |

ज्येष्ठ पत्रकार स्तंभलेखक श्री. वसंत आत्माराम मोरे यांचा जन्म रत्नागिरी जिल्हा व गुहागर तालुक्यातील पिंपर या खेडेगावी १ जानेवारी १९२६ रोजी एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. ते मराठी सातवी शिकलेले होते. त्यांना उत्तम मराठी व मोडी ही भाषा अवगत होती. त्यांच्या मराठी भाषेवरील प्रभुत्वाचा माझ्या मनावर बराच प्रभाव होता. आमचे घराणे खोत होते. पण खोताचा वरचढपणा, फसवेगिरी असले दुर्गुण त्यांना अमान्य होते. त्यांची सभ्यता, नीती, सन्मानाने जगण्याचा हव्यास यामुळे त्यांना नित्य गरिबीला सामोरे जावे लागले. त्यांच्या जीवनात खोतीचा आविष्कार प्रकर्षाने होता. पण ती खोती खोटी ठरत होती. ती गरिबीकडे लोटीत होती. तरीही त्यांना गाव सोडून मुंबई

पुण्याकडे नोकरीस जाणे नापसंत होते. अशाही परिस्थितीत मी त्यांचा मोठा मुलगा असल्यामुळे वकिलीपर्यंत शिकावे असे त्यांचे स्वप्न होते. माझे सख्खे चुलते वासुदेव अर्जुनरा मोरे हे मॅट्रिकपर्यंत शिकले होते. ते मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये कारकून होते. त्यांनी मला मराठी पाचवीनंतर मुंबईत शिक्षणासाठी आणले. मी गिरणगावातील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत तिसरीपर्यंत शिकलो. माझी प्रगती पाहून मी अधिकाधिक शिकेन असे त्यांना वाटत होते. पण त्यांचा आजार त्यांना सोडवत नव्हता. त्यातच त्यांचा अंत झाला. परिणामी माझ्या शिक्षणाची आकांक्षा संपुष्टात आली. मी कोकणात घरी गेलो, गावी गुरे राखली. त्यानंतर माझे दुसरे चुलते विष्णुपंत मोरे यांनी आजीच्या सांगण्यावरून मला मुंबईस आणले. रात्रीच्या शाळेत जाऊ लागलो. या काळात वाचनाचा व्यासंग वाढतच होता. माझी लिखाणाची आवड कधीच कमी झाली नाही. नोकरी नव्हती, आर्थिक साहाय्य नव्हते, नोकरी वृत्तपत्रांतच करायची असा माझा निर्धार होता. माझे काही साहित्यप्रेमी मित्र मला साथ देत होते. त्या काळात परळला राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे साप्ताहिक कामगारांचे संपादन गो.बा.महाशब्दे यांना भेटलो व कामगारामध्ये घेण्याची विनंती केली. त्यांना मी पंडित नेहरूंविषयी लेख लिहून दिला होता. त्या लेखावर ते बेहद्द खूष होते. त्यांनी मला लगेच उपसंपादकपदी घेतले. तेथेच माझी पत्रकारितेची सुरुवात झाली. त्यानंतर मी काही काळ दै. ‘चित्रा’ या वृत्तपत्रात काम केले.

१९५६ मध्ये दै ’मराठा’ सुरू झाले. त्या वृत्तपत्राचे मालक, संपादक आचार्य अत्रे यांना केनेडी पुलाजवळच्या कार्यालयात भेटलो. त्यांनी तडक कामावरून रुजू होण्यास फर्मावले. मी वार्ताहर नात्याने कामास सुरुवात केली. या काळात वसंत देशपांडे व प्रफुल्ल मोकाशी या दोन्ही वार्ताहरांचे व अन्य उपसंपादकांचे मला स्मरणीय सहकार्य

लाभले. त्या वेळी माझ्याकडे महापालिकेच्या बैठका, न्यायालये, पोलिस ठाणे विशेषतः गुन्हेगारी यांच्या बातम्यांची जबाबदारी होती. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभांना 'मराठी'त साहजिकच प्राधान्य होते. त्या बातम्या पृष्ठभर असायच्या. त्या संपूर्ण हशा टाळ्यांसह देण्याचा साहेबांचा कटाक्ष होता. त्या सभांना तिघांपैकी एक वार्ताहर जात असे व त्याचे वृत्त रातोरात देत असे. त्यासाठी रात्र झाली अशी सबब नव्हती, पण तो फार मजेदार व उत्साही काळ होता. त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची सेवा होती हे अभिमानाने सांगता येते. नंतर मी उपसंपादक, मुख्य उपसंपादक व वृत्तसंपादक या पदावर काम केले. दरम्यान, संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. त्याचे श्रेय आचार्य अत्रे व त्यांचा 'मराठा' यांना सर्वाधिक आहे. मुंबईत प्रबोधनकार ठाकरे, श्रीपाद अमृत डांगे, एस. एम. जोशी आदी नेत्यांचे समर्थ नेतृत्व त्या आंदोलनाला होतो. श्रीमती. अहिल्या रांगणेकर, श्रीमती. मृणाल गोरे, श्रीमती तारा रेड्डी आदी झुंजार आघाडी होती. गिरणगावातील कामगारवर्ग त्या आंदोलनात हिरिरीने भाग घेत होता. दादर गिरणगावातील मध्यमवर्ग संयुक्त महाराष्ट्रासाठी प्राणपणाने लढत होता. 'मराठा' दैनिकाचा सर्वाधिक खप व तुफानी प्रचार जनजागृती किती होते याचा धडा केंद्रीय सत्ताधाऱ्यांना घ्यावा लागला. महाराष्ट्र राज्याचा मंगलकलश भले नामदार यशवंतराव चव्हाण यांनी हाती घेतला असेल; पण त्या कलशाची जडणघडण आणि निर्मिती केली ती आचार्य अत्रे यांनी आणि त्यांच्या दै. 'मराठा'ने. या मराठा नावाच्या इतिहाससाक्षेपी संशोधकाला दृष्टिआड करता येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | श्री. मधू शेटे |
| पत्ता | : | न्यू मुन्यूपाल बिल्डिंग, प्लॉट क्र. ३०,<br>चौथा माळा, नाना चौक, ग्रॅन्ट<br>रोड, पश्चिम मुंबई : ७ |
| जन्मतारीख | : | २६ जुलै १९३० |
| लिंग | : | पुरुष |
| व्यवसाय | : | सामाजिक कार्य व पत्रकारिता |
| मुलाखतीचा ठिकाण | : | न्यू मुन्यूपाल बिल्डिंग, प्लॉट क्र.३०, चौथा<br>माळा, नाना चौक, ग्रॅन्ट रोड, पश्चिम मुंबई ७ |
| मुलाखतीचा दिनांक | : | ०९/०४/२०१३ |
| वेळ | : | दुपारी १२ वाजता. |

ज्येष्ठ पत्रकार स्तंभलेखक श्री. मधू शेटे यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ या गावी २६ जुलै १९३० रोजी झाला. आई कुडाळच्या प्रसिद्ध नाडकर्णी वतनदार कुटुंबातील, तर वडील मेढा मालवण येथील वतनदार. कुटुंबातील पत्रकारितेचा वारसा त्यांचे मामा रामचंद्र पुरुषोत्तम नाडकर्णी यांच्याकडून त्यांना मिळाला. ते विविध वृत्तांत लिहीत. विद्यार्थी दशेतच श्री. मधू शेटे १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनाने प्रेरित होऊन राजकारणाकडे आकृष्ट झाले. नंतर राष्ट्र सेवादलात सामील झाले. अच्युतराव पटवर्धन आणि अरुणा असफअली संपादित 'क्रांतिकारी' नियतकालिकाचे प्रसारण करण्यात त्यांनी भाग घेतला.

रॉबर्ट मनी हायस्कूल व नंतर आर्यन हायस्कूलमधून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले.

आर्यनमध्ये प्रसिद्ध कम्युनिस्ट नेते दिवंगत शंकर वामन देशपांडे यांच्या शिक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली ते कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले. तो काळ १९४८ चा त्याच काळात प्राध्यापक मोरावे मास्तरांच्या प्रभावाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित संशोधनाच्या अध्ययनाकडेही वळले. १९५२ मध्ये ते जहाल राष्ट्रवादी संपादक एस. एदानंद यांच्या फ्री प्रेस जर्नल या इंग्रजी दैनिकात संपादक खात्यात वार्ताहर म्हणून दाखल झाले.

संयुक्त महाराष्ट्र व गोवामुक्ती लढ्याच्या प्रखर आंदोलनात त्यांनी सक्रिय भाग घेऊन अनेकदा सत्याग्रहात मुंबई अटक करून घेतली. फ्री प्रेस जर्नल कामगारांच्या युनियनचे अध्यक्ष एन. एस. झिराडकर व नंतर जार्ज फर्नांडिस यांच्यासमवेत त्या युनियनचे त्यांनी चिटणीस म्हणून अनेक संप लढविले. १९६१ ते १९६८ या कालखंडात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आघाडीतून कम्युनिस्ट पक्षाच्या तिकिटावर ते मुंबई महापालिकेत निवडून आले. महापालिकेचा विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी अभ्यासपूर्ण कारकीर्द गाजवली.

वृत्तपत्राच्या बाबतीत विचार करावयाचे झाले तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या इतिहासाचे पहिले पृष्ठ आहे आचार्य अत्र्यांच्या दै. 'मराठा' या वृत्तपत्राचे. हे कसे काय घडले असा विस्मयचकित करणारा हा प्रकार महाराष्ट्रातील अवघ्यांनी पाहिला. ते मात्र तितकेच खरे आहे. 'मराठा'वर नि आचार्य अत्र्यांवर या वृत्तपत्रांतील सहकार्याची जाज्वल्य निष्ठा तर आचार्य अत्र्यांचा त्यांच्यावर गाढा विश्वास. नुसता विश्वासच ठेवला नाही तर त्यांनी अमर्यादित स्वातंत्र्यही बहाल केला. त्यांनी मग काय आधीच झपाटून गेलेल्या अवघ्यांनी मिळून घणाघाती लेखनाचा सपाटाच लावला. जालन्याची निवडणूक

समितीने जिंकून बहुमत मिळविले तेव्हा निगरगट्ट काँग्रेसवाल्यांना उद्देशून लिहिलेल्या अग्रलेखाचा मथळा होता, आता तरी जाल ना, वसमतची निवडणूक जिंकली तेव्हा त्या सुमारास सर्वतोमुखी असलेल्या त्या सिनेगीताची नेमकी ओळ लक्षात घेऊन अग्रलेखाचे शीर्षक लिहिले, वसमत हमारे साथ है. असे अनेक मथळे त्यांनी या आंदोलनाच्या काळात दिले.

आचार्य अत्रे यांच्या शिवाजी पार्कवरील सभांचे रकानेच्या रकाने भरून वर्णने 'मराठा'त यायचे. एकदा तीस हजारांच्या प्रचंड सभेत 'आचार्य'अत्रे यांनी सिंहगर्जना' असे छापून आले. अत्रे रागावले, कोण वार्ताहर होता, त्यांनी चौकशी केली. तो एका लहान गावातून आलेला होता. मग अत्रे यांनी एक युक्ती केली. सभेला जमलेल्या श्रोत्यांकडे एकदा नजर टाकून आज इथे जो पाच लाखांचा जनसमुदाय जमला आहे.... अशी ते सुरुवात करायचे नि तो धागा पकडून वार्ताहराने बातमी तयार करायची.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवण्यासाठी अत्र्यांनी ज्या सिंहगर्जना केल्या आणि लेखणीद्वारे जो अंगार पेटविला त्याची आठवण अजूनही झाली तरी अंगावर रोमांच उभे राहतात. खरे सांगायचे तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला तो केवळ आचार्य अत्रे व त्यांच्या इतर सहकार्यामुळेच झाला.

परंतु १ मे १९६० रोजी यशवंतराव चव्हाणांनी मंगल कलश आणला आणि त्यासाठी शिवाजी पार्कवर जी प्रचंड सभा झाली त्या सभेचे आमंत्रण आचार्य अत्रे यांना नव्हते. त्या वेळी मराठी माणसे ज्याप्रमाणे आचार्य अत्रे यांना विसरली त्याप्रमाणे आजही ५० वर्षानंतर मराठी माणसे काय, महाराष्ट्र शासनही आचार्य अत्रे यांना विसरले, ही फार दुःखदायक गोष्ट आहे.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | श्री. अरविंद वासुदेव नाचणे |
| पत्ता | : | जनरल सेक्रेटरी ऑल इंडिया फेडरेशन एलआयसी कामगार फेडरेशन, बॉम्बे मॅच्युयल बिल्डिंग, दुसरा माळा, रस्तुम सिदवा मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ |
| जन्म तारीख | : | ५ जुलै १९३४ |
| लिंग | : | पुरुष |
| व्यवसाय | : | जनरल सेक्रेटरी ऑल इंडिया फेडरेशन एलआयसी कामगार फेडरेशन |
| मुलाखतीचा ठिकाण | : | एलआयसी कामगार फेडरेशन, बॉम्बे मॅच्युयल बिल्डिंग, दुसरा माळा, रस्तुम सिदवा मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ |
| मुलाखतीचा दिनाक | : | १६/०८/२०१२ |
| वेळ | : | सायंकाळी ५ वाजता |

ऑल इंडिया फेडरेशन एलआयसी कामगार फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी श्री. अरविंद वासुदेव नाचणे यांचा जन्म ठाणे येथे ५ जुलै १९३४ रोजी झाला. लहानपणी त्यांच्या घरी शैक्षणिक वातावरण होते. वडील श्री. वासुदेव नाचणे हे ठाणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या दै. 'प्रतियोगी' या दैनिकाचे संपादक होते. लहानपणापासून ते राष्ट्र सेवा दलाचे सैनिक होते. सिद्धार्थ महाविद्यालयात असताना त्यांना अनंत काणेकर व मधू दंडवते या प्राध्यापकांच्या सान्निध्यात शिकण्याची संधी मिळाली. संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या काळात कॉ. डांगे यांच्या विचाराकडे प्रभावित होऊन ते कम्युनिष्ट चळवळीकडे वळले. त्यामुळे या चळवळीत त्यांना सहभागी होण्याची संधी मिळाली. त्या काळात संयुक्त

महाराष्ट्राची चळवळ म्हणजे एक झंझावात होता. मोर्चे, निदर्शने, सत्याग्रह, संप, हरताळ हे एका मागोमाग एक चालू होते. मुंबई हे तर या चळवळीचे केंद्रबिंदू होते. गिरगावात तर सभांचा उच्चांक झाला होता. आचार्य अत्रे, साथी एस. एम. जोशाी, कॉ. डांगे या समितीच्या नेत्यांबरोबरच अप्पा पेंडसे, सुशील कवळेकर या गिरगावातील स्थानिक नेत्यांच्या सभा होत असत. त्या काळात त्यांच्या सभांना मोठ्या प्रमाणात गर्दी होत असत. आम्ही समितीचे कार्यकर्ते म्हणून या सर्व सभांची तयारी करणे, छोट्या छोट्या सभा घेऊन या सभांना येण्यासाठी लोकांना विनंती करणे, या काळात आम्ही एकही सभा चुकविलेली नसल्याचे आठवते.

१९५६च्या सुमारास मुंबईमध्ये फ्लोराला जो प्रचंड मोठा मोर्चा निघाला या गिरणीकामगारांसोबत आमच्या युनियनने बंद हाक दिली. आम्ही कामगार तीन दिवस संपावर होतो व आंदोलनात सहभागी झालो. त्यावेळेचा जो प्रचंड मोर्चा होता त्यानंतर मी एकदाही तसा मोर्चा पाहिला नाही. वृत्तपत्रांच्या बाबतीत विचार करावयाचे झाले तर त्या काळात मुंबईमध्ये लोकमान्य नवशक्ती, लोकसत्ता, केसरी अशी वृत्तपत्रे होती. पण त्यातल्या त्यात लोकमान्य व नवशक्ती ही महत्त्वाची वृत्तपत्रे होती. त्याचे मालक परप्रांतीय असल्यामुळे या चळवळीविषयी ठोस अशी भूमिका घेतली नव्हती. इंग्रजी या वृत्तपत्राचा तर या चळवळीला विरोधच होता. संयुक्त महाराष्ट्राचा प्रसार इतर कुठलेही वृत्तपत्र करीत नाही हे समितीच्या नेत्यांच्या लक्षात आल्यानंतर आचार्य अत्रे यांच्या नेतृत्वाखाली दै. 'मराठा' हे वृत्तपत्र काढावयाचे ठरविले. सुरुवातीपासूनच 'मराठा'ला प्रचंड प्रतिसाद आणि लोकप्रियता लाभली. आचार्य अत्रे यांच्या शिवाजी पार्कवरील सभांचे रकानेच्या रकाने भरून वर्णने मराठात यायची.

नाव : भाई वैद्य

पत्ता : तोरणा, मनमोहन पार्श्वनाथ सोसायटी, बिबवेवाडी,
पुणे ४११०३७

जन्मतारीख : २२ जून १९२८

लिंग : पुरुष

व्यवसाय : सामाजिक व राजकीय कार्य

मुलाखतीचा ठिकाण : तोरणा, ममोहन पार्श्वनाथ सोसायटी, बिबवेवाडी,
पुणे ४११०३७

मुलाखतीचा दिनांक : १३/०६/२०१२

वेळ : सायंकाळी ७ वाजता

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत स्वातंत्र्यसैनिक भाई वैद्य यांचा जन्म वेल्हे तालुक्यातील दापोडे खेडेगावी दि. २२ जून १९२८ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. भाईंचा राजकारण तसेच समाजकारणाशी अगदी लहानपणापासून म्हणजे विद्यार्थी दशेपासूनच संबंध आला. त्या काळात स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र असलेल्या पुण्यातील जेधे मॅन्शन आणि गायकवाड यांच्या वाड्याच्या टापूत ते राहत. आणि गुरुवर्य बाबूराव जगताप यांच्यासारख्या थोर शिक्षणतज्ज्ञ मुख्याध्यापक असलेल्या शिवाजी मराठा शाळेत शिकत होते. तो सगळा काळ आणि परिसर स्वातंत्र्य चळवळींनी भारलेला होता. त्या काळी महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्याबद्दल घरापासून आपुलकी व आदरभाव सहज दृष्टीस पडायचा. साधारणतः ते आठ वर्षांचे असताना पहिल्यांदा निवडणुकीच्या प्रचारात सहभागी झाले. शिवाजी मराठा माध्यमिक शाळेत संसद भरवण्याचा उपक्रमही आयोजित

करण्यात आला होता. तेव्हा भाई त्या संसदेमध्ये भारताचे पंतप्रधान बनले होते. योगायोगाने शाळेतील ज्येष्ठ विद्यार्थी १९४२ च्या चळवळीत पकडले गेल्यामुळे विद्यार्थी संघटनेचे नेतृत्व भाईंकडे आले. १९४२ च्या चळवळीत समाजवादी विचारांनी भारलेल्या अनेक तरुणांना स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करण्याची संधी लाभली. अशातच भूमिगत राहून महाराष्ट्रात लढा चालू ठेवणाऱ्यामध्ये अरुणा असफअली, अच्युतराव पटवर्धन, शिरूभाई लिमये, यांच्यावर तर कॅपिटल बॉम्बस्फोट खटला सुरू होता. शिरूभाऊ लिमये तर तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले होते. परिणामतः १९४३ मध्ये भाई राष्ट्र सेवादलात सामील झाले. राष्ट्र सेवादल हे तर सुरुवातीपासून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सहभागी होते. त्यामुळे भाई देखील या लढ्यात सहभागी झाले.

शंकरराव देव यांनी पंडित नेहरूंच्या दबावामुळे संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त केल्यावर आंदोलनात एक पोकळी निर्माण झाली होती. त्यावेळी पुणे शहरातील लालजी कुलकर्णी, रामभाऊ परदेशी इत्यादींच्या बरोबर भाईंनीही पुणे शहरातील विविध मंडळांना एकत्रित आणून एक ठराव मंजूर करून घेतला. या ठरावानुसार आम्ही विरोधी पक्षाचे आमदार व समाजवादी चळवळीतील सर्व मान्यवर नेत्यांनी श्री.एस.एम.जोशी यांना विनंती करून येथून पुढील लढ्याचे नेतृत्व त्यांनी करावे, अशी विनंती केली. त्यामुळे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला अनुकूल असलेल्या राजकीय पक्षाची एक बैठक ६ फेब्रुवारी १९५६ रोजी पुणे येथे टिळक मंदिरामध्ये आयोजित केली. या बैठकीचे अध्यक्ष देशभक्त केशवराव जेधे हे वयोवृद्ध नेते होते. बैठकीला विविध पक्षाचे नेते उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्याचा व तिचे नेतृत्व सरचिटणीस म्हणून एस. एम. जोशी यांनी करावे असा ठराव झाला. एस. एम. यांच्या सूचनेवरून या

ठरावाला मान्यता घेण्यासाठी शनिवारवाड्यावर एक प्रचंड जाहीर सभा झाली आणि जनतेनेही सर्वानुमते संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापना व एस.एम.जोशी यांचे नेतृत्वाला मान्यता दिली. या कार्यामध्ये भाईंना स्वतः सहभागी होता आले. याचा मनाला आनंद व अभिमान वाटतो. पुढे जी चळवळ झाली त्यात मी स्वतःला झोकून दिले. अनेक सत्याग्रही तुकड्या पाठविल्या आणि स्वतःही सत्याग्रही होऊन तुरुंगवास पत्करला.

वर्तमानपत्राच्या भूमिकेबद्दल विचार करावयाचा झाला, तर सुरुवातीला संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही बेळगाव साहित्य संमेलनात नागपूरच्या तरुण भारतचे संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांनी मांडली. त्यानंतर या मागणीला इतर जिल्ह्यातील वृत्तपत्रांनी ही मागणी उचलून धरली. उदा. जळगावाच्या ब्रीजलाल पाटील यांचे दै. 'प्रजासत्ता' धुळ्याचे भाई मदानी यांचे 'आपला महाराष्ट्र' नाशिकचे 'गावकरी', मराठवाड्याचे 'मराठा', सावंतवाडीचे 'वैदेनहेत' हे साप्ताहिकांनी ही मागणी उचलून धरली. त्यानंतर १९५६ ला सुरुवात झालेल्या दै. 'मराठा' या वृत्तपत्राचा खास उल्लेख केला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र एकभाषक मराठी राज्याची चळवळ सुरू झाली. त्यापूर्वी मराठा हे वृत्तपत्र अस्तित्वात नव्हते. चळवळीसाठी म्हणून हे निर्माण करण्यात आले आणि चळवळींनी त्याची उभारणी केली. या वृत्तपत्राचे संपादक आचार्य अत्रे यांचे अष्टपैलू कर्तृत्व आणि त्यांची प्रेरणादायी अनेकदा प्रक्षोभक असणारी भाषाशैली एक मोठे हत्यार होते. उपहासाचे व विनोदाचे अत्यार त्यांनी अतिशय समर्थपणे वापरले. त्यामुळे 'मराठा'हे दैनिक संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे एक हत्यार होते. देशातील व इतर कोणत्याही जनआंदोलनात 'मराठा' वृत्तपत्राने जशी भागीदारी केली त्या दर्जाची व त्या तीव्रतेची कामगिरी इतर कोणत्याही चळवळीत कोणत्याही वृत्तपत्राने बजावलेली मला माहीत नाही. दै. 'मराठा' खालोखाल

वालचंद कोठारी यांच्या संपादकाखालील दै. 'प्रभात' याचा उल्लेख करावा लागेल. त्यांनीही तर्कशुद्ध पद्धतीने आणि भारदार शैलीने एकभाषक मराठी राज्याचा पुरस्कार केला. आचार्य अत्रे आणि वालचंद कोठारी यांनी प्रत्यक्ष आंदोलनात भागीदारी केली. ते नुसते संपादक नव्हते आंदोलनाचे नेते व कार्यकर्ते होते. सभा संमेलनापासून ते प्रत्यक्ष तुरुंगवास पत्करण्यापर्यंत त्यांची भागीदारी होती. वर्तमानपत्राच्या संपादकाने अशा रीतीने आंदोलनात सहभाग होण्याची उदाहरणे फार कमी आहेत. संयुक्त महाराष्ट्र या चळवळीच्या दिवसात दररोज सत्याग्रह करायचा असा तो काळ होता. त्यामुळे या सत्याग्रहासाठी आम्ही सेवादलातील सैनिकांनी एकत्रित येऊन गुरुवार पेठ, शुक्रवार पेठेतील अनेक महिलांची तुकडी पाठवण्याचे काम केले आहे. या चळवळीदरम्यान पुण्यात तर सभांचा उच्चांक झाला होता. आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉ. डांगे, केशवराव जेधे, दत्ता देशमुख, यांच्यासह कितीतरी नेत्यांच्या मोठ्या प्रमाणात सभा होत. या सभांची तयारी करणे, ज्या मुख्य भागात सभा आयोजित केली असेल त्या भागाच्या इतर भागांत छोट्या सभा घेऊन लोकांना मुख्य सभांना येण्यासाठी विनंती करणे. असे कितीतरी कार्य आम्ही सेवादलातील सैनिकांनी केले आहे. ३० नोव्हेंबर १९५७ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील अश्वारूढ पुतळ्याचे तत्कालीन देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते अनावरण होणार होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचा या कार्यक्रमाला विरोध होता, आम्ही पुणे जिल्ह्यातून सहभागी झालो होतो.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | श्री. डॉ. बाबुभाई डबूवाला |
| पत्ता | : | न्यू मन्युपाल बिल्डिंग चौथा माळा,<br>नाना चौक, ग्रँटरोड, पश्चिम मुंबई : ४०० ००७ |
| जन्मतारीख | : | २३ जानेवारी १९२१ |
| लिंग | : | पुरुष |
| व्यवसाय | : | वैद्यकीय सेवा |
| मुलाखतीचे ठिकाण | : | न्यू मन्युपाल बिल्डिंग, चौथा माळा, नाना चौक, ग्रँटरोड<br>पश्चिम मुंबई : ४०० ००७ |
| मुलाखतीचा दिनांक | : | १५/०८/२०१२ |
| वेळ | : | दुपारी १.०० वाजता. |

मुंबई महापालिकेचे ज्येष्ठ सेवानिवृत्त समुपदेशक तथा समाजसेवक श्री. डॉ. बाबूभाई डबूवाला यांचा जन्म गुजरात राज्यातील सुरत शहरात २३ जानेवारी १९२१ मध्ये गुजराती समाजात झाला. लहानपणी त्यांच्या घरी शैक्षणिक वातावरण होते. ते शिक्षणाच्या निमित्ताने मुंबई शहरात आले आणि ते मुंबईतच राहिले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना कॉ. अमृत डांगे, एस. एम. जोशी यांच्या विचाराच्या प्रभावामुळे ते सेवा दलात आले. भाषावार प्रांतरचना व्हावी हा विचार सुरुवातीपासून सेवा दलाचा होता. शिवाय, आपल्या प्रांताचा कारभार प्रत्येकाला समजावा, त्यामुळेच कारभार मराठीतून चालावा, असा संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस एस. एम. जोशी यांचा पहिल्यापासून आग्रह होता. मी गुजराती समाजातील असून हा विचार मला पटला. त्यामुळेच मी या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी झालो. त्या काळात संयुक्त

महाराष्ट्राची चळवळ म्हणजे एक झंझावात होता. मोर्चे, निदर्शने, सत्याग्रह, संप, हरताळ हे एका मागोमाग एक चालू होते. मुंबई हे तर या चळवळीचे केंद्रबिंदू होते. आचार्य अत्रे, साथी एस. एम. जोशी, कॉ. डांगे, डॉ. नरवणे आदी नेत्यांच्या नेहमी सभा होत असत. त्या काळात त्यांच्या सभांना मोठ्या प्रमाणात गर्दी होत असत. आम्ही समितीचे कार्यकर्ते म्हणून या सर्व सभांची तयार करणे, तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख, शाहीर गव्हाणकर, शाहीर साबळे, आत्माराम पाटील, तसेच राष्ट्र सेवा दलाचे वसंत बापट यांच्या नेतृत्वाखाली असलेले कलापथक यांच्याबद्दल तर काय माहिती सांगायची. अख्खा महाराष्ट्र उभा अडवा पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन त्यांनी घराघरांत पोहोचविले.

वृत्तपत्राच्या बाबतीत विचार करावयाचे झाले तर त्या काळात मुंबईमध्ये लोकमान्य, नवशक्ती, लोकसत्ता, केसरी अशी वृत्तपत्रे होती. पण त्यातल्या त्यात लोकमान्य व नवशक्ती ही महत्त्वाची वृत्तपत्रे होती. परंतु त्यांचे मालक हे परप्रांतीय असल्यामुळे या चळवळीविषयी ठोस अशी भूमिका घेतली नव्हती. इंग्रजी या वृत्तपत्राचा तर या चळवळीला विरोधच होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला सरकार अनुकूल नाही म्हणून विरोध दर्शविण्यासाठी मध्यवर्ती सरकारने अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. ऑगस्ट १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने शिवाजी पार्कवर सभा घेतली या सभेत आचार्य अत्रे यांनी 'मराठा' वृत्तपत्र काढण्याचे ठरविले. या आव्हानाला प्रतिसाद देऊन मी स्वतः या वृत्तपत्रासाठी नाना चौक, ग्रँट रोड परिसरात निधी जमा करण्याचे काम केले आहे. त्यामुळे 'मराठा' वृत्तपत्र काढण्यासाठी आमचाही हातभार लागला आहे. शिवाय, मी स्वतः डॉक्टर असल्यामुळे या

आंदोलनावर झालेल्या गोळीबारात जखमी झालेल्या अनेक आंदोलकांवर उपचार केला आहे.

आंदोलन ऐन भारात असताना समितीच्या नेत्यांना बदनाम करण्यासाठी गुजराती समाजाच्या वस्तीवर समितीच्या कार्यकर्त्यांनी हल्ला चढवला आहे व महिलावर अत्याचार केल्याची अफवा मोठ्या प्रमाणात पसरविण्यात आली. मी समितीचा कार्यकर्ता आणि गुजराती समाजातील असल्यामुळे एस. एम. जोशी यांच्या मार्गदर्शनाने राष्ट्र सेवा दलातील कार्यकर्त्यांसह आम्ही गुजराती समाजाच्या वस्तीवर वास्तव्यास गेलो व त्यांना धीर देण्याचेही काम आम्ही केले. पुढे जी चळवळ झाली त्यात मी सेवा दलाचा सैनिक म्हणून मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे, याचा मला अभिमान वाटतो.

| | |
|---|---|
| नाव | : पन्नालाल सुराणा |
| पत्ता | : मु. पो. आसू, ता. परंडा, जि. उस्मानाबाद |
| जन्मतारीख | : ०९ जुलै १९३३ |
| लिंग | : पुरुष |
| व्यवसाय | : सामाजिक व शैक्षणिक कार्य |
| मुलाखतीचा ठिकाण | : साने गुरुजी स्मारक, सिंहगड रोड, पर्वती पायथा पुणे–४११०३० |
| मुलाखतीचा दिनांक | : १३/०६/२०१२ |
| वेळ | : सायंकाळी ५ वाजता. |

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक पन्नालाल सुराणा यांचा जन्म पुणे येथे दि.०९ जुलै १९३३ रोजी एका जैन कुटुंबात झाला. त्या वेळी चार–पाच मित्रांनी एकत्रित येऊन सेवादलाच्या शाखेत जाण्यास सुरुवात केली. १९४३ मध्ये आम्ही 'लेंगे लेंगे स्वराज लेंगे' म्हणत पहाटे पाच वाजता प्रभात फेरी काढत असू. त्या माध्यमातून आम्ही गटारे साफ करणे, खराट्याने रस्ते झाडणे, सूतकताई करणे अशी विधायक कामे करू लागलो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी मॉडेल हायस्कूलमध्ये रात्री १२ वाजता आम्ही ध्वजवंदन केले. १०वी नंतर पुढील शिक्षणासाठी मी पुण्यात आलो. त्या वेळी जयप्रकाश नारायण यांनी एस. एम. जोशी यांच्याकडे तरुण कार्यकर्त्यांची मागणी केली. त्या वेळी एस. एम. यांनी बापू काळदाते व पन्नालाल सुराणा यांना बिहारला पाठविले. तिथे जयप्रकाश यांना ग्राम सेवा दल सुरू करावयाचे होते. कार्याचीही सुरुवात केली. काही

कालावधीनंतर आम्हाला काही गोष्टी न पटल्यामुळे आम्ही त्यापासून बाजूला झालो. नंतर बार्शी येथे येऊन शंकरराव देव यांच्या पुढाकाराने समाजप्रबोधन ही संस्था सुरू केली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण भागात शिक्षक, ग्रामसेवक, सोसायटीचा सचिव यांच्यावर विकासकामाची मोठी जबाबदारी आली. त्यांच्यासाठी पुस्तके प्रकाशित करावी लागत. त्यासाठी ही संस्था काम करीत असत. १९५४ मध्ये बी.ए.पास, तर १९६१ मध्ये एलएल.बी.ची परीक्षा उत्तीर्ण १९५५ मध्ये डॉ. वीणाताई यांच्याशी नोंदणी पद्धतीने विवाह. संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरटिणीस एस. एम. जोशी व राष्ट्र सेवा दल यांच्या विचाराचा प्रभाव असल्यामुळे, तसेच राष्ट्र सेवा दल हे सुरुवातीपासून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सहभागी होते. त्यामुळे पन्नालाल सुराणादेखील या लढ्यात सहभागी झाले.

संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन हा मराठी जनतेचा मोलाचा ठेवा आहे. मराठी भाषेवरचे त्यांचे प्रेम त्यातून प्रकट झालेच, त्याचबरोबर समता आणि न्याय या मूल्यांच्या आधारे समाज जीवनाची घडी नव्याने बसवावी अशी दुर्दम्य आकांक्षाही त्यातून प्रकटली. अन्यायाचा प्रतिकार करण्याचा निर्धार जगाला जाणवला. व्यापक शांततामय जनआंदोलन कसे चालवावे याचा आगळावेगळा वस्तुपाठ भारतीय लोकशाहीच्या ग्रंथात लिहिला गेला.

मुंबईत फ्लोरा फाउंटन (आताच्या हुतात्मा चौक) जवळ कामगारांच्या मोर्चावर गोळीबार झाला. ही बातमी वर्तमानपत्रात वाचल्यावर सोलापुरातील कामगारवर्गात संतापाची लाट उसळली. त्यांनी मोर्चा काढायचे ठरवले. दुपारी बाराच्या सुमारास कलेक्टर कचेरीवर हजारोंचा मोर्चा पोहोचला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, कामगारांचा बळी घेणाऱ्या सरकारचा धिक्कार असो आदी घोषणांनी आसमंत दुमदुमत होता. कामगार नेते कॉ. जी. डी. साने, मीनाताई, बाबा कुसूरकर, व्यंकाप्पा मकूर,

मकबूल कारभारी आदी नेत्यांचे भाषण झाले. त्या मोर्चात सुराणाही सहभागी झाले होते. पुण्याच्या दैनिक 'प्रभात'चे वा. रा. कोठारी हे मूळ सोलापूर जिल्ह्यातले. ब्राह्मणेत्तर चळवळीत त्यांनी कार्य केलेले. माढा, मोहोळ, बार्शी, पंढरपूर आदी विविध शहरांत त्यांनी सभा घेतल्या. त्या वेळी श्री.सुराणा हे त्यांच्या सभेला उपस्थित राहत. इतरत्र फारशी नसलेली हिंदू महासभा सोलापुरात पाय रोवून होती. वि. रा. पाटील यांचा आवाज त्या वेळी गर्जत असायचा. शाळाशाळांत रोज चर्चा चालायच्या. (दयानंद कॉलेज त्या वेळी एकच होते) संध्याकाळी कार्यकर्ते पार्क चौकाच्या समोरच्या कोपऱ्यात एका कट्ट्यावर जमायचे. न्यू हायस्कूल (आताचे प्रशाला)चे वा. रा. शिरोळकर हे शिस्तप्रिय शिक्षक होते. त्यांचे वाचन दांडगे होते. ते या कट्टा बैठकीत नेहमी असायचे.

वर्तमानपत्राच्या भूमिकेबद्दल विचार करावयाचा झाला. सुरुवातीला संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही बेळगाव साहित्य संमेलनात नागपूरच्या तरुण भारतचे संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांनी मांडली. त्यानंतर या मागणीला इतर जिल्ह्यातील वृत्तपत्रांनी मागणी उचलून धरली. खरे म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणण्याचे श्रेय पुढाऱ्यांना दिले जात असले तरी त्या कलशापर्यंत त्यांचे हात पोहोचायला लागणारे खळे बळ त्यांना या वृत्तपत्रांच्या प्रेरणादायी रेट्यामुळे शक्तिशाली बनलेल्या लोकलढ्यालाच द्यावे लागणार आहे. त्यानंतर १९५६ला सुरुवात झालेल्या दै. 'मराठा' या वृत्तपत्राचा खास उल्लेख केला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र एकभाषक मराठी राज्याची चळवळ सुरू झाली त्यापूर्वी 'मराठा' हे वृत्तपत्र अस्तित्वात नव्हते. चळवळीसाठी म्हणून हे निर्माण करण्यात आले आणि चळवळीने त्याची उभारणी केली. या वृत्तपत्राचे संपादक आचार्य अत्रे यांचे अष्टपैलू कर्तृत्व आणि त्यांची प्रेरणादायी अनेकदा प्रक्षोभक असणारी भाषाशैली

एक मोठे हत्यार होते. त्यानंतर वा. रा. कोठारी यांच्या दैनिक 'प्रभात' या वृत्तपत्राचे योगदानही महत्त्वाचे आहे.

सोलापूर शहरात कन्नडभाषकांची संख्या २० ते २२ टक्के उद्योग व व्यापार या क्षेत्रात त्यांचा प्रभाव होता. आंध्रातून आलेल्या तेलुगू भाषकांचे प्रमाण १२ टक्के तो मुख्यतः विणकर व विड्या वळणारा वर्ग. कम्युनिष्ट पक्षाच्या युनियनमुळे त्यांचाही संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाला पाठिंबा होता. अक्कलकोट व सोलापूर हे तालुके कन्नड बहुभाषिक, पण व्यवहार सगळा सोलापूर शहरावर अवलंबून, त्यांना कर्नाटक राज्यात जाऊ नये असे वाटायचे. उत्तर–पश्चिमेकडील तालुके हे मराठीबहुल. त्या भागात शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव होता. त्यांचे नेते तुळशीदास जाधव हे नुकतेच काँग्रेसमध्ये गेले होते. पण माळशिरसचे शंकरराव मोहिते पाटील, मोहोळचे बाबूराव पाटील अनगरकर आदी शेतकरी कामगार पक्षाचे नामवंत नेते होते. राज्यकारभार आपल्याला समजणाऱ्या मराठी भाषेत चालावा हा मुद्दा तर लोकांच्या जिव्हाळ्याचाच होता. पण आपली मुंबई तोडून वेगळी करण्याचा भांडवलदारांचा डाव आहे. तो हाणून पाडायचा हा लोकमानसातला मुख्य मुद्दा होता. ३० नोव्हेंबर १९५७ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील अश्वारूढ पुतळ्याचे तत्कालीन देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते अनावरण होणार होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचा या कार्यक्रमाला विरोध होता. आम्ही सोलापूर जिल्ह्यातून सहभागी झालो होतो.

नाव : श्रीमती. शांताबाई मधुकर कानडे

पत्ता : १०६/८, मकरंद अपार्टमेंट, केतकर रोड, एरंडवणे.

पुणे : ४११ ००४

जन्मतारीख : २६ जून १९२५

लिंग : स्त्री

व्यवसाय : सामाजिक व राजकीय कार्य

मुलाखतीचा ठिकाण : १०६/८, मकरंद अपार्टमेंट, केतकर रोड, एरंडवणे,

पुणे ४११ ००४

मुलाखतीचा दिनांक : ३०/०८/२०१२

वेळ : सायं. ७.०० वाजता.

१९४६ पासून कम्युनिष्ट पक्षाच्या सभासद असलेल्या शांताबाई मधुकर रानडे यांचा जन्म २६ जून १९२५ रोजी पुण्यात सदाशिव पेठेत झाला. त्यांचे वडील गणेश रामचंद्र साठे यांचा बिस्कीट व चॉकलेट चा व्यवसाय होता. शांताबाई यांचे प्राथमिक शिक्षण हे महापालिकेच्या शाळेत व माध्यमिक शिक्षण एस.एन.डी.टी. कन्या शाळेत झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांचा ऑल इंडिया फेडरेशन या विद्यार्थी संघटनेशी संबंध आला. त्यांच्या नियमित चालत असलेल्या स्टडी सर्कलमध्ये त्या सहभागी होत असत. १९४२ चा काळ स्वातंत्र्याच्या चळवळीने भारलेला होता. त्यामुळे विद्यार्थी संघटना त्यामध्ये सहभागी होत असत त्या वेळी निदर्शने, आंदोलने मोठ्या प्रमाणावर होत. या संघटनेवर प्रामुख्याने कम्युनिष्ट पक्षाचा प्रभाव असल्यामुळे साहजिकच

शांताबाई रानडे या कम्युनिष्ट पक्षाकडे ओढल्या गेल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कम्युनिष्ट पक्ष हा महत्त्वाचा घटक असल्यामुळे त्या या चळवळीकडे ओढल्या गेल्या. १९४७ च्या सुमारास मधुकर गणेश रानडे या कम्युनिष्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबत नोंदणी पद्धतीने विवाह झाला. नंतरच्या काळात त्या अखिल भारतीय महिला परिषद या संघटनेतही काम करीत असत.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची सुरुवात मुंबईतही झाली; पण सत्याग्रहांची सुरुवात मात्र पुण्यात झाली. पुण्यात शनिवारवाड्यावर जी पहिली सभा झाली ती पुण्यातील तरुण मंडळींनी (तालमी) एकत्र येऊन घेतली होती. ती इतकी प्रचंड  झाली की, त्यातच व्ही.डी.चितळे, कॉ. डांगे, आणि एस.एम.जोशी यांच्या उपस्थितीत सत्याग्रहाची घोषणा केली आणि त्यातूनच पुण्यात सत्याग्रह सुरू झाले.

पुणे हे तेव्हा वाड्याचे शहर होते. एकेका वाड्यात १५ ते २० कुटुंब राहत. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रचार करण्यासाठी वाड्यांमधून सभा घेतल्या. महिला नेहमी देवळात जात त्यामुळे देवळात जाऊन त्यांचे छोटे छोटे गट पाडून संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न काय आहे. त्यामागे आर्थिक राजकारण काय, मराठीतून राज्या कारभार चालणे कसे आवश्यक आहे हे शांताबाई रानडे यांना तिथे समजावून सांगत. शांताबाईसोबत मालतीबाई गाडगीळ, अंबूबाई टिळेकर, कांताबाई चोरगे, वत्सलाबाई गायकवाड यांचा सहभाग होता.

छोट्या मोठ्या जाहीरसभा तर पुण्यात रोजच घेतल्या जात. मात्र मंडईत सभा असली तर शनिपार, मिनर्व्हा टॉकीज, नव्या पुलाच्या कट्ट्यापर्यंत सर्व रस्ते भरलेले असत. क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. डांगे, आचार्य अत्रे यांच्या सभा तर तीन तीन तास

चालत. या सर्व सभांना महिलांची अलोट गर्दी असे. त्यांची मानसिकता तयार करण्याचे काम या महिला नेतृत्वाने केले. १९५७ च्या निवडणुकीला कॉ. व्ही. डी. चितळे कसबा पेठेतून उभे होते. त्यांच्या निवडणुकीसाठी प्रचार आणि निधी गोळा करणे अशी दोन्ही कामे शांताबाई रानडे व त्यांच्या सहकारी महिलांनी केली. तसेच जनतेचा एवढा प्रक्षोभ वाढला होता की, पुण्यात काँग्रेस पक्षाचे आमदार किंवा खासदार आले आहेत हे समजल्यावर सर्वपक्षीय जनता त्यांच्या समोर निदर्शने करीत, त्यांना घेराव घालण्याचे काम जनतेने केले आहे. वृत्तपत्रांच्या बाबतीत विचार करावयाचे झाले तर त्या काळात पुणे शहराला प्रामुख्याने दोन प्रकारची वृत्तपत्रे होती. एक म्हणजे पूर्णपणे चळवळीला वाहिलेली. म्हणजेच दै. ‘केसरी’, दै. ‘प्रभात’ या सारखी दुसरे म्हणजे चळवळीला विरोध करणारी. यात प्रामुख्याने डॉ. ना. भि. परुळेकर यांचे दै. ‘सकाळ’ वृत्तपत्र त्याचबरोबर इतर इंग्रजी वृत्तपत्रे होती. त्यामुळे या वृत्तपत्रांनी या चळवळीविषयी ठोस भूमिका घेतली नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात जर वृत्तपत्र नसती तर चळवळ झाली नसती का, असे काही नाही. कारण ही चळवळ जनतेची होती. उत्स्फूर्तपणे जनता या चळवळीत सहभागी झाली होती. वृत्तपत्रे ही आंदोलनाला चालना देऊ शकतात किंवा विरोध करू शकतात. वृत्तपत्रे आंदोलन उभे करू शकत नाहीत. कोणतेही आंदोलन असो ही जनता उभे करीत असते. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी विरोध केला किंवा खोटा प्रचार केला तरी तो मोडून काढून जनता आंदोलन यशस्वी करू शकते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभागी होताना जो उद्देश होता, तो म्हणजे समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र. तो मात्र आजही ५० वर्षानंतर मला दिसत नाही. सीमाप्रश्न तर अजूनही रेंगाळत पडला आहे, ही खंत आजही माझ्या मनात आहे.

## परिशिष्टे क्र.३

# संदर्भ साधने

## प्राथमिक साधने

अ) वृत्तपत्रे / साप्ताहिके / मासिके

१) दै. सकाळ : दै.सकाळचे मूळ अंक (इ.स.१९५४ ते १ मे १९६० अ.क्र.४००

२) दै. केसरी : दै. केसरी वृत्तपत्राचे मूळ अंक

३) दै. मराठा : दै. मराठा वृत्तपत्राचे मूळ अंक

४) दै. पुढारी : दै. पुढारी वृत्तपत्राचे मूळ अंक

५) दै. प्रभात : दै. प्रभात वृत्तपत्राचे मूळ अंक

६) साप्ताहिक युगांतर : साप्ताहिक युगांतरचे मूळ अंक

७) साप्ताहिक मौज : साप्ताहिक मौजचे मूळ अंक

८) साप्ताहिक साधना : साप्ताहिक साधनाचे मूळ अंक

**ब) अहवाल (मराठी)**

१. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे वार्षिक अहवाल, २००१–२००२

२. पंढरपुरे राजेंद्र श्रीराम, पत्रकार संघाची हीरकमहोत्सवी स्मरणिका –१९९७–०२

३. पत्रकार दर्पण संपादक प्रसाद मोकाशी–ज्येष्ठ पत्रकार विशेषांक मुंबई मराठी पत्रकार संघ ३ जानेवारी २०१०

४. पत्रकार दर्पण संपादक कुमार कदम– ज्येष्ठ पत्रकार विशेषांक मुंबई मराठी पत्रकार संघ दिवाळी अंक २००७

५. कॉ. गोविंद पानसरे– अमृत महोत्सव गौराविका कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती कोल्हापूर १३ नोव्हेंबर २०१०

६. राष्ट्र सेवा दल पत्रिका स्वातंत्र्यदिन विशेषांक वर्ष ४९ अंक क्र.३ ऑगस्ट २००९

७. समाजव्रती साथी पन्नालाल सुराणा गौरव समिती गौरव अंक ८ जुलै २०१२.

८. महाराष्ट्र राज्य स्वर्ण महोत्सव गौरव अंक २०१० संपादक कॉ.किरण माने

**क) पुस्तके**

१. पेंडसे लालजी : महाराष्ट्राचे महामंथन, साहित्य सहकार संघ लि.,दादर, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९५.

२. फडके य.दी. : केशवराव जेधे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १२ नोव्हेंबर १९८२

३. गुप्ते आर.एस. : द. हिस्ट्री ऑफ मॉडर्न चायना, नॅशनॅलिझम ॲण्ड कम्युनिझम इन इंडिया, स्टिर्लिंग प्रकाशन,१९७४

४. लेले रा.के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८४.

५. सेन एस.पी. : इंडियन प्रेस कलकत्ता, इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज, १९६७

६. कानडे रा.गो. : मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाउस, १९३८

७. शहा,वष्ट, राशिनकर : १९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्य : (संपादक) कोठारी जन्मशताब्दी समिती,पुणे.

८. अत्रे प्र.के. : मी कसा झालो? परचुरे प्रकाशन,मुंबई,आ.द.२०००

९. कोठारी वा.रा. : जुन्या आठवणी : संकल्प प्रकाशन पुणे १९७३

१०. शहा,वष्ट,राशिनकर : १९९३ प्रभातकार वा.रा.कोठारी विचार व कार्य : वा.रा.(संपादक) कोठारी जन्मशताब्दी समिती, पुणे.

११. अत्रे प्र.के. : कऱ्हेची पाणी : खंड १ ला परचुरे प्रकाशन :१९९७

१२. ठाकरे प्रबोधनकार : वास्तवतेच्या चष्म्यातून आचार्य अत्रे : अत्रे विविध दर्शन संपादक कृ.पा.कुलकर्णी व इतर : मुंबई १९५८

१३. डॉ.परुळेकर ना.भि.:निरोप घेता आत्मचरित्र, सकाळ प्रकाशन,पुणे.

१४. महाजनी ह.रा. : संयुक्त महाराष्ट्राची समस्या, १९५७ केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई.

१५. शेख मल्लिका अमर :सुर एका वादळाचा : १९९२: मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई

१६. कारखानीस सरला :संयुक्त महाराष्ट्राच्या हुतात्म्याची कहाणी : एप्रिल १९५६ : प्रकाशन आणि पृष्ठ क. आढळत नाही.

१७. सत्यान्वेषी : संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत : १९५८: प्रकाशकाचे नाव आढळत नाही.

१८. बागल माधवराव : जीवनप्रवाह भाग : ३:१९५७: संपादकाचे हंटरकार खंडेराव गोपाळराव बागल यांचे निवडक लेख

१९. पटवर्धन अप्पा : जीवनयात्रा : १९७१: परंधाम विद्यापीठ प्रकाशन वर्धा

२०. चव्हाण यशवंतराव : विधिमंडळातील निवडक भाषणे : खंड १

२१. चव्हाण यशवंतराव : प्रेस्टिज पब्लिकेशन सदाशिव पेठ, पुणे द्वितीय आवृत्ती : १९८६

२२. जोशी एस.एम. : मी एसेम : आत्मकथा : प्रथमावृत्ती : १९८४ कॉन्टिनेण्टल प्रकाशन पुणे.

२३. कोठारी वा.रा. : जुन्या आठवणी : संकल्प प्रकाशन पुणे

२४. सरकार जदुनाथ : शिवाजी ॲण्ड हिज टाइम्स, नवी दिल्ली, २०११ पृष्ठ क्र. ८.

२५. डॉ.देशमुख गो.वि. : संयुक्त महाराष्ट्राचे मारेकरी, प्रकाशकाचे नाव आढळत नाही, पृष्ठ क्र. ५३

२६. महाजनी ह. रा. : संयुक्त महाराष्ट्राची समस्या.

## संयुक्त महाराष्ट्रासंबंधी दै. सकाळ वृत्तपत्रातील अग्रलेख

२७. दै. सकाळ : १ फेब्रुवारी १९५५ चा अग्रलेख (डाव्यांचा एक नवा पक्ष)

२८. दै. सकाळ : १८ मार्च १९५६ चा अग्रलेख (पजा समाजवाद्यांचा गोंधळ)

२९. दै. सकाळ : ६ एप्रिल १९५७ चा अग्रलेख (समितीला राजकीय दिशा)

३०. दै. सकाळ : ३ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (नेतेपणाची परवड)

३१. दै. सकाळ : २४ सप्टेंबर १९५५ चा अग्रलेख (पुढारपण गमावेल भीती)

३२. दै. सकाळ : २३ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (नेहरूंचा सल्ला)

३३. दै. सकाळ : ५ ऑक्टोबर १९५६ चा अग्रलेख (पं.नेहरूंच्या सभेत गोंधळ)

३४. दै. सकाळ : ४ ऑक्टोबर १९५६ ची बातमी

३५. दै. सकाळ : १४ एप्रिल १९५६ चा अग्रलेख (भाषिक वादातून गुंडगिरी)

३६. दै. सकाळ : २४ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (भाषेची अडचण का)

३७. दै. सकाळ : ११ डिसेंबर १९५६ चा अग्रलेख (हा विजय कुणाचा)

३८. दै. सकाळ : २ सप्टेंबर १९५७ चा अग्रलेख (राष्ट्रीयतेस लागलेली कीड)

३९. दै. सकाळ : १७ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (विद्यार्थ्यांची ही वाट नव्हे)

४०. दै. सकाळ : ४ सप्टेंबर १९५९ चा अग्रलेख (पराभव कोणाचा)

४१. दै. सकाळ : २९ मार्च १९६० चा अग्रलेख (बांडगुळांचे विसर्जन)

४२. दै. सकाळ : १ फेब्रुवारी १९५५ चा अग्रलेख (डाव्यांचा एक नवा पक्ष)

४३. दै. सकाळ : १८ मार्च १९५६ चा अग्रलेख (प्रजा समाजवाद्यांचा गोंधळ)

४४. दै. सकाळ : ६ एप्रिल १९५७ चा अग्रलेख (समितीला राजकीय दिशा)

४५. दै. सकाळ : ३ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (नेतेपणाची परवड)

४६. दै. सकाळ : २४ सप्टेंबर १९५५ चा अग्रलेख (पुढारपण गमावेल भीती)

४७. दै. सकाळ : २३ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (नेहरूंचा सल्ला)

४८. दै. सकाळ : ५ ऑक्टोबर १९५६ चा अग्रलेख (पं.नेहरूंच्या सभेत गोंधळ)

४९. दै. सकाळ : ४ ऑक्टोबर १९५६ ची बातमी

५०. दै. सकाळ : १४ एप्रिल १९५६ चा अग्रलेख (भाषिक वादातून गुंडगिरी)

५१. दै. सकाळ : २४ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (भाषेची अडचण का)

५२. दै. सकाळ : ११ डिसेंबर १९५६ चा अग्रलेख (हा विजय कुणाचा)

५३. दै. सकाळ : २ सप्टेंबर १९५७ चा अग्रलेख (राष्ट्रीयतेस लागलेली कीड)

५४. दै. सकाळ : १७ डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (विद्यार्थ्यांची ही वाट नव्हे)

५५. दै. सकाळ : ४ सप्टेंबर १९५९ चा अग्रलेख (पराभव कोणाचा)

५६. दै. सकाळ : २९ मार्च १९६० चा अग्रलेख (बांडगुळांचे विसर्जन)

५७. दै. सकाळ : २७ जुलै १९५९ चा अग्रलेख (सोंगाड्याचा संकल्प)

५८. दै. सकाळ : ३० डिसेंबर १९५५ चा अग्रलेख (कुस्तीगीर पुढारी)

# दुय्यम संदर्भ साधने


## इ) अप्रकाशित एम.फिल. शोधनिबंध (मराठी)

१. पवार संजय : २००३ : पत्रकारांच्या संघटना, पुणे श्रमिक पत्रकार संघ, एक अभ्यास : एम.सी.जे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी सादर केलेला लघुप्रबंध : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

## ई) अप्रकाशित पीएच.डी. शोधनिबंध (मराठी)

१. सौ .मंदा किशोर आदमाने : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि प्राचार्य गो. ग. आगरकर यांचा तौलनिक अभ्यास.

२. सौ. मंजूषा पंकज पवनीकर : मराठी दैनिकांचा संपादकीय दृष्टिकोन अभ्यासणे.

३. डॉ. ऋतुजा विकास खोत : महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय स्थिती आणि वा. रा. कोठारी यांचे योगदान (१९१५–१९६०)

४. डॉ. शिवाजी गजेंद्र जाधव : कै.डॉ.ग.गो.जाधव यांची पत्रकारिता एक विश्लेषणात्मक अभ्यास.

५. प्रा.दिगंबर अप्पासाहेब खेडेकर : यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील योगदान.

## उ) संशोधनपर लेख

१. गांधी पुष्पा : वाचा, लिहा, कामात मग्न रहा सांगणारे प्रेमळ दादा प्रभात, १२.०९.१९९१

२. मटकर जयानंद : गोवा स्वातंत्र्य संग्रामातील सत्याग्रह पर्व : दै. सकाळ कोल्हापूर १५ ऑगस्ट २००४.

## ऊ) संदर्भग्रंथ


१. जैन अशोक : महाराष्ट्र शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन,मुंबई प्रथमावृत्ती, जून १९९३

२. व्होरा राजेंद्र (संपा.): समाजप्रबोधन पत्रिका पुणे (त्रैमासिक),वर्षे ३८, अंक १५५, एप्रिल जून २००१

३. विसपुते एस. एम. : माणूस नेता एसेम, चेताश्री प्रकाशन, अमळनेर प्रथमावृत्ती, १ एप्रिल २०००

४. राजहंस बा. न. : संयुक्त महाराष्ट्र राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही, प्रकाशक चिटणीस प्रजा सोशॅलिस्ट पार्टी (महाराष्ट्र), प्रथमावृत्ती १९५८

५. फडके य. दि. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड –५, राजकीय इतिहास (१९४० ते १९४७), श्री.विद्या प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती,१५ एप्रिल, १९९७

६. सरकार चंचल :कहाणी वर्तमानपत्राची (अनुवाद : दिनकर गांगल), नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९८९

७. सुतार, पटवर्धन : वर्तमानपत्राचा इतिहास, शिक्षण संक्रमण, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, जुलै २००३

८. गोखले किरण : पत्रकारिता विद्या वृत्तसंकल (लेख), भट गो.आ.,

मॅजिस्टिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००३

९. मूर्ती एन. के. : द फार गॉटन हीरो ऑफ इंडियन प्रेस, जे.ए.हिकी, विदुर खंड–१७, अंक–१, फेब्रुवारी १९८०

१०. अकलूजकर प्रसन्नकुमार : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे अंतरंग, श्री. विद्या प्रकाशन, सप्टेंबर २०००

११. सेन एस. पी. : द इंडियन प्रेस : राव वसंत द बिगनिंग ॲण्ड ग्रोथ ऑफ दी मराठी प्रेस, कलकत्ता इन्स्टिटट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज, १९६७

१२. शहा,वष्ट राशिनकर : १९९३ प्रभातकार वा. रा. कोठारी विचार व कार्य : . (संपादक) कोठारी जन्मशताब्दी समिती पुणे

१३. माळी मा. गो. व इतर : भाई माधवराव बागल (निवडक लेखसंगह) महाराष्ट्र राज्य (संपादक)साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे

१४. खंडकर माधव : १९९३ कुशल व्यवस्थापन आणि व्यवहारी मालका (लेख)

१५. शिंदे अनिल : संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन १९९३

१६. सिरसीकर व. म. : २००९ आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण (इ.स.१९६०, २०००) कॅन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे.

१७. शहा, वष्ट, राशिनकर : १९९३ प्रभातकार वा. रा. कोठारी विचार व कार्य : (संपादक) कोठारी जन्मशताब्दी समिती,पृष्ठक्र.२५६

१८. शिंदे अनिल : संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, १९९३ पृष्ठ क्र. २५०––२५१

१९. चव्हाण नित्यानंद : आचार्य अत्र्यांची शिवशक्ती : मुंबई सकाळ : १२ नोव्हेंबर १९८३ : पृष्ठ क्र. ४

२०. कर्वे स्वाती : सकाळ वृत्तपत्र आणि वृत्तसमूह : न्यू एज प्रिंटिंग प्रेस,मुंबई

२१. लेले रा. कृ. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास : पहिली आवृत्ती,(१९५४), दुसरी आवृत्ती (२००४) कॉन्टिनेण्टल प्रकाशन : पुणे.

२२. गोखले किरण : २००३ : पत्रकारितेची विद्या : मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

२३. गाडगीळ न. वि. : १९९६ : समग्र काका : पथिक : भाग दोन, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२४. जोग रा. श्री. (संपादक) : १९७३ : मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड :५ भाग–१, पुणे

२५. जोशी रामभाऊ : १९७६ : यशवंतराव– इतिहासाचे एक पृष्ठ केसरी मुद्रणालय, पुणे

२६. देव शंकरराव : १९७६ : देव देते पण कर्म नेते, सासवड आश्रम विश्वस्त मंडळ, सासवड

२७. केळकर न. चि. : १९२८ : टिळक समग्र वाङ्मय, खंड– ३, भाग –२, पुणे

२८. सरदार गं. बा. : १९७५ : आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार : प्रथमावृत्ती व्हीनस प्रकाशन, पुणे.

२९. प्रधान ग. प्र. : १९७१ : आगरकर लोकसंग्रह : प्रकाशन साहित्य

अकादमी : नवी दिल्ली.

३०. शिरसीकर व. म. : २००१ : आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण (इ.स.१९६०––२०००) : कॉन्टिनेण्टल प्रकाशन,पुणे.

३१. केळकर न. चिं. :१९३९ : गतगोष्टी–अर्थात माझी जीवनयात्रा य. न. केळकर (प्रकाशक), केसरी प्रेस, पुणे.

३२. काळे भीमराव : १९८८: संयुक्त महाराष्ट्र : काल आणि आज : संकेत प्रकाशन : जालना.

३३. बागल माधवराव : १९३० : श्री शाहू सत्यशोधक समाज करवीरतर्फे सत्यशोधक हीरकमहोत्सव ग्रंथ

३४. बेणारे गोपाळ : २००१ : मराठी वृत्तपत्रसृष्टी : फडके प्रकाशन,कोल्हापूर

३५. ठाकरे के. सी. : १९७३ : माझी जीवनगाथा (संपादक : बाळासाहेब ठाकरे) सोमय्या प्रकाशन, मुंबई.

३६. बेडेकर दि. के. : संयुक्त महाराष्ट्र : १९४७, चित्रशाळा प्रकाशन, पुणे

३७. भुस्कुटे वि. वि. : जवाहरलाल नेहरू विचारधारा : राजकारण आणि धर्म : (अनुवाद)१९८९ नृसिंह प्रकाशन, डोंबिवली.

३८. गोरे ना. ग. (अनुवाद) : पंडित नेहरू आत्मकथा : जातीयतेचे थैमान : धर्म म्हणजे काय : कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे.

३९. नेहरू पंडित जवाहरलाल : जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन,१९३४ कॉन्टिनेण्टल प्रकाशन,पुणे.

४०. पटवर्धन वसंत (संपादक) : एस. एम. जोशी : व्यक्ती, वाणी, लेखणी :१९९४ प्रकाशकाचे नाव आढळत नाही.

४१. चव्हाण यशवंतराव : ऋणानुबंध : १९७९ प्रेस्टिज प्रकाशन,पुणे.

४२. मांगले महेश : लढा संयुक्त महाराष्ट्राचा : मल्टिग्राफ प्रेस प्रा.लि.पुणे

४३. मुणगेकर श्री. ग. (संपा) : परिवर्तनाचे प्रवाह : महाराष्ट्र १९३२ ते १९८२ : सकाळ प्रकाशन, पुणे.

४४. प्रा. काळे भगवान : संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज : संकेत प्रकाशन जालना

४५. काळे वि. र. : आचार्य अत्रे महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व : वसंत बुक स्टॉल दादर, मुंबई पृष्ठ क्र.१८१

४६. प्रधान गणेश प्रभाकरः आगरकर लेखसंग्रह

४७. रा. के. लेले : मराठी वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास

४८. भांडारकर पु. ल. : सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती औरंगाबाद ४ थी आवृत्ती,१९९९,पृष्ठ क्र.२८९

४९. प्रा. यंग पी. व्ही. : समाजशास्त्रीय संशोधन (अनु.डॉ. वा. भा. पाटील) प्रथम आवृत्ती, १९९८ मंगेश प्रकाशन,पृष्ठ क्र. २९

५०. डॉ.संत दु. का. : शोध विज्ञानकोश—साधन संदर्भ ग्रंथ, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे १९८५ पृष्ठ क्र.२३४

५१. प्रा. वेबस्टर : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती (अनु. प्रा. रा. ना. घोटाळे) सातवी आवृत्ती,२००० मंगेश प्रकाशन, पृष्ठ क्र. ४१

५२. प्रा. गुड व हॅट : सामाजिक संशोधन पद्धती, पु. ल. भांडारकर, आवृत्ती ४ थी, २०००, पृष्ठ क्र.९७

५३. बेस्ट जे. डब्ल्यू : रिसर्च इन एज्युकेशन, प्रेन्टिस हॉल ऑफ इंडिया, १९६३, पृ. ४.

५४. नाडगोंडे गुरुनाथ : सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६, पृष्ठ क्र.१२

५५. घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन–तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर २००८–०९, पृष्ठ क्र.५

५६. धारूरकर व्ही. एल. : मास कम्युनिकेशन अॅण्ड कल्चर,गांधीज कॉन्ट्रिब्युशन टू इंडियन जर्नालिझम.

५७. महजन व्ही. डी. : एंशियंट इंडिया,एस.चांद अॅण्ड कंपनी, नवी दिल्ली, पृष्ठ क्र.३९१

५८. सहस्त्रबुद्धे पु. ग. : महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे, २००३, पृष्ठ क्र. १५८

५९. साने रविकरण : लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र.१

## ए) मुलाखती

| अ.क्र. | नांव | पत्ता | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनंत विष्णू आजगांवकर | मु.पो.अत्तूर,ता.आजरा, जि. कोल्हापूर | १३/०६/२०१२ |
| २ | श्रीमती.मृणाल केशव गोरे | केशव गोरे स्मारक,आरे रोड, गोरेगांव, मुंबई पश्चिम | १०/०२/२०१२ |
| ३ | श्री.दिनू रणदिवे | घामट टेरेस,दादर पश्चिम मुंबई | १५/०८/२०१२ |
| ४ | कॉ.गोविंद पंढरीनाथ पानसरे | १७ आयडीयल सोसायटी, सागरमाळ ई वॉर्ड, कोल्हापूर ४१६६०८ | १३/०६/२०१२ |
| ५ | दत्तात्रय बाळकृष्ण ताम्हणे | श्री.राहुल नाचणे, ७०२,अमृत सोसायटी मुलुंड(पुर्व) ४१ | ०६/०७/२०१३ |
| ६ | श्री.वसंत आत्माराम मोरे | ६७/२,आराम नगर, वेसावे, पश्चिम अंधेरी,मुंबई ४११०६१ | ०८/०४/२०१३ |
| ७ | श्री.मधू शेटे | न्यू मुन्यूपाल बिल्डिंग,प्लॉट क्र.३०,चौथा माळा, नाना चौक, ग्रॅन्ट रोड, पश्चिम मुंबई–४०० ००७ | ०९/०४/२०१३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री.अरविंद वासुदेव नाचणे | ऑल इंडिया फेडरेशन एल.आय. सी. कामगार फेडरेशन, बॉम्बे मॅच्युअल बिल्डिंग दुसरा माळा, रस्तुम सिदवा मार्ग फोर्ट,मुंबई ४००००१ | १६/०८/२०१२ |
| ९ | भाई वैद्य | तोरणा,मनमोहन पार्श्वनाथ सोसायटी, बिबवेवाडी,पुणे– ४११०३७ | १३/०६/२०१२ |
| १० | श्री.डॉ.बाबूभाई डबूवाला | न्यू मन्युपाल बिल्डिंग,चौथा माळा, नाना चौक ग्रेन्ट रोड, पश्चिम मुंबई–४०० ००७ | १५/०८/२०१२ |
| ११ | पन्नालाल सुराणा | मु.पा.आसू,ता.परंडा, जि.उस्मानाबाद | १३/०६/२०१२ |
| १२ | श्रीमती.शांताबाई मधुकर रानडे | १०६/८,मकरंद अपार्टमेंट, केतकर रोड, एरंडवणे, पुणे– ४११००४ | ३०/०८/२०१२ |

परिशिष्टे क्र. ४

अ) अग्रलेख सुची क्र. १

6 एप्रिल 1957 - अग्रलेख - क्रमांक - १

# सकाळ

## समितीला राजकीय दीक्षा

नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने नांवारूपास आलेली 'संयुक्त महाराष्ट्र समिति' निवडणुका संपल्यानंतर टिकून कशी राहील, अशी,तीं टिकविण्यांत हितसंबंध गुंतलेल्या व्यक्ति आणि संघटनांना घोर चिंता लागून राहिली होती. मुंबईंत समितीच्या मध्यवर्ती समितीची एक बैठक भाई एस. ए. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. सतत सात तासपर्यंत समितीच्या भवितव्यावर विचारविनीमय झाला. अखेर निर्णय घेण्यांत आला कीं समिति स्वतंत्र राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वांत यावी. तिचे सभासदत्व कोणत्याहि पक्षावर आधारलेले न ठेवता सभासदांची नोंदणी स्वतंत्रपणेच व्हावी. विचित्र परिस्थितीने एकत्र आले आणि सुखी संसार करू म्हणू लागले, अशातलीच गत या संघटनेत दाखल झालेल्यांची होती. त्यांच्यापैकी अनेकांना समितीत एकत्र रहाण्याचे कोठलेहि नैतिक बंधन नको होते, पण तसे बंधन नसेल तर हे तारु कोठल्याच प्रश्नावर एकमताची कड गांठू शकणार नाही, याचा उमज पडून मध्यवर्ती समितीने आता नवा निर्णय घेतला आहे. निवडणुका संपल्यानंतर समितीचे एक नेते साथी एस. एम. जोशी यांना या संबंधात प्रश्न विचारला असता त्यांनी सांगून टाकले होते कीं विधिमंडळांत निवडून आलेल्या या आमदारांनी संघटित विरोधक म्हणून एकजुटीने काम करावे कीं नाही हा प्रश्न समितीत दाखल झालेल्या निरनिराळ्या पक्षांनीसोडवावयाचा आहे. त्यांच्या या विधानाने खूपच खळबळ माजली आणि आता समिति म्हणून कांही जाग्यावर उरते कीं नाही असे धास्तावलेले विचार समितीचे कांही लोक प्रकट करू लागले. त्यांना दिलासा देण्यासाठीच मुंबईतील नवा निर्णय घेण्यांत आलेला आहे.

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति हेच समितीचे एकमेव ध्येय,असे सांगण्यांत येते. त्यासाठी या ध्येयाचे आम्हीहि अभिमानी म्हणून सांगत जे पुढे आले आहेत त्यांच्यातच समिति राजकीय पक्ष बनू नये असा प्रथमपासूनचा विरोधी सुराचा आग्रह सुरू होता. आपण याबाबतीत आतापर्यंत अधांतरी राहिलो ही चूक झाली, असे समिति नेत्यांना वाटू लागले. विधिमंडळांत आणि बाहेर जेथे जाऊ त्या ठिकाणी लोक आपणास जाब विचारतात कीं निवडणुकीचे वेळी तुम्ही आम्हाला आश्वासने देऊन सांगत होता कीं 'आम्ही सारे एक' आणि मग महत्वाच्या प्रश्नावर तुमचे निरनिराळे पक्षनिष्ठ धोरण कसे? असे त्यांना वाटले असणे स्वाभाविक होते. ही विचित्र परिस्थिति टाळण्यासाठी समिति आता स्वतंत्र पक्ष बनणार आहे. आगामी म्युनिसिपल निवडणुका व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड निवडणुका यांची ही पूर्वतयारी आहे. या बनावांत कम्युनिस्टांचा वरचष्मा कायम रहाणार आहे, बाकीचे शे. का. फे., शे. का. प., जनसंघ, कॉंग्रेसजन वगैरे मंडळी कम्युनिस्ट रिंगमास्टरांसाठी त्यांच्या भालदार-चोपदारांच्या भूमिका वठविणारीच आहेत. त्यांची स्वत:ची कुवत थोडी, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या लाटेने त्यांचेपैकी कांहींना लोक नेते बनविले व उचलून मानाच्या जागांवर बसविले. आपले घोडे गंगेत न्हायले अशा विजयाच्या भावनेत बिनचुके नेते मश्गुलआहेत.यापुढे आपणास कोणी आणखी कांही हेतुसाठी वापरले तरी त्याची त्यास चिंता नाही. मुख्य प्रश्न आहे तो प्रजासमाजवाद्यांचा. आतापर्यंत निवडणूक प्रचाराच्या धगीने ते आणि कम्युनिस्ट एकत्र नांदले असले तरी समितीच्या नव्या बनावांत ते कोठे रहातील, नेतेपणांत त्यांची कितवी पायरी राहील,हा धास्तीचा विचार त्यांच्या मनांत घर करून राहिल्याशिवाय रहाणार नाही. समितीची निर्मिति आणि चलती म्हणजे आपले नशीब काढण्याची पर्वणी अशा विचाराने वावरणाऱ्या धूर्तांची संख्याहि समितीत कांही थोडीथोडकी नाही. आता समितीचा सभासद म्हणून जो नागरिक नव्याने दाखल होईल त्याला आस्तेकदम आपल्या झेंड्याखाली नेऊन कसा उभा करावयाचा,याची चुरस या आंवळ्यांच्या मोटेतून निर्माण झालेल्या राजकीय पक्षांत सुरू होणे अटळ आहे. राजकीय सोंगाडेपणाचा एक प्रयोग आर. एस. एस. आणि जनसंघ यांच्या परस्पर संबंधात यापूर्वी जनतेपुढे आलेला आहे. टोप्या बदलून संघवाले जनसंघ सभासद म्हणून त्या पक्षांची सूत्रे आपल्या हाती वागवू लागले. त्यामुळे तेथे स्वतंत्र वृत्तीच्या कार्यकर्त्यांना काम करणे मुश्कील होऊन ते संघाच्या या राजकीय भोंदूगिरीतून बाजूस सरले. आता समितीमध्ये जमा झालेले बारभाई पक्षनिष्ठा बाजूस ठेवून दीर्घकाळ एकत्र काम करतील ही कल्पना समितीच्या नेत्यांनी कितीहि आकर्षक भाषेत मांडली तरी प्रत्यक्षांत ती कितपत खरी ठरेल याची वानवाच आहे. एस. टी. अस्तित्वांत

विरोधी पक्ष हा निव्वळ अधिकारारूढ पक्षाला खाली ओढण्याच्या सूत्रानेच एकत्र बांधला गेला असेल तर विचार आणि कृतीचा एकजिनसीपणा त्यांचेमध्ये कधीच निर्माण होत नाही. आपण विरोधक आहोत, तेव्हा विधायक विचार करण्याची आपल्यावर कांही जबाबदारी नाही, अशीच त्यांनी स्वत:ची ठाम समजूत करून घेतलेलीअसते.लोकांच्या डोळ्यापुढेआपण सतत रहावे म्हणून ते राज्यकारभारात सतत नवे अडथळे निर्माण करण्यावरच भर देतात आणि यांतून विध्वंसक कृत्यांना त्यांचेकडून स्वयंस्फूर्त प्रशस्तिपत्रके दिली जातात. परंतु अशा तऱ्हेने सध्या देशांत भासत असलेल्या कणखर विरोधी राजकीय पक्षाची उणीव कधीहि भरून निघणार नाही आणि कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली गोळा होऊन आपण तो अभूतपूर्व चमत्कार करून दाखवू अशी उमेद बाळगणारे अखेर जाणून बुजून स्वत:ची वंचनाच करीत होते असेच आढळून येईल.समितीत दाखल झालेल्या अनेक पक्षांजवळ वैयक्तिक स्वार्थ व प्रतिष्ठेला अग्रमान आहे. लोकसेवेचा विचार अस्तित्वात असलाच तर तो दुय्यम अथवा तिसऱ्या प्रतीचा म्हणूनच. आणि देशाच्या आर्थिक आणि राजकीय प्रगतिबाबतची त्यांची साधने व ध्येये परस्परांना पूरक तर नव्हेच परंतु काटशह देणारी असतात. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी एकमेकांच्या हेतूबद्दल नेहमीच साशंक आहेत त्यांनी एकत्र यण्याचे नाटक केले तरी ते किती काळ टिकणार आणि जनमतावर तरी त्याचा परिणाम काय होणार?

संयुक्त महाराष्ट्र समितीला राजकीय दीक्षा देण्याचा विधि आता पार पडला. तेव्हा त्याच पावलावर पाऊल ठेवून गुजरातमधील 'महागुजरात जनता परिषदेला'हि आपला दीक्षाविधि उरकावा अशी भावना होईल.कारण परिषद म्हणजेहि असेच परस्पर विरोधी राजकीय पक्षांचे कडबोळे आहे. म्हणजे वरकरणी उभय गटात सारख्याच अंतराने पवित्रे पडत रहातील.अद्याप समिति आणि परिषदेत संयुक्त आघाडी निर्माण करण्याबद्दल निर्णायक बोलणी व्हावयाची आहेत. ती होतील तेव्हा त्यात आपण जिंकू, असा आशावाद समितीच्या कार्यकर्त्यांना वाटत आहे. पण भाषिक अभिनिवेशाने एकत्र आले तरी परस्परांच्या दृष्टिकोनाबद्दल समजूतदारपणा दाखवून समझोत्याने प्रश्न निकालात काढण्याच्या बाबतीत मात्र या दोन्ही गटांतील नेत्यांच्या भूमिका समिति आणि परिषद जन्मास येण्यापूर्वीच्या काळच्याच, एकमेकास पाण्यांत पहाणाऱ्या, अद्याप कायम आहेत. तेव्हा 'तुम्ही आम्ही एक' ही भाषा समिति आणि परिषद यांच्या संभाव्य एकजुटीबाबत जितकी तकलुपी तितकीच निरनिराळ्या छोट्या मोठ्या राजकीय पक्षांचे समितीतील अस्तित्व कायम राखून त्या सर्वांवर पांघरूण घालणारी अशी राजकीय पक्ष बनलेल्या समितीची एकजूटहि अखेर बेगडीच ठरेल.

12 जून 1957 - अग्रलेख - क्रमांक - २

# सकाळ

## डांगेशाही

संयुक्त महाराष्ट्र निवडणूक समितीचे अध्यक्ष श्री. एस. ए. डांगे यांनी मुंबईतील नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत एक चोवीस पानी पुस्तिका अहवाल म्हणून प्रसिद्ध केली. तिच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की 'हा छोटेखानी अहवाल मोठ्या ग्रंथाचा विसार म्हटला पाहिजे.' प्रसिद्ध झालेला अहवाल समितीने औपचारिकरीत्या स्वीकारलेला (has not been formally adopted) नाही, हेहि त्यांनी नमूद केले आहे. संयुक्त महाराष्ट्र निवडणूक समितीचे मुख्य आधारस्तंभ म्हणजे कम्युनिस्ट आणि प्रजासमाजवादी पक्ष. निरनिराळे पक्ष आणि गट अशा दहा संघटनांखेरीज समितीत आणखी काही स्वतंत्रहि दाखल झालेले आहेत,. पण समितीचे मुख्य बळ म्हणजे डावे पक्ष असा भाई डांगे यांनी उल्लेख केलेला आहे. डाव्यांच्या राजकारणाचा अर्क कम्युनिस्ट हा संकेत त्यांच्या मनाशी ठाम असल्याने समिति कम्युनिस्टांच्या बळावर चालली आहे, हे त्यांना ध्वनित करावयाचे होते. ते त्यांनी या अहवालात साधून घेतले आहे. परंतु त्याहिपेक्षा अधिक प्रमाणात त्यांनी आपली पक्षीय उद्दिष्टे या अहवालात समितीच्या नांवावर खपविलीआहेत.तीहि स्वतःच्याच बरोबरीने मानला गेलेला समितीचा दुसरा आधारस्तंभ प्रजासमाजवादी पक्षाच्या शिरोधाला लाथाडून, हे विशेष. नाशिक येथील महाराष्ट्र प्रजासमाजवादी पक्षाच्या खास अधिवेशनात भाई डांगे यांच्या या अरेरावीच्या दुखण्यास सभासदांनी नाइलाजाने वाचा फोडली.

नाशिकच्या अधिवेशनात महाराष्ट्र प्रजासमाजवाद्यांनी भाई डांगे यांच्या अहवालाचा निषेध करणारा एक ठराव पास केला. त्यात म्हटले आहे की या अहवालावर समितीत चर्चा झालेली नव्हती. त्यातील काही विधाने, समितीचे ध्येय आणि उद्दिष्टांशी विसंगत आहेत. एकंदरीत सबंध अहवाल समितीच्या ऐक्यास मारक ठरणारा आहे. या संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचा उल्लेख 'स्वतंत्र राष्ट्र' म्हणून करावा, ही गोष्ट अत्यंत निंद्य आहे. इतकेच नव्हे तर, समितीच्या ऐक्यास घातक आहे. संघटनेतील आपल्या अधिकारपदाचा उपयोग स्वतःच्या पक्षाच्या धोरणाचा पुरस्कार करण्यासाठी करावा, हीहि अत्यंत अश्लाघ्य गोष्ट होय. महाराष्ट्र प्रजासमाजवाद्यांना डांगेशाहीचा तापदायक सासुरवास बराच जाणवू लागलेला दिसतो. त्यामुळेच घरातील आदळआपट आता चव्हाट्यावर राजरोसपणे मांडण्यात त्यांना कसलाहि संकोच वाटत नाही.

भाई डांगे यांनी आपल्या अहवालात शेतकरी, कामकरी आणि कष्टकरी मध्यमवर्गीयातून उफाळून निघालेल्या उठावामुळे काँग्रेसचा पराभव झाला, ही एक महत्वाची राजकीय घटना घडली, असे म्हटले आहे. महाराष्ट्रीय मध्यमवर्ग भाषिक राष्ट्रीय निष्ठेशी ( Linguistic national loyalty ) सच्चा राहिला आणि निवडणुका जवळ येताच तो झटपट कामास लागला. 'भाषिक राष्ट्रवाद' हा शब्दप्रयोग या अहवालात दोन तीन ठिकाणी मुद्दाम घुसडून दिला आहे. समितीच्या यशाचे गमक सांगताना अहवालात एके ठिकाणी म्हटले आहे, 'समितीचा विजय काही अंध राष्ट्रवाद अगर भाषिक वाद अथवा प्रतिगामी प्रादेशिक वादाचे यश नसून क्रतीस तयार झालेल्या मराठीभाषिकांतील प्रागतिक राष्ट्रीय जाणीवेने हस्तगत केलेला तो विजय आहे. परंतु समितीच्या चळवळीमागील बळ फक्त भाषिक राष्ट्रवादापुरतेच मर्यादित नव्हते, तर लोकांनाच आपल्या लोकशाही हक्कांची जाणीव झाली होती, काँग्रेस हुकुमशाहीचे दुष्परिणाम त्यांना जाणवू लागले होते, राज्यकारभारातील लाचलुचपत व कष्टाळू जनतेपुढील प्रश्न सोडविण्यात अधिकारारूढ पक्षाला आलेले अपयश त्यांना दिसत होते. अशा प्रकारे समितीच्याकार्यक्रमातील इतरआवाडघांचाहि (Planks) लोकांच्या निर्णयावर परिणाम झाला.' म्हणजे तथाकथित भाषिक राष्ट्रवादापेक्षाहि इतर काही गोष्टी समितीच्या पदरात यश पाडण्यास कारणीभूत झाल्या, ही गोष्ट भाई डांगे मान्य करतात. त्यांच्या प्रमाणाबाबत फार तर इतरांशी मतभेद राहील. पण प्रजासमाजवाद्यांना आणखी काही काळ आपल्या भाईकडून अशाच जबर कोपरखळ्या खाव्या लागतील, तेव्हा कदाचित् कम्युनिस्टांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शिरून काय साधावयाचे आहे याची थोडी फार कल्पना त्यांना येऊ लागेल.

संयुक्त महाराष्ट्र समिति ही फुटिर गटांनी आपापले स्वतंत्र हेतु मनात धरून एकत्र येऊन निर्माण केलेली आघाडी आहे. परस्परांच्या गैरविश्वासाची अनेक खिंडारे तिला पडलेली आहेत. भाई डांगे यांनी अहवालात निर्वाळा दिला की जनसंघ, हिंदुमहासभा यासारख्यांचा समितीत समावेश असला तरी जातीयतेची किंचितहि छटा समिती—अनुयायात आढळली नाही. जातीयता आणि प्रांतीयता ज्यांच्या आचार विचारात नखशिखांत भरून राहिली आहे त्यांच्यात निराळी छटा आढळली नाही हे सांगण्याचे काही कारण नाही. लोक त्यांना समितीच्या जन्मापूर्वी ओळखत होते आणि समितीचे मंदिल बांधून ते हिंडू लागले, तेव्हांहि त्यांच्या डोक्यात एकाएकी राष्ट्रहिताचे विचार संचारले असतील, अशी कोणाची दिशाभूल झालेली नाही. परंतु काँग्रेसला खाली ओढण्यासाठी कम्युनिस्टांना कोठल्याहि पातळीवरील संकुचित वृत्तीचे लोक चालणार होते. कारण समिति म्हणजे आपली उद्दिष्टे साध्य करण्याचें एक आयते साधन एवढीच त्यांची दृष्टि आहे. त्यात प्रजासमाजवादी मात्र भावनात्मक दृष्टीने एकरूप होण्याचा प्रयत्न करीत असून समिति जगविण्यासाठी प्रसंगी स्वतःच्या पक्षाची छकले उडाली तरी चालतील, अशी इरेस पडल्याप्रमाणे ते भाषा वापरीत आहेत. परंतु त्यांचा त्याग आणि पक्षाच्या शिस्तीच्या बलिदानाची त्यांनी दाखविलेली तयारी ही अखेर प्रजासमाजवाद्यांना खच्ची करणारी व समितीत वरचढ ठरलेल्या डांगेशाहीला खतपाणी पुरविणारी सामुग्री ठरेल.

o o o o

12 जुलै 1957 - अग्रलेख - क्रमांक 3

# सकाळ

## ते आणि हे चित्र

मुंबई असेंब्लीचे नवे अधिवेशन तारीख १७ जूनपासून सुरू झाले, त्यात संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार म्हणून निवडून आलेल्यांनी तीन आठवड्यात तीन वेळा सभात्याग केला. त्यामागची कारणे इतकी क्षुल्लक आहेत की सभात्यागाला घटनेत जे गंभीरपणाचे स्वरूप असते ते राहिले नसून रस्त्यावरील इतर निदर्शनातील तो एक प्रकार होऊन बसला आहे. प्रांताचा जमाखर्च आणि अंदाजपत्रकासारखे प्रश्न असेंब्लीपुढे असताना समितीचे सभासद त्यावर कांही न बोलता भलभलते वक्तव्य करीत सुटतात. आपल्यासमोर असलेल्या विषयाला धरून त्यांतून लोकांना कांही शिकता येईल असे त्यांच्या भाषणांत कांही असत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या नांवावर विसंगत, अद्वातद्वा, थिल्लर आणि विषयाचा बिलकुल संपर्क नाही अशी वक्तव्ये ऐकल्यानंतर वऱ्हाड, मराठवाडा किंवा गुजरात, कच्छ, काठेवाड यांतील सभासदांना महाराष्ट्रांत बुद्धिमत्ता आणि अभ्यास कुठे आहे की नाही आणि श्वानं, युवानं, मघवानं याप्रमाणे महाराष्ट्राने निवडून दिलेले हे सारेच पुढारी एका माळेतले कसे बनले, असा विचार येत असल्यास नवल नाही, असे हे समितीचे लोकनियुक्त सभासद उद्या सुदैवाने अगर दुर्दैवाने अधिकारावर आले तर ते राज्यकारभार काय करणार आणि महाराष्ट्रांतील लोकशाहीचा गाडा तरी चालला आहे कुणीकडे, असे या प्रसंगाने वाटल्याखेरीज रहात नाही.

अंदाजपत्रकावर बोलताना त्यातील जमाखर्चाबद्दल एकालाहि व्यवस्थित कांही सांगता आले नाही. समितीतील उपलब्ध असलेली बौद्धिक रुचि आणि पातळीच्या दृष्टीने आचार्य अत्रे हा त्यांचा उच्च बिंदु. ते म्हणाले की अर्थसंकल्पातील आंकडे बिकडे आपणाला कांही समजत नाही. "माझ्यासारख्या सामान्य माणसाला ते जमणार नाही." या वाक्यापुढे (हंशा) असे प्रासंगिक परिस्थितीचे वर्णन त्यांच्याच संपादकत्वाखाली चाललेल्या मराठा पत्रांत दिले आहे. परंतु हा हंशा कुणाचा, अत्र्यांचा, हंसणाऱ्या प्रेक्षकांचा, संयुक्त महाराष्ट्र समितीचा, किंवा महाराष्ट्रांतील लोकप्रतिनिधित्वाचा ? आचार्य अत्र्यांचे भाषणातील एक भाग दारूबंदीबद्दल होता. ही दारूबंदी कशी चालली आहे आणि लोकांच्या सहकार्याशिवाय यशस्वी होणार नाही, याचा पुरावा म्हणून असेंब्लीत त्यांनी असे आव्हान दिले की "पंधरा मिनिटात सांगाल त्या तऱ्हेची दारूची बाटली येथे आणून दाखवितो." अत्र्यांच्या या पराक्रमाबद्दल कुणास आश्चर्य वाटणार नाही. कारण हा विषयच मुळी त्यांच्या इतका चिरपरिचयाचा आत्मसात आहे की लागेल त्या तऱ्हेच्या दारूची बाटली ते कुठूनहि आणून दाखवितील. तो विक्रम फार थोड्यांना करता येईल. परंतु त्यांचे वक्तव्य तेवढ्यावर थांबले नाही. आदल्या दिवशी दारूबंदी मंत्र्यांनी म्हटले होते की प्राचीन काळी या देशांत दारूला स्थान नव्हते. त्यावर वाचन करून आचार्य अत्र्यांनी आधार शोधून काढला होता. असेंब्लीत अर्थ विषयावर बोलताना अत्र्यांच्या जमेच्या बाजूला वाचन आणि ग्रंथांतरीचा आधार हा एवढाच होता.

आर्य वैद्यकाचा आधारस्तंभ जो वाग्भट त्याने आपल्या चिकित्सेत आपल्या ग्रंथाच्या २७८ पानावर म्हटले आहे, असे सांगून आचार्य अत्र्यांनी खालील उतारा वाचून दाखविला, "अग्नि प्रदिप्त करणारा, रुचि करणारा, शोक, भय यांचे निवारण करणारा, आरोग्य शक्तीस पुष्टि देणारा असा मद्यापेक्षा दुसरा चांगला पदार्थच नाही. म्हणून आयुष्याचे रक्षण करणाऱ्या सात्विक पुरुषाने ते नहमी प्यावे. हे हितावह असून, धर्माचे उत्तम साधन आहे." वाग्भटाच्या या उताऱ्याबरोबर आचार्य अत्र्यांनी या विषयावर आपला आजपर्यंतचा अनुभव सांगितला असता तर ते कदाचित आणखी परिणामी आणि बहारीचे झाले असते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या निवडणुकीतील प्रचारतंत्रापासून तो कायदेमंडळातील मतप्रदर्शनापर्यंत विचार आणि व्यवहार दोन्ही क्षेत्रांत कम्युनिस्टांचे तंत्र निर्माण झाले आहे. आचार्य अत्र्यांच्या भाषणांत वरीलसारखे गदळ असले तरी कम्युनिस्ट प्रचारातला एक मध्यवर्ती मुद्दा चांगला उगाळण्यांत आला होता. तो मुद्दा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रचारातला एक भागच होऊन बसला आहे.

समोरची सत्ता हाणून पाडावयाची झाल्यास त्याचे मुख्य बळ जे पोलीस त्यांवर विचार, उच्चार आणि आचार अशा तिन्ही बाजूने आघात करावयास पाहिजे आहे. महागुजरातच्या भाषिक चळवळीवर कम्युनिस्टांची छाप पडून अहमदाबादमध्ये पोलीस आणि पोलीस कचेऱ्यांवर हल्ले होत, ते या तंत्राला धरून. आचार्य अत्र्यांनी पोलीस खात्यावर होणाऱ्या खर्चाबद्दल टीका केली यांत विशेष नाही. परंतु त्यांनी त्यामागचा जो कार्यकारणभाव सांगितला तो कम्युनिस्टांच्या विचारमालिकेतला हिरा म्हणावयास हरकत नाही. ते म्हणाले, प्रांतांतील औद्योगिक शहरात जे पोलीस दल इतर ठिकाणापेक्षा मुद्दाम अधिक ठेवले आहे, त्याचे कारण कामगारांना "ठेचण्यासाठी." त्याचे एक विशिष्ट उदाहरण पुढे करताना ते म्हणाले "या शहरातील (मुंबई) कामगार हा अतिशय जागृत आहे. राजकीय आंदोलनात तो नेहमी आघाडीवर राहिला आहे. त्याला ठेचून काढण्यासाठी हे एवढे पोलीस सरकारला हवे आहेत. इंग्रज राजवटीत स्वातंत्र्याची चळवळ दडपण्यासाठी पोलीस लागत. आता लोकशाहीचे आंदोलन ठेचून काढण्यासाठी इतके पोलीस ठेवले आहेत." सारांश ही भाषा श्री. डांगे आणि ऐपालन यांची असून संयुक्त महाराष्ट्र समिति ही आता कम्युनिस्ट कर्तव्यक्षेत्राची एक शाखा झाली आहे.

प्रांताच्या कायदेमंडळांत समितीच्या पक्षाचे नेते म्हणून श्री. एस. एम. जोशी यांना पुढे केले असले तरी या सगळ्या जमान्यात महाराष्ट्रांतील प्रजासमाजवादी दिशाहीन आणि निर्माल्यवत बनले आहेत. स्वत: श्री.एस.एम.जोशी यांची स्थिति इंग्रजांना जाऊन मिळालेल्या राघोबासारखी झाली आहे. इंग्रजांच्या छावणीत राहून पेशवाई मिळवू आणि चालवू अशी राघोबाची समजूत, त्याप्रमाणे कम्युनिस्टांच्या अंकित राहून संयुक्त महाराष्ट्र संपादू अशी श्री. जोशी यांची भावना आहे. इंग्रजांना सोडले तर आपण आणि आपल्या बाजूचे इतर सरदार आणि बारगीर निर्माल्यवत होतील असे राघोबाला वाटे. त्याप्रमाणे कम्युनिस्टांस सोडल्यास आपल्याला मुळी स्थान राहणार नाही अशी भीति श्री. जोशी आणि समितीत सामील झालेले पक्ष, गट अगर पुढारी यांना वाटू लागली आहे. त्यामुळे जितके प्रांत तितकी वेगळी राष्ट्रे आणि महाराष्ट्र हे एक स्वतंत्र राष्ट्र असे कम्युनिस्ट पुढारी डांगे म्हणाले तरी चालते. असेंब्लीत स्वतंत्र पक्ष म्हणून रहावे असे अखिल भारतीय प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीचे मत असले तरी पक्षातून मराठी प्रजासमाजवाद्यांना फुटावे लागल्यास चालेल, पण श्री. डांगे-ऐपालनना सोडता येत नाही. समितीच्या नांवावर असेंब्लीमध्ये कम्युनिस्ट मतप्रणालीला पोषक अशा भाषणांचा पूर वाढत असला तरी तो आवरता येत नाही. असे साऱ्याच बाजूने हातपाय बांधून घेऊन कम्युनिस्टांच्या छावणीत रहाणे श्री.एस.एम.जोशी यांना अवश्य झाल्यामुळे विधिमंडळातील पक्षनेते म्हणून त्यांच्या पुढारपणाला अर्थ उरला नाही. तेथील चर्चा, मते, भाषण आणि डावपेच यांत कम्युनिस्टांचे पुढे समितीत सामील झालेल्या इतर कोणत्याच पक्षाचा अगर तथाकथित पुढाऱ्यांचा प्रभाव दिसत नाही. वाईट एवढेच वाटते की याच प्रांताच्या विधिमंडळात पारतंत्र्य काळात डॉ. आंबेडकर, रँ. परांजपे, बॅ. जयकर, सर नारायण चंदावरकर, श्री. भास्करराव जाधव आणि डॉ. गोपाळराव देशमुख बसत त्या जागी स्वराज्यात महाराष्ट्राच्या प्रतिनिधीत ही अशी अवस्था झालेली दिसावी.

मराठेय क्रमांक -५ ३० ऑक्टोबर १९५७

# सकाळ

## समितीचे राजकारण

प्रतापगडावर छत्रपति शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते शनिवार ३० नोव्हेम्बर रोजी करावयाचे ठरले असून ते त्यांना अशक्य करून टाकण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे गडावर आणि आजूबाजूस 'प्रचंड' निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. मुंबई कायदेमंडळांत निवडून आलेले समितीचे सर्व आमदार जातीने हजर राहणार असून वाटल्यास पंतप्रधानांनी त्यांच्या प्रेतावरून प्रतापगडावर चढून जावे असे समितीचे आव्हान आहे. निदर्शनाचा निर्णय असेंब्लीतील संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभासदांच्या कार्यकारिणीच्या बैठकीत मुंबई येथे २५ ऑक्टोबर रोजी घेण्यांत आला. त्याच्या दुसरे दिवशी पुण्यास शनवार वाड्यापुढील "विराट" सभेत आचार्य अत्रे व प्रभातकार वा. रा. कोठारी यांची त्यावर भाषणे झाली. त्याखेरीज समितीचे पुण्यांतील बाकी पुढारी निवडणुकीच्या प्रचारांतून या मुद्यावर जोर देत आहेत. पुण्याची निवडणूक जिंकल्यानंतर त्यांचा पुढला मोर्चा प्रतापगडावर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर निघणार असा आजचा बेत आहे. शनवार वाड्यापुढील भाषणांत आचार्य अत्रे म्हणाले, "नेहरू प्रतापगडावर शिवाजी पुतळ्याचे उद्घाटन करण्यास येतो, त्याला अधिकार काय? ज्यानी द्विभाषिक लादण्याचा कसोशीने प्रयत्न केला अशा महाराष्ट्रद्रोही माणसाचे अपवित्र हात पवित्र माणसाच्या पुतळ्याचे उद्घाटनाकरिता कशाला? त्यासाठी समिति आपले प्राण पणाला लावून निदर्शने करणार. समितीचे १३२ आमदार व खासदार त्यांत भाग घेणार. नेहरूला उद्घाटन करण्याचा अधिकार काय पोचतो? मोरारजीने माफी मागितली पाहिजे. ज्या कॉंग्रेसचे बारसे आम्ही १९३८ साली साजरे केले त्याचा खड्डा खणण्याचा प्रसंग असून त्यासाठीं आज मला येथे यावे लागले. प्रत्येक ठिकाणी कॉंग्रेसचा आम्ही मुडदा पाडणार."

कार्यकारिणीच्या सभेत निर्णय घेण्यांत आला तेव्हा असेंब्ली पक्षाचे श्री. एस. एम. जोशी अध्यक्ष होते. समितीच्या मध्यवर्ती निवडणूक मंडळाचे अध्यक्ष कम्युनिस्ट खासदार एस. ए. डांगे खास निमंत्रणावरून उपस्थित होते. भाई उद्धवराव पाटील, श्री. व्ही. डी. देशपांडे हे दोन उपनेते, चिटणीस श्री. दत्ता देशमुख, उपप्रतोद श्री. ए. बी. वर्धन, श्रीमंत विजयसिंह डफळे, प्रा. सदानंद वर्टी, श्री. हांडे, कम्युनिस्ट आमदार व्ही.डी. चितळे प्रभृति हजर होते. म्हणजे शनवार वाड्यापुढे आचार्य अत्रे कांही तरी भरांत बोलून गेले असा हा विषय नसून कायदेमंडळांतील समितीच्या सभासदांच्या कार्यकारिणीने घेतलेला हा निर्णय आहे. या क्षोभाचा मागचा थोडा इतिहास असा आहे की एका अमेरिकन विद्यार्थ्याशी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री असताना श्री. मोरारजीभाई कांही बोलले त्याचा सारांश म्हणून त्याने आपल्या एका स्नेह्याला लिहिले. त्या पत्रांत म्हटले होते की महाराष्ट्रांत हिंसक प्रवृत्ति आहे. इतिहासांत अफझुलखानाचा वध शिवाजीमहाराजांनी केला हे त्याचे एक उदाहरण होय. मोरारजीभाई अमेरिकन विद्यार्थ्याला हिंसा–अहिंसेचे धडे देत होते की काय, तसेच प्रांताच्या मुख्यमंत्र्यांनी कुणाशी कुठवर बोलावे याला कांही बंधन आहे की नाही, इत्यादि प्रश्नांचा विचार येथे कर्तव्य नाही. हिंदचे अर्थमंत्री श्री. कृष्णमाचारी यांनी न्यूयॉर्क टाईम्सच्या बातमीदाराला मुलाखत म्हणून जे सांगितले त्यावरून वादळ निर्माण झाले. ते आपल्या तोंडचे शब्दनशब्द नव्हते. मुलाखत संपेपर्यंत त्याने एकहि शब्द लिहून घेतला नाही, मी तसे बोललोच नव्हतो, असा खुलासा करता करता अर्थमंत्र्यांना आता पुरेवाट झाली आहे. तेव्हा मंत्र्यांची ही सार्वत्रिक खोड मोरारजीभाईंच्या अंगांत असेल तर नवल नाही.

श्री. मोरारजीभाईंनी खुलासा केला की आपल्या बोलण्याचा त्यात विपर्यास असून विद्यार्थ्याने जे कांही आपल्या मित्राला लिहिले, ते उभयतांतील संवादाचा अहवाल होऊ शकत नाही. आमच्या मते तोहि मुद्दा महत्वाचा नव्हे. श्री. मोरारजीभाई तसे बोलले होते असे गृहीत धरले तरी ही कुरापत काढून पंतप्रधान पंडित नेहरू यांना आव्हान देण्याचे आणि उद्घाटनाचे वेळी अतिप्रसंग करण्याचे समितीने जे योजले आहे, त्याचे कांही समर्थन होऊ शकत नाही. अफझुलखानाच्या वधांतील न्यायनैतिक बारकावा इतिहास संशोधकांनी काढीत बसावे. एक महाराष्ट्र सोडला तर सबंध देशांत आतापर्यंत इंग्रज इतिहासकारांनी त्यावर केलेली मल्लीनाथी रूढ आहे. तो गैरसमज संशोधनाच्या मार्गाने दूर व्हावयाचा तेव्हा होईल. परंतु एका अमेरिकन विद्यार्थ्याच्या खाजगी पत्रव्यवहारातील मजकुराचा आधार घेऊन पंडित जवाहरलाल नेहरूंनी मोरारजीभाईंना मंत्रिपदावरून काढून टाकले पाहिजे, तसे न करता ते शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यास येतील तर पाहून घेऊ, अशा धमक्या समितीच्या आमदारांनी घालणे म्हणजे वड्याचे तेल वांग्यावर काढणे होय. आमदार या नात्याने ते आपली जबाबदारी कशी जाणत नाहीत याचे आश्चर्य वाटते.

नेहरूंच्या विरुद्ध निदर्शने उभारून रक्तपाताचा प्रसंग आला तरी बेहेत्तर असा निर्णय घेण्याला जणु वरील कारण पुरे नाही, असे त्यांचे त्यांनाच वाटले म्हणून की काय, त्यांत भर घालण्यासाठी समितीच्या लोकांनी दुसरा एक आक्षेप काढला. तो असा की पंडित नेहरूंनी महाराष्ट्रावर एक राष्ट्र असून त्याच्या एका भागांतून दुसऱ्यात कोठेहि जाण्याचा नागरिकांना अधिकार आहे. ते आपल्या मनाप्रमाणे कुठल्याहि ऐतिहासिक पुरुषाचा पुतळा उभा करून त्याचे अनावरण करण्याला कुणालाहि बोलावितील. त्याविरुद्ध निदर्शन किंवा अतिप्रसंग कुणी घडवून आणू पाहील तर देशांतील जनतेच्या स्वातंत्र्यावर ते आक्रमण आहे.

संयुक्त महाराष्ट्र समितीची 'आदर्श घटना' नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. तीत समितीचा उद्देश लोकसत्ताक व समाजवादी महाराष्ट्र प्रस्थापित करणे असा दिला आहे. आता या महाराष्ट्रापुरते लोकसत्ताक समाजवादी राज्य झाले आणि इतर प्रांतातील लोकांनी आपल्या मताप्रमाणे दुसराच कांही निर्णय घेतला तर काय करावयाचे? आज आमचा हा उद्देश, बाकीच्यांचा कांही कां असेना, अशी त्यांची विचारसरणी दिसते. उद्या तामीळ प्रांतातील लोकांनी द्राविड राज्य स्थापन केले व तिथे हुकुमशाही आली तर समितीवाल्याना त्याबद्दल कांही बोलण्याचा आणि करण्याचा हक्क अगर अधिकार कसा पोचणार? ज्या त्या प्रांताने आपल्यापुरते पहावे, संघराज्याचे घटक म्हणून त्याना राहता आले, घेतले किंवा मान्य केले तर ठीक, नाही तर ज्याची त्याची वाट मोकळी असे हे तत्त्वज्ञान आहे. भाषावारी प्रांतरचनेच्या पोटांत देशाची फाळणी अभिप्रेत असून चौदा भाषांना धरून चौदा राज्ये या देशांत होतील असे आम्ही वारंवार म्हणत आलो त्याचा हा पुरावा आहे. इंग्रज प्रथम मद्रास आणि बंगालमध्ये उतरून अखेर महाराष्ट्र पोटांत घालू शकले, याचे कारण हा देश एक असून त्यांतला कुठलाहि भाग कुजला, किडला, परक्यांच्या कह्यांत गेला तर मग साऱ्या देशाला धोका असून संयुक्त महाराष्ट्र समितीने या प्रांतात आपल्यापुरते लोकसत्ताक राज्य प्रस्थापित केले तरी ते जाग्यावर राहणार नाही.

या साऱ्या अतिरेकीपणातील मूळ कीड अशी आहे कीं गेल्या निवडणुकीत आपल्याला जनतेने मते दिली म्हणजे आपणास वाटेल ते करावयास ताम्रपट मिळाला अशी समितीवाल्यांची जी समजूत झालेली दिसते ती जनतेच्या मतावर त्यांचे आक्रमण होय. पंडित जवाहरलाल नेहरू या देशाचे पुढारी म्हणून कोणी मान्य करो न करो, परंतु ते पंतप्रधान आहेत. त्यांच्याबाबत अशा तऱ्हेची भाषा, निदर्शने, रक्तपाताचा प्रसंग आला तरी बेहेत्तर असल्या धमक्या यांत पंतप्रधानांचा म्हणजे देशाचा आणि त्या देशाचा अविभाज्य भाग असलेल्या या महाराष्ट्राचा अपमान आहे. वेळीअवेळी कुरापती काढून आपल्यातील थोर थोर आणि देशास मान्य असलेल्या पुढाऱ्यांची नालस्ती करीत सुटणे हे कांही राजकारण नव्हे. ते केल्याने इतर प्रांतात महाराष्ट्राबद्दल तिटकारा आणि तुच्छता वाटू लागेल. परराष्ट्रांत आपली बेअब्रू होत जाईल. या देशाच्या टीकाकाराना आयताच मालमसाला मिळत जाईल. एका मोठ्या स्वतंत्र आणि स्वायत्त देशाचे नागरिक या नात्याने आपल्यावर कांही जबाबदारी येते, याचा किंचित विचार न करता बहकलेल्या माणसाप्रमाणे मन:पूतं समाचरेत् असे कसेहि आम्ही वागलो तरी महाराष्ट्रातील जनता आमच्यामागे आहे असे समितीवाले समजत असतील तर तो त्यांचा भ्रम होय.

सकाळ--पुणे,सोमवार, ता. ६ मे, सन १९५७

# व्यक्तित्व घडविणाऱ्या भाषेत व्यवहार होऊ द्या

# मराठी भाषिकवाद राष्ट्रवादाप्रमाणे परद्वेष्टा नाही

## भाषिक वादावर मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष प्रा. अनंत काणेकर यांचे भाषण

(आमच्या खास बातमीदाराकडून)


औरंगाबाद, ता. ५— "आज सर्व मराठी भाषिक एकत्र आले असले तरी भारताचे अविभाज्य भाग म्हणून मराठी भाषिकांचे मराठी भाषिक राज्य असणे मराठी भाषिकांचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो अजूनहि आपणाला मिळालेला नाही. तो मिळविणार अशी आपण प्रतिज्ञा केली पाहिजे" अशी विनंति ३९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मुंबईचे प्रा. अनंत काणेकर यांनी आज येथे भाषण करताना केली आहे.

### भाषिकवादाच्या चर्चेला प्राधान्य

मराठवाडा विदर्भ व महाराष्ट्र हा सलग मराठी भाषेचा भाग मुंबई द्विभाषिक प्रांतात एकत्रित आल्यानंतर भरणाऱ्या पहिल्याच साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष असल्यामुळे त्यांचे भाषण साहित्य परिषदेच्या नेहमी होणाऱ्या भाषणापेक्षा थोडसे निराळे भासले. भारतातील भाषिक वाद व त्यांत द्विभाषिक मुंबईतील मराठीचे स्थान याच प्रश्नाचे चर्चेत त्यानी भाषणातील सव्वा सहा हजार शद्बांपैकी पांच हजार शद्ब खर्ची घातले असून याच प्रश्नाला प्रमुख स्थान दिले आहे.

### आमच्या भाषिकवादाचे वैशिष्ट्य

मराठवाड्याचे साहित्यिक वैशिष्ट्याचे वर्णन करून ते आजचे प्रश्नाकडे वळताना म्हणाले, "जनतेचा सर्व व्यवहार त्या त्या जनतेच्या मायभाषेतूनच झाला पाहिजे. असे उच्च रवाने सांगणाऱ्या या महात्म्यांना विशाल मनस्क विश्ववादी म्हणायचे कीं संकुचित भाषावादी Linguism चे क्षुद्रमनस्क पुरस्कर्ते म्हणावयाचे असा प्रश्न आजच्या परिस्थितीत विचारावासा वाटतो. आज कांही उच्चपदस्थ थोरा--मोठ्यांच्या तोंडी 'भाषावादी' ही शिवी झाली आहे. तेव्हां 'भाषावादी' ही शिवी केव्हां ठरते आणि निरुद केव्हां ठरते याचा तुम्हां--आम्हासारख्या भाषासेवकांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे यांत शंका नाही. स्वभाषेचा काय, स्वभूमीचा काय किंवा स्वदेशाचा काय, जाज्वल्य अभिमान असणे ही गोष्ट मुळात कधीच वाईट नव्हती आणि नाही. हा अभिमान इतरांच्या भाषा दडपून टाकण्याच्या, इतरांच्या भूमीचे लचके तोडण्याच्या वा इतरांचे देश पादाक्रांत करण्याच्या इच्छेतून निर्माण झाला, तर तो संकुचित, प्रतिगामी किंवा शिवी देण्याचा लायकीचा ठरतो. आपल्या भारताचा राष्ट्रवाद मुळीच संकुचित किंवा प्रतिगामी नाही. त्याप्रमाणेच आम्हा मराठी भाषावाद्यांचा भाषावाद लवमात्र परद्वेष्ट नाही. भारताला ज्याप्रमाणे कुणावरहि आक्रमण करावयाचे नाही. किंवा कुणाची एक तसूभरहि भूमि घ्यावयाची नाही, त्याप्रमाणेच महा–



प्रा. अनंत काणेकर

### एकतेचे होणारे भयंकर परिणाम

निरनिराळ्या भाषिकांना एकत्रित आणून त्यांचे संबंध जोडण्याने कोणते दोष निर्माण होतात यांचे विवेचन करताना प्राध्यापक काणेकर म्हणाले,

राजीखुषीने जोडलेले संबंध आणि राजीखुशीने केलेली देवघेवच टिकाऊ आणि सुफलदायी होते. एका प्रदेशाची तंगडी दुसऱ्या प्रदेशाला जबरदस्तीने बांधली आणि दुतोंडी राज्ये निर्माण केली कीं दोघांत अधिक प्रेम निर्माण होईल आणि दोघांची अधिक प्रगति होईल ही कल्पना चकीचीच नव्हे तर घातक आहे. तीन तंगडी शर्यतीत लोक अडखळून पडतात, तुझ्यामळे मी पडलो अशी मित्रामित्रांत बाचाबाची होते, आणि बघणारे मात्र मजा पहात असतात. व्यवहारांत दुतोंडेपणा चांगला नाही. तसाच राज्यकारभारांतहि तो चांगला नाही. एका तोंडाच्या माणसापेक्षा दोन तोंडाचा चांगला, दोन तोंडाच्यापेक्षा तीन तोंडाचा आणि दहा तोंडाचा रावण सर्वांत चांगला अशी विशालतेची कांही लोकांची कल्पना आहे. ही विशालता नसून हा राक्षसीपणा आहे. तशीच एकता म्हणजे एकाची तंगडी दुसऱ्याला, दुसऱ्याची तिसऱ्याला, तिसऱ्याची चौथ्याला अशी अनेकांची गठडी वळली कीं भव्य एकता निर्माण होते असे

"मित्र हो, मराठी मायभाषेचा एक नम्र पाईक म्हणून भाषा महात्म्याचा हा प्रपंच आपणासारख्या जाणकार आणि भाषाप्रेमी रसिकांसमोर इतका वेळ केला. तो करण्याची संधि या इतिहासपुनित स्थळी आणि या इतिहास घडणाऱ्या काळी, हे बहुमानाचे स्थान देऊन आपण मला दिलीत याबद्दल पुन्हा एकदा आपणां सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून माझे भाषण मी पुरे करतो.

(स्वागताध्यक्ष भाषण पान ४ पहा)

### मिरजेत आरोग्यमंत्री कन्नमवार निरनिराळ्या संस्थाना भेटी दिल्या

(आमच्या बातमीदाराकडून)



श्री- कन्नमवार

मिरज, ता. ५- मुंबई प्रांताचे आरोग्यमंत्री श्री. एम. एस. कन्नमवार रविवारी सकाळी मेलनं येथे आले. अंबाबाई तालीम रौप्यमहोत्सव सामन्यांच्य बक्षीस समारंभासाठी त्यांचे आगमन आहे. मिरज नगरपालिका, मिरज मिशन हॉस्पिटल, महारोगी दवाखाना, क्षयरोग हॉस्पिटल या संस्थांना त्यानी भेटी दिल्या.

### दहा लाखाचे कर्जास मंजुरी द्यावी

माजी नगराध्यक्ष श्री. अप्पासाहेब देशपांडे यानी आरोग्यमंत्र्यांना नागरिकांच्या तक्रारी सांगितल्या. ड्रेनेजसाठी २६ वर्षांची योजना आखली आहे. नगरपालिकेने आपले साडेतीन लाख रुपये भरले आहेत. सरकारने काम चालू केले आहे. तीन लाख बारा हजार रुपयांचे काम पुरे झाले आहे. ड्रेनेज कामात नगरपालिका जितके पैसे भरील तितकेच म्हणजे साडेतीन लाख रुपये सरकारने द्यावयाचे ठरले आहे. हे पैसे सरकारने दिले असते म्हणजे आज सात लाखाचे काम झाले असते. पण ते झाली नाही. म्युनिसिपालिटीने ड्रेनेजसाठी दहा लाख रुपये कर्ज उभार-

# नव्या मुंबई प्रांतात येऊन — काय मिळविले?

**विदर्भाची प्रतिक्रिया... मराठवाड्याचे विचार...**

(आमच्या बातमीदाराकडून)

★"आमची लक्ष्मी गेली." ★"एका आगीतून निघून दुसऱ्या आगीत पडलो." ★"जेत्यांनी जितराष्ट्राला वागवावे तसे आम्हाला वागवितात" ★"मुंबई राज्याच्या कारभारांत माणुसकी नाही."

नव्या मुंबई राज्यांतील राजवटीचा एक वर्ष अनुभव घेतल्यानंतर विदर्भातील जनतेला काय वाटते याचे हे प्रातिनिधिक उद्गार आहेत. विदर्भातील लोकांची प्रतिक्रिया समजावून घेण्यासाठी नागपूर, वर्धा, अकोला, अमरावती वगैरे ठिकाणच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींशी मी बोललो. त्यांचे अनुभव, अडचणी ऐकल्या. थोड्याफार फरकाने वरील शब्दातच सर्वांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

## लोकनायक बापूजी अणे

### भाषिक चळवळ आता थांबवू या

सर्वात प्रथम लोकनायक बापूजी अणे यांची मी भेट घेतली. बापूजी म्हणाले, "भाषिक प्रांताची चळवळ आता थांबवून नवे अस्तित्वात आलेले राज्य आपण चालू दिले पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत तेच ...शहिताचे आहे. पुरेसा पैसा उपलब्ध होत ...सल्याने पंचवार्षिक योजनेत काटछाट ...रण्याचा विचार चालू आहे. ज्या भागांत ...रकारच्या प्रस्तुत अस्तित्वालाच विरोध ...हे तेथे योजनांच्या यशाकरिता जनतेचे ...वश्यक सहकार्य मिळण्याचा संभव कमी ...ल्यामुळे तेथेचप्रथम काटछाट होण्याचा ...व अधिक हे लक्षांत घेऊन आपल्या ...थिक प्रगतीच्याच दृष्टीने या चळवळी ...थांबविल्या पाहिजेत."

### ...ांचा कौलघेऊन निर्णय घ्यावा

...ाहे तेच राज्य चालावे असे आम्हाला ..., पण फेररचनेचा प्रश्न उपस्थित ...जाणारच असेल तर मात्र विदर्भाची ...ा व्हावीअशी आमची भूमिका आहे, ...ांगून श्री. अणे म्हणाले, "आमच्या लक्ष्मी गेली ही आमची खरी तक्रार ...द्विभाषिकाऐवजी संयुक्त महाराष्ट्र झाला तरी या परिस्थितीत काय ...डणार आहे? आमची राजधानी ...ी, सर्व तक्रारी आम्हाला येथल्या करून घेता येत होत्या. विदर्भाची ...जेव्हा होईल तेव्हाच ही परि...स्था निर्माण होईल. फेररचना ...असेल तर विदर्भाचे भवितव्य ...' किंवा अन्य मार्गाने तेथील ...त अजमावूनच ठरविले पाहिजे. ...स्वयंनिर्णयाचा हक्क मिळावा. ...क्त महाराष्ट्र समितीचे नेते ...णून त्यास संयुक्त महाराष्ट्रांत ...लोकांचा कौल घेऊन निर्णय ...च आमची लोकशाही भूमिका

...दूर गेल्याने येथील लोकांच्या ...डचणी दूर होण्यास विलंब ...रींची दाद लवकर लाग...था झाली पाहिजे, असे ... सुचविले.

### ...ला परका मानू लागले

...ळवळीतील एका अनिष्ट ...वेधून ते म्हणाले, "गुज...

...राती माणूस परका अशी भावना संयुक्त महाराष्ट्र समितीतील कांही नेत्यांची भाषणे व प्रचारामुळे बळावत आहे. त्याचप्रमाणे कांही अतिरेकी महागुजरातवादीहि महाराष्ट्रीयांबद्दल परकीयतेचा भाव प्रदर्शित करतात. दुसऱ्या भाषेच्या माणसाला परका मानण्याची ही प्रवृत्ति राष्ट्रीय ऐक्यास विघातक आहे. अन्य भाषिकाला आपण परका मानू लागलो तर मग फेडरेशनला–संघराज्याला कांही अर्थच रहाणार नाही. भाषाभिन्नत्वामुळे मनुष्य परका होतो व त्याशी सहकार्य करणे सुतराम शक्य नाही या कल्पना भरतवर्षातील लोकांनी अजिबात टाकून दिल्या पाहिजेत."

### नागपूर--अकोला करार निकामी

संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर नागपूर-करार व अकोला करार आम्ही अंमलांत आणू, अशी आश्वासने देऊन विदर्भातील लोकमत आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते करीत आहेत. त्यासंबंधी बोलताना बापूजी म्हणाले, "अशा करारांनी विदर्भातील लोकांचे समाधान होणे शक्य नाही, हे विदर्भातील लोकांच्या यातना ज्यांना खरोखर समजल्या आहेत असा कोणताहि माणूस सांगू शकेल."

जुना मध्यप्रदेश होता तेच ठीक होते. नवे प्रांतच निर्माण करावयास नको होते. म्हणजे त्यांतून उद्भवलेल्या या कटकटीहि उद्भवल्या नसत्या, असेहि विदर्भातील कांही लोकांचे मत असल्याचे त्यांनी सांगितले.

### लोकक्षोभकारी निदर्शनास विरोध

विदर्भाचा प्रांत व्हावा अशी आमची भूमिका असली तरी त्यासाठी आज आमचा आग्रह नाही. सध्याचा प्रांत यशस्वी होण्यासाठी सहकार्य देण्याची आमची तयारी आहे व आम्ही ते देत आहो. संयुक्त महाराष्ट्र समितीप्रमाणे संप, सत्याग्रह वगैरे चळवळी करून सरकारचे मार्गात आम्हाला अडथळे आणावयाचे नाहीत. प्रसंग उपस्थित होईल तेव्हा तर पूर्णपणे सनदशीर व कायदेशीर मार्गानीच आम्ही आमची मागणी मिळवण्याचा प्रयत्न करू, असे सांगून स्वराज्यांत स्वतः-च्याच सरकारविरुद्ध संप, सत्याग्रह, लोकक्षोभकारक निदर्शने वगैरे स्वरूपाच्या चळवळी करण्यास श्री. अणे यांनी पूर्ण विरोध दर्शविला.

'द्विभाषिक राज्याचे निर्णयांत लवकर बदल केला जाईल असे आपणास वाटते काय?' असे विचारता बापूजी म्हणाले, "दुसरी पंचवार्षिक योजना पूर्ण होईपर्यंत व या निर्णयास पाठिंबा देणारी लोकसभा कायम असेपर्यंत तरी हा द्विभाषिक मुंबई प्रांताविषयीचा निर्णय बदलण्याचा मला फार कमी संभव वाटतो."

### कम्युनिस्टांचे बळ वाढत आहे

"संयुक्त महाराष्ट्रवादी चळवळ ही काँग्रेसविरोधी गटांच्या संयुक्तीकरणामुळेच जीव धरून राहिली आहे. यामुळेच कम्युनिस्ट पक्षाचे बळ वाढत आहे व ते वाढण्यास इतर काँग्रेसविरोधी पक्ष अप्रत्यक्षपणे साहाय्य करीत आहेत. या अनिष्ट प्रकाराची जेवढी जाणीव प्रस्तुत संयुक्त महाराष्ट्रवादी पक्षांत असावयास पाहिजे तेवढी दिसत नाही, असे मला मोठ्या दुःखाने म्हणावे लागते."

## श्री. रा. कृ. पाटील

### अडचणीचे पहाणीसाठी कमिशन

राज्यपुनर्रचनेनंतर विदर्भ, मराठवाडा, तसेच सौराष्ट्र व कच्छ या मुंबई राज्यांत नव्याने सामील झालेल्या प्रदेशात काय अडचणी आहेत, लोकांची प्रतिक्रिया, तक्रारी, अनुभव काय आहेत याची पहाणी करून...

...एकीकरण घडवून आणण्यासाठी दळणवळण वाढले पाहिजे. कायद्यांत एकसूत्रीपणा आणताना निरनिराळ्या विभागांतील पूर्वीच्या सवलती व चांगल्या गोष्टी राहू दिल्या पाहिजेत. म्हणजे नव्या राज्यांत आपल्यावर अन्याय झाल्यासारखे त्यांना वाटणार नाही. भावनात्मक एकीकरणास कांही कालावधि जावा लागेल, असे श्री. पाटील यांनी सांगितले.

### संयुक्त महाराष्ट्रांत विदर्भाचे हित

सध्याचे द्विभाषिक राज्य, संयुक्त महाराष्ट्र व विदर्भ यांपैकी कोणता पर्याय येथील लोकांच्यादृष्टीने आपणास हिताचा वाटतो, असे विचारता श्री. पाटील म्हणाले, "योग्य तऱ्हेने विकेंद्रीत शासन मिळाले तर संयुक्त महाराष्ट्रांत रहाण्यातच विदर्भाचे हित आहे. सध्याच्या द्विभाषिक राज्यांत संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना खरोखर तक्रारीला जागा नाही. खरी तक्रार आहे ती गुजरात्यांची. एका जमातीला दुखवून संयुक्त महाराष्ट्र आणणे योग्य नाही."

### मुंबईचा प्रश्न व मद्रासचा दाखला

मुंबईच्या वादासंबंधी बोलताना मद्रासचा दाखला देऊन ते म्हणाले, "आंध्र व तामीळनाडमध्ये मद्राससंबंधी वाद होता. तामीळनाडने प्रथम स्वतंत्र प्रांताची मागणी केली असती तर त्याला मद्रास सोडावे लागले असते. आंध्रने ती केल्याने त्याला मद्रासवरचा हक्क सोडावा लागला. मुंबईबाबत तसे होण्याची शक्यता आहे. गुजरातचे जनतेने आपणहोऊन महागुजरात अलग करण्याची मागणी केली तर त्यांना मुंबई शहरावरचा हक्क सोडावा लागेल."

### अधिक परिचयांत काय दिसले

पुण्यामुंबईकडचे लोक अहंभावी, ताठरलेले अशी येथील लोकांची समजूत आहे, पण आपला स्वतःचा तसा अनुभव नाही, ते बौद्धिकदृष्ट्या सर्वसाधारणपणे फार पुढारलेले असतील असे वाटत होते, पण अधिक परिचयाने ...

...पु... ता... अ... हिस... प्राध्... म्हण...

" ... तर ... पुढारलेल... बरोबरच ... येथे झाल... पुराणमतव... तर वादहि ... व मराठा ... गुण्यागोविंद... सांभाळतात


### मराठी म...

शाळांतून ... येथे सुरू झाले ... कोर्टातूनहि म... आहे. मुंबई ... भाषा म्हणून ... माध्यमाची म... हायस्कूल बोर्ड ... तत्वांना अधिक ... परीक्षा घेत न... ठरविते.

प्रादेशिक भा... तर पारिभाषिक ... व त्यासाठी पूर्वी... खास भाषाखाते ... नव्या सरकारने ... टाकले."

### महत्वाचे निर्ण...

राज्यकारभाराब... अडचणींसंबंधी ... म्हणाले, "कच्छपासू... लेल्या नव्या विशाल... झेपणे सरकारला कठ... दिसते. त्यामुळे पत्रां... मिळणे, महत्वाचे निर्ण... येथील परिस्थितीच्या... चुकीच्या सूचना व हु... येथील लोकांच्या सार्व...



# मराठवाड्याची बोलकी प्रतिक्रिया-

(आमच्या बातमीदाकडून)

❋ राज्यकारभारात कमालीची लांचलुचपत, ❋ मागासलेले म्हणून मराठवाड्याची हेटाळणी, ❋ विकास कार्यांच्या नांवाने गोंधळ, ❋ प्रभावी नेतृत्वाचा अभाव, ❋आमदार व मंत्री लक्ष देत नाहीत, ❋ बाहेरून आलेले अधिकारी अहंमन्यतेने वागतात.

नव्या मुंबई राज्यात सामील होऊन एक वर्ष अनुभव घेतल्यानंतर मराठवाड्यांतील जनतेला काय वाटते याचे हे प्रतिनिधिक उद्गार आहेत. निरनिराळ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, वकील डॉक्टर, शिक्षणतज्ज्ञ व स्वतंत्र कार्यकर्ते यांनी हे विचार व्यक्त केले आहेत. प्रत्यक्ष द्विभाषिका-विरुद्ध तक्रार थोडी पण बाहेरचा नोकरवर्ग आणि त्यांचा कारभार याबद्दल मात्र कडाडून सर्वांनी टीका केलेली दिसून येते. पूर्वीच्या मोगलाईपेक्षांहि नव्या राजवटीत अधिक गोंधळ आणि अराजक असल्याचे बोलण्यांत येते.

## डॉ. गणपतराव वैद्य

काँग्रेस कार्यकर्ते

### नववधूसारखी स्थिति

#### अनोळखीपणांतहि आपलेपणा

मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्याची प्रगति अगदी निश्चित आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर आमचा पूर्ण विश्वास आहे. मुख्य मंत्र्यांना आमच्या भागाबद्दल आस्था आहे, प्रेम आहे, कळकळ आहे, याची जाणीव निश्चितपणे आम्हाला आहे.

मुंबई सरकार आमच्या विभागाचा विकास होण्यासाठी पाण्यासारखा पैसा ओतीत आहे. त्यांनाहि तळमळ आहे आणि आम्हालाहि मुंबई राज्याच्या इतर प्रगत विभागाबरोबर येण्याची निकड—जरुरी वाटते, तशी आंचहि आहे.

आमच्या अधिकाऱ्यांकडे इतर विभागांतील जे अधिकारी ज्या एका विशिष्ट दृष्टिकोनांतून पहातात तो दृष्टिकोन बदलला पाहिजे.

आज आम्हाला सर्व क्षेत्रांतच प्रगति करावयाची आहे. सरकारच्या शासन-व्यवस्थेत जी एक झांपड घालून ठराविक क्रमाने कार्य करण्याची पद्धति आहे ती चूक आहे. शेतीसाठी ट्रॅक्टरची जरुरी असेल तर त्याच्या स्टाफवर खर्च करण्यांत येतो, परंतु खुद्द ट्रॅक्टरचा मात्र पत्ता नसतो. अशा गोष्टी घडत आहेत आणि याच कारणामुळे जनता आज या विकास कार्याकडे उपेक्षित दृष्टीने पहात आहे.

नव्या नव्या फाईल्स लवकर निकालांत निघतात, परंतु जुन्या फाईल्स कित्येक वर्षांपासून तशाच पडून आहेत.

आजच्या नव्या राज्यांतल्या अनोळखीपणांतहि एक प्रकारचा आपलेपणा आहे. ज्याप्रमाणे एखादी नववधू सासरी जाते त्यावेळी माहेरच्या आपलेपणांत एकप्रकारचा वेगळेपणा निर्माण होतो आणि त्याचबरोबर अनोळखी 'सासर'शी आपलेपणाची भावना निर्माण होते. नेमक्या या नववधूची स्थिति मराठवाड्याची आहे.

## डॉ. गोपाळदास श्रॉफ

स्वतंत्र सामाजिक कार्यकर्ते

### लोकशाहीचा विकास-उद्दिष्ट

एकभाषिक राज्य चांगले यांत संशय नाही, पण लोकसभेने ज्याअर्थी द्विभाषिकाचा निर्णय घेतला आहे नवीन निवडणुकी होऊन नवीन मंत्रिमंडळहि पण वास्तव्यांत आले आहे, तेव्हा त्यांच्यातले चांगले तितके घेऊन त्यांचा विकास करणे अत्यावश्यक आहे. लोकशाहीच्या विकासासाठी एकभाषिकत्वाचे साहाय्य होते, हे अगदी खरे आहे, परंतु द्विभाषिकामुळे लोकशाहीच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होतात असे अगदीच नाही. आपले मूळ उद्दिष्ट लोकशाहीचा विकास आहे हे आपण विसरता कामा नये.

### गुणी व लायक माणसे मागे पडली

राज्यपुनर्रचना झाल्यानंतर मराठवाड्याच्या जीवनांत राजकीयदृष्ट्या जो बदल झाला त्यास थोडीशी ऐतिहासिक परंपरा आहे. हैद्राबाद राज्यांतील निरनिराळ्या भाषिकांचे जरी एकच वास्तव्य होते तरी पण त्यांचे भावनात्मक एकीकरण मात्र पूर्णपणे झालेले होते. आज मराठवाड्याचे जीवनांत प्रभावी नेतृत्वाचा अभाव असून त्यामुळे लोकांचे प्रश्न सुटत नाहीत हे खरे आहे. मराठवाड्याच्या विमोचनासाठी ज्या नत्यांनी खटपट केली ते काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांचे मतभेद झाले आणि त्याचा परिणाम निर्माण झालेली पोकळी परिस्थितीनुसार भरून निघाली आणि ज्या लोकांच्या मनामध्ये मराठवाड्याच्या उन्नतीसाठी तळमळ नाही, योजना नाही ते लोक पुढे आले, अधिकारावर गेले. याचा परिणाम काँग्रेस संघटनेमध्ये प्रामुख्याने दिसून येतो आणि त्यामुळे मंत्रिमंडळावर किंवा उच्च श्रेणीच्या राजकारणांत मराठवाड्याची बाजू प्रभावीपणे मांडल्यासारखे दिसून येत नाही. विशेषत्वाने देशप्रेमाने प्रेरित झालेली माणसे काँग्रेस संघटनेत घेऊन त्यांना पुढे नेण्याऐवजी त्यांना मागे खेचण्यांत येते असा सर्वत्र आरोप आजच्या नेतृत्वावर करण्यांत येत आहे. त्याचा परिणाम असा होत आहे की गुणी आणि लायक माणसे मात्र मागे पडत चालली आहेत. त्यांच्यामधील उदासीनता अधिक वाढत आहे. ध्येयनिष्ठ लोकांची काँग्रेसमध्ये उणीव प्रामुख्याने भासत आहे.

## श्री. विजयेंद्र काब्रा

मराठवाडा प्रजासमाजवादी पक्ष—अध्यक्ष

### उच्च गंडाची भावना-अनुभव


"कुणालाहि राग येवो, पण एकदा कुणी तरी स्पष्ट सांगितलेच पाहिजे. कुर्डुवाडी व मनमाडपलीकडील मंडळींना स्वतःबद्दल थोडासा उच्च गंड आहे, हा सार्वत्रिक अनुभव आहे. बड्या द्विभाषिक राज्यांत काय किंवा संयुक्त महाराष्ट्रांत काय, अशा प्रकारचा उच्च गंड कोणीहि चालू देणार नाही. आम्ही मराठवाड्यांतील माणसे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने मागासलेले असू, परंतु सहृदयता आणि माणुसकीची मूल्ये, या सर्वच प्रश्नांकडे सहानुभूति आणि सहनशीलतेने पहाणे आमच्यांत इतरांपेक्षा असलेले जास्त गुण आहेत. परंतु इतरांनी त्याचा दुरुपयोग करून घेता कामा नये.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामांत इतरांनी बलिदान केले असेल, तर मराठवाड्याने निजाम व रझाकारांशी दोन हात केलेले आहेत.

पंचवीस ते तीस इंचापर्यंत पाऊस, कारखानदारीकरिता नसलेले भांडवल, कमी वाहतुकीची साधन, खनिज पदार्थ नसलेला असा आमचा दुर्दैवी भाग आहे. म्हणून त्यामुळे आमच्याकडे अधिक लक्ष देण्यांत यावे, अशी आमची अपेक्षा आहे. जो कोणी ती पूर्ण करील त्याला मराठवाडा डोक्यावर घेऊन नाचेल. गेल्या शतकापासून उपेक्षित असल्यामुळे ही उपेक्षा पुढे चालू शकणार नाही आणि याबाबतीत राज्यकर्त्यांनी अकारण संघर्ष निर्माण होऊ देऊ नये, अशी माझी नम्र सूचना आहे.

**क) नकाशा सुची क्र. ३**

३० नोव्हेंबर 1957 - नकाशा - क्रमांक 2




# पुण्यांतील नेहरू जाहीर सभेची व्यवस्था

पुणे, ता. २९–पुण्यातील शनिवारची नेहरूंची सभा इंजिनियरिंग कॉलेज मैदाना वर रात्री आठ वाजता ठेवण्यात आली आहे. तेथील सर्व तयारी पूर्ण झाली आहे. तेथे सुमारे एक लाख लोक तरी बसू शकतील असा अंदाज आहे. गोडाऊन रस्त्यावरील श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूलचे प्रवेशद्वार तसेच शिवाजी रस्त्यावरील दुसरे प्रवेशद्वार पुरुषांना जाण्यासाठी ठेवले असून इंजिनियरिंग कॉलेज वसतिगृहाजवळचे रस्त्यावरून स्त्रियांसाठी प्रवेशद्वार ठेवले आहे. परततांना त्याच रस्त्याने जावयाचे आहे. सभेची व्यवस्था वरील नकाशावरून येईल. पंडित नेहरू प्रतापगडाहून सायंकाळी परतल्यावर स्वारगेटहून शंकरशेट रोडमार्गे एल्फिन्स्टन रोडने वेस्ट एंड सिनेमा, ससून हॉस्पिटल या मार्गाने लगेच सभेच्या जागी जाणार आहेत.

## ड) छायाचित्र सुची क्र. २

सकाळ

0000 Regd No B. 2948 Licence No. 37 Licenced to Post Without Prepayment किंमत ६ नवे पैसे

VOL XXVI NO. 105 DAILY SAKAL Friday, 3 May, 1957 शुक्रवार, ता. ३ मे, १९५७, वर्ष २६ वे, अंक १०५




मुंबईचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी गुरुवारी पुण्यास धावती भेट दिली. पर्वती गांवच्या मागच्या बाजूस माजी सैनिकांच्या मुलांसाठी बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहाची कोनशिला मुख्यमंत्री बसवीत असताना घेतलेले पहिले छायाचित्र. त्यांच्याशेजारी पुण्याचे कलेक्टर डॉ. ए. यू. शेख आहेत. खडकीच्या हॅरिस पुलाखाली मुळा नदीत बुडणाऱ्या तिघांना मिलिटरी इंजिनियरींग कॉलेजांतील बी. सेनगुप्ता यांनी आपला जीव धोक्यात घालून वाचविले होते. या त्यांच्या पराक्रमाबद्दल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांना तलवार बक्षीस देण्यात आली. ती देत असताना घेतलेले दुसरे छायाचित्र.

# सकाळ

Regd. No. B. 2948 Licence No. 37 Licenced to Post Without Prepayment

VOL XXVI NO. 157 DAILY SAKAL Wednesday, 3 July, 1957 बुधवार, ता. ३ जुलै, १९५७, वर्ष




पं. नेहरूंनी आपल्या नॉर्वेमधील भेटीत तेथील किंडर गार्डन शाळेला भेट दिली त्या प्रसंगी घेण्यांत आलेले छायाचित्र, दोन लहान मुलांशी ते खेळत असताना वरील चित्रांत दिसत आहेत.

## असेंब्लीतील विरोधी पक्ष म्हणून सं. महाराष्ट्र समितीस मान्यता



एस. एम. जोशी

### मुंबई प्रांतास केंद्राकडून अधिक मदतीची मागणी

#### असेंब्लीत विरोधकांतर्फे अभिनंदन

(आमच्या बातमीदाराकडून)

मुंबई, ता. २–मुंबई असेंब्लीत आज अंदाजपत्रकावरील चर्चेच्या दुसऱ्या दिवशी बऱ्याच सभासदांनी केंद्राकडून अधिक आर्थिक मदत मिळविण्याची आणि प्रांताच्या ज्या भागांत दारूबंदी नसेल, त्या ठिकाणी ती लागू करण्याची मागणी केली.

श्री. शशीशेखर आठले यांनी आपले भाषण पुढे चालू करताना, रत्नागिरी जिल्हयाचे विकासाकडे अधिक लक्ष पुरविण्याची सरकारकडे मागणी केली. रत्नागिरी जिल्हयांत चांगले रस्ते नाहीत,

### नऊ जहागिरदारांचे तनखे पाच वर्षे बंद होत नाही

(आमच्या बातमीदाराकडून).

कोल्हापूर, ता. २– मुंबई सरकारकडून कोल्हापुरांतील नऊ जहागिरदारांना मिळणारे तनखे १ जुलैपासून बंद करण्यांत येणार होते. पण हा हुकूम पुढील पांच वर्षे तहकूब करण्यांत आला आहे. १जुलै १९६२ पासून मात्र जहागिरदारांचे तनखे रद्द करण्यांत येतील, असे आज त्यांना कळविण्यांत आले आहे.

पहिला हुकूम मिळाल्यानंतर जहागीरदारांतर्फे एक शिष्टमंडळ मुंबईस जाऊन मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना भेटले व त्याचा परिणाम होऊन वरील हुकूम निघाला असावा, असे बोलले जात आहे.

---

डॉ. शांताबाई कोटेचा (काँग्रेस) यांनीहि विदर्भात दारूबंदी जारी करण्याची मागणी केली. मराठवाडा व सौराष्ट्र हे दोन अविकसित प्रदेश मुंबई प्रांतांत सामील झालेले असताना, सौराष्ट्राच्या

+ फोटो ८४७

# सकाळ


किंमत १ आणा

Regd. No. B. 2948 Licence No. 37 Licenced to Post Without Prepayment

85 DAILY SAKAL Saturday, 30 November, 1957 शनिवार, ता. ३० नोव्हेंबर, १९५७, वर्ष २६ वे, अंक २८


विले
सून
ती–उत्तर

ावरणप्रसंगी
ईपासून एक
याथुढे जाता

की या रस्त्यावरून
ताच सर्व निदर्शक

ासाठी वाईचे कॉंग्रेस
भास हजर रहाण्याचे
ांचे पुढाऱ्यांनी उत्तर

ा या स्मारकासाठी
एक चांगले ठिकाण
याचे रक्षण करण्याची
रेस्ट हाऊस, पिण्याच्या
टाक्यांची दुरुस्ती हे सर्व
डोळ्यापुढे आहे.

## वा निदर्शने नकोत

देवीचे देऊळ नवीन रंग
रंभानिमित्त सुशोभित केलेले
न दिवसापूर्वी श्री. व्ही. एम.
स. एम. जोशी गडावर नाईक
शी निदर्शनाबाबत भेटीसाठी
छत्रपती शिवाजीमहाराज
आज तुम्ही-आम्ही महा-



छत्रपति शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचे अनावरण आज शनिवारी दुपारी पंतप्रधान नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावर व्हावयाचे आहे. गडावर थेट वरपर्यंत पंडितजींना मोटारीतून जाता यावे म्हणून मुद्दाम तयार केलेल्या रस्त्याचे हे छायाचित्र आहे. चित्राचे, वरच्या बाजूस प्रतापगडाचा अफझुल्ला बुरुज दिसत आहे.

## पोलीस व नि
## कराचीमध्ये

### सुऱ्हावर्दींच्या मो

कराची, ता. २९–वि
निदर्शकांनी आज सायंकाळ
उडून तीत बारा लोक ज
ण्याचा काठ्यांना बांधले
सांनी लाठ्यांचा उपयोग

### सुऱ्हावर्दींच्या मोट

त्यानंतर कांही वेळाने
गटाने असेंब्ली इमा
प्रयत्न केला. परंतु त्या
तिची बैठक तहकूब
प्रसंगापूर्वी एका जम
पंतप्रधान एच. एस.
लाग करून त्यांचे
केली. गाडीचा वि
यांची मोडतोड इ
आदेश आज वि
पाळावयाचा होत
निदर्शकांचा जमा
विरुद्ध दिशेने
चालली असता
पादत्राण फेक
फोडून आंत

### नॅशनल गा

निदर्शक
वर पंतप्रधान
बाहेर आल
विभक्त म
परंतु तुम्ही
सांगितले.
घोषणा
निदर्शना
शहरांत

दैनिक केसरी



संयुक्त महाराष्ट्र समितीची 'शॅडो कॅबिनेट'
श्री. एस. एम. जोशी, कॉ. एस. ए. डांगे, श्री. दत्ता देशमुख.

दैनिक केसरी




संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे फाजलअली कमिशनला द्यावयाच्या निवेदनावर चर्चा करताना
स्वामी रामानंद, डॉ. धनंजयराव गाडगीळ, श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. देवीदास चौहान, श्री. कुंटे, श्री. नरवणे.



पं. जवाहरलाल नेहरु प्रतापगडावर गेले तेव्हा झालेली निदर्शने

(ता. ३० नोव्हेंबर १९५७)



**प्रतापगडचा मोर्चा**

प्रतापगडच्या पायथ्याशी मोर्च्याची छावणी पाडली होती. (ता. ३० नोव्हेंबर १९५७)



...का हातांत बंदुक व दुसऱ्या हातांत डांब...

काँग्रेसश्रेष्ठांचा महाराष्ट्रावर चाललेला दुहेरी हल...

“काँग्रेसला नेस्तनाबूत करा”

शनिवारवाड्यासमोर अत्रे यांचें प्रभावी भाषण


पुणें, दि. २९:—“ महाराष्ट्रांतून आज काँग्रेस नष्ट झाली आहे; पण ...य असा आपल्यापुढे प्रश्न आहे. भावी काळांत महाराष्ट्रांतील इतर ...क्षांनी बारीकसारीक मतभेद विसरुन डाव्या पक्षांची एकजूट करावी ... महाराष्ट्राच्या प्रश्नावर आगामी निवडणुका लढवाव्यात. ... काँग्रेसपक्ष अधिकारावर येतां कामा नये. डाव्यांची ...युक्त महाराष्ट्र मिळविण्याचें आधुनिक शस्त्र आहे. ... अधिकारारूढ झाली तर पुन्हा द्वैभाषिक राज्य ... टाळावयाचें असेल तर राजकीय दृष्ट्या महारा- ... व डाव्या गटाचें मंत्रिमंडळ बनवून तें भार- ...ते आपण हें कर्तव्यबुद्धीनें केलें तर ... होईल.”

मंगळवार दि. १५—... तीनिमित्त श्री. गो. म. ... अध्यक्षतेखाली साहित्याचा ... हरदास यांचें 'शंकराचार्य ... कार्य' ह्या विषयावर व्याख्यान.

बुधवार, दि. १६:—मॉक ... शन.

गुरुवार, दि. १७:—मो... (अभिरूप खटला) “वाङ्मय... वादाची समाज व साहित्यावरी...

शनिवा...वाड्यासमोर भाषण करतांना ...चार्य अत्रे



# गोळीबाराच्या चौकशीस पुनः न

## पोलिसांच्या संयमी वृत्तीचें मोरारजीकृत समर्थ

### महाराष्ट्रियेतरांच्या हुकमी बहुमताने ठराव फेटाळला !


( आमच्या वातमीदाराकडून )


मुंबई, दि. २०:—राज्य फेररचनेच्या प्रश्नावर मुंबई विधान सभेंत चर्चा सुरू असतां, दि. २१ नोव्हेंबर रोजीं कौन्सिल हॉलच्या रोखाने संयुक्त महाराष्ट्रवादी निदर्शकांनी मोर्चा नेण्याचा प्रयत्न केला असतां पोलिसांनी जो गोळीबार केला त्याची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी करणारा बिनसरकारी ठराव प्रजा-समाजवादी सदस्य श्री. पुजार यांनी आज मुंबई विधान सभेंत मांडला पण तो महाराष्ट्रीय आमदारांच्या लाचार मनोवृत्तीने व महाराष्ट्रियेतरांच्या हुकमी बहुमतामुळे प्रचंड बहुमताने फेटाळला गेला !

मुख्य मंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी आजहि न्यायालयीन चौकशीच्या मागणीस ... अशी चौकशी करणे आपणांस आवश्यक वाटत नाही व चौकशीचा कांही ... असे नेहमीच्या अरेरावी पणकाऱ्यांत श्री. मोरारजींनी बजावलें.

... गोळीबारांत १५ इसम ठार झाले. त्या ... श्री. देसाई ...

... बिनसरकारी ठराव ...


सरकारी मोटारींतून विषारी पत्रकांचा प्रचार
सेवानिवृत्त सैनिकांना समारंभाचा भाडेखर्च दिला जाणार !
इगतपुरीनजिक झालेला भीषण रेल्वे-अपघात
(आमच्या खास प्रतिनिधीकडून)
चलो प्रतापगड एक साथ
परवानगी मागणारा
अर्ज फेटाळला


होलिकोत्सवावर बंदी
पतियाळांत हरताळ
मंगळवार, दि. २४
अर्थमंत्री श्री. देशमुख राजिना
विश्वासघातास नकार
काँग्रेसच्या अवसानघातकी धोरणाचा निषेध
( आमच्या खास प्रतिनिधीकडून )
चिकित्सा समितींत 'होयबा' महाराष्ट्र
हायड्रोजन स्फोटांत
रशियाच पहिला
कट्टर महाराष्ट्रवाद्यां
पंतांच्या भाषणाने
महोत्सव


हुतात्म्यांनी तेजाळलेली भूमि अशी
हुतात्मा स्मारक
अनावरण

दैनिक मराठा म्हणजे आचार्य अत्र्यांचा जीव की प्राण होता.
त्याच संपादकीय खुर्चीत बसून आचार्यांनी
अनेक प्रखर अग्रलेख लिहिले.
▼






▲ अस
त्या



...ी, अच्युतराव पटवर्धन,
...वणे

संयुक्त महाराष्ट्र आंदोलन. प्रतापगडावरील मोर्चात अग्रभागी असलेल्या जीपमध्ये आचार्य अत्रे, शेजारी कॉम्रेड जी. एल्. रेड्डी व इतर








▲ आंदोलनाच्या या काळात अत्रे, एस्. एम्. व बॅ.नाथ पै विचारविनिमय करताना.

(५)

१९५० साली आचार्य अत्रे बेळगाव पत्रकार संमेलनाचे अध्यक्ष झाले.
या प्रसंगी प्रास्ताविक भाषण करताना दे. भ. गंगाधरराव देशपांडे ▼




छायाचित्र




## निदर्शनाचा खेळ—

समिति हुकूमशहा डांगे—चलो प्रतापगड!
नाराज समितीवाले—निदर्शने हाणून पाडा!

छायाचित्र 3 ऑक्टो 1957



## निदर्शन : पण कशाचे ?

(पंतप्रधान पंडित नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ ... त्यावेळी विरोधी निदर्शने करण्याचा निर्णय मुंबई असेंब्लीतील संयुक्त महाराष्ट्र ... चव्हाण एका मुलाखतीत म्हणाले, "एक महान नेता दुसऱ्या ... उचित नाही.")

## इ. संयुक्त महाराष्ट्रासाठी हुतात्मा झालेल्यांना अभिवादन

| | |
|---|---|
| १. सीताराम बनाजी पवार | १८. बालाण्णा मुतण्णा कामाठी |
| २. जोसेफ डेव्हीड पेजारकर | १९. धोंडू लक्ष्मण पारडूले |
| ३. चिमणलाल डी. शेठ | २०. भाऊ सखाराम कदम |
| ४. भास्कर नारायण कामतेकर | २१. यशवंत बाबाजी भगत |
| ५. रामचंद्र सेवाराम | २२. गोविंद बाबुराव जोगल |
| ६. शंकर खोटे | २३. पांडूरंग धोंडू धाडवे |
| ७. धर्माजी गंगाराम नागवेकर | २४. गोपाळ चिमाजी कोरडे |
| ८. रामचंद्र लक्ष्मण जाधव | २५. पांडूरंग बाबाजी जाधव |
| ९. के.जे. झेवियर | २६. बाबु हरी दाते |
| १०. पी.एस.जॉन | २७. अनुप महावीर |
| ११. शरद जी. वाणी | २८. विनायक पांचाळ |
| १२. बेदीसिंग | २९. सिताराम गणपत म्हादे |
| १३. रामचंद्र भाटीया | ३०. सुभाष भिवा बोरकर |
| १४. गंगाराम गुणाजी | ३१. गणपत रामा नानकर |
| १५. गजानन ऊर्फ बंडू गोखले | ३२. सीताराम गयादीन |
| १६. निवृत्ती विठोबा मोरे | ३३. गोरखनाथ रावजी जगताप |
| १७. आत्माराम पुरूषोत्तम पानवलकर | ३४. महंमद अली |
| | ३५. तुळशीराम पुंजाजी बेलसरे |

| | |
|---|---|
| ३६. देवाजी सखाराम पाटील | ५६. रामनाथ पांडूरंग अमृते |
| ३७. शामलाल जेठानंद | ५७. परशुराम अंबाजी देसाई |
| ३८. सदाशिव महादेव भोसले | ५८. घनश्याम बाबू कोलार |
| ३९. भिकाजी पांडूरंग रंगाटे | ५९. धोंडू रामकृष्ण सुतार |
| ४०. वासुदेव सूर्याजी मांजरेकर | ६०. मुनीमजी बलदेव पांडे |
| ४१. भिकाजी बाबू बावस्कर | ६१. मारूती विठोबा म्हस्के |
| ४२. सखाराम श्रीपत ढमाले | ६२. भाऊ कोंडिबा भास्कर |
| ४३. नरेंद्र नारायण प्रधान | ६३. धोंडो राघो पुजारी |
| ४४. शंकर गोपाळ कुष्टे | ६४. व्हदयसिंग दारजेसिंग |
| ४५. दत्ताराम कृष्णा सावंत | ६५. पांडू महादू अवरीकर |
| ४६. बबन बापू भरगुडे | ६६. शंकर विठोबा राणे |
| ४७. विष्णू सखाराम बने | ६७. विजयकुमार सदाशिव भडेकर |
| ४८. सीताराम धोंडू राड्ये | ६८. कृष्णाजी गणू शिंदे |
| ४९. तुकाराम धोंडू शिंदे | ६९. रामचंद्र विठ्ठल चौगुले |
| ५०. विठ्ठल गंगाराम मोरे | ७०. धोंडू भागू जाधव |
| ५१. रामा लखन विंदा | ७१. रघुनाथ सखाराम बिनगुडे |
| ५२. एडविन आमब्रोझ साळवी | ७२. काशिनाथ गोविंद बिंदूरकर |
| ५३. बाबा महादू सावंत | ७३. करपय्या किरमल देवेंद्र |
| ५४. वसंत व्दारकानाथ | ७४. चुलाराम मंबराज |
| कन्याळकर | ७५. बालमोहन |
| ५५. विठ्ठल दौलत साळुंखे | ७६. अनंता |

७७. गंगाराम विष्णू गुरव

७८. रत्नू गोदिवरे

७९. सय्यद कासम

८०. भिकाजी दाजी

८१. अनंत गोलतकर

८२. किसन वीरकर

८३. सुखलाल रामलाल बेसकर

८४. पांडूरंग विष्णू वाळके

८५. फुलावरी मगरू

८६. गुलाब कृष्णा खवळे

८७. बाबुराव देवदास पाटील

८८. लक्ष्मण नरहरी थोरात

८९. ठमाबाई विठ्ठल सूर्यभान

९०. गणपत रामा भुते

९१. मुन्शी वझीर अली

९२. दौलतराम मथुरदास

९३. विठ्ठल नारायण चव्हाण

९४. देवजी शिवन राठोड

९५. रावजीभाई डोसाभाई पटेल

९६. होरसमजी करसेटजी

९७. गिरधर हेमचंद्र लोहार

९८. सत्तु खंडू वाईकर

९९. गणपत श्रीधर जोशी

१००. माधव राजाराम तुरे (बेलदार)

१०१. मारूती बेन्नाळकर

१०२. मधुकरबापू बांदेकर

१०३. लक्ष्मण गोविंद गावडे

१०४. महादेव बारीकडी

१०५. कमलाबाई मोहिते

१०६. सीताराम दुलारी घाडीगावकर